होळकरांची कैफियत

संशोधन व टीपा

यशवंत नरसिंह केळकर

[सर्व हक्क प्रकाशकाधीन]

प्रकाशक :— सदाशिव लक्ष्मण कोकाटे
हनुमान प्रकाशन, ७१८ सदाशिव पेठ, पुणें ३०.

मुद्रक :— भाऊ लक्ष्मणराव कोकाटे
हनुमान छापखाना, ७१८ सदाशिव पेठ, पुणें ३०

द्वितीयावृत्ति] किंमत ८ रुपये [सन १९७२

प्रस्तावना

"होळकरांची कैफियत" ही बखर कै. का. ना. साने यांनीं काव्येतिहास संग्रहांत शके १८०८ म्हणजे सन १८८६ सालीं प्रथम प्रसिद्ध केली. अर्थात् त्याला ६८ वर्षे होऊन गेलीं. त्यानंतर तिचें पुनर्मुद्रण केव्हांहि झालें नाहीं. वास्तविक ही बखर काव्येतिहास–संग्रहांत प्रसिद्ध झालेल्या इतर सर्व बखरींपेक्षां मोठी आहे. एवढेंच नव्हे तर उत्तमोत्तम म्हणून प्रसिद्धी लाभलेल्या भाऊसाहेबांच्या बखरीच्या तोडीची ती आहे. असे असतां ती मागें पडली, याचीं आमच्या मतें मुख्य दोन कारणें संभवतात. त्यांपैकीं पहिलें हे कीं, मराठी इतिहासकरांनीं शिंदे होळकर घराण्यांची वारंवार तुलना करून होळकरांचीं कृत्यें सारीं स्वार्थमूलक तर शिंद्यांचीं कृत्यें तेवढीं सारीं उदात्त, स्वामिनिष्ठेचीं असें रंगविण्याचा प्रघात पाडला. यामुळें होळकर बदनाम झाले व त्यांच्या विषयींची बखर आवर्जून वाचण्यास लोकांस उल्हास वाटेनासा झाला. दुसरें कारण म्हटलें म्हणजे भाऊसाहेबांच्या बखरींत शिंद्यांना पानपत प्रसंगामुळें मिळालेली अभिलषणीय बैठक. त्या बखरीचा शेवट भाऊगर्दीच्या वीरकरुण प्रसंगानें झालेला असल्यामुळें त्याचें आकर्षण केव्हांहि स्वाभाविकच अधिक वाटतें. वास्तविक ती बखर म्हणजे होळकरांच्या कैफियतीसारखीच शिंद्यांची कैफियत आहे व तिला 'शिंद्यांची कैफियत' किंवा 'शिंद्यांची बखर' असेंच नांव देणें योग्य झालें असतें. परंतु तिचा शेवट भाऊसाहेब पेशव्यांच्या पानपत स्वारीनें झालेला असल्यामुळें व सान्यांना उपलब्ध झालेल्या पुणें येथील प्रतीच्या १२७ व्या बंदाच्या डोकीवर 'बखर भाऊसाहेबांची' असें लिहिलें होतें तेवढ्याच्या आधारावर सान्यांनीं त्या बखरीला भाऊसाहेबांची बखर असें आकर्षक नांव दिलें इतकेंच.

तें कसेंहि असो, होळकरांची ही कैफियत इतिहास व वाङ्मय या दोन्ही दृष्टींनीं भाऊसाहेब बखरीइतकीच सरस असल्यामुळें या बखरीचें पुनर्मुद्रण करण्याची कल्पना मी माझे स्नेही हनुमान प्रकाशन संस्थेचे मालक यांस सुचविली. ती त्यास पसंत पडून त्यांनीं बखर पुनर्मुद्रित करण्याचें ठरविलें. ६८ वर्षांपूर्वीं सान्यांनीं केलेलें या कैफियतीचें संपादन त्यांच्या लौकिकास शोभण्यासारखेंच टापटिपीचें होतें. त्यांनीं अनेक प्रति जमवून शुद्धाशुद्ध ठरवून आणि अर्थनिर्णायक व आवांतर माहितीच्या विपुल टीपासह ही होळकरांची कैफियत प्रसिद्ध केली होती. फार परिश्रम घेऊनहि बखरींतील अनेक ठिकाणीं शब्दार्थांच्या या इतर चुका राहिल्याची जाणीव साने यांना होती. बखरींतील तशा अनेक चुका पुढें सान्यांचे इंदूरकर मित्र श्री. बळवंत कमळाकर यांनीं त्यांच्या नजरेस आणल्या व चुका दुरुस्त करून त्याचें टिपणहि त्यांनीं साने याजकडे पाठविलें. नंतर साने यांनीं

संशोधकाच्या निराग्रह बाण्यास अनुसरून तें सर्व टिपण काव्येतिहास–संग्रहांत ' शुद्धीकरण व अधिक टिपणें ' या मथळ्याखालीं छापूनहि काढलें होतें. तथापि इतके करूनहि होळकर कैफियतींत पुष्कळच चुका शिल्लक राहून गेल्या. गेल्या ६८ वर्षांत महाराष्ट्रांत ऐतिहासिक साधन वाङ्मय प्रचंड प्रमाणांत प्रसिद्ध झालें आणि अभ्यासहि त्या प्रमाणांत वाढला व त्यामुळेंच सान्यांच्या मूळ होळकर कैफियतींत राहिलेल्या चुका आतां दुरुस्त करतां येऊं शकल्या व बखरींतील मजकुराला विपुल प्रत्यंतर पुरावेहि देतां येऊं शकले.

सान्यांच्या होळकर कैफियतींत पृष्ठ ४९ वर परिच्छेद तोडला आहे. त्यापुढील मधला बराचसा मजकूर गहाळ झाल्याचें त्यांनीं पुढीलप्रमाणें टीप लिहून कळविले होते. " येथें दुसऱ्या दोनहि प्रती त्रुटिक आहेत. वर आलेला मजकूर चौसष्ठाव्या बंदाच्या शेवटीं संपला. पुढें १०१ बंदापर्यंत ३६ बंद गहाळ झालेले आहेत. हे बंद मिळविण्याची खटपट आमच्या हातून होइल तितकी आम्ही केली, पण ते मिळाले नाहींत. पुढेंहि मिळतील अशी फारशी आशा नाहीं. तेव्हां हें प्रकरण असेंच त्रुटिक प्रसिद्ध करणें भाग पडलं आहे. मधील ३६ बंद न मिळाल्यामुळें हिंदुस्थानांतील वगैरे कांहीं मसलतींत तुकोजीरावानें कोणता कार्यभाग कसा उरकला वगैरे हकीकत नाहींशी झाली आहे. हा त्रुटित भाग कोणी इंदूरकर मित्र मिळवून आमच्याकडे पाठवितील तर त्यांचे आम्ही अत्यंत आभारी होऊं. "

सुदैवानें कै. पारसनीस यांना तो उपलब्ध झाला व त्यांनीं तो त्यांच्या इतिहाससंग्रह पुस्तक ४ अंक १, २, ३ (ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर) मध्यें प्रसिद्ध केला. पारसनीसांना बहुधा होळकरांच्या कैफियतीची एखादी संपूर्ण प्रतच मिळाली असावी. ती सान्यांच्या प्रतीशी ताडून पाहून सान्यांच्या प्रतींत जेवढा भाग गहाळ झाला होता तेवढाच त्यांनीं नेमका प्रसिद्ध केला. पारसनीसांच्या इतिहाससंग्रहांत होळकर कैफियतींतील गहाळ झालेला तो मजकूर २४ पृष्ठें दिलेला आहे. " तो मी कुलदीपक कारकूर उत्पन्न " या वाक्यापाशीं तो मजकूर संपतो. त्या खालीं त्यांनीं कांहींच खुलासा केलेला नाहीं म्हणून आणखी कांहीं शिल्लक राहिलेला मजकूर त्यांनीं पुढील अंकांत छापला असावा कीं काय म्हणून आम्ही शोध केला. इतिहाससंग्रहाचे अंक तपासले. परंतु तसा मजकूर पुढें केव्हां छापलेला आढळला नाहीं. म्हणजे १ ते २४ पृष्ठें एवढाच मजकूर गहाळ झालेला होता असे दिसते. फार तर एखाद दुसरीच ओळ राहिली असेल. इतिहाससंग्रहांतील तो सव मजकूर आमच्या होळकरांच्या कैफियतीच्या प्रस्तुतच्या आवृत्तींत आम्ही समाविष्ट केला आहे. यामुळें बखरीला पूर्णता आली आहे.

होळकर कैफियतीचा लेखक कोण असावा याचा सुगावा लागलेला नाहीं. कैफियती-

च्या म्हणजे बखरीच्या समाप्तीपूर्वी लेखकाचा उल्लेख केलेला नाहीं. फक्त " अग्रे ईश्वरो वेत्ति भावी पदार्थ आगमन ऐकिले पाहिजे त्या धोरणावर इतिहास यच्चावत् लिहिला असे." येवढेच शब्द आहेत. तथापि बखरलेखक हा होळकरांचा पिढीजात नोंकर आणि निकटचा विश्वासू मुत्सद्दी असला पाहिजे असे त्यानें बखरींत जे निरनिराळे प्रसंग तपशिलवार वर्णिले आहेत किंवा ज्या खासगत घराऊ बाबी त्यानें उल्लेखिल्या आहेत त्यावरून स्पष्ट दिसून येईल.

बखरीचा कर्ता किंवा लेखक कोण असावा याविषयीं एक तर्क मात्र आम्हास सुचला आहे. काव्येतिहाससंग्रह व भारतवर्ष यांत पूर्वी प्रसिद्ध झालेल्या साधनांची पुनरावृत्ति आणखी बऱ्याच नवीन पत्रांची भर घालून ' ऐतिहासिक पत्रव्यवहार ' या नांवानें सरदेसाई, कुळकर्णी व काळे या संपादकत्रयीनें सन १९३३ सालीं प्रसिद्ध केली. त्या पत्रव्यवहारांत श्री. भा. रा भालेराव यांच्या संग्रहांतील कांहीं पत्रें आहेत. त्यापैकीं पत्र नं. ३६७ व पत्र नं. ३९५ या पत्रांचा लेखक जो कोणी असेल तोच या बखरीचा लेखक असला पाहिजे असा संशय आम्हास येतो. वास्तविक तीं पत्रें काशीराव व यशवंतराव होळकर यांच्या नांवानें लिहिलेलीं असलीं तरी त्यांचा मसुदा किंवा मजकूर जुळणी अर्थात च त्यांच्या पदरच्या दिवाणानें किंवा चिटणीसानें केलेली आहे. त्या पत्रांची भाषा आणि होळकराची कैफियत या बखरींतील भाषा हीं एका धर्तीची भासतात. बखरकार " या भावी " " समय समर्पक " इत्यादि जे शब्द वारंवार वापरतो. तेच शब्द नेमके या दोन पत्रांत आलेले आहेत; व मुख्यतः त्यावरूनच त्या दोन पत्रांचा जो कोणी लेखक असेल तोच होळकर कैफियत या बखरीचा कर्ता म्हणजे लेखक असला पाहिजे असे आम्हास वाटते.

बखर लेखक वृद्ध, माहितगार व होळकर कुळाचा अभिमानी आहेच. पण त्यांतल्या त्यांत तो यशवंतराव होळकराशीं निकट संबंध असलेला व त्याच्या पराक्रमामुळें त्यावर बेहद्द खूष असलेला, त्याला कांहीं ईश्वरी कृपाप्रसादच होता असे मानणारा होता. हे त्यानें यशवंतरावविषयींच्या हकीकतींत ठिकठिकाणीं काढलेल्या उद्‌गारांवरून वाटते. राठोडाशीं होळकरांची जी एक सफेजंगीची लढाई झाली त्यांत बखरकारानें यशवंतरावांचा आवर्जून उल्लख केलेला आहे. वास्तविक तेव्हां यशवंतराव अवघा १०-१२ वर्षांचा होता. बखरकार लिहितो, " निमे राहिले त्यांणीं हला बापू होळकराचा गोल उठला हें पाहून पलटणचा मुकाबला सोडून यांजवर आले. भेळाभेळ होऊन चार घटका समरंगणीं भाला, बंदुक यांचें काम पडलेंच नाहीं. एकमेकांचे गळां हात घालून घोड्याखालीं येऊन तरवार, कटार, दांत अशानिशीं रजपूत एक जाऊं न दिल्हा. चार पांचशें रांगडे खपूं देऊन आपले-

कडील महाळोजी पिंगळेसारखी दोन तीनशें नांवाची माणसे कामास आली. येशवंतराव महाराज, बारा वर्षांचें वय, प्रथम तरवार तेथें केली. "

सन १९२६ सालीं श्री. अ. ना. भागवत व श्री. ना. के. भवरासकर यांनीं 'भवानी शंकर बक्षी यांची रोजनिशी' प्रसिद्ध केली. ही रोजनिशी म्हणजे यशवंतराव होळकर व भवानी शंकर बक्षी यांची बखरच आहे. त्या बखरीच्या प्रस्तावनेंत भागवत यांना उपलब्ध झालेल्या होळकराच्या कैफियतीच्या एका निराळ्याच प्रतीचा उल्लेख आहे. व ती होळकरांची कैफियत छापत असल्याची जाहिरातहि भवानी शंकर बक्षीच्या रोजनिशीच्या पुस्तकाच्या पाठीमागें छापलेली आहे. तथापि त्यानंतर ती होळकर कैफियत कधींहि छापून निघाली नाहीं. भागवतांची ती होळकर कैफियत व कै. साने यांनीं प्रसिद्ध केलेली होळकर कैफियत या दोन्ही एकच असण्याचा संभव आहे. भागवतांची होळकर कैफियत छापली गेली असती तर कदाचित् त्यांत बखरीच्या लेखकाचे नांव सांपडण्याचा संभव होता.

पुणें, ता. २०-२-१९५४ य. न. केळकर

प्रकाशकाचें निवेदन

साहित्यसम्राट कै. नरसिंह चिंतामण केळकर यांचे सुपुत्र, इतिहास संशोधक श्री. यशवंत नरसिंह केळकर यांचे सहकार्यानें आज होळकर कैफियत प्रसिद्ध करितांना विशेष आनंद होत आहे. या पुस्तकाची उपयुक्तता इतिहासज्ञच जाणूं शकतील. या पुस्तकाचा खप अत्यल्प होणार हें माहीत असूनहि किंमत शक्य तितकी कमी ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. शिक्षण संस्थांनीं मनावर घेतल्यास व त्या तसें घेतील असा विश्वास जाणूनच पुस्तक-प्रसिद्धीचें धाडस केलें आहे. जनता-जनार्दन व शिक्षण संस्था या पुस्तकाच्या प्रति खरेदी करून माझ्या धाडसाचें कौतुक करतील असा विश्वास आहे.

पुणें, ता. २०-२-१९५४. प्रकाशक

पहिल्या आवृत्तीचेच हे पुनर्मुद्रण होय.

२५-२-७२ प्रकाशक

विषयानुक्रमणिका

मल्हारराव होळकर

(१) मल्हारराव होळकराचें पूर्ववृत्त, बाल्य, नागाचा चमत्कार. (२) मल्हारराव पेंढारी पथकांत दाखल होऊन पेशव्यांच्या नर्मदापार दिल्ली-स्वाऱ्यांत जातो; प्रत्यक्ष बाजीरावास ढेकूळ मारून आपल्या निधड्या छातीची परीक्षा देतो; होळकरांचा गोट लुटण्याचा पेशव्याचा विचार व त्याचें पर्यवसान. (३) मल्हारराव बाजीरावास ओढ्या-कांठीं गांठून चकित करतो, बाजीरावानें केलेली मल्हाररावाच्या पराक्रमाची बूज, उभय-तांची शपथक्रिया, पांच हजार स्वारांची सरदारी मल्हाररावास देण्याचें बाजीरावाचें आश्वासन. (४) बढवाणीची लढाई, मल्हाररावामार्फत तह ठरतो. (५) पेशव्यांचा उदाजी पवारास सामील करून घेण्याचा प्रयत्न, उदाजीची मग्रुरी, नंतर पेशवे मल्हारजी होळकरास बारगळाकडे मागतात व मल्हाजी पेशव्यांचा नोकर बनतो. (६) पेशवे पवाराची मनधरणी करतात, तरी ऐकत नाहीं. सबब त्याचा नाद सोडण्याचा मल्हार-राव इषारा देतो. पवाराचा पश्चात्ताप. (७) रजपूत संस्थानिकांचा पुढारी सवाई जय-सिंग दिल्लीकराशीं बिघडतो, मराठ्यांची मदत चाहतो व त्यासाठीं बोलणीं करण्याकरितां नंदलाल मंडलेईस पाठवितो. मंडलोई घाटांतील वाटा दाखवून सैन्य दयाबहादूरावर नेऊन घालण्याचें आश्वासन देतो. (८) मल्हारराव व उदाजी पवार दयाबहादूरावर धाड घालतात. लढाईंत दयाबहादूर ठार होतो, धारेंत पेशव्यांची द्वाही फिरते, उज्ज-नीचा कबजा, माळव्यांत मराठे दहशत पाडण्याकरतां गढीवाल्यांची क्रूर पारिपत्यें करतात, होळकराचें पुण्यास प्रयाण, पुण्याहून बाजीराव दिल्लीच्या स्वारीस निघतो, दिल्लीची लूट, जयसिंगाशीं सख्याचा करार, जयसिंगाकडून तीस लाखांची खंडणी घेतात. (९) मल्हाररावाच्या खास शिफारसीनें राणोजी शिंदे हुजऱ्याचा सरदार बनतो. (१०) माळव्यांतील उत्पन्नाच्या पेशवे, शिंदे, होळकर व पवार यांच्या वांटण्याचें प्रमाण, सवाई जयसिंगाच्या मुलांतील भांडणें, रजपूत भांडणामुळें मराठ्यांचा राज-पुतान्यांत प्रवेश. (११) नानासाहेब पेशवा जयपूरवाल्यांच्या पारिपत्यास निघतो; ईश्वरसिंग व मल्हारराव होळकर यांची लढाई, बुंदीचें राज्य व २० लाख रुपये खंडणी मिळते, बुंदीवर उमेदसिंग होडे यांची स्थापना. (१२) ईश्वरसिंगाचा विषप्रलय, माधो-सिंगाची स्थापना मल्हारराव करतो. शिंदे होळकरांचें वैमनस्य सुरू, जयपूरवाल्यांनीं शिंद्यांची केलेली कत्तल, मल्हारराव धुळेवाल्याची गढी काबीज करतो, जयपूरकर २५ लाख रुपये गुन्हेगारी देतात. (१३) मनसूरअलीचें मल्हाररावाकडे राजकारण, सादल-बादलाचे फौजेशीं युद्ध, सादलबादलाचा मृत्यु, पठाण रोहिल्यांशीं तह, शिंदे-होळकरांची दिल्लीपतीशीं भेट व खिलतचौघड्याची प्राप्ती. (१४) निजामाची पेशव्यावर स्वारी, सुपा येथें रामदासपंतांनीं घातलेला छापा, गाजुद्दीखान यांस दक्षिणची सुभेदारी बहाल, औरंगाबाद मुक्कामीं गाजुद्दीखानास विषप्रयोग व त्याचा मृत्यु. मल्हारजी होळकर दिलेल्या

शपथेनुसार गाजुद्दीखानाचें प्रेत दिल्लीस पोंचतें करतो. (१५) कुंभेरीचा वेढा, खंडेरावाचा मृत्यु, मल्हारराव मथुरेहून दिल्लीवर धाड घालतो, मलकाजमानीची विटंबना व मल्हाररावाचें आश्वासन. (१६) मल्हारराव बादशहाकडून ८० लाखांचा ठराव करून घेतो. (१७) मल्हाररावाची दादासाहेब पेशव्यांसह हिंदुस्थानावर स्वारी, नजीबास दिल्लीबाहेर काढले, मल्हाररावाची लाहोर सरहद्दपर्यंत स्वारी, दिनाबेग रुजू होतो. (१८) भाऊसाहेब पेशवे मल्हारराव होळकरास दाबलेला ६० लक्षांचा पैका ओकावयास लावतात. मल्हाररावाची व भाऊसाहेबांची झटापट. (१९) मल्हारराव ६० लक्ष रुपयांचा भरणा पेशव्यास कबूल केल्याप्रमाणें विष्णु महादेव गद्र्यामार्फत करून देतो. (२०) शिंदे यांच्या नजीब व गिलचे यांशीं लढाया, जनकोजीबाबा जखमी होतो, दत्ताजी शिंदे ठार होतो. (२१) मल्हारराव, शिंद्याच्या मदतीसाठी निघतो. रेवाडीस शिंदे-होळकर भेटी होतात, शिंदे होळकरांच्या नजीबाशीं झटापटी, होळकराकडील अन्याबा पळशीकर दिवाण व शेटीबा खराडे ठार होतात, होळकर आग्र्याहून जयपूरच्या मुलुखांत येऊन छावणी करतात. (२२) कुंजपुरा व पानपत येथील लढाया, होळकरांचा व भाऊसाहेबांचा बेबनाव, पुन्हा समेट, जाटास मदतीस आणण्याचें कारस्थान. (२३) जाटास दगा करण्याचा बेत, मल्हाररावाचा विरोध, मल्हारराव जाटास सुखरूप काढून देतो. (२४) पानपतची अखेरची लढाई, विश्वासरावांचा मृत्यु, मराठ्यांचा मोड, होळकर दक्षिणेचा रस्ता धरतात. (२५) कृतोपकार स्मरून जाटानें होळकरांस केलेलें सहाय्य. होळकर ग्वालेरीस येतात. (२६) ग्वालेरीस पुन्हा फौज जमून मल्हारराव रांगडे व रजपूत यांचा बंदोबस्त करतो, भटवाट वाड्याची लढाई, मल्हारराव जखमी होतो तरी लढतो व २५ लक्ष रुपये खंडणी घेतो, इंदुरास जातो, नंतर तुकोजी होळकरास माळवे प्रांतीं ठेवून देशीं देवदर्शनास येतो. (२७) मेवात्यांच्या दंग्यामुळें मल्हारराव पुन्हा मावळ्यांत जातो व बंड शमवितो, नानासाहेब पेशव्यांचा मृत्यु, मल्हाररावाचा पुण्यात ६ महिने मुक्काम. (२८) जाट व नजीब यांच्या लढाया, सुरजमल्लाचा मृत्यू, मल्हारराव जाटांच्या मदतीस जातो, जाटाचा व नजीबाचा तह ठरवून देऊन मल्हारराव अनुपशहरास जातो. (२९) सुभेदार व सुजाउद्दौला यांच्या इंग्रजांशीं लढाया, होळकरांवर इंग्रजांचे छापे, होळकर पराभव पावून झांशीस येतो. (३०) जाट व गोसावी झांशी जिंकतात, ३ महिन्यांच्या युद्धानंतर मल्हारराव झांशी घेतो, दातिया जिंकतो. (३१) गोहदचा वेढा, शिंद्यांची फितुरी, मल्हारराव होळकराची मध्यस्थी, गोहदकर जाटाशीं ३० लक्ष रुपये खंडणी घेऊन सला. (३२) अलमपूर मुक्कामीं मल्हारराव होळकराचा मृत्यु. छत्री बांधण्यास सुरुवात.

अहिल्याबाई व तुकोजीराव होळकर

(३३) मालेराव होळकराचा मृत्यु. (३४) होळकर दौलत जप्त करण्याचें गंगाधर यशवंत व दादासाहेब पेशवे यांचें कारस्थान आणि त्याच्या प्रतिकाराची अहिल्याबाईनें केलेली तजवीज. (३५) तुकोजी होळकरांस अहिल्याबाई वस्त्रें देतें, दादासाहेब

पेशवे व अहिल्याबाईचा समेट. (३६) अहिल्याबाईनें दादासाहेबांशीं लढण्यासाठीं आणलेल्या भोसले, गायकवाड व रजपुतादि सरदारांना निरोप. (३७) गंगाधर यशवंतावर अहिल्याबाईची बेमर्जी, माधवराव व दादासाहेब यांच्यांत बेबनाव, तुकोजी होळकर गुप्तपणें माधवरावास सामील होतो, धोडपची लढाई, दादासाहेबांचा पराभव. (३८) गंगाधर यशवंत संन्यास घेऊन पळत असतां त्यास अटक. (३९) दादासाहेब माधवराव पेशव्यांच्या स्वाधीन होतात. (४०) गंगाधर यशवंताच्या जागीं दुसरा कारभारी निवडण्याची वाटाघाट, शिवबा बाजी व नारोपंत शौचे यांतून निवड करून नारो गणेशास कारभारीपद किंवा दिवाणगिरी पेशवे देतात. (४१) गंगाधर यशवंताचें पारिपत्य. (४२) उत्तर हिंदुस्थानची स्वारी, रामचंद्र गणेश कानडे याची. तुकोजी होळकर याची शिंद्याबरोबर तिकडे रवानगी. (४३) शिवबा बाजी होळकरांतर्फे पेशव्यांच्या दरबारी राहतो. (४४) नारोपंतनानावर अहिल्याबाईचा राग, उत्तरेच्या स्वारीस निघण्याआधीं तुकोजी होळकर अहिल्याबाईशीं एकनिष्ठ राहण्याचें वचनप्रमाण करतो, अहिल्याबाईच्या व तुकोजी होळकरांच्या महालांची वांटणी. (४५) दिल्लीचा बादशहा उठावला, होळकरांनीं पुन्हा त्यास गादीवर बसविलें, शिंदे-होळकरांत वैमनस्य, तुकोजी शत्रूस दिलेला शब्द पाळतो, बक्षीच्या फौजेचा धुव्वा. (४६) पथ्थरगडावर हल्ला, तुकोजी होळकरांची जाटाशीं निकराची लढाई, जाट पळून डिगेचा आश्रय घेतो. (४७) माधवराव पेशव्याचा मृत्यु. होळकर इंदुरास परत येतात, होळकरी फौजेच्या समजाविसीचा पडलेला राडा, राणोजी शिंदे चोंडीकर नारोपंत नानांकडून सक्तीनें पथकाच्या पगाराची बाकी वसूल करितो. (४८) नारायणराव पेशव्याचा खून, कासेगांवची लढाई, त्रिंबकराव पेठ्यांचा मृत्यु, दादासाहेबांचा तुकोजी होळकरांस सामील करून घेण्याचा प्रयत्न. (४९) तोतयाचें बंड, मोरोबाचें बंड, सखारामबापूचा फितूर, मोरोबा व सखारामबापूस कैद, नारो गणेशास कैद, नारो गणेशाच्या जागीं पेशवे दादाजी गंगाधराची तुकोजीचा कारभारी म्हणून नेमणूक करतात. अखेर सहा महिन्यांनीं नारो गणेश पुन्हा होळकरांचा दिवाण बनतो. (५०) दादाचा पाठलाग, गुजराथेंतील मोहीम, हरीपंततात्यांची अहिल्याबाईच्या दरबारीं शिष्टाई. परंतु ती अपेशी ठरली, तुकोजी होळकर व अहिल्याबाई यांच्यांत वैमनस्य. महादजी शिंद्यांची मध्यस्थी, अहिल्याबाईचा बाणेदारपणा. (५१) इंग्रज व दादासाहेब यांची पुण्यावर स्वारी, बोरघाटांतील लढाया, बापू होळकराचा पराक्रम. (५२) होळकरांमार्फत इंग्रज तहाचें बोलणें लावतात, होळकरांचा पेशव्यांनीं केलेला सन्मान, बापू होळकरांची स्वामिनिष्ठा व बाणेदारपणा, पेशवा त्यांस रावेर व कोंचमहाल हे महाल जहागीर करून देतात. (५३) दादासाहेब हरीबाबाजीस मारून कैदेंतून पळून जातात, व इंग्रजांचा आश्रय घेतात. (५४) सवाई मल्हारराव होळकराचें लग्न. (५५) टिपूवरील स्वारी, टिपू मराठ्यांच्या लष्करांवर छापा घालतो. तुकोजीचा दूरदर्शीपणा. (५७) जाट व इंग्रज यांचें शिंद्यांशीं युद्ध, गोविंद शामराज यांचा लढाईत मृत्यु. इंग्रज ग्वालेर घेतात, होळकरांचे बाळूजी इंगळे व राजाराम रणसोड हे शिंद्यांच्या मदतीस जातात. (५७) काशीचा राजा चेतसिंग इंग्रजाविरुद्ध उठतो, शिंदे ग्वाल्हेर परत जिंकतात, लालसोटची लढाई, महाद-

जींचा पराभव व पश्चात्ताप. (५८) आग्र्याचे नजीबकुळीखानाचे मोर्चे उठवून मथुरा वगैरे ठाणीं शिंदे काबीज करतात. (५९) राजपुतांचा होळकरांविरुद्ध उठाव, होळकरांचा अंबाजीपंत लढाईत ठार होतो, चकरज्याचीलढाई, मकाजी गिल्याचा पराक्रम, पंजू जमादार, चतरसिंग चेचाणी इत्यादि रांगडे सरदारांचा मृत्यु. (६०) अमदेचा वेढा, सोभागसिंगाचा मृत्यु. (६१) काशीराव होळकरांच्या कन्येचें लग्न, अंबाजी इंगळे यांची अहिल्याबाईनें घेतलेली हजेरी. (६२) बमण्याच्या गढीवरील लढाई, बापू होळकरांचा पराक्रम. (६३) तुकोजी व अलिबहाद्दर महादजी शिंद्यांस भेटतात. नारोपंतनाना व तुकोजी वैमनस्य. (६४) नारोपंतांचा छळ व मृत्यु. (६५) गुलाम कादर पकडला जातो, हिंमतबहाद्दरावरून अलिबहाद्दराचा शिंद्यांशीं कलह. होळकरांची जयपूरच्या मुलुखांत आवाडाव, इस्मायल बेगाचा पराभव, बापू होळकराचा पराक्रम. (६६) मारवाडवाल्यांशीं सामना, होळकरांचें शिंद्यांस साहाय्य. (६७) तुकोजी व महादजी यांची भेट. एकमेकांचा पाणउतारा करण्याचा प्रयत्न. (६८) शिंदे दक्षिणेंत येण्यास निघतात. (६९) सत्वासगढीवरून अहिल्याबाईचा महादजीस शाप. (७०) हिंदुस्थानांत गोपाळराव चिटणीस व होळकर यांत वैमनस्य, 'कामा'ची लढाई. (७१) राजपुतान्यांत शिंदे होळकरांच्या लढाया, व नंतर तात्पुरता सलोखा. (७२) सवाई मल्हारराव होळकरास अहिल्याबाई राजपुतान्यांत पाठवितें. पुन्हा शिंदे होळकर लढाई सुरू. जुंजरनेक व डिबॉईन यांच्या कवाईती कंपूंचा संग्राम, होळकरांचा लाखेरीस पराभव, महादजी शिंद्यांचा मृत्यु. (७३) खर्ड्यांची लढाई. (७४) अहिल्याबाईचा मृत्यू. (७५) सवाई माधवरावाचा मृत्यु, तुकोजीरावाच्या पुत्रांतील कलह, काशीरावास वस्त्रें मिळतात. मल्हारराव रागावून निराळा होतो.

काशीराव ऊर्फ बाळासाहेब होळकर

(७६) तुकोजीच्या मृत्यूनंतर मल्हारराव बंड करतो. मल्हाररावाची दानत. (७७) मल्हाररावावर काशीराव व शिंदे दग्यानें हल्ला करतात, मल्हाररावाचा मृत्यु, लाख्या बारगीराचा मृत्यु, यशवंतराव होळकराचा पराक्रम. (७८) बाळोबा तात्या शिंदे होळकराचा समेट करून देतात. (७९) शिंद्याच्या दरबारांतील शेणवी मंडळ कैद, सर्जेरावाचे पुण्यांतील उत्पात. (८०) यशवंतरावाचें नागपुरास प्रयाण. (८१) यशवंतराव नागपूरकरांच्या कैदेंतून युक्तीनें सुटतो. (८२) यशवंतराव व भवानी शंकर यांची प्रथम भेट. जुंजरनाईकाची भेट. (८३) यशवंतराव, पवाराच्या आश्रयास जातो. (८४) शामराव माढडीकाची भेट. (८५) यशवंतराव सैन्य उभारतो. (८६) धोंडोपंत गोडबोल्याचा पराभव. (८७) यशवंतराव महेश्वर बळकावतो. (८८) यशवंतरावाची स्वारी शिकारी. (८९-९०) यशवंतराव शिंदेबायास लुटून घेतो. (९१) कृष्णाजी मुकुंद बक्षी याची बहादुरी. (९२) उज्जनची लढाई. (९३) शिंद्याची इंदुरावर चाल. (९४) इंदुराजवळच्या चकमकी. (९५) कंपूंत बिघाड. (९६) जुंजरनेकास कैद, इंदुराची जाळपोळ. (९७) काशीराव यशवंतराव होळकरास भेटतो. (९८) गोपाळराव

चिटणीसाशी लढाई. (९९) यशवंतराव मुत्सद्यास छळून पैका काढतो. (१००) यशवंतरावाच्या भराऱ्या. (१०१) यशवंतरावाची पुणें दरबारी रदबदल. (१०२) पुरंदऱ्याचा पराभव. (१०३) हडपसरची लढाई, यशवंतरावाचा पराक्रम, पेशवे पळून जातात. (१०४) फत्तेसिंग मान्याचा फितूर व पुढें त्यास कैद, शिंदे व भोसले यांची इंग्रजाशी लढाई. (१०५) यशवंतरावाच्या भराऱ्या. (१०६) यशवंतरावाची इंग्रजाशी झटापट. (१०७) भरतपूरची लढाई (१०८) शिंदे होळकर भेटीचा समारंभ. (१०९) ज्यानबत्तीसास कैद. (११०) अंबोजी इंगळ्यापासून यशवंतराव पैका काढतो. (१११) यशवंतरावाचें शिखाशी संधान. (११२) यशवंतराव अमृतसराहून उलटतो. (११३) ज्वालामुखीची यात्रा, खंडेराव होळकराचा मृत्यू, पलटणाचा दंगा. (११४) इंग्रजाच्या पारिपत्यासाठीं तोफांचा कारखाना घालतो. (११५) यशवंतरावास वेड लागते. (११६) यशवंतरावाची मुलगी भीमाबाई हिचें लग्न, तुळसाबाई, धर्माकुंवर यांचा कारभारांत वरचष्मा, मीरखानाचे उपद्व्याप, सोभाराम व धर्मा यांचा वध. (११७-११८) फौजेचा पगाराकरतां दंगा. (११९) पलटणवाल्यास लुटून घेण्यांत येते.

मल्हारराव होळकर (तिसरा)

(१२०) यशवंतरावाचा मृत्यु. (१२१) नथू फणसे याचें बंड. (१२२) फौजेचा तलबेसाठीं दंगा. (१२३) रामदिन व मैनाबाईस कैद. (१२४) पेशव्यास सामील होण्याचा तुळसाबाईचा विचार. (१२५) विठ्ठलपंतास कैद. (१२६) तुळसाबाईस कैद. (१२७) तुळसाबाईचा मृत्यु. (१२८) इंग्रजाशी झटापट. (१२९) सदरदीन हवालदाराच्या सैन्याची हलाखी. (१३०) फिरंगी तीन कोस पिच्छा करतात. (१३१) इंग्रजाशी तहनामा. (१३२) बाजीराव माल्कमच्या स्वाधीन होतो. (१३३-१३४-१३५-१३६) दौलतीची नवी व्यवस्था, विठ्ठल महादेवाचा मृत्यु. (१३७) सोमयाग.

हौळकरांची कैफियत

कैफियत कैलासवासी मल्हारजी होळकर यांनीं स्वपराक्रमें करून दौलत उभीं केली, त्याचा इतिहास इस्तकबिल तागाईतअखेर येणेंप्रमाणें :—

(१) मौजे होळ मुरूम, नीरेचे कांठीं जेजुरीजवळ आहे. तेथें खंडूजी वीरकर खुटेकर धनगर चौगुले राहत होते. त्याजला मौजे तळोदें परगणें सुलतानपूर येथील भोजराजजी बारगळ यानें आपली बहीण दिल्ही होती. तिचे पोटीं पुत्र जाहला. त्याचें नांव मल्हारजी होळकर. तो कांहीं दिवस त्या गांवींच होता. त्याचा पिता मृत्यु पावला. मल्हारजी होळकर मूल, तीन वर्षांचे असतां, भाऊबंद मुलाची हेळसांड करूं लागले. बाईचें कांहीं चालूं दिलें नाहीं. वतन वांटा आपणच दाबून वहिवाट चालविली. बाईस नित्यकृत्याचाहि आधार नाहीं. मुलास कांहीं अपाय होईल असें समजून चिरंजीवासुद्धां माहेरीं भावापाशीं येऊन राहिली. मल्हारजी होळकर मूळचे होळचे राहणारे म्हणून 'होळकर' नांव चाललें. कांहीं मोठे झाल्यावर बारगळ यांणीं भाच्यास घरचीं मेंढरें चारावयास लाविलें. दररोज रानांत जाऊन मेंढ्या चारून सायंकाळीं घरास यावें. हा क्रम चालत असतां, कोणे एके दिवशीं अरण्यांत दोन प्रहरां झाडाखालीं मल्हारजी निद्रिस्त झाल्यावर, वारुळांतून नाग निघून (त्यानें) मुलावर फणीची छाया केली. तितक्यांत मातुश्री घरींहून भाकरी घेऊन आली. तिनें पाहिलें. भयभीत होऊन माघारी जाऊन भावस वगैरे वर्तमान कळवून त्यांजसुद्धां तेथें आली. तो भुजंग सर्वांनीं तसाच पाहिला. मनुष्याची भीड नागाचे दृष्टीस पडल्यावर नाग वारुळांत गेला. नंतर मुलास सावध करून पाहिलें असतां, अन्य विचार दृष्टीस न पडला. तेथेंच मुलास भोजन घालून घरास घेऊन आले. अभ्यंग

---

(१) **कैफियत** – हकीकत, वृत्तान्त. **इस्तकबिल** – पासून. **तागाईत** – पर्यंत, अखेर. **तागाइतअखेर** – वास्तविक 'अखेर' या शब्दाची पुन्हां जरूर नाहीं. तथापि जुन्या काळीं तसाहि वाक्प्रचार करण्याची रीत होती. **खुटेकर** – धनगरांतील एक पोट जात. धनगरांत खुटेकर, हटकर, सेगर व सणगर असे चार पोट भेद आहेत. **चौगुला**– पाटलाच्या हाताखालील एक ग्रामाधिकारी. पाटलाचे हाताखालीं चौगुला, हवालदार, रामोशी वगैरे नोकर असतात. त्यांत चौगुला मुख्य होय. **नित्यकृत्य** – रोजची उपजीविका. **भीड** – गर्दी, जमाव. **अन्य विचार दृष्टीस न पडला** – नागानें दंश वगैरे केल्याचे कांहीं चिन्ह दृष्टीस पडलें नाहीं.

स्नान घालून दूधभात खाऊ घातला. या गोष्टीचें मातुश्रीस आश्चर्य होऊन चौघे म्हातारे ममतेचे धनगर (होते) त्यांस विचारलें. त्यांस त्यांच्या उपमा अन्यत्रांस, ते तर प्रत्यक्षच ! त्यांतहि एकानें सांगितलें कीं, " बाई, ब्राह्मणास पूस. तो सांगेल. " मग ब्राह्मणास एकांतीं विचारलें. ब्राह्मणानें सांगितलें कीं, " बाई, हा मूल पृथ्वीपति होईल. त्यास दहा वर्षांचा होई तावत्काल फार सांभाळावें. पुढें हा पृथ्वीस संभाळून तुला पृथ्वीपतीची आई म्हणवील ! " त्या दिवसापासोन (मामानें) रानांत जावयाचें मना करून घरचे घोड्यांची देखरेख (मल्हारीस) सांगितली. यानंतर मातोश्रीचा काळ सत्वरच झाला.

(२) त्या दिवसांत बाळाजी विश्वनाथ पेशवे यांजला सातारकर राजे यांनीं दौलतीची सोप करून गिरासपणा करूं लागले. प्रथम स्वारी गोदावरीपर्यंत जाहली. ' गंगेस घोडे न्हाले ' अशी म्हण आहे. नंतर पेशवे यांणीं पवार, धनगर वगैरे अवघे मराठे मंडळी जमा करून गंगेपुढें चाल केली. त्यांत पेंढारी सरदार यांचे पथकांत बारगळ यांणीं मल्हारजी होळकर याचे जिम्मेस, पांच पंचवीस घोडे होते ते, करून पेंढारी यांचे पथकाबरोबर रवाना केलें. चाकरींत तैनात कांहीं एक नाहीं. लुटींत जें ज्यास प्राप्त होईल तें त्याचें. हुकूम पेशवे मशारनिल्हे यांचा. अशा चालीनें नर्मदा दक्षण तीरपर्यंत स्वारी केली. तें पेंढारियाप्रमाणें दौडीच्या चालीनें दिल्लीपर्यंत गेले. पातशाई सलतन मोठी. फौज आली गेली हें कोणाचे गांवींहि नाहीं. दिल्लीचे आसपास पोंहचल्यावर एक्या महालचे खंडणीचा जाब ठरला. तेथें हारी बिघडूं नये

---

(१) **मातुश्रीस आश्चर्य होऊन** – मातुश्रीस आश्चर्य वाटून. **त्यांस त्यांच्या उपमा अन्यत्रास इ०** – अडाणी किंवा अज्ञानी मनुष्यास धनगराची उपमा देतात. मग ते तर काय प्रत्यक्षच धनगर होते. ते त्या चमत्काराचा उलगडा कसा करून दाखविणार ?

(२) **सोप करणें** – सोपवून देणें, हवाली करणें. **गिरासपणा** – लुटालूट. येथें अर्थ स्वारीशिकारी किंवा मोहीम. **गंगेस घोडे न्हाले** – गोदावरी नदीलाहि गंगा म्हणण्याचा प्रघात होता व अद्यापहि आहे. **तैनात** – पगार, वेतन. **मशारनिल्हे** – उपर्युक्त, पूर्वोक्त. **पेंढारियाप्रमाणें दौडीच्या चालीनें दिल्लीपर्यंत गेले** – वाटेल तेवढ्या लांब लांब मजली मारण्याबद्दल पेंढाऱ्यांची फार ख्याति असे. **सलतन** – सलतनत, राज्य. **हारी बिघडूं नये** – ' हरीफी घडूं नये ' असे पाहिजे. **हरीफी** – दांडगेपणा, कपटाई. महालाकडून अमुक इतकी खंडणी घेण्याचे ठरलें होतें म्हणूनच त्या महालांत लुटालूट करण्यास किंवा शेतें कापण्यास सेनापतीनें बंदी केली होती.

असा करार. त्यांत मल्हारजी होळकर यांनीं आपल्या स्वारानिशीं हारी कापून आणून घोडयापुढें टाकिली. याचा बोभाट पेशवे यांपर्यंत गेला. तेव्हां बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचे चिरंजीव बाजीराव हे जातीनीं हातांत काठी घेऊन ताकिदीस निघाले. तों पहात पहात मल्हारजी होळकर यांचे गोटांत घोडयापुढें हारी पाहून एका बारगिरावर बाजीराव यांनीं काठी टाकिली. तों मल्हारजी होळकर राहुटीचे तोंडीं चऱ्हाड वळीत बसले होते तेथून शिव्या देऊन मातीचें ढेंकूळ बाजीराव यांस मारिलें! " आम्हांस काय रोजमुरे देऊन भागलास म्हणून काटया मारितोस ? " याप्रमाणें शिपाईभाषणें केलीं. ते समयीं बाजीराव यांणीं खामोश करून आपले खाजगत डेऱ्यांत गेले. तेथें जाऊन वडिलांपाशीं बहुत निग्रह केला, " असे विदेशांत बेहुकुमी होऊं लागली असतां परिणाम काय ? " (तेव्हां) बाळाजी विश्वनाथ यांणीं विचार करून उदईक मल्हारजी होळकरास लुटून घ्यावे असा विचार केला. हें वर्तमान मल्हारजी होळकर यांस समजतांच यांणीं आपले बारगिरास बोलावून एका केला. " जो माझ्या मरणाचा सोबती असेल त्याणें रहावें. जो सोबती नसेल त्याणें यावेळेस निघून जाऊन आपला बचाव करावा. " मग जावयाचे ते निघून गेले. वीस बावीस असाम्या मरणोन्मुख होऊन घोडीं लष्करांत सोडून दिलीं. खोगरें राहुटी वगैरे अजबाब जाळून, अंगास राख लावून, ढाल तरवारेनिशीं मागें टेंकटी होती त्या टेंकडीवर जाऊन बसले. हें वर्तमान फौजेंत कोणी हाटकर धनगर, बाराशें रावताचा जमाव, (ज्याजवळ असा) मुस्तकीम होता, त्याजला समजलें. त्यांनीं मल्हारजी होळकर याजला सांगून पाठविलें कीं, " हिंमत सोडूं नको! हाटकर खुटेकर धनगरांचें बीज (ज्याचें) असेल तो तुजला सामील आहे. तुझी वाट ती आमची वाट. " असें सांगून आपण जातीनें पेशवे यांजकडे जाऊन बहुत निषेध केला कीं, " सरदारी करूं म्हणतां, आणि शिपाई यांची बरदास्त या प्रकारची! अशानें वेल मांडवास कसे जातील ? तुम्हांस ढेंकूळ मारिलें तो तुमचे हरिपाचा प्राण घ्यावयास कसा चुकेल ? हें पहाणें एकीकडे ठेवून (वर्तता!) पंचवीस

---

(२) **हारी** – तयार झालेलीं शेतें. **शिपाईभाषण** – शिपायास शोभेल असें बिनमुरवतीचें, रागाचें किंवा मग्रुरीचें भाषण. **खामोश करून** – गम खाऊन. **निग्रह** – हट्ट. **बेहुकुमी** – हुकूमबाह्यवर्तन. **एका करणें** – एक विचार करणें, पक्की जूट करणें किंवा एकत्र जमविणें. **मरणोन्मुख होऊन** – मरणास सन्मुख होऊन; मारूं किंवा मरूं असा निश्चय करून. **अजबाब** – सामानसुमान, सामुग्री. **मुस्तकीम** – तयार, जय्यत किंवा भक्कम. **वेल मांडवास जाणें** – महत्त्वाकांक्षा सफल होणें, दौलत वाढणें. **हरीप** – हरीफ, शत्रु.

स्वार लुटून घेतल्यांत लौकिक, (किंवा) फौजेस हामराई किंवा बरदास्त केल्यांत ? यांतील विचार पाहावा. बाकी तो तर मरणें संकल्पून बसलाच आहे. कदाचित् धनगरमात्र त्याजला सामील झाल्यास कसें पडेल ? " अशा भावें बोलणें बोलून, लुटून घेणें महकूब करून, घोडीं लष्करांत जिकडे गेलीं असतील तीं जमा करून, त्यांची त्यांस देऊन, अजबाब पंचवीस हजार रुपये नक्त द्यावे, असें ठरावांत आणून आपले गोटांत गेला. प्रातःकाळीं पुनः येऊन बाळाजी विश्वनाथ व चिरंजीव बाजीराव उभयतां आणखी सरदार बरोबर घेऊन मल्हारजी होळकर टेंकटीवर बसले होते त्यांजपाशीं आले. बहुतां प्रकारें दीलजमाई करून, आंगास राख लाऊन बसले होते तितक्यांस वस्त्रें देऊन, अजबाबाकरितां वीस हजार रुपये नक्त पदरीं घालून, घोडीं ज्या ज्या गोटांत गेलीं होतीं तितकीं जमा करून त्यांचे स्वाधीन केली.

(३) याप्रमाणें किस्सा निर्गत होऊन स्वारी माघारी फिरली. लोक आबाद जाहले. मल्हारजी होळकर यांणीं पंचवीस घोडयांची सव्वाशें घोडीं केलीं. माघारी फिरतांना सिपरी कोल्हारस या मैदानांत आले. तेथें नाल्याचें कांठीं झाडझुडका होता त्या छायेंत बाजीराव जातीनें स्नान करून भोजन करीत होते. मुक्काम जवळपासच होता. दहा वीस स्वार बरोबर. तितक्यांत मल्हारजी होळकर लबार भरून पांचशें स्वार कडाचूर आडरानानें आले. बाजीरावास पाहून गराडा घातला. रायाचे छातीस भाला आणून भाषण केलें कीं, " तें दिवशीं ढेंकूळच मारलें. आतां भाला पार करितों ! तुझा वाली कोण ? " याप्रमाणें आडव्या तिडव्या गोष्टी बोलोन (घेतल्या.) मग रायांनीं उठोन, घोडयाखालीं उतरवून, मल्हारजी होळकर यांचा स्तुतिवाद फार केला कीं, "ज्या ठिकाणीं कामकाज पडलें तेथें तरवार तुझीच पाहण्यांत आली. भोजन करावें." यांणीं उत्तर केलें कीं, " तुझे मनांत आम्हांविषयीं खत्रा, तेव्हां तुझे पंक्तीस आम्हीं कशास जेऊं ? " मग बाजीराव बोलले, " तुमची आमची या अन्नाची क्रिया. पुनः स्वारी करण्याचे समयीं तुम्हांकडे पांच हजार फौजेची सरदारी सांगूं. " असें बोलून

---

(२) **लौकिकी** – मोठेपणा, पराक्रम, शौर्य. **हामराई करणें** – लगामी लाऊन घेणें. **धनगरमात्र** – सैन्यांतील झाडून सारे धनगर लोक. **महकूब** – तहकूब.

(३) **किस्सा** – कज्जा, तंटा. **निर्गत होणें** – निकालात निघणें. **आबाद** – संपन्न, समृद्ध, अर्थात मुलुखगिरींतील लुटीमुळें. **लबार** – मूळ शब्द लब्बा म्हणजे बैल. लबार भरून म्हणजे कही भरून. **कडाचूर असणें** – आपल्या नादांत गर्क असणें. **तेथें तरवार तुझीच पाहण्यांत आली** – लढायांतून ऐन गर्दीच्या, मारामारीच्या ठिकाणीं तूंच जातीनें पराक्रम केलास तो आम्ही प्रत्यक्ष पाहिला आहे. **खत्रा** – खुनस, किल्मिष, संशय. **क्रिया** – शपथ.

अन्नावर हात ठेविला. इतःपर मागील संशय एकरूप उभयपक्षीं ठेवूं नये असें खचित बोलण्यांत येऊन श्रीमंत दरमजल पुण्यास गेले. फौज आपले आपले जागीं गेली.

(४) मल्हारजी होळकर तळोद्यास आपले सरंजामानिशीं आले. मामाची भेट घेतली. वित्तविषय अप्रतरणीक मामास समजून दिलें. घोडे माणूस, सरंजाम हुशार पाहून मामा प्रसन्न जाहला. मग आपली कन्या गौतमाबाई होती ती याजला द्यावी हें मनांत वागवून बायकोस विचारिलें. बायकोनें कांहीं नाक मुरडिलें. (पण) तें कांहीं एक मनांत न आणितां आपली मूल गौतमाबाई मशारनिल्हेस दिली. समयीं समर्पक लग्नाचा उच्छाह होऊन पुढें घोड्याचे निर्वाहाचें कठीण पडलें. मामी मागें पुढें कुरकूर करूं लागली. हें मल्हारजी होळकर यांस न सोसावे. सबब श्रीमंतांची फौज बढवणीस येऊन लागली होती. त्यापूर्वीं मल्हारजी होळकर आपल्या घोड्यांनिशीं बढवणीस चाकरीस राहिले होते. बाहेरील फौजेची मोर्चेबंदी झाल्यावर मल्हारजी होळकर यांणीं चौदाशें माणसांनीं बाहेर निघून मोर्च्यांचा कट्टा करून वारापाणी करावें. अशी तीन महिने लढाई घेतली. फौज त्रासरूप होऊन श्रीमंतांस पत्रें लिहिलीं कीं, " रांगडे यांची बाबत ती काय? परंतु मल्हारजी होळकर त्यांत सामील. तो दाद लागूं देत नाहीं ! " मग श्रीमंतांनी मल्हारजी होकळर यांस पत्रें लिहून " उभयपक्षीं तुम्हांकडे मुखत्यारी. खंडणीचा जाब ठराव करून फौजेची रवानगी करावी, " (असें लिहिलें.) हें पत्र आलियावर मल्हारजी होळकर दरम्यान पडून, श्रीमंतांचें वर्चस्व ठेवून, फौजखर्ची बाहेर काढून, खंडणीचा ऐवज अक्लेश जामदारखान्यांत पावता केला. याजवर श्रीमंतांची आस्था होळकर यांचे ठायीं बहुत बसून, असे माणूस दौलतींत असावे हें मनांत वागून (राहिलें). किंचित काळांतरें स्वारी मोहीमशीर होण्याचा बेत ठरला.

(५) त्या स्वारीस कलमी फौज ठेवावी असा इरादा. तेव्हां ते उदाजी पवार हे राजे यांचे चाकर ! चाकरी कबूल करीनात. " तुम्हीं आम्हीं एक्या धन्याचे चाकर

---

(३) **एकरूप** – बिलकूल, निखालस.

(४) **वित्तविषय** –मोहीमांत आणलेली लूट. **अप्रतरणीक** – काहीं एक प्रतारणा किंवा फसवणूक न करतां. **वागवून** – मनांत आणून. **समयीं समर्पक** – समर्पक समयीं, योग्य मुहूर्तावर. **येऊन लागली होती** – वेढा घालून बसली होती. **कट्टा करणें** – कत्तल करणें, नाश करणें. **वारा पाणी करणें** – दाणादाण करणें. **त्रासरूप होऊन** – संत्रस्त होऊन. **फौज खर्ची बाहेर काढून** – फौजेस पडलेला खर्चहि वसूल करून घेऊन. **अक्लेश** – सुरळीत, विनायास.

(५) **कलमी फौज** – नक्त पगार देऊन ठेवलेली फौज. **राजे** – शाहू राजे.

तुम्हांस हजेरी देऊन रोजमुरा आम्हीं कां घेऊं?" (असें म्हणू लागले.) त्यांत उदाजी पवार शिपाई, मारती तरवार. त्यांचें म्हणणें पडलें कीं, "आम्हांस बरोबर हिस्सा द्याल तर आम्हीं स्वारीस येऊं." यांत श्रीमंत कायल झालें. निमे हिस्सा कबूल करून न्यावें तर आपलें वर्चस्व तें काय? न नेल्यास नांवाचे माणूस, तरवार-बहादर. टाकून जावें हें ठीक नाहीं. मग बाजीराव साहेब यांनीं विचार केला कीं, मल्हारजी होळकर आपलेंसे करून मग याचा विचार करूं. ऐसा विचार करून मल्हारजी होळकर यांजला पत्रें लिहिलीं कीं, "तुम्हांकडील मुकत्यार कारकून बोलावयास पाठवावें." या भावीं पत्रें आलियावर यांणींहि विजार केला कीं, मुग्ध कारकून पाठवून एकादा करार ठरण्यांत आल्यास मालकी बारगळाची ठरली, (असें होईल.) आपण आपले मजूरचे मजूर राहूं. ऐसा विचार मनांत येऊन श्रीमंतांस उत्तर लिहिलें कीं, "आम्ही चाकर बारगळाचे, त्याजपासून (आपण) मागून घेत असल्यास हजरच आहोंत." या भावीं उत्तरें पाठविलीं. मग त्यांनीं मोठा माणूस बाळोजी बाबा म्हणून परभू कारकून होता, त्याजला बारगळाकडे पाठवून मल्हारजी होळकर यांस मागून घेतलें. यास खटपट बरीच लागली. शेवटीं बारगळांनीं मल्हारजींस आज्ञा दिल्यावर स्वच्छ उत्तर केलें, "आपले आज्ञेवरून चाकर पेशवे यांचा झालों. (यापुढें) आपला हुकूम मजवर राहिला नाहीं." बारगळानींहि रुकार दिल्हा. नंतर रामाजीपंत पळसकर कारकून श्रीमंताकडे पाठविले. त्यांची व श्रीमंतांची भेट जवळें मुक्कामीं झाली. भोजनाचे समयीं जाऊन पोहोंचले. श्रीमंतांस समजल्यावर पंगत खोळंबून, स्नान त्यांजला घालून, आपले शेजारीं पाट ताट मांडून भोजनास घातलें. भोजनोत्तर एकांतीं घेऊन तीन लक्ष रुपयांच्या हुंडया त्यांचे स्वाधीन करून आज्ञा केली कीं, 'पांच हजार फौजेनिशीं गोदातीरीं सामील व्हावें.' तत्क्षणीं रवाना केले. इकडे होळकर फौजेचे संचणींत होतेच. रामाजीपंत येऊन पोंहोचल्यावर पैका फौजेस देऊन कमलजारी सुरू करून पांच हजार फौज, कट्टा सरंजाम, नवी उमेद (असे) श्रीमंत गंगातीरास आले तों दाखल झाले. कांहीं दिवसांचे अंतरानें श्रीमंतहि आले.

(६) भेटी होऊन प्रथम मसलत पवार प्रकरणीं. होळकर यांनीं खात्री केली (कीं) शेदवें मुक्कामीं पवार आहेत तेथें आपण उभयतां जाऊन त्यांची दीलजमाई करून बराबर घेऊं. असा इरादा करून दरकूच शेदवें मुक्कामीं आले. उदाजी पवार यांची

---

(५) **शिपाई** – लढवय्या. **मारती तलवार** – तलवार करून दाखविणारा पराक्रमी शिपाई. **कायल** – निरुत्तर. **मुग्ध कारकून** – अडाणी कारकून. **संचणी** – जमवाजमव, भरती. **कमलजारी** – सैन्य भरती.

भेट झाली. त्रिवर्ग एकांतीं बसून पवार यांची दिलजमाई बहुतां प्रकारें केली. परंतु पवार मार्गावर न येत. त्यास तरवारीचा व जमयतीचा आजम. आम्हां वांचून ब्राह्मणाच्यानें काय करावयाचें आहे, हा फंद ! शेवटीं बाजीराव यांनीं पागोटें काढून उदाजी पवार यांचे पुढें ठेविलें. तथापि त्यांचें बोलणें तेंच. तेव्हां मल्हारजी होळकर यांजला त्वेष येऊन बाजीरावाचा हात धरून वोढलें, " इतकें मनावीत असतां ध्यानास न ये ! एक कुळंबट न आलें तर काय चिंता आहे ? आपलें नशीब आपले बराबर आहे." असें बोलून बाजीराव यांस हात धरून उठविलें. पानसुपारी न घेतां आपले गोटांत येऊन नौबत दिली. कूच करून नर्मदेचे कांठीं यावें हा इरादा. तों मागें पवाराचे कारभारी कवठेकर यांनीं उदाजी पवार याशीं बुद्धिवाद ठेवून कायल केलें कीं, "तुम्हीं फार चुकलां. या प्रसंगीं श्रीमंतांनीं बहुत ग्लानी केली. तुम्हीं रुकार न दिल्हा. यांत आपले पायावर धोंडा पाडून घेतला. त्याचे हातीं मल्हारजी होळकर निधी लागला आहे. हा पाहिजे तें करील. कमजोर झाल्यावर कोणास तरी आपलें करून ठेवावें. यांत माणूस जख खात नाहीं. असें सिद्धांत आहेत." हें दिवाणाचें सांगणें पवार यास सोईकर वाटून दिवाणासी उत्तर केलें कीं, " पुढें मेळ कसा करावा ?" तेव्हां कवठेकरांनीं सांगितलें कीं, " मल्हारजी होळकर बाजीराव यास नर्मदा उतरवीत नाहींत. सडे आपण उतरतील. ही बातमी ठेवून मागोमाग आपले सरंजामानिशीं जाऊन मल्हारजीस सामिल व्हावें. तो अनादर करणार नाहीं."

---

(६) **मार्गावर न येत** – सांगितलेलें ऐकेनात. **त्यांस तरवारीचा व जमयतीचा आजम** - आपण तरवार बहाद्दर आहो व आपणाजवळ जमयत म्हणजे सैन्याचा जमावहि पुष्कळ आहे; या घमेंडींत उदाजी पवार होता. **आजम** – मूळ शब्द ' उजम ' असा आहे. त्याचा अर्थ ' थोरवी, ' येथें गर्व, अभिमान या अर्थीं हा शब्द वापरला आहे. **ब्राह्मणाच्यानें काय करावयाचें आहे** – ब्राह्मणाच्या हातून काय पराक्रम घडणार ? आम्ही एवढे तोलदार फौजबंद सरदार ते बरोबर नसलो तर बिचाऱ्या बाजीरावाच्या हातून मुलूखगिरी कसली होते ! **फन्द** – घमेंड, स्फुंद. **मनावणें** – समजावणें, आर्जव करणें. **कुळंबट** – कुणबी, कुळंबट व कुणबट एकच. मराठ्यांत जातीनें मजूरासारखा शेती करतो तो हलका समजण्यांत येत असे. येथें कुळंबट शब्दाचा तुच्छतादर्शक उपयोग होळकरांनीं केला. **नौबद दिली** – कुचाचा इशारा देण्यासाठीं नौबद, नगारा वाजविला. **बुद्धिवाद ठेवून** – मुळांत बुद्धिवाद देऊन असें असावें. बुद्धिवाद देऊन म्हणजे युक्तिवाद करून. **ग्लानी** – आर्जव, अजीजी. **निधी** – भांडार, खाण, कल्पतरु अशा अर्थी. **जख खाणें** – गोता खाणें, नुकसानी होणें, नाश होणें. **मेळ** – सलोखा.

(७) तों इकडे जयपूरवाले जोतपूरवाले वगैरे रजवाडे यांजवर पातशाही कर तिसरे वर्षांत डोकेंदेणें लागत होता. या त्रासानें आपले जागा दिक्क. मनांतील धर्म, कसेंही करून बादशाहीस धक्का द्यावा हा इरादा. परंतु पातशाही सलतानाचा प्रसार मोठा. राजेरजवाडे खातरेंत नाहींत. तेव्हां सर्वांनीं एकदील बादशाहीस धक्का द्यावा हा इरादा करून, जयपूरवाले राजे सवाई जयसिंग यांस पुढें करून, दक्षणी घोडीवाले यांस बगलेंत घेऊन गिरास करावें, हा मनसुबा सिद्ध करून, उज्जनीस देवदर्शनाचे मिसें करून आले. तेव्हां एकाएकीं उघाड होतां नये सबब इंदूरकर मंडलेई (यास) मल्हारजी होळकर यांजकडे पाठविलें. कारण 'तुम्हीं जुवामर्दीचा इरादा धरला आहे त्या पक्षीं तुम्हास तमाम रजवाडे जयपूर, जोतपूर आदीकरून लहान मोठे सामल करून देऊं. परंतु तुम्हीं दयाबहादर सुभा उज्जन बातशाई आहेत, त्या बराबर सरंजाम साठ हजार पठाण व चाळीस हजार आलिगोल व तीनशें तोफा चालू, याप्रमाणें आहे. याचें पारपत्य करून धारा उज्जन येथें अमलाफैला तुमचा होऊन पुढें चाल चालू झाली म्हणजे एकसमयावछिन्न लहान मोठे रजवाडे यांचे वकील तुम्हांपाशीं आणितों.' या भावीं (मल्हाररावाशीं) बोलून फौज हमरा करून सुभा पातशाही याजवर आणून घालावें. तेथें घोडीवाल्यांकडून सुभ्याचें पारपत्य झाल्यास पुढें आठ दहा रोजांत रजवाडयांशीं व घोडीवाल्यांशीं मेळ घालून हिंदुस्थान पाहावें. कदाचिन् सुभ्यानें यांचें पारिपत्य केलें तर ' आग फसे बंदा हुशार ' अशी मसलत करून इंदूरचे जमीदार मल्हारजी होळकर यांजकडे पाठविले. मल्हारजी होळकर व बाजीराव पेशवे यांनीं मसलत करून बाजीराव यास माघारे पुण्यास रवाना करून (दिले व) आपण सडा घोडा राऊत, त्यांत पालपडदा बायको जातें इत्यादि

(७) **डोकें देणें** – जिझीया नांवाचा हिन्दुवर लादलेला कर. हा कर दर डोई द्यावा लागत असे. **दिक्क** – कष्टी. **सलतान** – राज्य, अंमल. **प्रसार** – पसारा. **एकदील** – एकदील करून. **गिरास** – बंड. **उघाड** – परिस्फुटता. **कारण** – कीं. **दयाबहादर सुभा उज्जन** – उज्जनचा सुभेदार दयाबहादूर. **आलिगोल** – तोफेचा गोलंदाज. **चालू** – प्रत्यक्ष उपयोगांत असलेल्या, शोभेच्या नव्हेत. **अमलाफैला** – अधिकार, अंमल. **एकसमयावच्छिन्न** – एकसमयावच्छेदेंकरून, एकाच वेळीं. **हमरा करणें** – बरोबर घेणें, सामील करून घेणें. **घोडीवाले** – मराठे. **हिंदुस्थान पहावें** – उत्तर हिंदुस्थानांत प्रवेश करावा. इंदूर, माळवा हे उत्तर हिंदुस्थानांत प्रवेश करण्याचें द्वारच होय. **आग फसे बन्दा हुशार** – पुढच्यास ठेंच मागचा शहाणा. **पालपडदा** – तंबू, राहुटी. **सडा घोडा राऊत इ०** – लष्करांतील डेरे, राहुट्या, कुटुंब, कबिले इ. सर्व मागें ठेवून केवळ सडी स्वारी करून दयाबहादूरावर धाड घालावी असा मल्हाररावानें बेत केला.

पडदळाचें नांव नाहीं, असा बेत करून नर्मदा उतरावी. याचा माहितगार वाटघाटाचा कोणी तरी असावा या उद्देशांत. तों नंदलाल मंडलोई दोनशें स्वारानिशीं येऊन दाखल झाले. मल्हारजी होळकर यांच्या त्यांच्या भेटी झाल्या. राजे सवाई जयसिंग याणीं रवानगी केली त्या समयीं जे पर्याय बोलण्यांत आणले ते सर्व बोलून आशादुराशाही विशेष दाखविली. परंतु सुभा बुडविल्याचे पोटीं इतक्याही गोष्टी नमुदास आणून देऊं. मल्हारजी होळकर यांणीं श्रवण करून उत्तर केलें कीं, " आम्हांसहि सुभ्याशींच काम आहे. सुभा पाहून घेतल्यावर राजे रजवाडे व हिंदुस्थान पातशाई सलतन पाहून घेऊं." राजकारणप्रकरणीं हा दम देऊन जमीदार यांची खातरतसलीम करून पगडीबदल भाईचारा करून त्यास आज्ञा केली कीं, " तुम्हीं आम्हांस घाटावाट निटोप्याची दाखऊन दोन प्रहराचे संधीस त्यांजवर आम्हांस नेऊन सोडावें. मग श्रीमार्तंड काय करील तें अवघ्यांचे दृष्टीस पडेल." या प्रमाणें इंदूरकर जमीदाराशीं सफाईचें बोलणें होऊन घाट पाडण्याचा जिमा त्यानें केला.

(८) इकडे घोडीवाले पार उतरोन दंगा करतील यास्तव फौज सरंजामसुद्धां कूच करून दयाबहादूर धारचे मुक्कामीं येऊन नाक्या घाटाचा बंदोबस्त करून होते. तेव्हां इंदूरकर जमीदार व कांहीं सामल पूर्व स्नेहावर बढवाणीकर, या उभयतांचें विचारें घाट वाट अनोळखी काढून, सुभ्याकडील बंदोबस्त जागचे जागींच राहोन, नर्मदा पार उतरोन सूर्योदयापूर्वी घाट चढोन गेले. ही बातमी उदाजी पवार यांनीं ठेऊन ज्या वाटेनें मल्हारजी होळकर उतरून गेले त्याच वाटेनें हेही आपल्या सरंजामानिशीं उतरून घाटावर सामल जहाले. मल्हारजी बावास कळलें कीं, उदाजी

(७) पडदळ – पडथळ, सामानसुमान. **उद्देशांत** – शोधांत. **पर्याय** – मुद्दे, कलमें. **अशादुराशा** – आमिष. **परंतु** – कीं. **नमुदास आणून देऊं** – सिद्ध करून देऊं, घडवून दाखवू, प्रत्ययास आणून देऊं. **सुभा पाहून घेतल्यावर** – सुभ्याचा पराभव केल्यावर, सुभ्याचा नाश केल्यावर. **सुभा** – सुभेदार (दयाबहादूर). **हा** – असा. **दम** – विश्वास, भरंवसा, आश्वासन. **खातरतसलीम** – खातरनिशा, खात्री. **पगडीबदल भाईचारा करणें** – एकमेकांनीं परस्परांचीं शिरोभूषणें घेऊन स्वतःच्या डोक्यावर घालणें. उत्तर हिंदुस्थानांत भाईचारा म्हणजे स्नेह किंवा पक्की एकी झाली असे दाखविण्याकरितां अशा रीतीनें पगड्या किंवा शिरोभूषणें बदलण्याचा रिवाज होता. **घाटावाट** – घाटांतली वाट. **निटोप्याचीं** – जवळची वाट (Short cut) मूळ शब्द निटोपा (Straightness). **घाट पाडणें** – घाटांतून वाट तयार करणें, काढणें.

(८) जिम्मा करणें – हमी घेणें. **पार उतरून** – पलीकडे उतरून. **सामल** – सामील.

पवार आले. ते क्षणी त्यांचे मंडळांत जाऊन, भेट घेऊन बहुत खातरी केली. हमराहा करून तेथें घोडयाचे खोगीर तोबरे घालून दोन प्रहराचे संधीस जमीदारांनीं कोशा अदकोशाच्या छटीने गांठ घालून दिली. चैत्राचा महिना, उष्ण अति तीव्र, यावनी सलतान, जागां जागां तहखानें सामसूम होते. अदकोशावरून ' हर हर महादेव !' करून घोडे घातले; त्यांत भेसळ होऊन निजला त्यास उठूं दिला नाहीं, बसला त्यास उभे राहूं दिलें नाहीं, उभा त्यास घोडयास हात लावूं दिला नाहीं ! ! याप्रमाणें तहखान्याचे तहखान्यांत व बाहेरचे बाहेर, एकसा कत्तल जाहली. तोफखाना आपलासा केला. पायदळ कडब्यासारखें कापलें. इतक्या अवसरांत दयाबहादर जातीनें अवसान धरून पांच चार हजार पठाण हमराहा करून लढाई सुरू झाली. एक प्रहर धुमसाधुमसी होऊन शेवटीं प्रहर दिवस राहतांना घोडे घातले. पांच हजार स्वार नाहींसे करून दयाबहादूर यांचें डोकें हत्तीवर कापलें. नंतर धारेंत पेशवे याची द्वाही फिरवून, सलतन आटपावयास विठोजी बुळे इतलाखी बोलीनें होते, त्याजपाशीं दोन हजार स्वार ठेवून जातीनें आठ हजार स्वारानिशीं उज्जनीस येऊन अमलफैला केला. कांहीं एक अवघड पडलें नाहीं. एवढा सुभा बुडवावयास वर्षाचीं वर्षें लागावीं तो एक छाप्यांत गांवखुद जाहला. हा दक्षण्यांचा होतकाळ, श्रीमंतांचा प्रताप, मल्हारजी होळकर याचे तलवारीचा जलूस ! वर्षोगणती परिश्रम एक दिवसांत सिद्ध जाहले. उज्जन इंदूर वगैरे माळव्यांत अमलफैला करून सोदवाडयांत ज्या गढीवाल्यानें गोळी वाजविली त्या गढीचा कट्टा करून तीनशें तीनशें पांच पांचशें माणूस मेकसूखालीं मारिलें ! नारळ फोडीत गेले ! ! असा निग्रह रवाब पडण्याप्रीत्यर्थ करून माळव्यांत अमलफैला केला. तों रजवाडयांचे जाब आले.

---

(८) **हमराह** – सामील करून घेऊन. **छटीनें** – छव्यानें, अन्तरानें, तफावतीनें. उष्णऊन. **तहखाना** – उष्णतेपासून बचाव करण्याकरितां जमिनींत खोदलेलें तळघर. **जागां जागां तहखानें सामसुम होतें** – मुसलमानी सैनिक तळघरांतून आराम करीत पडले होते. **त्यांत भेसळ होऊन** – शत्रूच्या सैनिकांत घुसून. **एकसा** – एकसहा, सरसकट. **आपलासा केला** – जिंकला. **धुमसाधुमसी** – लांबून लांबून, प्रत्यक्ष अंगाश आंग न भिडता चाललेले हल्ले, प्रतिहल्ले. **गांवखुद होणें** – नष्ट, निष्प्रभ होणें. **' होत काळ ' किंवा ' होता काळ '** – म्हणजे उत्कर्षाचा योग, बढतीचे दिवस. मुळांत साने यांनीं ' वेत काळ ' असें छापलें आहे ती मोडी वाचनाची चूक होय. **जलुष** – दरारा, पराक्रम. **गोळी वाजविली** – प्रतिकार केला, बन्दुकीच्या गोळ्या सोडून. **कट्टा करणें** – नाश करणें. **रवाब** – रुबाव, धाक किंवा दरारा.

त्यास बरोबर घेऊन नर्मदा उतरून पुण्यास आले. पुण्यास रजवाड्यांचे वकिलांचीं बोलणीं चालणीं खात्रीचीं होऊन बाजीराव साहेब पेशवे यांजला समागमें घेऊन माळव्यांत आले. माळव्या पावेतों अमलफैला आपलाच जाहला होता. पुढें रजवाड्यांपैकीं सवाई जयसिंग जयपूरवाले यांचे विचारें रजवाडा पार होऊन दिल्लीचे आसपास खूब धुमा चौकडे केली. जाळपोळ अशी केली कीं, दिल्लीचे बाहेर चाळीस चाळीस कोस दिवा ना बत्ती. कुंजपुरा लुटला. त्यानें फौजेंत अन्यत्र धातूंचा परित्याग होऊन सुवर्णाचा संग्रह जाहला. पातशाई हालवून माघारे फिरले. जयपुरावर येऊन सवाई जयसिंग यांच्या व श्रीमंतांच्या व मल्हारजी होळकर यांच्या भेटी जाहल्या. त्या दिवसापासून मल्हारजी होळकराचा पगडीबदल भाईचारा (झाला). पांच चार रोज लोटल्यावर राजास खर्चाचे अडचणीची निकट लाविली. तेव्हां राजाचें उत्तर पडलें कीं, आमची विद्या आम्हासच प्रत्ययास येऊं म्हणते कीं काय? यांनीं उत्तर केलें कीं, "हा विषय आपण मनांत आणूं नये. खर्चाची सरबरा करावी." तेव्हां जबरीचा जाब पाहोन जयपुरवाले छद्मी. त्यांनीं विचार केला, पैका देणें सुटत नाहीं. तथापि कांहीं वर्चस्व ठेवून देणें तें द्यावें. अशा भावें मुद्दा घातला कीं 'आम्हीं देणें तें तुळशीपत्र ठेवून देऊं.' पेशवे यांणीं कबूल केले. "आम्हीं ब्राह्मण आहों, म्हणाल तर तुम्हांला तीर्थही देऊं, परंतु खर्चीस पाहिजे." तेव्हां तीस लाख रुपये तुळशीपत्रासह घेतले. तेथून निघोन देशांत आले.

(९) त्याजवर मल्हारजी होळकर पुण्याचे मुक्कामीं होतें. त्यांजला दुवक्ता थाळा राणोजी शिंदा चांभारगोंदेकर श्रीमंतांपाशीं खिजमातगार होता, तो घेऊन येत होता. त्या समयीं मल्हारजी होळकर यांचें बोलणें श्रीमंतांपाशीं पडलें होतें कीं, "तुम्हांकडील एक पाग्या व जरीपटका व मुतालकी शिक्के व ब्राह्मण काराभारी द्यावा. जरीपटका व खासा डेरा मधीं देऊन आम्हीं डावे बाजूस पागा उतरून कारभार डेऱ्यांत होत जावा. आपल्यास पत्रें येणें तीं पाग्या व आमच्या नांवें येत असावीं. असा

---

(८) **रजवाडा पार होऊन** – राजपुताना ओलांडून. **धुमा** – धामधूम. **सुवर्णाचा संग्रह झाला** – खूप लूट मिळाली. **आमची विद्या आम्हासच प्रत्ययास येऊं म्हणते कीं काय** – आम्ही तुम्हास मुलुखगिरीला मार्ग दाखवून दिला ते तुम्ही आम्हापाशीहि खंडणी मागू लागलात तेव्हां आमची विद्या आम्हासच फळली असें झालें! **सरबरा** – तरतूद, पुरवठा. **छद्मी** – कपटी. **तुळशीपत्र ठेऊन देऊं** – म्हणजे खंडणी म्हणून देणार नाहीं, दान म्हणून पैका देऊं. दान करावयाच्या वस्तूवर तुळशीपत्र ठेऊन ती देण्याची वहिवाट असते.

(९) **थाळा** – जेवणाचें ताट.

बेत करून द्यावा." श्रीमंत यांचें उत्तर " तुम्ही सांगाल त्यास पागा देऊं." असें बोलणें चाललेंच होतें. तों एके दिवशीं राणोजी शिंदे थाळा मुदबखांत ठेवून मल्हारजी होळकर बिचोव्यांत निजले होते, त्यांचे पायथ्याशीं येऊन उभा राहिला. राम राम करून जावें तितक्यांत मल्हारजी होळकर राणोजी शिंदे हुजरे यासी बोलिले कीं, "राणू, तूला पागा, जरीपटका, मुतालकी शिक्का देतों. तूं (मज) बराबर चाल." त्याणें उत्तर केलें कीं, " मी जोडा उचलणार, माझी थट्टा करितां कीं काय ?" तेव्हां मल्हारजी बावा बोलिले कीं, " तिसरे प्रहरीं काय होतें तें पहावें." तो राम राम करून पुण्यांत गेला. तिसरे प्रहरीं मल्हारजीबावा कचेरीस आले. तो बाजीरावसाहेब गादीवर बसून राणोजी शिंदा चौरी उडवीत होता ते समयीं सुभेदारांनीं पुनः विनंति केली, " आमचे समागमें द्यावयास योजना कोणाची करितां ?" तेव्हां श्रीमंतांनीं उत्तर केलें कीं, " तुम्ही सांगाल त्यास देऊं." नंतर मल्हारजीबावा बोलिले कीं, " हा राणू चौरी उडवितो याजला वस्त्रें द्यावीं." उत्तम आहे, असें म्हणोन तेच समयीं वस्त्रें आणून राणोजी शिंदे यांस दिलीं. वस्त्रें पागा देऊन बाहेर गारपिरावर डेरा दिल्हा. कारभारी यांची योजना होण्यास एक दोन रोज विचार जाहला. मग रामचंद्रबावा शेणवई कारभारी नेमांत आले. मल्हारजीबावांनीं सरकारी शिक्का कटार श्रीमंतांचे रुबरू राणोजीबावांस दिलें. त्या दिवसापासून शिंदे होळकरांची गांठ.

(१०) उभयतां पुनः माळवे प्रांतीं आले. रामचंद्रबावा कर्ते पुरुष व मल्हारजी होळकर याजला सरदारी दिली ते समयीं कारभारी गंगाधर येशवंत करून दिले होते (ते, अशा) उभयतांनीं एक विचारें माळव्याचे महालाचा आकार पाहून वांटण्या केल्या. निंमे शिंदे निमे होळकर ऐसी वहिवाट चालली. परंतु वांटणीचा तपशील येणेंप्रमाणें:— श्रीमंत ४५, शिंदे २२॥, होळकर २२॥, पवार १०. याप्रमाणें आकार पाहून माळवा वांटून दिल्हा. ते समयीं उदाजी पवार यास वैषम्य वाटलें कीं, आम्हीं काय नाकार म्हणोन आम्हांस दहा ? तेव्हां कौठेकर यांतीं पवाराचें शांतवन केलें कीं, " त्यांच्या जमेती मोठया व बाजीरावसाहेब यांनीं पागोटें काढून तुमचे पुढें ठेविलें ते समयीं सन्मानानें आलां असतां तर इतकेंही बोलणें शोभतें. आतां बोललें असतां पुन्हा फांटा पडून पूर्ववत् होईल. यास्तव जहालें हेंच

---

(९) **मुदबख** – पाकशाळा. **बिचोवा** – एका काठीची लहान राहुटी. **गारपीर** – स्वारीस निघतांना पुण्याबाहेर सैन्याचा तळ पडण्याची नेहमीची जागा. **रुबरू** – समक्ष, देखत.

(१०) **नाकार** – नादान. **फाटा पडणें** – बिघाड होणें.

सोबत

उत्तम मोजून सोभत द्यावी." असें सांगितलें. तेव्हां पवार आपले मनांत समजोन उगेच राहिले. महालाच्या वांटण्या जाहल्या त्याप्रमाणें अद्यापि चालतात. फौज उभयतांनीं कोणी कितीक ठेवावी ही श्रीमंतांची नेमणूक नाहीं. उभयतां सरदारांनीं आपले नांवालौकिकाकरितां फौज लागेल तशी ठेवून राजेरजवाडे यांजवर जरब बसवून उत्पन्नावर हुकूम वांटून घेऊन नक्षा राखावा. याप्रमाणें राणोजीबावा असतां वहिवाट चालली. पुढें राणोजीबावा यांचे पुत्र जयाजी, दत्ताजी व जोतिबा हे त्रिवर्ग खासे, औरस व तुकोजी व म्हादजी उभयतां विदुर, एकूण पांचजण होते. त्यांपैकीं तुकोजीचें व जयाजीचें न बने, यामुळें ते श्रीमंतांपाशीं राहिले. जयाजी शिंदे व मल्हारजी होळकर यांणीं स्वाऱ्या शिकाऱ्या करून, रजवाडे जेर करून पुण्यास आले. ते दिवसांत जयपूरवाले सवाई जयसिंगाचे चिरंजीव उभयतां (होते) त्यांत गादीचा अधिकारी सिसोदेवालीचा पुत्र माधोसिंग. परंतु हे धाकटे वयानें, सबब राजानें कनिष्ठेचा पुत्र ईश्वरसिंग हा गादीवर बसवून आसन्न काळाचे समयीं जयसिंगानें असें करून निधन पावले. नंतर ईश्वरसिंगास राज्याभिषेक होऊन गादीचा मालक माधोसिंग याजला दगा करून मारून टाकावा या इलाजांत होते. तेव्हां माधोसिंगाची मातुश्री माधोसिंगास घेऊन माहेरी उदेपुरास आली. मग राणाजीनें रामपुरा चंद्रावताचे येथें माधोसिंगास ठेवून मल्हारजी होळकर यांजकडे संधान केलें कीं, "माधोसिंग तुमचा भाचा आहे, याची शरम ठेवून जयपुरीं गादीवर बसवावें." असेंच उमेदसिंग होडे याची सापत्नमाता जयसिंग जयपूरकर याची बहीण, तिनें सापत्न पुत्र वाढविला. कांहीं बहीणभावाचे बोलण्यांत विग्रह होऊन बहीण मूल उमेदसिंग याजला घेऊन पुण्यास मल्हारजी होळकर यांजपाशीं आली कीं, "मी तुझी बहीण, जयसिंगानें बोलण्यांत विग्रह केला. याजमुळें मी राज्य सोडून तुजपाशीं आलें. मागें भावानें बुंदीचे राज्यांत अमलफैला केला. आतां या मुलास स्थानारूढ करणें तुजकडे आहे."

(११) दोन्ही राजकारणें घेऊन (मल्हारराव) बाजीराव पेशवे यांचे चिरंजीव नानासाहेब यांजला घेऊन माळव्यांत आले. पुढें चाल करून परगणे नेवाई प्रांत धुडाड

---

(१०) **सोभत द्यावी** – सोबत द्यावी म्हणजे शिन्दे होळकरांबरोबर राहून काम करावें. **उत्पन्नावर हुकूम वांटून घेऊन** – 'हुकूम वांटून घेऊन' या ऐवजीं मूळांत 'हुंड्या वांटून घेऊन' असे असावे. मोडी वाचनाची चूक आहे. **विदूर** – अनौरस, लेकवळे, रक्षापुत्र, खर्चीं संतति. **खासे** – औरस. **ते** – तुकोजी. **सिसोदेवाली** – उदेपूरकर राजाची कन्या. **कनिष्ठेचा** – कनिष्ठ बायकोचा. **बसवून** – बसविला. **इलाज** – उपाय. **राणाजीनें** – उदेपूरच्या राण्यानें.

येथ पावेतों आले. जयपूरवाल्याचें पारिपत्य करावें. तो शिरावर बरसात वारद झाली व राजा सरंजामें करून जबर. तेव्हां नाना यांणीं मसलत काढिली कीं हा दिवस लढाईचा नव्हे. बाजबरसात याचें पारिपत्य करूं. आतां शहास गुंतून छावणी केल्यास खर्चाची अडचण पडेल. याप्रमाणें विचार काढला. तेव्हां मल्हारजी होळकर यांणीं आपलें कुटुंब खंडेराव होळकर चिरंजीव बरोबर देऊन मार्गस्थ केलें. आपण जातीनें होळकर व सडी फौज घोडा राऊत त्याच निजध्यासांत राहिले. शिंदे याचें कोणी बराबर नव्हतें. नाना कूच करून गेल्यावर जयपूरचा राजा ईश्वरसिंग मल्हारजी होळकर याजवर चालून आला. त्याची यांची तफावत सात आठ कोसांची. हें सुभेदार यांस कळतांच निवडक दोन हजार स्वार घेऊन पूर्व रात्रीस रांगडयाचे आसपास गनीमी करावी याकरितां गेले. हे जाऊन पोंचतांच रांगडे याचें कूच होऊन सडी स्वारी पुढें अर्ध कोशावर, बुणगे दरोबस्त ठिकाणीं, अशी संधि पाहून, बुणग्यावर जाऊन पडतांच त्यांस समजलें, "मल्हार आया !" मग मनुष्याचें जिवांत जीव न रहातां मर्द नामर्द एकसारिखें जाहले. दोन घटिकेंत लुटून लाखेरीच्या दऱ्याकडे घेऊन गेले. पाऊस सतत लागला. राजाचे फौजेंत अन्नपाणी (घेण्यास) अमळ देखील मवसर नाहीं. जेर जहाले. तेव्हां कारभारी यांणीं मसलत दिली कीं, "बुणगे गेले, जामदारखाना गेला, फौजेनें हैबत खाल्ली. आतां तह ठरवावा." मग वकील पाठवून बोलों लागले. तेव्हां सुभेदार यांणीं बोलणें घातलें कीं, "बुंदीचे राज्य व पंचवीस लाख रुपये द्यावे तेव्हां तुम्हांस जाग्यावरून हालूं देऊं." तेव्हां राजानें निरुपाय जाणून वीस लाख रुपये व बुंदीचें राज्य देऊन जयपुरास गेला. इतके अवसरांत श्रीमंत इंदुरास दाखल जाहले. तों हें वर्तमान समजल्यावर श्रीमंतांस संतोष जहाला. बुंदीचे राज्यावर उमेदसिंग होडे याजला बसवून दिलें. राजामल्ल खत्री जयपूरचा कारभारी त्याचें व राजाचें चित्त शुद्ध नवतें. तो सुभेदार यास मिळोन होता. सुभेदार इंदुरास येऊन श्रीमंतांसुद्धां देशीं आले.

(१२) पुनः मल्हारजी होळकर फौजबंदी करून माळव्यांत एकटेच आले. हें वर्तमान राजामल्लास कळल्यावर सुभेदार याजला फौजेसुद्धां चाटून प्रांत धुडाड येथपावेतों आणून ईश्वरसिंग राजास कळविलें कीं, मल्हारजी होळकर आला. तेव्हां

---

(११) बरसात – पावसाळा. **वारद** – प्राप्त. **शिरावर बरसात वारद झाली** – पाऊसकाळ डोक्यावर आला. **बाजबरसात** – पावसाळ्यानंतर, बाज म्हणजे नंतर. **निजध्यासांत** – जयपूरवाल्यांचा कांटा काढण्याच्या उद्योगांत. **गनिमि** – गनिमी पद्धतीचे छापे घालणें, धामधूम उडवून देणें. **मवसर** – अवसर, सवड. **हैबत** – भीति, धास्ती.

आज्ञा केली कीं, आपली फौज जमा करा. ऐकून कानागाडा केला. हा फितूर राजास समजतांच राजानें विषप्रळय केला. हें वृत्त कारभारी यांणीं मल्हारजीबावांस कळवितांच कूच करून दरवाज्याजवळ मुक्काम केला. दरवाजे उघडून आंत जाऊन राजास अग्निसंस्कार करून, नियतशाबूदी व पुढें होतकाळाचें लक्षण, जयपुरासारिखें राज्य बैतन हातीं लागलें असतां दुराशा रतिमात्र न करितां बंदोबस्त कारभारी यांसी सोंपवून आपण मुक्कामास येऊन सांडणी स्वार रामपुऱ्यास पाठवून माधोसिंग राजा जयपूरचा येथें आणून (त्याची) चिरंजीव म्हणून स्थापना केली. पाऊण कोट रुपये नजर व रामपुरा, हिंगळाजगड व टोंक व धाकटा रामपुरा इतक्या जागा दिल्या. तों मागाहून शिंदे आले. यांणीं ठरलेला कार मोडावा, दुसरा राजा बसवावा, असें मनांत आणून महिनाभर घोळ पडला. शेवटीं जयपूरवाले छत्री यांणीं शहरांत कौलाचा बाजार भरवून शंभराची रक्कम पंचविसांत द्यावी. ही शोहरत शिंद्याचे फौजेंत कळतांच कमकसर दहा हजार मनुष्य चढापाला शहरांत खरेदी

(१२) **कानागाडा** – कानाडोळा, दुर्लक्ष. **विषप्रळय केला** – विषप्राशन केलें. **नियतशाबूद** – वचनाचे धड, दिलेला शब्द पाळणारे. **होतकाळ** – उत्कर्ष काळ. **बैतन** – बेवारस झालेले. **दुराशा** – लोभ. **यांणीं** – मल्हारराव होळकरांनीं. **कार** – करार, ठराव. **कौलाचा बाजार** – मौलाचा बाजार असे असावें. या बाबत अत्रेकृत मल्हारराव होळकर चरित्रांत माहिती दिली आहे.

" मौल " म्हणजे कपट इंद्रजाल वगैरे. मौलाचा बाजार व मिनाबाजार भरविण्याची पूर्वीं चाल होती. कै. श्री. जयाजीराव शिंदे हे मिनाबाजार भरवीत असत असें ऐकिवात आहे. या बाजारांत मालाची विक्री करण्यास बहुधा वेश्या किंवा स्त्रिया असतात. त्या मालाची मागतील तितकीच किंमत द्यावी लागते; व एकदा रक्कम किंवा माल मागितल्यावर तो घ्यावाच लागतो असा नियम आहे. हा बाजार रात्रीस भरतो. ह्याचाच दुसरा प्रकार खोऱ्या रकमा (वस्तु) किंवा रकमेचें रूपांतर करून बहुत किंमतीची रक्कम थोड्या किंमतीस द्यावयाची; व यासच 'मौलाचा बाजार' म्हणतात. " मौलाचा " ऐवजी 'कौलाचा' वाचणें ही मोडी वाचनाची चूक समजावी.

शोहरत – आवाई. **मनुष्य चढापाला** – 'मनुष्याचा ढाबळा' असा दुसरा पाठच बरोबर वाटतो. 'ढाबळी' किंवा 'ढाबळा' म्हणजे कबुतरांना राहावयाकरतां केलेली अनेक कप्प्या कप्प्यांची पेटारी. एकेका ढाबळींत शें दोनशें सुद्धां कबुतरें राहूं शकतात. त्यावरून डाबळा किंवा ढाबळी म्हणजे जमाव, थवा असा अर्थ निष्पन्न झाला. येथें दहा हजार शिंद्याच्या माणसांचा जमाव कबुतरांच्या ढाबळ्याप्रमाणें एक गटानें मौलाच्या बाजारास गेला. **कमकसर** – कमी अधिक, अजमासें, सुमारें, फार नाहीं तरी.

करितां गेलें. त्यांनीं शहराचे दरवाजे लावून कत्तल केली. हें वर्तमान बाहेर रतिमात्र फुटों दिलें नाहीं. तेव्हां दोन स्वार राजमहालाचा दरवाजा तिरपुल्यापासून घोडे हांकून, कोट शहराचा आंतून वीस हात उंच व बाहेरून शंभर हात उंच असा कोट उडून दोन राऊत आले. त्यांत एक तर कोटाचे चारव्यास अडकून बरोबर जाहला. एक शाबूतीनें लष्करांत आला. त्याणें वर्तमान समजाविलें. सात आठ हजार खासा कामास आला. लष्कर बरबाद जाहलें. येणें करून शिंदे यांचा तोरा राहिला नाहीं. मग शिंद्यांनीं आपसांत समेट घालून मल्हारजी होळकर यांणीं ठराव केला त्यास अनुसर होऊन राजाचे कारभारी बोलावून त्यांस जरब दिली कीं, " तुम्हांस गादीवर बसविलें याचा फायदा आम्हांस हाच कीं काय ? विश्वासघात करून दगा केला ! काय चिंता आहे. जयपूर खोदून बराबर करितों ! " तेव्हां जयपूरचे कारभारी यांणीं उत्तर केलें कीं, " आम्हांस ठिकाणशीर बसविलें असतां आम्हांकडून अशी हरामखोरी कशी घडेल ? माणसाची चुरस होऊन समेटांत न येतां अरे अरे करणें आमचें आम्हांपाशीं राहून ही दशा जाहली. " अशी लाचारी बोलतात, इतक्यांत धुळेवाला रजपूत भाईबेटा राजाचा, त्याची पहाडावर गढी, माची (स) शहर, ती अस्तमानी स्वारी जाऊन मल्हारजी होळकर सुभेदार यांणीं माचीची वस्ती लुटून जाळून गढी खोदून बरबाद केली. प्रहर दिवस येतां लष्करांत आलें आणि बोलून दाखविलें कीं, " याप्रमाणें तुमचे राज्याची अवस्था एक्या महिन्यांत करितों. आजची मिती मांडून ठेवावी, " असें बोलतां जयपूरचे कारभारी यांजवर जरब पडली. त्यांणीं बहुत आधिनी करून गुन्हेगारी बाबत पंचवीस लाख रुपये याची निशा देऊन येथून कूच

(१२) **तिरुपला** – तिरपुल्या, म्हणजे तीन कमानींचा. असे दरवाजे बाजाराव पूर्वीं करीत असत. सध्यां रतलाम येथें असा एक दरवाजा आहे. **कोट उडून** – कोटाच्या तटावरू घोडे उडवून. **चारवा** – मूळ शब्द ' चर्या ' असा असावा. त्याचा अर्थ राजव्यवहार कोशांत ' चर्या प्राकारफालिका ' असा दिला आहे. त्यावरून, तटाच्या भिंतीच्या माथ्यास, कातरलेल्या करंजी प्रमाणें किंवा कमळाच्या पाकळ्या प्रमाणें बांधकाम केलेलें असतें तें. महाराष्ट्र शब्द कोशांत तुकाराम गाथेंतील अवतरण दिलें आहे तें असें " उभारिली दुर्गे दारवंटे फांजी । कोटि चर्या माझी शोभलिया । " यावरून शब्दकोशकारांनीं चर्या या शब्दाचा अर्थ रचना, बांधणी असा मोघम कांहीं तरी लाविला आहे. नक्की वर्णन कळत नाहीं. **बरोबर जाहला** – ठार झाला. **बरबाद** – नष्ट. **तोरा** – वरचष्मा, डौल. **अनुसर होणें** – कबुल होणें. **ठिकाणशीर** – योग्य ठिकाणीं. **आधिनी** – अजीजी, आर्जव, विनवणी. **निशा** – खात्री.

करावें असें ठरावून कूच करविलें.

(१३) त्या संधींत दिल्लीकडील राजकारण मनसूर अली दिल्लीचा वजीर याजला फर्काबादवाले पठाण यांनीं दग्यानें लुटून घेतलें, याजमुळें मनसूर अली लाचार कायल होऊन सुभेदार यांजकडे बोलणें करण्यास वकील पाठविला कीं, "तुम्हीं आमची मदत करावी. तुम्हांस कुचाचे लाख, मुक्कामाचे पन्नास हजार रुपये देत जाऊं" असें शिंदे होळकर यांशीं बोलणें होऊन दरकूच आगऱ्यास आले. तिकडून मनसूर अली दिल्लीहून आगऱ्यास आला. सरदारांच्या त्यांच्या भेटी जाहल्या. हें वर्तमान फर्काबादवाल्यांस समजल्यावर त्यांणीं सादलबादल पठाण चाळीस हजार फौज व दोनशें तोफा, कांहीं पायदळ भरवंशाचें, या जमाव कासमगंजाचे पुलावर पाठविले. हें वर्तमान शिंदे होळकर यांस समजतांच सुभेदार यांणीं आपले कडील गंगाधर येशवंत व शिंद्याकडील साबाजी शिंदे वीस पंचवीस हजार घोडा सडा राऊत तत्क्षणीं रवाना केले. यांनीं यमुना उतरून, त्याशीं मुकाबला घालून तिसरे लढाईस सादलबादल याची फौज लुटून घेऊन सरदारांचीं डोकीं कापून आणिलीं. हें वर्तमान शिंदे होळकर उभयतां सरदारांपाशीं येतांच मनसूरअलीसुद्धां कूच करून फर्काबादेस गेले. फर्काबादवाले पठाण शहर सोडून भागीरथीचे खळ्यांत जाऊन राहून गंगापूर रोहिल्याचे मुलुखांतून रसद आणून खळ्याचे आसऱ्यानें राहिले. तेथें शिंदे होळकर यांचा उपाय, जागा बिकट यांजकरितां, न चाले. तेव्हां गंगा उतरून रोहिलखंडांत शिरले. तेथें बातमी राखून फरकाबादवाल्यांची रसद बंद करून मारून आणिली. त्यांस खळ्यांत अन्नाची भ्रांति जाहली. तेव्हां फर्काबादवाले यांस रोहिले सामल होते. पन्नास, शंभर हजार फौजेचा जमाव करून रोहिले यांणीं शिंदे होळकर यांचा मुकाबला केला. उभयतां सरदारांनीं त्यांचे फौजेभोंवती गमिनी करून अन्नपाणी, हागमूत बंद करून आठ रोजांत लुटून घेतलें. जातीनें पळून कमाऊंचे पहाडांत शिरले. त्याचे मागोमाग फौजा रवाना होऊन पहाडांत कायल केले. तेव्हां रोहिले व फर्काबादवाले पठाण मनसूरअली वजीर यासी शरण जाऊन भेटले. वजीराने आपले मनोदयानुरूप पठाण रोहिले यांचा तह ठरावून, मसलत समेटून शिंदे होळकर यांस

---

(१३) **खळीं** – खळगा, सखल प्रदेश. खळ्या खोचरे असा शब्द ऐतिहासिक पत्रांतून अनेक वेळां आलेला आहे. खोचर किंवा खोचार याचा अर्थ – A gorge, recess, or hollow amongst hills. **खळी** – A pit hole or hollow, A cavity or small depression. **रसद** – धान्याचा पुरवठा. **मारून आणली** – लुटून आणली.

दिल्लीस घेऊन आले. पातशाई भेटी होऊन खिलत चौघडा शिंदे होळकर यांस दिल्हा. पैसा मनसूरअलीनें कबूल केल्याप्रमाणें कवडी कवडी चुकवून दिली.

(१४) त्या संधीस देशीं निजामअली याचा दिवाण रामदासपंत यांनीं फौजबंदी करून नानासाहेब व भाऊसाहेब यांजवर चाल केली. पारनेरानजीक लोणी कोल्ह्याची येथें मुक्काम आला. श्रीमंतांचा मुक्काम तीन कोसांच्या छटीनें सुप्यावर होता. ती बातमी रामदासपंतांनीं ठेवून छापा घातला. तो छापा श्रीमंतांनीं मारून शाबुतीनें राहिले. ईश्वरें खैर केली. हें वर्तमान दिल्लीस गेलें. शिंदे होळकर यांजला समजलें. तेव्हां निजामअली याचा भाऊ गाजुदीखां दिल्लींत होता. त्याजला दक्षणचा सुभा पातशापासून सांगून निजामअलीची तहगिरी केली. बाहालीच्या सनदा गाजुदीखांस देऊन त्याजला घेऊन देशीं आले. औरंगाबादेस आलियावर गाजुदीखां शहरांत भेटावयास गेला. तेथें निजामअलीच्या कोणी बायका होत्या, त्यांणीं जहर घालून त्यास मारून टाकिलें. त्याबराबर पांच कोटीची रोकड होती. त्याजवर श्रीमंतांनीं बदनियत ठेविली होती. तेव्हां मल्हारजी होळकर यांणीं सुभा आणिला त्याचा अभिमान धरून श्रीमंतांसी उत्तर केलें कीं, " म्यां बेलभंडार देऊन आणिलें. त्याचा प्रकार असा जाहला. ईश्वरी कृत्य. यास उपाय नाहीं. परंतु त्यांची वस्तवानी व शरीर दिल्लीस पोचवून देईन." असें बोलून सटवाजी राजोळे पांच हजार फौजेनिशीं गाजुदीखांचे प्रेताबरोबर देऊन सुतळीच्या तोड्यासुद्धां दिल्लीस पावता करून दिल्हा. या प्रमाणें ती स्वारी झाली.

(१५) त्या उपर तिसरे स्वारीस फौजबंदी करून श्रीमंत दादासाहेब व जयाजी शिंदे व आपण कुंभेरीस येऊन सुरजमल्ल जाट यांस शह दिला. जाटानें कुंभेरीचा किल्ला बळकावून लढावयास सिद्ध झाला. तेथें फार करून आग्रह सुभेदाराचा; श्रीमंत व शिंदे यांचा आंतून जाटाशीं मेळ, (म्हणून) ते मोर्च्याचा निकट करीनासे जाहले. जाटाचे उपराळ्याकरितां महमदशा पातशाई दिल्लीहून कूच करून चमेल सिकंदरा येथें आला. इतक्यामध्यें मल्हारजी होळकर यांचे पुत्र खंडेराव होळकर कुंभेरीच्या मोर्च्यामध्यें गोळी लागून कामास आले. मग होळकर याचा मनोभंग होऊन सर्व

---

(१३) **खिलत** – सन्मानाचा पोषाख.

(१४) **तहगिरी** – अधिकारावरून दूर करणें, बडतर्फी. **जहर** – विष. **बदनियत** – पापदृष्टी. पेशव्याच्या मनांत गाजीउद्दीनखानाची पांच कोटीची रोकड लुटून घ्यावयाचे होते. **बेलभंडार** – शपथ, आणक्रिया, वचन.

(१५) **बळकाऊन** – मजबूत करून. **मोर्च्याचा निकट करीनासे जाहले** – होळकराच्या मोर्च्यांना मदत करीनासे झाले. **उपराळा** – मदत. **मनोभंग** – हिरमोड.

प्रकारें उदास झाले. मग दादासाहेब व शिंदे यांणीं पातशा याचा दबाव दाखवून जाटाचा मेळ करावा अशा भावें सुभेदार यांशीं बोलूं लागले. यांणीं उदासीच्या भावें उत्तर केलें "आपण धनी व शिंदे मुकत्यार सरदार, चांगलें तेंच कराल. आम्हीं शिलेदार. सांगाल ती चाकरी करूं." अशा भावीं उदासीचीं बोलणीं होऊन चिरंजीवाचें उत्तरकार्यानिमित्त न पुसतां मथुरेस कूच करून आले. तेथून पातशा चाळीस कोस. तिसऱ्या प्रहरापासून चाळीस हजार पेंढारी, दहा हजार स्वार, दाणा-चारा करून पांच हजार स्वारांच्या हातीं एकेक दोन दोन बाण इतक्यानीं मथुरेहून दौड करून जातीनें मागील पांच घटका रात्र राहतां पातशाई सलतानापाशी दाखल जाहले. पातशाई सलतानांत ! पाहांटचा वेळ, आपले जागां ऐषआरामांत ! यांणीं जातांच फौजेभोंवताला तलावा दिला. कोणी असें बोलेना कीं, "तुम्ही कोण कोठील?" अशी गाफली पाहून कांहीं बाजारावर व कांहीं खाशा डेऱ्यावर बाण टाकिले. त्या बाणाच्या गराटयानें 'मल्हार आया !' या दहशतीनें पुरुषमात्रानें बायको सोडून दिल्लीचा रस्ता धरिला. असेंच पातशाई नालखींत बसोन दिल्लीस गेले. मग फौज लुटावयास सुरुवात जाहली. हे फौज लुटून फन्ना केली. मलकाजमानी पातशाहाची बेगम, पेंढारी यांशीं गांठ, तेव्हां इचे तालेमाले कांहीं एक न राहतां, विवस्त्र करून**चा देखील झाडा घेतला. तिचें म्हणणें "मल्हार कहां है ?" हें वर्तमान सुभेदारास समजल्यावर तोंडावर मारून घेऊन, 'ही सर्वांची मातोश्री, इच्यावर हा गजब, मी प्रसंगीं असतां ! हा केवल प्रमाद !' असें दुःख मनांत आणून हातांत नागवी समशेर घेऊन पायउतारा धांवत गेले. तेथें पेंढारी याची गलबल. पांच सात पेंढारी आपल्या हातानें तोडून; बाईजवळ गेले. बाई दर्जांत नग्न उभी ! तेव्हां दारेव्याच्या शेल्याची पाचंग होती तो शेला सोडून (तिच्या) आंगावर टाकिला. कांहीं शासन देण्याकरितां पाय धरिले, तेव्हां

---

(१५) **दबाव** – भीती. **उदासी** – उदासीनता. **उदासीच्या भावें** – उदासीनपणामुळें, खिन्नतेमुळें. **सलतान** – लष्कर. **तलावा देणें** – भोंवतीं घिरट्या घालणें. **गराटा** – दरारा, दणका. **नालखी** – पालखीपेक्षां वरिष्ठदर्जाचें वाहन. नालखीचा मान पालखीपेक्षां फार मोठा मानतात. **पातशाही नालखींत बसून दिल्लीस गेले** – मोगल सरदारानें पळून जातांना आपली 'नालखी' तेथेंच टाकली होती. त्याच नालखींतून मल्हारराव दिल्लींत गेले. **ताले-माले** – मोठेपण, प्रतिष्ठा. **दर्जा** – मूळ शब्द 'पर्जा' असावा. 'परज' म्हणजे 'कैद.' दर्जा असा शब्द स्वीकारल्यास "अशा ऐश्वर्यांत !" असा अर्थ होईल. **पाचंग** – पचंग, पासोडी, कांबळे इ. वस्त्र मानेपासून कमरेपर्यंत पोट पाठ झांकेल असें गुंडाळून गळ्यामागें गांठ देण्याचा प्रकार. **कांहीं शासन देण्याकरितां पाय धरले** – 'मी गुन्हेगार आहें. मला चुकीबद्दल वाटेल तें शासन करावें' असें म्हणून मलकाजमानीचे पाय धरले.

तिनेंही छातीशीं लाविलें, "बेटा-तूं होते (तो) हमारे पर ऐसा गजब न होना ! परंतु खुदाका गजब ! तू क्या करेगा ? " या भावीं समाधान करून तितक्यांत सुभेदारानीं पेंढारी लुटारी वगैरे दूर करून पांचशें स्वार चौकीस उभे केले. आणि ते समयीं कारकून बापूजी त्रिंबक वरखेडकर दृष्टीस पडला त्याजला तेथील सोंप केली. " जे बाईचे मुखावाटें निघेल त्यास रुकार देऊन तत्क्षणीं मजला लिहीत जावें. सरबरा होईल." असें सांगून तेथील लुटीपैकींच लाख दोन लाख रुपये त्याचे तसलमातीस देऊन चौकी पाहऱ्याचा वगैरे त्यांचे बंदोबस्त करून आणखीही बायका होत्या त्यांजला एकत्र केलें. वरकड सलतान बाजार वगैरे जातीनें पातशा मागें गेले, पातशाई सलतन तेथील तेथेंच राहिली, याचा बंदोबस्त सुभेदारांनीं केला.

(१६) हें वर्तमान दादासाहेब व शिंदे यांस समजल्यावर शिंदे यांनीं नक्षाची गोष्ट एकीकडे ठेवून, वैषम्य मोजून, वांटा न घेतां, मारवाड प्रांतीं उठोन गेले. त्या दिवसापासून शिंदे व होळकरांची मनओळख पडली ! पातशाई सलतन लुटींत आली तिचा होळकर यांनीं आपला वांटा घेऊन शिंदे व श्रीमंत यांचा वांटा दादासाहेब यांचे हवाला केला. शिंदे मारवाडांत गेले ते तेथें दगा होऊन मृत्यु पावले. होळकर दिल्लीस गेल्यावर पातशहापासून ऐशीं लाख रुपये ठरावावरून कांहीं नक्त, बाकी ऐवजाचे माहाल अंतरवेदींत विटावे तालुक्यापैकीं घेतले. याप्रमाणें ती मुलुखगिरी होऊन देशीं आले.

(१७) त्या उपर फौजबंदी करून श्रीमंत दादासाहेबांस घेऊन हिंदुस्थानांत आले. जयाजी शिंदे यांचे बंधु दत्ताजी शिंदे हे मारवाडांतच होते. दादासाहेब व होळकर दिल्लीस आले. दिल्लीमध्यें नजिबखान दिल्ली बळकावून होता. त्याजला सामदाम करून दिल्लीबाहेर काढून त्याजला शुक्रतालीं पोहोंचून दिलें. अदले वर्षीं नादरशा गिलच्या दिल्लीस येऊन, दिल्ली व मथुरा लुटून, आपलें ठाणें बसवून आपले ठिकाणीं गेला. त्याच्या फौजा सरहद्द लाहोर येथेंहोत्या. त्याकरितां सुभेदार अग्रेसर होऊन दादासाहेबांस घेऊन सरहद्देस गेले. तेथें गिलच्यांची फौज दोन सरदार होते. त्यांशीं लढाई करून फौज लुटून सरदार धरले. तेथून लाहोरास गेले. तेथें दिनाबेग गिलच्याकडील सरदार होता. त्यास जरब दिली. तेव्हां हात जोडून

---

(१६) वैषम्य मोजून – वैषम्य वाटून घेऊन. **मन ओळख** – वैर, दावैर, मनापासून वैर. **ठरावावरून** – मुद्रणदोष दिसतो ' ठराव करून ' असें असावें.

(१७) नादरशा – स्वतः नादीरशहा नव्हे. त्याचा सरदार अहमदशहा. **सरहद** – सरहिंद. **दिनाबेग** – आदिना बेग.

रुजू जाहला. तथापि त्याजलाही लुटून एक महिना मुक्काम करून होते. पुन्हा दरमजल माळव्यांत येऊन श्रीमंत दादासाहेब शिरोंजेच्या मार्गें देशीं गेले. शिंदेहि मारवाडांतून देशीं गेले होते त्यांणीं फौजबंदी करून दिल्लीचे रोखे गेले. सुभेदार इंदुरीं आल्यावर लोकांचा समजावेश करून देशीं जावें या विचारांत होते.

(१८) तितक्यांत देशींचीं पत्रें वकिलांकडून सुभेदारांस आलीं कीं,तुमचे ठायीं श्रीमंतांची नजर ठीक नाहीं, तुम्हीं सावध होणें. हें ऐकून सुभेदारांनीं पुढें गंगाधर येशवंत व अन्याबा पळशीकर रवाना केले. मागाहून जातीनें फौज आठ दहा हजार खाशांसुद्धां जेजुरीस गेले. तेथें श्रीमंत नानासाहेबांचा पुत्र माधवरावसाहेब जाऊन भेटी गोष्टी जाहल्या. जेजुरीहून पुण्याचे मुक्कामीं यावें तों त्यांचे मनांत कल्पना येऊन वेलवढ्यावर मुक्काम झाला. मग संताजी वाबळे, मोत्याजी खराडे यांणीं सुभेदार यांस बुद्धिवाद मनसुब्याचें धोरण व सत्क्रियेचें लक्षण (इत्यादि) उपदेश करून श्रीमंतांची भेट घ्यावी असें ठरविलें. मग दहा वीस रावतांनिशीं पालखींत बसून पुण्यांत भेटीस चालले. हें वर्तमान नानाभाऊंस समजल्यावर उभयतां चाळिसां स्वारांनिशीं सामोरे आले. कुंभार वेशीपाशीं भेटी जाहाल्या. हे मुक्कामीं आल्यावर सुभेदार यांणीं मनसुबा करून मागील प्रहर रात्र राहतां, पालखींत बसून एकाएकीं श्रीमंतांचे वाड्यांत जाऊन बिबाजी नाईक (होता) त्याच्या बगलेंत पालखींतील गादी व तक्या देऊन समोरले ओसरीवर माणसें काणसें निजलीं होतीं, त्यांतच गादी टाकून आपण वर निजले. तों श्रीमंत नाना भाऊ हे उठोन आपलाले तालीमखान्यांत जाऊन बाहेर आले. तों चौकीदारांनीं जाऊन विनंती केली, "सुभेदार चार घटिका जाहल्या ओसरीवर येऊन माणसां काणसांत निजले आहेत." तसेंच उभयतां सुभेदारांजवळ आले. बिंबाजी नाईक बुक्या मारीत होता. तो उठोन एकीकडे उभा राहून उभयतांस कुरणीस केली. उभयतांनीं त्यास प्रश्न केला कीं, "सुभेदार जागे आहेत किंवा झोंपेंत आहेत?" त्याणें उत्तर "डोळा लागला आहे," असें केलें. "आज्ञा जाहल्यास जागे करितों." ही भाषणें परस्परेंचीं ऐकून जागे होतांच, झडपडोन उठोन एकीकडे

---

(१७) **रुजू जहाला** – शरण येऊन भेटीस आला. **समजावेश** – समजाविशी.

(१८) **वेलवढ्यावर** – येलवढ्यावर असें पाहिजे. येलवडे म्हणजे सध्यांचें येरवडे. **मागील प्रहर रात्र पाहतां** – एक प्रहर रात्र उरली असतां. **एकाएकी** – एकटेच. **माणसें काणसें** – माणसें बिणसें, सामान्य जन, नोकर लोक. **तसेंच** – तत्काल. **बुक्या मारीत होता** – पुष्कळ श्रीमंत लोकांना नोकरांकडून बुक्या मारून घेऊन, अंग रगडून किंवा मालीश करून घेत झोपण्याची संवय असते. **कुरणीस** – कुर्नीसात. **झडपडोन** – खडबडोन, दचकल्याप्रमाणें.

उभे राहून श्रीमंतांस रामराम केला. हात जोडोन उभे राहिले. तेव्हां नानांनीं पुढें येऊन हात धरून गादीवर बसले. " सुभेदार! आपण रायांचे ठायीं! आज पावेतों आपलेंही करणें वडीलपणासारखेंच (मग) आज लवून रामराम करणें, हात जोडणें कोठून आणिलें?" इतकें बोलणें होई तोंपर्यंत भाऊ जागचे जागांच उभे होते. त्यांसी सुभेदार बोलले कीं, " बाबा तूं कां उभा? बैस. तुला काय प्राण घेणें, कैद करणें, तें कर. " असें भाऊसाहेबांस बोलून बसविलें. मग उभयतांसी बोलूं लागले कीं, " बाळाजीपंत नाना, बाजीरावसाहेब, यांच्यापुढें आम्हीं बेकैदी हे लेंकुरपणें जे करूं नये ती केली. परंतु त्यांणीं सर्वोपरी बरदास्त करून या मरातबास आणिलें. त्यांच्या लोभावर आम्ही म्हणजे (वास्तविक) चाकर. कोणतेंहि राजकारण (त्यांच्या) इतल्याशिवाय करूं नये, हें कांहीं एक मनांत न वागतां रजवाडे दूर केले, उठविले, बसविले. जें केलें त्यास त्यांचा रुकार होत गेला. त्याचेच वंशज आपण. तेव्हां असेंच चालेल हा भरंवसा. परंतु सांप्रतकाळीं आपली क्रूरदृष्टी पाहून डोळे उघडले. त्यास एकला येऊन हजर झालों. आपण धनी, आम्ही सेवक. बालंबाल गुन्हे आहेत. काय पारपत्य करणें, पायांत बिड्या घालून किल्यावर टाकावें, अथवा प्राण घ्यावा, हजर आहों." तेव्हां नाना बोलले, " आपण अशा गोष्टी बोलूं लागला यांत आमचे विषम काळाचें सूचक दिसतें." अशा भावीं बहुत ग्लानी करून बोलले. डोळ्यांस पाणी आणलें. तेव्हां सुभेदाराचे मनासही कळवळा आला. मग बोलले कीं, " त्या गाढवीस

---

(१८) **रायांचे ठायीं** – वडील बाजीराव यांच्या ठिकाणीं. **हें** – हीं. **लेंकुरपणें** – अज्ञानामुळें. **मरातब** – मान्यता, हुद्दा, पदवी. **त्यास** – म्हणून. **बालंबाल गुन्हे आहेत** – बाल म्हणजे केश, रोम. अंगावरच्या केसागणिक अपराध माझ्या हातून घडले आहेत. **ग्लानी** – आर्जव, अजीजी. **गाढवी** – गढवी किंवा गडवी असे पाहिजे. गडवी हा गरवी या शब्दाचें अपभ्रष्ट रूप. गडवी म्हणजे Important-Respectable. नानासाहेबाची आई काशीबाई हीच तेवढी पेशव्यांच्या घरांत वडील माणसांपैकीं राहिली होती. तिला बोलावून आणून तिच्या समक्ष म्हाताऱ्या मल्हारराव होळकरानें भाऊसाहेब पेशव्याची यथेच्छ शिव्यागाळी करून पूजा बांधली. पेशव्यांच्या दिवाणगिरीचें व वसूलादिकाचा आयव्यय पहाण्याचें काम नानासाहेबानें भाऊसाहेबावर सोपविलें होतें. भाऊसाहेब हा कामांत अत्यंत चोख व हुशार होता. परंतु स्वभावानें जरा गर्विष्ठ व तापट होता. नानासाहेबासारखा धोरण पाहून गोड शब्दांनीं काम करून घेणारा [पुढील पानावर पहा]

बोलावून आणा. " मग काशीबाईस बोलाविलें. बाई आलियावर तिला प्रश्न केला कीं, "नाना हा आमचा पोटचा खरा; दादा हा देवपुजापाशीं छिटून उत्पन्न केला; (पण) हा कोठीचा काळकूट कोणाचे पोटचा आहे सांग." तेव्हां भाऊसाहेब बोलले, — " नानासाहेब धनी, आपण सरदार, शास्त्रार्थाच्या गोष्टी उभयतांसही बोलण्यास हिंगफटकू लागत नाहीं. परंतु माझे गळ्यांत संसाराचें लोहडणें घातलें. तेव्हां

(१८) नव्हता. उत्तर हिंदुस्थानांतल्या स्वाऱ्यांत मल्हारराव होळकरादिकांनीं ठरल्याप्रमाणें योग्य तो सरकारवसूल पाठवून दिला नाहीं. हिशेबांत गफलत केली. ती भाऊसाहेबांनीं शोधून काढून होळकरास कडक पत्रें लिहिलीं. त्यानें होळकराचा आग भडका झाला. त्याच्या हातून कुचराई झालीच होती. व ती त्याला पदरांत घेणें प्राप्तच होतें. पण बाकीचा इतका पैसा ओकावा लागणार यामुळें त्याचा संताप झाला; व तो त्यानें वडीलकीच्या नांवाखालीं धनगराला शोभण्यासारख्या अचकट विचकट शिव्या देऊन शमवून घेतला. मल्हारराव हा बाळाजी विश्वनाथापासून पेशव्यांच्या चाकरीस होता. त्याच्या इतका वृद्ध, अनुभवी सरदार दुसरा नव्हता. नानासाहेब व भाऊसाहेब तर त्यांस काका असे सम्बोधित असत. हे लक्षांत घेता, व जुन्या काळीं घरांत बायकामाणसांसमोरहि बीभत्स, अश्लील शब्द उच्चारण्यांत फारसा विधिनिषेध मानला जात नसे, हें लक्षांत घेतले म्हणजे मल्हाररावाच्या शिवीगाळीनें चमत्कारिक वाटणार नाहीं. **नाना हा आमचा पोटचा खरा** – नाना हा आमच्या म्हणजे धनगरांच्या पोटचा उपजलेला म्हणजेच अज्ञानी, वेडा, व्यवहारशून्य. धनगर म्हणजे अडाणी असेंच सर्व प्रसिद्ध आहे. **दादा हा देवपुजापाशीं छिटून उत्पन्न केला** – देवपुजा म्हणजे देवपूजा करणारा भिक्षुक. छिटून म्हणजे संग करून. भावार्थ दादासाहेब हा भिक्षुकापासून उपजला. अर्थात् त्याचीही अक्कल भटाभिक्षुकाइतपतच. **हा** – हा भाऊसाहेब. **कोठीचा काळकूट** – कोठीवर, खजिन्यावर संरक्षक म्हणून बसलेला भुजंग. **हिंगफटकू** – हिंग आणि फटकूर. फटकूर म्हणजे कापडाचा किंवा चिंधीचा तुकडा. या दोन्ही वस्तु क्षुद्र. त्यांस खर्चवेच लागत नाहीं. भाऊसाहेबांच्या म्हणण्याचा भावार्थ असा, " नानासाहेब मालक आणि आपण मोठे तोलदार सरदार. त्यांना थोड्याच सर्व बारीक सारीक गोष्टी तपासाव्या लागणार? तेव्हां त्यांनीं लंब्या चवड्या गोष्टी बोलल्या तर त्यांना त्या शोभतातच. नुसत्या बोलण्याला कवडीचाहि खर्च लागत नाहीं. परंतु माझ्या गळ्यांत पेशवाईच्या संसाराचें म्हणजे नफा-नुकसानी पहाण्याचें फडणीशीचें काम घातलें आहे. तेव्हां मला बारीकसारीकहि खर्चवेच तपासून पहावा लागतो. पेशव्यांना किती कर्ज झालेलें आहे, उलट पक्षी सरदारांनीं आपल्या खंडण्या देण्याचें लुच्चेगिरीनें कसें टाळलें आहे ते तुम्हीच दोघे [पुढील पानावर पहा]

बाजारांतून डाळ, पीठ आणून प्रसंग संपादावयाच्या पोटी देणेदाराची कोचवण किती आहे याची रफेदफे धणी अथवा आपण करून मला मोकळे करावें. म्हणजे मीही उभयतांपेक्षां गोड बोलणीं बोलून उभयतांसहि आवडवून घेईन. श्रीमंतांचे दौलतीस कर्ज होऊन दौलत कर्जभरीत झाल्यावर मग कर्ज बाहेर निघणें कळतच आहे. यास्तव धणी व तुम्हीं वडिलांचे हातचीं माणसें एकत्र जाहलां, हिशेबाकितेबाचा संशय असल्यास कागदपत्र तयार आहेत, हिशेब पाहून मला मोकळें करावें." तेव्हां सुभेदार बोललें कीं, "तुझे आईवर तलाख आहे, खरेंच सांग दौलतीस देणें किती ?" तेव्हां मग भाऊसाहेब हांसून बोलले, "पाऊण कोट रुपये देणें आहे." "खरेंच कीं काय ?" म्हणोन सुभेदारांनीं पुसिलें. तेव्हां भाऊ बोलले कीं, "बोललों यांत दहावीस हजार अधिक उणें (इतकेंच)" मग सुभेदार बोलले, "दौत लेखणी बंद आण." तत्क्षणी आणविलें. भाऊसाहेब यांस म्हणाले कीं, "याद धर." तीस लक्ष आपलें नांवें लिहिलें. तीस लक्ष शिंदे यांचें नांवें लिहिलें. "बाकी काय राहिली ?" म्हणून प्रश्न केला. भाऊसाहेब बोलले कीं, "पंधरा लक्ष राहिले." "याची वर्गणी विंचूरकर वगैरे लहान मोठे सरदार यांचा मेळ करून देऊं किंवा तुम्ही करून घ्याल ?" त्याचें उत्तर भाऊंनीं केलें कीं, "आम्हीं करून घेऊं. परंतु साठ कधीं पटतील ?" तत्क्षणीं बिबाजी नाईक, विष्णु महादेव यांस बोलावून पाठवून घेऊन आले. पूर्व संकेत नसतां त्यांचे रूबरू विष्णु महादेव यांस सांगितलें कीं. "साठ लक्ष रुपये भाऊंस आज द्यावें." त्यांचे अंगास डबडबा घाम आला. तथापि हो म्हणणें प्राप्त झालें. भाऊस सुभेदार यांणीं पुशिलें "रुपये आले ?" भाऊ म्हणाले "हे देतील." तेव्हां मग विष्णुपंत बावांस सुभेदार बोलले "खातरी भाऊंची कर." विष्णुपंत बावा यांणीं हिंमत धरून भाऊसाहेबांस विनंती केली, "आपण हो म्हणावे, संशय असल्यास उंट पाठवावे." असें बोलल्यावर भाऊंनीं

---

(१८) वाटल्यास तपासून पहा, व मला बोला. सरकार कामाला लागणारा पैसा जर मलाच कोठींतून काढून द्यावा लागतो, तर येणकऱ्यांकडे तगादा करून तो पैसा कोठींत आणून भरणें हेंहि माझें कामच आहे. मग होळकराकडे पैशाची मागणी केल्याबद्दल त्यांना राग कां यावा ? **कोचवण** – जाच, तगादा, तसदी, टोंचणी. **रफेदफे** – निबाडा, निकाल, निराकरण. **कर्जभरीत** – कर्जानें वाकलेली, कर्जानें ग्रासलेली. **वडीलाचे हातचीं माणसें** – कदीम, जुनी, विश्वासू माणसें. **तुझे आईवर तलाख आहे** – तुला आईची शपथ आहे. **तलाख** – शपथ. **बंद** – कागद. **आपले** – मल्हाररावाचे, स्वतःचे. **वर्गणी** – वाटणी. **विष्णु महादेव** – गद्रे सावकर. **उंट पाठवावे** – पैसा भरून आणण्यासाठीं.

रुकार दिला. मग सुभेदार भाऊंशीं बोलले कीं, "बाबा, दौलतीचें कर्ज फिटलें कीं?" मग भाऊसाहेबांनीं उत्तर केल, "आपलेसारखीं माणसें दौलतींत असून कर्ज कोठून राहील? परंतु मजकडे वाईटपणा स्थापून अर्थ जाहला. वडील आहां, क्षमा करावी." या रीतीनें सफाई होऊन बोलले. "डेऱ्यास जाऊं किंवा आणखी कांहीं तुझ्या मनांत राहिलें?" तेव्हां मातोश्री बोलली कीं, "येथेंच भोजन करून जा." तेव्हां सुभेदारांनीं उत्तर केलें कीं, "तूं भाकरी कर आणि तिघांस जेऊं घालशील तर जेऊं." मग बाईनीं स्वयंपाक करून त्रिवर्गास भोजनास हातें घातल.

(१९) नंतर सुभेदार डेऱ्यास आले. गंगोबा तात्या व अन्याबा पळसीकर सफाईस आले होते त्यांस ही वार्ता ठाऊक नाहीं. डेऱ्यास आल्यावर उभयतांस वर्तमान सांगितलें. त्यांनीं उत्तर केलें कीं, "आम्ही दोन महिने अगोदर येऊन काय गवऱ्या वळल्या?. परंतु 'सोम्या मारी गोम्याला, प्रायश्चित राजधराला.' साठ लक्ष रुपये आज मी विष्णुपंतबावांस कोठून देऊं?" "तुम्ही जाणें तुमचें कर्म जाणें, जाहलें वर्तमान तुम्हांस सांगितलें," (येवढेंच मल्हारराव बोलले.) (त्यावर) भाऊसाहेबांनीं सूर्योदय झाल्यावर कारकून उंटें विष्णु महादेव यांचे घरीं पाठविलीं. बावांनीं तेचक्षणीं साठ लक्ष रुपये यांचा भरणा करून दिला. मग लष्करांत आले. तात्यांस बुद्धिवाद फार केला कीं, "पूर्व संकेत नाहीं, श्रीमंतांशीं गांठ. आमचा प्राणच घ्यावयाचा होता तर आपले डेऱ्यापासून मेकसू लांब गेला

---

(१८) फिटलें कीं? – फिटलें कीं नाहीं! **परंतु मजकडे वाईटपणा स्थापून अर्थ जाहला –** भाऊसाहेबानें असा टोमणा दिला कीं, आतां कर्ज फिटलें. अर्थ जाहला म्हणजे पैका उत्पन्न झाला, पण त्यासाठीं मला इतका वाईटपणा पत्करावा लागला तेव्हां!

(१९) सफाईस – वसूलाच्या रुजवातीस, हिशेब समजावून देण्याकरतां. होळकरांचे गंगोबा तात्या व पळशीकर पुण्यास अगोदर दोन महिन्यापासून, भाऊसाहेबाकडे आले होते. **सोम्या मारी गोम्याला प्रायश्चित राजधराला –** वड्याचें तेल वांग्यावर अशा अर्थी ही म्हण आहे. भावार्थ असा. गंगोबा तात्या म्हणाला, 'पेशव्यांनीं तुमची खरड काढली आणि तीस लक्ष रुपये तुम्ही मुकाट्यानें कबूल केलेत पण मी तुमचा दिवाण. उद्यां विष्णूपंत गद्रे सावकरास ते रुपये मी कोठून देऊं!' त्यावर होळकरानें गंगोबा तात्यास उत्तर दिलें 'ते तुमचे तुम्हीच आतां कसें तें पाहून घ्या. तुम्हीच खोटाई करून माझ्या पदरीं बोल आणलात. आतां तुम्ही दिवाण आहात, तर त्या रकमेची भरपाई तुम्हालाच केली पाहिजे.'

कांचेचं बासन - कांचेची उंची वस्तू
दुसरा अर्थ - केस (कांचेच्या)

नव्हता. सावकारी म्हणजे कांचेचें बासन, जरा कंपेश जाहल्यास जन्मास मुकाव-याचें काम." मग तात्या (ह्यांनीं) विष्णु महादेव यांचे कर्तृत्वाचें स्तुतिस्तोत्र करून साठ लक्ष रुपयांच्या वराता महालानिहाय करून दिल्ह्या. मग फौजेस विदा करून शनवारचे हवेलींत दोन महिने मुक्काम करून राहिले.

(२०) इकडे हिंदुस्थानीं दत्ताजी बावा शिंदे व जनकोजी शिंदे दिल्लीकडे आले होते त्यांणीं नजीबखानाशीं बेलभंडार करून शुक्रतालाहून दिल्लीस आणिलें. दिल्लीस आल्यावर नजीबखानास धरून मारावें हा विचार (त्यांनीं) केला. हें नजीबखानास समजलें.(म्हणून) त्याचे मध्यस्त होते त्याशीं बोलून शुक्रतालास माघारी गेला.मागोमाग शिंदेहि कूच करून गाजुदीखान वजीर सुद्धां शुक्रतालास गेले. शुक्रतालास मोर्चेबंदी केली तेव्हां नजीबखानानें गंगेस पूल बांधून, तिकडून रसद आणून, बेहेडे धरून मजबुदीनें राहिला. शिंदे यांचा उपाय चालेना. तशांत नजीबखानानें गिलच्यांकडे वकील पाठवून चार दस्ते (म्ह.) अठ्ठेचाळीस हजार फौज आणविली. ते सरदेस पोंचले. हें वर्तमान शिंदे यांस कळतांच शुक्रतालाचे मोर्चे उठवून गिलच्याचे फौजेचे सुमारें चालले. बुढिया शाहरणपूर यमुनेच्या कांठीं आहे. त्या अलीकडे पांच साहा कोशांवर दत्ताजी व जनकोजी शिंदे राहून जिवाजी भोईटे सरनोबत पंधरा हजार फौजेनिशीं गिलच्याचे तोंडावर रवाना केले. हे इकडून जातां मार्गांत गिलच्याच्या फौजेशीं गांठ पडली. उभयतांची झटपट होऊन बाराशें (स्वारानिशीं खाशांचीं) डोकीं कापून गिलच्यांनीं नेलीं. बाकी फौज राहिली ती

---

(१९) **कांचेचें बासन** – कांचेची उंची वस्तु. बासन म्हणजे किल्ला असाहि दुसरा एक अर्थ आहे, 'वॅशन' या इंग्रजी शब्दावरून 'बासन' हा मराठी शब्द रूढ झाला. सावकाराची पत कांचेच्या किल्ल्या सारखी नाजूक आहे. जरा तडा गेला की संपलें म्हणून ती फार जपावी लागते असा भावार्थ. कबूल केल्याप्रमाणें ठराविक वेळीं रक्कम मोजूं शकला नाहीं कीं सावकाराची पत संपली ! त्याचें दिवाळें निघालें ! **वराता** – चेक, हुंडी, वरात. **शनवारचे हवेलींत** – शनवार वाड्यांत नव्हे तर शनवार पेठेंत होळकरांचा जो वाडा होता त्यांत.

(२०) **बेहेडे** – मूळ शब्द बेहड. बेहड – नदीच्या जोरदार प्रवाहानें जमिनीला पडलेली खोल घळ. **सुमारें** – रोखानें. **सरनोबत** – सैन्यांतील एक दर्जाचा अधिकारी, सेनापति सारखाच. **बाराशें स्वारानिशीं खाशांची डोकीं कापून गिलचानें नेलीं** – सान्यांनीं स्वीकारलेल्या 'बाराशें खाशांचीं डोकीं कापून' या पाठापेक्षा त्यांनीं पादटीपेंत दिलेला हाच पाठ योग्य होय. खासा म्हणजे सैन्यांतील मुख्य सेनापति किंवा त्या दर्जाच्या आसपासचा मातबर अधिकारी. अर्थात १२०० खाशांचीं डोकीं कापून नेलीं हा पाठ स्वीकारला

पळून शिंदे यांजपाशीं आली. मार्गांत यमुनेचे कालवे व दलदली यांत हजारों फौज बुडाली. बाकी राहिले ते, शिंदे होते त्या मुक्कामी आले. मग तेथून शिंदे निघोन दिल्लीस येऊन घाटोघाट चौक्या बसविल्या. गिलच्यांची फौज बुढिया शहारणपुरापाशीं यमुना उतरून शुक्रताली पोंहचतांच नजीबखानानें कूच करून दिल्लीचे सुमारें येऊन यमुनेचे उत्तर तीरीं मुक्काम केला. तेथून येमुनेचा पयाबा पाहून दोन हजार रोहिले यमुनेच्या मध्यें बेटावर पाठविले. वर्तमान शिंद्याकडे कळतांच शिंदे चालून त्या बेटांतील रोहिल्यांवर गेले. तेथें रोहिल्यांनीं ताशेरा दिल्हा. त्यांत गोळी जानकोजी बावाचे डावे हातास लागली. आणि दत्ताजीबावाचा तर ठिकाणच नाहीं. लढाईंत पडले किंवा कोठें गेले अशी गोष्ट झालियावर शिंद्यांचे फौजेचा धीर सुटून फौज पळाली. बाजारबुणगे सर्व लुटले गेले. जनकोजी बावा राहिले फौजेनिशीं रेवाडीस तीस कोस गेले.

पयाब पायउतार

(२१) सुभेदार फौजेसुद्धां जयपूर प्रांतीं होते. त्याजला येण्याविषयीं शिंद्याची पत्रें आलीं. तेव्हां सुभेदार कूच करून रेवाडीस आले. अलीकडे तीन कोश पाटोली गांव आहे, तेथें सुभेदाराचा मुक्काम जहाला. तेच दिवशीं शिंदेहि रेवाडीस आले. दुसरे दिवशीं शिंदे होळकर यांच्या भेटी होऊन बुणगे दरोबस्त कबिल्यासुद्धां माळव्यांत रवाना करून सडे झाले. हें वर्तमान नजीबखानास समजतांच गिलच्यासुद्धां कूच करून यांचे सुमारें आला. होळकरांची गांठ पडूं न देतां, यमुना उतरून शिकंदऱ्यावर (शिंदे होळकर गेले.) यांच्या पाठीमागें नजीबखानही यमुना उतरून आला. सुभेदारास समजतांच त्याच्या तोंडावर फौजा रवाना करून आपण व जनकोजी बावा शिंदे आगऱ्याच्या सुमारें आले. तों मागें शिंदे व होळकर यांच्या फौजेशीं व गिलच्याच्या फौजेशीं गांठ पडून होळकराकडील अन्याबा पळशीकर दिवाण व शेटीबा खराडे कामास आले. वरकड फौजेचा पाय सुटून कोणी मथुरेस, कोणी रामगडास गेले. सुभेदार आगऱ्यास आल्यावर मथुरेची व रामगडची पळालेली फौज येऊन सामील झाली. नजीबखानानें याचा पाठलाग न करतां शुक्रतालास गिलच्यासुद्धां गेला. सुभेदारांनीं मसलत केली,

---

(२०) तर 'खासे' होते तरी किती ! सैनिकांपेक्षां पुढाऱ्यांचीच गर्दी अधिक होती असें म्हणावें लागेल व ते तर उघडच असंभाव्य. पयाबा – वास्तविक पयाब असेच मूळांत असले पाहिजे. 'व' व 'बा' मोडींत सारखे भासतात. पयाब – म्हणजे पाय उतार, पायानें तरुन जाण्यासारखा नदीचा उतार. ताशेरा – बंदुकीच्या गोळ्यांचा मार, फेर.

(२१) कबिला – कुटुंब, स्त्रिया वगैरे. पाय सुटून – धर सुटून, अवसान सुटून.

महाराष्ट्र प्रयोजक संस्था

एक बरसाद जयपुराच्या मुलखांत छावणी करून बादबरसाद करणें तें करूं. याप्रमाणें ठरवून आगऱ्याहून कूच करून जयपुरच्या मुलखांत येऊन छावणी केली.

(२४) हें वर्तमान श्रीमंत भाऊसाहेब देशीं मोगलांवर स्वारी करून गेले होते तेथें कळलें. मग त्यांनीं त्या मोहिमेचा सामदाम करून हिंदुस्तानांत यावयाचा इरादा केला. कागदपत्र सरदारांस पाठवून मागोमाग श्रीमंतही कूच करून दरकूच बमय फौज आगऱ्यानजीक आले. येथें उभयतां सरदारांच्या भेटी होऊन ठराव झाला कीं, तूर्त बरसाद आणि यमुनेस फार पाणी, उतरल्यावर समजून घेऊं. याप्रमाणें मनसब्यांची संचणी करून दरोबस्त फौज दिल्लीस आली. दिल्लींत ठाणें कायम केलें. ते वेळेस कुंजपुराहून बातमी आली कीं, गिलच्यांची दहा हजार फौज यमुनेस पाणी फार म्हणून मुक्काम करून आहे. हें वर्तमान श्रीमंतांस कळतांच कूच करून कुंजपुरास जाऊन गिलच्यांचे फौजेवर पडले. ते गाफल, तथापि तलवार खूप चालली. दहा हजार फौज लुटून तेथें गल्ला मुबलग म्हणून एक मास मुक्काम केला. हें वृत्त गिलच्यांस समजल्यावर कूच करून नजीबखान सुद्धां यमुना उतरून दिल्लीच्या व कुंजपुऱ्याच्या मध्यें येऊन पडले. भाऊसाहेबांस कळतांच कुंजपुऱ्याहून कूच करून पानिपतावर आले. तेथें सव्वातीन महिने राहून लढाया नित्य गिलच्यांच्या फौजेशीं करीत गेले. दाणाचाऱ्याची बहुत अडचण पडली. सबब गोविंदपंत बुंदेले अंतरवेदीस रसद आणावयास गेले. त्यांणीं रसद भरून नमुनेच्या कांठीं उतरले. मुक्काम होऊन गंगातीरीं स्नान, संध्या, स्वयंपाक होत आहेत हें वर्तमान गिलच्यांस समजलें. वीस हजार घोडे राउत दौड करून बुंदेले यांच्या फौजेवर जाऊन पडले. फौज व रसद लुटून गोविंद पंतांचें स्नान-संध्या करितांना डोकें कापून नेलें. उंच उंच फडक्यांचीं वेष्टनें गुंडाळून एक्या फकीराबरोबर ज्याफत म्हणोन श्रीमंताकडे पाठविलीं. श्रीमंतांला अंदेशा प्राप्त झाला कीं याचा आमचा लढाईचा इरादा असतां ज्याफतीचा अर्थ काय? तथापि हुजऱ्यास आज्ञा होऊन सोडून पाहिलें. तों डोकें निघालें! ओळखणारांनीं ओळखलें. सांगितलें कीं, गोविंदपंत बुंदेले यांचें डोकें आहे. तेव्हां श्रीमंतांस कळलें कीं, रसद मारिली गेली. पुढें दाण्याचाऱ्याचें अवघड पडलें. तेव्हां मल्हा-

(२१) **एक बरसात** – एक पावसाळा. **बादबरसात** – बरसातीनंतर पावसाळा संपल्यावर.

(२२) **मोहिमेचा सामदाम करून** – तह करून मोहीम संपवून. **बमयफौज** – फौजेसह. **मनसब्याची संचणी करून** – मसलतीची उभारणी करून. **गाफल** – गाफील, बेसावध. **ज्याफत** – मेजवानी. **अंदेशा** – संशय, येथें अर्थ आश्चर्य. **मनसुब्यास**

रजी होळकर सभेदार यांणीं मनसुब्यास बुद्धिवाद आणिला कीं, आपण गनीम, त्यांत विदेश, येथें लढाईशीं तोंड न देतां दिवसेंदिवस चारादाणा केला तरी भाकर विसाकोसांवर भाजावी, तिथून खाणें पंचवीस कोसांवर व्हावें, अशा परिश्रमानें हरीफ जेर करावे. या भावानें बोलत असतां (तें भाऊसाहेबांच्या) ध्यानास न येऊन तीन महिने खाई खोदून मुक्काम केला. यानें परिणाम काय व्हावयाचा ? पाहून सुभेदाराचा उक्तभाव समर्पक पडला यामुळें पोटांत राग होता तो एकीकडे ठेवून भाऊसाहेबांनीं उत्तर केलें कीं " जाल्या गोष्टीस शब्द लावून फळ नाहीं. पुढें काय करावें ? " मग सुभेदार बोलले कीं, आतां कूच होतच नाहीं, रसिदेचा मेळ जाहला पाहिजे. त्यास त्याच जिल्ह्यांत जबरदस्त रसद पोहोंचवावयाजोगा जाट आहे. त्याची दीलजमाई झाली असतां दाणाचाऱ्यास कमी पडणारा नाहीं. आपण आज्ञा कराल तर त्याजला आपल्या पाशीं आणितों. त्याची खातरी करावी म्हणजे रसदेची काळजी रहाणार नाहीं. तवातोबरा चालल्यावर दुसरें सुचेल. या अडचणींत कांहींच बनून येत नाहीं. " तेव्हां श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं " जाटास आणावें. त्याची खातरी करूं. "

(२३) तेव्हां सुभेदारांनीं जाठास कागद लिहिला कीं, तुम्हीं फौजसुद्धां भेटसि यावयाचें करून रसद माफक फौजेनिशीं रसदेची तार बांधोन लष्करांत जिन्नस मण दीडामणाची धारण राहे असें करावें. आणि एक वेळ सरदारांच्या

---

(२२) बुद्धिवाद आणला – ठरलेला मनसुबा बदलण्याचा सल्ला दिला. **गनीम** – मराठे. **हरीप** – शत्रू. ' हा विदेश असल्यामुळें आपण गनिमी काव्यानें लढावे, शत्रू भोंवतीं तलावे द्यावे, बिलगावे. पुन्हा लांब पळून जावे, आतां इथें आहेत तर दुपारीं तिथें, असें करून शत्रूस भंडावून सोडावे. त्याच्या भोवतालचा मुलूख जाळून पोळून बेचिराख करावा असें करून त्यास जेर करावे ' असें मल्हाररावाचें म्हणणें. **खाई** – खंदक, चर. **यानें परिणाम काय व्हावयाचा पाहून** – अशा रीतीनें खंदक खणून राहण्यानें आपलीच उपासमार होत आहे, शत्रूचा पराभव दूरच राहिला, हे पाहून म्ह. अनुभवास येऊन ' सुभेदाराचा उक्तभाव समर्पक पडला ' असें भाऊसाहेबास मनोमन पटले. **उक्तभाव** – प्रकट केलेले विचार. **समर्पक पडला** – प्रत्ययास आला. **रसिद** – रसद, धान्यपुरवठा. **मेळ** – संपादन. **तवातोबरा** – शिपायाला अन्न आणि घोड्याला दाणा. मराठी स्वारा बरोबर तवा तोबरा हीं नेहमीं असावयाचीच. भाकरीसाठीं तवा व घोड्याला हरबरा देण्यासाठीं तोबरा.

(२३) रसद माफक फौजेनिशीं – रसदेच्या संरक्षणास लागेल तितकी फौज ठेवून किंवा देऊन. **तार बांधोन** –अखंडितपणें रसदेचा पुरवठा होत राहिल अशी व्यवस्था करून.

भेटीस यावें. हें सुभेदाराचें पत्र येतांच रसदेची तार लावून लष्करांत दीडमणाची धारण सुरू केली. मागाहून जाठ साठ हजार फौजेनिशीं जातीनें भेटावयास आला. सुभेदार यांच्या विद्यमानें भेटी जहाल्या. वस्त्रें–जवाहीर आदि शिष्टाचार यथोक्त होऊन जाट महिनाभर लष्करांत राहिला. पुढें भाऊसाहेबांचें मनांत पाप आलें कीं, जाटास लुटून घ्यावें. तेव्हां हें वर्तमान सुभेदारास (कळतां) अग्रेसर होऊन बोललें कीं, "आपलें आज्ञेवरून मी वचन बेलभंडार देऊन आणिला. त्यास आणिल्यासारिखें त्याणें चाकरीही केली. दीडमणाची धारण केली. महिना भरून चुकला. कोण्याही जिनसाची कमती पडूं दिली नाहीं. असें असतां आपले मनांत हें आलें. उत्तम आहे. आम्ही आणलें तसें त्यास लष्करापासून पांच कोशांवर पोंचवून देऊन मग आपण लुटणें तर लुटावें. पाहिजे तें करावें. अगर आम्हांस आज्ञा करावी, हुकूम बजावूं." असें बोलणें निग्रहाचे पडल्यावर श्रीमंत भाऊसाहेब उगेच राहिले. सुभेदार डेऱ्यास येऊन जाटास बोलावून सांगितलें कीं, " तुम्हांस आम्हीं आणिलें. सांप्रत श्रीमंतांचे मनांत तुम्हांविषयीं पाप आलें आहे, यास्तव आम्हीं तुम्हांस लष्करापासून पांच कोश पोंचवून देतो. पुढें तुम्ही संभाळून जावें. (नाहीं तर) आम्हींच लुटावयास येऊं. " असें स्पष्ट सांगून दिलें. जाटाचें उत्तर पडलें कीं, " पांच कोश श्रम आपण आम्हांकरितां कशास करितां ? आम्हांस सुचविलें हेंच स्नेहपणाची शर्थ झाली. " इतकें बोलून डेऱ्यास येऊन नौबद दिली. तयार होऊन चालले गेले. श्रीमंतांनीं सांगून पाठविलें कीं, " जाट कोणाच्या हुकुमानें गेला ? " सुभेदाराचें उत्तर गेले, " काल दरबारीं बोलणें झालेंच होतें, त्यावरून तो उठून गेला. आतां आज्ञा झाल्यास मागें धावणें करितो. " तेव्हां भाऊसाहेबांनीं सांगून पाठविलें कीं, " हे खेळ अवघे तुमचेच आहेत. इतःपर बोलावूं तेव्हां दरबारास येत जावें. बोलवण्याखेरीज येण्याचें कारण नाहीं." यांचें उत्तर गेलें कीं, " आज्ञा शिरसावंद्य. आम्हांस मनसुब्याचें कारण नाहीं. चाकर आहों. चाकरी सांगाल ती करून घरीं स्वस्थ बसूं. "

(२४) यावर मास पक्ष असेंच चाललें, तों पुन्हां धान्याची अडचण पडोन तीन रुपये शेर धान्य भाव मात्र. जिन्नस दमडीवर नाहीं. तेव्हां लाचारी पडली. मनसुब्यास सोहलत राहिली नाहीं. आतां अन्नावांचून मरावें तेपेक्षां धारातीर्थी

---

(२३) महिना भरून चुकला – एक महिना संपूर्ण झाला. **शर्थ** – परिसीमा. **धावणें करतो** – धावून जाऊन पाठलाग करून लुटतो.

(२४) मनसुब्यास सोहलत राहिली नाहीं – कोणाकडे बोलणें करून मदत

V.P. Bhagwat

अनुसर व्हावें हें नेकसल्ला. भावी भवितव्यानुसार मनसुबा मनांत ठसून शिंदे-होळकर आदिकरून शहाण्णव कुळीचा मराठा बरोबर होता. (त्यांपैकीं) हा बुद्धिवाद कोणासही न पुसता जय अपजय परमेश्वर देईल त्यास, परंतु दाण्याचाऱ्याचे कोचर्णीनें हबक खाऊन उठून जातील, मग समेटणें कठीण, असा आपल्या मनांत विचाराचा आगम बांधून दुसरे दिवशीं श्रीमंत भाऊसाहेब यांणीं फौजेस तमाम ताकीद करून समरांगणास जागा उभेतीची पाहून लढाईस आरंभ केला. लढाई निकराची. भाऊसाहेबांचा हत्ती पुढें, तेथून गोळीच्या टप्प्यावर विश्वासरावांचा हत्ती. ईश्वर कृत्यानुसार विश्वासरावास अचानक गोळी लागली. भंवते स्वार होते ते कालवले. हें वृत्त भाऊसाहेबांस समजतांच भाऊसाहेबांनीं हत्ती बसविला आणि धांवत आले. विश्वासराव गोळीचे जखमेनें कार्य होऊन गंतुकाम. तथापि हिंमत धरून भाऊसाहेबांशीं बोललें कीं, " येथें जें ईश्वरास कर्तव्य तें केलेंच. परंतु आपलें आल्यानें लढाई बिघडेल. ही गोष्ट चांगली केली नाहीं. आपण तों प्रसंग संपादावा." इतकीं अक्षरें हिंमत बांधून बोलले. तथापि भाऊसाहेब यांचा स्वभाव सडेतोड. (पूर्वीं) देशी मोहीमसीर होण्याचे समयीं दादासाहेब यांणीं स्वारीच्या देण्याचा तगादा केला हें भाऊसाहेबांस बरदास्त न होता जाब दिल्हा कीं, " स्वाऱ्या शिकाऱ्या करून देणें घरास आणावें ही चाल कोठील ? " तेव्हां दादासाहेबांनीं उत्तर केलें कीं, " आम्ही चाकर हरामखोर, श्रीमंतांचें पायाशीं प्रतारणा करून कुणगे वेगळे ठेऊन देणें दाखवितों ! इतक्यावर स्वारी आपणच करावी." " उत्तम आहे. आम्हींच करूं, परंतु आम्हीं कारकून आम्हांस धनी पाहिजे, विश्वासराव यास बरोबर द्यावे."

---

(२४) मिळवावी तर तसा कोणी मनुष्य दिसेना. **सोहलत** – सवड. **मनसुबा** – सल्ला मसलत. **नेक सल्ला** – उत्तम मार्ग. **हबक** – धास्ती, हाय. **समेटणें** – आवरणें. **विचारांचा आगम बांधून** – विचार ठरवून. **उभेतीची** – उमेतीची असें असावें. उमेठ–उंचवट जागा. उमेतीची–उमाठ्याची. **कालवले** – शिस्त सुटून सरमिसळ झाले. **गन्तुकाम** – मरणोन्मुख, परलोकचे प्रस्थान ठेवलेला. **येथें जें ईश्वरास कर्तव्य तें केलेंच इ०** – ईश्वरानें नेमले होते त्याप्रमाणें माझा येथें गोळी लागून काळ होणार त्यास इलाज नाहीं. परंतु तुम्ही आपली जागा सोडून मजकडे धावत आल्यामुळें तिकडला घरबंध सुटेल व सेनापति दिसेनासा झाल्यामुळें लोक पळूं लागतील व लढाई बिघडेल. तरी तुम्ही आपल्या जागीं जाऊन उभे राहा व प्रसंग संपादा. म्हणजे लढाई जिंका. **बरदास्त** – सहन, मान्य, ग्राह्य. **देणें घरास आणणें** – कर्ज करून घरीं येणें. **हरामखोर** – गुन्हेगार, राजद्रोही. **कुणगा** – धनाचा साठा.

(असे भाऊसाहेब बोलले) तेव्हां नानासाहेबांनीं उत्तर केलें कीं, "मुलानें पाहिलें काय? त्यानें येऊन तरी काय करावयाचें आहे? तुमचे तुम्ही असल्यावर पोर कशास नेता?" (पण) भाऊसाहेबांचा आग्रह पडला. तेव्हां नानासाहेबांस रुकार देणें प्राप्त झालें. हें वर्तमान गोपिकाबाईस समजतांच तिनें आग्रह धरिला कीं, "माझें पोर मी जाऊं देणार नाहीं." तेव्हां नाना, भाऊ उभयतांचाहि इलाज खुटला. मग भाऊसाहेब जातीनें गोपिकाबाईकडे जाऊन पदर पसरून, साष्टांग नमस्कार घालून प्रार्थना केली कीं, 'विदेशास लेंकरांस कशास न्यावें हें खरेंच. परंतु बाल सिंहाचें! कोल्ह्याकुत्र्याचें नाहीं. तथापि विश्वासरावाच्या बालाग्रास धक्का लागावयाचा नाहीं. मीच जातों परंतु आमचे पदरीं इतकें पुण्य नाहीं. नाना पुरुष भाग्यशाली. त्यांच्या भाग्याचा प्रसर आहे ह्यास्तव विनंती मान्य होऊन विश्वासरायास बराबर द्यावें." तेव्हां गोपिकाबाईस संकोच पडून रुकार दिल्हा. अशा आग्रहानें आणिलें आणि येथें ईश्वरानें काय केलें? आतां तोंड (कसें) दाखवावें? इतकें मनांत आणोन घोड्यावर स्वार होऊन घोडे घातले. या उभयतांचें वृत्त वकिलाच्या चिठ्या शिंदे होळकर यांजकडे जातांच हवा पाहून उभयतां सरदारांनीं घोडे घातले. जनकोजी शिंदे गारद झाले. मल्हारजी होळकर (यांनीं) ऐशीं स्वारांनीं दक्षिणचा रस्ता धरला.

(२५) जाटाचे मुलखांत आल्यावर एक जाट, जाठाचा भाईबेटा, सुभेदार त्याचे गढीवरून चालले. तों जाट येऊन सुभेदाराच्या घोड्याच्या जेरबंदास हात घातला. "श्रमले आले आहां, गढींत चालून भोजन करून जावें." त्याशीं शिष्टाचार बोलतां गोविंदराव बुळे जवळ होते त्यांस डोळा घालून त्यानें ज्या हातानें जेरबंद धरिला होता तो हात तोडून टाकिला आणि घोडे उचलिलें. जागां जागां स्नेहानें अथवा पापबुद्धीनें बहुत आडवे आले. समय पाहून कोणाचाही विश्वास न धरितां जुवामर्दीनें ग्वालेरीस आले. मागें फौजेचा भरा जाहाल्यावर जसा ज्याला रस्ता सांपडला तसा तो निघोन गेला. ज्याचें आयुष्य सबळ तोच पार पडला.

---

(२४) **मुलानें पाहिलें काय?** – मुलाला काय अनुभव आहे! तो लहान असल्यामुळें त्याला स्वाऱ्या शिकारीचा अनुभव नाहीं. **बाल** – छावा, मूल. **बालाग्र** – केसाचें टोंक. **मीच जातो** – मीच एकटा गेलो असतो. **पदरीं इतकें पुण्य नाहीं** – दौलतीच्या मालकाचा अधिकार मला नाहीं. **संकोच** – भीड. **हवा** – धुन्दी, गोंधळ, रागरंग.

(२५) **भाईबेटा** – पुतण्या, भाऊबंद. **जुवामर्दी** – धाडस, शौर्य. **भरा** – मोड, दाणादाण.

बाकी बहुतेक मारले गेले. जाटापाशीं जो आला त्यानें सुभेदाराच्या स्नेहाची शर्थ ठेवून, हत्तीवाल्यास हत्ती, पालखीवाल्यास पालखी, घोडेवाल्यास घोडे, जोडेवाल्यास जोडे. राहील तोंपर्यंत यथेच्छ भक्षावजास, जाईल ते दिवशीं खर्चीस, माणूस पाहून भारबरदारी (अशी) सरबरा करून ग्वालेरीस पावते करून (दिले). ये प्रमाणें हत्तीनिसापासून भंग्यापर्यंत सरबरा केली. त्यांत रावजी महादेव फडणीस पारनेरकर निसबत होळकर हे मथुरेस आले. बहुत खराबींत. त्यांचे मामाचे चिरंजीव राजाराम सदाशिव पानिपतावर राहिले. मथुरेस आल्यावर जाट जातींनें जाऊन भेटून बहुत प्रार्थना केली कीं, " लागेल त्याची आज्ञा करावी. " त्यांनीं उत्तर केलें कीं, "आपण कृपा करून आज्ञा करितां तेथें आमचा बंधु पानिपतावर राहिला. यास्तव चार कोस अवरस चवरस रण पडलें आहे तें भाड्याचे गाडे लाऊन गंगेंत टाकावें. त्यास जो पैका लागेल तो आम्हीं देऊं. " त्याणीं कबूल करून चारशें गाड्या भाड्याच्या लावून संपूर्ण रण गंगेत टाकलें. चाळींस हजार रुपये भाडें लागलें. ते सावकाराची चिठ्ठी जाटास देऊन (मग रावजी महादेवाचा) जाटानें सन्मान करून ग्वालेरीस पावते केले.

(२६) सुभेदार ग्वालेरसि येऊन पंचवीस हजार फौज जमा केली. तमाम नर्मदा तीर पावेतों मामलेदार येऊन भेटले. रांगड्यांनीं हवा पाहून जे गढीबंद होते ते होते, ज्यांस गढी नाहीं ते गढी बांधून बदमामलीस आले. जयपुरकर माधोसिंग यानें वीस हजार फौज रायासिंग घोडचढे याजबरोबर देऊन नर्मदा-

---

(२५) **स्नेहाची शर्थ ठेवून** – स्नेहाची जाणीव ठेवून. होळकरानें सुरजमल जाठास भाऊसाहेब पेशव्यांचा बेत अगोदर कळवून त्यास सावध करून जीवानिशीं पूर्वी बाहेर काढून दिले होते ते उपकार स्मरून. **खर्चीस** – खर्चास. **भारबरदारी** – सामानवाहतुकीसाठीं बैल वगैरे. **सरबरा करणें** – पुरवठा करणें. **हत्तीनिस** – हत्तीनशीन, हत्तीवर बसण्याचा मान असलेला मातबर माणूस. **पानिपतावर राहिले** – पानपतावर मेले. **रण पडले आहे** – रणांगणावर मुडदे पडले आहेत. **जाटास देऊन** – जाटास दिली व मग.

(२६) **हवा पाहून** – रागरंग पाहून. **बदमामलीस येणें** – उलटणें, उद्धटपणास प्रवर्तणें. पानपतास झालेल्या मराठ्यांच्या मोडामुळें रांगडे संस्थानिक मराठ्यांवर उलटले. जे गढीबंद होते म्हणजे ज्यांस कोटाचा आश्रय होता असे रांगडे संस्थानिक तर मराठ्यांस जोरा दाखवू लागावे यांत आश्चर्य नाहीं. पण आतांपर्यंत जे सामान्य क्षुद्र भुमे होते तेहि पुंड झाले. त्यांनीं किल्ले कोट बांधले व ते मराठ्यांना पूर्वीप्रमाणें दबेनासे झाले व त्यांनीं मराठ्यांना खंडण्या देण्याची चाळवाचाळव सुरू केली.

पर्यंत आपला अमलाफैला करावा, या इरादावर रवाना केलें. हें वर्तमान सुभेदारास समजतांच बमय फौज कूच करून हडोतीचे मैदानांत हाडे सामल करून (सामना)केला. लढाई भटवाटवाड्यावर मातबर जहाली. सुभेदाराच्या हातास गोळी लागली. इतक्यांत सुभेदार घोड्यावरून पालखींत येतांच फौज दामदस्त पळाली. तेव्हां बुंदी कोटेवाले हाडे यांनीं विचार केला कीं आपण घोडेवाल्यांत सामल होऊं नये हा उत्तम पक्ष झाला. त्यास घोडेवाले निघोन देशास जातील परंतु आपली भूम जयपूरवाला खोदून टाकील. त्यापेक्षां सोक्षमोक्ष आजच व्हावा. असा निश्चय करून जाजमे हांतरून जयपूरवाल्यांशी लढाई घेतली. जयपूरवाल्यांचे पाऊल मागें पडतांच मल्हारजी होळकर (यांनीं) हात गळ्यांत बांधोन घोडे घातले. तो मारीत सागोन दरवाज्यास भाले लाविले. तेथेंच मुक्काम केला. जरबेखालीं पंचवीस लक्ष रुपये घेतले. बुंदी कोठेवाले यांस भेटून खातर तसलीम करून इंदुरास गेले. इंदुरीं मुक्काम करून महालवाल्यांकडे माहालचा पैसा तीन सालीं जमला होता तो पैसा जमा करून माळव्यांत तहद हडोतीपर्यंत ज्या ज्या रांगड्यांनीं मामलेदारांशीं बदमामली केली त्यांच्या गढ्यांचा कट्टा केला. रबाब पूर्ववत् जमून इंदुरास आले. फौजची दिल-

---

(२६) **घोड्यावरून पालखींत येतांच** – जखमी झाल्यामुळें सुभेदारास पालखींत रहावे लागले. **दामदस्त** – झाडून सर्व. **भूम** – मुलूख, जमीन. **जाजमे आंथरून लढाई घेणें** – धरल्या जागेवरून किंवा बैठकीवरून बिलकूल न हलण्याचा निश्चय करून लढणें. असाच वाक्प्रयोग हरिवंश बखरींत आलेला आहे. फक्त तेथें जाजमाऐवजीं सतरंजी असा शब्द आहे. " सावनूरकर नबाब यांजकडील पठाण किल्ल्याचे रेवणीवर सतरंज्या हांतरून वर बसून तिरंदाजी करीत–येथेंच मरूं, पण जागा कधीं सोडणार नाहीं, असा आपला निश्चय शत्रूस कळावा म्हणून. " हरिवंश बखर पृष्ठ ९. **हात गळ्यांत बांधून** – हाताला गोळीची जखम झाली होती तरी तो जखमी हात तसाच गळ्याशीं बांधून मल्हाररावानें लढाईच्या गर्दींत प्रवेश केला. **सागोन** – हें दरवाज्याचें विशेष नांव दिसतें. **तहद** – पर्यंत. **तहद हडोतीपर्यंत** – वास्तविक पहिला ' तहद ' किंवा शेवटचा ' पर्यंत ' या पैकीं कोणता तरी एक शब्द अनावश्यक आहे. परंतु जुन्या भाषेंत एका अर्थीं असे दोन्ही शब्द घालण्याची वहिवाट असे. उदा. ' विना ' व ' वांचून ' हे शब्द समानार्थक असतां त्यांचा एकाच वाक्यांत उपयोग करीत. जसे " विना त्याचें परिपत्य केल्यावांचून मला समाधान नाहीं. " दुसरें उदा. " अखबार पुरन्दर अज इस्तकबिल छ दहा मोहरम लगायत. " वास्तविक ' अज ' व ' इस्तकबिल ' हे दोन्ही समानार्थक शब्द आहेत.

जमाई करून, तोंडानें मागितली नालबंदी देऊन चौमहिन्यांनीं बाज बरसात इंदुरीं येऊन हजर व्हावें ह्या बेतानें फौज रवाना करून माळवें प्रांतीचे बंदोबस्तास तुकोजी होळकर याजपाशीं पांच हजार फौज ठेऊन आपण देव-दर्शनास देशीं गेले.

(२७) तुकोजी होळकर फौज सुद्धां मेवाडांत गेले. आलीकडे मंदोसरांत वस्ती फार करून मेवात्यांची. मेवात्यांशीं व कोतवालाशीं कलह होऊन मेवाती यांनीं लढाई करून कोतवाल याचें डोकें गादीवर कापलें. हें वर्तमान सुभेदारास थालनेर मुक्कामीं समजतांच हजार स्वारानिशीं धाऊन तिसरे दिशीं मंदोसरास आले. शहरांत शिरून मेवात्यांचा कट्टा केला. मेवाती पाहिला त्या ठिकाणीं डोकें कापिलें. चौतऱ्यावर ज्या मेवात्यानें डोकें कापिलें होतें त्याचें डोकें चौऱ्यावरच कापिलें. मेवात्यांस समजलें सुभेदार आला, आपला प्राण वांचणें कठीण. तेव्हां मेवात्यांत मुख्य होते ते कमाविसदार याचे विद्यमानें सुभेदारास शरण येऊन पन्नास हजार रुपये नजर दिल्हे. त्याजवर पांच चार मेवाती मुख्य होते त्यांजला वस्त्रें देऊन, पन्नास हजार रुपये नजरेचे कमावीसदार यांचे जमेस करून, आपण पुन्हा देशीं आल. श्रीमार्तंडाचें दर्शन घेऊन पुण्यास आले. पाणिपताचे लढाईचें वर्तमान पुण्यास समजून नानासाहेब हाय भाऊ! हाय भाऊ! (करीत) शिरोज भेलशापर्यंत गेले.

---

(२६) **तोंडानें मागितली इ०** – शिलेदारांनीं नालबंदीसाठीं वाटेल तेवढी रक्कम मागतली तरी ती होळकरानें तात्काळ दिली. **नालबंदी** – नोकरींतील शिलेदारास त्याच्या ठरलेल्या पगारापैकीं कांहीं भाग आगाऊ तयारीसाठीं म्हणून देण्याची पद्धत असे, तिला नालबन्दी म्हणत. या पैशांतून शिलेदारानें आपल्या घोड्यांना नालबन्दी करून तीं सज्ज ठेवावीं अशी अपेक्षा असे.

(२७) **गादीवर** – कचेरींत, भर कचेरींत. **चौतरा** – कोतवालाची कचेरी. **यांचे जमेस करून** – यांच्या हवाली करून. **हाय भाऊ हाय भाऊ करीत** – नानासाहेब पेशव्याला भाऊसाहेबाविषयीं किती अपरंपार शोक झाला होता हे पाहणें असल्यास पुरन्दरे दप्तर भाग १ मधील अखेरचीं पत्रें पहावींत. "नानासाहेबांची तबीयत आजारीपणानें आधींच ढासळली होती. त्यांत हा जबर धक्का बसल्यामुळें तर तो खंगत चालला. 'घोड्यावर अर्ध कोसहि बसवत नाहीं.' इतक्या कनिष्ठ दर्जाला तबियत जाऊन पोंहोंचली. सर्व वेग विचारें करून त्यानें आवरले पण भाऊसाहेबांचें दुःख कशानेंच परिहार होण्याजोगें नव्हतें. 'भाऊवांचून दुनिया दौलत व्यर्थ आहे. त्याचें हातचें पत्र पाहीन तेव्हां माझ्या बायकोस मला जीव येईल. आतां तों वेडेपणें आहों. लेक अल्पायुषी होता. सूर्यमंडळ भेदून गेला. तें दुःख परमार्थ—शास्त्रपुराणें करून टाकिलें. परंतु चिरंजीव भाऊवांचून दुनिया व्यर्थ आहे!!' 'भाऊवांचून सकळ व्यर्थ' हें नानासाहेबांचें दुःखोद्गार कसल्याहि पाषाण—

शिरोजेस नानासाहेबांचा काळ झाला. माधवराव साहेब पुण्यास होते त्यांची भेट घेऊन साहा महिने राहिले.

(२८) तों इकडे जाटाशीं व नजीबखानाशीं लढाई उत्पन्न होऊन नजीबखानानें सुरजमल्ल जाटाचें डोकें कापून (टाकलें). जाटाचे चिरंजीव नवलसिंग व जवाहीरसिंग यांची उमेद तीर्थरूपाचा सूड घ्यावा. एतंनिमित्य सुभेदाराकडे वकील आला व नजीबखानाचाही भाईचारा त्याचा (हि) वकील आला. तेव्हां फौजबंदी माधवराव साहेबांचे आज्ञेकरून (वरून) पेंढारी फौज घेऊन जाटाचे उपकार पाणिपताचे स्वारीचे प्रसंगीं याजमुळें जाटाकडे आले. जाटाची फौज घेऊन नजीबखानाशीं साडेतीन महिने लढाई जाहाली. जाटाची फौज फितुरी. तन देईना. तेव्हां जाठ कमजोर पडून जाटाचे मनाजोगा घाट न उतरतां सुभेदारांनी जाटाचा व नजीबखानाचा तह ठरावून देऊन आपण अनुपशहरावर गेले.

(२९) येथें सुजाउद्दवला होता, त्याजला फिरंग्यांनीं लुटून घेतलें. यास्तव सुभेदारांशीं भेटोन लाख रुपये कुचाचे, पन्नास हजार मुक्कामाचे असें कबूल करून सुभेदारास घेऊन फिरंग्यावर गेला. रुपये मुबलक फौजेस द्यावे हें सुभेदाराचे बुद्धीस येईना. तशांत कारभारांत विसाजी लांभाते याचें संमत फौजेस रुपये द्यावे हें पडेचना. लढाईचा मोसम. लढाईस अग्रसर गंगोबा तात्या (त्यास) फौज घेऊन मुकाबल्यास फिरंग्यांचें जाणें प्राप्त. फौज बेदील. स्वाधीन कांहीं नाहीं. ह्यामुळें गंगोबा तात्याही बेदील. लढाईचें तोंड, चोहोंकडून दहा कोशांचें अंतरानें फेरानें फौज पळते, फिरंगीं मागें तेव्हां बेजार जाहले. मग शंखभट उपाध्ये होते त्याजपाशीं तात्यांनीं त्रासरूप होऊन गाऱ्हाणें सांगितलें कीं, " फौज घेऊन पुढें मरणें

(२७) हृदयास पाझर फोडतील. पुरंदरे–दप्तर भाग १ प्रस्तावना पृष्ठ ६०. **शिरोजेस नानासाहेबांचा काळ झाला** – चूक. पुण्यास पर्वती येथें काळ झाला.

(२८) **तन देणें** – छाती देणें, हिय्या करणें. तन–छाती.

(२९) **लाख रुपये कुचाचे, पन्नास हजार मुक्कामाचे** – मुक्काम पडेल त्या दिवसाखाठीं खर्चास पन्नास हजार व फौज कूच करून जाईल त्या दिवसाचे पन्नास हजार. **मोसम** – हंगाम, प्रसंग. **बेदिल** – पगार न मिळाल्यामुळें बिथरलेली. **दहा कोशांचे अंतरानें इ०** – फिरंग्यांनीं चोहोकडून मल्हाररावाच्या फौजेचा पाठलाग चालविला. होळकरांची फौज दहा वीस कोसांचें अन्तर आपणांत व इंग्रजांत सोडून सारखी पळत होती. इंग्रज कांहीं पाठलाग सोडेनात, त्यामुळें होळकरी फौजहि धावतांना बेजार झाली. **शंखभट** – सखंभट तर नसेल?

मला, लोकास जखम अथवा पैसा देऊं म्हटल्यास स्वाधीन नाहीं, यास काय करावें? तुम्ही यजमानास उपदेश करून दोन रोजमुरे देववावे. फिरंग्याचें पारिपत्य करण्याचा जिमा माझा." तेव्हां शंखभट यांनीं कबूल करून सुभेदारास फजीत केलें कीं, "रुपये आपले बापाचें कीं काय? ज्यांजवर रुपया येतो त्यांजला जखम लागली असतां हळद फटकूं मिळणें कठीण. तेव्हां फौजेची हामराई राहते कशी? राखणारानें काय करावें?" तेव्हां उद्यां लढाई करावी, दोन रोजमुरे आस्तमानीं घ्यावे असें गंगोबा तात्यांस समक्ष आणोन त्याची खातरी करून सांगितलें. दुसरें दिवशीं तात्यांचें हमराईनें फौजहि हमरा होऊन घोडे घातले. सात पलटणें कापून काढिलीं. बंदुकीच्या मोळ्या बांधून चवदाशें गोऱ्यांचे डोक्यावर देऊन आणिल्या. अस्तमानीं "रोजमुरा कशाचा द्यावा? चार पलटणें अवशिष्ट राहिलीं आहेत त्यांचें पारिपत्य होईल तेव्हां रोजमुरा मिळेल!" या बोलण्यानें तात्या व फौज फारच उदास जहाली. उदासी व दिवसाचा श्रम ह्या गिरफारीनें कोणी चौपत कोणी उदास. मागील चार घटिका रात्र राहतां चार पलटणें लढाई झाली तेथून चौकोशांवर होतीं, त्याणीं उठावणी करून चार घटिका मागील रात्रीं येऊन पडले. फौज आपली तरबितर होऊन सुभेदार व बाळाबाई अल्हडवाल्याचें कुटुंब बराबर होतें (त्या) कुटुंबासुद्धां काल्पीनजीक यमुनेचे घाटावर आले. तेथें पाणी अथाक, मागें फिरंगी, तेव्हां श्रीमार्तंडाचें स्मरण करून श्रीयमुनेची पूजा करून हत्ती घातला. तों कंबरेइतकें पाणी. तमाम फौज उतरोन आली. त्या ठिकाणीं यमुनेस पायउतार कधींच जाहला नव्हता. येथें पायाब होऊन यमुनेनें मार्ग दिला! तो मागाहून फिरंगी आला. त्याणेंही गंगेंत प्रवेश केला तों पाणी अक्षोभ! लाचार होऊन माघारा गेला. बहुत आश्चर्य झाले कीं, मल्हारजी होळकर मनुष्य नव्हे? कांहीं ईश्वराचा अंश खरा. असें मानून टोपी काढून सलाम करून माघारा गेला. चाले चाले झांशीस आले.

(३०) तों इकडे दातिया, ओडसे, सेवडे व गोहदवाला जाट यांनी एकदिली

---

(२९) **ज्याजवर रुपया येतो** – ज्या सैनिकांच्या बळावर आपण विजय मिळवतो व खंडण्या घेतो. **हळद फटकूं** - जखमांना लावण्यासाठीं हळद व जखम बांधण्यासाठीं चिंधीचें फटकूर. **हमराइ** – जमाव, उपस्थिति. **हमराईनें** – येथें अर्थ हमीमुळें. **हमरा होऊन** – विश्वासी होऊन. **गिरफदारी** – चिंता, काळजी, संशय. **तरबितर** - तारबितर, डावाडोल, उध्वस्त, विकीर्ण. **अथाक** – अथांग. **पायाब**– पायानें प्रवाह तरून जाण्यासारखा उतार. **अक्षोभ** – अथांग, अपरंपार. **चाले चाले** – कूच मुक्काम करीत.

करून हिमत बाहादर अनुपगीर गोसावी पातशाई चाकर याला आणून खर्च कबूल करून झांशी व ग्वालेर घ्यावी हा इरादा बांधोन झांशी घेतली. अशा संधीस सुभेदार येऊन दाखल झाले. तों रांगडे यांणीं शेवडे, दतीया वगैरे येथील जमियत झांशींत भरून दिली. कारण सुभेदार झांशीस मोर्चे लावितील. जागा त्यांची. याजकरितां झांशीचे जमेतींनें बळकटी करून हिमतबहादर आंत ठेविला. हें पाहून सुभेदारांनींही कवाईत केली. झांशी सोडून शेवड्याकडे चाल केली. तेव्हां बुंदेले यांणीं रातोरात झांशीची जमेत काढोन शेवड्याकडे आले. हें वर्तमान समजतांच सुभेदारांनीं रातोरात येऊन झांशी घेरिली. मोर्चे लाविले. तोफा सरंजाम बराबर नव्हता. सडी स्वारी. तेव्हां रामपुऱ्याहून झाळादळ, सलाम, भवानी, मार्तंड चारी तोफा आणून मोर्चे सुरुवात केले. तीन महिन्यांत झांशी घेतली. श्रीमंतांचा झेंडा कायम करून हिंमतबहादर गोसावी याणें विचार केला कीं, सुभेदार आले येथें आपलें बुद्धिकौशल्य अथवा जुवामर्दी चालून यश येतें असें नाहीं. आपले जमेतीनिशीं निघोन गेला. सुभेदार झांशींचें ठाणें मुस्तकीम करून दतियासी लागले. तिसरे दिवशीं चार तोफा दराबीवर धरून मागें शिलेदार सरदार हुजरात वगैरे पायदळ देऊन हल्ला करून दतीया घेतला. राजा धरिला. आपला अमलफैला करून मग राजाची दिलजमाई करून आपला नातु म्हणून त्याची स्थापना केली. गोडीगुलाबीनें त्याचें राज्य परत करून पंधरा लाख रुपये खंडणी घेतली. शेवडे ओडशे दतियाचे पेट्यांतील, जरबेनें हात बांधोन हजर जाहले. त्यानें पांच पांच लाख खंडणी दिली. सुभेदार भाग्यशाली, प्रतापवान, जातींनें अपेश कोठें आलेंच नाहीं. परंतु समाप्तीचा वेळ आल्यासारखी बुद्धि उत्पन्न होऊन विसोबा लांबहाते याचे नादीं लागून फौजेस खर्चास न दिल्यामुळें फिरंग्याचें आलें यश गमाऊन साठ कोश झांशसि आले ! अव्वलीपासून जातींनें मनसुब्यास धक्का कोठेंही बसला नव्हता. मृत्युचिन्हाचें सूचक (म्हणून) फिरंग्यांची बदनक्षा घडून आली. तथापि बुंदेलखंडांत आल्यावर श्रीमंताचा रबाबा त्यांनीं जथा चांगला जमविला.

(३०) **जमियत** – सैन्य. **कवाईत** – युक्ति, डाव. **मुस्तकीन** – कायम, जबरदस्त. **दराबीवर धरून** – दराबी म्हणजे तोफेच्या खालीं जो स्टँड किंवा फडपैया असतो तो. दराबीवर धरून – नेम धरून ? **पेट्यांतील** – ताब्यांतील. **अव्वलीपासून** – प्रथमपासून, सुरवातीपासून. **जातींनें** – स्वतः रचलेल्या व्यूहास, मसलतीस. **फिरंग्यांची बदनक्षा घडून आली** – फिरंग्याच्याबाबत मल्हाररावास पराभवाची अपकीर्ति स्वीकारावी लागली म्हणजे इंग्रजाकडून त्याचा पराभव झाला. हा डाग त्याला लागला. हें दुष्ट चिन्हच झालें. जणूं कांही दैवाला या योगें मल्हाररावाचा पुढील मृत्यूच सूचित करावयाचा होता.

(३१) तों इकडे देशी जनकोजी शिंदे पानिपतचे गर्दींत गारद जाहले, दत्तोजी शिंदे नजीबखांचे गर्दींत कामास आले. जयापा मारवाडांत राहिले. राणोजी शिंदे याचे तिघे खांसे पुत्र श्रीमंतांचे नौकरींत तवतुक जाहले. तेव्हां महादजी शिंदे विदूर पैकीं, शाहाणा दौलत आटोपून सरकार चाकरी करावयाजोगा (असें) ध्यानास आणून माधवराव साहेब व दादासाहेब यांनीं वस्त्रें देऊन सुभेदार बुंदेलखंडांत एकटे, सबब दादासाहेब फौजबंदी करून माळव्यांतून हडोती जयपूर या जिल्ह्यांतून दाणा-चारा करीत सुभेदारास येऊन भेटले. त्या संधीस गोहदवाल्यानें येऊन लबाडी करून दादासाहेब यांची कही मारून नेली. हा रोष दादासाहेबांचे मनांत येऊन गोहोद खोदून मोकळी करावी हा आग्रह सुभेदारांनीं पाहून मनसुब्याचे साधक बाधक कांहीं एक न सुचविता राजहट्टास अनुसर होऊन गोहोदेस मोर्चे लाविले. आठ महिने लढाई झाली त्यांत महादजी शिंदे यांचें (व) गोहदवाल्याचें सूत्र मिळोन, दाणा दारू याची कमती पडली होती ती शिंदे यांच्या मोर्चांतून भरती जाहली. हें पत्तेवार श्रीमंत दादासाहेबांस समजतांच शिंद्यावर इतराजी होऊन मेखसू घालून मारून टाकावा असे वर्ण दादासाहेबांचे तोंडांतून निघतां सुभेदारास समजल्यावर एकांतीं दादासाहेबांची गांठ घालून या रोषाची सफाई करण्याविशीं यावत शक्य प्रयत्न केला. परंतु त्यांचे मनांतील किलाफ दूर न होता, " सुभेदार आपण या कारभारांत पडूं नये. अखेर गुलामाची जात आपले जातीवर गेली. " (असें भाषण केलें.) सुभेदारांनीं उत्तर केलें कीं, " शिंदे उभे केले त्या दिवसा-पासून आज पावेतों त्यांचे हातून कंपेश कोटी रुपये खर्च होऊन त्यांत चार कामें सुधारली असतील, दहा कामें बिघडलीं असतील. तीन पुरुष सरकार कामास आले. तेव्हां दौलतींतील माणूस गणनीय मरातब्यास आले ते नादान गोष्टीवर माणसाचा आब घ्यावा ही गोष्ट कोठील ? माणूस करण्यास लाखों रुपये त्याचे हातून बिघडावे लागतात तेव्हां माणुसकी येती. पोरपण करूं नको. दौलतीचीं कामें आहेत. " या भावीं बहुत परिश्रम केला. परंतु उपतिष्ठला नाहीं. या घाल-मेलींत मालराव होळकर इंदूरीहून सुभेदारांचे भेटीकरितां आले होते. महादजी

---

(३१) **तवतुक** – या शब्दाचा अर्थ सिद्ध किंवा रुजु असा आहे. पण येथें अर्थ कामास आले, मेले असा आहे. **विदुर** – दासीपुत्र. **दाणाचारा करीत** – धान्य वगैरे लुटीत. **कही** – सैन्याला दाणावैरण वगैरे मिळवून आणणारी लष्करावरोबरची टोळी. **राजहट्ट** – स्त्रीहट्ट, बालहट्ट व राजहट्ट हे दुर्निवार असतात असें सुभाषित आहेच. **वर्ण** – शब्द, अक्षरें. **किलाफ** – संशय, अढी, राग. **गणनीय** – महत्त्वाचा. **मरातब** – पदवी. **नादान गोष्टीवर** – क्षुल्लक सबबीवर. **उपतिष्ठला नाहीं** – फळास आला नाहीं.

अहिल्याबाई व तुकोजीराव होळकर

(३२) नंतर गंगाधर तात्या यांनीं दादासाहेबांपाशीं आज्ञा मागितली कीं, " फौजेस पांच वर्षे जाहलीं. हिशेब घेऊन घर पहावें हा इरादा. त्यांत सुभेदार कैलासवासी जाहले. याजमुळें कोणकोणास हिशेबाचा भरंवसा येत नाहीं. यास्तव एक वेळ इंदुरास जाऊन फौजांची समजावीस करून आज्ञा जाहलियावर हजर होऊं." ऐसा भावीं आज्ञा मागोन इंदुरास आले. लोकांची समजाविसाची तोडजोड लाविली. हिशेब पैका पदरीं घालून पुढील नालबंदी देऊन बिदा केलें. हुकूम येईल तत्क्षणीं यावें अशी ताकीदहि केली. इंदूर मुक्कामीं पागा सरंजाम मात्र नजिक. सरंजामी इतलाखी आपले जागीं गेले. तो दाहावे महिन्यांत कांहीं सरदारांस आत्मकृत्य विकृतीमुळें मालराव होळकर याचा काळ जाहला. दोघी बायका सती गेल्या. बाईसाहेब शोकार्णवांत. तेव्हां मनुष्यमात्र शोकांत. अशा संधींत गंगाधर यशवंत यांचे बुद्धीस विपर्यास येऊन दादासाहेबांकडे प्रेष पाठविला कीं, ही दौलत बेतलमाल जाली. त्यांत आपण सुभेदारांचे चिरंजीव हे जघन्य. ते पक्षीं आपण दरमजल येऊन दौलत समेटावी, येथें शोकानें गालब होऊन मनुष्यमात्र गिरफदारींत आहे, आपलें

---

(३३) **घर पाहावें** – घरीं मुला माणसांत जावें. **हिशेबाचा भरंवसा नाहीं** – शिलेदारांना वाटते कीं मल्हारराव होळकर मेल्यामुळें आतां आपणांस ठरल्याप्रमाणें पगाराची रक्कम मिळेल कीं नाहीं कोणास ठाऊक ? **समजाविस** – समजुत. शिलेदारांना मिळावयाच्या पगारांतील एका हप्त्याचें नांव नालबंदी, नेबाद, अर्जबाब, समजाविस. हे ते हप्ते होत. **नालबंदी** – शिलेदार वगैरे लोकांस आगाऊ खर्चास पैसा देतात तो. **सरंजामी** – ज्या सरदारांस लष्करी नोकरीकरतां सरंजाम लाऊन दिलेला असतो तो सरंजामी सरदार. **इतलाखी** – पगार देऊन ठेवलेला सैनिक किंवा शिलेदार तो इतलाखी. अशा पगारी शिपायांची फौज ती इतलाखी फौज. **सरदारांस आत्मकृत्य विकृतिमुळें इ०** – या वाक्यांतील सरदारांस या शब्दाचा अर्थ व संगति लागत नाहीं. **आत्मकृत्य विकृतिमुळें** – आपणच केलेल्या उपद्व्यापामुळें फळ पावून. मालेराव होळकर हा वेडसर, व वृत्तीनें दुष्ट होता म्हणतात. अहिल्याबाईनें मोठ्या भक्तीनें ब्राह्मणास जोडे वगैरे दान करावे. त्यांत यानें विंचू घालून ठेवावे व ते डसल्यानंतर ब्राह्मण कळवळून ओरडूं लागले म्हणजे यानें पोट धरधरून हसावे अशा त्याच्या संबंधीं आख्यायिका आहेत. **बेतलमाल** – बेतनमाल, बेवारशी. **जघन्य** – सर्वप्रसिद्ध. **सुभेदारांचे चिरंजीव** – पेशवे हे मल्हारावास वडलांसारखा मान देत असत. **समेटावी** – दाबावी, गिळंकृत करावी. **शोकानें गालब होणें** – शोकाखालीं खचून जाणें. गालब याचा अर्थ वरचढ होणें असा आहे.

येणें सत्वर जाहलें असतां समय आहे. या भावें प्रेष गेला.

(३४) हें वर्तमान शिवाजी गोपाळ व राजाराम रणसोड निसबस रावजी महादेव फडणीस पारनेरकर यांजला समजतांच बाईसाहेबांसी त्या दिवसांत बोलावें असें पुण्य कोणाचें नाहीं, परंतु हरकूबाई व उदाबाई वाघमारे सुभेदाराच्या कन्या (यांसी) उभयतांनीं गंगाधर तात्याचा बुद्धिवाद श्रवण करून " बाईसाहेबांपाशीं बोलोन या गोष्टीचा धरबंद आजपासून केला असतां सोईस पडेल. नाहीं तरी तुम्हांस घोड्याचे दाणे भरडावे लागतील आणि आम्हांस भीक मागावी लागेल." असें बोलले. तेव्हां उभयतां बायांनीं प्रश्न केले कीं, " धरबंदाची पैरवी कशी, हें आम्हांस सांगावें. त्याप्रमाणें आम्हीं बोलूं." तेव्हां यांनीं उत्तर केलें कीं, " शोकाचें गाठोडें बांधून एकीकडे ठेवून हिम्मत धरावी. सरंजामी, इतलाखी यांसी जासूद पाठवून जमा करावें. भोंसले, गायकवाड, दाभाडे यांजला सांडणीस्वारांसमागमें रवानग्या व्हाव्या कीं, "कैलासवासी सुभेदार यांनीं श्रीमंतांचे दौलतीचा पाया खोदून, वीट आपले हातें टाकून, इमारत उभी केली. त्यास या प्रसंगीं आम्हांवरी ईश्वरी गजब, ते पक्षीं दौलत जगवून आम्हांस हमराई करून सेवा–चाकरी घ्यावी तें एकीकडे राहोन, दौलतीवियर्यी पापबुद्धि धरली आहे. त्यास आमचें जसें असेल तसें आम्ही भोगूं. परंतु आज आम्हावरि, उद्यां तुम्हांवरि हीच गोष्ट आहे, याचा विचार करून फौज मदतीस पाठवावी." अशीं पत्रें तमाम लहान मोठे सरदारांस पाठवून गादीची मालकी, उत्तमपक्ष नथ्याबा फणसे यांसी अधिकार खरा परंतु लेंकरूं; बांसडा खांद्यावरी टाकील असा पाहिजे, यास्तव सुभेदार यांनीं अवसान–काळीं मालरावबावाचे हात तुकोजी होळकर याचे हातांत दिला; जाटाचे पारपत्याविषयीं तुकोजी होळकरांनीं पाणी सोडतांच पिंडास काकस्पर्श जाहला, ते पक्षीं त्यांजला आणोन गादीवर बसवावें म्हणजे कोणतेही अवघड पडणार नाहीं. या गोष्टी आज

(३३) **गिरफदारी** – चिन्ता, काळजी. **समय** – संधी. **प्रेष** – पत्र.

(३४) **धरबंद** – धरबंद, उपाय, प्रतिकाराची योजना. **पैरवी** – योजना, उपक्रम. **रवानगी** – पत्राची रवानगी. **गजब** – गहजब. **हमराइ करून** – बरोबर घेऊन, सांगातीं घेऊन. **बांसडा** – भाला. फौज संभाळील व स्वाऱ्या शिकाऱ्या करील असाच प्रौढ अनुभवी शूर माणूस होळकराच्या सरदारीवर पाहिजे असा भावार्थ. **या गोष्टी आज विषतुल्य**– तुकोजी होळकराचे व अहिल्याबाईचे बिलकूल पटत नसे. यामुळें तुकोजीलाच आणून सरदारी आपणाहून त्याच्यावर सोपविणें, हे विषासारखे कडू वाटावयाचेंच.

शिंद्याचें सफाईविशीं कांहीं यत्न न चालल्यामुळें लाचार होऊन एके दिवशीं मागील दोन घटका रात्र राहतां आपण व मालराव बावा व महादजी शिंदे त्रिवर्ग टाकण घोड्यावर बसून, एक एक माणूस असे, श्रीमंत दादासाहेब यांचे डेऱ्यास आले. तों श्रीमंत तालीमखाना खेळून शौचास जावें त्या अवसरांत पट पट घोड्यावरून उतरून सुभेदारांनीं आपले हात व उभयतांचे हात रुमालानें बांधून जाऊन पायांवर पडले. तेव्हां कोणीही उठेनात. मग दादासाहेबांनीं सुभेदारास आपले हातें जबरदस्तीनें उठवून बहुत ग्लानी लेंकुरपणाचे अन्वयें केली कीं, " आम्हा त्रिवर्गास आपण रायाचे ठिकाणीं. त्यांत आपण मजला लेंकुरासारखें मोजून या मरातब्यास आणिलें. तेव्हां हें कृत्य करणें आमचे अकल्याणाचें सूचक आहे. " मग सुभेदारांनीं उत्तर केलें, " आम्ही सुरतसांभाळ्यापासून तुमचे घरीं लहानाचे मोठे जाहालों. माणसें आम्हांस तुम्हीं केलें. बाळाजीपंत व बाजीराव व नाना तीन पुरुष गेले. आतां आम्हांस वांचणें हें असकत. चाकर तेव्हां चाकरीच्या कंबेसींचे इलाजमास चिंता नाहीं. धनी आहां बरदास्त कराल. परंतु हरामखोरीचे इलाजमानें आमचे शिळास बट्टा आहे. याचा विस्तार न करितां माझा जीव आहे तावत् या उभयतां पोरांस अबरू कायम ठेवून यांचे हातून चाकरी घ्यावी. आमचे परिश्रम करण्याची पराकाष्ठा जाहाली. आतां बसले ठिकाणीं आम्हांस अन्नवस्त्र देणें तुम्हांस प्राप्त आहे. आमचे डोळे झांकल्यावर या उभयतांची तुमची धुणीपाणी असल्यास आमचें नांव राखतील, नाहीं तरि जें त्यांचे प्रालब्धीं असेल तें होईल. " असें बोलून डोळ्यांस पाणी आणिलें. मग दादासाहेबांनीं कांहीं एक उत्तर न करितां त्रिवर्गास तीन

---

(३१) **टाकण घोडा** – घोड्याची एक जात. याची इमारत लहान असते. **लेंकुरपणाचे अन्वयें** – स्वतःकडे पोरपणा स्वीकारून. **हें कृत्य करणें** - रुमालानें हात बांधून पायावर डोकें ठेवणें. **सुरतसांभाळ्यापासून** – सुरत–शरीर. आम्हाला शरीर सांभाळता यावयास लागल्यापासून. भावार्थ लहानपणापासून. **असकत** – अशक्य. **इलाजम** – आरोप, दोष, ठपका. **कंबेसी** – कंपेशी, कमी करणें, चुकारपणा करणें. मल्हारराव म्हणतो, " आम्ही तुमचे चाकरच आहोंत, तेव्हां चाकरी बजावतांना आमच्या हातून कदाचित कुचराई झाल्याचा आरोप आमच्यावर तुम्हास करतां येईल. तसा केलात तरी चिंता नाहीं. कारण तुम्ही धनी आहां. परंतु हराखोरीचा, राज–द्रोहाचा, विश्वासघाताचा आरोप तुम्ही करतां तो मात्र आम्ही मान्य करणार नाहीं. कारण तों आमच्या शीलास कलंक होईल असें आम्हीं समजतो." **याचा विस्तार न करतां** – या प्रकरणीं जास्त चिकित्सा न करतां. **उभयतांपोरांस** - मालजी होळकर व महादजी शिंदे. **धुणीपाणी** - ऋणानुबंध.

पोशाख, कडीं, चौकडे, सिरपेंच व मोत्यांचे तुरे, तिघांस तीन हत्ती देऊन वाजत गाजत बिदा केला. नंतर गोहदवाल्याचे जाबसालांत सुभेदार दरम्यान पडून तीस लक्ष रुपये खंडणी ठरावून गोहदवाल्या जाटास पायांवर आणून घातलें.

(३२) तेथून कूच करून अलमपुरावर आले. अलमपूरचे मुक्कामीं सुभेदाराचे कानास ठणका लागला. तथापि राजकारण हेंच कीं फिरंग्याचें पारपत्य करावें. दुसरें कुंभेरीस खंडेराव होळकर कामास आले त्याचा मुबदला जाहला नाहीं तो करावा. या दोन गोष्टी अंतःकरणीं डांचत होत्या. त्या मनचे मनांत राहून ईश्वर नेमितानुसार शके १६८७ भाद्रपद वद्य ११ प्रहर दिवस चढतां पंचत्व पावले. दादासाहेब व महादजी शिंदे व मालराव बावा जवळ होते. आसन्न काळीं सुभेदारांनीं मालराव बावांचें हात दादासाहेब व महादजी शिंदे यांचे हातांत देऊन शेवटीं तुकोजी होळकर यांचेही हातांत मालराव बावा याचे हात दिले. ते समयीं तुकोजी होळकर यांनीं उभे राहून विनंती केली कीं, "मी चाकर मनुष्य, माझे हात बाबासाहेबांचे हातांत देऊन सर्वोपरी निर्वाहाची सोय करावी, तें न होतां हें काय?" तेव्हां सुभेदार बोलले कीं, "माझें नांव व श्रीमंतांची चाकरी तूंच करशील." असें बोलून समाप्ती झाली. नंतर उत्तरकार्य सुभेदारांचें त्याच ठिकाणीं जाहालें. दहावें दिवशीं पिंडास कावळा शिवेना. तेव्हां दादासाहेबांनीं मालराव बावाकडून पाणी सोडविलें कीं, जाटाचें पारपत्य मी करीन. पिंडास काकस्पर्श न होय, मग दादासाहेबांनीं जातीनें उदक सोडलें, तथापि काकस्पर्श जाहला नाहीं. मग महादजी शिंदे यांजकडून सोडविलें, तथापि स्पर्श न होय. शेवटीं आणखी तुकोजी यांजकडून सोडविलें. उदक सोडतांच स्पर्श जाहला. सर्वांस आश्चर्य जाहलें. नंतर त्रयोदशांत कर्म होऊन त्या ठिकाणीं छत्री बांधावयाचा मनसबा सिद्ध करून दतियेवाले वोडसे सेवडेवाले बरोबर होतेच, त्यांजपासून तीस हजार रुपयांचें गांव घेऊन कारकून ठेवून, छत्री बांधावयास प्रारंभ केला. दादासाहेब यांस बाजीराव, नाना, भाऊ गेले त्या समयीं इतकें दुःख वाटलें नाहीं (इतकें) सुभेदार मृत्यु पावल्यानें बहुतच श्रम वाटले, आतां वडील म्हणून विश्रांतीस जागा राहिली नाहीं!

---

(३१) बिदा करणें – निरोप देणें. **पायावर आणून घातलें** – शरण आणले.

(३२) मुबदला – सूड. **मुबदला जाहला नाहीं** – सूड घेतां आला नाहीं. **नेमित**–नेम, संकेत. **पंचत्व पावले**–मरण पावले. **विश्रांतीस** –आश्रय घेण्यास, कुशींत शिरण्यास.

अहिल्याबाई व तुकोजीराव होळकर

(३३) नंतर गंगाधर तात्या यांनीं दादासाहेबांपाशीं आज्ञा मागितली कीं, "फौजेस पांच वर्षें जाहलीं. हिशेब घेऊन घर पहावें हा इरादा. त्यांत सुभेदार कैलासवासी जाहले. याजमुळें कोणकोणास हिशेबाचा भरंवसा येत नाहीं. यास्तव एक वेळ इंदुरास जाऊन फौजांची समजावीस करून आज्ञा जाहलियावर हजर होऊं." ऐसा भावीं आज्ञा मागोन इंदुरास आले. लोकांची समजाविसाची तोडजोड लाविली. हिशेब पैका पदरीं घालून पुढील नालबंदी देऊन बिदा केलें. हुकूम येईल तत्क्षणीं यावें असी ताकीदहि केली. इंदूर मुक्कामीं पागा सरंजाम मात्र नजिक. सरंजामी इतलाखी आपले जागीं गेले. तो दाहावे महिन्यांत कांहीं सरदारांस आत्मकृत्य विकृतीमुळें मालराव होळकर याचा काळ जाहला. दोघी बायका सती गेल्या. बाईसाहेब शोकार्णवांत. तेव्हां मनुष्यमात्र शोकांत. अशा संधींत गंगाधर यशवंत यांचे बुद्धीस विपर्यास येऊन दादासाहेबांकडे प्रेष पाठविला कीं, ही दौलत बैतलमाल जाली. त्यांत आपण सुभेदारांचे चिरंजीव हे जघन्य. ते पक्षीं आपण दरमजल येऊन दौलत समेटावी, येथें शोकानें गालब होऊन मनुष्यमात्र गिरफदारींत आहे, आपलें

(३३) **घर पाहावें** – घरीं मुला माणसांत जावें. **हिशेबाचा भरंवसा नाहीं** – शिलेदारांना वाटते कीं मल्हारराव होळकर मेल्यामुळें आतां आपणास ठरल्याप्रमाणें पगाराची रक्कम मिळेल कीं नाहीं कोणास ठाऊक? **समजाविस** – समजुत. शिलेदारांना मिळावयाच्या पगारांतील एका हप्त्याचें नांव नालबंदी, नेबाद, अर्जबाब, समजाविस. हे ते हप्ते होत. **नालबंदी** – शिलेदार वगैरे लोकांस आगाऊ खर्चास पैसा देतात तो. **सरंजामी**– ज्या सरदारांस लष्करी नोकरीकरतां सरंजाम लाऊन दिलेला असतो तो सरंजामी सरदार. **इतलाखी** – पगार देऊन ठेवलेला सैनिक किंवा शिलेदार तो इतलाखी. अशा पगारी शिपायांची फौज ती इतलाखी फौज. **सरदारांस आत्मकृत्य विकृतिमुळें इ०** – या वाक्यांतील सरदारांस या शब्दाचा अर्थ व संगति लागत नाहीं. **आत्मकृत्य विकृतिमुळें**– आपणच केलेल्या उपद्व्यापामुळें फळ पावून. मालेराव होळकर हा वेडसर, व वृत्तीनें दुष्ट होता म्हणतात. अहिल्याबाईनें मोठ्या भक्तीनें ब्राह्मणास जोडे वगैरे दान करावे. त्यांत यानें विंचू घालून ठेवावे व ते डसल्यानंतर ब्राह्मण कळवळून ओरडू लागले म्हणजे यानें पोट धरधरून हसावे अशा त्याच्या संबंधीं आख्यायिका आहेत. **बैतलमाल** – बैतनमाल, बेवारशी. **जघन्य** – सर्वप्रसिद्ध. **सुभेदारांचे चिरंजीव** – पेशवे हे मल्हारावास वडलांसारखा मान देत असत. **समेटावी** – दाबावी, गिळंकृत करावी. **शोकानें गालब होणें** – शोकाखालीं खचून जाणें. गालब याचा अर्थ वरचढ होणें असा आहे.

येणें सत्वर जाहलें असतां समय आहे. या भावें प्रेष गेला.

(३४) हें वर्तमान शिवाजी गोपाळ व राजाराम रणसोड निसबस रावजी महादेव फडणीस पारनेरकर यांजला समजतांच बाईसाहेबांसी त्या दिवसांत बोलावें असें पुण्य कोणाचें नाहीं, परंतु हरकूबाई व उदाबाई वाघमारे सुभेदाराच्या कन्या (यांसी) उभयतांनीं गंगाधर तात्याचा बुद्धिवाद श्रवण करून "बाईसाहेबांपाशीं बोलोन या गोष्टीचा धरबंद आजपासून केला असतां सोईस पडेल. नाहीं तरी तुम्हांस घोड्याचे दाणे भरडावे लागतील आणि आम्हांस भीक मागावी लागेल." असें बोलले. तेव्हां उभयतां बायांनीं प्रश्न केले कीं, "धरबंदाची पैरवी कशी, हें आम्हांस सांगावें. त्याप्रमाणें आम्हीं बोलूं." तेव्हां यांनीं उत्तर केलें कीं, "शोकाचें गाठोडें बांधून एकीकडे ठेवून हिम्मत धरावी. सरंजामी, इतलाखी यांसी जासूद पाठवून जमा करावें. भोंसले, गायकवाड, दाभाडे यांजला सांडणीस्वारांसमागमें रवानग्या व्हाव्या कीं, "कैलासवासी सुभेदार यांनीं श्रीमंतांचे दौलतीचा पाया खोदून, वीट आपले हातें टाकून, इमारत उभी केली. त्यास या प्रसंगीं आम्हांवरि ईश्वरी गजब, ते पक्षीं दौलत जगवून आम्हांस हमराई करून सेवा-चाकरी घ्यावी तें एकीकडे राहोन, दौलतीवियर्यी पापबुद्धि धरली आहे. त्यास आमचें जसें असेल तसें आम्ही भोगूं. परंतु आज आम्हावरि, उद्यां तुम्हांवरि हीच गोष्ट आहे, याचा विचार करून फौज मदतीस पाठवावी." अशीं पत्रें तमाम लहान मोठे सरदारांस पाठवून गादीची मालकी, उत्तमपक्ष नथ्याबा फणसे यांसी अधिकार खरा परंतु लेंकरूं; बांसडा खांद्यावरी टाकील असा पाहिजे, यास्तव सुभेदार यांनीं अवसान-काळीं मालरावबावाचे हात तुकोजी होळकर याचे हातांत दिला; जाटाचे पारपत्याविषयीं तुकोजी होळकरांनीं पाणी सोडतांच पिंडास काकस्पर्श जाहला, ते पक्षीं त्यांजला आणोन गादीवर बसवावें म्हणजे कोणतेही अवघड पडणार नाहीं. या गोष्टी आज

---

(३३) **गिरफदारी** – चिन्ता, काळजी. **समय** – संधी. **प्रेष** – पत्र.

(३४) **धरबंद** – धरबंद, उपाय, प्रतिकाराची योजना. **पैरवी** – योजना, उपक्रम. **रवानगी** – पत्राची रवानगी. **गजब** – गहजब. **हमराइ करून** – बरोबर घेऊन, सांगातीं घेऊन. **बांसडा** – भाला. फौज संभाळील व स्वाऱ्या शिकाऱ्या करील असाच प्रौढ अनुभवी शूर माणूस होळकराच्या सरदारीवर पाहिजे असा भावार्थ. **या गोष्टी आज विषतुल्य**– तुकोजी होळकराचे व अहिल्याबाईचे बिलकूल पटत नसे. यामुळें तुकोजीलाच आणून सरदारी आपणाहून त्याच्यावर सोपविणें, हे विषासारखे कडू वाटावयाचेंच.

विषतुल्य (वाटतील) परंतु परिणामी अमृतोपम होतील. या समयीं बुद्धीचें दार्ढ्य करून तुकोजी होळकरांस पाचारण (करावें) व पत्राच्या रवानग्या आज जाहल्या पाहिजेत. उद्यां म्हणाल, ' कोणी मेल्यानें आम्हांस सुचविलें नाहीं. ' यास्तव विनंती केली आहे. " तेव्हां तेच समयीं हरकूबाई व उदाबाई दोघी बाईसाहेबांकडे जाऊन सांगितल्या अन्वयें, स्पष्ट बोलिल्या, " ब्राह्मण हरामखोरीस आला आहे. सावध झाल्यातच प्रांत. न जाहाल्यास तुम्हां आम्हांस पुढें दाणे भरडावे लागतील. सावध व्हावें ही नेकसल्ला." तेव्हां बाईसाहेब बोलली, ' उभयतांस बोलावून आणावें.' त्यावरून शिऊबा बाजी व राजाराम आत्याजी बोलावून नेऊन हरकूबाई उदाबाई बोलिली त्या गोष्टीची ओळख न देतां, ग्लानी गिरफदारी कांहीं एक न दाखवितां, धनीपणाचे जरबेनें भाषणें केलीं. " मेल्या ब्राह्मणानें हरामखोरी आरंभली आहे. परंतु मी बायको असें मानूं नका. खांद्यावर बांसडा टाकून उभी राहीन, तेव्हां श्रीमंताचे दौलतीस अवघड पडेल ! आमचे वडिलानीं भांडभवई करून दौलत मिळवली नाहीं; तर तरवारीचे अनुमानें शरीर खर्च घातलें आहे. आम्ही सिलेदार. वडिलांचे चाकरीप्रमाणें चाकरी घेतल्यास हजर आहोंत. धुणीपाणी सरली असल्यास मोंगलाईची चाकरी करूं. अथवा फिरंग्याची करूं. अगर पाहिजे तें करूं. (पण) ब्राह्मण म्हणतील दौलतीचा अभिलाष करूं तर हें होणार नाहीं. " हें बोलणें चौघांनीं ऐकावें असे तऱ्हेनें बोलून खुणा कानांत सांगितल्या कीं, भोंसले, गायकवाड, दामाडे, वगैरे मराठेमंडळ यांजला गुप्त पत्रें लिहून सांडणीस्वार बिदा करावे व सांडणीची डाका बसवून तुकोजी

---

(३४) बुद्धीचे दार्ढ्य करून – मनाचा दृढनिश्चय करून. **ब्राह्मण** – गंगोबा तात्या चन्द्रचूड दिवाण. **प्रान्त** – शेवट, सुटका, सोडवणूक. **नेक सल्ला** – हितकारक विचार. **ग्लानी गिरफदारी** – शोक, चिन्ता इत्यादि. **भांडभवई** – भांडभवई. नाचेपणा, खुषमस्करीपणा. **भांड** – पशुपक्षादिकांच्या आवाजाची नक्कल करणारी, खुषमस्करी करणारी एक जात. **भवई** – नटाचा व नर्तकाचा धंदा करणारी गुजराथेंतील एक जात. **तरवारीचे अनुमानें** – तरवारीच्या पराक्रमानें. **शरीर खर्च घातलें आहे** – जिवाकडे न पाहतां कष्ट, मेहनत केली आहे. **धुणीपाणी** – ऋणानुबंध. **ब्राह्मण म्हणतील** – पेशवे म्हणतील. **डाक बसाविणें** – पूर्वी हल्लीं सारखी टपालाची व्यवस्था नव्हती. पेशवे सरकार, सरदार लोक किंवा सावकार लोक आपआपले जासूदजथे ठेवून पत्रें नेण्याआणण्याची स्वतःपुरती व्यवस्था करीत. मधल्या निरनिराळ्या टप्प्यावर घोडी किंवा जासूद ठेवून पत्रें जलदीनें नियोजित स्थळीं पोहचण्याची जी रिलेसारखी व्यवस्था केलेली असते तिला डाक बसवणें म्हणतात.

होळकर यांस सहावे दिवशी मजपाशीं आणावें. हीं दोन्हीं कामें आज करा. मंत्रभेद न होण्याविशीं फार जपावें. इतकीं अक्षरें श्रवण करून उभयतां बाहेर आले. अंतःकरणीं (कीं) पेरल्या पदार्थास फळें सत्वर आलीं. सबब हमराई बदरून सरदारांस कागदाच्या रवानग्या स्वाराबरोबर होऊन, सांडेच्या डाकेचा बेत करून उदेपुरास तुकोजी होळकर यांस पत्रें गेलीं कीं, फौज जेथील तेथें मुस्तकीम ठेवून तुम्हीं जेवीत असल्यास पाणी प्यावयास आम्हांपाशीं यावें.

(३५) अशा गुप्त रवानग्या करून स्वस्थ बसले. ईश्वरास कर्तव्य. तुकोजी होळकर सहावे रोजीं तृतीय प्रहरीं येऊन दाखल जहाले. तेंच क्षणीं अभ्यंगस्नान घालून मुहूर्त अथवा कोणास विचारणें कांहीं एक न करितां, वस्त्रें देऊन गारडा खेंडीस डेरे उभे करून तुकोजी होळकर यांस डेरेदाखल केले. त्याच दिवशीं हजार स्वार हुजरात व पंधराशें सरंजामापैकीं व पांचशें बाणांची कैची व सातशें जंबुऱ्याचे उंट इतकी जमियत प्रहर रात्रीचे आंत दाखल केली. तों भोंसल्याकडील फौज हुसंगाबाद रेवा दक्षण तीरीं दाखल होऊन छावणी केली होती तेथून सांडणीस्वार आला. गायकवाडकडील वीस हजार फौज आली. मोहनचे राज्याचे काकडावर आली. वरकड सरदारांचे जाब आले कीं, "मल्हारजी होळकराचा उपकार नाहीं असे कोण आहे ? प्रसंगास आपले जवळच समजावें." अशीं हमराईचीं उत्तरें माधवराव साहेब श्रीमंत याजलाहि पत्रें गेलीं होतीं त्यांचीं उत्तरें आलीं कीं "तुमचें दौलतीविषयीं जो पापबुद्धि ठेवील त्याचें पारपत्य बेलाशक करावें. तुम्हांकडील मुखत्यार दोघे हुजूर पाठवावें." याप्रमाणें उत्तरें आलीं. तेव्हां दाभाडे गायकवाड यांचे खर्चाची सरबरा करून नाक्यावर सोय केली. तों गंगाधर यशवंत व दादासाहेब एकसंधान करून दादासाहेब पन्नास हजार फौजेनिशीं उज्जनीस आले. अंकपातावर येऊन मुक्काम केला. हें वर्तमान तुकोजी होळकर यांस समजतांच मातोश्री बाईसाहेबांचे पायांवर डोय ठेवून, रातोरात दत्ताचे आखाड्यावर पडले. तों दुसरे दिवशीं दादासाहेबांकडील

---

(३४) **मंत्रभेद** - मसलतीची परिस्फुटता. **बदरून** – ही मोडी वाचनाची चूक दिसते. 'बदस्तुर' असा मूळ शब्द असावा. 'बदस्तुर' याचा अर्थ दस्तुराप्रमाणें किंवा नियमाप्रमाणें, चालत आलेल्या वहिवाटीप्रमाणें. **कागदाचा**–पत्राच्या. **मुस्तकीम**–जय्यत, तयार, कायम.

(३५) **हमराईची** – स्नेहाची, अगत्यवादाची. **सरबरा** – सोय, तरतूद. **नाक्यावर सोय केली** – आघाडीस तोंडावर ठेवले. **अंकपात** – या नांवाचा एक घाट उज्जनीस आहे. **दत्ताचा आखाडा** – या नांवाचेंहि स्थळ उज्जनींत आहे.

फौजेची बिनी क्षिप्रेंत आली. हें तुकोजी होळकर यांनीं पाहून सांडणीस्वार पाठविला कीं, " क्षिप्रा उतरला असतां तुमची आमची तरवार चालेल. याचा विचार करून पाऊल टाकणें." मग बिनीवाल्यांनीं श्रीमंताकडे सांडणीस्वार पाठवून आपण तसेंच उभे राहिले. दादासाहेबांस विचार पडला कीं, दुसऱ्याचें घर घेऊं जातां (तो) प्राण जाय तोंपर्यंत कस्त करण्यास चुकणार नाहीं. आपले मालक देशीं, त्यांचेंहि संमत नाहीं. यांचे घरावर उपप्लव, तेव्हां त्यांनीं उत्तें पत्रें लिहून उत्तें आणलींच असतील. आशादुराशा धरून आगळिक केल्यास साधल्यास लौकिक नाहीं, स्वार्थ मात्र न साधल्यास अर्थ नाहीं. व मल्हारजी होळकर यांचा ऋणानुबंधाचा अवसाफ होऊन खुद्दवक्तावर मनांत पाप आणून बदनक्षा केला हीं अक्षेरें कपाळीं लागून पतहि रहाणार नाहीं. त्यांस पोक्त विचार करून तुकोजी होळकर यांजकडेस कारकून पाठविला कीं, " मालरावबावा वारले यास्तव आम्ही मातंगपोशीस येत असतां तुमचे बुद्धीस विपर्यास येऊन वांकडी गोष्ट सांगावयाचें कारण काय ? " तेव्हां यांनीं उत्तर केलें कीं, " मातंगपोशीविशीं कृपा केली ते पक्षीं फौजेचें कारण काय ? आपण पालखींत बसून एकटें यावें. ही फौज घरदार दौलत आपले वेगळे काय आहे ? " असें उत्तर कारकुनाबरोबर पाठविलें. तेव्हां होळकराचे मनांत संशय आला हा दूर व्हावा याकरितां तेच समयीं पालखींत बसून दहा पांच सरदार शागीर्दपेशा इतक्यानिशीं येऊन तुकोजी होळकर याजपाशीं दाखल जहाले. तुकोजी होळकर पायउतारा पुढें जाऊन पायांवर डोई ठेविली. उभतांही श्रमी जहाले. तसेंच कूच करून इंदुरास आले. ते स्वार शागीर्दपेशा जिकडील तिकडे लावून

---

(३५) **फौजेची बिनी** – आघाडीची टोळी. **कस्त** – श्रम, कष्ट, मेहनत. **उपप्लव** – संकट, अरिष्ट. **त्यांनीं** – यांनीं, म्ह. होळकरांनीं. **आशादुराशा** – लोभ. **आगळिक केल्यास साधल्यास लौकिक नाहीं, स्वार्थ मात्र न साधल्यास अर्थ नाहीं** – आम्ही आगळिक करून चढाई केली, आणि ती यशस्वी झाली तरी लौकिक होणार नाहीं, म्हणजे लोक बरे केले जाणार नाहींत. मात्र स्वार्थ साधण्याकरितां ही गोष्ट केली असा दोष देतील. बरें, आमचें काम यशस्वी न झालें तर लौकिक मिळणार नाहींच, पण अर्थ म्हणजे पैसाहि मिळण्याची आशा नाहीं. **अवसाफ** – महाराष्ट्र शब्दकोशांत या शब्दाचा अर्थ स्तुति, प्रशंसा, देणग्या असा दिला आहे येथें तो जुळत नाहीं. येथें 'समाप्त' असा अर्थ दिसतो. **खुद्द वख्तावर** – ऐन प्रसंगीं. **बदनक्षा** – दुर्लौकिक. **मातंगपोशी** – मातमपोशी, दुखवटा. **पाय उतारा** – चालत; आदर दाखविण्याकरितां. **श्रमी** – दुःखी, कष्टी, दोघांनाहि मालेरावाच्या संबंधीं गोष्टी करून हळहळ व्यक्त केली. **शागर्द** – शिष्या, नोकर.

दोघे शागीर्द व स्नानसंध्येचा सरंजामसुद्धां बाईसाहेबांचे बंगल्यापाशीं डेरा देऊन राहिले. ते महिनाभर होते. पांच चार बैठकींत सेव्य सेवकत्व प्रकरणीं बोलणीं बाईसाहेबांपाशीं जहालीं. अहिल्याबाई बायका माणूस खरीच, परंतु शूद्र होत्साती स्नानसंध्या, शिष्टसांप्रदाय ब्राह्मणासारखी. ज्ञातिसंबंध नाहीं. दुसरें, मल्हारजी होळकर संपूर्ण पृथ्वीस काळ; (पण) त्याचा विश्वास बाईसाहेबांचे ठिकाणीं. सांगेल तितकें पाणी पियावयाचें हा ऋणानुबंध. खंडेराव होळकर सुभेदारांचे चिरंजीव कुंभेरीस कामास आले ते समयीं बाईसाहेबांचा आग्रह सहगमनाचा विशेष पडला. तेव्हां मल्हारजी होळकर सुभेदार यांनीं पोटांत डोकी घातली, बोलले कीं, " बाई, मला उन्हाळा करित्येस कीं काय ? तूं माझे पाठीवर आहेस तर अहल्या मेली, खंडू आहे, हा मला भरंवसा." तेव्हां सहगमन महकूब जहालें, नीट जहालें. कारण सुभेदार यांनीं पैसा उत्पन्न करून मागें टाकावा त्याची व्यवस्था व चार माणसांचे संरक्षण बाईनें करावें असा ओघ चालत आला. येणें करून बाईसाहेबांचें तेजापुढें दादासाहेबांचें वर्चस्व कांहीं एक दिसण्यांत आलें नाहीं. महिनाभर राहून तुकोजी होळकर यांस वस्त्रें देऊन आपले फौजेंत उज्जनीस जाऊन सत्वासचे घाटें उतरून देशीं गेले.

(३६) मग भोसल्याकडील व गायकवाडाकडील फौज आली होती त्यांतील खांसे खांसे सरदार नांवाची माणसें हजार पंध्राशें हरदु तर्फेची बोलावून मेजवानी केली. बनातीचे तागे फाडून बसावयास घालून, एक ताट, पांच पांच वाटया ठेऊन मेजवानी केली. तुम्ही उपकार केल्यानें आमचा सर्वोपरी बचाव झाला. या भावीं मोठेपण त्यांस देऊन मनुष्य पाहून कंठी, चौकडे, शिरपेंच, वस्त्रें जशी ज्याची योग्यता तशी त्यास देऊन गौरव केला. घरोब्याचे वृद्धीचें बोलणें करून बिदा केले. राजे-रजवाडे यांनीं गृहकृत्याचे समारोपाचें वर्चस्व श्रवण करून बायको

(३५) **ज्ञाति संबंध नाहीं** – ज्ञाति म्हणजे जात. होळकराची जात धनगराची. असे असून अहल्याबाईचें वागणें सर्व ब्राह्मणासारखें. **सहगमन** – सती जाणें. **पोटांत डोकी घातली** – लहान मूल जसें आईच्या कमरेला मिठी मारते; व तिच्या अंगावर डोकें टेकतें, तसे मल्हारराव होळकरानें केलें. **उन्हाळा करणें** – सर्वनाश करणें. **महकुब** – तहकुब. **नीट जहाले** – झालें तें ठीकच झालें. **ओघ** – पहिल्यापासून व्यवस्था, क्रम.

(३६) **हरदुतर्फेची** – दोहोबाजूकडील. **गृहकृत्याचे समारोपाचे** – गृहकृत्याच्या समारोपाचे; घरांतील खेकटीं व्यवस्थित निकालांत काढण्याचें अहिल्याबाईचें वर्चस्व म्हणजे कौशल्य. वजन, ऐकून किंवा पाहून राजेरजवाडे यांनीं तिचा स्तुतिवाद केला.

होत्साती दौलतीचा बंदोबस्त केला. जरबेचा जलूष पाहून घरोब्याची वृद्धि असावी यास्तव टिका वस्त्रें जोतपूर, जयपूर, उदेपूर, बुंदी अदिकरून सर्वांनीं पाठविलीं त्यांचाही गौरव करून बिदा केले.

(३७) या राजकारणापासून गंगाधर यशवंत राजकारणांतून निघून (त्याचे) आचरणानुसार स्वरूपास हीनता आली. देवदर्शनास जातों म्हणून आज्ञा घेऊन तेहि देशीं आले. बाईसाहेबांनीं चाकर नाहींत अशा भावीं बिदा केले नाहींत. शुष्क विचार दौलतीचे देशीं श्रीमंतांशीं बोलण्याविषवीं आज्ञा करून रवानगी केली. दादासाहेब ग्वाल्हेर प्रांतीं होते. तेथें सुभेदारांचा काळ झाल्यावर माधवरावसाहेबांचे व दादासाहेबांचे मनओळखीस प्रारंभ झाला. हें राजकारण झालियावर दादासाहेब देशीं गेले. स्वारीचें कर्ज व फौजेचे समजाविशीबाबद ऐवज मागावयाचा तगादा लाविला. माधवरावसाहेब यांनीं उत्तर केलें कीं, " मागें आपण स्वारी करून घरीं कर्ज आणित होतां तेव्हां कैलासवासी नाना, भाऊ आपल्यास वडील होते ते सांभाळीत होते. आतां आम्हांस दौलतीस वडील आपण. सावकाराचें देणें व लोकांचें देणें ह्याचा धरबंध आपल्यास कर्तव्य तसा करावा. शिल्लक-सांखळी असल्यास आमचे स्वाधीन केली तरी सांभाळून ठेवूं." या बोलण्यावर तराह खाऊन

(३६) **जलुष** – महात्म्य, प्रभाव. **घरोब्याची** – अहिल्याबाईशीं घरोब्याची. **टिका वस्त्रें**– रजपुत राजांत राज्यारोहणाचें वेळीं टीका म्हणजे तिलक लावून वस्त्रें सन्मानार्थ देण्याची प्रथा असते. जोधपूर, जयपूरकर संस्थानिक यांनीं आपल्याला होळकरांचा पाठिंबा असणें आवश्यक आहे, असें जाणून त्यांनीं त्यांस वस्त्रें पाठविलीं.

(३७) **या राजकारणापासून** – होळकराची जहागिर गिळंकृत करण्याच्या कारस्थानापासून. **राजकारणांतून निघून** – गंगाधर यशवन्ताला अहिल्याबाई दिवाण म्हणून सल्ला विचारीनाशी झाली. **स्वरूपास हीनता आली** – लौकिकास कमीपणा आला. **चाकर नाहींत अशा भावीं** – अहिल्याबाईनें राज्यकारभारांत गंगाधर यशवन्ताचा सल्ला घेण्याचें अजिबात सोडले होते तरी त्याला तसें स्पष्ट सांगितलें नाहीं. कारण तो पेशव्यांच्या संमतीनें नेमलेला दिवाण होता. म्हणून त्याला काढून टाकणें शक्य नव्हते. तो जेव्हां पुण्यास जाण्याकरतां अहिल्याबाईची परवानगी मागूं लागला तेव्हां तिनेंहि त्याला शुष्क म्हणजे गैर महत्त्वाच्या कांहीं गोष्टींचा खुलासा पेशव्याकडून करून घेण्याचें क्षुद्र काम सांगितलें. **दौलतीचे** – होळकराच्या संस्थानासंबंधीं. **मनओळख** – खरी अन्तरंगाची ओळख, वैर. **धरबंद** – आवरासावर, निर्वाह, व्यवस्था. **शिल्लक सांखळी** – शिल्लक. **तराह** – तऱ्हा. **तऱ्हा खाणें** – चिथरणें.

दादासाहेब कूच करून गंगापूर नजिक नाशिक त्रिंबक येथें मुक्काम घालून फौजबंदी आरंभिली. इतक्यांत तुकोजी होळकर वस्त्रें घ्यावयाकरितां पुण्यास आले. श्रीमंतांनीं वस्त्रें देऊन नजरेचा ऐवज गंगाधर तात्या यांचे विद्यमानें ठरला तो त्यांनीं देऊन तुकोजी होळकर व गंगाधरपंत तात्या वस्त्रें घेऊन वाफगांवास आले. तेथें आल्यावर माधवरावसाहेबांचा हुजऱ्या येऊन तुकोजी होळकर यांस सडे बोलावून नेलें. कारण एकांती माधवरावसाहेब व तुकोजी होळकर बसून रायांनीं तुकोजी बावांस प्रश्न केला, "तुमचे कारभारी गंगाधर यशवंत त्यांचा आचार तुमचेहि अनुभवी आहेच. पुढें तुम्हांस चांदवडास जाणें. गंगापुरावर दादासाहेब (आहेत) तेव्हां रंगांत रंग मिळावयाचा इरादा किंवा सरकार लक्षानुसार चालावयाचें, यांतील मनोधर्म वास्तविक बोलावें." तेव्हां सुभेदारांनीं उत्तर केलें कीं, "आमची क्रिया कैलासवासी बाजीरावसाहेब व कैलासवासी सुभेदार या उभयतांचें वचनप्रमाण झालें आहे. तेंच आम्हीं अनादी जाणतों. जो त्यांचे गादीवर तो आमचा मार्तंड. दुसऱ्याशीं आम्हांस कारण नाहीं. हें खचित स्वामींनीं मनांत ठेवावें. बाकी आमचा ब्राह्मणाशीं मेळ पडतच नाहीं. बाईसाहेबापर्यंत जाऊं तावत् ब्राह्मणाशीं आम्हास बिघडतां येत नाहीं. मागाहून आपली आज्ञा लिहिल्यात आली होती त्याप्रमाणें कोणी बोलावयास आपल्याकडे येईल. आम्ही फौजसुद्धां चांदवडास जाऊं. तेथें दादासाहेबांनीं आमचा मेळ घातला तर घालोत. कारण कारभाऱ्यांचा त्यांचा मेळ. तेव्हां ही गोष्ट अर्थात् प्राप्त होईल. परंतु सेवकाचें अंतःकरण स्वामीचरणींचेंच भृंग मोजावें." अशा भावीं माधवरावसाहेबांची दीलजमाई करून तुकोजीबावा गंगाधर तात्यांस घेऊन वाफगांवास जाऊन फौजेसुद्धां कूच करून चांदवडास आले. हें वर्तमान दादासाहेबांस समजतांच तेही चांदवडास आले. चांदवड मुक्कामीं दादासाहेब व सुभेदार व गंगोबा तात्या यांच्या बैठकी होऊन बोलणीं जाहलीं. यांतील खुषबो श्रीमंत माधवरावसाहेब (यांच्या) समजण्यांत चौपट आली. तेव्हां

---

(३७) **रायांनीं** – माधवरावांनीं, रावांनीं. **रंगांत रंग मिळविणें** – सामील होणें. **वास्तविक** – खरें असेल तें. **मार्तंड** – खंडोबा, होळकरांचें कुलदैवत. **ब्राह्मणाशीं** – गंगोबा तात्याशीं. **सेवकाचें अंतःकरण स्वामी चरणींचेंच भृंग मोजावें** – आमचें अन्तःकरण मनःपूवक तुमचेकडेच राहील असे खचित समजावें. जसे भुंगे हे कमळाच्या ठिकाणीं लीन होतात तशी माझी निष्ठा तुमच्याच पायाशीं राहील. **मोजावे** – गणावे, समजावे. **खुषबो** – सुगंध. येथें अर्थ वाटाघाटींत घाटलेल्या कारस्थानाचा वास. **चौपट** – माधवरावाविरुद्ध चाललेल्या कारस्थानांत होळकराचें अंग थोडें असतां पेशव्याच्या बातमीदारांनीं तें भलतेच अधीक म्ह. चौपट असल्यासारखें पेशव्यास समजाविले.

कल्पना सिद्ध झाली कीं, तुकोजी होळकर आम्हाशीं बोलणें दाक्षिण्यार्थ बोललें. येथील (बोलणें) येथेंच ठेऊन कारभाऱ्याचें नादीं लागून रंगांत रंग मिळविला, किंवा बोलण्यावर शाबूत आहेत, यांतील परीक्षा पहावयास विश्वासुक शागीर्द घोड्याच्या डाकेनें चांदवडास रवाना केला. त्यास आज्ञा केली· कीं, 'तूं भिक्षुकीच्या वेशानें जाऊन पारनेरकर रावजी महादेव यांचे घरीं उतरून तेथें जो मुखत्यार असेल त्यांसी एकांती भेटून, ही चिठ्ठी तुकोजी होळकर यांस प्रविष्ट करून, उत्तर घेऊन येणें' अशी आज्ञा होऊन शागीर्दाची रवानगी केली. तो चांदवडास पारनेरकराचे घरीं उतरून तेथें मुनीम महीपतराव गिरमाजी होते त्यांस वेगळें गांठून श्रीमंतांचें हातची चिठ्ठी (त्यास) दिल्ही आणि बोलला कीं, "या समयीं ही चिठ्ठी सुभेदारास दाखवून उत्तर मजला प्राप्त होऊन सूर्योदयात्प्राक् माझें निघणें येथून होईल असें करावें. येथील व्यवहार पहातां गंगाधर तात्याच्या नकळत सुभेदाराशीं वेगळे वाटेनें कोणी भाषण करील ऐसें प्राप्त नाहीं. तथापि ही अडचण तशीच, यास्तव सुभेदार भोजनास बसले, सहा घटिका रात्र झाली होती, त्यासमयीं जाऊन हुजरे वगैरे अवध्यांस दूर करून चिठी वाचून दाखविली. त्यांत सार हेंच कीं, "तुम्ही कारभाऱ्यांचे नादीं लागून रंगात रंग मिळविला. आम्हांस सल्ला काय सांगतां ?" तेव्हां सुभेदारांनीं श्रवण करून उत्तर द्यावयास सांगितलें कीं, "जे समक्ष विनंती केली तीच निःसीम मोजून पत्र पावतांच नाशिका-

(३७) **दाक्षिण्यार्थ** – मुख–शोभेकरतां, आदर दर्शविण्यापुरते. **घोड्याची डाक** – जुन्या ऐतिहासिक काळीं राजे लोक कोठून महत्वाची बातमी आणावयाची असता तेथपर्यंत जासूदांचे, घोड्यांचे किंवा सांडणीचे टप्पे ठेवीत. म्हणजे मूळ ठिकाणापासून बातमी विलंब न होता लौकर येऊन पोहोचे. येथें अर्थ असा. पुणें ते चांदवडापर्यंत पेशव्यानें दहा दहा पंधरा पंधरा मैलावर घोडीं सज्ज ठेवलीं. पेशव्याचा निरोप घेऊन निघालेला खास शागीर्द वाटेंत घोडीं तयार असल्यामुळें एकसारखा दौडत अगदीं थोड्या वेळांत चांदवडाला जाऊन पोचला. **मुखत्यार** – सर्वाधिकारी, मुख्याधिकारी. **सूर्योदयात्प्राक्**– सूर्योदयाच्या आंत. **प्राप्त** – हिम्मत. दिवाण गंगाधर तात्याच्या अपरोक्ष तुकोजी होळकराशीं खलबत करण्याची कोणाची हिंमत नव्हती इतका गंगाधरपंताचा कडक कारभार व कैद होती. **तथापि ही अडचण तशीच** – पत्र खुद्द पेशव्याचें तेव्हां तें त्यानें सांगितल्याप्रमाणें काय वाटेल ते करून सुभेदारास पोचते करणें आवश्यकच होते. **आम्हास सल्ला काय सांगता** – आतां आम्ही काय करावे असें तुमचें म्हणणें ? **जे** – जी. **निस्सीम मोजून** – पूर्ण खरी अशी मानून. म्हणजे जो संकेत केला होता, तोच कायम

वर मुक्काम येऊन करावा. आम्ही व साहेब कूच करून घोडपेच्या सुमारें जाऊं लागलों म्हणजे आपण बेलाशक कूच करून आम्हांवर यावें. आपले फौजेचा धुळोरा कोशा अदकोशाच्या आंत पाहिला म्हणजे घोडे घालून (दादासाहबांच्या फौजेस) लुटून घेतों. यांत तथा नाहीं. " याप्रमाणें उत्तर देऊन शागीर्द बिदा केला. तो ठिकाणसीर पोहोंचतांच श्रीमंत बमय फौज नाशिकास आले. तों दादासाहेब दबाव पडून, घोडप जवळ करावी असा विचार करून, दादासाहेब व तुकोजी होळकर कूच करून चालले. घोडप तीन कोश राहिली. त्या संधीस माधवरावसाहेबांचीहि स्वारी दाखल जाली, स्वारांचा धुळोरा पाहून तुकोजी होळकर सुभेदार हत्तीवर होते ते घोड्यावर बसून, आपले फौजेशीं पूर्वसंकेत होतांच, त्याप्रमाणें घोडे घालून दादासाहेबांस लुटून घेतलें. तो श्रीमंत येऊनही दाखल जाहलें. श्रीमंत माधवरावसाहेब यांचा व तुकोजी होळकर यांचा रामराम जाला. माधवरावसाहेबांची मर्जी बहुत प्रसन्न जाली. त्या संधींत दादासाहेब सवड फावून किल्ल्यावर गेले. ते समयीं सुभेदारांनीं विनंती केली, " घोडे सोडून पायउतारा होऊन किल्ल्यावर जाऊन धरून आणितों ! हुकूम जाला पाहिजे. " श्रीमंतांनीं आज्ञा केली, " आतां कोठें जातात ? धरून घेऊं. हकनाक माणसें जाया करूं नये. "

(३८) तों इकडे गंगाधरपंत तात्या यांजला आपलें आचरण स्मरून, त्यांनीं काषाय वस्त्रें परिधान करून, दोघे खिजमतगार मात्र बरोबर घेऊन, अणकाईचे किल्ल्यास गेले. किल्ल्याचे दरवाज्याशीं जातांच दोघे खिजमतगार बरोबर होते त्यांनीं दरवाणकरास सांगितलें कीं, " हा गंगाधरपंत तात्या, सरकारचा हरामखोर, तुमचे जिमेस आहे ! " तेव्हां तात्यांनीं सरोष खिजमतगाराकडे पाहिलें. तेव्हां

---

(३७) आहे असें समजून. **साहेब** – दादासाहेब पेशवे. **धुळोरा** – धुराळा. **तथा** – बाकी, कुचराई. **ठिकाणसीर** – नेमलेल्या जागीं. **बमय फौज** – फौजेसुद्धां. **दबाव** – भीति. **घोडप** – घोडपचा किल्ला. **हकनाक** – नाहक, विनाकारण.

(३८) **याजला आपलें आचरण स्मरून** – याला आपल्या दुराचरणाचा पश्चात्ताप झाला व आतां आपलें पारिपत्य मोठेंच होणार असे समजून ते टाळण्यासाठीं त्यानें संन्यास घेतला. संन्याशाला कोणी शिक्षा करीत नाहीं ही समजूत. **त्यांनीं** – ते. **काषाय** – भगवी, काविनें रंगवलेली. **आणकाई** – हा किल्ला खानदेशांत आहे. **दरवाणकरास** – दरवाजकरास असे पाहिजे. मोडी वाचनाची चूक. मोडींत 'न' व 'ज' ही अक्षरें सारखी दिसतात. **सरकारचा हरामखोर** – सरकारचा गुन्हेगार, राजद्रोही. **जिमेस** – ताब्यांत. मूळ शब्द जिम्मा.

हुजरे यांनीं उत्तर केलें कीं, " रागें रागें काय पाहातोस ? तुझे मागें आठ महिने खराब आहों. श्रीमंतांनीं आम्हांस उभयतांस पाठविलें होतें, रोजची अकबार पोंचवीत होतों. आज उघडे होऊन तुजला किल्लेदाराचे जिमेस करून हुजूर जातों. पुढें तुमचे प्रालब्धी असेल तें होईल. " असें निष्ठुर भाषण करून उभयतांही श्रीमंत माधवरावसाहेबांजवळ जाऊन मुजरा केला. तों लष्करांत मशारनिल्हे पळाले म्हणून हाकाहाक पडली. हुजरे आल्यावर त्यांनीं सांगितलें कीं, अणकाईस किल्लेदाराचें जिमेस करून आलों. तेसमयीं सांडणीस्वार पाठवून, घेऊन येऊन पादभूषणादिक अलंकार देऊन पुण्यास प्रविष्ट केले.

(३९) श्रीमंत व होळकर यांनीं किल्ल्याखालीं मुक्काम केला. दुसरे दिवशीं किल्लेदारास ताकीद गेली कीं, " साहेब पोहोंचाऊन देणें." माधवरावसाहेब यांचे जरबेचा जलूष मोठा. दादासाहेबांनीं किल्लेदारास भुलथापी बहुत दिल्ह्या. आशा दुराशाही दाखविली. परंतु माधवरावसाहेबांचे जरबेपुढें कांहीं एक बनून न येतां दादासाहेबांस स्वाधीन करतांच बनलें. हस्तगत झाल्यावर तुकोजी होळकर सुभेदार यास पुनः वस्त्रें-अलंकार देऊन इंदुरास रवाना केले.

(४०) इंदुरीं आल्यावर बाईसाहेब यांची भेट घेऊन (नंतर) कारभारी कोणीं नेमून द्यावायास्तव पूर्वीं आज्ञाही आली होती (कीं) दोघे गृहस्थ पाठवावे. त्याजवरून खाजगीकडील कारकून नारो गणेश, (व) दौलतीपैकीं शिवाजी गोपाळ निजबत, रावजी महादेव फडणीस या उभयतांची रवानगी पुण्यास केली. उभयतां पुण्यास दाखल होऊन श्रीमंतांची भेट घेऊन ज्या कारणास्तव बोलविलें होतें त्या विषयाचें प्रत्यक्ष निदर्शनास आलें. तेव्हां बाईसाहेबांचे व तुकोजीबावा सुभेदार यांचे स्तुतिस्तोत्र श्रीमंतांनीं स्वमुखें बहुत केलें. मग उभयतांनीं श्रीमंती आज्ञापित भाव कारभाऱ्या प्रकरणीं विनंती केली कीं, " बाईसाहेबांचे सुभेदाराचें सांगणें कीं

---

(३८) **तुझे मागें आठ महिने खराब आहों** – गेले आठ महिने तुझ्या सारखे पाळतीवर अष्टौप्रहर राहात आलो आहो व त्यामुळें फार त्रास सोसला आहे. **अकबार** – अखबार, बातमी. **उघडे होऊन** – प्रकट होऊन. **हाकाहाक** – बोंबाबोंब. **पादभूषणादिक अलंकार** – बेड्या.

(३९) **जरबेचा जलुष** – जरब, कदर, दबाव. **करतांच बनले** – याचा अर्थ लागत नाहीं. मूळांत काय अक्षरें असावीत त्याचा तर्क करता येत नाहीं.

(४०) **द्यावायास्तव** – द्यावयास्तव. **निजबत** – तर्फेचा, कडील. **श्रीमन्ती आज्ञापित** – अहिल्याबाईनें सांगितल्याप्रमाणें.

आम्हांस कारभारी नेमून द्यावा." तेव्हां श्रीमंतांनीं आज्ञा केली, " येथून कोणी नेमून दिल्यास तुमचा व त्यांचा मनोधर्म मिळावयास वर्षभर पाहिजे. यास्तव तुमचे दौलतीपैकीं खातरजमेच्या माणसाची योजना करा. त्यासच आम्ही आपले म्हणोन वस्त्रें देऊं." उत्तम आहे, म्हणून बिऱ्हाडास आले. नारोपंत नाना व शिवबा बाजी बसले. उभयतांचा स्नेह अकृत्रिम. बाजी नानासी बोलिले कीं, " माझे मनांत आले कीं, " त्वां दिवाणगिरी करावी." तेव्हां नानांनीं उत्तर केलें कीं, ' मी खाजगीचे कारकुनाचा कारकून. त्यांत बायकांकडील. भाकरी मोजाव्या इतकी आमची बुद्धि. दौलतीचे ओझें आम्हांसारिख्याच्या माथां ठेवूं म्हणतां (तेव्हां) थट्टा करितां कीं काय ?" बाजी बोलिले कीं " तुम्हांस काय ? मी मातोश्रीसाहेबांस लिहून आज्ञा आणवितो." असें बोलून ते समयीं कागद लिहिले. श्रीमंतांचे बोलण्याचा आशय व आपले ठायीं प्रसन्नतेचा गौरव, व. कारभाऱ्याविषयीं आज्ञा केली तो अभिप्राय दर्शवून मनुष्य–योजनेचा विचार नारो गणेशांचें नांव लिहून पाठविलें. " ध्यानास येऊन आज्ञा आली म्हणजे नमूद सिद्ध होईल.' अशाभावीं पत्राची रवानगी करून बारावे दिवशीं उत्तर आलें. त्यांत रुकाराचा अभिप्राय पाहून श्रीमंतांस विनंती केली कीं, " मातोश्रीसाहेबांनीं नारो गणेश यांची योजना करून पाठविली." श्रीमंतांचेही ध्यानास येऊन दुसरे दिवशीं मुहूर्त पाहून (त्यास) वस्त्रें दिल्हीं.

(४१) गंगाधर यशवंत यांचें पारपत्य स्वहस्तें करून कैदेंत ठेविलें. तथापि

---

(४०) शिवबा बाजी – म्ह. शिवाजी गोपाळ. **नमूद सिद्ध होणें** – गोष्ट अमलांत येणें. **वस्त्रें दिलीं** – होळकरांच्या दिवाणगिरीची.

(४१) पारपत्य स्वहस्तें करून – माधवराव पेशव्यानें गंगाधरपंतास किती निष्ठुर शिक्षा केली त्या संबंधीं हें पत्र पाहा. ५-८-१७६८ " श्रीमार्तंड. पुरवणी श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीस, विज्ञापना. राजकी वर्तमान राजश्री गंगाधर येशवंत याजकडे तीस लक्ष रुपये घ्यावेसे करार आणि एक वर्ष पुण्यांत कुटुंबासुद्धां रहावें ऐसे झाले होते, त्यास त्याजकडून तिसा लक्षा रुपयाचा निकाल होऊन न ये यास्तव श्रीमंतांनीं अधिक वद्य १ प्रतिपदेस समक्ष दिवाणखान्यांत दोन प्रहर दिवसा बोलाविलें. तात्याबरोबर बाजी विठल मेहुणे व सखंभट व चिरंजीव दादा व आपणासह आले. श्रीमंतानीं रुपयेचे विचारले. रुपयाचा जाबसाल यथास्थिती न जाला. त्याजवरोन श्रीमंत बहू कोपायमान होऊन चौघाचे मुसके बांधले; पायांत आलंकार घालून चौघास छेड्याचा मार विशेष दिला. बाजी विठल यांस तीनसे छडी मोजून मारली, रघत वोकले, त्याप्रा। सखंभटास व दाजीस मारिले. तात्यास बारा छेड्या यैशा मारिल्या कीं रघताचे चिलकांड्या उडाल्या; उपरांतिक चालीस पनास

श्रीमंतांचें घरची कैद व इतर ठिकाणची कृपा बराबर होणार नाहीं. स्नानसंध्या, नित्य भोजनाची टापटीप, वस्त्रापात्रादि कांहीं एक कमी नाहीं. कोणाकडे त्यांनीं जाऊं नये व त्यांजकडे कोणी येऊं नये इतकी मात्र अटक. असा बंदोबस्त ठेवून घरावर चवकी पहारा मोजदाद करावयास पाठविला. तेंथें प्रथम कागद-पत्रांचें रुमाल हातीं लागले. त्यांत दर्याफ्ती करितां शाण्णव लक्ष बत्तीस हजार फक्त धर्मादाय निवडून श्रीमंतांस लिहिलें. तें श्रीमंतांनीं ध्यानास आणून कारकून जप्ती बोलावून घेतली. कारण ज्याकडून कंपेश कोट रुपये धर्म, तेंथें मागें काय असावयाचें आहे ? ह्या संधींत पिशुनांनीं जप्तीचे घालमेलींत राहूरकर भिवाजी रणसोड व रावजी महादेव पारनेरकर या उभयतांचा व गंगाधरपंतांचा मेळ, याजकरितां उभयतांचे घरावर जप्ती करावयाच्या यादी करून श्रीमंतांपुढें टाकिल्या. पाहून श्रीमंतांनीं उत्तर केलें कीं, " रावजी महादेव पारनेरकर याची दौलत कोणास डोळे असल्यास श्रीत्रिंबकेश्वरी जाऊन पहावी. कारकुनाचा कद किती ? भिवाजी रणसोड फक्त शिपाई मनसुभा वगैरे कारभार जाणत नाहीं." असें बोलून दोन्ही यादी आपले हातें फाडून टाकिल्या. तदुपर गंगाधरपंताचा पुन्हा उदय झाला नाहीं. दादाजी गंगाधर,

---

(४१) आणखी मारिल्या, कांहीं रुपयाचे कांहीं न बोलत. मग पितापुत्राचे नाका कानास चाप लाविले ते समई माहा आकांत जाला. येथे बहुतप्रकारें विटंबना करोन थोरल्या चौकांत दरबाज्यापासी गाड्याचे हवाल आहेत. सर्वत्र जन तमासा पहात आहे. अद्याप रुपयाचा निकाल जाला नाहीं. कळावें. " [पेशवे दप्तर भाग १९ पृष्ठ ९७.] **श्रीमन्ताचे घरची कैद व इतर ठिकाणची कृपा बराबर होणार नाहीं** – इतर ठिकाणीं कोठेंहि चैन मिळणार नाहीं अशी चैन व सुख सोय पेशव्याच्या कैदेंत असतां गंगाधरपंताची चालू होती. भावार्थ गंगाधरपंतास कैद केलेले होते तरी तो मातबर राजकीय कैदी म्हणून नजर कैदेखेरीज त्यावर बंधन घालण्यांत आले नव्हते. **मोजदाद करावयास** – गंगाधरपंतांच्या मिळकतींतून दंडाचीं रक्कम वसूल होते कीं नाहीं याची पाहणी करण्यासाठीं माणसें पाठविली. **दर्याप्ती** – समजणूक, आकलन. **दर्याप्ती करणें** – समजून घेणें. **दर्याप्ती करितां** – शोधाअन्ती. **फक्त** - सर्व ! गंगाधरपंतांच्या मिळकतीचे हिशेब पाहाता त्याने बहुतेक सर्व इस्टेट धर्मादाय करून टाकल्याचें आढळून आलें. **कारकून जप्ती बोलावून घेतली** – जप्ती करितां पाठविलेला कारकून परत बोलविला. **कंपेश** – कमी अधिक, जवळपास, सुमारें. **पिशुन** – चहाडखोर, दुष्ट लोक. **कद** – लायकी. **कारकुनाचा कद किती** – रावजी महादेव साधा कारकून. त्याची मिळकत ती कितीशी असावयाची ! **तदुपर** – त्यानंतर.

त्यांचे चिरंजीव, त्यांजवर श्रीमंत माधवराव साहेबांची पूर्ण कृपा. बराय मसलत साठ हजारांची जहागिरी देऊन जवळ बाळगिले.

(४२) इकडे नारो गणेशास वस्त्रें देऊन, हिंदुस्थानांत सुभा रवाना करावा हें राजकारण सिद्ध करून रामचंद्र गणेश यांची योजना केली. शिंदे नवे सरदार, कारभारी वडिलांचे हातचे, त्यांचें यांचे न बने. सबब उज्जनीस राघोबा पागे यांची व महादजी शिंदे यांची लढाई होऊन राघोबा पाग्याचें डोकें कापिलें. येणें करून जरब पडून बाजी नरसिंह व राघो मल्हार आदिकरून सर्व रूजू जहाले. दौलतीचा बंदोबस्त करून पुण्यास आले. श्रीमंतांची भेट घेऊन यांचीहि योजना रामचंद्र गणेश यांजबराबर केली. व होळकराकडील कारभारी याजला ताकीद केली कीं, " तुम्ही इंदुरास जाऊन फौजेची तयारी करून सरकारी सरंजाम येईल त्याजला सामल होऊन त्रिवर्ग एक विचारें मनसब्याची पैरवी करीत जावी. " अशी आज्ञा जाली.

(४३) तों दादो मल्हार वाघोलकर यांचा व नारोपंत नानाचा स्नेह फार. त्यांनीं नारोपंत नानास बुद्धिवाद केला कीं, " होळकराची दिवाणगिरी आपण केली ही गोष्ट फारच मोठी केली. परंतु शिवबा बाजी याचे हाताखालीं तुम्ही व तुमचे यजमान वगैरे आहां, आज पावेतों ' अरे नारोबा ' असें बाजी म्हणतात, तेव्हां कारभार साराच हे करितील. मलईचे मालक तुम्ही. फौजेचे लोकांचा मार खावा इतकेंच मात्र तुम्हांपाशीं राहिल्याचा विचार काय केला ? " तेव्हां नारो गणेश यांनीं उत्तर केलें कीं, " आपण कल्पना घेतली ही खरी, परंतु याचा घरबंद कसा करावा ? याची शकल सांगा. " तेव्हां दादो मल्हार बोलिले, " बाजीचें रहाणें हुजूर व्हावें, तुम्हीं स्वारी करावी, असें जाहल्या खेरीज तुमचा प्रांत नाहीं. मग

---

(४२) **सुभा** – सुभेदार. **वडिलांचे हातचे** – वडिलांपासूनचे, जुने, वृद्ध. **मनसब्याची पैरवी** – विचार – अचार, वाटाघाट.

(४३) **राहिल्याचा** – ' राहिल याचा ' दादो मल्हार म्हणाला, " तुम्ही नांवाचेच कारभारी होणार. खरा कारभार शिवबा बाजी करील व शेवटीं फौजेच्या लोकांचा पगार वेळच्या वेळीं पोचला नाहीं म्हणजे ते लोक कारभाराचा दरक तुमच्याकडे म्हणून तुमच्या दाराशीं धरणीपारणी करतील आणि अखेर तुम्हास मारहाण करून तुमची अब्रूहि घेतील. अधिकार तुमचेपाशीं कांहींच राहणार नाहीं. फक्त शिपायांचा मार खाण्याची जबाबदारी मात्र पत्करली असे होईल. **मलई** – दंगा, धिंगामस्ती, बखेडा. **शकल** – उपाय, विचार. **प्रांत** – शेवट, निभाव.

नाना बोलिले कीं, हें घडतें कसें ? मग दादो मल्हार बोलिले कीं, " लाख रुपये खर्च करावा. बाजीचें रहाणें श्रीमंतांशीं बोलून पुणें मुक्कामीं करितों." नारोपंत नानांनीं कबूल केलें. मग दादो मल्हार श्रीमंतांशीं बोलिले. श्रीमंतांचेहि ध्यानास आलें. परंतु बाजीशीं ही गोष्ट बोलण्याचा संकोच पडतो. कारण कीं, पारनेरकराचें लक्ष श्रीमंतांचे चरणीं निःसीम, त्यांत आमचे लेकुरपणांत दादासाहेबांचे दौलतींत आक्रमण (झालें असतां) आम्हांस देयाघेयाची अडचण पडूं लागली, तेव्हां महादजीपंत गुरुजी याजकडून रावजी महादेव हुजूर होते त्यांशीं बोलून या प्रसंगीं सुभेदारास लिहून आमचे खर्चाची मदत लाख पन्नास हजारांची करवावी (असें केलें) तेव्हां रावजी महादेव यांनीं थोरले सुभेदारास वर्तमान लिहून एका महिन्यांत पांच लक्ष रुपयांच्या हुंडया आणून नजर केल्या. व विष्णु महादेव याचे दुकानावर सदर परवानगी पाठविली. याप्रमाणें सरकार लक्षास जपून, अशा माणसास स्वार्थपर होऊन, हिरमोड (त्याच्या) उमेदीचा करावा ही गोष्ट कशी ?" तेव्हां दादोमल्हार यांनीं विनंती केली हें (न ?) जाल्यास होळकराचे दौलतींत कलह उत्पन्न होऊन सरकारकामांत व नक्षास पदोपदीं बाध पडेल. ही गोष्ट श्रीमंतांचे गळीं उतरून एक दिवशीं बाजीस भोजनास बोलावून बाजी स्वयंपाक करितात, श्रीमंत जवळ बसून साहित्य देतात, त्यांत बाजीस श्रीमंतांनीं विचारिलें कीं, " बाजी आम्हांस लाख रुपये मिळून तुम्हीं आम्हापाशीं रहावें असें जाल्यास कसें ? " तेव्हां बाजीनीं विनंती केली कीं, " सुवर्ण आणि सौगंध्य ! सरकारचा अर्थ होऊन पादसेवा घडते, या उपर लाभ तो कोणता ? असें होत असल्यास स्वामींनीं मनांत कांहीं एक अंदेशा न आणितां ही गोष्ट अगत्य करावी. अंतःकरणापासून विनंती करितों, स्वामींचे चरण साक्ष आहेत. " तेव्हां श्रीमंत निःसंशय होऊन या गोष्टीस रुकार दिला. भोजन होऊन घरास आले. नारो गणेश यांजला या गोष्टीचा इतला दिल्हाच नाहीं. मग जेव्हां नमूद सिद्ध झाला तेव्हां बाजीस एकांतीं घेऊन (नारो गणेशांनीं) सफाईच्या गोष्टी विशेष बोलून, " आपण कोणीहि कारकून द्यावा अथवा बटीकहि दिल्ही तरी दौलतीचा ओघ तिचे टांकाखालून काढीन. "

---

(४३) नक्ष – लौकिक, कीर्ति, दबदबा. **सुवर्ण आणि सौगंध्य** – सुवर्णाला सुवासहि यावा अशी अधिकच उत्तम गोष्ट. **सरकारचा अर्थ होऊन** – तुम्हांस पैसा मिळून तुमचा स्वार्थ साधतो आणि मला तुमचे जवळ राहावे लागून अनायासे तुमची चाकरी मजकडून घडते, अशा दोन्ही गोष्टी साधतात. **इतला** – दखल. **नमूद सिद्ध झाला** – योजनेप्रमाणें बनाव तयार झाला. **दवलतीचा ओघ तिचे टांकाखालून काढीन** — बटकीकडूनहि कारभार करवून दाखवीन.

असें बोलून पायांवर हात ठेविला. बाजीनीं बहुत खातरी केली कीं, " नाना, आपण दौलतीचें ओझें उचललें तेव्हां आपल्याला अनकूल प्रतिकूल पाहून त्याचा बंदोबस्त केला असतां यांत वाकडे तें काय ? आम्हीं तुमचे बरोबर असतों अथवा हुजूर राहिलों तथापि नीट वाकडें याचा प्रश्न सुभेदार अथवा श्रीमंत आपल्यास करितील ते पक्षीं आपण केलें हें उचितच. आमचें ऐश्वर्य मिळून श्रीमंतापाशीं धन्या जवळ आपल्या सारिखे मुरब्बी त्यांचे निकट आमची गरीबी कायम राहून, वैगुण्याचा दोष न येतां त्रिवर्गांचे मनांत आमची गरीबी वागली म्हणजे लक्ष या गोष्टीस मिळोन मुस्तकीम होऊन लोभ ठेवावा. श्रीमंतांचे पायापाशीं राहिलें असतां आपल्यास अनकूल तेंच घडेल. वायां जाणार नाहीं. " असे भावीं बोलणें होऊन नारो गणेश याजला श्रीमंतांची आज्ञा देऊन बिदा केलें.

(४४) इंदुरीं आल्यावर श्रीमती व सुभेदार यांची भेट घेऊन, झालें वर्तमान श्रवणारूढ करून शेवटीं ही गोष्ट सांगितली. ऐकोन घेऊन (बाईसाहेबांच्या) चित्ताचा विक्षेप बहुत जाहला. " अद्यापीहि हिंगली न वाफेली इतकियांतच न पुसतां कारभार करूं लागले. उत्तम आहे. ज्या समयीं आम्हांवर वक्त कैलासवासी वडिलांनीं माणसें करून ठेवलीं होतीं त्यांनीं तर खटलीं पाहिलीं. तुम्हीं आमचे

---

(४३) आमचें ऐश्वर्य .... लोभ ठेवावा – या वाक्याची कर्ता, कर्म, क्रियापद अशी फोड करणें कठीण आहे. भावर्थ असा कीं, आम्हीं श्रीमंतापाशीं राहिलो म्हणजे आम्हांला मिळावयाचें तें ऐश्वर्य मिळून चुकेल, तुम्ही धन्याजवळ म्हणजे तुकोजी होळकराजवळ राहिलात म्हणजे त्यांचा कारभार उत्तम चालेल व तुमचेहि उर्जित व्हावयाचें तें होईल. आणि आमची गरीबी म्हणजे सचोटी किंवा एकनिष्ठता होळकरांच्या दौलतीशीं कशी कायम आहे तें होळकरांस तुम्ही समजवाल. एकन्दरीत पेशवे, तुकोजी होळकर व तुम्ही अशा तिघांनाही माझी एकनिष्ठता कळेल. **मुरब्बी** – कर्ते, मुत्सद्दी, हुशार. **वैगुण्य** – अपमान, दुर्लौकिक. **मुस्तकीम** – बळकट, पक्का.

(४४) हिंगली न वाफेली – कशास काहीं ठिकाण नाहीं अशी स्थिति. **वख्त** – कठीण प्रसंग. **माणसें करून ठेवली होती** – विश्वासाचे नोकर संग्रह करून राखले होते. **खटलीं पाहिलीं** – ' खटलीं पाडिलीं ' असें पाहिजे. खटलीं उपस्थित केलीं. भानगडी उपस्थित केल्या. अहिल्याबाईचा भावार्थ असा कीं, " नवरा खंडेराव होळकर वारला. पाठोपाठ सासरा मल्हारराव होळकर तोहि वारला. आम्हावर संकट कोसळलें. कर्ता पुरुष माणूस नाहीं म्हणून होळकरी दौलतीवरती जप्त होण्याचें संकट उभें राहिलें. त्यावेळीं गंगाधर यशवंत चन्द्रचूडासारखा पुरातन विश्वासू म्हणून गणला गेलेला माणूस दिवाण ह्यानेंच राघोबाशीं संगनमत करून भानगडी निर्माण केल्या ! "

मर्मेतील खासगीचे कारकून. परंतु गुणदोष तुम्हांस समजले असतां आपले वचावास्तव मनचे मनांत ठेवून राहिला. ते समयीं शिवबा बाजी व राजाराम यांनीं जीव झोकून बुद्धिवाद सांगितला. त्याजवर हा दिवस ईश्वरें दाखवून तुम्हांस संस्थान प्राप्त जालें. या गोष्टी तुम्हांस ठाऊक असतां मनोभंगास आमचे आज्ञेचाही आक्षेप घेण्याचाहि संकोच पडला नाहीं. याजवरून पुढें तुमचे हातून दौलतींतील माणसें वोळखून आपसांत किलाफ न वाढवितां दौलतीचा जळूष राखाल यांतील निदर्शन या करण्यांतच ध्यानास आलें." अशा भावीं दोष पदरीं घालून मनांत मशारनिल्हेविशीं किलाफाचें बीजारोपण जहालें. पुढें हिंदुस्थानांत फौजा जाव्या सबब रावसाहेब यांनीं रामचंद्र गणेश सुभे व विसाजीपंत बिनीवाले कारभारी नेमून देऊन फौजा रवाना केल्या. आणखी शिंदे होळकर यांजला तैनातीस रहावयाविशीं आज्ञापत्रें दिलीं. इंदूर उज्जनीचे मैदानांत फौज आल्यावर उभयतां सरदारांनीं सामल व्हावें. त्यांत महादजी शिंदे सामल होऊन श्रीमंतांकडील सरदार व शिंदे दरकूच करून पुढें गेले. तुकोजी होळकर इंदूर मुक्कामीं असतां बाईसाहेबांचे मनांत विकल्प मोठा आला. कारण दौलत ईश्वरइच्छेनें आपले हातें दुसऱ्याचे घरांत घातली, तथापि कारभारी माझा कारकून केला कीं पांच विस्वे तरी त्याचें मन मजकडे ओढेल. म्हणून हा बेत केला. त्यानें वस्त्रें घेतांच चांचणुक दाखविली. तेव्हां दौलतीचा आमचा संबंध अर्थात राहिला नाहीं. इत:पर सर्व ईश्वरानें सोडविलेंच आहे. ततपक्षीं महेश्वर नर्मदातटाक पुण्य क्षेत्र आहे तेथें स्नान संध्या करून सार्थकाचा विचार करावा (हा) अमुचा मनोधर्म. दौलत तुमचे स्वाधीनच केली

---

(४४) गुणदोष – गंगाधर यशवंताच्या कारस्थानाची बातमी. **जीव झोकून** – जीवावर उदार होऊन, प्राणांताचें पारिपत्य मिळण्याचा धोका होता, तोहि पत्करून. **तुम्हांस संस्थान प्राप्त झालें** – तुम्हांस तुकोजीची म्हणजे होळकरी दौलतीची दिवाणगिरी मिळाली. **मनोभंगास** – आमचा मनोभंग करण्यास. मनोभंग म्हणजे अपमान, अवज्ञा. **संकोच पडला नाहीं** – अपेक्षा किंवा जरूरी वाटली नाहीं. अहिल्याबाईचा भावार्थ असा "तुकोजीची दिवाणगिरी स्वीकारताना शोभेकरतां कां होईना पण आमची म्हणजे माझी आज्ञा म्हणजे परवानगी घेण्याचा लौकिक उपचार तुम्ही करावा तोहि तुम्ही केला नाहीं त्यामुळें तुम्ही माझ्या मनोभंगास म्हणजे अपमानास कारण झाला." **जळुष** – आब, जरब. **किलाफ** – किलमिष, वाकुडपणा. **सुभे** – सुभेदार, मुख्य सरसेनापति. **तैनातीस** – मदतीस. **विस्वा** – रुकयाचा विसावा हिस्सा. **पांचविश्वें** – कांहीं टक्यांनीं, थोडासा. **चांचणूक** – चुणूक. **सार्थकाचा** – देह सार्थकाचा.

आहे. वडिलांचा लौकिक संरक्षण (करून) यजमान (व) श्रीमंत यांचा लोभाचा ओघ शुष्क न पडे यास जपावें. आमचा परामर्ष कराल न कराल याचें चेष्टित दिसतच आहे." हीं अक्षरें तुकोजी होळकर सुभेदार यांनीं श्रवण करून आपले गालात मारून कंपित होऊन बळकट बाईसाहेबांचे पाय धरिले. उत्तर केलें कीं "महाराज कैलासवासी सुभेदार असतां भाऊबंदकी एकीकडे ठेवून गुलामखाजादानांत या वृत्तीनें हुकूम बजावीत आलों. त्यांचें कूर्मदृष्टींचें हें फळ ! तथापि सुभेदारहि हरएक विषयीं आपले भरंसियार निश्चित होते. प्रसंगीं सुभेदारांचे आशीर्वादाचा अनुषंग पाहून मजला माणूस केलें. तेव्हां माझे सुभेदार व मातुश्री प्रत्यक्ष आपणच आहांत. दौलत प्रकरणीं राजकारण व श्रीमंतांचें लक्ष संपादणें यांतील राखणें जोखणें कारभारी यांच्या विचारें करणें प्राप्त. परंतु आपले चरणाशीं प्रतरणेचा विचार साक्षात् आपला मार्तंड येऊन बोलला असतांहि पायाशीं अंतर होणार नाहीं, (मग) प्राण जावो कीं राहो. ही गोष्ट महाराजांनीं खचित मनांत वागवून कूर्मदृष्टी ठेवावी. यांत दौलतींचें व माझें कल्याण." या भावीं बहुत खात्री केली. मग मातुश्री साहेबांचे मनांत वागून उत्तर केलें कीं, "बोलण्यांत अर्थ नाहीं, दिसण्यांत येईल तें खरें. बोलण्याप्रमाणें चालणें जाहलें असतां ईश्वर उपेक्षा करीत

---

(४४) **चेष्टीत** – वर्तणूक. **आपले गालांत मारून** – आपल्या थोबाडींत मारून घेऊन. **गुलामखाजादा** – गुलाम खानजादा. **गुलाम** – दास. **खानजादा** – खानजादा-दासीपुत्र. **या वृत्तीनें** – जणू कांहीं आपण गुलाम आहोंत, खानाजाद आहो, आपणास कांहीं हक्क नाहींत, फक्त धन्याची नोकरी हुकुमाप्रमाणें बजावणें हेंच आपलें इतिकर्तव्य अशा भावनेनें वागलो. **त्यांचें कूर्मदृष्टींचें हें फळ** – "मल्हारराव होळकर मजवर कृपा करीत आले. परंतु आतां तुम्ही मला धिक्कारून बोलता !" **कूर्मदृष्टी** – कासव आपल्या पिलाला अंगावर पाजीत नाहीं. अंगावर न पिताच कासवाचें पिलूं मोठें होतें. यावरून अशी समज रूढ आहे कीं, कासव आपल्या पिलाकडे सारखे वात्सल्य दृष्टीनें बघतें, आणि तेवढ्यानेंच त्या पिलाचें पोषण होतें. **प्रसंगीं** – संकट पडलें तेव्हां, दौलत जप्त होण्याचा प्रसंग उभा राहिला तेव्हां. **अनुषंग** – संगती, संसर्ग, सख्य, निकट समागम, संबंध. **माणूस केलें** – भाग्यास आणले, पदवीप्रत पोहचविले. **प्रसंगीं सुभेदाराचे ..... माणूस केलें** – तुम्हीच सुभेदारांची मजवर फार कृपा होती हे पाहून मला होळकरांची सरदारी बहाल करविलीत. **सुभेदार** – मल्हारराव होळकर. **श्रीमंतांचें लक्ष संपादणें** – पेशव्याची मर्जी, कृपा राखणें. **राखणें जोखणें** – कामगिरी, कारवाई. **मनांत वागून** – मनांत येऊन.

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था.

नाहीं " असें बोलणें मातुश्रीचें महेश्वरीं होऊन देशींचे महाल व माळव्यांतील महाल दरोबस्त यांची देखरेख मातुश्री साहेबांकडे ठेवून कारभारास नारो गणेश यांचे भाचे मुकुंदराव हरी यांची योजना होऊन, मशारनिल्हेचें अल्प वय तेव्हां तोड-जोडीचें माणूस कृष्णाजी मल्हार पारनेरकर, बुळे यांचे सरदारीचे दिवाण, यांज-कडे सोंप केली.

(४५) नंतर मातुश्रीसाहेबांची आज्ञा घेऊन हिंदुस्थानांत रवाना जाहले. अगोदर रामचंद्र गणेश व शिंदे आले होते. यांनीं सुभेदार यांचे इतल्याशिवाय बादशहा उठवून बसविला होता. खंडणी घेतली होती. हें राजकारण करून जाबताखान रोहिला फत्तरगडवाला याचे राजकारणास्तव दिल्ली साडूने अंतरवेद उतरले होते. सुभेदार यांनीं मागाहून येऊन पुनः बादशहाचें उत्थापन करून चार रुपये आणखी घेऊन स्थापना केली. ही गोष्ट शिंदे व रामचंद्र गणेश यांजला वैषम्य वाटून शिंदे रुसून पंचवीस कोस माघारे आले. मग पांडुरंग शंकर व पांडुरंग रणसोड पारनेरकर यांजकडील सरदारी तुकोजीबावाकडे होती त्या वेळेचे दिवाण फडणीस, यांजला पाठवून समजाऊन आणिलें. नंतर त्रिवर्ग सरदार एकत्र होऊन जाबताखान रोहिला याचे राजकारणास लागले. तेथें सुभेदारांकडील कार-भारी यांनीं जाब केला कीं, "जाबताखानाचा व कैलासवासी सुभेदाराचा भाऊपणा, त्याजला आम्हीं पत्र लिहून वकील आणवितों. जाबसाल करार ठरण्यांत आल्यास उत्तमच. न आल्यास पारपत्य करूं." असें बोलून पत्रें रवाना केलीं. तेथून बक्षी पन्नास हजार फौजेनिशीं जाबसालास आला. त्याशीं तुकोजी होळकर याचा करार कीं, "तुमचे आमचे बोलण्यांत तह ठरला असतां नीटच आहे. न ठरल्यास आम्ही ताबेदार, माफक हुकूम नोकरी बजावणें प्राप्त, याबाबत तुमचा आमचा करार भागीर्थीपार तुम्हांस तुमचे मुलुखांत करून देऊन आम्हीच तुम्हांस लुटून घेऊं. हें बोलणें तुम्हांस कबूल असल्यास यावें." तेव्हां तो यवन चढावर, त्याचे खातरेंत ही फौज नाहीं. पन्नास हजार फौजेनिशीं बक्षी पाठवितों, तसेंच काम पडल्यास बक्षी त्यासी पुरा पाडील, असा स्तोम बाळगून वकील बक्षीचा पाठविला. त्याची फौज गंगापार राहून पांचशें स्वारानिशीं इकडे बोलावयास आला. तो

---

(४४) तोडजोडीचें माणूस – तोडजोड करण्यास लायक असा अनुभवी माणूस. **सोंप केली** – सोपविलें.

(४५) इतल्याशिवाय – अनुज्ञेशिवाय, अनुमतीशिवाय. **माफक हुकूम** – हुकुमाप्रमाणें, हुकूममाफक. **चढ** – गर्व. **त्यासी पुरी पाडील** – त्यास पुरून उरेल. **स्तोम** – गर्व.

होळकरांचे फौजेशेजारीं उतरला. पांच चार दिवस बोलणें जाहलें. परंतु शिंदे व रामचंद्र गणेश यांचे मनांत पाप कीं, बादशाईचे इतिकर्तव्यतेस बाध पाडून आपलें करणें व्यर्थ केलें. तेव्हां या जाबसालांत होळकरास फिकें पाडावें, अशा संधानावर त्यांची दृष्टी. तेव्हां बोलण्याचालण्यांत रस न पडतां वकिलास लुटून घ्यावें असें मनांत पाप आणिलें. हें वृत्त सुभेदारांस समजतांच यांजकडील कारभारी यांनीं सारे दरबार (मध्यें) जाब केला कीं, " आमचे वचनावर वकील आला आहे. जाब ठेवणें अथवा बिघाड करणें हें तुम्हीं श्रीमंतांचे मुखत्यार तेव्हां तुमचे तुम्हांकडे. परंतु वकिलास कोणीही लुटलें नाहीं. तुम्ही अशाच विचारास प्रवर्तक जाल्यास आम्ही ताबेदार, परंतु आम्हांकडून वकिलास आणविलें. ते पक्षीं आम्हीं वकिलास गंगापार त्याचे फौजेंत दाखल करून मग हुकूम कराल तर आम्हींच लुटून घेऊं. " तेव्हां रामचंद्र गणेश यांनीं उत्तर केलें कीं, " उत्तम आहे. तुम्ही वकिलास गंगेपार त्याचे फौजेंत प्रविष्ट करून तुम्ही लुटून घ्यावें. " याप्रमाणें उत्तर केल्यावर कारभारी डेऱ्यास येऊन सुभेदारास वर्तमान सांगितलें. सुभेदारांनीं वकिलास बोलावून वर्तमान जाहीर केलें. त्यांनींही उत्तर केलें कीं, आम्हांस गंगेपार आमचे फौजेंत पावतें करावें. नंतर आम्ही खुदाचे. हीबसात नाहीं. मग ते समयीं त्यांची तयारी करून आपली पांच हजार फौज बरोबर देऊन गंगेपार उतरून दिले. दुसरे दिवशीं सुभेदार जातीनिशीं तयार होऊन गंगापार उतरले. बक्षीशीं तिसरें दिवशीं गांठ घालून लढाई फार मातबर झाली. बक्षीचें डोकें कापून आणून फौज बरबाद केली. शिंदे, रामचंद्र गणेश यांनीं कुमक केली नाहीं. बक्षी बुडविला हें वर्तमान जाबतेखानास समजल्यावर साठ हजार फौज व तीनशें तोफा घेऊन सुभेदाराचे मुकाबल्यास आला. गांठ घालून लढाई सुरू झाली. तीनशें तोफ एक समय दीन चालती केली. त्याच्या तोफा, याचे जंबुरे, परस्परें मार चालला. त्याचे

---

(४५) **बादशाईचे इतिकर्तव्यतेस बाध पडून** – बादशहाबाबत आपण ठरवलेल्या योजनेस किंवा कारस्थानास बाधा पडून. **फिकें पाडणें** – फशी पाडणें, गोता देणें, महत्त्वशून्य करणें. **रस पडणें** – एक वाक्यता होणें. **सारे दरबार** – सेर दरबार असे पाहिजे. **सेर दरबार** – शेर दरबार, भरदरबार. **जाब ठेवणें** – तहाची बोलणीं चालू ठेवणें. **करू** – करून. **हीबसात** – ' हीसाबात ' असें मुळांत असावें. **हीसाबात** – हिशोबांत. हिसाबांत नाहीं, म्हणजे चिंता नाहीं. पर्वा नाहीं. **बरबाद** – नष्ट. **दीन चालती केली** – दीन दीन अशी रणगर्जना करीत. **दीन** – ही मुसलमानी युद्धगर्जना आहे. दणक्यानें चालू केली असाहि अर्थ होऊं शकेल. **जंबुरा** – लहान तोफ.

फौजेचा मार लागूं न होता जंबुऱ्याचे मारानें रोहिल्यांची फौज फिरून दिली. असें चिन्ह सुभेदारांनीं पहातांच घोडे घालावे असा मनसुबा करून पेंढारी मागें घालून मुकाबला. ....

(४६) मुकाबल्यास तुकोजी होळकर सुभेदार यांनीं हल्ला केला. मागाहून पेंढारी यांची लांडगेतोड बरीच झाली. दुतर्फा शह पाडून रोहिले कुल बरबाद केले. हें वर्तमान शिंदे, रामचंद्र गणेश यांस समजतांच, कूच करून, गंगा उतरून सुभेदारास सामील झाले. त्रिवर्ग एकत्र होऊन पथरगडास येऊन मोर्चे लाऊन किल्ल्यावर हल्ला. केला. बायकापोरें धरून दरोबस्त लुटलीं. मलकाजमानीचे अन्वयें पेंढारी यांनीं बायकांस उपद्रव केले. दौलत बहुत निघाली. पुनः माघारी फिरले. दिल्लीवरून जाटावर यावयाचा हेत. या मसलतीस अग्रेसर तुकोजीराव होळकर. शिंदे व विसाजीपंत यांचे संकोचार्थ सामील खरे; परंतु मनांतील धर्म, कोणेही मसलतींत होळकरास तोंडघशीं पाडून आपलें वर्चस्व होऊन, श्रीमंत माधवरावसाहेब यांस समजावें हा इरादा. गंगापारीहून पथरगडचे मसलतीचा समारोप करून, दिल्ली डावी सोडून, अरण्यांतून शेखावटींत आले. तेथोन पुढें जाटावर चाल करावी येविषयीं आग्रह. निकड होळकराची. उभयतां बाह्यात्कारें सामेल. झुकवीत झुकवीत हिंडोन बयाणामध्यें मुक्काम केला. तेथोन भरतपूर १२ कोस, दीग १८ कोस. सुभेदाराच्या बोलण्यास रुकार मात्र, परंतु कूच करण्यास अनेक पर्याय दाखवूं लागले. तेव्हां एके दिवशीं रात्रीं सुभेदार रात्रौ भोजन करून गादीवर हुक्का ओढीत होते. चित्तांत बहुत उदासी आली कीं, जाटाचा रुवाब भारी. हे मोकाबल्यास आले जाणून जाट नवलसिंग ८०,००० स्वार, १२०० तोफा चालू,

---

(४५) फिरून दिली – फिरून टाकली. मार सहन न होऊन रोहिल्यांच्या फौजेनें पाठ दिली, पळू लागले.

(४६) **कुल** – झाडून सर्व. **बरबाद** – नष्ट. **मलकाजमानीचे अन्वयें** इ० – मलकाजमानी जवळ पुष्कळ पैका असावा अशा समजुतीनें पेंढाऱ्यांनीं बायकांसहि द्रव्याकरितां फार छळलें. अपेक्षेप्रमाणें दौलत म्हणजे पैका खूपच मिळाला. **हेत** – हेतु, इरादा. **यांचे संकोचार्थ** – यांच्या भिडेमुळें. **यांचे** – तुकोजी होळकरांचे. **निकड** – आग्रह, ईर्षा. **पर्याय** – सबबी, अडचणी. **रुवाब** – रुबाब, जोरा, वरचष्मा, सैन्यसामान. **समरूचीं पलटणें** – बेगम समरूचीं पलटणें. **मनांतील धर्म** – अंतस्थ हेतू. **उदासी** – उदासीनता किंवा खिन्नता. **चालू** – शोभेच्या नव्हेत तर प्रत्यक्ष लढाईत उत्तम काम देतील अशा, तरतुदीत राखलेल्या.

लाख पायदळ, शिवाय समरूचीं पलटणें ४, या सरजामानिशीं दीग पाठीमागें ३ कोस टाकून, पुढें यांचे फौजेवर रुख दिला. सोबत्याचे मनांतील धर्म उघडाच दिसतो. आपलें जातीचा अजमास पाहतां, पंधरा हजार इतलाखी शिलेदार, पांच हजार सरंजामी व पांच हजार पागा व पंचवीस हजार पेंढारी एकोण पन्नास हजारांची जड. ईश्वर मार्तंड प्रांत कसा लावील असी मनांत व्यावृत्ती. तितक्यांत कांहीं डोळाही लागला. इतक्यांत साक्षात् मार्तंड, निळा घोडा, पांढरा पोशाख, खाद्यांवर भाला, गळ्यांत गाठाळा, पाठीं भंडार (असा) समोर येऊन बोलला कीं, " धनगरा ऊठ. आठ अक्षरीं मंत्राचा जप कां करतोस? मी पुढें चाललों. तूं मागें कूच करून जलद ये." इतकीं अक्षरें श्रवण करून जागे होतात, (तोंच) स्वार गेला असा भास झाला. तों इतक्यांत नगारखान्याचा जमादार येऊन विनंती केली कीं, " चौघडा अखेर होऊन दोन घटका झाल्या, मी माणसासुद्धां सामसूम निजलों. पहारवालां बसला होता. तीन डंके नौबतीवर गैबी झाले. कानावर घालावयास आलों." हें श्रवण करून शरीरांत हिंमत येऊन, उपाध्यायास बोलावून नौबदीची पूजा करून, कोणास न पुसतां कूच केला. दीडा प्रहाराचे आंत जाटांचा यांचा मुकावला चौ कोसांचा राहिला. यांनीं मुक्काम जमवून, गोविंदराव बुळे यांचें पथक छबिन्यास उभें करून, सुभेदार स्थळ करून भोजन करून, पलंगावर आंग टाकिलें, तों छबिन्यांतून सांडणीस्वार आला कीं, जाट येऊन पोंचला. आमची व त्याची

---

(४६) **रुख** – रोख. **सोबती** – शिंदे. **मनांतील धर्म** – अन्तस्थ हेतु. **जातीचे** – जमावाचे, सैन्याचें. **अंगठाण** – मोजमाप, अदमास. **इतलाखी शिलेदार** – पगारी शिलेदार. **जड** – जमाव. **प्रांत** – शेवट. **व्यावृत्ति** – चिंता. **गाठाळा** – खंडोबाच्या भक्ताच्या गळ्यांतील रुप्याची हासळी किंवा कडें असतें त्यास गाठा किंवा गाठाळा म्हणतात. **पाठीं भंडार** – पाठीवर किंवा खाकेंत. भंडार म्हणजे हळद भरलेली पिशवी. **आठ अक्षरीं मंत्र** – " कसें करूं काय करूं " हा. **चौघडा अखेर होणें** – तळावरून सैन्याचें कूच व्हावयाचे असे त्यावेळीं तीनदा नगारा वाजवून इशारा देण्यांत येण्याची पद्धति होती. तिसऱ्या म्हणजे अखेरच्या नगाऱ्यानंतर तळावर कोणीहि राहाता कामा नये अशी मराठी लष्करांची शिस्त असे. **तीन डंके नौबदीवर गैबी झाले** – तीनदा नौबत वाजली. मात्र नौबती किंवा ते वाजविणारे कोणीच दिसले नाहींत ! **गैबी** – गुप्त. **मुकावला** – मुफासला असावे. फासला,-अन्तर. **मुक्काम जमविणें** – लष्कराच्या तळाची आखणी करणें, व्यूह रचना ठरविणें. **छबिना** – लष्कराच्या तळापुढें शत्रूच्या बातमीसाठीं फिरती ठेवलेली रखवालीची टोळी. **स्थळ करणें** – मुक्काम करणें.

गोळागोळी होती. तों सुभेदारांनीं नारो गणेश यांजला सांगून पाठविलें कीं, फौज तयार करून मुकाबल्यास जाणें. हुकूम येतांच नानांनीं फौजेस ताकीद करून घोड्यावर बसून ढालेपाशीं गेले. फौजहि कट्टी होती. मानाजी फांकडे व भगवंतराव कदम, खंडोजी मोयटे व यशवंतराव चव्हाण, दोन महिने अगोदर तलब चुकऊन येऊन, शिंद्याचे जवळ चाकरीस राहिले होते. हे कूच करून पुढें आले तेव्हां तेही यांचेबरोबर कूच करून आले. ४०० स्वारांचें पथक. धनगर उद्यां म्हणेल, पैका खाऊन समयास....दाखविली. याकरितां विना बोलावण्यावांचून सामील झाले. शिलेदार घेऊन नाना पुढें चालले. तों छबिन्यांतून सांडणीस्वार दुसरा आला कीं, स्वारी लवकर यावी. आमचे पाय टिकत नाहींत. तेव्हां सुभेदार उठून, शौचाहून जाऊन येऊन, हत्तीवर बसून ढालेपाशीं गेले. रखमाबाईसाहेब बरोबर होती. त्यांनीं विनोदानें भाषण केलें कीं, "मी शेणगोळा करून ठेवितें." सुभेदार स्वार होऊन पुढें झाले. भिवाजी रणसोड राहूरकर पागनीस हे पांच चार हजार हुजुरांत तयार करून हत्तीपाशीं आले. सुभेदारांनीं हत्ती बसवून आपल्या भंडारींतील भंडार भिवाजीपंत नाना यांच्या कपाळीं लाविला, आणि बोलले कीं, "झाल्या गोष्टीची उजळणी आज करून दाखवावी." हें उत्तर न करितां पुढें चालले. सुभेदारांच्या बोलण्यांतील तात्पर्य, नारो गणेशाशीं व राहूरकराशीं कांहीं चुरसाचुरस झाली होती. त्याप्रसंगीं भगवंतराव कदम व मानाजी फांकडे यांनीं राहूरकराचा पक्ष करून वर्चस्व ठेविलें. असले किरकोळ किस्त्यांचा बयाण फार होतो. श्रवण करणार चित्त पुरवून पुसल्यास सांगावयास येतील. त्या दिवसापासून उभयतां सरदार व राहूरकर यांचा संकेत होता कीं, जाठाचे लढाईचे प्रसंगीं

---

(४६) **होती** – होत आहे. **ढाल** – सैन्यांतील मुख्य झेंड्याचें निशाण. **कट्टी** – निवडक. **तलब चुकवून घेणें** – पगाराची बाकी पदरांत पाडून घेणें. **समयास**दाखविली**– ऐन वेळीं दगा केला, कुचराई केली. **पाय टिकत नाहींत** – आमच्यानें शत्रू थोपविला जात नाहीं. **शेणगोळा करून ठेवतें** – अनिष्ट निरसनार्थ एक तोडगा ! **भंडारी** – भंडार ठेवण्याची पोतडी. **उजळणी करून दाखविणें** – उत्तीर्णता करून दाखविणें, बोलल्याप्रमाणें करून दाखविणें, सूड घेणें. **चुरसाचुरस** – चुरस, स्पर्धा, बोलाचाली. **पक्ष करणें** – पक्ष धरणें, बाजू घेणें. **किस्त** – भानगड. **बयाण** – विस्तार. **असले किरकोळ किस्त्यांचा बयाण फार होतो. श्रवण करणार चित्त पुरवून पुसल्यास सांगावयास येतील** – असल्या बारिक गोष्टी तपशीलवार सांगणें तर फार बयाण म्हणजे विस्तार होईल. परंतु श्रोत्यांना जिज्ञासा असल्यास त्याहि सांगता येतील.

दोन्ही गोषावर तुम्हीं उभयतांनीं असावें. मध्यवर्ती हुजरात. हुजरातीचें निशाण उठलें म्हणजे तुम्हीं बेलाशक उठावें. त्यावर उभयतां सरदार गोषावर होतेच. हुजरात जाऊन मधीं उभीं राहिली. जाटाकडील तोफखान्याचा मार अनिवार. फौज थिजून गेली. तेव्हां नारो गणेश यांनीं सांडणीस्वारासमागमें चिठी भिवबा नानाकडे पाठविली कीं, "दिवस चार घटका राहिला. या समयीं व्यर्थ मार खाऊन घोडे माणूस जाया करावें. हें ठीक नाहीं. या वेळेस टाळा द्यावा. सकाळीं पाहून घेऊं." तेव्हां नानांनीं उत्तर केलें, जबानी सांगितलें कीं, "आम्हांस फार दिवस वांचावयाचें नाहीं. आपण यजमानापाशीं उभे राहून तमाशा पाहावा." असें सांगून पाठवून सांडणीस्वारानें तोंड फिरवतांच हुजरातीचें निशाण उठलें. हें कदम फांकडे यांनीं पाहून, हजार हजार स्वारांचे सरदार त्यांनींही घोडयांच्या अनिनी उचलल्या. ते समयीं, गोलंदाज तोफ भरूं लागले नाहींत, तों बासडे सही केल. तोफा मागें टाकून पायदळ कडब्यासह कापलें गेलें. हुजरात व कदम फांकडे यांचे हत्यार लागू झाल्यावर तमाम फौज उठली. पायदळाचें बींबूड करून स्वारांत शिरलें. तों रांगडे स्वार घोडयाचें वेठण कमी, यामुळें बाजूनें पेंढारी व समोर फौज. जाटांची स्वार सरंजाम जमूं न शकतां प्रायशः मारले फार गेले. कांहीं जीव घेऊन पळालेहि असतील. याप्रमाणें जाटाची तारांबळ करून, जाट जातीनें विवस्त्र होऊन, गोपीनाथ घुले मथुरेकर महाराष्ट्र भिक्षुक उभयतां घोडयाचे रथांत होते. ते पेंढाऱ्यांनीं विवस्त्र करून, खास जाट हा हें त्यांस न समजल्यामुळें

---

(४६) **गोषा** – बाजू ? टोंक ? **उठणें** – हल्ला करून जाणें. **फौज थिजून गेली** – फौज म्हणजे घोडदळ. तोफांच्या मारामुळें घोडदळास पुढें घुसणें अशक्य झालें. **टाळा देणें** – अंग काढून घेणें, पळून जाणें. **जबानी** – तोंडानें, लेखी नव्हे. नारो गणेशानें भिवबा नानाकडे लेखी चिठ्ठी पाठविली होती परंतु त्यानें लेखी उत्तर न देतां जबानीनेंच कळविलें. **तमाशा** – पराक्रम. **हुजरातीचें निशाण उठलें** – हुजरात पथकानें चालून घेतलें. **अनीन उचलणें** – घोड्यांनीं दवडावे म्हणून त्यांना लगामाचा इशारा करणें. **तों बासडे सही केले** – गोलंदाजांना तोफा भरू देण्याचा अवकाश न देतां त्यांस शिलेदारांनीं आपल्या भाल्यांनीं ठार केले. **बासडा** – भाला. **सही करणें** – जिंकणें, कामीज करणें. **कडब्यासह** – कडब्याप्रमाणें. **बींबूड** – निकाल, नष्टांश, सपूण कत्तल. **रांगडे स्वार घोड्यांचें वेठण कमी** – रांगडे स्वारांजवळ घोड्यावर बसण्याचें कौशल्य किंवा कसब मराठे शिलेदारांसारखे नव्हते. **वेठण** – कसब, कौशल्य. घोड्यावरील मांड. **जाटांची स्वार** – मूळ पाठ ' जाटांचा ' असा असला पाहिजे.

शेंडी उडत डिगेंत शिरले. लढाई फत्ते झाली. ४ पलटणें समरूचीं ते लढाईचे अवलपासून तुटून किल्ला बांधून होती. त्यावर कोणी जाटाचा माणूस गेलाही नाहीं. पेंढारी याचे स्वार गेले आले, त्याजवर गोळा टाकून जवळ फरकूं न दिले. किल्ला बांधून शाबुतीनें आपले ठिकाणास गेले. बाकी सरंजाम तरबितर करून, चारी प्रहर रात्र बेटांत उभे राहून सूर्योदयीं मुक्कामास आले. लढाई लागली हें वर्तमान विसाजीपंत व शिंदे यांस कळतांच, येऊन सामील झाले. होळकराची फौज मरीमाऱ्यांत. शिंद्यांनीं लूट मनस्वी केली. श्रीमंतांकडील विसाजीपंताचे फौजेपैकीं जंबुऱ्यांचा मार कांहीं उपयोगी पडला. एवंच दोन्ही फौजेनीं लूट केली. लढाई होळकरांनीं मारली. दुसरे दिवशीं सुभेदार तुकोजी होळकर यांनीं शिंदे, विसाजीपंत व आपले फौजेंत रूरयात न ठेवितां, तिन्ही लष्कराची लूट जबरदस्तीनें एकत्र करून बरहुकूम हिस्सा वांटून दिली.

(४७) इकडे देशीं माधवरावसाहेब याजला राजयक्ष्म्याचा उपद्रव होऊन त्यांचा काल झाला. हें वर्तमान समजतांच, फौज माघारा फिरोन, जाटापासून चार हजार रुपये घेऊन पूर्वस्नेह कायम करून सुभेदार इंदुरास आले. शिंदे उज्जयनीस, विसाजी कृष्ण देशीं गेले. शिंदे-होळकर यांनीं फौजेची समजावीस करण्यास आरंभ केला. राडा बहुत पडला. गंगाधर तात्यांची हतोटी थोडक्यांत माणसाची समजूत ठेवून माणूस हमराहा ठेवावे. हें करणें नारो गणेश यांजपाशीं कमी. याकरितां राडा पडोन राणोजी शिंदे चोंडीकर, बाईसाहेबांचे भाचे, पांचशें स्वारांचें पथक शूरत्वानें व

---

(४६) शेंडी उडत डिगेंत शिरले – निशाण पुढें धावत असतां त्याच्या काठीची पताका मागें फडकत राहते. जाट व गोपीनाथ घुले हे जीव घेऊन पळून जात असतां त्यांच्या शेंड्या वाऱ्यावर मागें उडालेल्या दिसत होत्या. **ते** – तीं, तीं चार पलटणें. **अवलपासून** – प्रारंभापासून. **तुटून** – अलग अशी. **किल्ला बांधणें** – आवळून शिस्तीनें गोल बांधून उभे राहणें. **फरकूं देणें** – फिरकूं देणें. **फरकूं न दिलें** – फिरकूं दिलें नाहीं. **शाबुतीनें** - शाबूत राहून, नुकसानी होऊं न देता. **तरबितर** – तारबितार. **तरबितर करून** – उध्वस्त करून किंवा दाणादाण करून. **मरीमाऱ्यांत** – जीवावरच्या संकटांत. भावार्थ होळकरांच्या फौजेनें एकटीनें जीव धोक्यांत घालून लढाई केली. शिंद्यांच्या फौजेनें लढाईनंतर लूट तेवढी केली. **जंबुरा** – उंटावरील तोफ. **रूरयात** – भीडभाड, संकोच. **बरहुकूमहिस्सा** – ठरलेल्या हिश्शाप्रमाणें, हिश्शाबरहुकूम.

(४७) राजयक्ष्मा – क्षय. **राडा** – भानगड, तंटा, बखेडा, त्रास. **हमराहा** – संतुष्ट, स्नेहांकित.

कांहीं मातुश्रीसाहेबांचे हिंमायतीनें, नारोपंत नानांची अपेष्टा फार करून तोंडाचा मागितला रुपया घेऊन, सुभेदारास रामराम करून, बाईसाहेब इंदुरास समजाविशीचे बंदोबस्ताकरितां आली होती, त्याजलाही रामराम करावयास गेले. तों बाईसाहेबांनीं सांगून पाठविलें कीं, " असा मळईखोर आहेस, तर मला तोंड दाखवूं नको. " तेव्हां राणूजी शिंदे यांनीं विनंती सांगून पाठविली कीं, " धनगराचेच घरावर ईश्वर सुवर्णाचा पाऊस पाडतो, आणि इतर सरदार मेले असें नाहीं. तुझे आशीर्वादेकरून चाकरी मिळवितों कीं, तें पहावें. ध्यानास येईल. " असें बोलून, जबाब देऊन, नागपूर प्रांत वऱ्हाड भोंसल्यांचें घरीं चाकरीस राहिले. सदतीस वर्षे चाकरी केली. इकडे कोणाचें तोंड पाहिलें नाहीं. पांच चार वर्षांनीं काळ होईल तेव्हां बाईसाहेबांनीं पत्रें पाठऊन बोलावून आणिलें. निंबहेडा महालपैकीं निमे जागा राणीपुरा जहागीर देऊन जहागीरदार केले.

(४८) इकडे माधवरावसाहेबांचा काळ झाल्यावर नारायणराव गादीवर बसले. दादासाहेब कैदेंत होते. सखारामबापू व मोरोबा फडणीस, थोडेबहुत आनंदीबाई यांचा विचार एक होऊन, नारायणराव यांचा आठवे महिन्यांत प्राण घेतला. हें वर्तमान समजतांच शिंदे होळकर कांहीं फौज पागा सरंजाम घेऊन पुण्यास दाखल जाले. दादासाहेब यांनीं कर्मांतर करून साताऱ्यास जाऊन राजाचीं वस्त्रें घेतलीं. तों नारायणरावसाहेब यांचें कुटुंब पुरंदरास, दो महिन्यांचा गर्भ असें कारभाऱ्यास समजल्यावर; अग्रेसर बाळाजीपंत नाना फडणीस, बराय मसलत बाह्यात्कारें सखारामबापू, मोरोबादादा यांस घेऊन मसलत केली कीं, साहेबांस पुण्याला येऊं न देतां विनंती करावी कीं, राजाचे शिरपाव झाले, ते पक्षीं जेजुरी, पंढरी देवदर्शन करून मग यावें. त्यांचेही मनास येऊन पुण्याकडे न येतां जेजुरीस गेले. फौजेंत मुखत्यार त्रिंबकरावमामा पेठे व लिहिण्याचें कामावर हरिपंततात्या. फौजेंत हुकूम

---

(४७) **हिंमायत** – वशिला, पुष्टीबळ, पाठिंबा. **तोंडाचा मागितला रुपाया घेऊन** – तोंडाला येईल तो आंकडा सांगून आणि तेवढा जबरदस्तीनें घेऊन. **मळईखोर** – दंगेखोर. **मळई** – मलई, दंगा. **धनगर** – होळकर. **मिळवितो कीं** – मिळवितो कीं नाहीं तें. **काळ होईल** – काळ होईल असें वाटेल तेव्हां, मरणकाळ जवळ आला असें वाटूं लागलें तेव्हां.

(४८) **कर्मांतर** – क्रियाकर्मांतर. **राजाचीं वस्त्रें घेतलीं** – राजाकडून. छत्रपतीकडून पेशवेपदाचीं वस्त्रें घेतलीं. **बराय मसलत** – मसलतीसाठीं, मसलतीकरतां **साहेबास** – रघुनाथराव पेशवे यास. **शिरपाव** – शिरोभूषण, पेशवाईचा दरक दिल्याबद्दल. **राजाचे** – छत्रपतीचे.

V. P. Bhagwat

उभयतांचा. जातीचा सरंजाम साहेबांचा हजार बारांशें. जेजुरीहून पंढरीस आले. पंढरीस आल्यावर दादासाहेबांस फितूर समजला. मग आपल्या सरंजामानिशीं सावध राहूं लागले. एक दिवशीं देवदर्शनास मामा व दादासाहेब बरोबर गेले. तेथें मार्गांत हुकमें चुरसाचुरस होऊन तरवार चालविली. त्रिंबकरावमामा कामास आले. साहेब आपले सरंजामानिशीं वेगळें पडून, सरकार फौजेंत हरिपंततात्यांनीं बंदोबस्त करून, पुणें मुक्कामीं नानांस पत्रें लिहिलीं कीं, " येथें आपसांत तरवार चालून त्रिंबकरावमामा कामास आले. श्रीमंत आपल्या सरंजामानिशीं वेगळे राहिले. आम्हीं सरकारी फौजेचा बंदोबस्त करून मुकाबला करून आहोंत. खर्चाची मदत लवकर करावी. " ऐसीं पत्रें रवाना केलीं. जों जों ही मसलत उघडीं होत चालली, तों तों बापू, मोरोबा फडणीस हे मनसब्यांतून गाळीत चालले. हरिपंततात्यांचें पत्र आल्यावर बापूस चिठी नानांनीं लिहिली कीं, पंढरपुरीं प्रसंग असा गुजरला. पुढें कैसें करावें ? तो अभिप्राय प्रायः ध्यानास आणून उत्तर सांगून पाठविलें. फौजेचा बंदोबस्त हरिपंततात्यांनीं केला आहे. खर्चाची मदत तुम्हीं करावी. हें श्रवण करून नाना प्रसन्न झाले कीं, भूतभविष्यवेत्ते हीं माणसें खरीं. मग हरिपंततात्यांचे खर्चाची मदत केली. यावर हरिपंततात्या दादांचे मागें लागले. दादासाहेबांचा विचार महेश्वरास जाऊन होळकरास आपलेंसें करावें. अशा बेतानें कसरावदेवर आले. तों बाईसाहेबांनीं कृष्णाजी मुरार यांजबरोबर फौज देऊन दादासाहेबांचे मुकाबल्यास पाठविलें. " या प्रसंगीं आपलें येणें अप्रशस्त. आपण धनी. आपल्यास प्रतिकूल कोण आहे ? पण प्राप्त प्रसंगाची हवा पाहिली असतां, आम्ही मारले जाऊं. यास्तव आपणास नर्मदा उतरणेस सल्ला नाहीं." तेव्हां अलीमोहनचे राज्यांतून महीचे सुमारें गेलें.

(४९) इकडे शिंदे, होळकर पुणें मुक्कामीं आल्यावर येथें फळी होतीच. शिंदे व नाना फडणीस यांचा मेळ पडून, होळकर, सखारामबापू व मोरोबादादा यांचा मेळ पहिल्यापासून होताच. तशांत तोतया भाऊसाहेब उभा राहून, डोंगर-

(४८) **हुकमें** – हुकूम देण्याचा अधिकार कोणाचा या मुद्यावरून. **चुरसाचुरस** – बोलाचाली. **मुकबला करून आहोंत** – दादासाहेबांच्या फौजेवर नजर ठेऊन आहों. **मसलत उघडी होत चालली** – बारभाईच्या मसलतीची परिस्फुटता होऊं लागली. **मनसब्यांतून गाळीत चालले** – मसलतींतून अंग काढून घेऊं लागले. **बाईसाहेबांनीं** – अहिल्याबाईनें. **हवा** – रागरंग. **आपणास नर्मदा उतरणें सल्ला नाहीं** – आपण नर्मदा उतरणें योग्य होणार नाहीं.

(४९) **फळी** – पक्ष, पक्षभेद, आपसांतील फूट.

कठाडीचे किल्ले दरोबस्त घेऊन सिंहगडास येऊं लागला. तेव्हां शिंदे होळकर यांस आज्ञा झाली कीं, तुम्हीं यासी धरून आणावें. हुकूम होतांच शिंदे कूच करून गेले. होळकरास जाण्यास अनुषंगावरोधेकरून अवकाश लागला. तितक्यांत शिंद्यांनीं धरून आणिला. त्याचें पारपत्य केलें. किल्ले, जागा घेतल्या होत्या, त्या खालीं करून घेतल्या. रामचंद्र नाईक परांजपे तोतया याचा पक्ष धरून खरे असें म्हणत होते, ते सरकारचोर झाले. यामुळें ते आपले ठिकाणीं साशंकित यास्तव सरकारआप्त, मातबर माणूस याचा आब घेतला असतां सरकार उपयोग (नाहीं) व लौकिक तादृश. दौलतींतील माणूस मात्र जाया होईल, असें जाणून पुरंदरास कोणास पाठाऊन त्याची दिलजमाई करून किल्याखालीं आणून पूर्ववत् व्यवसाय करून असावें असें केलें. शिंदे व नाना फडणिसांचा पेट्या एक. यांनीं मसलत करून बापू व मोरोबा व नारो गणेश, होळकराचे कारभारी, तिघांस जरब द्यावी असा व्यूह सिद्ध केला. हें वर्तमान इकडे समजल्यावर मोरोबा फडणीस, नारो गणेश उभयतांची मसलत होऊन बापूस इतल्ला केला. बापूंनीं या मनसब्यास दूषणें लाविलीं कीं, " श्रीमंतांचे राज्यांत फळी बांधून, धनी माथ्यावर नसतां अपस्वार्थाकरितां बखेडा करावा ही नेकसल्ला नाहीं. असेंच करणें असतें तर कंपेष वर्खाचा आरसा होता. यांत यावें तर दिल्लीपावतर पुणेंपावतर वंश केला असता. परंतु हें कृत्य करून हरामखोरीच्या मरातब्यास येऊन आपलें इहपरत्र

---

(४९) **अनुषंगावरोधेकरून** – अनुषंग–सोबत. होळकराच्या परिवारांतील लोकांनीं त्यास अवरोध म्ह. अडथळा आणला यामुळें. भावार्थ सैनिकांनीं पगाराकरतां दंगा केल्यामुळें. **खरे असे म्हणत होते** – तोतया हा खरे भाऊसाहेब होत, असे रामचंद्र नाईक परांजपे म्हणत होता. **सरकारचोर** – सरकारचे चोर, सरकारचे गुन्हेगार. **आब घेणें** – अब्रू घेणें. **लौकिक तादृष** – तूर्त लौकिक मात्र होईल. **दौलतींतील माणूस** – घरंदाज, सरकार कामास उपयोगी पडण्यासारखा मातब्बर वजनदार माणूस. **पेट्या एक** – एक पेट्या, गट्टी. **इतल्ला करणें** – विचारणें, पुसणें. **या मनसब्यास दूषणें लाविलीं** – हा मनसबा म्हणजे मसलत योग्य नाहीं असा दोष दिला. **अपस्वार्थाकतां** – स्वतःच्या स्वार्थाकरितां. **कंपेस वर्खाचा आरसा होता** – वर्ख म्हणजे सोनें किंवा इतर धातूचा अत्यंत पातळ पापुद्रा. सोनेरी किंवा रुपेरी मुलाम्याचाहि कागद करतात. तो अर्थातच सोन्यारुप्याचा नसतो अत्यंत चकचकीत असतो व त्यांत प्रतिबिंबहि दिसतें. तथापि कांचेवर लावलेल्या पाऱ्याच्या आरशांत जसें स्वरूप स्थिर व स्पष्ट दिसतें तसें त्यांत दिसूं शकत नाहीं. म्हणून खऱ्या आरशाची त्याला योग्यता नाहीं. येथें असल व नकल या अर्थी आरसा व वर्ख हे शब्द वापरले आहेत. सखारामबापूंचे

कां बुडवावें ? सांप्रत आपल्यास कैद करून प्राण घेतील. यांत आपली क्रिया राहून परत्र साधन घडेल. वांचणें किती दिवस ? कोणीही अग्रेसर होऊन श्रीमंताचे दौलतीची पैरवी बांधावी ही नेकसल्ला. " असा भावी इतल्ला करून योजिला घाट मोडून टाकिला. पुढें मोरोबा फडणीस याला कैद करून नगरचे किल्ल्यावर ठेविलें. सखारामबापू यांजला कैद करून कोंकणकठाडीचे किल्ल्यावर ठेविलें. जातेसमयीं आक्षेप घेतला कीं, नानांशीं आम्ही दोन गोष्टी बोलूं, मग जाऊं. तेव्हां नानांस गांठ घालणें प्राप्त आलें. गांठ घालून बोलणें झालें कीं, " तुम्ही हें कृत्य केलें फार चांगलें. उगाच प्राकृत संसार करण्यांत चार हुकूम असल्यास पुरी पडत नाहीं. तेव्हां ही तर दौलत. त्यांत धनी नाहीं. चार हुकूम म्हणजे दौलतीचा नाश आहे. परंतु या दौलतीचे रफीक पूर्वींपासून होळकराचे घर. सांप्रत तुम्हीं सिंदीबन वाढविलें आहे. यापासूनच तुम्हांस अपाय होईल. हें खचित मनांत वागवून फार जपावें. बाकी तुम्हीं विचक्षण, रजाचा गज करून दौलत नमुदास आणाल, हा मज भरवंसा. सांगितल्या गोष्टीस फार जपावें. " इतकें सांगून पालखींत बसून किल्ल्यावर गेले. पुढें नारो गणेश यांसी कैद करून पुरंदरावर ठेविलें, आणि होळकराची दिवाणगिरी दादाजी गंगाधर यांस सांगितली. या गोष्टीस संमत कांहीं बाईसाहेबांचेंही खरें. परंतु तुकोजी होळकर सुभेदार यांचा व दादाजी गंगाधर यांचा मेळ न पडतां सुभेदारांनीं दुखणें काढलें. कचेरी झालीच नाहीं. इकडे नारो गणेश यांनीं शिंद्यांचें साधन करून लाख रुपये देऊन सुटका केली. नानांस

(४९) म्हणणें असें कीं राघोबा हा पेशवाईचा खरा धनी नाहीं. त्याची बाजू उचलणें म्हणजे वर्खाला आरशाची प्रतिष्ठा देणें होईल. **कंपेष** – या शब्दाचा अर्थ येथें सहज, विनासायास असा आहे. **नेकसल्ला** – योग्य विचार. **मरातब** – मान, पदवी. **दौलतीची पैरवी बांधावी** – दौलत सांवरावी. **असाभावी** – अशा भावीं. **आक्षेप घेतला** – आग्रह धरला. **प्राकृत संसार** – छोटासा संसार. भावार्थ छोट्याश्या संसारांतहि एकमुखी सत्ता असली तरच तो सुरळीत चालतो. चार हुकूम देणारे असून कसें भागेल ? मग ही तर पेशव्यांची दौलत म्हणजे साऱ्या हिंदुस्थानचा संसार. तेव्हां तेथें चार जण हुकूम करणारे अग्रेसर असतील तर दौलत बुडावयास वेळ लागणार नाहीं. **रफीक** – स्नेही. **सिंदीबन** – बापूनीं केलेली ही कोटी. शिंदीचें म्हणजे ताडीचें झाड निषिद्ध आहे. शिन्दे हे शिन्दीच्या झाडासारखेच निषिद्ध व त्याज्य होत. पण तुम्ही तर शिंदे घराण्यावर भलताच लोभ दाखवीत आहात. असा बापूनीं नानास इशारा दिला आहे. **नमुदास आणणें** – सुस्थिर करणें.

समजाविलें कीं, तुकोजी होळकर याचें मनोधारण तोडून आपला अर्थ तो काय ? नारो गणेश कंपेष करतील याचा जिंमा आमचा. ऐसी खात्री करून, नारो गणेश यांजला सोडवून आणून पुन: दिवाणगिरीचीं वस्त्रें दिलीं. दादाजीचा कारभार सहा महिने राहिला. सहा महिने सुभेदार यांनीं कचेरी व स्मश्रू सोडून पलंग धरला होता. नारो गणेश कचेरींत आल्यावर स्मश्रू व स्नान करून शिरे दरबार झाला. त्या समयीं शिंदे यांनीं १५ लाख रुपये नजर कबूल करून विनंति करून घेतली. तेव्हां कोणीं कोणीं सुभेदारासही सूचना केली. आपणही विनंति करून घ्यावी. त्यांनीं उत्तर केलें कीं, " रुपये द्या, विनंति करून घ्या. यांत विशेष तें काय आहे ? आम्हांस श्रीमंत धनी आणि ब्राह्मण यांचा आशीर्वादच चांगला." विनंतीची खटपट केली नाहीं.

(५०) इकडे हरिपंततात्यास मसलत तोलेना. सबब शिंदे, होळकर यांजला मदतीस पाठविले, शिंदे व नाना फडणीस यांचा भीतरपेठा मेळ. कांहीं कारणांगभूत शिंद्याचे जाण्यास दिनावधी लागली. होळकर दरकूच पोंहचून कोंडाईबारी गुजराथचा काकड तेथें हरिपंततात्या, होळकर मिळोन दादासाहेबांशीं लढाई मातबर झाली. मानाजी फांकडे वगैरे पांच चार सरदार जखमी पाडाव करून होळकरांनीं आणिले. तसाच पाठलाग केला. दादासाहेब भडोचेस दाखल झाले. तेथें कांहीं उपद्रव करावा, (तर) इंग्रजांशीं वैर करून आज शहास गुंतून (पडावें पण तसें) पडावयाचें कारण नाहीं. ऐसी मसलत हरिपंततात्यांनीं करून माघारीं फिरले. सुभेदार इंदुरास गेले. हरिपंततात्या, फौज खानदेशांत पुणें मार्गाकडे रवाना करून, सडे, अहिल्याबाई पुण्यवान् व कारस्थानी दोन्हीं अंगें एकसारखीं, तेव्हां दर्शन घेऊन जावें या भावीं, महेश्वरास आले. बाईसाहेबांची भेट झाली. शिष्टाचार आदरसत्कार बहुत उत्तम झाला. तात्यांचे मनांत बाईसाहेबांसारखें मनुष्य, यांचें आपले कांहीं प्रामाण्य असावें असें मनांत येऊन, कृष्णाजी मुरार यांशीं बोलण्याचा व्यूह काढला. त्यांनीं स्पष्ट उत्तर दिलें कीं," अशा गोष्टी बाईसाहेबांशीं आम्हीं कोणीही बोलाव्या, इतकें कोणाचेंही पुण्य नाहीं. येथें त्यांचे

---

(४९) **कंपेष** – कमीअधिक. येथें अर्थ आवाडाव किंवा घालमेल. **शिरेदरबार** – खुला दरबार, भरदरबार. **विनंती करून घेणें** – नजरेचा पैका भरून पेशव्याची संमतिदर्शन पत्रें आणविणें.

(५०) **तोलेना** – संभाळवेना. **भीतरपेठा** – अंतस्थ, गुप्तपणें. **मेळ** – दोस्ती, एकमत. **तसाच** – त्याचवेळीं, वेळ न गमावता. **सुभेदार** – तुकोजी होळकर. **प्रामाण्य** – सख्य, शपथ, करार,

मुखावाटें आज्ञा होईल तितका व्यवहार करून आहों. अगोदर पुत्रशोक. त्यांत राज्य दुसऱ्याचे स्वाधीन केलें. त्यांत मनस्वी किलाफ. मातुश्रीच्या स्वभावांत पीळ. सूर्योदयापासून पुनः सूर्योदयापर्यंत सदाचरणाच्या घटका नेमलेल्या. त्यांत अवकाश करून हांक मारली असतां जाऊन प्रश्न करतील, तितकी विनंति करावी. अधिक बोललें असतां मर्जी कोणे कलास जाईल ही भीति. उदास म्हणोन गवताची पेंडी अथवा पावशेर तेल आज्ञेशिवाय कोणास प्राप्त होईल, इतकी मुखत्यारी कोणाकडे नाहीं. हा विषय आपण समक्ष बोलले असतां, रुकार अथवा अन्य विचार उत्तरांत काय निष्पन्न होईल तो खरा." हें त्यांचे गळीं उतरून, तिसरे दिवशीं रात्रौ फराळास बोलाविलें होतें. पांचशें खाशांचा बेत. त्याचा समारंभ उत्तम प्रकारचा सिद्ध होऊन, हरिपंततात्या मंडळीसह आले. मंडळी कचेरींत बसवून जातीनें आंगरखा पागोटें काढून बाईसाहेबांचे स्नानसंध्येचे बंगल्यांत आले. तों मातोश्री-साहेबांची स्नानसंध्या संपून देवघरांतून बाहेर आली. तात्यांस पाहिल्यावर गालीचा मखमली बसावयास टाकून, हरिपंततात्यांनीं दादाजीस हांक मारली. त्यास बोलण्याचा ओघ दादाजीकडून अगोदर समजलाच होता. दादाजी आल्यावर बंदी करून, तात्यांनीं बोलण्याचा व्यूह काढला. तेव्हां मातुश्रीसाहेबांनीं उत्तर केलें कीं, "आपलें बोलणें मुत्सद्दी काव्याचें. आमचा विषय पाहतां गैरसमजुतीबद्दल आमच्या उपमा अन्यत्रास देतात. ते आम्हीं प्रत्यक्ष, त्यांत बायका माणसें. आमची समजूत ती काय? आम्हास जें बोलणें तें उघडें बोलावें. त्याचें उत्तर करूं." तेव्हां तात्यांनीं कांहीं स्पष्टहि बोलून दाखविलें. त्याचें उत्तर "तात्या ईश्वरइच्छेकडून

(५०) **राज्य दुसऱ्याचें स्वाधीन केलें** – तुकोजीकडे तिनें सरदारीचा सर्व अधिकार सोंपविला होता त्यास अनुलक्षून. **किलाफ** – भानगडी, तंटे. **सदाचरणाच्या** – जप, देवपूजा, कथापुराण, व्रतवैकल्य इत्यादिकांच्या. **अवकाश करून** – सवड काढून. **विनंति करणें** – नम्रतेनें उत्तर देणें किंवा जबाब देणें. **उदास म्हणोन** – अहिल्या बाईसाहेब लौकिक व्यवहारास उदास आहेत म्हणजे तिकडे लक्ष देत नाहींत म्हणावे तर त्यांच्या हुकुमाशिवाय गवताची पेंढीहि कोणास देतां येणार नाहीं! **हा विषय** – बारभाईशीं करून घ्यावयाच्या दोस्तीसंबंधींच्या प्रामाण्याचा म्हणजे शपथ क्रियेचा विषय. **बंदी करून** – राबता बंद करून, जवळचे लोक बाहेर काढून देऊन. **आपलें बोलणें मुत्सद्दी काव्याचें** – आपण जो विचार सांगितला तो अनुभविक, राजकारणी मुत्सद्यांनींच विवरण्याचा आहे. मी मूर्ख, अज्ञान. माझी उपमा लोकांना देतात. ती मी, या विषयांत काय निर्णय देऊं! फिरून त्यांत मी बाईमाणूस पडलें. बायकांना तें ज्ञान किती!

मजवर सर्वोपरी गहजब. अशांत म्यां दौलत दुसऱ्याचे स्वाधीन करून राहिलें. आयुष्य तें परत्रेचे विचारांत काढावें. अशा भावीं नर्मदातीरीं क्षेत्र पाहून दिवस लोटतें. तथापि आमचा हा विचार कैलासवासी मल्हारजी होळकर यानें श्रीमंतांचे गादीशीं केला. त्यांत अवघे आम्हीं बांधलों आहों. जागजागां असें विचार घडूं लागले असतां, आमचे बुद्धीनें बेल म्हणजे भाजीपाला त्याचें साधन असें आहे! आपण श्रीमंतांचे दौलतीचे खैरख्वाह आहां. आपण वेगळें बोलणें बोलतां हेंच अप्रशस्त." अशा भावीं सडेतोड उत्तरें केलीं. यांत हरिपंततात्यांचे मनांत वैषम्य तर आलेंच, परंतु तात्यांची साधकता विशेष, यामुळें तो बोलण्याचा संबंध सोडून अन्यत्र गोष्टी बोलण्यांत, पोटांत कळ निघाली म्हणोन पाव घटका तेथेंच निद्रा करून बोलले कीं, "उपद्रव विशेष होत चालला. आज्ञा होईल तरी मी डेऱ्यास जाईन," "बहुत उत्तम आहे" असें बोलून त्यांस बिदा केले. ते मंडळीसह गोटांत गेले. पांचशें पात्रांचा समारंभ. पात्रें वाढून सिद्धता झाली होती. मंडळी गेल्यावर आपले पदरची मंडळी मुत्सद्दी, भिक्षुक, पागे वगैरे बोलावून फराळास घातले. त्याजकडेही दहीपोहे, लोणचीं, पापड, वडे ऐसा बहंग्या भरून शागिर्दा-हातीं पाठवून दिल्या. त्याजवर तिसरे दिवशीं कृष्णाजी मुरार यांसीं समाचारास पाठविले. ते जाऊन बोलणीं झालीं. कृष्णाजी मुरार यांनीं विनंति केली कीं, "ये विषयींचे मनोधर्म सुचविलेच होते. मालरावबावा कैलासवासी झाल्यापासून स्वभाव कोणाचेही हातीं नाहीं. पुण्यवान् धैर्यवान् यामुळें दिवस श्रमानें निघतात.

---

(५०) **परत्रेचे विचारांत आयुष्य काढणें** – मृत्यूनंतर परलोकांत चांगली जागा मिळावी अशा हेतूनें, राहिलेल्या आयुष्यांत पुण्यकृत्यें आचरीत असावीं इतकेंच आतां कर्तव्य राहिलें. **हा विचार** – पेशव्याशीं एकनिष्ठ राहण्याचा. **जागजागा असे विचार इत्यादि** – आम्ही म्हणजे होळकरांचे घराणें, पेशव्याशीं म्हणजे धन्याशीं एकनिष्ठतेनें बांधलेले असतां तुम्ही आम्हांस एकनिष्ठतेविषयीं आणप्रमाण करावयास सांगतां आश्चर्य वाटतें. मनाची एकनिष्ठता ती खरी. नाहीं तर शिवावरील बेल उचलून देण्याचें नाटक केलें तरी तें खरें नव्हें. बेल म्हणजे काय? झाडाचा पाला! **साधन** – सोडवणूक, गुंता उकलण्याची रीत किंवा मार्ग किंवा उपाय. **खैरख्वाह** – हितचिंतक. **पोटांत कळ निघाली म्हणून** – हरिपंत तात्यांना पोटशूळाची कायमची व्यथा होती. यावेळीं विषय बदलण्यास उपयोगी पडली! **साधकता** – समेटून घेण्याची हातोटी. **बिदा करणें** – निरोप देणें. **त्यांजकडेसहि** – हरिपंताकडेहि. **बहंगी** – पिशवी, करंडी. **स्वभाव कोणाचेहि हातीं नाहीं** – कोणाचेंच ऐकत नाहींत. (पुढील पानावर)

त्यांत आपलें येणें या ठिकाणीं कशास? तो योग झाला असतां त्यांत मज ओळखीचें कारण काय? आपलेसारखें मिठ्ठास व दुसऱ्याचें मनोधारण हें श्रीमंतांचे राज्यांत धुंडाळल्यानें मिळावयाचें नाहींत. ते पक्षीं रंगाच्या मोटा बांधून कूच करावें हे नेकसला." तेव्हां तात्यांनीं उत्तर केलें, "आपण बोलतां तसेंच घडेल." दादाजी प्रकृति पुसून आले. दुसरे दिवशीं हरिपंततात्या वाड्यांत आले. एकांतीं बाईसाहेबांशीं कित्येक प्रकारचीं बोलणीं होऊन बिदा मागितली. वस्त्रें, अलंकार देऊन बिदा केले. ते पुण्यास आले. महादजी शिंदे गुजराथेंत न जातां मागें राहिले होते, ते मागून उज्जनीस आले. तुकोजी होळकर गुजराथची स्वारी करून खानदेशांत होते. त्यांजकडे महेश्वराकडे जाणें वांकडे. कारण सहा महिने दिवाणगिरी दादाजी गंगाधर यांणीं केली. ते बाईसाहेबांचे इतल्यानें जावें. पुनः नारो गणेश यांची मुक्तता व कारभार सुरू झाला. याचा इतला सगळा मातुश्री बाईसाहेबांस नाहीं. यामुळें बाईसाहेबांचे अंतःकरणीं संशयाचे पर्वत. तेव्हां महेश्वरीं जाऊन सफाई होणें इतकें पुण्य कोणाचेंहि नाहीं. तथापि शमरुडाचे घाटें परभारें इंदुरास आले. मग महादजी शिंदे यांस इंदुरास बोलावून त्यांशीं बोलणें केलें कीं, "तुम्ही आमचे बंधू, ते पक्षीं मातुश्रीसाहेबांकडे जाऊन, आपसांतील सफाई करावी." तेव्हां पाटीलबावांनीं उत्तर केलें कीं, "श्रीमंत, मोंगल, भोंसले, या प्रकरणीं अधिकउणें जाब असल्यास त्यांतील व्यवस्था आपले मनोगतानुरूप घडून येईल. पण बाईसाहेबांपाशीं जाऊन यश यावें असें मनोत्साहास वाटत नाहीं. परंतु घरचें काम, ते पक्षीं जातों. घडेल तें खरें." असें बोलोन एक पालखी व चौघे खिजमतगार व घोडे कोतवाल इतक्यानिशीं महेश्वरास आले. बाईसाहेबांस समजतांच मुकुंदराव हरी दिवाण यांस सामोरे पाठवून बहुत समारंभानें किल्ल्यावर

(५०) **पुण्यवान्, धैर्यवान, यामुळें दिवस भ्रमानें निघतात** – अहिल्याबाई पुण्यवान् आहे, धैर्यवान् आहे यामुळेंच केवळ तिच्या दबदब्यामुळें होळकरांच्या दौलतीकडे कोणी पापदृष्टीनें पाहूं शकत नाहीं. **भ्रमानें** – जोरावर. **रंगाच्या मोटा बांधणें** – स्नेहाचा किंवा ऐक्याचा वरकरणी देखावा राखणें. **बिदा मागणें** – जाण्यासाठीं परवानगी मागणें. **त्यांजकडे महेश्वराकडे जाणें वांकडें** – अहिल्याबाईचें व तुकोजी होळकराचें पूर्ण वैमनस्य असल्यामुळें त्याला आपण होऊन महेश्वरास अहिल्याबाईकडे जाणें प्रशस्त वाटत नव्हतें. **इतला** – दखल, माहितगारी, संमति, अनुज्ञा. **सगळा** – बिलकुल. **पुण्य** – सुदैव, भाग्य. **कोतवाल** – स्वारीच्या घोड्याखेरीज जादा बरोबर बाळगलेले.

आणोन वाड्यांतच राहावयाची सोय केली. दुसरे दिवसापासून संपूर्ण कारभार, द्यावें, देणें, सुद्धां सोपला. जामदारखानेवाल्यास लाख रुपये पावेतों परवानगी कीं, पाटिलबावांनीं लाख रुपये कोणास देवविले असतां द्यावें. आमचे परवानगीचा आक्षेप घेऊं नये. असा बंदोबस्त करून, त्रिकाल भोजन मुतपाकांत, त्यांत दोन प्रहरां पंक्तीस, प्रातःकाल सायंकाळ मावशीबाईस आणून नाना प्रकारचीं खाणीं त्यांनीं व ब्राह्मणाचे पदार्थ करवून आपण जवळ बसून भोजनास घालावें. हा क्रम तीन महिने एकरूप चालला. पाटिलबावा बहुत प्रसन्न करून, अशा मावलीचे पोटीं जन्म घ्यावा अशा भावी बोलण्यात, परंतु ज्या कामाकरितां आले त्या बोलण्याचा प्रारंभ केला असतां पाटिबावांची रूरयात कांहीं एक न ठेवितां, कायम करून समेटाचे पर्यवसानास येऊं दिलें नाहीं. शेवटीं पाटिलबावाही दिक होऊन बोलले कीं, " बाईसाहेब आपण इतकी अंगवणाचीं बोलणीं बोलतां परंतु आम्हीं पुरुष आहोंत. आपले ढंगावर आलों असतां आपण काय कराल ? " याचें उत्तर " जसें तुम्हीं आपल्या बाया सुपारीच्या खांडासारख्या तोंडांत टाकून गिळून गेला, तोच बोध तुकोजी होळकरास करून उभयतां फौजबंदीनें येण्याचें करावें. इंदुरीहून तुमचें कूच, त्याच दिवशीं हत्तींचे पायांत अंडीं घालून तुमची खात्री करीन, तरच मल्हारजी होळकराची सून. तुमचे मनांत गुबार होता तो तुम्हीं बाहेर काढला. या गोष्टीस चुकाल तर तुम्हांस मार्तंडाची शपथ." मग पाटिलबावांनीं हंसल्यावर

---

(५०) **द्यावें देणें** – कुलमुखत्यारी. 'द्यावे' असा शेरा दिवाणानें लिहावयाचा व 'देणें' असा शेरा मालकानें लिहावयाचा; असे हे दोन्ही अधिकार महादजीकडे सुपूर्त केले. **परवानगी** – तोंडी आज्ञा किंवा हुकूम. **एकरूप** – एकसारखा, कमी-अधिक न होता. **खाणीं त्यांचीं** – मांसादिक पदार्थ. आहिल्याबाईकडे ते सर्व वर्ज होते. **दिक** – खिन्न. **रूरयात** – भीडभाड. **अंगवणाची** – ईर्षेचीं, जोऱ्याची. **आपले ढंगावर आलो असतां** – आपल्याप्रमाणेंच आम्हीही जोरा धरला तर. **तुम्ही आपल्या बाया सुपारीच्या खांडासारख्या इत्यादि** – हा महादजींला टोमणा आहे. दत्ताजी व जयाप्पा यांच्या बायकांचें आणि महादजीं शिंद्यांचें सरदारी-करितां पूर्वीं भांडण लागलें होतें. व त्यांत शेवटीं पेशव्यांना पडावें लागलें. त्या प्रसंगास अनुलक्षून अहिल्याबाई महादजी शिंद्यास म्हणतें कीं, तुम्ही आपल्या घरच्या खऱ्या अधिकारी बायांचा निकाल लावलात तोच सल्ला तुकोजीस द्या व दोघे एक होऊन माझा निकाल लावा म्हणजे झालें! **अंडी** – मोडी वाचनाची चूक. 'अंदू' असें पाहिजे. अंदू म्हणजे लढाईचे वेळीं हत्ती जाग्यावरून पळू नये म्हणून त्याच्या पायांत जो साखळदंड घालतात तो. **गुबार** – मनांतील गुप्त दुष्ट हेतु, कपट.

गोष्ट नेऊन मातुश्रींचें शांतवन केलें. तार ध्यानास आणिला. यश यावें ऐसें पाऊल दिसण्यांत येईना. सबब आज्ञा घेऊन इंदुरास आले. झालें वर्तमान सांगितलें. नारो गणेश यांनीं पाटिलबावांशीं वेगळे वाटें बोललें कीं, उभयतां सरदारांच संमत घडेल तर आठां दिवसांत बंदोबस्त करितों. हें बोलणें पांच विश्वे महादजीबावांसहि रुचलें. मग सुभेदार यांचें मानस महादजीबावांनीं पाहिलें. तेथें सुभेदारांचें उत्तर एकच पडलें कीं, " बाईसाहेबांचे पायापाशीं हरामखोरी मजकडून एकरूप व्हावयाची नाहीं. कदाचित् ढंग दोषें करून तिचे मनांत मजविषयींहि पाप आल्यास मी हात बांधून रुबरु जाईन. मग ती प्राण घेवो वा कैदेंत ठेवो. तें मजला कबूल आहे. परंतु हरामखोरी माझे प्राणांत प्राण आहे तोंपर्यंत होणार नाहीं. याकरितां दौलत उद्यां जात असेल तर आज जावो. मी जोडा संभाळून उभा राहीन, परंतु माझे वस्तू ही गोष्ट सुतराम होणार नाहीं." असा खंबीर सुभेदाराचा पाहून पाटिलबुवा नारो गणेशांशीं बोलोन उज्जनीस गेले. नंतर सुभेदार कूच करून आल्या वाटेनें पुण्यास गेले.

(५१) नाना फडणिसांचे मनांत पूर्वदंश होताच. त्यामुळें वाफगांवीं राहणें पडून सरदारी गळाठ्यांत आली. तों इकडे दादासाहेब यांनीं अंग्रेजांशीं बोलणें केलें कीं, " आमची दौलत चोरापोरी लुटली जात आहे, ते पक्षीं सहा आणे घेऊन आमची मदत करून आम्हांस राज्यावर बसवावें." ही गोष्ट अंग्रेजांचे मनांत भरून पांच पलटणें व पापडसाहेब व इस्टुर फांकडा दोघेही बरोबर देऊन बोरघाटाखालीं आले. तेव्हां पुण्यांत हलकल्लोळ होऊन, पुणें जाळून बाहेर पडावें असा विचार झाला. मग सुभेदार पुण्यास बोलावून मसलतीचा प्रश्न केला कीं, " साहेबांनीं अरिष्ट आणिलें, ते पक्षीं आपणही पुणें जाळून मोंगलास सामील करून यांचे मागें लागावें असा बेत केला आहे." तेव्हां सुभेदारांनीं उत्तर केलें कीं, " धनीपणाची मुखत्यारी आपणाकडे. आम्ही ताबेदार. सांगाल तैसें करूं. परंतु

---

(५०) **तार** – रागरंग. **वेगळे वाटे** – गुप्तपणें, एकांतात. **पांच विश्वे** – पांच टक्के, म्हणजे कांहींसें. **ढंग दोषेंकरून** – अभिमानामुळें किंवा गर्वामुळें. **माझे वस्तु** – माझ्या हातून, माझेकडून. **खंबीर** – खमीर, निश्चय.

(५१) **गळाठ्यांत येणें** – खालावणें, ओढघस्त स्थिति येणें. **सहा आणे** – रुपयांत सहा आणे हिस्सा. **इस्टुर फांकडा** – कॅ. स्टुअर्ट. 'फांकडा' ही मराठ्यांनीं कॅ. स्टुअर्टला त्याच्या शौर्याबद्दल खूष होऊन दिलेली पदवी. **साहेबांनीं** – (१) रघुनाथरावदादांनीं. (२) इंग्रजांनीं.

आमचे मनास वाटतें कीं, आपण एक लक्ष धरून गर्भवासी श्रीमंतांची आज्ञा या क्रमावर दौलत नमुदास आणिली, ते पक्षीं मुर्गीस बिसमिल्ला तो कशास ? आपली फौज जमा करून बोरघाट धरावा. घाट चढून वरती होतील तेव्हां घडणें तें घडों. आपले हातें आज आपलें घर जाळावें असें तुम्हांस संकट तें काय ?" ही गोष्ट नाना फडणीस यांनीं श्रवण करून बहुत संतोषातें पावले. मनांत विचार केला कीं, सरदार गळाठ्यांत असून समयास मसलतीचीं पैरवी उत्तम प्रकारची सांगितली. तेच समयीं सुभेदारांस फौज ठेवावयाची आज्ञा होऊन, वरकड सरंजामी जमा करून कांहीं इतलाखीचाही भरणा केला. तमाम फौज सुभेदारांचे हुकमांत चालावी ऐसी ताकीद होऊन बमय फौज सुभेदार घाटाचे तोंडीं आले. तों फिरंग्यांनीं एक पलटण ५०० माणूस, जय्यत चार तोफा, घाटावर चढवून लढाईचा मुकाबला घातला. त्या पलटणानें घाटावरून चौ तोफानें असा मार दिला कीं, पांच स्वार एके ठिकाणीं उभे राहूं दिले नाहींत. अशी दररोज लढाई चार महिने सतत झाली. ऐशीं हजार फौजेचा मेळ असतां उमष खाऊं दिला नाहीं. यामुळें नानाहि फार दिक् झाले. मग श्रीमंतांनीं स्वदस्तुर चिटी सुभेदारांस लिहिली कीं, "आपण जातीनें ऐशी हजार फौज असतां, एका पलटणाचें पारपत्य न होतां फौज हवा खाऊन राहिली. तेव्हां आम्हांस जातीनें येणें लागेल कीं काय ? आपलें उत्तर आलें म्हणजे तसाच बेत करावयास येईल ?" असी चिठी घेऊन सांडणीस्वार सुभेदार घोड्यावर होते तेथें आला. चार घटका दिवस होता. गाशा टाकून चिठीचें वृत्त श्रवण करितात, इतक्यांत पांच माणसें एकत्र पाहून तोफेचा गोळा आला. चार महिने श्रमाची दगदग आणि चिठीच्या मजकुराच्या फांसण्या, येणेंकरून चित्त विमनस्क होऊन डेऱ्यास आले. नंतर काशीराव होळकर, बापू

---

(५१) या क्रमावर – या रीतीनें. **दौलत नमुदास आणिली** – दौलत सुप्रतिष्ठित केली. **मुर्गीस बिसमिल्ला तो कशास ?** – कोंबडी कापायला मुसलमान आणावयाची यातायात कशास पाहिजे ! किंवा कोंबडीची हत्या करायला धर्मान्तर करून मुसलमान होण्याचें दिव्य कशाला ? भावार्थ, क्षुद्र गोष्टीच्या परिहारास भलतीच मोठी तयारी कशाला ! **बिसमिल्ला** – मुसलमानी मुलाणा किंवा मुसलमानी धर्म. **सरंजामी** – सरंजामी सरदार. सैन्याच्या नोकरीकरतां ज्यांना सरंजाम लाऊन दिलेला होता असे सरदार. **उमष** – उमस, विसांवा, श्वास घेण्याइतकी फुरसत, निश्वास टाकण्याइतकी फुरसत. **हवा खाऊन राहणें** – भयभीत होऊन राहणें, जरब खाऊन राहणें. **गाशा** – घोड्याच्या खोगिरावर घालावयाचें पातळ गादीसारखें आच्छादन. **फासण्या** – टोचण्या.

होळकर, भिकाजी होळकर, मल्हारराव होळकर चौघे पुत्र. त्यांत मल्हारराव होळकर याचें वय आठा वर्षांचें. तिघेजण बराबरीचें, काम करण्याजोगे. चौघांसही बोलावून आई, माई, जोरू, बेटी कांहीं एक विचार दुर्भाषणें बोलून, "श्रीमंतांचा मजला ओळंबा आला, ते पक्षी उदईक मजला मरावयाचें. मग तुम्हांस उमजेल." कोणेहि गोष्टीची बाकी ठेविली नाहीं. तेव्हां मल्हारजी होळकर लेंकरूं, काशीराव होळकर एकांगहीन, भिकाजी होळकर ते होळकरच राहिले. बापू होळकराचे काळजास भोंक पडून, त्याप्रसंगीं कांहींएक उत्तर न करितां तेथोन बाहेर आल्यावर पागे, बारगीर व शिलेदार सरदार यांस, प्रसंगास उपयोगी तितक्यांच्या घरोघर हिंडून, पदर पसरून, पायावर डोकें ठेवून, मागणें मागितलें कीं, "सुभेदाराचा वृद्धापकाल, त्यांनीं श्रमसाहस या दौलतींत केलें, तें आपण कानांनीं ऐकिलें नाहीं, मग पाहणें तर दूरच ! हे सर्व गांवखुर्द होऊन या प्रसंगीं वृद्धापकाळीं त्यांस श्रीमंतांचा ओळंबा आला. तेव्हां त्यांनीं तर मरणाचा संकल्प केला. पण त्यांनीं मरावें व आपण वांचावें, या वांचण्यास धिक्कार असो ! आमचे मरणाचे सोबती व्हावयाचें असल्यास चौघडा आखर झाल्यावर अमुक जागा घोडें न घेतां पादचारी ढालतरवारेनिशीं त्या ठिकाणीं हजर व्हावें. वडिलांचे पुण्येंकरून कामकाज होऊन

---

(५१) **आई, माई, जोरू, बेटी इत्यादि** – संतापाच्या भरांत तुकोजी होळकरानें आई-माईवरून शिव्या दिल्या. **जोरू** – बायको. हिंदुस्थानी शब्द आहे. **ओळंबा येणें** – दोष येणें, आरोप लागणें, ठपका येणें. **एकांगहीन** – एक अंग लुळे पडलेला. काशीरावाच्या एका अंगावरून वारे गेलें होतें. **भिकाजी होळकर ते होळकरच राहिले** – भिकाजी होळकरास अक्कल वा समजूत कांहींच नव्हती. **प्रसंगास उपयोगी** – लढाईंत जीव गमावावयास तयार अशा ईर्षेचें. **तें आपण कानानीं ऐकिलें नाहीं मग पहाणें तर दूरच** – होळकरांची सरदारी रक्षिण्यासाठीं तुकोजी होळकरांनीं फार पूर्वीपासून कमालीचें श्रमसाहस केलें. आपण जन्मलोंहि नव्हतों त्यांच्या आधींपासून त्यांचे पराक्रम झाले. ते इतके पूर्वीं होऊन गेले कीं आपल्या लहानपणीं त्यांच्या दन्तकथाहि आपल्या कानावर कधीं आल्या नाहींत. मग ते प्रत्यक्ष पाहण्यास मिळणें तर त्याहून अशक्य. या विचित्र भाषणाचा इत्यर्थ हा कीं, तुकोजीबावांनीं फार पूर्वीपासून पेशव्यासाठीं लढायांत अगणित कामकाजें केलीं, पण यावेळीं तीं सर्व विसरलीं जाऊन त्यास बोल लागण्याचा म्हातारपणीं प्रसंग आला आहे. तेव्हां ती गोष्ट आपण होऊं देतां कामा नये. **गांवखुर्द होणें** – गांवखुर्द व गांवखुद एकच. रद्दबातल, नष्ट, बिनकिमतीचे. समाप्त होणें. **चौघडा आखर** – चौघडा

आल्यास दौलत तुमची आहे. वांटून खाऊं. " या भावीं बोलणीं अस्तमानापासून दोन प्रहर रात्रपर्यंत एकेक माणसाशीं बोलून, आनंदानें रुकार दिला त्याचें नांव यादीवर लिहिलें. ज्यानें रडाच्या गोष्टी सांगितल्या, त्यास रामराम केला. ऐसी आसामी यादीवर १८०० आले. इतके सिद्ध करून डेऱ्यास जाऊन, घुटीची प्रार्थना यथास्थित करून, स्नान करून देवावर भंडारा टाकून, सुभेदारांचें नांव घेऊन कंबर बांधली. संकेतस्थानीं आले, तेथें यादीबरहुकूम जमाव झालाच होता. कोणकोण यावयाचे तेहि आले. एकत्र होऊन चाल केली. हें वृत्त कोणासही ठाऊक नाहीं. घाटाचें तोंडीं गेले. तोंपर्यंत पलटणवाल्यांसी ही खबर नाहीं. आठ कोसांचा छटा राहिला. त्यानें बिघडून जागा बिकट केली होती. जोंपावेतों पलटणवाल्यांस समजलें नाहीं, तोंवर मुकाट्याच गेलें. गडबड केली नाहीं. तोफेपासून गोळीच्या पल्ल्यावर बिकट पाहरे होते. त्यांनीं ऐकतांच, झडपून पाहरे कापून टाकिलें ! तेथोन हजार बाराशें बंदुकीचा एकदांच ताशेरा दिला. दुसऱ्यानें मेण्यांतून काढून हल्ला केला. त्यांनींही छरे मारण्यांत कमी केली नाहीं. आठराश्यांत मेळ होईपावेतों ६०० राहिले. सहाशांनीं तरवार करून, पलटण दरोबस्त बुडवून, चारी तोफा अडीचशें माणूस परतून आले. यांत चोवीस पालखीनवीस व तेरा हत्तीनवीस कामास आले. याशिवाय पागे बारगीर संख्या नाहीं.

(५२) हें वर्तमान सुभेदारांस समजलें. मर्जी प्रसन्न झाली. मेले, गेले, राहिले, इतक्यांचें घरोघर जातीनें सुभेदार हिंडोन, सर्वांची दिलजमाई करून, श्रीमंतांस पत्रें लिहिलीं कीं, " आज्ञेप्रमाणें पलटण कापून काढलें व इतक्यांत अंग्रेजांकडून

---

(५१) **ऐसी आसामी** – असे लोक. **घुटी** – प्रासादिक मद्य. **छटा** – छट्टा, अन्तर, फासला. **त्यानें** – इंग्रजानें. **बिघडून जागा बिकट केली होती** – इंग्रजानें तळाशी रचना बदलून मोर्चे बांधून जय्यत तयारी ठेविली होती. **बिकट पहारे** – ' पिकेटस, ' छबिन्याच्या चौक्या. ' बिकट ' हा इंग्रजी ' पिकेट ' शब्दाचा अपभ्रंश आहे. **त्यानीं ऐकताच** – ' त्यानीं येतांच ' असें मुळांत असावें. त्यांनी म्हणजे होळकराच्या लोकांनीं. **ताशेरा देणें** – फैर झाडणें, सरबत्ती करणें. **मेण्यांतून** – म्यानांतून. **मेण्यांतून काढून** – अर्थात तलवारी. **आठराशांत मेळ होईपावेतों** – लढाई संपून लोक परत आपल्या गोटांत येईपावेतों, १८०० लोकांपैकीं अवघे ६०० च जिवन्त राहिले. बाकीचे हल्ला करीत असतां ठार झाले. **सुभेदारावर ओझें ठेवून** – सुभेदारावरच जबाबदारी किंवा जोखीम सोंपवून. **चारी तोफा अडीचशें माणूस परतून आले** – शत्रूच्या ४ तोफा व २५० इंग्रजाकडील शिपाई पाडाव करून आणले.

सुभेदारापाशीं प्रेष आला कीं, " तुमची दोस्ती आम्हांस तोडावयाची नाहीं. दादासाहेबांस तुमचे तुम्ही आटोपून बंदोबस्त करावा. तुमची आमची दोस्ती पूर्वापार आहे, ती कायम करावी." असें बोलणें आलीयावर नानाकडे प्रेष पाठविला. त्यांनींही सुभेदारावर ओझें ठेवून उत्तर लिहिलें कीं, आपण प्रसंगीं आहां. कळेल त्याप्रमाणें ठरावांत आणून साहेब हस्तगत करून घ्यावे. मग सुभेदारांनीं अंग्रेजांशीं बोलणें करून, दादासाहेब व सहा आणीचा लेख व कांहीं मसलतखर्च व दादासाहेबांचा जवाहीरखाना मुंबईस आहे तो आणून द्यावा. त्यांनीं उत्तर केलें कीं, " जवाहीर व सहा आणीचा लेख हें कलकत्त्यास आहे. आम्ही चकती देतों. कोणास पाठवावें. घेऊन येईल. गुंता पडणार नाहीं." ऐसें बोलणें झाल्यावर मसलतखर्च व दादासाहेब व चकती आणोन हजर केली. मग सुभेदार पुण्यास आले. श्रीमंत जातीनें तीन कोस सुभेदारास सामोरे आले होते. भेटीचे समयीं श्रीमंतांकडील व सुभेदारांकडील तोफखाना सुरू झाला. शनवारचे वाड्यांत आले. नाना फडणीस यांनीं शिरेदरबार सुभेदाराचे चार घटका स्तुतिस्तोत्र केलें. सुभेदारांनीं एकच उत्तर केलें कीं, चाकरी चाकरांनीं केली, त्याचा इतका बडिवार कशास पाहिजे? इतकें बोलून विडे घेऊन मुजरा करून मुक्कामास आले. दुसरे दिवशीं बापू होळकरास भेटीस पाठवावे म्हणोन निरोप आला. यांनीं बापूस बोलावून सांगितलें कीं, भेटीस जाणें. बापूंनीं उत्तर केलें कीं, " मला श्रीमंतांशीं काम काय? आपण चलाल तेव्हां बराबरच चालेन." सुभेदारांनीं शिव्या दिल्या. हें वृत्त निरोप आणणारानें अवघे डोळ्यानें पाहिलें. मग सुभेदारांनीं त्या गृहस्थाशीं बोललें कीं, " कारटा हट्टीखोर आहे. मी येईन ते दिवशीं बराबर घेऊन येईन." मग चौ दिवसांनीं सुभेदार गेले. त्यांचे बराबर बापूही गेले. सुभेदारांचे पाठीमागें दोघे खिजमतगार त्यांत आपण उभे राहिले. नानांनीं सुभेदारास विचारिलें कीं, " बापू कोठें?" तेव्हां बापूनें हात जोडून विनंति केली कीं, " मी हजर आहे." नानांनीं पराक्रम ऐकिला.

---

(५२) **एकाद्यावर ओझें ठेवणें** – एकाद्यावर विश्वासानें निर्धास्तपणें कांहीं एक जबाबदारी सोंपविणें. **साहेब** – दादासाहेब. **सहा आणीचा लेख** – दादासाहेबांनीं रुपयांत सहा आणे इंग्रजास देण्याबाबत जो तहनामा केला तो. **चकती** – पत्र. **गुंता** – अडचण, हरकत, अडथळा. **शिरेदरबार** – जाहीर दरबारांत, जाहीरपणें. **बडिवार** – स्तोम, बडेजाव. **चलाल** – जाल, निघाल. **सुभेदारांनीं त्या गृहस्थाशीं बोलले** – सुभेदार त्या गृहस्थाशीं बोलले. **हट्टीखोर** – हट्टी, हटवादी. **आचार** – वागणूक, रीतभात. **पराक्रम तो ऐकिला आचार हा पाहिला** – इतका पराक्रम केलेला असून अशी गर्वरहित लीन वागणूक पाहून नाना फडणीस फार प्रसन्न झाले.

आचार हा पाहिला. येणेंकडून बहुत प्रसन्न होऊन, रावेर व कोंच महाल त्या दिवशीं जागीर करून दिली.

(५३) नंतर दादासाहेबांस झांशीचे किल्ल्यांत ठेवावें असा विचार. श्रीमंतांकडून हरी बावाजी व होळकरांकडून जीवनराव पागनीस अवसरकर या उभयतांस बराबर घेऊन, साहेब कुटुंबसुद्धां झांशीस रवाना केले. मार्गांत हरी बावाजीचा जाच फार होऊं लागला. तेव्हां सौभाग्यवती आनंदीबाईंनीं अमृतरावसाहेब यांजला सांगून ओंकारेश्वराचे अलीकडे तीन कोस मुक्काम, तेथून कूच करून पुढें जावें. तयारी झाली. घोड्यावर बसल्यावर अमृतरावसाहेबांनीं हरी बावाजी याचे गोटांत येऊन मशारनिल्हे आंगरखा घालून घोड्यावर बसावें, इतक्यांत रावसाहेब कां आले म्हणून यांचेसमोर आले. तोंपर्यंत रावसाहेबांनीं बासडा मारून पाडले, आणि घोडा उडवून आपले सरंजामांत जाऊन, तयारी होतीच, झांशीचा रस्ता सुधरून गुजराथचा रस्ता धरून पुनः अंग्रेजाकडे गेले. होळकराकडील व श्रीमंताकडील सरंजाम राहिला. ते कूच करून देशीं गेले.

(५४) नंतर मल्हारराव होळकर, सुभेदारांचे द्वितीय कुटुंबाचे चिरंजीव यांचें लग्न फार मोठें झालें. लांभाते यांची सोयरीक झाली. लग्नसमारंभ फार मातबर झाला. लग्नांत विघ्न, कचेरीचा मांडब जळाला! लाखों रुपयांचें नुकसान झालें! कांहीं माणसेंही जाया झालीं. श्रीमंत व नाना फडणीस लग्नास आले होते. नंतर श्रीमंतांचें लग्न झालें.

(५५) नंतर टिपूनें खंडणीचा ऐवज द्यावयास लबाडी करून फौजबंदीनें काकडावर मुक्काम केला. तेव्हां मसलत प्राप्त होऊन हरिपंततात्याबराबर फौज देऊन भोंसले, मोंगल सामील करून, हरिपंततात्या व सुभेदार व मोंगलाकडील फौज व भोंसल्याकडील फौज मिळून लाख फौजेचा जमाव करून टिपूचे मुलखांत शिरले. सावनूर बंकापुरावर लढाई मातबर होऊन टिपू उधळून आपले मुलखांत गेला. मागें हेहि दरकूच चालले. टिपूचा कागदपत्र येणें तो सुभेदारांकडे यावा. इतराशीं त्यानें गरज ठेविलीच नाहीं. नादी लावून श्रीमंतांचे फौजेवर छापा टाकावा, हा मनसबा करून तयारी केली. हें वर्तमान सुभेदारास समजतांच, अवघे सरदारांस इतल्ला करून, बुणगे पिछाडी डोंगर याचे आश्रयानें अलीकडे ठेवून,

---

(५३) **या उभयतांस बराबर घेऊन** – या उभयतांस बराबर देऊन असें पाहिजे. **ओंकारेश्वर** – ओंकारमांधाता.

(५५) **इतल्ला करून** – दखल देऊन. **इतराशीं** – इतरांशीं. **पिछाडी** – पिछाडीस.

सडे भारी घोडा राऊत असा सर्वांस इतल्ला केला. कोणीं ऐकून घेतलें. मोंगल, भोंसले यांनीं थट्टा केली कीं, सुभेदारांस म्हातारपणीं फार दिवस वांचावें हा अभिलाष उत्पन्न झाला आहे. अशा भावीं बोलले. ते सुभेदारांचे कानावरही आलें. तथापि क्षमा करून, आपले बुणगे दामदस्त राहुटी पाल पडदे बेलबाधी या कांहीं-एक न ठेवितां, एक बिचोबा (व) पलंग मात्र ठेविला. बाकी आपला गोट सडा जगरा केला, तों मागील प्रहर रात्र राहतां गोळा चालला. मोंगल, भोंसले यांचें येथें रामजानीचा तमाशा होत होता.ते जेथील तेथें राहून प्राण घेऊन निघावयास मुष्कील पडली ! त्या काळीं अवघ्यांस वाटलें कीं, सुभेदार सांगत असतां आपण हयगय केल्याचें फळ पावलों. मग टिपू सुलतानानें फौज लुटून नेऊन वेगळाली उभी केली. त्यांत सुभेदारांकडील एक म्हतारीचा बैल, जातें व पाळ ! तेव्हां त्यांस आश्चर्य वाटलें. ज्यांनीं हिंदुस्थान काबीज केलें, तेथें अशा सावधानीनेंच राहिलें म्हणून गुजारा झाला. नंतर टिपू सुलतान यानें लूट सुतळीच्या तोडयासुद्धां ज्याची त्यास पावती केली. सुभेदारांकडील म्हातारी तिजला साडी चोळी देऊन, एक बैल मातबर देऊन बिदा केली. पुढें दो चौ महिन्यांनीं सुभेदारांचे विद्यमानें खंडणीचा ठराव ठरून, पैका चुकवून देऊन, तमाम फौजा मुलुखांतून काढून दिल्या. पुणें मुक्कामीं आल्यावर सुभेदार वाफगांवास आले.

(५६) इकडे हिंदुस्थानांत महादजी शिंदे उज्जनीस होते. गोहदकर जाट यांचा इरादा, ग्वालेर घ्यावी, हें कायवाङ्मनःपूर्वक परंतु जातीचें अंगवण थोडें. तथापि उद्योग करीतच होता. तों ग्वालेर श्रीमंतांनीं शिंद्यास दिली. त्याच्या सोडचिठी घेऊन अंबोजी इंगळे ग्वालेरीस आले होते. अशा संधींत जाटानें कानपूर छावणींत फिरंग्याशीं पैगाम लावला. "पांच लक्ष रुपये आम्हीं तुम्हांस देतों. तुम्हीं ग्वालेरीचा किल्ला घेऊन आम्हांस द्यावा." त्यांनीं कबूल करून, चार पलटणें रवाना केलीं. त्यांनीं येऊन किल्ल्याची बदली होती असी संधी पाहून, उरवाईचे

---

(५५) **इतल्ला केला** – सल्ला दिला. **दामदस्त** – झाडून सर्व. **बेल–बाधी** – बैल वगैरे भारबरदारीचें साहित्य. **या** – वा. **बिचोवा** – छोटी राहुटी, लहान बिनखांबी तंबू. **जगरा** – जरारा असें पाहिजे. **जरारा** – सडा, सामानसुमान, अडगळ, बोजा जवळ नसलेला. **रामजानी** – कळवंतीण. **सावधानी** – सावधानता, दक्षता.

(५६) **ग्वाल्हेर द्यावी** – ग्वाल्हेर घ्यावी असें पाहिजे. **अंगवण** – पराक्रम. **पैगाम** – बोलणें. **किल्ल्यांची बदली होती** – एका अंमलदाराकडून दुसऱ्या अंमलदाराकडे किल्ला जात होता अशी संधि पाहून.

माजी किल्लेदाराकडील जमादार होता, त्याजला पंचवीस हजार रुपये देऊन, फितुरांत आणून त्या मार्गी किल्ल्यावर चढून आले. हें वर्तमान माजी किल्लेदार गोविंद शामराज यांजला समजतांच त्यांनीं तरवार धरली. ते सावध, हे बेसावध. तथापि निमक खाण्याची शर्त करून: जुवामर्दीनें देह अवसान जाहलें ! लौकिक त्यांचा जाहला. ग्वालेरसारखा किल्ला एकाएकीं हातीं आल्यावर अंग्रेज हमराहा होऊन शिरोंजेकडे चाल केली. अंबोजी इंगळे फिके पडून उज्जनीस आले. तेव्हां अंबोजीबरोबर महादजी शिंदे यांनीं दहा हजार फौज घेऊन फिरंग्याचे मुकाबल्यास रवाना करून, श्रीमंतांस पत्र लिहिलें कीं, " ग्वालेर प्रांतीं फिरंग्यांची पलटण येऊन ग्वालेर घेऊन पुढें चाल करून शिरोंज घेतली. आम्हींही त्यांचे मुकाबल्यास अंबोजी इंगळे दहा हजार फौज देऊन रवाना केले. सांज सकाळ आम्हींही कूच करून जातों. फौजेची खर्चाची मदत झाली पाहिजे." असें लिहून आपणही अंबोजीचे मागें चार मजलीचे अंतरानें राहत गेले. अंबोजी इंगळे यांचा व पलटणांचा मुकाबला लागला. समोर मुकाबला करून लढाई करावी, तर पुरें पडणें हे तर कठीणच म्हणून खांद्यावर भाला टाकून, भोंवताले हिंडून, रसद चारा पाणी यांजवांचून जेर केलें. मागें महादजीबावा हा दबाव, सबब पुढें चालावयाची हांव सोडून मागें ग्वालेरीचे मैदानांत आले. तेथें अंबोजी इंगळे व महादजी शिंदे एकत्र होऊन घेराघेरी आरंभिली. ऐसा क्रम ८ महिने चालला. कज्याखीचें आंग महादजी शिंदे यांजला हीन अंगामुळें कमी; सबब बेजार झाले. मग मातुश्री बाईसाहेबांस पत्रें पाठविलीं कीं, फौजेची मदत करावी. त्यावरून बाईसाहेबांनीं बाळूजी इंगळे सरदार व राजाराम रणसोड बराबर देऊन, दहा हजार फौजेनिशीं शिंदे यांस सामील झाले. क्रम तोच घेराघेरीचा प्रसंग. त्यांत पलटणवाल्यांनीं महादजी शिंदे मागें असत असी बातमी ठेऊन चार, तोफा, एक पलटण शिरोंजचे सुमारें जाऊन, तिकडून उलटून महादजीबावांवर छापा टाकला. पाटिलबावांस जिवंत धरावें असा समय

---

(५६) **निमक खाण्याची शर्त करून** – निमक हलालीची शर्थ करून, खाल्ल्या मिठास जागून. **निमक** – मीठ. **जुवामर्दीनें** – पराक्रम करून. **देह अवसान जाहलें** – ठार झाले. **हमराहा** – येथें अर्थ उत्साहित. **फिके पडून** – लज्जित होऊन, अब्रू जाऊन. **सांजसकाळ** – दिवस रात्र न पहातां सारख्या मजली करीत. **कज्याखी** – जातीनें केलेले कष्ट किंवा पराक्रम. **हीन अंगामुळें** – पानपतच्या युद्धांत महादजीचा पाय लंगडा झाला होता, यामुळें. **क्रम तोच घेराघेरीचा प्रसंग** – गनीमी काव्याचें सतत धांवपळीचें युद्ध. **मागें असता** – मागें आहेत, अशी बातमी काढून.

प्राप्त झाला होता. होळकरांकडील फौज बाजूस होती. त्यांस समजल्यावर, सरदार धरला जातो जाणोन, मागील चार घटका रात्रीचे संधींत घोडें घातलें. पलटणें कापून चारी तोफा घेतल्या. फत्ते झाली. व पुढें आघाडीस अंबोजी इंगळे यांनींही एक पलटण झामडलें. नक्ष जमला असतां महादजी शिंदे यांनीं हैबत खाल्ली. छापा खाल्ल्यावर तिसरे दिवशीं, मागील चार घटका रात्र आहे तों बाळाराव दिवाण व राघो मल्हार पोतनीस यांनीं मसलत केली. फौज कमी. तेहि खर्चाची अडचणीमुळें तन देईना. तेव्हां जातीनें उज्जनीस जाऊन खर्चाची सरबरा व देशीं लिहून आणखी फौज आणून मुकाबल्यास यावें असा मनसबा सिद्ध करून, राजाराम रणसोड होळकरांकडील यांजला बोलावून बराय मलसत विचारली कीं, " आम्हीं असा विचार काढला आहे, ही गोष्ट कशी ? " मग राजाराम रणसोड यांनीं बहुत निषेध केला कीं, " उज्जनीस जाऊन मसलतीचा सजल पाडणार, तोंपर्यंत समोरचा हरीप तुमची येण्याची वाट पाहील कीं काय ? उज्जनीस येऊन गोळे करणें त्यास अवघड तें काय ? यास्तव मसलतीचा सजल येथील येथेंच करणें ती करावी. पुण्याहून फौज व खर्चाची सरबरा होऊन त्या भरंवशावर यांसी पुरें पाडणें हें घडत नाहीं. तुम्हांस न तोले तर नजीबखान दिल्लीचा वजीर याजपाशीं लाख स्वार व तीन लाख पायदळ व बाराशें तोफा चालू आहेत. त्याजकडे वकील पाठवून पुढें मुलूख सोडविला जाईल त्याची सहा आणी त्याजला कबूल करून त्याची फौज आणवावी म्हणजे सहजच इभ्रत पडेल. " ही गोष्ट पाटिलबुवांचे मनास रुचून, " अत्याजी ! तुमचा त्याचा विशेष मेळ आहेच. तुम्हीं हें काम करावें. " (असे बोलले) मग याचे सरदार त्रिंबकजी इंगळे पैक्याचें झाड. फौज खर्चाचें तोंड. सबब इंगळे यांनीं आपलें अंग काढून सरदारी राजाराम रणसोडदास याचे गळां घातली . नित्य गांड घोडें खर्चाची अनुपत्य जाणोन, येथें राहण्यांत आपली पुरें पडत नाहीं. महेश्वरास उठून जावें तर नाकाबली येती. तेव्हां ही मसलत कबूल करून, पंचवीस हजार रुपये पाटिलबुवांपासून घेऊन दरकूच जयपुरास आले. जयपुरीं हिंमतबहादर गोसावी मशारनिल्हेस भेटले. त्यास त्यांनीं मसलतीचा ओघ

(५६) **झामडले** – झडप घातली. झडप घालून लुटले. **नक्ष जमला असता** – शत्रूवर मराठी फौजेचा जोरा किंवा वरचष्मा बसला होता अशा वेळीं. **हैबत खाणें** – कच खाणें. भीति घेणें. **तन देणें** – छाती करणें. **सरबरा** – तरतूद. **सजल** – सज, उपक्रम. **इभ्रत पडणें** – दरारा किंवा वचक बसणें. **अनुपत्य** – चणचण, ठणठणाट, अनवाप्ति. **नाकाबली** – नाकाबिलात, नादानपणा. **मसलतीचा ओघ** – इतिहास, पूर्वपीठिका.

सांगितला. त्यांनीं उत्तर केलें कीं, " तुमचा आमचा भाईचारा, ऐकाल तर नेकसल्ला सांगूं." पंत मशारनिल्हे यांनीं उत्तर केलें कीं, " या विदेशांत आम्हांस तुमच्यासारखा रफिक कोण ? सरकारची फौज कायम राहून गुजारा चालेल ऐसें कांहीं सांगावें." मग गोसावी बोलले कीं, " नजीबखान तुम्हीं पाहिला, तो आतां राहिला नाहीं. दिल्लींत आल्यावर नेकबंद, खरीच चाल, एक भाषण. तें कांहींच राहिलें नाहीं. आम्हीं रात्रंदिवस जवळचे राहणार, त्यास सहा सहा महिने वर्ष वर्ष आमचें दर्शन नाहीं. तेव्हां तुम्हीं जाऊन तुमची भेट होयास वर्ष सा महिने पाहिजेत. इतक्यांत तुम्ही खर्चाचे कोचवणींत येऊन डेऱ्याचे दांडे होतीलना ! शिंद्यावर उपकार व धन्याची चाकरी. यास्तव आमचे मतें तुम्ही याच जिल्ह्यांत काळ काढावा हें चांगलें." कोणे रीतीनें काळ काढावा ? तेव्हां हिंमतबहादर बोलले कीं, " आम्हीं नबाबापाशीं त्रासून येथें आलों. राजास शपथ केले. त्याचें म्हणणें भाईभेट यांनीं आम्हांशीं फेरबदलीच्या गोष्टी करतात. यांत एकादोघांचें पारिपत्य केलें असतां जरब पडून बंदोबस्त होईल. तुम्हीं ही गोष्ट करावी. त्यास आम्हांस या जिल्ह्यांत काळ काढणें. सर्वांशीं भाईचारा. वाईट कोणाशीं व्हावें ? यास्तव तुम्हीं विदेशीं. तुम्हांपासून ही गोष्ट घडावयाजोगी. तुमचा व राजाचा मेळ करून देतों." यांनीं उत्तर केलें कीं, " टोंक, रामपुरा हे आमचे महाल. हे अकलेश सोडून देऊन बाईसाहेबांशीं सफाई करावी म्हणजे आम्हांस राहण्यास प्रशस्त. पोटापाण्याचा बंदोबस्त करावा. सांगाल तरी चाकरी करूं." त्यांनीं कबूल करून राजाशीं बोलणें केलें. त्यांनीं ही गोष्ट कबूल करून यांच्या भेटी झाल्या. त्यांनीं टोंक, रामपुरा, अकलेश सोडून, विसा लक्षांची जायदाद फौजेस लाऊन देऊन, कामकाज सांगण्यांचें तें सांगितलें. बाईसाहेबांचें संमत आणून तेथें राहिले.

(५७) इकडे फिरंग्यांचे पलटणास घेराघेरी चाललीच होती. तों काशीचा राजा चेतसिंग यानें जमीयत करून फिरंग्यांचीं पांच पलटणें कापून काढलीं. काशीचे राज्यांत टोपी पाहिली असतां कंठस्नान घालावें हा क्रम चालला. तेव्हां पलटणास

---

(५६) **भाईचारा** – दोस्ती, स्नेह. **नेकसल्ला** – योग्य तोच सल्ला. **रफीक** – स्नेही. **गुजरा** – गुजारा, उपजीविका. **नेकबंद** – नेकीनें चालणारा, प्रामाणिक. **खरीच चाल** – सरळ वर्तणूक. **एक भाषण** – एकवचनी, दिलेला शब्द पाळणारा. **कोचवणी** – तंगी, अडचण. **डेऱ्याचे दांडे होणें** – डेऱ्याचें कापड झडून जाऊन फक्त दांडे शिल्लक राहणें. भावार्थ गळाठा होणें, दुर्दशा होणें. **भाईभेट** – भाईबेटे असें पाहिजे. **अकलेष** – अक्लेष, विनायास. **जायदाद** – जहागीर.

पायबंद पुरकस बसला. मग त्यांनीं पाटिलबावाशीं सलख करून निघोन गेले. जाट गोहदवाला फिका पडला. मग पाटिलबावांनीं ग्वालेरचा किल्ला घेऊन तमाम अंमल फैल केला. शेवटीं गोहदहि घेतली.जटास धरूस कैद केले.तों इकडे नजीबखानाचा काळ दिलीस झाला. तेव्हां सुनें रान पाहून, चमडावती उतरून आग्र्याचा किल्ला घेतला. त्यासमयीं लाला नौबतराय कोणी कायस्थ पाटिलबावांचे तोंडीं लागला होता. त्याजला फौजेची कंपूची बक्षिगिरी सांगून, जिवबादादा, बाळोबातात्या वगैरे शेणवई यांचें कांहीं एक न चालतां लाला नौबतराय सांगेल ती पूर्वदिशा. आग्रा येथील किल्ल्यांत अंमल फैल करून जयपुरचे मुलखांत स्वारी आली. जयपूरवाल्यांनीं, जोतपुरवाले व अमदानी, नजीबखानकडील सुभा व आपली जमीयत एकत्र करून लालसोडचे मुक्कामीं मुकाबला केला. अमदानी यानें हवा पाहून, लाला नौबतराय याजला तीन लक्ष रुपये देऊन फितूर केला. लढाईचा मोहरा यांचा त्यांचा लागला.एक दिवस तर फितूर समजण्यांत आला नाहीं.दुसरे दिवशीं निकाराची लढाई,पलटणें कंपू मुकाबल्यास उभा.एक ताशिरा खालीं चालवून लाला नौबतरायसुद्धां पलटणें उठून गेलीं. राठोडांनीं हल्ला केला.. पाटिलबावांस जिवंत धरून द्यावा हा इरादा. तों ईश्वर कृत्य. आमदानीस हत्तीवर गोळी लागून कामास आला. त्याची फौज बेबाद होऊन गेली. जयपुरवाले लबाडच, तेही तारगोवारगी राहिले. राठोडांनीं निःसीम चालवून घेतलें. महादजीबावांस धरून द्यावें तों विचूरकर यांनीं आडवे घोडे घालून, राठोड थोपवून कटा केला, यामुळें पाटिलबावांस सवड पाऊन ग्वालेरीस आले. पागोटें टाकून फेटा बांधिला. जुने मुत्सद्दी यांचे गळां हात घातले. "केल्या कर्माचें फळ (मला) पावलें. आतां संभाळावयाचें

---

(५७) **पुरकस** – पक्का. **अम्मल फैल केला** – आपले अम्मलदार नेमले. **चमडावती** – चर्मण्वती नदी. **तोंडीं लागणें** – प्रियपात्र बनणें. **हवा** – रागरंग पाहून. **मोहरा** – तोंड. **एक दिवस तर** – एक दिवसपर्यंत. **ताशेरा खालीं चालविणें** – बंदुकीची फैर शत्रूच्या अंगावर न सोडतां खालीं जमिनीवर सोडणें. भावार्थ, लढाईचें खोटें सोंग दाखवून. **बेबाद** – बेबंद असे मुळांत असावें. 'ब' 'बा'चा मोडीवाचनांतील घोटाळा. **तारगोवारगी** – ? **कटा केला** – 'खट्टा केला' असे तर मुळांत नसेल ? कटा असा शब्द धरल्यास कत्तल केली असें होईल. **पागोटें टाकून फेटा बांधला** – उद्वेग किंवा शोक दर्शविण्यासाठीं. **जुने मुत्सद्दी यांचे गळा हात घातलें** - जुन्या मुत्सद्यांची पुनः विनवणी केली. **फळ पावलें** – फळ (मला) पावलें. **हमराहा केली** – बरोबर दिली किंवा एकत्र केली.

असल्यास संभाळावें." (असा पश्चात्ताप केला.) तेव्हां सर्वांनीं विचार करून मराठे फौज हमराहा केली.

(५८) आग्र्याचे किल्ल्यास बादशाही सरंजामपैकीं नजीबकुलीखान यानें आग्र्यास मोर्चे लाविले. किल्ल्यांत लखोबा अंतरीवाला होता. यानें खूप किल्ला लढवून ग्वालेरीस पत्रें पाठविलीं कीं, कुमक आल्यास उत्तम आहे. आतां आमची पराकाष्ठा झाली. तेव्हां फाळके वगैरे पथकें थोरल्या लखबाच्या बराबर देऊन आग्र्यास किल्ल्याचे मदतीस पाठविले. यांनीं जाऊन, नजीबकुलीखान आग्र्याचे किल्ल्यास लागला होता, त्यांशीं लढाई करूच मोर्चे उठविले. मथुरा वगैरे ठाणीं कायम केलीं.

(५९) इकडे रजवाडेमात्र लहान मोठे एकत्र होऊन विचार केला कीं, दक्षण्यांचा अंमल ज्याच्या जिल्ह्यांत, त्यानें (तो) उठवून द्यावा. ऐसीं पत्रें रामपुरा व सावेरं व इंदुरपर्यंत आलीं. या मसलतीस रुकार बुंदी कोटेवाले यांचा मात्र पांच विश्वे. तुमचा अवघ्यांचा नमूद सिद्ध झाल्यावर आम्हांसही करणें अवघड तें काय ? असा लपेटवार रुकार देऊन, तरतें बुडतें पहावें या बेतांत. बाकी चंद्रावतांनीं रामपुरा घेतला. उदेपूरची दहा हजार फौज येऊन निंबहेडा, जावद वगैरे ठाणीं उठविलीं. सावेरचे जमीनदारदेखील बाहेर पडले होते. राणाजीची फौज येऊन निंबहेडा, जावद वगैरे ठाणीं उठविलीं. तेव्हां बाईसाहेबांनीं आंबाजीपंत, राघो रणसोड पागनीस यांचे मावसबंधु, यांचेबराबर हुजरात सरंजाम दीड हजार व कांहीं शिलेदार ऐसी तीन हजारांची भिडभाड त्याचे मुकाबल्यास पाठविलीच. चकरडा प्रांत मेवाड येथील मुक्कामीं राणाजींचे फौजेनें दोन प्रहरा छापा घातला. अंबाजीपंत मारले गेले. फौज रणभरी होऊन जावदेस जमा झाली. हें वर्तमान

---

(५७) मराठे फौज हमराहा केली – खरी विश्वासाची दगा न देणारी अशी आपल्या देशची मराठी फौज बरोबर दिली.

(५९) मात्र – झाडून सर्व. **रजवाडेमात्र** – झाडून सारे रजवाडे. **पांच विश्वे** – अर्धवट, संपूर्ण नाहीं असा. **नमूद** – मसलत. **लपेटवार रुकार देणें** – रुकार म्हणजे मान्यता असें लिहून देतांना पुढें लपेटींत " नाहीं, " असें लबाडीनें लिहून ठेवणें. भावार्थ, पळवाटीस जागा ठेवून मान्यता देणें. **तरतें बुडतें पहाणें** – बुडेल त्याची बाजू टाकून देणें व तरेल त्याची बाजू धरणें. भावार्थ, आधीं कोणाचाच पक्ष न धरता जो विजयी किंवा बळवान् ठरेल त्याची बाजू घेण्याचें स्वार्थी व लबाडीचें धोरण. **भीडभाड** – सैन्य, जमाव. **रणभरी होणें** – भय खाऊन रणांतून पळून जाणें.

महेश्वरी मातुश्रीसाहेबांस समजतांच, आबाजी रणसोड पागनीस यांचे डेरे बाहेर करून, शरीफभाई निसबत पागा हुजरात याजला पाठवून, करवंदीप्रमाणें थालनेर येथें पेंढारी पडले होते ते दरोबस्त आणून, जमादारांस मेजवानी करून वस्त्रें दिलीं. आणि ताकीद केली कीं, "मेले हो! तोंड दाखवावयास आलां, तर मेकसू घालून मारून टाकीन. मेवाड होतें कीं नव्हतें असें करून टाका." पेंढारी व आबाजी रणसोड व शरीफभाई रवाना झाले. शिलेदारांची तार बांधवून दिली. परंतु चकरडयाची लढाई मारल्यावर मेवाड हमराहा होऊन चंद्रावतांकडून रामपुरा घेवविला. तेव्हां उज्जनीस शिंद्यांकडील कुटुंबें होतीं. त्यांचें धैर्य हत होऊन, महेश्वरास पत्रें बाईसाहेबांस आलीं कीं, "आम्ही आपलेजवळ येतों." त्यास उत्तर बाईसाहेबांनीं लिहिलें कीं, "आल्यास तुमचें घर आहे. नक्षास बाध पडतो. तसाच प्रसंग पडल्यास तीन प्रहरांत तुमचेपाशीं दाखल होईन; घाबरूं नये." असें उत्तर लिहून खाजगत डेरा बाहेर दिला. तेथें रोज फौजेची हजरी. शंभर स्वार आले ते रवाना केले. पन्नास आले ते रवाना केले. पांचशें आले ते रवाना केले. आबाजी रणसोड व शरीफभाई तिसरे दिवशीं रामपुऱ्यास गेले. जातांजातांच मोर्चे लागले. हें वर्तमान मेवाडयांस समजतांच कूच करून दोन मजला चळद उतरून आले. हें वर्तमान आबाजी रणसोड व शरीफभाई यांस समजतांच रामपुरीयाचा शह सोडून संजीतीस मुक्काम केला. त्याचा यांचा छटा सा कोसांचा राहिला. तेव्हां रांगडयास खबर जातांच, दबाव पडून चळद उतरून गेले. सडा स्वार उतरून गेला. बुणगे चळद उतरत होते. इतक्यांत पेंढारी पोंचून बुणगे लुटून आणिले. दोनशें उंट व दीडशें घोडें शिवाय बैलबधीया घेऊन आले. शरीफभाईनीं आबाजी

---

(५९) **करवंदीप्रमाणें थालनेर येथें पेंढारी पडले होते इत्यादि** – करवंद बारीस पुष्कळ पेंढारी होते. तसेंच थालनेर येथें पेंढारी कामावाचून बसून राहिले होते त्यास आणविलें. **मेकसू** – मेखसू. कपाळमोक्ष करण्याकरितां डोक्यांत हाणतात ती मोठी लाकडी मोगरी. तंबू राहुट्यांच्या मेखा ठोकण्यासाठीं उपयोगांत आणतात तो हातोडा. **तार बांधवून देणें** – एकसारखा पुरवठा होण्याची तजवीज करणें. **मेवाड हमराहा होऊन** – मेवाडचा राजा होळकराश मिळाला. **धैर्य हत होऊन** – धैर्य गळून. **नक्षास बाध पडतो** – तुमच्या अब्रूस कमीपणा येईल. शिंद्याच्या बायका भीतीनें पळाल्या असा शिंद्याचा दुर्लौकिक होईल, म्हणून तुम्ही आहा तेथेंच रहा. **छटा** – छट्टा, अन्तर, फासला. **बैलबधीया** – भारदारीचे बैल. 'बधीया' हिंदुस्थानी शब्द आहे, त्याचा अर्थ a bullock; any gelded animal असा सांपडतो.

यांजला सांगितलें कीं, तुम्ही कूच करून चला, खडेदम लुटून घेतों, परंतु उभयतांनीं ऐकिलें नाहीं. मग मकाजी गिते शिलेदार यांच्या तैनातीस होते. त्यांजला दम देऊन अर्ध रात्रीं कूच करून पेंढारी घेऊन गेले. आबाजी शरीफभाई यांजला न पुसतां यशाचा अभिलाष सर्वत्रास, मुकाबल्यास गेले. तेथें रांगड्यांनीं बुणगे काढून सडा स्वार उभे होते. अंधाराचा मामला. यांच्या मतें कालच्यासारखें बुणगेंच आहेत. पेंढारी यांनीं तोंड लाविलें. तोंड लावतांच रांगड्यांनीं सडकलें. तोंच पांच चार पेंढारी जाया होतांच यांनीं पळ काढला. दामदस्त पेंढारी नाहींसा झाला. इकडे लष्करांत खबरहि नाहीं. मागील सा घटका रात्र राहतां फौजेचे कूच होऊन दिवस उगवतांच चळदचे कांठीं मुक्काम झाला. कोणी खोगीर उतरलें, कोणी उतरतो, कोणी घोड्यावरच, तों नदीचे पार फौजेचा धुराळा उठून राहिला. पेंढारी दोन दोन कोसावर तुंगचे तुंग उभे. तों रांगड्यांनीं मकाजी गिते यांस जिवंत धरावें या भावीं गराडा घातला. मकाजीपाशीं पागेचे स्वार मात्र दहा बारा. मकाजी गिता जुवामर्द, जातीनें शिपाई, हासड्याचे बळें रांगडा जवळ फटकूं दिला नाहीं. तशांत गांडीखालील घोडा पडला. तेव्हां पायउतारा होऊन मरणोन्मुख होऊन हातांत भाला, स्वार जवळ येऊं दिला नाहीं. इतक्यांत मशारनिल्हेच्या पागेचा कारकून नारो सिद्धेश्वर व चोपदार बोंब मारीत आले. त्या रांगड्यांची सरशी ऐकून पेंढाऱ्याचे बुणगे कांठाशीं होते, त्यांनीं आवळाआवळ करून मल्हारगड पाहिला. मग आबाजींनीं केशवराव फणसे तीनशें स्वारांचें पथक रवाना करून पार उतरून दिलें. त्यानें जाऊन मकाजी गिते यांजला शाबुतीनें काढून आणिलें. तों रांगडे हमराहा होऊन, पन्नास राऊत उठून फणसे यांचे मागें लागले. हे त्या स्वरांशीं खेळत खेळत येत आहेत. रांगडे गालभ, ते आबाजी व शरीफभाई डोळ्यानें पाहतात. दरम्यान नदी मात्र. तों आबाजीपाशीं शंभर राऊत हुजरातीचा भरंवशाचीं माणसें. हे घेऊन, नदीचे कांठीं येऊन, ठासन करून गोळ्या मारूं लागले. त्यांत ईश्वरी कृत्यानुसार रांगड्यांचें पन्नास स्वरांत अग्रगण्य पंजू जमादार सिद्धी व मालजी मेहता व चतरसिंह चेचाणी व बहादरसिंग सादुडीवाला आणखी एक दोन याला गोळ्या लागून कामास आले. बाकी राहिले ते गलबलले. तों

---

(५९) **खडे दम** – याच दमांत, उभ्या उभ्या. **दम देऊन** – धीर देऊन. **जुवामर्द** – जवान-मर्द. **तुंगचे तुंग** – ठिकठिकाणी घोळके करून, **हासड्याचे बळे** – 'बासड्याचे बळे' असें पाहिजे. **बासडा** – भाला. **मरणोन्मुख होऊन** – मारू किंवा मरू असा निश्चय करून. **गालभ** – गालब, जोर चढलेले. **ठासण** – ढासण, दबा, माऱ्याची जागा.

शरीफभाई यांचे हातास रामपुऱ्यावर गोळी लागली होती. रांगड्यांचें स्वार गलबलले पाहून, नदींत घोडा घालून पार झाला. तों मागाहून निराजी शामराज हुजरातचे स्वार घेऊन तोहि उतरला. रांगड्यांचे राहिले स्वार तेथेंच कापून टाकले. पुढें घोडे उचललें तेहीं हें चिन्ह (पाहून) पेंढारी जवळपास होतेच त्यांनींही उठावणी केली. तें मारीत मारीत एकलिंगजीपर्यंत गेले. कंपेश घोडे पांच हजार बाराशें मेहनतीच्या श्रमानें मेले. बाकी लूट कायम आली असेल, ती पेंढारीचे पेंढारी जाणेत.

(६०) सादडीवाला राजे सुलतानसिंग घरचा आला. दुसरे दिवशीं कूच करून जावद, निंबहेडा, राणीपुरा वगैरे किरकोळ महालांत ठाणीं बसवून रामपुऱ्याकडे आले. रामपुराहि सातावीसा दिवशीं अंमल झाला. चंद्रावत पळून अमदेस गेले. अमदेस मोर्चे लागले. ज्वाळा तोफा रामपुऱ्यास होती ती आणली. मोर्चे जमवून ज्वाळा जाया होती. (सबब) निमे बार भरून एक गोळा मारला. इकडील अलंग फोडून, भवानसिंग निजला होता त्याचे खपरेल उडून पलीकडील सफेल फोडून गोळा पार झाला. त्यांतच त्याचे टाके ढिले झाले. दुसरे दिवशीं हल्ला करावा असा आबाजी रणसोड, शरीफभाई यांचा विचार ठरल्यावर हें वर्तमान चंद्रावतास समजलें. त्यांनीं मार्गांत दारू बिछावून दिली कीं, हल्ला येतांच बत्ती द्यावी, म्हणजे माणसें उडून जातील. अशा भावीं दगा केला. इकडे मार्तंड साध्य. हल्ला आला नाहीं. तो अगोदर, भवानीसिंगाचे बंधु सोभागसिंग किल्ल्याबाहेर माणसें बसविण्यास आले, त्यांतून तोडयाचा गूल पडून दारूचा भपका उडाला. तों पन्नास माणूस जळून जातीनें सोभागसिंग फार जळाला. इतक्यांत हल्ला जाऊन पोंचला. त्याजला उचलून नेण्याचें किलेवाल्यास न बनतां किल्ल्यांत सांपडला. परंतु किलेवाल्यांनीं हल्ला मारून काढला. सोभागसिंगास घेऊन आले. त्यानें रदबदल फार केली. परंतु न ऐकतां सोभागसिंग चंद्रावत यास तोफेच्या तोंडीं देऊन उडवून दिला. चंद्रावतांत शूरत्वाचा व कर्तृत्वाचा तोहि खर्ची पडला. तेव्हां भवानीसिंगाची हिंमत न पुरतां तीनशें स्वारानिशीं रात्रौ पळून गेला. चोहो-

---

(५९) **घोडे उचलले** – घोडे उडविले, दौड केली. **तेहीं** – त्यांनीं. **हे चिन्ह** – हा रागरंग.

(६०) **सातावीसा** – सत्ताविसाव्या. **ज्वाला** – तोफेचें नांव. **अलंग** – तट. **सफेल** – तटावरील गच्चीची ठेंगणी भिंत. **टाके ढिले होणें** – घाबरणें. **बिछाऊन देणें** – पसरवून देणें. **तोडा** – बंदूक पेटवण्याकरितां उपयोगांत आणतात तो काकडा. **गुल** – ठिणगी. **तेव्हां भवानीसिंगाची हिंम्मत न पुरता** – भवानीसिंगाला दम न राहून.

करून जलुष वाढून पूर्ववत् बंदोबस्त राजास राज्य, प्रजास चैन (झाले) पुण्यास खबरा गेल्या. नाना फडणीस यांस वर्तमान समजून तोफा सोडून शिरेदरबार बाईसाहेबांचें स्तुतिस्तोत्र सहा घटिकापर्यंत गेलें. शापादपि शरादपि असे बायकांत अहिल्याबाई दिसण्यांत आली. आजपावेतों स्नानसंध्या धर्माची प्रवृत्ति ऐकण्यांत येत होती. आज पराक्रमाची गोष्टहि मोठीच केली. पुण्याचा दरवाजा म्हणजे माहिष्मती नर्मदा तीरचे, आम्हांस आज समजलें. संपूर्ण मानकरी सरदार यांनीं माना डोलविल्या.

(६१) पाटिलबावा ग्वालेरीस, फौजेची कमती, खर्चाची अडचण बदनक्षीचा बुरखा, यामुळें रात्रंदिवस चैन नाहीं. तेव्हां शेणवाई माणसें मोठीं. सदाशिवभाऊ व जिवबादादा व बाळोबा तात्या आदिकरून यांनीं आपसांत छाती चालवून पंचवीस लक्षांची तजवीज करून, देशीं जांब गांवीं बाळाजी जनार्दन होते त्यांजकडे कांहीं ऐवजाचा भरणा करून, दहा हजार फौज नवी कलमजारी करून आणविली. त्यांनीं फौज ठेवून, बापूजी जनार्दन कनिष्ठ बंधूसमागमें देऊन फौज रवाना केली. तेहि अमद मुक्कामीं येऊन पावले. त्या काळीं ग्वालेरहून शिंदे यांचीं पत्रें दिवसांतून दोन तीन आबाजी रणसोड, शरीफभाई यांस येत होतीं. यांचेही मनांत मदतीस जावें. तों देशीहून सुभेदार, शिंदे सोबती अडचणींत यास्तव नाना फडणीस याजशीं बोलणें केलें कीं, " सोबती अडचणींत. आम्हांस आज्ञा द्यावी. आम्हीं मदतीस जाऊं. " त्यांनींहि विचार करून ' उत्तम आहे ' म्हणून शिरस्त्यान्वयें बिदा केले. पुण्याहून वस्त्रें घेऊन माहिष्मतीस आले. अगोदरचे दंश, त्याची सफाई पांच वर्षें संशयाची निवृत्ती तुकोजी होळकर सुभेदार यांचे लक्षांतील निदर्शनें परभारें झालीं.

---

(६०) **जलुष** – दरारा, दबाव. **राजास राज्य प्रजास चैन** – राजाला राज्य व रयतेला सुख अशी सुस्थिति निर्माण झाली. **नर्मदा तीरचे** – नर्मदा तीरावरील. **माहिष्मती** – महेश्वर. **पुण्याचा दरवाजा इत्यादि** – पेशव्यांच्या राज्याची उत्तरेला पहिली चौकी महेश्वर असें तुम्ही सिद्ध केलें.

(६१) **बदनक्षीचा बुरखा** – दुर्लौकिक झाल्यामुळें बाहेर तोंड न दाखविण्यासारखी झालेली परिस्थिति. **नक्ष** – लौकिक. **बदनक्ष** – दुर्लौकिक. महादजीला लढाईंत फार मोठा पराभव खावा लागल्यामुळें लौकिकांत त्याची अब्रू साहजिकच कमी झाली होती. **छाती चालवून** – हिंम्मत करून. **जांब गांवीं बाळाजी जनार्दन होते** – हा बाळाजी जनार्दन म्हणजे नाना फडणवीस नव्हे. शिंद्याचा पदरचा मुत्सद्दी. **कलमजारी करणें** – पत्रें पाठवून नवी सैन्यभरती करणें. **सोबती** – शिंदे.

यामुळें श्रीमंत दयाळू, कागदीपत्रीं सफाई झालीच होती. आज्ञा घेऊन हिंदुस्थानांत जाण्याचें संमत अगोदर बाईसाहेबांचे आणून, मग नानाशीं बोलण्याचा उपयोग. श्रीमंतांकडून बिदा होऊन महेश्वरीं आले. भागाबाई, काशीराव होळकराची कन्या, हिचें लग्न करून कालगावडे मोत्याजीबावाचे पुत्रास देऊन, अंबोजी इंगळे शिंदे यांजकडून आले. ते सालशी दाखवावयास गेले. स्वार सरंजाम उज्जनीस ठेवून, एक पालखी, एक घोडा, चार शागीर्दपेशाचीं माणसें असी जांबेपर्यंत येऊन, तेथें शागीर्दपेशा अवघे टाकून, एक घोडा, दोन माणसें घेऊन शहरांत आले. घोडा माणूस शहरांत सोडून, एक माणूस आपण रोजची प्रवत्तीसारखें जाऊं लागले. ते किल्ल्याचे दरवाजांत जाऊन बंगल्यांत शिरून रामराम मातुश्रीस करून बसावयास लागले. मातुश्रीसाहेबांनीं ओळखून डोळे फाडून बोलली कीं, "मेले हो, सोदे हो, चार सोदे मिळून शिंदे यांचे दौलतीस धक्का दिला. तसी बयमानी करून येथेंही छद्म करूं पाहतां. परंतु मेखसू घालून डोकसें फोडून टाकीन." ऐसें बोलून शिरेदरबार उठवून दिलें. करावयास गेले साधाकपणा, त्यास श्रीमंतीचे समजण्यांत आलें कीं लबाडी करून चवकशीस बट्टा काढला. हे समजुतीस येऊन जरब दिली. तो साधला. गोविंदपंतदादा खाजगीवाले यांजकडे जाऊन, लाख रुपये नजर देऊन, त्याच दिवशीं मर्जी संपादून लौकिक व्यंग दिसूं दिलें नाहीं.

(६२) पुढें सुभेदार कूच करून चालले. तेव्हां पुढें काशीराव होळकर यांचे बरोबर फौज व पांडुरंग शंकर मुखत्यार करून देऊन, पुढें रवाना करून, मागाहून खास स्वारीचे डेरे बाहेर होऊन पंधरा दिवसांत कूच झालें. मेवाड येईतों पावेतों इंगळे बराबर होते. भिलाडयाचे मुक्कामीं आलीयावर आपला प्रसर होत नाहीं असें पाहून, युक्तीनें आज्ञा घेऊन ग्वालेर प्रांतीं गेले. भिलाडयास मुक्काम

---

(६१) **सालशी** – साळसूदपणा, सचोटी, गरीबी. **रोजची प्रवृत्ति सारखे** – रोजच्या प्रवृत्तिसारखे, नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें. **बयमानी** – बेइमानी. **छद्म** – कपट. **श्रीमंती** – श्रीमंताचे स्त्रीलिंगी रूप. येथें श्रीमंती ही पदवी अहिल्याबाईस लाविली आहे. श्रीमंत पेशवे तशी ही श्रीमंती अहिल्याबाई. श्रीमंती म्हणजेच श्रीमति. **चवकशीस बट्टा काढणें** – चवकशी म्हणजे जुन्या काळच्या टांकसाळींतील, खरीं–खोटीं नाणीं तपासून घेणारा अधिकारी. त्यावरूनच 'चोकशी' हें आडनांव पारशांत गुजरथ्यांत रूढ झालेलें आढळतें. येथें भावार्थ कीं, अंबोजी इंगळ्यानें सरकार कामांत स्वतःचा स्वार्थ साधला. **समजुतीस येऊन** – समज करून घेऊन.

(६२) **प्रसर** – प्रवेश.

फार झाले. तळ सडक चार कोस. मागें पुढें होण्यांत बमण्याची गढी चौबुर्जी त्या गढीवरून रंव पडली. ठाकूर पांच सात दहा माणसें पारावर बसलीं. सरकारस्वारी निघून गेली. भेटी केल्या. सर्वांशीं रामरामी झाली. रवेचा तमाशा पहात बसले होते तों जिवबा आणा सबनीस यांचे बंधु यांस कांहीं गैरआराम सबब पालखींत होते. यास बिगारी पाहिजे होता म्हणून गांवकऱ्याकडे जासूद पाठवून बिगारी आणविला. ठाकरानें उत्तर केलें कीं, आम्ही भले माणूस शिपाई बसलों आहोंत. गांवांत माणूस असलयास बेगारी आणून देऊं, असें माणसानें येऊन सांगितलें. यांनीं तोराखालीं सांगितलें कीं, त्यांतून एक ओढून आणावा. तेव्हां जादूस पुनः जाऊन एकास ओढलें. तों गांवचा ठाकूर ओढून आणला. त्यानें बहुता प्रकारीं सांगितलें कीं, मी ठाकूर गांवचा आहे. क्षण दम धरा. बिगारी आणून देतों. असें नरम बोलतांच, सबनीस यांनीं शिवी दिली. शिवी ऐकतांच तरवार मेणांतून ओढून सबनीसावर हात टाकिला. तों पिंजणी नव्हती. दाढी तोडून गर्दन एका हातानें वेगळी केली. आणखी दोघे चौघे जरबाऊन गांवांत गेले. सबनिसाचें वर्तमान सुभेदाराला समजतांच स्वारी माघारी आली. येतांच गराडा घालून हल्ला केला. रांगड्यांनीं तीन मारून काढले. मग शेवटीं सुभेदारांनीं बापू होळकर यांजला शिव्या दिल्या. 'तुम्हीं एकीकडे व्हावें. आम्ही हल्ला करतों.' पग बापूसाहेब पायउतारा होऊन कुदून पडले. गढीच्या चारी अलंगा मजबूत, चढावयाचा लाग नाहीं. मग सयदूभाई यानें गोळे–माणसाचे डोकीवर हातावर गोळा, त्यांत हात घालून वर चढावें असें हातावर गोळा, अशा तऱ्हेनें हल्ला चढला. त्यांत रजपुतांनीं गोळ्या मारल्या. तेल कढवून टाकिलें. दगड जात्याच्या तळ्या त्याही वर टाकिल्या. यांत

---

(६२) **सडक** – संपूर्ण किंवा आख्खे. **गढी चौबुर्जी** – बुरूज असलेली तटबंद लढाऊ गढी, किल्ला. **रंव पडणें** – सैन्याचें कूच होतांना एकामागें एक माणसांची लागलेली रांग. **भले माणूस** – शिलेदार. **तोरा** – गर्व, ऐट. **पिंजणी** – गळ्याचें रक्षण करणारी कॉलर ! **दाढी तोडून** – गळा कापून. **कुदून पडणें** – उडी घालून पडणें, तुटून पडणें. **अलंग** – तट, भिंत. **लाग** –सोय. **माणसाचे डोकीवर, हातावर गोळा इत्यादि** – या वाक्यांचा अर्थ लागत नाहीं. तट चढावयास आलेल्या सैनिकांच्या डोक्यावर एक हातभर उंच असा तोफेचा गोळा तटांत मारावा. मग त्या गोळ्यानें पडलेल्या भोंकांत हात घालून सैनिकांनीं वर चढावें. मग पुन्हा सैनिकांच्या डोक्यावर एक हात अंतर ठेवून तोफेचा गोळा मारावा कीं त्या सैनिकांनीं त्या दुसऱ्या भगदाडांत हात देऊन आणखी वर चढून जावें. अशा कष्टानें तट चढून तुकोजी होळकरांच्या सैनिकांनीं हल्ला चढविला.

माणूस जाया फार झालें. नक्षावर नजर. बापू होळकर जातीनें आंत कुदून दरोबस्त कापून टाकिले. एक बायको होती, ती मात्र मारली नाहीं. जिवंत धरून आणली. गढींत अर्थ पाहतां एका मडक्यांत पावशेर दारू, याशिवाय धान्य अथवा कांहीं-एक नाहीं. त्या बायकोस लुगडेंचोळी देऊन सोडून दिलें. माणूस जखमी अतोनात झालें. ऐसी हजार रुपये जखमीना लागला. त्याशिवाय बक्षिसा. नक्षामुळें इतकें करणें प्राप्त. शिवाजी बल्लाळ प्रस्तुत हुजूर आहेत. त्यांचे घरचे पुरुष या दौलतींत, याजसुद्धां तरवारीखालीं अठरा कामास आले.

(६३) तेथोन अल्लीबहादरासुद्धां कूच करून मथुरे सुमोरें महादजी शिंदे यांच्या भेटीचा इरादा धरला. तेव्हां नारो गणेश यांचें कर्तृत्व पाटिलबावा यांचे ध्यानांत. आजपावेतों डोंगरी मोर नाचविलें; आतां अवघड पडलें. ऐसें जाणून आबा चिटणीस यांजला सामदामादि भेदार्थ पुढें सामोरें पाठविले. ते साता मजलीचे तफावतीनें येऊन भेटले. नारो गणेश असतांना चढवीत होते. त्यांचे शांतवन एक रात्रींत करून, प्रातःकालीं नारो गणेश यांजला बराबर पाटिबावां-कडे घेऊन जावें असें ठरावून, आबाजी चिटणीस व नारो गणेश उभयतां गेले. तों महादजीबावा जातीनें तीन मजला सामोरे आले. नारो गणेश यांची व पाटिल-बावांची भेट झाली. नारो गणेश यांची जरब बाळगून पाटिलबावा होते. त्यांतील कंपेशी आबा चिटणीस यांची भेट झाली होती. खाशांची भेट झाली होती. खाशांची भेट होऊन भविष्यानुरूप बुद्धींचें (वाटोळें) होऊन रंगांत रंग मिळविला. पुढें सुभेदार व अल्लीबहादर यांच्या व पाटिलबावांच्या भेटी झाल्या. तोफखाने सुरू होऊन पूर्वरंग उत्तम झाला. मथुरेस आल्यावर मुलख सुटला, त्याच्या वांटणीचा प्रसंग पडला. त्यांत नारो गणेश यांच्या बोलण्यांतील आशय, भेटीचे पूर्वीं इरादा दिसत होता, त्यांतील समारोप होऊन बोलणें मिश्र पडूं लागलें. तेव्हां मिलाफाचें

---

(६२) आंत कुदून – तटाच्या आंत उडी टाकून. **जखमीना** – जखमी झालेल्या शिपायांना जखम बरी करण्यास मदत म्हणून देण्यांत येतो तो खर्च. **नक्ष** – प्रतिष्ठा प्रतिष्ठेचें रक्षण.

(६३) डोंगरी मोर नाचविणें – मोठ्या आढ्यताखोरीनें वागणें. **कंपेषी** – न्यून. **इरादा दिसत होता त्यांतील समारोप होऊन** – पूर्वीं जो इरादा म्हणजे हेतु त्यांनीं धरला होता त्याचा समारोप झाला म्हणजे त्यांनीं आपला हेतु बदलला, आणि म्हणून मिश्र बोलू लागले. **मिश्र बोलणें** – सरळ न बोलतां छक्के पंजे ठेवून किंवा कांहीं हातचें राखून बोलणें. **मिलाफाचे** – मिलाफाचे असें पाहिजे.

बीजारोपण होऊन सुभेदारांचे मनांत विकल्प आला. पुढें महादजी शिंदे गंगास्नानास चालले. त्यांचे समागमें नारो गणेशहि गेले. पुढें जातेसमयीं शिलेदारी खर्चाची याद होऊन मोघम ऐवज राजश्री पाराजीपंतबावा यांजकडून देण्याविषयीं आत्माराम शिवराम तांबोळी, वाकड्याचे गुमास्ते, याजला सांगून गेले. गंगेस गेलीयावर, गंगेच्या साक्षभूत काय बोलणें झालें असेल तें त्यांचें ते जाणोत, सुभेदारांकडे मुलुखाचे वांटणीबद्दल नव लक्षांचा मुलख खुरजा, गडमुक्तेश्वर वगैरे महाल लाऊन दिले. अलीबहादरांचें बोलणें खर्चास घेऊन स्वस्थ असावें. हे भाव बोलण्यांत आणून महालच्या सोडचिठ्या घेऊन माघारीं आले. सुभेदारांस सर्वार्थ समजाविला. त्यांत बोलणें मागील कांहींएक ओळख दिसण्यांत न येतां सोबत्याकडील कड धरून बोलणें पडलें. त्या बैठकींत मनओळखीचा प्रसर होण्यास आरंभ झाला. हे कारभारी सरकार यांचे मनओळखींत तथा राहिली नाहीं. ते दिवसापासून दिवाणाचे चालीचे पर्याय, मातुश्रीसाहेबांस व श्रीमंतांकडे नानांस, कच्चे व्यवहार ज्यांत अलीबहाद्दरसहित प्रतिकूलता पै दर पै दर्शविण्यास आरंभ होऊन, जुने माणूस शिवाजी गोपाळ पारनेरकर यांजला नानांचें संमतें बाईसाहेबांनीं महेश्वरीं आणिलें. मग कैद करण्याविशीं दोहोकडील हालवंत रजा आणविल्याच होत्या. तों पाराजीपंतबावांस नानांनीं विचारलें कीं, शिलेदाराची वांटणी कसी केली ? त्यांनीं उत्तर केलें कीं, फडणिसाचे कागदांत पाहून घ्यावें. मग खंडोपंतबावास विचारलें कीं, शिलेदाराच्या वांटणीच्या यादी दाखवा. त्यांनीं काढून दाखविल्या. त्यांत सांगितल्याखेरीज शिलेदार कारकून यांचें नांवें आठ दहा हजार रुपये जास्ती पडले. तें पाहून नारोपंतास अति क्रोध येऊन, खंडोपंतांस अनिर्वाच्य शब्द शिरेकचेरींत बोलूं नये, ते बोलले. तथापि खंडोपंत याजकडे कारकुनीचा पेशा, सबब खामोश करून उत्तर केलें कीं, हा राग आम्हांवर काढून अर्थ काय? देण्याघेण्याची मुखत्यारी आम्हांकडे नाहींच. सुभेदारांचे परवानगीनें पाराजीपंतबावाकडून देवऊन आम्हांकडून लिहिविलें तें आम्हीं लिहिलें. असें बोलल्यावर कमलदान उचलून मारावें. मारलें मात्र नाहीं. परंतु सुभेदार व पाराजीपंत या उभयतांचा उद्धार ज्ञानाचा व उत्पन्न कसें होतें याचा उच्चार करण्यांत सेव्यसेवकत्व राहिलें नाहीं. नंतर खंडोपंत यांणीं रुमाल आटोपून घरांत आले. अंतःकरणास बहुत खेद केला कीं, रावजीपंतबावाचे संस्थानाशीं आजपावेतों अशीं भाषणें कधीं झालीं नव्हतीं. आम्हीं त्याचे सेवकांत असे

---

(६३) तथा – बाकी. **हालवंत** – हाल adj Quick जलदीनें. **रजा** – परवानगी.

कुलदीपक उत्पन्न होऊन, या अधिकारास प्राप्त झालों. मग अर्धरात्रीचें समयीं यजमानांचे चिरंजीव चिमणाबापू हे रुमाल व कमलदान घेऊन सुभेदारांकडे गेलें. रुमाल, कमलदान बापू सुभेदारापुढें ठेवून नमस्कार केला कीं, " या दौलतींत थोरले सुभेदारापासून रावजीपंतबावाचे घरचा अपमान कधींहि झाला नाहीं. तो मी कुलदीपक कारकून उत्पन्न – (यापुढील कांहीं मजकूर गहाळ)

(६४) चिरंजीव कांहींएक निघो पावलें नाहींत. कोट रुपये द्यावे म्हणोन चिरंजीव जातीनें उन्हांत उभे केले. मुखें करून अनिर्वाच्य शब्द तसेच चालले. मग तोडगुळाची माळ घातली. तगाद्याची पराकाष्ठा केली. एकसारख्या अडीचशें घोडया हुजरातींत नेल्या, असेंच जें डेऱ्या रावटींत सांपडेल तें सरकारांत गेलें. शेवटीं पंधरा लाख (ठरले) मग ते रुपये पदमसीकडून हमी जाल्यावर कुटुंब व तिचा पिता-पुत्र धाकटे रामपुऱ्याचे किल्यास पाठविले. चौकशीस सुभानजी नाईक हुजऱ्या कोल्हापुऱ्या दिल्हा. शृंखळाबंधनें होतींच. तेथें सुभानजीचा त्रास विशेष पडून पंधरा लाख (रुपये) खर्च घेतला (च होता शिवाय) आणखीहि कांहीं दिल्हे (असे) असतां आपली सुटका होती असें घडत नाहीं. तथापि सुभेदारांकडे शेखसरीफ याचे द्वारें प्रेष केला कीं, " अन्यायाचें फळ पावलों. धनी मायबाप आहांत. कृपाळू होऊन एकवेळ मस्तकीं हात ठेवावा. एका संवत्सरांत दौलतीस कर्ज राहूं देणार नाहीं. हें न ध्यानास येतां निग्रहच धरिल्यास माझा प्राण रहातच नाहीं. तेव्हां पुढें प्रस्ताव होईल. दूरदेशी पाहून चित्तीं दया उत्पन्न होऊन कृपा करून बोलणें नमूद सिद्ध करून देईन. " अशा भावीं प्रेष पाठविला. परंतु श्रवण करून शेखशरीफ यांस आज्ञा जाली कीं, " या समयीं ही गोष्ट तुम्ही होता

---

(६४) **मुखें करून** – तोंडानें. **तोडगुळाची** – वास्तविक मुळात 'गुडगुलाची' म्हणजेच 'गुंडगुळाची' असें असलें पाहिजे. ही वाचनाची चूक होय. **गुंडगल** – हा एक अगदीं लहान तोफेचा प्रकार आहे. अशी ही जड तोफ गुन्हेगाराच्या गळयांत अडकवीत असत. जुन्या काळीं गुन्हेगाराचा छळ करण्याचे जे अमानुष प्रकार होते त्यांतलाच हा एक. (मुळांत मोडींत 'गुंडगुळाची' असा शब्द असावा. मोडींत 'तु' व 'गु' हे सारखे दिसतात. मोडी लिपी जलद लिहितांना वरच्या मात्रा किंवा खालचे उकार पुष्कळ वेळां मागें पुढें होतात.) **तगादा** – पैशाची मागणी. **एकसारख्या** – एकासारख्या एक, नामी. **पदमसीकडून हमी जाल्यावर** – पदमसी सावकारानें रुपये भरण्याची हमी घेतल्यावर. **किल्यास पाठविले** – कैद करून किल्यावर पाठविले. **मस्तकीं हात ठेवावा** – अभय द्यावें. **प्रस्ताव** – पश्चात्ताप. **दूरदेशी पाहून** – दूरवर विचार करून, दूरदृष्टि देऊन. **बोलणें नमूद** – बोलण्याप्रमाणें. **प्रेष** – निरोप, पत्र.

म्हणून ऐकून घेतलें, इतःपर कोणी गोष्ट बोलिलें असतां त्या पंगतीचा स्वीकार करावा लागेल." मग सरीफभाईनें तितके बोलण्याचा समारोप करून बिराडास गेले. मासपक्षांत इंदुरास येऊन काळ जाहला. हें वर्तमान नारो गणेश यांस समजतां विचार केला कीं, या पायीं मृत्यूचें घर पाहणें प्राप्त. ते व्यर्थ यातना तरीं कां भोगाव्या ? ऐसा विचार करून एके दिवशीं स्नान करितांना हातरुमाल होता त्यांतील कागद पाण्यांत भिजवून सुभानजी नाईक यास बोलावून तो कागदांचा गोळा स्वाधीन केला कीं, "तुकोजी होळकरांस सांग कीं, हा गोळा फलाणें बिस्तानेच्या फलाण्यांत घाल. आजपावेतों आशा होती. आतां शेवटलीच गोष्ट ऐकाल." ऐसें बोलणें सुभानजी हुजरे यांसी बोलून स्नानसंध्यादिक भोजन जहालें. त्याचे तिसरे दिवशीं देहावसान जहालें.

(६५) इकडे कारभार पाराजीपंत व खंडोपंत करूं लागले. राजकारणसंबंधीं लालसोंटचे लढाईंत महादजी शिंदे कच खाऊन ग्वाल्हेरीस गेले. त्या संधींत इस्माल बेग व गुलाम कादर यांनीं एक होऊन, गुलाम कादर जाबताखानाचा नातू, मालक व कारभारी व इस्मालबेग यांनीं पन्नास हजार फौज जमा करून, बंड माजवून, दिल्ली हस्तगत करून, बादशहाचे डोळ्यांत सळया फिरवल्या. त्याकाळीं इस्मायल बेग यांनीं बहुत रदबदल केली कीं, तुमचे मनांत बहुत काळकूट

---

(६४) **त्या पंगतीचा स्वीकार करावा लागेल** – त्याच्यासारखी तुमची अवस्था करीन. **बिस्तान** – बस्ता म्हणजे कागदाचा किंवा कापडाचा गठ्ठा. बस्तान म्हणजे तो गठ्ठा बांधण्याचा रुमाल किंवा त्यावर घातलेले कव्हर किंवा आच्छादन. बस्तान बसणें या रूढ मराठी वाक्प्रचारांत तोच अर्थ आहे. 'बिस्तान' असा शब्द कोशांतून सांपडत नाहीं. कदाचित् 'बासन' असें मुळांत असण्याचाहि संभव आहे. कपडे किंवा कागदपत्र ज्यांत बांधून ठेवतात त्याला बासन म्हणतात. मोडी वाचनाची चूक होऊन 'बासन' ऐवजीं 'बस्तान' असें वाचलें जाणेंहि शक्य आहे. **फलाणें** – कोणा एका विशिष्ट. **आतां शेवटलीच गोष्ट ऐकाल** – आतां नारोपंत मेल्याचीच वार्ता तुमच्या कानीं येईल. "तुकोजीनें पुढें नारो गणेशाचे इतके हाल केले कीं, ते पाहून सर्वांस मोठी कींव आली. तवे तापवून पुढें टाकिले, हत्तीचा साखळदंड गळ्यांत घातला. अंगास बत्त्या लावल्या. मिर्च्यांची धुरी दिली. राखेचा तोबरा दिला. स्त्रीस व पुत्रास उष्णामध्यें उभें करून कानास चाप लाविले. खांद्यावर बंदुका दिल्या. तापल्या तव्यावर उभें केलें. तेव्हां तीस लाख रुपये कबूल केले. पुढें आणखी निकड लाविली." [मराठी रियासत भाग २ पृष्ठ २३.]

(६५) **डोळ्यांत सळई फिरवणें** – डोळे काढणें. **काळकूट** – द्वेष.

असल्यास त्याचें उत्थापन करून आणखी कोणी बसवावयाचें असल्यास बसवा. परंतु हीनांग न करणें. तुम्हीं वजीर, तुम्हापासोन अशी अमर्यादा होण्यांत ईश्वरानें न राहतां तुम्हांस फलादेश सत्वरच येईल. त्यानें न ऐकतां वडिलांचें उसणें घ्यावें या इरादियावर डोळे काढिले. तेव्हां इस्मालबेग तड खाऊन तीस हजार फौजेनिशीं उठोन गेला. दहा हजार फौजेनिशीं गुलाम कादर तेथें राहून वजीरात करूं लागले. हें वर्तमान पाटिलबावांस समजतांच थोरले लखबा शेणवी याजबरोबर कंपू व फौज देऊन गुलाम कादराचे पारपत्यास रवाना केले. हें वर्तमान गुलाम कादरास समजल्यावर जरबेपुढें पाऊल न टिकतां बाहेर पडला. लक्ष्मण अनंत यांनीं दिल्लीस येऊन पातशहाची बहुत खात्री केली. पातशहांनीं प्रसन्न होऊन वजीरात पाटिलबावांस दिली. नालखी व खलत भूषणादि जो वजिराचा मरातब तितका देऊन ग्वालेरीचे आलीकडे आले होते. तेथें तीन कोस पाटिलबावांनीं सामोरें जाऊन मरातब ग्रहण केला. मग लक्ष्मण अनंत यास गुलाम कादर याचे बंदोबस्त करण्यास म॥ निल्हेस त्याचे मागें लागण्याची आज्ञा जाऊन कौशा फकीर याजला वजिरातीचे मुतालकीची सोंप करून पातशाई सलतनतीचे दरोबस्त महालची वहिवाट फकीर मजकूर याजकडे करून पातशाई खर्चाचा व दिल्ली शहराचा बंदोबस्त चांगला केला. व लक्ष्मण अनंत हे गुलाम कादराचे पिच्छा करून एका लढाईंत बरबाद केला. जातीनें पळून गेला. त्याचे शोधास हेर लाविले. चोहों सहा महिन्यांत (एक) उजाड खेडें, पांच चार घरांचीं वस्ती, तेथें एका पटवारी याचे घरांत राहिला होता. तों यांनीं महालांत गांवगन्ना द्वाही घराघरास उडद्या

---

(६५) **त्याचें उत्थापन करून** – त्यास गादीवरून काढून टाकून. **परंतु हीनांग न करणें** – वाटल्यास हा काढून दुसरा बादशहा बसवा. परंतु याचीं आंगें हीन करूं नका. म्हणजे ह्याचे डोळे काढू नका. **ईश्वरानें न राहतां** – 'ईश्वरातें न साहता' असा मूळपाठ असावा. ईश्वरास न आवडून. **फलादेश** – फळ, प्रत्यय. **उसणें घेणें** – बदला घेणें, परतफेड करणें, उट्टें काढणें. **इरादा** – हेतु. **तड खाऊन** – रागावून, बिथरून. **वजीरात** – वजीराचा कारभार, दिवाणगिरी. **कंपू** – युरोपियन सरदारांच्या हाताखालीं कवाईत शिकवून तयार केलेलें पायदळ सैन्य. **फौज** – घोडदळ. (सध्या आपण 'फौज' हा शब्द सर्वसामान्य सैन्य याअर्थी वापरतों; परंतु मराठेशाहींत 'फौज' याचा अर्थ फक्त घोडदळ असाच होत असे.) **जरबेपुढें** – कवाईती कंपूच्या तोफांच्या माऱ्यापुढें. **जरब** – तोफ. **मरातब** – सन्मान चिन्हें. **पिच्छा करणें** – पाठलाग करणें. **पटवारी** – कुलकर्णी. **उडदी** – वर्दी, ताकीद.

फिरविल्या होत्या कीं, जो गुलाम कादर दाखवून देईल त्याजला पांच हजारांची जागीर देऊन वादीष केली जाईल. आशा दुराशा त्यांत कायथांची जात. पटवारी कायथ होता. त्यानें गुलाम कादराची दिलजमाई करून इकडे लक्ष्मण अनंताकडे प्रेष लाविला कीं, गुलाम कादर आमचे घरीं आहे. दोनशें स्वार पाठवावें त्यांचे स्वाधीन करून देतों. तेव्हां दोनशें स्वार पाठवून हस्तगत करून पाटिलबुवापाशीं पोंचवून दिल्हा. अलीबहाद्दर आलियावर त्यांचा बस न बसे तेव्हां सुभेदार यांणीं हिम्मतबहाद्दर याजला हमराई करून शिंदे शुद्ध सरदार ठेवून मुखत्यारी अली-बहाद्दरकडे आणावी या राजकारणास अग्रसर केला. त्यानें मास पक्ष परिश्रम करून नमूद सिद्ध केला. हें वर्तमान पाटिलबावांस समजल्यावर हिंमतबहाद्दर हस्तगत करावा, या कारस्थानास लागले. हस्तगत करून आणीत होते. येतांना अली-बहाद्दरचे फौजेंतून आले. त्यानें जरीपटका शेंपन्नास हात (दूर) पाहून घोडिया-वरून उडी टाकून जरीपटक्याखालीं जाऊन बसला. तेव्हां अलीबहाद्दरास बहुत कठीण पडले. पाटीलबावांनीं निरोप पाठविला कीं, अशा लेकुरपणानें प्रांत कसा लागेल ? यांनींही उत्तर पाठविलें कीं, " आपण वडिलांचे हातचीं माणसें. तेव्हां आमचेकडे लेंकुरपणा खराच, परंतु जरीपटक्याचा आश्रय केला, आम्ही न आणितां त्यानें केला, तेव्हां आतां जें होणें तें विचारानेंच होईल. " असें उत्तर पाठविलें असताही पाटिलबावांचा दुराग्रह विशेष पडून कंपू बमय फौज अलीबहाद्दराचे सभोंवते फिरवून दिल्हे. तेव्हां अलीबहाद्दर यांणीं मुत्सद्यांस बलावून कौसल केलें.

---

(६५) **वादीष** – सन्मान. **आशादुराशा** – लोभ. **कायथ** – कायस्थ. **हिम्मत बहाद्दर याजला हमराई करून** – हिम्मत बहाद्दराला सामील करून घेऊन. **शुद्ध सरदार ठेवून** – फक्त सैन्याची सरदारी त्याकडे रहावी. बाकी लढाई, तह करण्याचा आखत्यार त्याकडे राहू नये. ती मुखत्यारी अलीबहाद्दरकडे असावी, असें राजकारण तुकोजी होळ-करानें केलें. **या राजकारणास अग्रसर केला** – या राजकारणाचा पुढारीपणानें उपक्रम केला. असें घडून यावें यासाठीं पुढाकार घेऊन खटपट केली. **त्यानें** – हिम्मतबहाद्दरानें. **नमूद** – कारस्थान. **लेकुरपणानें** – मूर्ख अविचारी वागणुकीनें. अलीबहाद्दर म्हणू लागला कीं, हिम्मतबहाद्दर हा सर्वांत श्रेष्ठ अशा पेशव्यांच्या जरीपटक्याखालीं आश्रयास किंवा अभयार्थ आला आहे. म्हणून त्यास तुमच्या हवाली करता येत नाहीं. या अलीबहाद्दराच्या बोलण्याला उद्देशून हा लेकुरपणाचा टोमणा आहे. **प्रांत लागणें** – शेवट लागणें, निभाव लागणें. **सभोंवतें फिरवून दिल्हें** – अलीबहाद्दराच्या सैन्याला शिंद्याच्या फौजेनें व कंपूनें वेढा दिला. **कौसल** – कौन्सिल या इंग्रजी शब्दाचा अपभ्रंश. **कौसल** – खलबत.

सदाशिवपंत अवसरकर पुरंदऱ्यांचे तर्फेचे दिवाण व आप्पाजीपंत दामले खासपतकाचे दिवाण व भिकाजीपंत पाळंदे फडणीसांकडील असे गणनीय माणसें जमा करून विचार केला. कोणी बोलला, असामी त्यांचे स्वाधीन करावी, कोणी कांहीं, इदमथ जहाले. त्यांत भिकाजीपंत पाळंदे फडणीसीकडील यांणीं अग्रसर होऊन बोलले कीं, " हिंम्मतबहाद्दरास द्यावयाचा नाहीं. याचें सोईनें होणें असेल तें हो. श्रीमंतांचें राज्याची बडती दौलत. तें पक्षीं शिंदे आगळीक करतील असें होणार नाहीं. कदाचित् तमावर चढून आगळीक केल्यास मरून मिटूं. मागें शिंदे यांस पुसणार बळकट आहेत. श्रीमंतांचे दौलतीचे कायमींत शिंद्यांचें शिंदेपण राहणें कठीण पडेल. आपले हातें आसामी देऊन श्रीमंतापासून मुकाबला कबूल करणार नाहीं. " अशा निर्धाराची गोष्ट सांगून उठले. हें वर्तमान येशवंतराव निंबाळकर अकळोजचे राहणार, पंढरपुरानजीक, आठशें स्वारांचें पथक, महादजी शिंदे यांजपाशीं होतें. त्यांणीं (ऐकून) नौबत देऊन आपला गोट आंवळून अलीबहाद्दर यास सामल जहाले. अलीबहाद्दर त्यांचे गोटास जाऊन त्याची खातर बहुत केली. एकच उत्तर केलें कीं, " शिंदे यांणीं आम्हांस पैक्याची कमी (केली) म्हणून आलों नाहीं. तुमचे संकेतें इरादा बसून गोष्टीचा ठराव जाहला, हें वर्तमान ऐकून श्रीमंतांचे राज्यांत राहतों, दुसरे सल्ला बदनेक, याजवर अंतःकरण प्रसन्न होऊन तुमचे करण्यास सामल जाहलों. " परस्परें शिष्टाचार होऊन हीच सल्ला मुस्तकीम

---

(६५) **असें गणनीय माणसें** – अशीं गणनीय माणसें. **गणनीय** –प्रतिष्ठित, जबाबदार. **इदमथ** – ' इदमित्थम् ' या संस्कृत शब्दांचा अपभ्रंश. **इदम** – हे. **इत्थम** – या रीतीनें. **याचे सोईनें** – ही गोष्ट मान्य करून मग इतर पर्याय काय काढता येईल तो काढा. **बडती दौलत** – उत्कर्षकाल, होत काळ. **तमावर चढणें** – ईर्षेस पेटणें. **तम** – ईर्षा. **मरून मिटूं** – तोंड देऊन लढतांना मरून जाऊ. **आपले हातें आसामी देऊन श्रीमंतापासून मुकाबला कबूल करणार नाहीं** – मी आपल्या हातानें असामी म्हणजे हिम्मत बहाद्दरासारखा मातबर माणूस पारिपत्याकरितां शिंद्याचे हवाली केला, तर श्रीमंत माझा मुकाबला करतील म्हणजे मला जाब विचारतील त्या रुजवातीस आपण तयार नाहीं असें पाळंद्यानें स्पष्ट सांगितलें. **खातर** – खात्री, खातरनिशा. **तुमचे संकेतें इरादा बसून गोष्टीचा ठराव जहाला** – तुमच्या इशाऱ्याप्रमाणें कारस्थान पक्कें झालें. **दुसरे सल्ला** – दुसरा विचार. श्रीमंतांच्या विरोधी अशा गोटांत सामील होऊन राहण्याचा. **बदनेक** – विश्वासघाताचा, गैर इतबारीपणाचा. **मुस्तकीम** – कायम.

जहाली. तेव्हां पाटीलबावांची निकट पडली. बराय मसलत सुभेदारांकडे प्रसरहि शिंदे यांनीं पाठविला कीं, " आपण वडील आहां. मुलास समजून सांगा. बाकी हरामखोर ज्या रीतीनें हस्तगत होईल त्या रीतीनें करूं, तोफेचे तोंडी देऊं, आपण शब्द ठेवाल, याजकरितां आपलेंहि कानावर घातलें आहे." यांनीं उत्तर पाठविलें कीं, " मूल खरेंच, परंतु धन्याचें, यद्यपि अमार्गेही असल्यास त्याची अमर्यादा करणें आपल्यास असकच. या (?) ही गोष्ट तर मार्गाची दिसती. तेव्हां याचा विचार होऊन व्हावें हें उचित." मग पाठीलबावा यांणीं तुम्हांकडील कोणी बोलावयास पाठवा म्हणोन सांगून पाठविले. त्याजवरून भिकाजीपंत पाळंदे बोलावयास पाठविले. व पाटीलबावांशीं बोलणें पडलें कीं, आपसांत बखेडा होऊन आजपावेतों श्रम साहास करून श्रीमंतांचा रबाब जमविला, क्रोड रुपयांचें खर्चांत आलों, या गोष्टी ध्यानास न येतां या हिंदुस्थानांत अनुपगीर गोसाव्यासारखा सोधा पाठीस घालून जमलेला लक्ष बिघडूं पाहतां हें आम्हीं घडूं देणार नाहीं. ज्या रीतीनें हस्तगत होईल त्या रीतीनें करूं. यासाठीं श्रीमंतांनीं आम्हांस तोफेचे तोंडीं दिल्हेयास कबूल आहे." मग पाळंदे यांणीं उत्तर केलें कीं, " आम्ही त्याजला बोलावून आणिलें असें जहालेंच नाहीं. त्यानें जरीपटक्याचा आश्रय केला असता प्राण वांचेल म्हणून आला. घरचे दबावणीच्या जरबा खाऊन तुमचे स्वाधीन लेकरूं.

---

(६५) **सल्ला** – विचार. **बराय मसलत** – मसलतीसाठीं. **प्रसर** – प्रेष, निरोप. **हरामखोर** – गुन्हेगार. येथें हिम्मतबहाद्दर. **असकच** – अशक्यच. **या** – अथवा, व. **रबाब जमविला** – रुबाब, प्रतिष्ठा वाढविली. **सोधा** – सोदा, डांबिस माणूस. ' सोदा ' ही उत्तर हिंदुस्थानातील लष्करातील लुटारू लोकांना दिलेली एक संज्ञा आहे. **लक्ष** – ' नक्ष ' असें पाहिजे. **नक्ष** – वरचष्मा, कीर्ति. **घरचे दबावणीच्या जरबा खाऊन गोष्ट सांगणें प्राप्त** – ' घरचे ' ही मोडी वाचनाची चूक. ' याचे ' असें मुळांत असलें पाहिजे. याचे दबावणीच्या जरबा खाऊन म्हणजे याच्या दमदाटीमुळें जरब म्हणजे भीति खाऊन जर लेकरूं म्हणजे अलीबहाद्दर तुमच्या स्वाधीन होईल म्हणजे तुम्ही सांगाल तसें ऐकूं लागेल तर त्याच्या शौर्याची परीक्षाच होऊन गेली असें समजावें लागेल ! शिंदे घरचे परिचयाचे, त्यांच्या दरडावणीनें जर आम्ही इतके हतबल होऊन जाऊं, तर बाहेरचे परके इराणी दुराणीसारखे शत्रु येऊन त्यांनीं आम्हांस दमदाटी करावयास सुरुवात केली तर स्वतःचे प्राण वांचविण्यासाठीं आम्ही ' आमचे प्राण वांचवा, वाटल्यास आमच्या फौजेचीहि वळती करून न्या ' असेंहि आम्ही सांगूं !! हें कसें शक्य आहे ? श्रीमंतांनीं जरीपटक्याचा अधिकार देऊन आम्हांस पाठविले तें आम्ही बावळट भित्रे नव्हे म्हणूनच.

तेव्हां इराणी दुराणी यांशीं गांठ पडली असतां आपले प्राण वांचविण्याविशींही वळतीची गोष्ट सांगणें प्राप्त. तेव्हां श्रीमंतांनीं जरीपटका सोपला हें चुकून केलें असें सिद्ध होतें. श्रीमंतास करण्यास दोष सिद्ध करून यावत् आयुष्य बेश्रमीचा बुरखा घेऊन वांचावें या वांचण्यास धिःकार. आपले यासी फिरोन गोष्ट सांगितली तेव्हां पुरी पडती हें कळतच आहे. हिंमतबहादरास घेऊन श्रीमंतांपाशीं जाऊं तेथेंच याचा इनसाफ होईल. परंतु तुमचे स्वाधीन करणार नाहीं. " अशा तंटयाच्या गोष्टी सांगोन उठोन आले. पुढें सुभेदारांचे विचारें पुरी पडणें कठीण, येरवीं पाटीलबावा आगळीक करून तुम्हांशीं बिघडवितो असें घडत नाहीं, परंतु सर्वांपरी खराब करील, देण्याचें पेंचांत येऊन मु (?) काबलीस पाठवावें हेहि ठीक नाहीं. यास्तव हिंमतबहादर, कारस्थानी माणूस, मोहरा हातीं लागला आहे, याजला अग्रसर करून बुंदेलखंडांत जावें. असा मनसबा सिद्ध करून अलीबहादर बुंदेलखंडास गेले. इकडे नारो गणेश प्रकरणीं व अलीबहादर प्रकरणीं पाटीलबावांचे मनांत दंश होताच. सुभेदारहि आपले ठिकाणीं साशंकित. परंतु शिंद्यांचे दौलतींत माणसें चांगलीं. त्यांणीं विचार करून पाटीलबावांस बुद्धिवाद केला, " आपण चाकर श्रीमंतांचे. लाख फौज, पन्नास हजार पायदळ व पांचशें तोफा घेऊन मुक्त्या-

---

(६५) श्रीमंतांचे करण्यास दोष सिद्ध करून – श्रीमंतांनीं आमची नेमणूक केली, ती चुकीची केली असें जर आम्ही आमच्या कृतीनें सिद्ध केलें तर सबंध आयुष्यभर आम्हास बेशरमीचा डाग कलंक लाऊन घेऊन जगावें लागेल. **आपले यासी** – आपल्या मागणीस. **फिरोन गोष्ट सांगितली** – अनादर केला. **पुरी पडती हे कळतच आहे** – आम्ही आमचें जें उत्तर सांगितलें, त्याचप्रमाणें आम्ही निश्चित अखेरपर्यंत वागणार. **पुढें सुभेदारांचे विचारें इ०** – पाळंदे व अलीबहादर यांनीं सुभेदाराचा म्हणजे तुकोजी होळकराचा सल्ला घेतला तेव्हां तुकोजी होळकर म्हणाला, " आपण केली ही गोष्ट येथें शिंद्याच्या संगतींत राहून निभावणें कठीण आहे. शिंदे आतां प्रत्यक्षच तुम्हावर हल्ला करून हिम्मतबहादराला पकडून नेईल हें घडणार नाहीं. परंतु तो तुम्हांस सर्व तऱ्हेनें नुकसानींत आणील. व मग तुम्हांस पुन्हा सैन्याच्या खर्चाकरता शिंद्याकडेच माणूस पाठवावा लागेल. त्यासारखी अपमानास्पद गोष्ट दुसरी नाहीं. करता हिम्मतबहादर हा बुंदेलखंडाचा माहितगार आहे. तिकडील मुलूख जिंकावा व फौज फेडावी. म्हणजे फौजेचा खर्च तिकडील खंडण्यांतून काढावा म्हणजे शिंद्याकडे तोंड वेंगाडावें लागणार नाहीं व आपला वरचष्मा व स्वातंत्र्य कायम टिकेल. "

रीचें काम करितों. कोटयावधीचे मुबादल्यांत. तथापि श्रीमंतांची चिटी आली असत एक्या घोडयानिशीं हजर व्हावें हा श्रीमंतांस भरंवसा. व आपलेंहि शील असेंच. याजवर श्रीमंतांनीं कृपावंत होऊन प्याद्याचे फर्जी केले. त्या भरंवशास अलीबहाद्दर याचा असा व्यवहार होऊन, काढून दिल्यासारखें, आणि सुभेदाराशीं ही किलाफाची वृद्धि करून, तेहि साहेबसुभे, केवळ तैनाती करून राहणार नाहींच; एवंच श्रीमंतांशीं हरामखोरीस पात्र होऊन वेगळे पडून कोण्या कलावर उंट बसेल, तेव्हां कृत परिश्रम व्यर्थ जाऊन खाबास खामी पडून हरामखोर असे वानऊं. यास्तव होळकर आपले भाऊ, त्यांणीं आपले घरीं पाहिजे तसें केलें (तरी) त्यांसी आपल्याशीं कारण तें काय ? यांसी मेळ घालून एक विचारें धोरण चालवावें. यांत अलीबहाद्दर प्रकरणीं (जा) हाला व्यवहार याजवर माती पडून सुभेदाराचे मिळण्यांत शीळास बट्टा येणार नाहीं." ही गोष्ट पाटीलबावांचे गळीं उतरून याच मनसुब्याचे पैरवीत राणेखान भाई याजला घालून सफाई करून पुढें राजकारण होणें तें एक विचारें होत असावें असें कायम जहालें. पुढें इस्मायलबेग तीस हजार स्वार व लाख पायदळ व पांचशें तोफेंनें नबाब कूलीखां व अफरासखां इत्यादि नजीबखानाचे चेले फौजबंद तितके साम-दाम-दंडभेद करून पिशवींत घालून त्यांचा जागा व सलतन समेटून नार जालेर या जिल्ह्यांत येऊन जयपूरचे राजास उपद्रव आरंभिला. बंदोबस्तास बापू होळकर दहा हजार फौजेनिशीं व शिंद्याकडील अंबोजी इंगळे असे रवाना जाले. शिखाचा व इस्मायलबेग याचा शिलशिला होता. याजमुळें शिखाचे तोंडावर काशीराव होळकर व शिंद्याकडील बाळोजी इंगळे वीस हजार फौजेनिशीं उभयतां सरदार रवाना केले. इकडे इस्मायलबेगाशीं बापूजी होळकर (व) अंबोजी इंगळे यांशीं मुकाबला होऊन दुरावरचे पाटणा-

(६५) **कोट्यावधीचे मुबादल्यांत** – कोट्यावधी रुपये वसूल होतील अशा मुलखाचे मालक, धनत्तर, कोणावर अवलंबून नाहीं असे. **साहेब सुभे** – मोठे सरदार. **तैनाती** – नोकऱ्या, सांगाकाम्यासारख्या चाकऱ्या. **कोण्या कलावर ऊंट बसेल** – कोण्या कलावर उंट बसेल तें सांगवत नाहीं म्हणजे आपलें दैव कसें फिरेल तें सांगतां येणार नाहीं. **खामी** – नुकसानी. **वानऊं** – वानिले जाऊं; असा आपला लौकिक होईल. **वानणें** – कौतुक करणें. **याच मनसुब्याचें पैरवीत** – हा मनसुबा किंवा ही मसलत सिद्ध करण्याच्या कार्यांत. **चेला** – घरच्यासारखा, मुलासारखा पाळलेला माणूस, पालकपुत्र, शिष्या, चेलेबारगीर. **पिशवींत घालणें** – सामील करून घेणें, कुटांत मिळून घेणें, घशांत घालणें, पचवणें. **नारजालेर** – 'नारनोल्ह' असें मुळांत असेल ! **शिलशिला** – सख्य, दळणवळण.

वर लढाई सुरू जहाली शिंद्यांकडील पलटणें होतीं. तोफांचे लढाईंत आपली फौज थिजली दिवस थोडा राहिला, अस्तमानीं लढाई महकूब होऊन आपलाले जागां मुस्तकीम राहून सूर्योदय होतांच गोळा फिरून सुरू जहाला. मग अंबोजी इंगळे व बापूजी होळकर यांणीं विचार केला कीं, तोफांचे लढाईंत आपल्या वस्तू पुरी पडेल असें नाहीं. तेव्हां घोडे घालावे. यांत ईश्वर यश देईल तो देऊं. असा खचितार्थ करून एक्या बाजूस बापूजी होळकर, एक्या बाजूस अंबोजी इंगळे, पाठीचे बाजूस पेंढारी (असे) तीनरूख शह घालून हल्ला केला. तेव्हां इस्मायलबेग कायल होऊन शिकस्त जहाला. लाख स्वार जिकडील तिकडे जाऊन जिवंत धरून आणला. तोफखाना वगैरे दरोबस्त हस्तगत जहाला. फत्ते जहाली.

(६६) पुढें मारवाडवाले जमाव धरून काकडावर आले. अजमेर जागा आपली प्राचीन साधावी व जयपूरवाल्याचेही महाल दाबावे. (असा इरादा) हें वर्तमान मथुरेस सरदारास समजल्यावर मारवाडवाल्याची जरब जयपूर प्रांतीं लालसोंटचे लढाईंत बाबद गालद होती याजमुळें पाटीलबावा (स) संकट वाटून फौज वीस हजार, त्यांत गोपाळराव चिटणीस व जिवबादादा प्रमुख तैनातीस डबाईचा कंपू असे रवाना होण्याची सिद्धता होऊन सुभेदाराकडे आले. ' मारवाडवाल्यानें डोकें उचललें आहे. अजमेर घ्यावी हा त्याचा इरादा आहे. त्याचे मुकाबल्यास फौजेची योजना जहाली आहे. आपलेकडील फौज व सरदार जमेयत यावी. असें बोलणें पडलें. तेव्हां इस्मायलबेग धरल्यावर शिखाचे फौजेचे मुकाबल्याचें कारण राहिलें नाहीं. काशीराव होळकर व बाळोजी इंगळे पटाळ्याहून हुजूर येऊन दाखल जहाले होते. काशीराव होळकर मारवाडांत रवाना करून बापू होळकरास पत्रें गेलीं कीं, तिकडील मसलत समारोप होऊन इस्मायलबेल हस्तगत जहाला. ते पक्षीं तुम्हीं फौज पेंढारी याजसुद्धां काशीराव यास मारवाड प्रांतीं जाऊन सामल व्हावें. अशीं पत्रें रवाना जहालीं. काशीराव होळकर व शिंद्या-

---

(६५) थिजली – कचरली, वेहिम्मत झाली, दबली. **आपल्या वस्तु** – आपल्याच्यानें. **खचितार्थ** – ' निश्चय, संकल्प. **तीन रुख** – तीन तोंडानें, तीन बाजूनें. **शिकस्त** – पराभव. **शिकस्त झाला** – पराभूत झाला.

(६६) सरदारास – शिंदे यांस **लालसोटचे लढाईंत बाबद गालद होती** – ' लालसोटचे लढाईबाबत गालब होती, ' असें मुळांत असलें पाहिजे. लालसोटचे लढाईंत महादजी शिंद्याच्या झालेल्या प्रचंड पराभवामुळें मारवाडवाल्यांची जरब जयपूर प्रांतीं गालब होती, त्यामुळें इ. **गालब** – जोरावर, प्रबळ. **डबाईचा** – डीबॉइनचा. **डोकें उचलणें** – आव्हान देणें, बंड करून उठणें.

कडील सरंजाम अजमेरीवर मुकाबल्यास दाखल जहाले. तो बापू होळकर यांसी पत्रें पोंचाऊन अंबोजी इंगळे यांसी पाटीलबावांनीं हुजूर बलावलें तेव्हां इस्मायलबेग याजला घेऊन मथुरेस गेले. बापू होळकर फौज बमय पेंढारी बमय काशीराव होळकर याजपाशीं दाखल जहाले. मारवाडवाल्याचा मुकाबला घालून एक लढाई होऊन मारवाडवाल्यास हटवून मेडत्यावर नेऊन घातले. हें वर्तमान राजास समजून त्यांणीं आपले भाईबेटयांस बलावलें. तेव्हां तुम्हांकडून कांहींच बनून आलें नाहीं. मग राठोडाचे फौजेंत जाटाचे गणनीय माणसें होतीं. त्यांस वीरश्री पडून आठशें असामी रजपूत यांणीं केशऱ्या करून मरणोन्मुख जहाले. लढाईची तयारी शिंद्यांकडील फौज जरब खाऊन (होती) तथापि त्याणें नक्षा बांधून उभे राहिले. पुढें पलटणें. पलटणांपुढें रणगाड्यांचा जंजिरा. यापुढें तिकाऱ्याचें गोखरू, असा जाबता तोफांचे गोळ्यांत करून कंपूचे एक एक बाजूस गोपाळराव व जिऊबादादा. होळकराची फौज त्यास गणनींत नाहीं. बापूराव व काशीराव अदकोसाचे

---

(६६) **बयम** – सुद्धां, सह. **जाटाचे** – जाटाची. **गणनीय माणसें** – मानकरी, नांवाचे, ईरेचे एकांडे. **केशरी करणें** – मारू किंवा मरू असा निश्चय करून रजपूत प्राणपणाच्या लढाईस उभे राहात, त्या वेळीं ते केशरी पोशाख परिधान करीत असत. अगर छातीवर केशराच्या गंधाचा पंजा उठवून घेत असत. **नक्षा बांधून** – ईर धरून, वीरश्री धरून. किंवा ' नकाशा बांधून ' असेंहि होईल. **नकाशा बांधणें** – व्यूह रचना करणें. **रणगाड्याचा जंजीरा** – रणगाडे आणि तोफा. **जंजीर** – या शब्दाचे तोफ आणि साखळदंड असे दोन अर्थ आहेत. म्हणून ' साखळदंडानें एकमेकांस जोडलेले रणगाडे ' असाहि अर्थ होऊं शकेल. **तिकाऱ्याचें गोखरूं** – तिखार म्हणजे पोलाद. विल्सनच्या कोशांत दिलेल्या गोखरू या शब्दाच्या अर्थावरून हल्ला करून दौडत येणाऱ्या घोड्यांच्या पायांत पोलादी काटे शिरवून त्यांची गति कुंठित करण्याचा प्रयत्न करण्यांत आला हें स्पष्ट दिसतें. विल्सनचा अर्थ असा a large kind called गोखरू दाकिनी bears a fruit of a triangular shape with prickles at the angles, and hence the same name is given to the iron crowsfeet thrown on the ground to check the adavance of the cavalry. **असा जाबता तोफांचे गोळ्यांत करून** – ? **होळकरांची फौज त्यांस गणनीत नाहीं** – होळकराची फौज त्याच्या खिजगणतींत नव्हती. म्हणजे होळकरांच्या फौजेला त्यानें क्षुल्लकांत गणून त्यांस महत्त्वाचें काम न सांगता रणांगणामागें अर्धा कोस ठेवले होते.

पिछाडीनें उभे होते. तेव्हां राठोडांनीं घोडे कसे घातले ? आणउचा गाळावा घेऊन उजवे हातीं हुका (?) डावे हातीं अनीन आणि चालीनें गेले. रणगाडे तरवारीनें तोडून तोफांवर तरवार चालविली. सफै कोठेंहि अक्षरें न बोलतां गेले. गोपाळरावजी व जिवबादादा तीन कोस पराङ्मुख जहाले. तेव्हां डबई भयभीत होऊन काशीराव व बापू होळकर उभे होते, त्यांजपाशीं येऊन टोपी आपटली. "बदनक्षा व नुकसान माझें होत नाहीं. सरदार आहां.(आतां) चांगलें दिसेल तें करावें." मग बापूसाहेबांनीं बाळासाहेबांस ठिकाणीं उभे करून, चार हजार स्वार निवडक घेऊन घोडे घातले. रजपूत गोळा, छरा, संगिन यांत निमे खपलेच होते. निमे राहिले त्यांणीं हल्ला बापू होळकराचा गोल उठला हें पाहून पलटणचा मुकाबला सोडून यांजवर आले. भेळाभेळ होऊन चार घटका समरंगणीं भाला, बंदूक यांचे काम पडलेंच नाहीं. एकमेकांचें गळां हात घालून घोड्याखालीं येऊन तरवार,

---

(९६) तेव्हां – अशा स्थितींत. **आउणचा गाळावा घेऊन** – मुळांत 'अफुचा गाळावा किंवा गोळ्या घेऊन' असें असलें पाहिजे. लढाईंत बेभान होऊन लढता यावे म्हणून उत्तर हिंदुस्थानांत अफू इत्यादिकांचा अम्मल करण्याची चाल असे. **चालीनें गेले** – दौडत चाल करून गेले. राठोड वीरांनीं बेभान होण्याकरतां अफूच्या गोळ्या खाल्ल्या. व उजव्या हातीं हुक्का धरून ओढीत, आणि डाव्या हातानें घोड्याचा लगाम धरीत ते बेदरकारपणें शिंद्याच्या फौजेवर येऊन पडले. तथापि हुक्का या शब्दाचा हातगोळा असा एक अर्थ आहे. व तोच येथें खरा शोभून दिसेल. म्हणजे असें कीं, डाव्या हातांत घोड्याचा लगाम व उजव्या हातांत दारूचा बॉंबगोळा शत्रूवर फेकून मारण्यासाठीं अशा पवित्र्यांत राठोड दवडत आले. आधीं हातांतील बॉंब फेकून नंतर शिंद्याशीं प्रत्यक्ष भिडताच त्यांनीं तरवार चालू केली. **रणगाडे तरवारीनें तोडून इ०** – रणगाड्यावरील लोक तरवारीनें मारून, तोफावरील गोलंदाजहि तरवारीनें मारले. **सफै कोठेंहि अक्षरें न बोलता गेले** – वाच्यता किंवा हाकाहाक होण्याच्या आंत. याप्रमाणें पहिली धडक मारून राठोड वीर परतहि गेले. **पराङ्मुख झाले** – पळाले. **टोपी आपटली** – वैतागानें सर्वनाश झाला अशा त्राग्यानें डोकीची टोपी काढून त्यानें जमिनीवर आपटली. जुन्या काळीं अशीच पद्धति होती. शाहूराजानेंहि, वसईच्या मोहिमेंत आपले चाळीस हजार मराठे मेले, त्यासंबंधीं इंग्रज वकिलासमोर त्रागा करताना डोकीचें पागोटें काढून जमिनीवर आपटल्याचा प्रसंग सुप्रसिद्धच आहे. **बदनक्षा** – काळीमा, दुर्लौकिक. **गोल** – जमाव. **गोल उठणें** – जमावच्या जमाव उठणें. **भेळाभेळ** – सरमिसळ.

कटार, दांत अशानिशीं रजपूत एक जाऊं न दिल्हा. चार पांचशें रांगडे खपूं देऊन आपलेकडील महाळोजी पिंगळेसारखीं दोन तीनशें नांवाचीं माणसें कामास आलीं. येशवंतराव महाराज, बारा वर्षांचें वय, प्रथम तरवार तेथें केली. आबाजी खंडेराव पारनेरकर फडणिसाकडील यांनींहि तरवार चांगली केली. त्या पांचशा रजपुतांचे लढाईंत माणसांमाणसांची परीक्षा जहाली. खेत कायम करून शाहाजनें वाजवून सुभेदारासी, कागद शाई हजर नव्हती सबब कोळसा उगाळून, चिटी लिहिली. यांत भाव. रजपुतांच्या केशऱ्या पाहून शिंद्याकडील फौज तीन कोस पळाली. कंपू बरबाद जहाला. मग डबई आम्हाशीं येऊन बोलला कीं, नक्षा व कारखाना माझा बुडतो असें नाहीं. सरदार आहां, चांगलें ते करा. (मग) आम्हीं घोडे घातले. श्रीमार्तंड कृपेनें फत्ते जहाली. यांतील खेरें खोटें डबई पाटीलबावांस लिहील. अशी चिठ्ठी लिहून सांडणीस्वाराबराबर रवानगी केली. मग डबई याणें आपले बेड्यांत जाऊन सरदार पळाले होते त्यांजकडे सांडणीस्वार पाठवून बलावून आणून मग लढाई खतल जहाली त्याची खुषी होऊन त्यांणीं आपले परी पाटीलबावांस पत्रें लिहिलीं. डबईनें जे सरदार तेथें जाजती देऊन पाटीलबावांस जालें वृत्त वास्तविक लिहून पाठविलें कीं, तुमचे फौजेकडून कांहीं एक जहालें नाहीं. होळकराकडील सरंजाम नसता तर करणें त्याचा कारखाना बरबाद होऊन बदनक्षा मुलखभर होता. याणें मात्र वास्तविक लिहिलें होतें.

(६७) नंतर गोपाळरावजी व जिउबादादाचीं पत्रें पाटीलबावांस जवळ पोंचून स्फीत्यर्थ पाटीलबावा मुत्सद्दी मंडळासह पत्रें घेऊन सुभेदारांकडे आले. बिचोब्यांत

---

(६६) **खपू देऊन** – खपू दिले, मारले. **खेत कायम करून** – आपल्या सरदारांचे व सैनिकांचे मुडदे रणांगणावर लांबवर कोठें कोठें पडले आहेत त्याचा तलास लावून. **शाहाजन** – जयवाद्य, जयसूचक वाद्य. **बरबाद** – नष्ट. **बेड्यांत** – बेहड्यांत. बेहडा–कारखाना. येथें अर्थ तोफखाना, तोफखान्याचें शिबीर. **आणून** – आणलें. **खतल** – खतम असें पाहिजे. **खतम** – समाप्त. **लढाई खतल जाहली त्याची खुशी होऊन** – 'लढाईत शत्रूची संपूर्ण कतल म्हणजे कत्तल झाली. त्याणें खूष होऊन' असाहि अर्थ होईल. **डबईनें जे सरदारांस येथें जा जती देऊन** – ? **करणे त्याचा कारखाना बरबाद होऊन** – 'करणेलाचा कारखाना' असें तर मुळांत नसेल ? म्हणजे कर्नल डिबाईचे कवायती कंपू.

(६७) **स्फीत्यर्थ** – फिदी फिदी हसण्याकरतां, होळकराची फजिती उडवण्याकरतां, किंवा आपल्या फौजेचा दिमाख दाखविण्याकरतां. **स्फीति** – दंभ, प्रतिष्ठा, ऐट. **बिचोबा** – लहान बिन खांबी तंबू.

एकांती बसून पत्रें वाचून दाखविलीं. सुभेदार श्रवण करून हासून उत्तर केलें कीं, " श्रीमंतांचे प्रतापें करून शिंदे, होळकर ज्या समरंगणांत तेथें अपेशाची दाद ती काय? बाकी कच्छे व राठोड माझ्या बापानें शंभर वेळां पाय पसरून मारले आहेत! हे तुमचे आमचे पाहिले ऐकिल्यांत (आहेच.) " मग चिमणाजीबापूस आज्ञा करून बाळासाहेब व बापूसाहेब यांची चिठ्ठी आली ती दाखवा म्हणोन सांगितलें. मग चिठ्ठी पाहून व डबईचें पत्र महादजी शिंदे यांस आलेंच होतें व यांचे चिठ्ठींतही खऱ्याखोट्याचा हवाला डबईचें पत्रावर होता (मग) पाटीलबावा मनचे मनांत समजून सर्द जहाले. सुभेदारांचे बोलण्यावर उत्तर होऊं पावले नाहीं. पानसुपारी अत्तरगुलाब शिष्टाचार होऊन आपले फौजेंत गेले.

(६८) पुढें देशीं टिपूवर फिरंगी आले ते समयीं श्रीमंताकडे टिपूकडून व फिरंगी यांजकडून वकील मदत करण्याविशीं आले. तेव्हां नाना फडणीस यांणीं विचार केला कीं, टिपू आपले ठिकाणीं मुस्तकीम राहिल्यास पुण्याचा दरवाजा आहे. हे पक्षीं आपण इंग्रजास नादीं लावून (ठेऊन) मदत मात्र टिपूची करावी. अशी मसलत सिद्ध करून हरीपंततात्या याज समागमें पन्नास हजार फौज देऊन रवाना केले. या स्वारीस मोहीमशीर महर्गता अशी झाली कीं, दाणे रुपयाचे पावशेर भाव मात्र. चारा आंब्याचीं पानें वगैरे वाळलेलीं रुपयाची टोपलेभर. आणि टिपू फिरंगी मिळून पांच लक्ष जीव. मसलत दिवसेंदिवस वाढत चालली. नाना फडणीस यांणीं हरीपंततात्यांचे खर्चाची मदत करण्यास कमी केली नाहीं व हरीपंततात्यांनीं दुतर्फा पैसा उत्पन्न करण्यास कमी केलें नाहीं. परंतु मोहीमशीर फौजेस, घरींहून मदत व मागितला पैसा अशा महर्गतेंत कोठून पुरणार? तेव्हां फौज गळून मसलत जड पडली. हें वृत्त पुण्याहून वकिलांनीं शिंदे यांस

---

(६७) **दाद** – वार्ता, बात. **पाय पसरून** – कांहीं श्रम न पडल्यासारखें, जागचे उठावेंहि न लागता. **माझ्या बापानें** – थोरल्या मल्हारराव होळकरानें. **सर्द होणें** – थिजणें, खजील होणें.

(६८) **पुण्याचा दरवाजा आहे** – पुण्याला म्हणजे पेशव्यांचा राज्याच्या घराला एकतऱ्हेनें दरवाज्यासारखा आधार आहे. म्हणजे टिपू तिकडे इंग्रजाच्या उरावर कायम आहे तोंपर्यंत इंग्रज पुण्यावर चालून येऊं शकणार नाहींत. **मोहीमशीर** – मोहीम चालू असता. **दाणे रुपयाचे पावशेर भाव मात्र** – रुपयाचें पावशेर दाणे द्यावे असा लष्कराच्या बाजारांत भाव ठरला. परंतु प्रत्यक्ष दाण्याचें दर्शनच होईना! **जीव** – माणसें. **फौज गळून मसलत जड पडली** – शिलेदारास पगार व घोड्यास दाणावैरण न मिळाल्यामुळें फौज गळाठली व मसलत लवकर तडीस जाईना, कारण फौजेंत शक्ति व

लिहिलें. त्याजवरून यांजला आशा उत्पन्न झाली कीं, हिंदुस्थानचा बंदोबस्त आपले हातींच आहे. परंतु तेथील बंदोबस्त ठेऊन आपण देशी जावयाचें करून टिपूची (हि) मसलत आपले हातें सुदरावी. म्हणजे ब्राह्मण अर्थात् टाळे जातील. ही उमेद धरून जिऊबादादा व गोपाळराव व डबई यांना पलटणानशीं हिंदुस्थानचे जिल्ह्यांत सोडून जातीनें पन्नास साठ हजार फौज व दोन अडीच कंपू घेऊन दरकूच देशास चालले.

(६९) दरम्यान मेवाडचा मामला येणें होता याजकरितां मासपक्ष गडबड करून रबाबाचे पोटीं खंडणीचा जाब बोलण्यांत आणून वसुलास अंबोजी इंगळे यांस ठेऊन खांसास्वारी झाडून उज्जनीस आली. तेथें मागील फौजेचा जाब व पुढील खर्चाची वगैरे तोडजोड करून हंडया हर्द्याचे घाटें उतरतां घाटांत नेमावर पंचमहालपैकीं सत्वास महाली बाईसाहेबांनीं गढी मजबूत बांधून वस्ती आबादी चांगली केली होती. जागा सोयकर पाहून गढी खालीं करून होळकराचें ठाणें उठवून बऱ्हाणपूरचा सुमार धरला. त्याकाळीं बाईसाहेब म्हणजे प्रत्यक्ष अहल्या. तिचे मुखावाटें अक्षरें निघालीं कीं, " हा मेला पुन्हा हिंदुस्थान पहात नाहीं. " देशीं येण्याचें राजकारण पाटीलबावांचे मनांत भरून कूच जालें. तेव्हां वकील पुण्यास लिहीतच गेले कीं, टिपूचे मसलतीचा समारोप आपले हातें करावा हा इरादा धरून येत आहेत. तेव्हां नाना फडणीस यांणी हरीपंततात्यांस निकड आरंभिली कीं, महादजी शिंदे बऱ्हाणपुरापर्यंत आले नाहींत तोंपावेतों टिपूचे मसलतीचा समेट, अंग्रेजांची व त्यांची दुरुस्ती करून बमय फौज पुण्याचे मुक्कामीं येऊन दाखल व्हावें तरी तुमचे परिश्रमाचे सार्थक. हें न जाल्यास आजपावेतों गर्भवासी श्रीमंतापासून सेवासेवन केलें हें गांवखुद होऊन यशाधिकारी आणखीच होईल. यांतील कार जे उगवून लिहिण्यांत येत गेले त्याज-

---

ईर्षा राहिली नाहीं. **वकिलांनीं** – शिंद्याच्या वकिलानें. **म्हणजे ब्राह्मण अर्थात् टाळे जातील** – ?

(६९) **मामला** – खंडणी. **रबाबाचे पोटीं** – दहशत देऊन, दहशतीच्या पोटीं, दबाव देऊन. **खंडणीचा जाब बोलण्यात आणून** – खंडणीची रक्कम ठरवून घेऊन. **गढी खालीं करून** – गढींतील होळकराचे लोक हाकून देऊन. **हिंदुस्थान** – उत्तर हिंदुस्थान. **दुरुस्ती** – स्नेह. **सेवासेवन** – सेवाचाकरी, कष्ट. **गांवखुद होणें** – नष्ट होणें, निष्फळ होणें. **आणखीच** – निराळाच कोणी तरी, भलताच, दुसरा. **कार** – दंश, मर्म, मुद्दा. **उगऊन लिहिणें** – खोलून खुलासा करून लिहिणें.

वरून हरीपंततात्याहि कृतकर्माच, तांम्र व टिपू उभयतांवर भय प्रीति ज्याची त्यापरि घालून, हवा याप्रमाणें, महागाई या प्रकारची, ते पक्षीं सालमजकुरी तहरह ठरवून तऱ्हे द्यावी. पुढें बस पडल्यावर पाहिजे तसें करावें हे नेकसल्ला. घसीं बळें गोऊन गुंतून पडणें हे राजधर्मास अप्रशस्त. असाच टिपूसहि बुद्धिवाद केला कीं, या गर्दशींत पानावर पान घालून तूर्त सफाई करावी. या भावीं ज्यांचें त्यास वेगवेगळालीं बोलणीं करून (इंग्रज व टिपू दोघासही सांगितलें कीं) याप्रमाणें तुमच्यानें होत नसल्यास आमचे घरीं राजकारण उत्पन्न जालें आहे याजकरितां मसलत खर्च लागला हा तुम्हांपासून घेऊन आम्ही निघून जाऊं. यांत उभयतांसहि अडचण पडेल हें उभयतांचे मनीं बिंबून त्यांचा त्यांचा आपसांत किलाफ न ठेवितां सफाईचें पोटीं भेटीं करून स्वारी खर्च पुण्याहून मदत जाली त्याजसुद्धां दुतर्फा आपला हात उगवून फौजेची समाजावीस तेथील तेथें करून, दरकूच महादजी शिंदे बऱ्हाणपुरास दाखल जहाले नाहींत तो साठ हजार फौजेनिशीं हरीपंततात्या पुण्यास दाखल जहाले.

(७०) हें वर्तमान पाटिलबावांस समजल्यावर मनची उमेद मनांत गळून ठोकर फार मोठी खाल्ली. पुढें जाऊन अर्थ नाहीं, मागें काय समजून जावें ? मग देशी येण्यास कारण वजीरातीचा आप्लाब बमय मरातब श्रीमंतास नजर करावा,

---

(६९) कृतकर्मा – मोठमोठीं कामें केलेला, अनुभवी. **ताम्र** – इंग्रज. **तऱ्हे देणें** – तऱ्हा देणें; दिरंगाईवर टाकणें. **बस पडणें** – बस बसणें, बळकटी होणें. **घसीं बळें गोवून गुन्तून पडणें** – उगाच आपणच होऊन संकटांत स्वतःच गोवून घेणें. 'घस' व 'घसमुसळया' या शब्दांचा मूळ अर्थ फार अश्लील आहे. **गर्दशी** – सर्वनाशाचा प्रसंग. **पानावर पान घालणें** – हो ला हो म्हणणें.

(७०) ठोकर खाणें – हिरमोड होणें. **पुढें जाऊन अर्थ नाहीं, मागें काय समजून जावे ?** – टिपूच्या मोहिमेचें यश आपल्या पराक्रमानें पदरांत पाडून घ्यावें म्हणून आपण जलदीनें दक्षिणेंत चाललो, तो मोहीम यशस्वी करून हरिपंत पुण्यास परतलेहि. तेव्हां दक्षिणेंत जाण्यांत आतां स्वार्थ काय राहिला ? बरें, असेच उलट परतून हिंदुस्थानांत जावयाचें करावें तर तेंहि शोभण्यासारखें नाहीं; कारण नाना फडणवीस तुम्ही उत्तर हिंदुस्थानचा बंदोबस्त सोडून दक्षिणेंत येऊं नका असें वारंवार बजावीत असतां आपण हट्टानें येण्यास निघालों. तेव्हां काय करावें ? असा मोठा पेंच महादजीला पडला. **आप्लाब** – मूळ आफ्ताब असा शब्द असला पाहिजे. आफ्ताब–(१) अबदागीर. (२) येथें वजिरातीचा. 'आफ्दाब' म्हणजे वजिरातीच्या प्रतिष्ठेचें द्योतक असें अब्दागीर वगैरे सामान. **मरातब** – सन्मानचिन्हें.

ही गोष्ट प्रधान करून, तावडतोब जाण्याचा समारोप बऱ्हाणपूर पावेतों होऊन सोहलतीनें पुण्यास गेले. इकडे हिंदुस्थानांत गोपाळराव चिटणिवीस मुक्त्यार, अलीबहाद्दर संबंधीं व्यवहार होऊन, पुढें सुभेदाराशीं मेळ शिंदे यांनीं राखला. यांतील आदिपश्चात् पहाणें याची माहिती जिऊबादादास त्याजकडे ताबेदारी. गोपाळराव चिटणवीस याचे अल्पवय, दुरांदेशी पहावयाचा तोटा. त्यांत धन्याचे प्रतापें कडून एक दोन कामें बनून आलीं. यावर तरवारीचे अदमासाचा स्फुंद. पाटिलबावा असतां सुभेदारांचे मनोधारण राखणें हा क्रम न धरितां लहान मोठ्या गोष्टी बेशिस्त घडून आल्या. तेव्हां सुभेदारांनीं विचार करून येथें राहून आपसांत कंबेशी उत्पन्न होईल, म्हणोन चार दिवस जयपूरचे राज्यांत काढावे, खंडणीहि घ्यावयाची आहे, (अशी) सबब (सांगून) कूच करून जयपूर प्रांतीं आले. कंबेशी न यावी याजकरितां सुभेदारांनीं टाळा दिला. किल्ले कामा प्रांत ब्रीज येथें अंमल शिंधाचे, परंतु खुशाल कुवर त्या जिल्ह्यांतील राहणार. त्याजकडे पागा हजार बारार्शे घोड्यांची. तो कामास राहिला होता. गोपाळराव चिटणीसांचे मनांत कांहींहि करून होळकरांशीं कळ वाढवून फाट पाडावा असें होतें. सुभेदार जयपूरचे जिल्ह्यांत (होते.) हा तेथें राहिला होता त्यास हुसकून द्यावें म्हणोन लखबा दादा थोरले यांजबरावर पांच हजार फौज देऊन रवाना केले. हे कामा मुक्कामीं आल्यावर त्यांनीं त्यांसी जाब लाविला कीं, आमचे खटल्याचा एक गवत वेगळें

---

(७१) **ही गोष्ट प्रधान करून** – या गोष्टीकरतांच मुख्यत्वें येत आहोंत अशीं जाहिरात करून. **समारोप** – निश्चय. **आदिपश्चात्** – मागील पुढील; अर्थात् आरंभापासूनची माहीतगारी. **त्याजकडे ताबेदारी** – वास्तविक खरा माहितगार जिवबा दादा होता. त्याजकडे हिंदुस्थानची मुखत्यारी महादजीनें द्यावयास पाहिजे होती. परंतु ती दिली गोपाळराव चिटणीसाला. आणि जीवबादादाला ताबेदाराचें म्हणजे दुय्यम नोकराचें काम सांगितलें. **दुरादेशी पहावयाचा तोटा** – दूर दृष्टीचा तोटा, अविचारी बुद्धि, कोती बुद्धि. **यावर** – यामुळें. **तरवारीचे अदमासाचा स्फुंद** – आपल्या फौजेच्या पराक्रमाविषयींचा स्फुन्द म्हणजे गर्व झाला होता. **कंबेशी** – कलह. **टाळा देणें** – दूर निघून जाणें. **फाट पाडणें** – वैर उत्पन्न करणें, ताटातूट करणें. **आमचे खटल्याचा एक गवत वेगळे करून इ०** – खुशालसिंगानें उत्तर केलें कीं, “ आम्ही या किल्ल्यांत जमेतीनिशी राहिलों असलों तरी तुमच्या प्रांताची कांहीं एक नाधाडी करीत नाही. आमच्या खटल्याला म्हणजे घोड्या तट्टांना गवत वगैरे लागतें तेवढें फक्त येथून घेतो. या वेगळा आमचा कोणचाच उपद्रव तुम्हास होणार नाहीं.

करून कांहीं उपद्रव असल्यास शोध घ्यावा. (तथापि) त्यास हरतऱ्हेनें बिघाड करावयाचा. तेव्हां मोर्चे लाविलें. तोफ सुरू जहाली. तिसरे दिवशीं पांच लोकांनिशीं बाहेर निघून मोर्चे तुडवून तोफा ओढून आणावयास लागतील यास्तव ठिकाणीच छकड्याखालीं टाकून आले. अशी सत्तावीस रोज लढाई झाली. तीन वेळां मोर्चे कापले. शिपाई जुवामर्द खुशाल कुवर एकच होता. परंतु होळकराच्या घरचीं माणसें. कोण्या नांवाची बायको घरांत घातली होती. तिचा भाऊ याचा प्राण घ्यावयाकरितां हिंडतच होता. ते दिवशीं दोन प्रहराची वेळ, हुक्का ओढीत बसला होता. त्यानें संधी पाहून जवळ कोणी माणूस नाहीं, बंदुक धरलीच होती, गोळी छातींत मारून प्राण घेतला. तेव्हां म्हणार मेला, आंतूर मजबूत परंतु धणी नाहीं. यामुळें सर्वांनीं विचार करून हजार बाराशें सरंजाम, दीडशें उंट जंबुऱ्याचें सरंजाम, तयार करून बाहेर निघून सुभेदारांकडे जयपूरचे मुलकांत आले. याजवर जयपूरचे खंडणीचा जाब ठरावून राजांच्या भेटी जाल्या. परस्परें मेजवान्या शिष्ठाचार व्हावयाचे ते होऊन ऐवज भाई–बेटयांवर वराता दिल्ह्या, त्यांत तीन लाख रुपयेची वरात प्रतापसिंग माचा हेडीवाल्यावर होती. तो ऐवज सुभेदारांनीं बापूजी होळकराचे खर्चास दिल्हा. बापूसाहेब सरंजामानशीं वसुलास गेले. जयपूरवाले दुतीघर गोपाळरावभाऊ व जिवबादादा यांच्या गोडींत शिरून हिमायत केली. त्यांचा प्रेष बापूसाहेबांकडे आला कीं, माचाहेडीवाल्याकडे आमचे दहा लक्ष रुपये घेणें. आमचा ऐवज वसूल होय तों पावेतों तुम्ही तगादा करूं नये, येणार नाहीं. असें पत्र पाठवून मागाहून कूच करून मुकाबल्यास आले. तेव्हां यांनींही सुभेदाराकडे पत्रें पाठविलीं कीं, येथें असा प्रसंग प्राप्त जाला आहे. आज्ञा येईल तसें करूं.

---

(७०) **कोण्या नांवाची** – कोण्या फलाण्या नांवाची. लेखकांस नाव स्मरत नसल्यामुळें असें लिहिलें आहे. **म्हणार** – मोडी वाचनाची चूक. लढणार असें पाहिजे. लढणार – लढवय्या असा एक खुशालकुवर होता, तो मेला. किल्ल्यांत मजबुती पुष्कळ होती. परंतु खुशालकुवर मेल्यामुळें धनी किंवा पुढारी नाहींसा झाला. म्हणून किल्ल्यांतील लोक तो टाकून पळून गेले. **जंबुरा** – एक तऱ्हेची तोफ. ही उंटावरून चालवीत असत. **ऐवज** – ऐवजासाठीं. **वरात** – सध्याच्या चेकसारखी पैसे पटविण्यासारखी हुंडी किंवा हुकूम. **दुतीघर** – द्व्यामुष्यायण ! दोहीकडे अंग देणारा ! दुदील ! तरतें बुडतें पाहात बसणारा ! **यांच्या गोडींत शिरून हिमायत केली** – यांच्याशीं सख्य करून वजन मारलें, वशिला लावला. **येणार नाहीं** – पैसा येणार नाहीं. वसूल मिळणार नाहीं. खंडणी हातीं लागणार नाहीं.

तेच दिवशीं होळकराकडील पेंढारी यांणीं शिंद्याकडील फौजेचा तीनशें उंट व कांहीं घोडे बैल व बंदीशाळा ही लुटून आणलीं. ही अनाहूत फिसाद होऊन त्यांनीं चालून घेतलें. यांनींहि बुणगे छाटून पुढें रवाना केले. सडा घोडा राऊत मुकाबला सांभाळीत सांभाळीत जयपूरचे मुलकांत आले. सुभेदाराचा मुक्काम बनारसचे कांठीं होता.

(७१) एक दिवशीं जयपूरवाल्याचे व शिंद्यांचे फौजवाल्याचे अंत्र एक (असतां) इकडे दौलतराम हळदे जयपूरचे कारभारी यांजला आणून सुभेदारांनीं ताव दिल्हा कीं, ऐवजास इल्लाबिल्ला दाखऊन आमचे आपसांत कलह उत्पन्न केला. त्यानें उत्तर केलें कीं, " तुमचे हत्तीची लढाई तुमचे तुम्ही जाणा. आम्ही पैसा कबूल केला तो देऊं-आम्ही त्यांचेंहि देवाळ व आपलेंहि देवाळ. जबरदस्त असेल तो घेईल." असें बोलणें होतांच त्यासमयीं गोपाळराव व जिऊबादादा यांचा छापा बापू होळकरास सोडून सुभेदारावर आला. पाराशर दादाजी जुवामर्द सर्वा गोष्टींस बहाद्दर परंतु स्वभाव तपीक. सुभेदारांचा हात धरून वोढून " कसचें कपाळाचें बोलणें बोलतां ? हरीप उरावर आला." सुभेदारांस घोड्यावर बसवून, दोन हजार स्वार हुजुरातीचे बराबर देऊन पुढें काढून दिल्हें. मागें शिलेदार कांहीं हुजरात घेऊन जातीनें मुकाबल्यास राहिले. बाजार वगैरे कदुप सुभेदाराचे मागें रवाना केला. तों शिंद्याकडील फौज नदी उतरून आली. त्याठिकाणीं दोन घटका हुरमठ फार मोठी जाली. माणीकचंद हजारी व

---

(७०) **बंदीशाळा** - शत्रूकडील पकडून कैद करून आणलेले लोक ! **फिसाद** - कटकट, फितूर. **छाटून** - निवड करून, निराळे काढून. **बनारसचे कांठीं** - बनासचे कांठीं असें पाहिजे. हें नदीचें नांव आहे.

(७१) **अंत्र** - सूत्र, आतडें. **एक अंत्र असणें** - एक विचार असणें, सख्य असणें. **ताव देणें** - समज देणें, जरब देणें. **इल्ला बिल्ला** - चाळवणी, देऊं दिलाऊ करणें. **तुमचे हत्तीची लढाई** - तुमची हत्तीहत्तींची लढाई. एकाला शरण जावें, तर दुसरा मारणार. तेव्हां आम्ही दोघानाहि शरण जाणार. तुमच्या दोघांत मारामारी होऊन जो विजयी ठरेल त्याला आम्ही खंडणी देऊं. **देवाळ** - देणेंकरी. **तपीक** - वाचनाची चूक. मूळ शब्द ' तपीळ ' किंवा ' तपळ ' असा आहे. त्याचा अर्थ ' तापट, ' ' तल्लख ' असा होतो. **हरीप** - शत्रु. **कदुप** - मोडी वाचनाची चूक. ' लादून ' असें पाहिजे. **हुरमठ** - झुरमठ, झोंबाझोंबी, मारामारी, हातघाई.

हिरोजी वाघमारे असे पांच पन्नास नांवांचीं माणसें कामास आलीं. दिनकरराव पागनीस याजला भाल्याची जखम लागली. तेव्हां सांभाळून पाठीवर घ्यावी. (पण) निशाणाचा हत्ती भवानी शंकर मागें फिरेना. तेव्हां निशाण उतरून घेतल्यावर मागें फिरला. प्रसंगी माणसें कामास आलीं. इतक्या अवसरांत सुभेदारांचा यांचा चौ पांचा कोसांचा छाटा पडला. तों इतक्यांत बापू होळकरहि येऊन सामील जहाले. तो सरंजाम आलियावर मुस्तकीम होऊन मुकाबल्यास सडे उभे राहून मागें ढाला उभ्या केल्या. त्यांनींहि यांची बळकटी पाहून तीन कोसांचे छाटींनें मुक्काम केला. सुभेदार बावीस कोस, मौजे बावी तालुके ब्राह्मणगांव, हडोतीचा अम्मल जहागीर होळकराची, गढी मजबूत, पाणी चाऱ्याची सोय, असें पाहून मुक्काम करून, महेश्वरीं बाईसाहेबांस पत्रें रवाना केलीं कीं, " येथें प्रसंग असा गुदरला. इत:पर खर्चाची व फौजेची मदत जाली पाहिजे. " वर्तमान मातोश्रीसाहेबांस समजून अंगुष्टाची आग मस्तकास गेली. तुकोजी होळकर मारला गेला असतां चिंता नव्हती, परंतु म्हातारपणीं चाकराचे हातून बदनक्षीची गोष्ट ! असो. "जीवन्नरोभद्रशतानि पश्येत्" ऐसा धैर्याचा विचार करून पांच लक्ष रुपयेच्या हुंड्या सुभेदाराकडे पाठवून पत्र लिहिलें. त्यांतील आशय कीं, " हिंमत न सोडतां हरामखोराचें पारपत्य करावें. खर्चाचा व फौजेचा श्वेत बांधितें. म्हातारपणीं जरब खाली असल्यास लिहून पाठवावें. मी डेरे दाखल होते. " अशा रवानग्या तिकडे दोन चार लगत करून, देशीं दहा कारकून नालबंदी बाबद ऐवज बरावर देऊन खानदेशांत व स्वदेशी पाठवून शिलेदार आणिले. एक्या महिन्यांत दहा हजार हजेरी होऊन चिमणाजी फडणीस याजबराबर रवाना केले. दुसरे महिन्यांत आठ हजार स्वारांची हजेरी जाली. काशीराव होळकर जयपूर प्रांतीं देवाशाचें मुक्कामींहून लग्नाकरितां महेश्वरीं आले होते. त्यांचेबराबर रवाना केली. अशा फौजेच्या चुंगी पांचशें, हजार, पंधराशें, दोन हजार जशी हजेरी होत गेली तशी पाठवीत गेले. याशिवाय सुभेदारांनीं गोसावी

---

(७१) **तेव्हां सांभाळून पाठीवर घ्यावी** – तेव्हां अधिक हानी होऊं न देतां माघार घ्यावी. **प्रसंगीं** – तेवढ्या अवधींतहि. म्हणजे हत्तीवरून निशाण उतरून घेईपर्यंतच्या थोड्यशा अवधींत झालेल्या हातघाईंत कांहीं माणसें ठार झालींच. **छाटा** – छट्टा, अंतर. **ढाल** – निशाण. **अंगुष्ठाची** – पायाच्या अंगठ्याची. **श्वेत** – सेतु, पूल. **श्वेत बांधणें** – एका पाठोपाठ रवाना करीत राहणें. जसें ' पत्रांचा श्वेत बांधला. ' **लगत** – लागोपाठ. **चुंग किंवा चुंगी** – टोळी. **गोसावी-बैरागी** – या उत्तर हिंदुस्थानांतील लढाऊ जमाती होत्या.

बैरागी चाळीस हजार ठेविले. चाळीस हजार स्वारांचा भरणा जदीद कदीम जाहला. याशिवाय पायदळ. रोज लढाई चालली. एक दिवशीं त्यांनीं कंपू पुढें घालून मागें फौजेच्या मुकाबल्यास आले. तोफांच्या माऱ्याखालीं यांचा टिकाव न होतां पाय उठले. सांभाळून मुकाबला सोडविला. पुढें विचार करून सुभेदार व बुणगे कोटयास पोंचून नगारा, घोडा, राऊत बापू होळकर व पाराजीपंत राहिले. मग मुकाबला न पडतां पलटणास घेराघेरी केली. पलटण सोडून स्वार सरंजाम मुकाबल्यास आल्यास उचलून घ्यावे. याप्रमाणें कजाखी तीन महिने केली. तीन महिन्यांत त्यांचे लष्करांत रुपये शेर अन्न व रुपयाच्या पांच पेंढ्या चाऱ्याच्या जाल्या. ते कायर जाले. मग त्यांजकडील पेगाम आला कीं, जाली गोष्ट ही भविष्यावर टाकून, आपण धणी, मागें आम्ही सेवक, पूर्वींपासून मुलकाच्या वगैरे वाटण्याचे शिरस्ते, त्याप्रमाणें अंतरवेद वगैरे मुलकाची वांटणी घेऊन आम्ही ताबेदार. सुभेदारांनीं एखादी मोहीम करावी. आम्ही चाकरीस हजर (राहावें) याप्रमाणें पेगाम आल्यावर सुभेदारांस लिहून परवानगी आणली. त्यावरून पाराजीपंत बाबा व बापू होळकर व गोपाळरावजी व जिवबादादा यांच्या भेटी होऊन यादी बुदी ठरून यांचा बेलभंडार त्यांची उदी परस्परें सलामाई जाली.

(७२) तो महेश्वरीं मल्हारराव होळकर सवाई यांनीं महेश्वरीहून बाहेर पडून बंड केलें. खानदेश स्वदेश मोंगलाचा मुलूख लुटून दहा हजार फौज जमली होती. तें बंड श्रीमंतांनीं फौजा पाठवून बुद्धीबळाचे खेळासारखे घेरीत घेरीत वाफगांवचे किल्लयांत आणला. तेथें हस्तगत करून पुण्यास नेऊन महेश्वरी बाईसाहेबांपाशीं

---

(७१) जदीद – नवा. **कदीम** – जुना. **पाय उठणें** – धर न धरवणें. **उचलून घ्यावें** – त्यावर उलटून पडावें. **कजाखी** – कष्टाची लढाई, मेहनत. **कायर** – कायल म्ह. घाबरे. **पेगाम** – पैगाम–बोलणें. **झाली गोष्ट ही भविष्यावर टाकून** – अदृष्टांत होते त्याप्रमाणें न व्हावी ती गोष्ट हातून झाली, ती आतां विसरा. **यादी बुदी** – करार, करारांचीं कलमें. **उदी** – पिराजवळ ऊद जाळून त्याचा अंगारा प्रसादार्थ घेतात तो. बेलभंडार, उदी, गंगाजळ, देवावरील तुळशी फुलें इ० देऊन शपथप्रमाण करण्याची पूर्वीं पद्धत असे. **सलामाई** – दिलजमाई, सख्य.

(७२) मल्हारराव होळकर सवाई – तुकोजी होळकराचा मुलगा मल्हारराव. **सवाई** हा इंग्रजींत Junior किंवा The second असें लिहितात त्यासारखा देशी शब्दप्रयोग आहे. जसें सवाई माधवराव, सवाई जयसिंग, सवाई शिकंदर.

पावतें केलें. त्याची उमेद कंपूस एक दिवसांत मारून बराबर करीन ! हें बोलणें. देशी बंडांत मोंगलाशीं व श्रीमंतांशीं पन्नास पन्नास स्वारांनशीं कुदून पडून फौज हात बेहत्तर केल्या. त्या भरंवशियावर हें बोलणें गोडसें वाटून जोत्याजी घोरपडे वगैरे नांवाचीं माणसें दहा हजार फौज बराबर देऊन रवाना केले. ते येऊन पोंहचले. मातोश्रीचा लेख गेलाच होता कीं, समेट जाहला हा सर्वोपरी चांगला. परंतु जाल्या गोष्टीची उजळणी न जाली हें अंत:करणीं खटकणी राहिली. यानंतर मल्हारराव होळकर दहा हजार फौजेनिशीं येऊन पोंहचलें. याचे शूरत्वाचे वोहोम्यावर व मुल्य भावी होणारान्मुख बुद्धि उत्पन्न होऊन ठरला प्रकार बेलभंडारसुद्धां त्या गोष्टीस फेरपगडी बांधून बदलून गोष्ट सांगितली. यांत पाराजीपंत, बापू होळकर यांनीं तीन महिने श्रम करून वचनांत आल्या गोष्टी रहीत होऊन पूर्व दिवस प्राप्त जाला. यांत उभयतां उदास जाले. पुन्हा घेराघेरी चालली. सुभेदारांनीं मथुरेचे मुक्कामीं जुंजरनेक फरांशिस चाकर ठेवून कंपू तयार करण्याविशीं आज्ञा केली होती. त्याचीं पांच पलटणें तयार जालीं होतीं. लढाईचा मुकाबला ठरला. त्यांचा कंपू यांची पलटणें त्यांचीं साठ तोफ व यांच्या पांच तोफा. लढाई सुरू जाली. यांच्या पांचा पांचा पलटणांची बरोबरी गोसावी चाळीस हजार त्यांत बाणाच्या कैच्या. सूर्योदयापासून (तों) चौदा घटका तोफांची लढाई जाली. त्यांत त्यांच्या चौदा तोफा गैर उपयोगी करून छकडयाखालीं पडल्या. डबई झाडावर चढून दुरबीण लावून पहात होता. त्या खांदीस गोळा मारून खालीं पाडला. चौदा घटकेंत पांचा तोफांनीं सत्तावीस हजार गोळे मारले. दोन प्रहरचा समय. पाणी पाणी मनुष्य करूं लागलें. त्यांचे कंपूत उंटाच्या पखाला भरून येऊं लागल्या. इकडे पाण्याचा तोटा. येणें करून गोसावी व बैरागी यांचे पाय उठले. पलटणांत सरंजामाची कमती पडली म्हणून, एवं पलटणें बैरागी निघाले. स्वारांचेहि पाय उठले. लाखोरीचे

(७२) **कुदून पडणें** – उडी घालून पडणें. **फौज हात बेहत्तर** – वाचनाची चूक. फौजा तारबतार केल्या असें पाहिजे. **तारबत्तार** – तारबतार म्ह. उध्वस्त, विकीर्ण, दाणादाण. **उजळणी न झाली** – उट्टें काढतां आलें नाहीं. **खटकणी** – बोंच, रुखरुख. **वोहमा** – वहमा, आवाई, लौकिक. **भावी होणारान्मुख** – भविष्यांत होतें त्याप्रमाणें. **फेर पगडी बांधणें** – वचनभंग करणें. **जुंजरनेक** – दुद्रनेक. **कैची** – २४ बाणांची गड्डी. **बाण** – दारूचे बाण. **छकडा** – तोफ ज्यावर घातलेली असते तो गाडा. **यांचे पाय उठले** – हे जागा सोडून निघून गेले, पळून गेले.

बारींतून निघता त्या तलावाचे कांठीं मल्हारराव होळकर फारबस होऊन पाण्यांत पडले आहेत. ज्याचे भरंवशियावर फेरपगडी, त्याची ही दशा ! ! मग त्यांजला उचलून हत्तीवर बसवून तेथून काहडलें. तों मागाहून शिंद्यांकडील पेंढारियानें लगट करून खराबा बहुतच केला. भिकाजी होळकर सुभेदाराशीं येत तोंपर्यंत तीन घोडे ठार जाले. वाटेंत पाणी नाहीं. पाराजीपंत बाबा सुभेदारांपाशीं आले. घोड्यावरून उतरून तळतळून सुभेदारांपुढें हात करून "जाल्या गोष्टीस फेर-पगडी बांधल्याचें फळ पावला. आतां उठा. माझा मार्तंड मल्हारी आला." तो समयास फरबस होऊन तलावांत पडला होता. त्यास सांभाळून आणणें कठीण पडलें. खंडोबा खंडोबाचे जागां राहिला. म्हातारपणीं अपेशाचे ठिकरे घेतलें. मग सुभेदारांस उठवून हत्तीवर बसवून कहाडलें. पळती फौज, पाणी पंधरा वीस कोस नाबूद, त्यांत पेंढाऱ्यांची अडचण. मुलतानपुरापासून तीन कोस गांव तेथें तलाव होता. त्या तलावाचें पाणी आटून कर्दम शेष राहिला. तों मागाहून आले त्यांनीं वस्त्रें घालून पिळून प्याले. ही दशा जाली. शेंकडों घोडे व शेंकडों माणूस पाण्यावांचून गांवखुद जहाली. या तऱ्हेनें मुकुंदराव उतरून दरकूच इंदुरास आले. गोपाळराव चिटणीस यांचे मनांत धर्म होता कीं, सुभेदारास जिवंत धरून पाटिलबावापाशीं न्यावें, आणि तो करताहि. परंतु जिवबादादा जुना माणूस दुरांदेशीचा. त्यानें बनासचे छाप्यांत व लाखेरीचे लढाईत टाळा दिल्हा, लाखेरीची हार जाल्यावर त्यानें गोपाळराव व कंपू यांजला लाखेरीची बारी उतरूं न देतां आपण जातीनें मुकुंदराव हे रामपूर प्रगण्यांत येऊन मेवाडकडे निघून गेले. इकडे पिच्छा केलाच नाहीं. यामुळें इमान ठिकाणीं राहून भावी प्रारब्धानुसार होणें तितकें जालें. हें वर्तमान महादजी शिंदे यांजला पुणें मुक्कामीं समजल्यावर आबा चिटणीस यांनीं तोफा सोडण्याविशीं परवानगी तीन वेळां विनंती केली, परंतु पाटिलबावा बोललेच नाहींत. तिसरे वेळेस झडझडून उत्तर केलें कीं, "आपसांत कटकट करून

---

(७२) **फारबस** – 'परवश' असा शब्द साने यांनीं सुचविला आहे. **परवश** – बेहोष झाल्यामुळें तर नव्हे ? मल्हाराव एक नंबरचा व्यसनी व दारूबाज होता. **जाल्या गोष्टीस फेर पगडी बांधल्याचें फळ पावला** – ठरलेला करार मोडलात त्याचें प्रायश्चित तुम्हांस मिळालें. **समयास** – लढाईच्या वेळीं. **ठिकरे** – खापर, **नाबूद** – साफ, स्वच्छ. **गावखुद** – नष्ट. **मुकुन्दराव** – मुकुन्दरा असें असावें. मुकुन्दरा हे स्थानिक विशेष नाम आहे. **धर्म** – अंतस्थ हेतु. **टाळा देणें** – पळ काढणें. **हार** – पराभव.

जन्माचे भाऊपणियांत पाणी घातलें ! तोफा सोडण्याविशीं मजला वाटत नाहीं ! इतक्यावर सुभेदारांची माझी भेट होत नाहीं." डोळ्यांस पाणी आणलें. गोपाळराव यांस कैद करून भेलशास ठेविलें. जिऊबादादा यांस बोलावून आणून हुजूर घेतलें. सुभ्याचें काम जगन्नाथराम व लक्ष्मण अनंत यांजकडे सांगितलें. त्याच वर्षांत महादजीबावांचा काळ जहाला. पाटिलबावा जिवंत असतां सरदारीचीं वस्त्रें दौलतराव शिंदे यांस द्यावी असें मनांत होतें. तोच मजकूर कारभारी यांनीं श्रीमंतांचे कानावर घालून विनंती केली.. त्याजवरून श्रीमंत कृपावंत होऊन पाटिलबावांचे मनोदयानुरूप वस्त्रें सरदारीचीं दौलतराव शिंदे यांस दिलीं. पुढें मोंगल चढाई करून आले. त्याचे मुकाबल्यास श्रीमंत जातीनें जावें हा इरादा धरून बाहेर निघाले. होळकरांस पत्रें आलीं कीं, तुम्ही सरंजामसुद्धां येऊन सामल व्हावें म्हणून. येथें फौज मनस्वी, हिशोबाचा राडा पडला होता, (तो) राडा निपटून सुभेदार महेश्वरीं आले. पुढें श्रीमंतांचे आज्ञेप्रमाणें हजर होण्याचा विचार तावत्कालपर्यंत दिवाणगिरीचे मोहोगम होतें. पाराजीपंत, खंडोपंत काम करीतच होते 'असें' 'नाहीं' म्हणावयास पाराजीपंतबावा. परंतु मातुश्रीबाईसाहेबांचा व सुभेदारांपासून शिलशिला लोभाचा व ऋणानुबंधहि रावजी महादेव पारनेरकर फडणीस यांचे घरावर यांतील वास्तविक अर्थ निदर्शनें बाईसाहेब कारभारांत अव्वल अखेर माहीतगारी त्यांची व सुभेदारहि तोंडापुढेंच होते. त्यांजलाहि ठाऊक. त्या ओघावर सुभेदार मातुश्री एखादें बारीक मोठें विचारणें तें खंडोपंतास विचारीत असावें, त्या धोरणावर ओघ चालावा, असा क्रम होता. त्या प्रसंगीं खंडोपंत यांनीं विचार केला कीं, श्रीमंतांचे हुजूर जाणें. समयसमर्पक द्रव्याचा, राजकारणाचा, लढाईचा प्रसंग तेव्हां मुकत्यार कोणी असावा म्हणजे धण्यास पुसावयास व आपल्यासारखे गोरगरीबाचे बचावास नीट. यास्तव नारो गणेश बहुतां दिवसांचे पदरचे. भविष्यानुरूप धण्याचे लक्षांत न जपतां कंबेशी आली न आली त्याचें फळ पावून प्राणास मुकले, ते पक्षीं त्यांचेच मुलास वस्त्रें देऊन बाळाजी लक्ष्मण व त्यांचे मुतालक श्रीपतराव मैराळ रांजणगांवकर यांनीं उभयतांनीं कारभार करावा ही सल्ला खावंदास

---

(७२) **भाऊपणीयांत पाणी घालणें** – भाऊपणांत विक्षेप आणणें. स्नेहांत वैर पाडणें. **तोफा सोडण्याविशीं मजला वाटत नाहीं** – तोफा सोडाव्या खुषी करावी असें मला वाटत नाहीं. **हजर होण्याचा विचार तावतकालपर्यंत** – हजर होण्याचा विचार पक्का ठरेपर्यंत. **मोहोगम** – मोघम, पक्के नाहीं असें. **शिलशिला** – ऋणानुबंध.

देऊन नमून सिद्ध केला. संवत १८५१ चे सालीं वस्त्रें दिल्हीं. रामराव आबाजी पळशीकर याजलाहि म्हाळसाकांतांचीं वस्त्रें जालीं.

(७३) याप्रमाणें बंदोबस्त होऊन पुण्यास यावयाकरितां सुभेदार नर्मदा उतरले. पुणें मुक्कामीं दाखल जहाले. श्रीमंत भोंसले, शिंदे, होळकर व किरकोळ सरदार मानकरी मिळोन असंख्य सैन्य जालें. दहा कोसांत तळ रहात होता. तसाच मोंगलहि असंख्य सैन्य मिळवून तीन वर्षाचा सरंजाम भारबरदारी करून आले होते. त्यांत श्रीमंतांचे प्रतापें करून एक्याच लढाईंत मसलत सिद्ध जाली. लौकिक शिंद्यांकडील तोफखाना व भोंसल्याकडील बाण यांचा फार जाला. परंतु तरवारीशीं गांठ परशुरामभाऊ पटवर्धन मिरजकर व होळकराशींच पडलीं! यांतील दर्याप्तीनें ज्या प्रसंगीं हिंडण्यांत वागण्यांत त्यास आहे नानासाहेब यांस पुर्ते उमजलें होतें.

(७४) हा अध्याय संपल्यावर श्रावण वद्यांत चतुदर्शीस मातोश्री बाईसाहेबांचा काळ जाहला. त्यासमयीं सुभेदाराचे कनिष्ठ बंधु संताजी होळकर किल्ले सेंदव्याचे जिम्मेस होते, ते समयास येऊन हजर जाले. उत्तर कार्य त्यांनीं केलें. प्राणोत्क्रमण बहुत सावधानीनें जालें. श्रावण मासचा महिमा. बारा हजार तेरा हजार पात्र जेवण्याचे, त्याचा संकल्प सोडून, आसन्नकाळीं मोक्ष धेनु उत्क्रांत धेनु (दिल्या), धर्माची प्रवृत्ति होऊन, नामस्मरणाचे घोषांत देहावसान जालें. त्याच

---

(७२) **म्हाळसाकांताचीं वस्त्रें** – देवाचीं प्रासादिक वस्त्रें.

(७३) **दहा कोसांत तळ रहात होता** – सैन्य इतकें अगणित जमलें होतें कीं, त्याला दहा कोसांएवढें विस्तृत क्षेत्र उतरावयास लागत होतें. **भार बरदारी** – सामान-सुमान वहाण्यासाठीं बैल, उंट, तट्टे, वगैरे. **यांतील दर्याप्तीनें ज्या प्रसंगीं हिंडण्यांत वागण्यांस त्यास आहे** – " यांतील दर्याप्त जे त्या प्रसंगीं हिंडण्यांत वागण्यांत होते त्यांस आहे " असें पाहिजे. **दर्याप्त किंवा दर्याप्ति** – समजणूक, आकलन. भावार्थ, त्याप्रसंगीं जे हजर होते त्यांना या गोष्टीची पूर्ण जाणीव आहे. **नानासाहेब** – नाना फडणवीस.

(७४) **किल्ले सेंदव्याचे जिम्मेस होते** – सेंदवा किल्ल्यावर किल्लेदारीचें काम करीत होते. **सावधानीनें** – शुद्धीवर असता. **श्रावणमासाचा महिमा** – धार्मिक दृष्ट्या अति महत्त्वाचा असा श्रावणमास सुरू असल्यामुळें. **मोक्ष धेनु आणि उत्क्रांत धेनु** – ही मरणसमयीं करावयाचीं दानें. सुखानें मृत्यु यावा व पापक्षालन व्हावें म्हणून मरणसमयीं गाई दान करीत असत. त्या दानांची हीं नांवें आहेत.

समयीं प्रातःकाळीं दर्शनी गाय होती तिनें हामडोन प्राण सोडला. बाईसाहेब होळकरांचे घरांत आल्यापासून समजूं लागल्यावर खंडेराव होळकर यांचे जहाला सरदारी चलण, त्यांत घुटी प्राधान्य. खर्च वगैरे अव्यवस्थित. आचारहि सदहू अन्वयें. यामुळें वृत्तीस उदास राहून सासू सासऱ्यांचे सेवनी तत्पर असून अंबादास पुराणीक याजपासून परत्र साधनाची कांहीं व्यवस्था ग्रहण करून सासुरवाशी सबब चोरून जपून युक्तीनें त्या वस्तूचें दास्य करीत राहिल्या. महिन्यांतून दोनवेळ तीनवेळ खंडेरावमहाराजांकडील बोलावण्याचा प्रसंग येईल ते दिवशीं खाशांनीं सर्व गोष्टी व्रतस्थ रहावें. थाळाहि दुवक्तीं हिकडून जावा. प्रहररात्र जाहल्यानंतर बाईसाहेबांनीं डेऱ्यांत जाऊन सहा घटका रात्र रहातांना निघून (परत) यावें, अशी रूढ. यांत ईश्वरी कृपेंकरून एक पुत्र व एक कन्या मालराव बावा व मुक्ताबाई जालीं. थोरले सुभेदार यांचा पूर्ण लोभ. कशीहि तबियत बेज्याह असल्यास बाईसाहेबांचा निरोप गेला असतां त्याप्रमाणें व्हावयाचें. दौलतींत उत्पन्नाविशीं सुभेदाराचें प्रारब्ध व पराक्रम. परंतु व्यवस्था करणें, नफानुकसानी पहाणें हें कारभारी यांनें बाईसाहेबांचे आज्ञेनें करीत असावें. असाच ओघ. याचप्रमाणें गौतमाबाईसाहेबांचाहि लोभ करणें (असे) बाईसाहेबांचे करण्याची रीत प्रखर. धनीपणाचें वारें कांहीं एक न ठेवितां कोणतेंहि करणें तें करावें. दुसरें, खावंद या प्रकारचे, परंतु स्नानसंध्यादि आचाराविषयीं सबाह्य एकरूप. येणेंकरून दिवसेंदिवस जास्ती वाढून खंडेरावमहाराज कुंभेरीवर कामास आले. तेसमयीं सहगमनाचा निर्धार. परंतु सुभेदारांनीं बहुतच ग्लानी केली. दौलतीचे सांभाळण्याविषयीं खंडू हें नांव तुजला ठेवून मी उत्पन्नाची काळजी करून होतों. हें माझें सौभाग्य कायम ठेवणें असल्यास विचार करावा. तेव्हां बाईसाहेबांनीं सुरत सांभाळल्यावर इष्ट अराध्य सुभेदारच असें मानून काळ काहाडला. तेव्हां संकोच प्राप्त होऊन मनेच्छा रहित

(७४) **दर्शनी गाय** – रोज सकाळीं जिचें दर्शन अहिल्याबाई घेई ती. **हामडणें** – हंबरडा फोडणें. **जहाला** – जहाल. **चलण** – वर्तणूक. **घुटी** – आंबलेला पदार्थ, दारू वगैरे. **(कांहीं) व्यवस्था ग्रहण करून** – कांहीं मंत्र वगैरे घेऊन. **त्या वस्तूचे दास्य करीत राहिल्या** – त्या मंत्राचा जप करीत राहिल्या. **थाळा** – जेवणाचें ताट. **हिकडून** – अहिल्याबाईकडून. **रूढ** – पद्धत वहिवाट. **बेज्याह** – अनावर, संतप्त. **ओघ** – पद्धति, वहिवाट. **प्रखर** – प्रकट, किंवा उघडाउघड. **खावंद** – नवरा. **ग्लानि** - अजीजी, आर्जव. **सुरत संभाळल्यावर** – शरीर सांभळता येऊं लागल्यापासून, कळू लागल्यापासून.

केली. सुभेदारांची सर्वोपरी झकली त्यांत दबाऊन आदिपश्चात विचाराच्या गोष्टी बोलणें असें पुण्य व भीड आहिल्याखेरीज दुसरे कोणाची नव्हती. अशा वर्तणुकीनें ईश्वरें पुत्ररत्न नेऊन दौलत आपले हातें दुसऱ्याचे घरांत घालून स्वच्छ रेवातीरीं वास करून स्नान–संध्या–दान–धर्म यांतच निमग्न राहून दौलतींचें धोरण दक्षण उत्तर महालची वहिवाट लावणी–उगवणी दामदस्त बाईसाहेबांपाशीं. दरम्यान सुभेदाराची बैठक वाफगांवीं पडून आठ चार चा (?) प्रसंग प्राप्त जाल्यावर खानदेश गंगातीर महालची चुकोती वाफगांवीं करीत जावी, म्हणून सांगून पाठविलें. जातीनें महालची वहिवाट केली. धर्माचा लौकिक परंतु पंधरा लक्षांची गांवखेडीं चालले होते तेव्हां वाड्यांत पाहिजेल तें केलें. परंतु महालचे रुपयेपैकीं धर्माकडे एक कवडी न खर्चतां तिसरें वर्षी चवथें वर्षी हिशेब मामलेदारापेक्षां जुजरशीनें वाफगांवीं पाठऊन द्यावे. त्यांत लाख दोन लाख आपले फाजील व घरचे बंदोबस्त. याप्रमाणें राजकारणसंबंधीं. दादासाहेब आनंदीबाईसह लहान मोठा सरदार विठ्ठल शिवदेव, राजेबहादर आदिकरून कोणी विरामास आले नाहींत असे राहिले नाहींत. त्याचे मनोदयानरूप हातीं कर्तव्यतेविशीं नानाफडणीस यांस लिहून पुसून ऐक्य करून रवाना केले. श्रीमंतांचे दौलतीचे बारीक मोठे विचार आपले हातें ठेऊन वैराग्याचा प्रकार करून स्नान–संध्या, दान–धर्मादि वार्ता कोपटचे म्हातारीस देखील ठाऊक. दोन हजार तेलंग द्राविडांचीं कुटुंबें अक्षयी राहून वंशावळीचे विस्तार होऊन सोयरिका येथेंच जाल्या. हिंडणार वागणार मनुष्यास यांतील दर्ज माहीत असावा याजोगेंच.

(७५) असो. बाईसाहेबांचा काळ जहाल्यानंतर काशीराव होळकर महेश्वरचे बंदोबस्तास रवाना केले. महेश्वरीं आल्यावर जखीऱ्याची व जामदारखान्याची वगैरे मोजदाद करून यादी सुभेदारांकडे रवाना केल्या. पुढें आश्विन शुद्ध १४ स श्रीमंत सवाई माधवरावसाहेबांचें देहावसान जालें. पुढें सुभेदारांची प्रकृत परतंत्र होत चालली. समक्ष कारभारी बाळाजी लक्ष्मण व श्रीपतराव मैराळ बळवंतराव वाकडे.

---

(७४) झकली – झकली–स्वच्छंदी वृत्ति. **आठ चाराचा प्रसंग** – भांडणाचा प्रसंग. **जुजरसी** – चवकशी. **विरामास आले नाहींत** – आश्रयास आले नाहींत. **हातीं कर्तव्यतेविशीं** – ‘ इतिकर्तव्यतेविशी ’ असें वाचन पाहिजे. **कोपटचे म्हातारीस देखील ठाऊक** – भावार्थ असा दिसतो कीं, भारताच्या कोनाकोपऱ्यातील म्हाताऱ्या कोताऱ्यापर्यंत तिच्या दानधर्माचा बोलबाला झाला होता. **दर्ज** – संबंध, संगति.

(७५) जखीरा – धान्याचें कोठार.

परंतु अंतःकरणींचा विचार शरीराचें अवसान पाहून खंडो महादेव व पाराशर दादाजी यांस सल्ला विचारली कीं, " सांप्रत काळीं शरीराची दशा या प्रकारची. घटकेचें शाश्वत नाहीं. दौलत अव्यवस्थित या प्रकारची. तेव्हां दौलतीचें ओझें कोणाचे माथां द्यावें ? दोन पोरें दोन प्रकारचीं." तेव्हां उभयतांनीं यथाबुद्धि सुचेल ती विनंती करून बोलले कीं, " दौलतीचें थामडें कायम ठेऊन, चार जुने माणसें वडिलांचे व आपले हातचीं जनलाज मनलाज धरून काशीराव होळकर वागवील. वरकड मजकूर जाल्यास जुने माणसांस देशांतरास जावें लागेल. आयुष्याचें पहाणें आपणहि पहावें. ध्यानास यावयाजोगें (आहे.) केवळ आमचे सांगितल्यावर राहूं नये. " तेव्हां सुभेदार यांचे गळीं उतरून आनंदराव माधव नि ॥ बुळे याजला तेच समयीं बोलावून चार गोष्टी दौलत प्रकरणीं उपदेशप्रद ठरण्यांत आल्या. गोष्टीबाबत सांगावयाच्या त्या सांगून सत्वर येण्याची ताकीद करून मशारनिल्हेची रवान्गी दुसरे दिवशीं काशीराव होळकर यांजकडे केली. मशारनिल्हे महेश्वरीं दाखल होऊन अज्ञापित विषय तेच निवेदन करून चाल चालावयाचा विचार तों काशीराव होळकर यांजला पुत्र जहाला. तेव्हां चार पांच महिने राहण्याचा विचार होऊन पुत्रोत्साह बाईसाहेबांचें कृतीप्रमाणें जाला. पुणें मुक्कामीं सुभेदार यांनींहि तसेंच केलें. जोशी व शास्त्री व व्यापाराचीं माणसें यांजला गांव इनाम, पालख्या सुभेदारांनींहि वाटल्या. आनंदराव माधव यांची रवानगी आठां चौ दिवसांत सुभेदारांकडे केली कीं, चौ पांचा महिन्यांनीं वडिलांचें पायापाशीं येऊन दाखल होतों. त्याजवर महेश्वरीं महालचे हिशेब व हुजुरांत पागानिहाय हजेऱ्या, गणत्या, दादी, फिर्यादी, जुंजरनेकाची समजूत इत्यादि कामें होण्यास दोन दिवस आरतेपरते लागल्यामुळें (येणें झालें नाहीं.) सुभेदारांची शरीरप्रकृति दिवसेंदिवस गळित (म्हणून) पुन्हा आनंदराव माधव व सुकजी बारोसे व सोमाजी लांबहाते, म्हाळोजी बारगळ इतक्यांची रवानगी होऊन स्वच्छ ताकीद तेथील कामें तशींच ठेऊन चिरंजिवास उचलून घेऊन घेणें. ते येऊन पोंचल्यावर आणखी मास पक्ष लागून मुखत्यार महेश्वरीं रामराव आबाजी पळशीकर व आबाजी रणछोड

(७९) **थामडे** – डोलारा. **वरकड मजकूर समल्यावर** – अन्यथा मजकूर किंवा प्रकार झाल्यास, म्हणजे काशीरावाऐवजीं मल्हारराव होळकरास गादी दिली गेल्यास. **आयुष्याचें पहाणें** – चरित्र, वर्तणूक. **बाईसाहेबांचे कृतीप्रमाणें** – अहिल्याबाईच्या कीर्तीला शोभेल असा. **व्यापाराचीं माणसें** – कामकाजास उपयोगी पडलेलीं माणसें.

पागनीस राहुरीकर व भारमल होळकर यांजकडे मुखत्यारी ठेऊन वरकड दरखदार मंडळींचे कारकून आपलाले कामावर होते. हुजरींहून मंडळी आली ती बाळासाहेबांस घेऊन दरकूच आले. मनमाडचे मुक्कामीं आलियावर डेरे उभे होत आहेत तों सुभेदारांची प्रकृत केवळ अवसानकाळास प्राप्त होऊन पत्रें आलीं कीं, जेवीत असल्यास पाणी येथें येऊन प्यावें अशीं पत्रें आलीं. तेव्हां पांच हजार स्वार काशीराव होळकर याजबराबर हुजुरात व इतलाखी सरंजामी होते, त्यांतून चौदाशें स्वार निवड करून ते वेळेस निघून सोळावे प्रहरास पुणें मुक्कामीं (येऊन) दाखल जहाले. चौदाशें स्वारांत बारा स्वार ठरले. त्यांत चौघे ब्राह्मण, आठ स्वार. खिजमतगार देखील एक नाहीं. प्रातःकाळीं जातांच सुभेदारांची भेट होतांच मल्हारजी होळकर सामोरे गेले होते ते बराबरच होते. बापू होळकर व भिकाजी होळकर जवळ होतेच. येशवंतराव होळकर यांनीं अवसानकाळीं सुभेदारांची सेवा फार केली, तेहि सन्निध होते. सुभेदारांनीं अगोदरचा बेत होता त्याप्रमाणें वस्त्रांची तयारी करून ठेविलीच होती. दिवाण फडणीस वगैरे दरखदार सर्वा देखतां काशीराव होळकर यांस वस्त्रें दिलीं. सुभेदार यांस नमस्कार करून मार्तंडाकडे चालले. ते समयीं मल्हारराव होळकर यांनीं हात जोडून सुभेदारांस विनंती केली, " मजला आज्ञा काय आहे ? " उत्तर केलें कीं, " काशीराव यास माझे ठिकाणीं मोजून चाकरी कर. तो तुजला आज्ञा करील. " हुकूम म्हणोन कुरणिसा करून काशीराव होळकर यांचे मागें आले. उभयतांनीं मार्तंडास भंडार बरोबर वाहून गादीकडे आले. काशीराव गादीस कुरणिसा करून गादीवर बसले. बंधु वगैरे मंडळी दरखदार बराबरच होते. काशीराव गादीवर बसल्यावर मल्हारराव होळकर यांनीं काशीराव यांस कुरणीस करून चालले ! बहुतांनीं आग्रह केला कीं, या समयास जावें हें नीट नाहीं. परंतु कोणाचें न ऐकितां आपले गोटांत जाऊन नवबद दिली. कूच करून फिरंग्या बेटाचे व मुळामुठा नदीचे दरम्यान मैदान होतें तेथें मुक्काम केला.

---

(७५) **चौदाशें स्वारांत बारा स्वार ठरले** – मनमाड ते पुणें अशा दौडींत काशीरावाबरोबर चौदाशें स्वारापैकीं फक्त बारा स्वार मजलीला निभले. **चालले** – निघून चालले. **फिरंग्या बेट** – पुण्याच्या संगमावरची ब्रिटिश रेसिडेन्सी.

काशीराव ऊर्फ बाळासाहेब होळकर

(७६) पुढें भाद्रपद शुद्ध ८ संवत १८५२ ते दिवशीं सुभेदारांचें देहावसान झालें. क्रिया त्यांनीं वेगळी केली. सपिंड्याहि दोन जाल्या. सवाई मल्हार यांनीं खानदेशांत महालानिहाय फौजा पाठऊन दंगा पुरकस करून महालचा खराबा जाला. आबाजी लक्ष्मण व धोंडो माणकेश्वर व सदाशिव भवानी यांनीं नंदुरबार, सुलतानपूर, आंबेड वगैरे जागा धूळधुमासा करून दिला. त्या काळीं शिंद्याचा मोठा जळजळाट. तेव्हां महालचा पैसा येऊन पुरी पडावा असा अर्थ राहिला नाहीं. दौलतींत काशीराव होळकर यांजला खर्चाची अडचण फार पडली येणें करून पागा, पीलखाना, दाम–दस्त–बरबाद जहाले. मास पक्षांत शिंद्याकडे, श्रीमंताकडे जाणें येणें जाल्यास सरंजाम बाहेरून आणावा, येथवर वारद झाले. मग काशीराव होळकर यांणीं मसलत केली त्यांत रघुपंत खंडेराव व बापू होळकर व चिमाजी बुळे यांणीं कौंसल करून शिंदे यांस पांच लक्ष रुपये देऊं, मल्हारराव हस्तगत करून आमचे स्वाधीन करावा, असा बेत ठराऊन बोलणीं, लिहिणीं, पुसणीं जहालीं. काशीराव होळकर यांचे अंतःकरणापासून मारावें असें नाहीं. परंतु भोपे सबळ. रघुपत खंडेराव यांणीं व बुळे, बापू होळकर यांनीं काशीराया वेगळें बोलणें केलें कीं, हस्तगत न होतां तैसाहि प्रकार जहाल्यास चिंता नाहीं. हें बोलणें काशीरायास न समजता केलें. दरम्यान समेटाचेंहि बोलणें जहालें कीं, “ माझा मनोधर्म व सुभेदारांची आज्ञा. त्याप्रमाणें बाळासाहेब मजला कैलासवासी सुभेदारांचे ठिकाणीं. माझे हातून मुखत्यारीचें काम घेतील तर त्याचा हुकूम मजवर, माझा हुकूम दवलतीवर. घेणें–देणें, स्वारी–शिकारी, श्रीमंतांचा हुकूम, शिंद्यांचा भाऊपणा राखणें इत्यादि कांहीं एक आच लागूं न देतां कैलासवासी वडिलांचे मार्गे

---

(७६) **त्यांनीं** – मल्हारराव होळकरांनीं. **पुरकस** – लढाई, तंटा. **धुळधुमासा करणें** – बेचिराख करणें, उध्वस्त करणें, लुटणें. **जळजळाट** – संताप. **पीलखाना** – हत्तीखाना. **पील** – हत्ती. **दाम-दस्त** – दरोबस्त. **वारद, वारीद** – प्रविष्ठ, दाखल, प्राप्त. **येथवर वारद झाले** – येथपर्यंत स्थिति आली. **कौंसल** – खलबत, मसलत. **लिहिणीं पुसणीं** – पत्रापत्रीं, लेखी करार-मदार. **भोपे सबळ**– भोप्या हा देवीचा पुजारी. येथें मुख्य देव किंवा देवी काशीराव, परंतु त्याचा सल्ला गुंडाळून ठेवून पुजाऱ्यासारखे जे रघुपत खंडेराव त्यांनीं वेळच आली तर मल्हारराव मारण्यासहि कमी करूं नये असें ठरविलें ! **तैसाहि प्रकार** – मारून टाकण्याचा प्रकार. **आंच लागूं न देतां** – कांहीं एक कमी पडूं न देतां.

चाकरी करून दाखवीन. हें न जाल्यास बाळासाहेब माझा बाप आहे, त्यानें आज्ञा केल्यास जोडा सांभाळून राहीन. नेमणूक देतील तितक्यांत गुजरा करीन. मजला कोणाच्या बापाचा संकोच नाहीं. परंतु बापू होळकर याजला काढून देणें म्हणजे मी सर्वोपरी अनकूल. बापूचें नांव यांत पैक्याची तरवारीची खामी पडेल. जाब मजपासून भरून घ्यावा. बापूचें निघणें न जाहल्यास ईश्वरें नेमलें तेंच घडेल. तिसरा जाब नाहीं." इकडे बापूचा अगत्यवाद विशेष पडल्याचें पोटीं दिवसेंदिवस किलाफाची वृद्धि होत जाईल. अशाहि अडचणींत काशीराव हस्तगत करावें अशी गांठ बाबासाहेबांशीं तीन चार वेळ पडली. काशीरायाबरोबर मार्गी घोडे शेंपन्नास स्वार. बाबासाहेबाबरोबर पांचशें स्वार प्रति बाबासाहेबांस (?) सहजांत उचलून घ्यावें असा प्रसंग. परंतु कैलासवासी सुभेदारांची आज्ञा व मनोधर्माचे बळकटीवर मुस्तकीम राहून एकटे पुढें येऊन घोडियावरून उतरून, कुरणीस करून आपले सरंजामांत जावें. काशीरायास वावगी नियत धरलीच नाहीं.

(७७) दरम्यानवाल्यानीं फिलाफाचे पर्वत टाकून सदरीं लिहिल्याअन्वयें मसलत सिद्ध केली. शिंदे यांणीं पैक्याचे लालचीनें कबूल केलें. जमियेतीचे धणी परंतु मल्हारजी होळकर हस्तगत करण्याचा विचार पडला कीं, दोन तीनशें स्वारानिशीं मुसळी मारून निघून गेला तर अवघडच. अथवा आपल्यावरि येऊन पडला तरीहि विचारच. शेवटीं कसेंहि होवो, लेखपूस जाला तेव्हां उद्योग करणें प्राप्त आहे. विठोबा व येशवंतराव होळकर हे बाबासाहेबांकडे जाऊन सामल झाले. आंबेड परगण्याकडे सदाशिवभाईनीं कांहीं सरंजाम घेऊन होते ते तिकडे मोंगलाचे

---

(७६) **मनोधर्म** – मनापासूनची इच्छा. **संकोच** – आडकाठी, पर्वा, फिकीर. **बापूचें नांव यांत पैक्याची तरवारीची खामी पडेल–खामी** – नुकसानी. बापू होळकरानीं दिवाण म्हणून काम केलें तर तो तुम्हांस उत्पन्नास खोट आणील व लढायांतहि अपेश आणील. **जाब मजपासून भरून घ्यावा** – माझे शब्द खरे झाले नाहींत, तर मग मला विचारा. **बापूचें निघणें न जाहल्यास** – बापू होळकरांस तुम्ही दूर न केल्यास. **किलाफाची वृद्धि होत जाईल** – किलाफाची वृद्धि होत जाई, म्हणजे गेली असे पाहिजे. **गांठ** – संधि. **बाबासाहेब** – मल्हारराव होळकर. **प्रति** – या शब्दाचे प्रयोजन येथें काय तें कळत नाहीं. **उचलून घ्यावें** – पकडावें, हल्ला करून पकडावें. **नियत** – वर्तणूक.

(७७) **दरम्यानवाले** – मध्यस्थ. **किलाफाचे पर्वत टाकून** – मोठें वैर निर्माण करून. **जमियेतीचे धणी** – शिंद्याजवळ भरपूर जमियत म्ह. सैन्य होतें, परंतु. **मुसळी** – मुसंडी. **लेखपूस** – कारारमदार.

फौज त्यांचे मुकल्यास आली. त्याचे मतदीस आठशें स्वार येथून बाबासाहेबांनीं रवाना केले. जवळ अडीडशा तीनशांचा भरणा. ही खबर (ठेवून) रघुपत खंडेराव यांणीं भाद्रपद वद्य ९ चे प्रातःकाळीं छाप्याची तयारी केली. हें वर्तमान बाबासाहेबांस समजतांच गोट आंवळून अडीचशें स्वारांनिशीं कंबरा बांधून हुशार जाले. बुणगे आंवळून एकीकडे बाडाचे आश्रयानें उभे केले. मागील प्रहर रात्र राहातांच बाबासाहेबांचे वकील बजाबा कुंटे नानाफडणीस यांचे दरम्यानकीत होते. रघुपंत खंडेराव यांणीं कुंटे यांचे नांवें चिठ्ठी लिहिली कीं, आजच बेत होता खरा, परंतु राहिला. पुढें प्रसंग पडेल तसें पाहून घेऊं. अहेव नवमीचा स्वयंपाक करवून सुवासिनी सांगाव्या. खचीत बातमी आहे. ही चिठ्ठी बाबासाहेबांपाशीं आली. ते वेळेस रात्र तीन घटका होती. चिठ्ठी वाचून अंतःकरणास विश्रांती पडून, जिजीसाहेबांस सांगून पाठविलें कीं, सैपाक करावा. लोकांसहि सांगितलें कीं, कंबरा सोडून झाडाझटका करावा. आणि फिरून यावें. तेव्हां कोणी कंबरा सोडल्या, कोणी सोडितो, कोणी सोडून शौचास गेले, कोणी कंबरा न सोडितां हुक्का तमाखू करितात. इकडे शिंदे यांस मोठीच मसलत पडून लष्कर आंवळून कांहीं फौज पलटणें बंदोबस्तास ठेऊन जातीनें पर्वतीचे डोंगरावर जाऊन बसून पलटणाचा परीघ पहाडाभोंवतां केला. स्वार, सरंजाम यांचा ताता बांधून कुंभारवेशीचे नदीपर्यंत स्वारांचा थाट उभा केला. पुढं मोहऱ्यावर मुजाफरखानाचें पथक घालून त्यांनीं बाबासाहेबांचे गोटाचे मुकाबल्यास येऊन एक ताशीरा दिला. त्या काळीं बाबासाहेबांनीं आंग टाकिलें होतें. तितक्यांत लाख्या बारगीर येऊन, जागे करून,

---

(७७) बाड – खाशांच्या राहण्याच्या राहुट्याजवळ. तंबूच्या किंवा डेऱ्याच्या भोंवतीं अंगण करून कंपाउंडाप्रमाणें कनातीचे पडदे लावतात, त्यांना ' बाड ' म्हणतात. **बुणगे आंवळून** – तळावरील व्यापाराचीं दुकानें लुटलीं जाऊं नयेत म्हणून व्यवस्थित एकत्र जमवून उभी करून. **दरम्यानकी** – मध्यस्थी. **बेत** – मल्हाररावाच्या गोटावर शिंद्याचा हल्ला होण्याचा. **झाडाझटका** – शौचमुखमार्जन वगैरे. **करितात** – करीत बसले. **मसलत पडणें** – संधि, किंवा मोका सापडणें. **परीघ** – वेढा. **ताता** – शिस्त, भिंत. **थट** – जमाव. **मोहऱ्यावर** – आघाडीस. **ताशीरा** – ताशेरा – फैर, बंदुकीची, तोफांची फैर, शिलक. **आंग टाकिलें होतें** – विसांवा घेत होते, आडवे झाले होते. **लाख्या बारगीर** – हा एक नामांकित एकांडा एक लाख तैनात कबूल करून मल्हाररावानें पदरीं बाळगला होता. लाख तैनात म्हणून त्यास लाख्या बारगीर असें नांव पडलें होतें.. बखरींतून व पोवाड्यांतून त्याचा उल्लेख आहे; परंतु समकालीन कागद पत्रांत

हुषार होऊन घोड्यावर बसा मी पुढें होतों (असें बोलला) त्याचेहि अगोदर येशवंतराव होळकर घोड्यावर बसून एक बाण चालविला. तो बाण त्यांचे स्वारांत न जातां आपले लष्करांत आला. इतक्यांत हवा समजून, काहडतें घेऊन शहराचा सुमार धरला. माकड हाडावर भाल्याची जखम लागली. परंतु निघून शहरांत दाखल जहाले. त्यांचा लाख्या बारगीर त्यांत गडप जाला. तो पुन्हां माघारीं आला नाहीं. त्याचें शव अथवा घोड्याचें हाड दृष्टीस पडलें नाहीं. मग पार होऊन गेला कीं मारला गेला, कसें असेल तें असो, पुन्हां कोठें उमगला नाहीं. त्याचे मागून आनंदराव बहाड यांनीं घोडा घातला. उलटणी एक करून दुसऱ्या उलटणीस छत्तीस जखमा खाऊन खेतांत पडला. चवथ्यानें बाबासाहेब उठले. पहिले उठावणीस कोणी त्यांजवर हत्यार धरलें नाहीं. दुसऱ्यानें घोडा घातला, तीन जखमा अनीनीच्या हातावर आल्या. चवथ्यानें घोडा घातला तेव्हां मुजाफरखां जातीनें सामोरा येऊन बोलला कीं, " अरे सरदार ! तेरे तरवारकी हाद हो चुकी. खूप तरवार कियी. आब तो मेरे पास आवो." त्यांसी उत्तर केलें कीं, " मी मल्हारराव होळकर धरलेला शिंद्यांचें येथें जाऊं ? हें घडणार नाहीं." असें बोलून त्याजवर तरवारीचा हात टाकिला. त्याचे आंगांत दहाशेर रूईचें डगलें. तरवार लागू जहाली नाहीं. इतक्यांत एके स्वारानें भाल्याची जखम छातींत मारून पार केला. घोडियाखालीं आले. मग त्यांनीं गोटांत जाऊन घोडीं व जामदारखाना लुटला. वरकड कशास हात लाविला नाहीं. मुशाफरखांकडील ऐशीं खांसा कामास आला. ते निघोन आपले गोटांत गेले. राहिले बारगीर वगैरे शिलेदार जिकडे ज्याला वाट फुटली तिकडे ते गेले. रविराव दोघे बंधु रात्रौ येऊन उमेदवाराचे नातें बाबासाहेबांस भेटले (होते.) त्यांनीं दोन पट्ट्या पानाच्या दिल्ह्या होत्या. तेहि कामास आले.

---

(७७) तो सापडत नाहीं. **हवा** – दुर्लक्षण, अपशकून. **त्यांचें** – शिंद्यांचें. **इतक्यांत** – या घटनेमुळें. **कहाडते घेणें** – आंग काढून घेणें. **उलटणी** – पळत असता एकदम उलटून हल्ला करणें. **अनीनीचा हात** – लगाम धरणारा डावा हात. **धरलेला** – कैद झालेल्या स्थितींत. **आंगांत दहा शेर रुईचें डगलें** – मुजफरखानानें दहा शेर वजनाच्या कापसाचें जाडजूड चिलखत बखतर अंगांत घातलें होतें. **भाल्याची जखम** – भाल्याची फेंक. **रविराव** – हा एका शिंदे घराण्याचा किताब होता. त्या घराण्यांतील दोघे भाऊ आदलेच दिवशीं मल्हाररावाकडे येऊन नोकरीस राहिले होते. ते उमेदवाराच्या नात्यानें आले होते. म्हणजे कोणच्याहि बिकट प्रसंगीं हार न खाता छातीनें लढू अशा प्रतिज्ञेनें नोकर झाले होते. व त्यांनीं तसे पैजेचे विडेहि उचलले होते. **पट्टी** – विडा.

इकडे कामास येतांच पांच कोस लोणी तेथें बायकांनीं खांद्याखालीं पदर टाकून बसल्या. सासू-सासऱ्यानें निषेध केले कीं, " तुम्हांस कशावरून समजलें ? " तों दोघांचीं माणसें आलीं. त्यांणीं वर्तमान सांगितलें. नंतर त्यांनीं सहगमन केलें. मग बापू होळकर व रघुपत खंडेराव व चिमणाजी बुळे जातीनें जाऊन बाबासाहेबांचें शव पालखींत घालून बाया जिजी आदि करून विठोजी (व) यशवंतरावाच्या बायकासुद्धां घेऊन आले. अग्निसंस्कार करून उत्तर कार्य जालें.

(७८) पुढें शिंद्यांकडील पांच लक्षांचा तगादा लागला. धरणेपारण्याचा प्रारंभ झाला. तेव्हां रामपुऱ्याची मामलत रामचंद्र शिवाजी यांजकडे सांगोन त्यांचे बंधु कामावर पाठविले आणि अडीच लक्ष रुपये पटवून दिल्हे. तगादा कांहीं शम जाला. तेव्हां श्रीमंतांनींहि दिवाण देण्याबद्दल पंधरा लक्षांची वरात शिंदे यांसी होळकरांवर दिल्ही. या साडेसत्राचे पेट्यांत महेश्वर व स्वारी व दरखदार आदिकरून कशाचाहि भ्रम न राहतां दारोदार पंचाईत होऊन आब जाब कांहीं एक राहिला नाहीं. रोज रोजीना खुराक आणखी देणें घेणें मिळून एकूण चाळीस लक्षांचा भरणा जाला. शिंद्यांचे हिशेबीं पांच चार लक्ष बाकी काढून तगादा चाललाच होता. तो कृष्णाजी बाणाजी हुजरे यांनीं बाळोबातात्या यांजला कैद केलें होते ते सुटून कारभारास लागले. तों शेख करीम फौजदार दौलतरावबावांचे कृपे-

---

(७७) खांद्याखालीं पदर टाकून बसल्या – वैधव्य आलें अर्थ समजून त्यांनी डोकीवरील पदर खांद्याखालीं काढून टाकला. **तों** – इतक्यांत. **सहगमन करणें** – सती जाणें.

(७८) धरणें पारणें – आपला पैसा वसूल करण्याकरता देणेदाराच्या दारीं आपण स्वतः उपवास करीत बसावयाचे व घरांत देणेदारासहि उपवास पाडावयाचे, अशा रीतीनें त्याला हैराण करून वठणीवर आणण्याची जी सर्रास रूढ अशी पद्धति जुन्या काळीं होती, तिला धरणें पारणें म्हणत. **धरणें** – धरणें धरून बसणें. **पारणें** – उपवास पाडणें. **शम होणें** – शमन पावणें. **साडे सत्राचे पेट्यांत** – साडे सत्रा लक्ष रकमेच्या पोटांत. **पेट्यांत** – पोटांत. **भ्रम राहणें** – अब्रू राहणें. भावार्थ असा कीं, साडे सतरा लक्ष रुपयांचा भरणा करतां करतां नाकीं नव आले. महेश्वरास बरीच रक्कम मिळेलसे वाटलें होतें, पण भरतीं झाली नाहीं. दरकदार होते त्यांजकडूनहि कांहीं उकळता आलें नाहीं. स्वतः खाशाच्या स्वारीचा खजिना तपासून पाहिला तोहि मोकळा. मिळून काय ! सगळा भ्रम फिटला. दारीदार तोंड वेंगाडण्याची पंचाईत म्हणजे पाळी आली, व आबजाब (आबदाब) म्हणजे कांहीं एक अब्रू शिल्लक राहिली नाहीं.

तील, पांचश स्वारांचा बेहडा करून दिल्हा होता, त्यानें तगाद्याची पराकाष्ठा केली. हें वर्तमान बाळोबातात्या आल्यावर इकडून व परभोरें त्यांचे लष्करांत तगाद्याचें वर्तमान समजल्यावर बाळोबातात्यांनीं दौलतराव शिंदे यांस बुद्धिवाद फार केला कीं, " होळकर कोण ? आपण कोण ? अडचणींचे प्रसंग. त्यांजकडून आपला उपयोग कोणेसमयीं कसा जाला ? व गोपाळराव चिटणिस यांणीं आगळीक करून शिंदे, होळकर यांची दुजागी राजेरजवाड्यांत दाखवून होळकरांची कमती पाडली. यांत नुकसान किती जालें ? या रागानें पाटिलबावांचे अवसानच जालें. तुकोजीबावा (स) व अहल्याबाईस तोंड दाखविलें नाहीं. त्या गोष्टीचें पहाणें, राखणें, जोखणें, त्यांचें त्यांचें बराबर जाऊन, आपण पुढें गौण राजकारणांत सामल होऊन होळकरांची दौलत शिंद्यांनीं बरबाद केली हे ठिकरें आपल्या माथ्यावर घेऊन, पुढें होळकर बुडाडाल्यावर आपणहि राहूं असें होणार नाहीं. व वक्त पडल्यावर परस्परें लौकिक दिसण्यांत उपयोग ? आदौ घटत असावें. याचे निदर्शन होळकराकडून पैदरपै घडत आलें. त्याजवर समय प्राप्त जाल्यावर आपल्याकडून हा लौकिक जाला. अशीच धोरणें राखण्याची मर्जी असल्यास आम्हांस घोरांत घालूं नये. ज्या ठिकाणीं होतो तेथें आपलें शुभचिंतन करून होतो. अशीच उमेद राहिल्यास आम्हांसारखे गरिबगुरीब जवळ असल्यास उपयोग नाहीं. " अशा भावीं बोलण्याचें प्रसंग तीन दिवस पडून दौलतराव शिंदे यांस कायल करून पुढें आला तो वसूल, राहिलें तें कृष्णार्पण असें करून, शेवटीं फौजदार मजकूर यानें शिंदे, होळकर यांचे घरोब्याचा शिरोभाग केला, त्यास तोफेचे तोंडीं उडवून द्यावें, व होळकराचे घरीं

---

(७८) **बेहडा** – तैनात बेहडा. शेख करीम याला पांचशें स्वार चाकरीस ठेवून चाकरी करावी असा दौलतराव शिंद्यांनीं तैनाती बेहडा करून दिला होता. **बेहडा** – Budget, A statement of ways and means. **बुद्धिवाद** – उपदेश. **आपला उपयोग कोणे समयीं कसा जाला** – आपल्या उपयोगी कसे पडले. **दुजागी** – द्वैत, फूट, वैर. **अवसान** – मृत्यू. **त्या गोष्टीचें पहाणें, राखणें, जोखणें, त्यांचे त्यांचे बराबर जाऊन** – त्या बाबतींतली विचारी व धोरणी अशी पाटिलबावांची वागणूक किंवा त्यांचें धोरण त्यांच्या मृत्यूबरोबरच संपलें. **गौण** – क्षुद्र. **ठिकरें** – खापर, दोष. **आदौ घटत** - ? **पै दर पै** – वारंवार. **समय** – संकट. **लौकिक** – दुर्लौकिक, दुर्लौकिकाची गोष्ट. **आम्हांस घोरांत घालूं नये** – आम्हास कारभाऱ्याचें काम करण्यास लाऊं नये. **उमेद** – भलत्याच गोष्टी करण्याची हौस, ईर्षा. **शिरोभाग** – शिरोभंग असें पाहिजे. **शिरोभंग** – नाश. **होळकराचे घरीं चालून** – होळकराचे घरीं चालून जाऊन.

चालून पूर्व क्रमास शिकल राहील असें होत असल्यास, आम्हांसारख्यास हांक मारल्यास हजर आहोंत. मग शिंदे यांनीं कायल होऊन कबूल केलें. दुसरें दिवशीं फौजदार याचा गोट दामदस्त लुटला. मशारनिले हस्तगत करून तोफेचे तोंडीं दिल्हे. तिसरें दिवशीं दौलतराव यांसी घेऊन होळकरांचे येथें आले. शिष्टाचार समाधानें भविष्यानुरूप होणार ज्या गोष्टी तुमचे आमचे स्वप्नींहि नसाव्या त्या गोष्टी प्रत्यक्ष दिसण्यांत आल्या. आपलें वडील घर, ते पक्षीं मनांतील कलुष टाकून परस्परें वडिलोपार्जित आचार याचेच परिशीलन मनांत परस्परें वागून एकविचारें श्रीमंतांचे सेवन समर्पक सेधा घडेल तें होत असावें. यांत फार चांगलें आहे. हरदु दौलतींचे पुण्य पुरुषार्थ वोहोदे परत्रींचा विचार आहे. असें कल्याणदायक गोष्टी बोलून साकर वाटून गेले. दो चौ रोजांनीं होळकर शिंद्यांचे येथें गेले. तेथें पानसुपारी अत्तर-गुलाब होऊन, डेऱ्यांत आले.

(७९) पुढें दोन्ही दौलतींतहि वागलेत अशा इराद्यानें बाळोबातात्यांनीं यशवंतराव शिवाजी पुढें करून होळकराची दिवाणगिरी करावी, अशा पैरवीचीं बोलणीं चालू होऊन पांच पन्नास हजार रुपये आंतून बाहेरून खर्चास दिल्हे. बोलल्या क्रमाचा नमूद निदर्शनास यावा तों शिंदे यांचे बाजारांत सरजेराईचा प्रसर होऊन दौलतरायास घुटीचा प्रारंभ करून त्या झपाट्यांत दौलत प्रकरणीं अनेक तऱ्हेचे भर सरजेरायांनीं भरून एकूण (वीस) आसामी कैद केली. त्यांत बाळोबातात्या व धोंडिबा व नारायणराव बक्षी व रामचंद्र शिवाजी व रायाजी पाटील वांबळे असे नांवाचीं कामाचीं माणसें एकूणीस असामी कैद केलीं. श्रीमंत बाजीरायांस सामल करून तेथील कारभारी नारोपंत चक्रदेव वगैरे कैद करून दोन पलटणें शनवारचे वाड्याभोंवतीं चवकशीस ठेविलीं. पुण्यामधीं उल्कापात केला. सरजेरायानें होळकराशीं आगळीक केली नाहीं. स्नेहच राखिला. शिंद्याचे दौलतींतील माणसें

---

(७८) **शिकल** – उजळा, पाणी, चकाकी. **पूर्वक्रमास शिकल राहील असें होत असल्यास** – पूर्वींच्याच धोरणास उजळा मिळणार असेल तर. **कायल** – निरुत्तर. **कलुष** – किल्मिष, वाकडे, संशय. **हरदु** – दोन्ही, दोहीकडील. **वो हो दे** - ?

(७९) **सरजेराईचा** – सरजेराव घाटग्याचा. **प्रसर** – प्रबळता, वरचष्मा. **दौलतरायास घुटीचा प्रारंभ करून** – दौलतरावास दारूचें व्यसन लाऊन. **भर भरणें** – सल्ला देणें. **उल्कापात** – उत्पात. सर्जेराव घाटगे हा इतका घोरकर्मा होता व पुण्याच्या लोकांचे त्यानें इतके हाल हाल केले कीं, तेव्हांपासून ' सर्जेरावी जुल्म ' असा वाक्प्रचारच मराठींत रूढ झालेला आहे.

V. P. Bhagwat

कैद केली होती ती सरदाराचे परतंत्रतेंत परवानगी घेऊन एकसमयावच्छेदें एकोणीस असामी मारून टाकिले. दौलत माणसांवांचून खालीं केली.

(८०) इकडे काशीराव होळकर यांचा गुजारा मोत्याची काळगावडे ज्याही खानदेश प्रांतीं बंड करून पांच पंचवीस हजार फौज घेऊन फिरत होते त्यांजवर चालत होता. इकडे यशवंतराव होळकर निघोन पुण्यांत गेले. ते बापू विठ्ठल परभू पूर्वीं आपले होळकरांचे दौलतींत शिलेदारीनें होते; चौभास माणूस, लिहिणार बोलणार, शिपाई इराद्याच्या माणूस, त्याच्या घरीं जाऊन त्याजला घेऊन जेजुरीस आले. मार्तंडाची महापूजा करून नागपूरचा रस्ता धरिला. नागपुरास जाऊन रघोजी भोंसले यांची भेट घेतली. त्यांनीं मोठ्याचा मूल वक्तशीर आपल्यापाशीं चालून आला, ते पक्षीं सर्वोपरी बरदास्त करून आपल्यापाशीं ठेविलें. हें वर्तमान पुणें मुक्कामीं (काशीराव) होळकर यांस समजतांच श्रीमंत व शिंदे यांचे कानावर घालून भोंसल्यांस पत्रें घेतलीं कीं, यशवंतराव होळकर तुम्हापाशीं पळून आला आहे. त्याजला कैद करून पुण्यास पोहोंचाऊन द्यावें. अशीं पत्रें श्रीमंत, शिंदे, होळकर यांचीं गेलीं. इकडे मल्हारजी होळकर यांचे कुटुंब जिजीबाई वगैरे होतें. त्यांस स्वतंत्र डेरा देऊन चौकी पहारा काशीराव होळकर यांचा जाबता होता. तेव्हां मल्हार शामजी दिम्मत होळकर नि॥ कापडणीस तुकोजीबावा सुभेदाराचे लोभांतील असामी; नाना फडणीस मेणोलीस निघून गेले होते, तेथून फौज ठेवण्याविशीं, पैका द्यावयाविषयींचा करार ठरला त्याचे जाबसालांत व ऐवज आणण्या-नेण्यांत मल्हार शामजी होते; त्या आरोपावर कैलासवासी सुभेदार वर्तमान असतां दिवाण यानें मुतालिक बाळाजी लक्ष्मण व श्रीपतराव मैराळ यांनीं कैद करून वाफगांवचे किल्ल्यांत ठेविलें होतें. तेथून पळून नाना फडणीसांचा

---

(७९) सरदाराचे परतंत्रतेंत – शिंद्याच्या बेहोष स्थितींत. **दौलत माणसांवांचून खालीं केली** – माणूस–नामांकित माणूस, मुत्सद्दी माणूस. शिंद्याच्या दौलतींत एकहि नामांकित मुत्सद्दी, विचारी माणूस शिल्लक राहिला नाहीं.

(८०) चौभास – चार भाषा बोलणारा. त्यावरून भावार्थ हुशार, हरहुन्नरी. **शिपाई इराद्याचा माणूस** – शिपाई बाण्याचा माणूस, लढवय्या. **वक्तशीर** – वक्त पडल्यामुळें म्हणजे संकटामुळें. **जाबता** – पहारा. **दिम्मत** – पदरचा. **निसबत** – कडील. जसे निसबत–कापडणीस म्हणजे कापडणीसाकडील. **कापडणीस** – कापड पुरविणारा किंवा कपड्याचा कारखाना ज्याच्या ताब्यांत असतो तो कापडणीस. **बटकी** – दासी. **श्रीपतराव मैराळ यांनीं** – येथें 'यांनीं' या शब्दाऐवजीं 'याना' असें मुळांत असावेंसें वाटतें.

आश्रय करून पुण्यास होते. त्यांनीं जिजीबाईशीं संधान लावून तुम्हीं ठिकाणांहून निघून मुळामुठा नदी उतरून यावें म्हणजे तुम्हांस घेऊन जाऊं. त्या संधानावर एके दिवशीं त्यांचा जाबता नदीपार ठेवून इकडे बाईस सूचना जाली. बाई शौचाच्या मिसें करून शेतखान्यांत जाऊन, बटकीचा लहंगा नेसून, आपलें लुगडें बटकीस नेसवून डेऱ्यांत वाटे लाविली. तांब्या घेऊन कुणबिणीच्या रूपानें नदी उतरून पार गेली. तेथें जाबत्याची गाठ पडली. पुण्यांत दाखल जाली. मल्हार शामजी यांनीं खर्चाचा वगैरे बंदोबस्त ठेवून तीन महिन्यांची गरोदर होती, सहा महिन्यानंतर पुत्र झाला. त्याचें नांव खंडेराव ठेविलें.

(८१) हिकडे भोंसले यांचे मनांत होळकराचें मूल आपले येथें आलें तेव्हां कांहीं यांस जाहागीर देऊन जाहागीरदार करून ठेवावा ऐसा इरादा. तों श्रीमंतांचीं, शिंदे, होळकरांचीं कैद करण्याविषयींचीं पत्रें गेलीं होतीं त्याजवर मनांत विचार केला होता तो रहित करून यशवंतराव यांस कैद केले. पलटणांत होते. पांच चार महिने कैद भोगिली. पुढें भोंसल्यांचा विचार पुण्यास पोहोंचते करावें असा विचार होऊं लागला. हें वर्तमान यशवंतरायास समजल्यावर बापू विठ्ठल यांशीं विचार केला कीं, पुढें काय करावें; तेव्हां बापूनें सांगितलें कीं, “ आपण शौचास जावें. तेथें माणसाचा चोळण', पागोटें घालून बाहेर पडावें. आपले बिछान्यावर मी निजतों. गोष्ट फुटल्यावर माझें काय होणें तें होवो. आपण निघून जावें.” असा विचार करून निघून गेले. - कडे बोभाट जाहाल्यावर बापू विठ्ठल यास धरून नेऊन पुरशीस भोंसले यांनीं केला. यानें साफ उत्तर केलें कीं, “ आम्हीं वक्ताचोर फीक सरदारांस काढून देऊन हजर आहोंत. यांत सेवाधर्मास विरुद्ध केलें नाहीं. आपणहि सरदार आहांत. पाहिजे तें करा.” भोंसले उत्तरावर प्रसन्न होऊन गुण घेतला. परंतु इकडे पुण्यास वाईट वाटेल याजकरितां त्याचे पायांत बिड्या घालून चार महिने कैदेंत ठेऊन पुण्यास यशवंतराव निघून गेल्याचें वर्तमान लिहिलें. तिकडून कांहीं यशवंतराव गेल्यासंबंधीं अधिकउणें दिसण्यांत आलें नाहीं. सबब बापू विठ्ठल यांस सोडून दिल्हे.

---

(८०) त्यांचा जाबता – बाळाजी लक्ष्मण व श्रीपतराव भेराळ याचे लोक.

(८१) माणूस – हुजऱ्या, चाकर माणूस, खिजमतगार. **पुरशीस** – चौकशी. **आम्ही वक्ताचोर फीक** – ‘ आम्ही वक्ताचे रफीक ’ असें वाचन पाहिजे. **रफीक** – स्नेहीसोबती. **वक्त** – संकट प्रसंग. भावार्थ आम्ही यांचे निदानचे सोबती आहों. मरेपर्यंत त्यास सोडणार नाही. **सरदारास** – यशवंतरावास. **सरदार** – मोठे लोक.

(८२) यशवंतराव होळकर पायांत जोडा नाहीं, अनवाणी पादचारी निघाले, तों नागपुरापासून दोन मजला आले. एक जोरीचें शेत होतें. त्या शेताचे छायेस दहापांच तटांचें आड जाऊन बसले होते. तों वाटेनें लोक भवानी शंकर कायथ घोड्यावर बसून चालले होते. स्वार पाहून यांजला आशंका उत्पन्न जाहाली. हा स्वार धरण्यांतील आहे किंवा पांथस्थ आहे ? असा संदेशा उत्पन्न होऊन जोरींत शिरले तों पुढें नाला होता तेथें लाला स्नानास उतरला. हें पाहून, (हा) पांथस्थ असा निश्चय करून, बाहेर निघून त्याजपासून पांच पंचवीस हातांवर आपणहि स्नानाचा उद्योग केला. त्याचे लक्षाचें संधान पाहिलें. तो वाटसरू, त्याचें लक्ष यांजवर कशाकरितां असावें ? असें पक्के ध्यानास आणून त्यास जाऊन रामराम केला. पुसलें ' तुम्हांस कोठें जावयाचें आहे ? ' त्यानें उत्तर केलें कीं, " आम्हीं उमेदवार नागपुरास आलों होतों. येथें कांहीं रोजगाराची सोय बनली नाहीं, सबब हिंदुस्थानांत जातों." " आम्हांस तिकडेच यावयाचें आहे. सांभाळून न्याल तर सोबतीनें चालूं." त्यांनीं म्हटलें कीं, " उत्तम आहे." हे बोलले कीं, " आम्हीं लुटले गेलों, घोडे कंठाळ अगदीं गेले, आम्हापाशीं खर्चास राहिलें नाहीं. कांहीं खर्चाची मदत कराल तर माळव्यांत गेल्यावर इंदूर, उज्जन येथें आमचें आप्तविषयीं आहेत तेथें तुमचे रुपये देऊं." त्यानें कबूल केल्यावर त्याचे सोबतीनें चालले. दिवसेंदिवस बोलण्याबसण्यांत वाट चालण्यांत भरोंसासा दिसून आल्यावर त्याजपाशीं वर्तमान सांगितलें. त्यास अनुकूल करून चार कोस यांनीं घोड्यावर बसावें, चार कोस त्यानें बसावें. (पुढें तो) सेवाचाकरी करूं लागला. खानदेश प्रांतीं आल्यावर जुंझर नाईक भील याचे हाटीवर आले. त्यास भेटून खासगत वर्तमान सांगितलें. त्यानें सर्वोपरी आंगेजनी करून आपल्यापाशीं ठेविलें. तेथें शिबंदीची कमलज्यारी करून पांच चारशें माणसें ठेवून सुलतानपूर, नंदुरबार येथें लुटण्यास प्रारंभ केला. हें वर्तमान सेदव्यास भिकाजी होळकर यांस समजल्यावर आनंदराव होळकर यांस

---

(८२) **जोरी** – ज्वारी. **कायथ** – कायस्थ. **धरण्यांतील** – आपणास धरण्यासाठीं पाठविलेल्यापैकीं. **संदेशा** – अन्देशा, संशय. **त्याचे लक्षाचें संधान पाहिलें** – त्याचें लक्ष कोणाकडे कशांत आहे, त्याचा अदमास पाहिला. **कंठाळ, कंठाळी** – जनावराच्या पाठीवर दोहो अंगास सारखी बसेल अशी पडशी, गोणी, बारदान. **वाट चालण्यांत** – प्रवासांत. **भरोंसासा** – भरोंसा असा विश्वास. **हाटी** – डोंगरांतील भिल्लांची वस्ती. **आंगे-जनी** – अंगिकार. **सर्वोपरी** – पूर्णपणें, निखालसपणें. **शिबंदीची कलमज्यारी करून** – सैन्य (ठेवण्यास) जमवण्यास सुरुवात करून.

समागमें तीनशें स्वार व पांचशें पायदळ देऊन यशवंतराव होळकर यांस धरून आणावें या इराद्यावर रवाना केलें. त्यांची यांची एक दोन वेळां झुरमट होऊन,येथें आपले पाय टिकत नाहींत असें समजून, तेथून जुंझर नाइकास न समजतां रातवा घेऊन शेंपन्नास माणसानिशीं निघून बडवाणीचे आसपास गोवर्धन नायकाची हट्टी होती तेथें जाऊन विसांवा घेतला. तेव्हां गोवर्धन नाइकाचे पोटांत पाप उत्पन्न झालें कीं, याजला हस्तगत करून सेदव्यास पावते करून आपण सरफरास व्हावें. यांतील गुणगुण समजतांच आपलें माणसांनिशीं शाबुतीनें निघून बडवाणीपाशीं नर्मदा उतरून धर्मपुरीस बेटांत आले. कांहीं दिवस तेथें राहिलें. बेटांतून निघून आठा-चौदिसां महेश्वरास येऊन शहरांत फिरून जावें असें केलें. त्यांत एके दिवशीं महेश्वरीं किल्ल्यांत येऊन फडनिसाच्या वाड्यांत जाऊन दाणे मागितले. तों माणसांनीं झिडकाऊन दिल्हें. मग तेथें तात्या आळेकर यानें आपले येथें घोड्याचे दाण्यांतून ओंजळभर हरभरे घेऊन यशवंतराव महाराजांस घातले. ते दाणे घेऊन निघून गेले.

(८३) सेदव्याहून भिकाजी होळकर यांनीं भारमल दादास लिहिलें कीं, यशवंतराव होळकर नागपुराहून पळून, खानदेशांत सुलतानपूर, नंदुरबार परगण्यांत येऊन जुंझर नाईक भिल्ल यांचे आश्रयानें राहून पांच चारशें माणसांची जमियत करून परगण्यांत लूटलुबाडी केली. आम्हांस समजल्यावर आनंदराव होळकरास पाठवून तेथून हुसकावून दिल्हे. तेथून नर्मदा उतरून पार गेले. इतके वर्तमान आम्हांस ठाऊक आहे. तेथेंहि जमियत करून तुम्हांस उपद्रव देतील. यास्तव त्याची आगाऊ चौकशी ठेऊन हस्तगत करावें. त्याजवरून भारमल होळकर यांनीं चौकशी केली. तर धर्मपुरीचे बेटांत ठिकाण लागला. तेथें कांहीं उपद्व्याप करावा तों यशवंतराव होळकर यांस समजून तेथून निघून धारेस येऊन आनंदराव पवार याजपाशीं चाकर राहिले. तीनशें मानसांचा तैनात जाबता केला. बाळाजी कमळाकर हळशी किनास (?) आहेत. हे धर्मपुरीचे बेटांत सोबती जाहले. धारेस हजीरी देऊन कांहीं दिवस राहिले. तेथें आनंदराव पवार व रंगराव वोढेकर दिवाण. दिवाण सरदाराची लढाई झाली. त्यांत पवारांची जमियत स्वार पायदळ हजार बाराशें. एक तोफ रंगराव वोढेकर यांचे बरोबर. तीन हजार स्वार पेंढारी.

---

(८२) **झुरमट** – झटापट, लढाई. **रातवा घेणें** – रात्रभर चालून मजल मारणें. **सरफरास होणें** – सन्मान पावणें.

(८३) **लूट लुबाडी** – लुटालूट. **उपद्याप** – उपद्व्याप, सद्योग. यशवंतराव होळकरास पकडण्याचा. **हळशी किनास** – ?

यांचा त्यांचा मुकाबला होऊन धारकरांच्या जमियतीचे पाय उठले. मग यशवंतराव होळकर यांनीं, खंडेराव होळकर यांचे नांवाचे शिके खोदले ते अक्षयीं कमरेस राहात होते. मनांत विचार केला कीं, या शिक्क्यांत कांहीं सामर्थ्य आहे नाहीं पहावें. म्हणून यांचे खासगत जमियतीपैकीं पांच पन्नास माणूस यांचे भिडेवर होते त्यांस हामराहा करून तोफेंत आपले हातें बार भरून पांच गोळे मारले. ईश्वर इच्छें करून, पेंढारी स्वार मरतो कशास ? गोळ्यांचा भरावा येतांच स्वार पेंढारी

---

(८३) **धारकरांच्या जमियतीचे पाय उठले** – धारकरांच्या सैन्याचा टिकाव लागेना, ते पळू लागले. **हामराहा करून** – त्यांस साक्षीस ठेवून. **पेंढारी स्वार मरतो कशास ?** – पेंढाऱ्यांचें लक्ष मुख्यत्वें लुटीवर, त्याची आशा नसेल तर पेंढारी जीव धोक्यांत कधींच घालीत नसत. म्हणूनच शिपाई, शिलेदार, बारगीर निराळा आणि पेंढारी निराळा. "मराठ्यांच्या लष्करांतील प्रचंड घोडदळाबरोबर त्यांच्या सैन्यांत पेंढारी घोडेस्वारांचीं पथकेंहि फारच असतात. या पेंढाऱ्या पथकांना पगार वगैरे कांही एक नसतो. पेंढाऱ्यांचे नायक मुख्य सरदारांकडून लूट करण्याचा लेखी परवाना मिळवतात म्हणजे झालें. हे पेंढारी जाळपोळीची व लुटीची इतकी कमाल करतात कीं विचारावयाची सोय नाहीं. पगार देऊन ठेवलेलें लष्करसुद्धां शत्रूच्या मुलुखाचा माणसा-काणसांचा नाश करीत नसेल इतका हे करतात. पेंढारी शिपायांचा सारा डोळा लुटीवर असल्यामुळें त्यांचा प्रत्यक्ष लढायांच्या कामास कांहींच उपयोग नसतो. लुटीचा लग्गा मिळण्याची आशा नसेल तर हे पेंढार आपला जीव धोक्यांत घालण्याची आशा नको. पेंढाऱ्यांच्या सैन्याची छावणी ज्या लष्कराचे ते असतील त्या लष्कराच्या शेजारीच पण स्वतंत्र असते. म्हणजे होळकरांचें पेंढार असलें तर त्याचा तळ होळकरांच्या तळा-नजीक कोठेंतरी असावयाचा. माझ्या पहाण्यांत आले ते बहुतेक पेंढारी सारे मुसलमानच दिसले. तथापि मुसलमानांचा धार्मिक कडवेपणा किंवा कडक आचारपालन दिसलें नाहीं. मला मुख्यत्वेंकरून या पेंढाऱ्यांत मुसलमानांचाच भरणा दिसला; तरी इतरहि जातीचे लोक पेंढाऱ्यांत असतात. या पेंढाऱ्यांची वस्ती मुख्यतः माळव्यांत आहे व शिंदे–होळकरांच्या लष्करांतच यांचा भरणा फार. हे पेंढारी लोक सामान्यतः भिकार भणंगच असतात. एखाद्याला दैवयोगानें बरीच लूट मिळाली, तर ती पुंजी संपेपर्यंत तो पेंढारी लष्करांत दिसावयाचा नाहीं. या पेंढाऱ्यांचीं घोडीं–घोडीं कसलीं तट्टें–फारच काटक असतात व त्यांना साज–सामानहि फारसें कांहींच नसतें. या दृष्टीनें लष्करांतील लढवाई घोडदळाच्या मुकाबल्यास तीं टिकण्यासारखीं नसतातच. कसेंहि असो, या पेंढाऱ्यांच्या उपद्रवाचा सर्व प्रांतांना मोठा धाक आहे. किंबहुना यांच्या भीतीमुळेंच

पळाले. रंगराव जातीनें मर्द. पांच पन्नास स्वार पागेचा होता तो घेऊन एक दोन परतण्या केल्या. परंतु तोफेपुढें जुमस न खातां पाहून निघोन उज्जनीस गेले. नंतर यशवंतराव होळकर तोफ घेऊन धारेस आले. आनंदराव पवार यांची भेट घेऊन बोंळवा दिल्हा कीं, अशा जमातीच्या भरंवशावर लढाई घेत असतां कीं काय ?

(८४) अशा भावीं बोलून बिऱ्हाडास आले. तोच शामराव माहडीक पिंपळोद्यास होते ते नागो जिवाजी यांजकडील कारकून दुंदरनेक याजपाशीं इंदुरी होते. त्यांजपाशीं येऊन कांहीं पोटापाण्याची सोय पहावी या उद्देशें आले होते. बहुत हालाकींत. तेथें सोय बनून आली नाहीं. आणि यशवंतराव होळकर धारेस आहे हें वर्तमान समजलें. तेव्हां इंदुरीहून निघून धारेस गेले. यशवंतराव होळकर यांची भेट घेतली. बहुत निषेध केला कीं, " तूं तुकोजी होळकराचा लेंक; आणि पवाराचे घरीं पायदळींत चाकरी करितोस, लाज कशी वाटत नाहीं ? ' साहा देशीं परदेशी चोरी. ' असें राहणें तुजला योग्य नाहीं. हाजारों हाजारों कोणी वांचत नाहींच. शंभराचे आंत कारभार. यांत एकदां मरणें खरें. ते पक्षीं अचाट बुद्धि खेळवून बळें लक्ष्मीस हात घालावा. त्यांत ईश्वर साह्य होऊन साध्य झाल्यास नीटच आहे. " अशा भावीं धैर्य देऊन उमेद वाढविली. मग यांनींहि शिक्क्याचें वर्तमान सांगितलें.

(८५) त्याजवर आशादुराशा उत्पन्न होऊन कांहीं उद्योग करावा असा निश्चय

---

(८३) लहान सहान खेड्यांनींसुद्धां गांवकुसें घातलेलीं असतात व गांवकुसवांआंत मध्यास गढी किंवा बालेकिल्ला बांधलेला असतो. (१७९५ सालीं मॅलेटनें खडर्यांच्या तळावरून लिहिलेल्या पत्रांतील उतारा.) **भरावा** - मार, सोसाटा. **परतणी** - उलटणी, उलटून केलेला हल्ला. **परंतु तोफेपुढें जुमस न खातां पाहून निघोन उज्जनीस गेले** - हें वाक्य उघडच गलथानपणाचें आहे. वास्तविक " परंतु तोफेपुढें जुमस खाऊन निघोन उज्जनीस गेले " असें वाक्य मुळांत असेल, किंवा " परंतु तोफेपुढें आपले स्वार जुमस खातांना पाहून निघोन उज्जनीस गेले, " असें तरी असावें. **जुमस खाणें** - दशहत खाणें, घाबरणें, **बोंळवा देणें** - दोष देणें, ठपका ठेवणें, उणें काढणें, टोमणा देणें.

(८४) **दुंदरनेक** - Dudrenec दुद्रनेक या युरोपियन विशेष नामाचा मराठी अपभ्रंश. हा फ्रेंच सरदार होळकरांच्या पदरीं होता. **पायदळींत** - पायदळ शिपायांत. **' सहा देशीं परदेशी चोरी '** - ? **हाजारों हाजारों** - हजारों वर्षें, किंवा हजार हजार वर्षें.

(८५) **आशा दुराशा** - लोभ, महत्त्वाकांक्षा

ठरवून पवाराचे घरीं धरणें देऊन तीन हजार रुपये बाकी निघाली ती घेऊन चारपांचशें माणसांची जमियत होतीच, शेंदोनशें स्वार त्या जिल्ह्यांतील नौकर ठेवून लाला भवान शंकर व शामराव माहडीक व बाळाजी कमळाकर असे जमेतीसह निघून देपाळपुरावर येऊन पडले. तेथें शेंदोनशें घोडे पांगेन्ने व रोकडहि ईश्वर इच्छेकरून पांचपन्नास हजार हातीं लागली. तेथून कलमजारी चालली. जमियत करून जावरा बरडावद या मैदानांत गेले. तेथें जावऱ्यास गंगाराम कोठारी मामलतदार होता. त्याशी लढाई होऊन तेथेंहि पाय ठरला नाहीं. त्यानेंहि आपलें महालांतून काढून दिलें. यांनीं बरडावदचे आलीकडे फरणाजीस येऊन, बोहरा बेपारी पन्नास हजारांची बनात घेऊन जात होता त्याजला लुटून, पन्नास हजारांचा ऐवज हातीं लागला. वजीर हुसेन येऊन तेहि सामल झाले. त्याजला थुराळास पाठवून स्वार सरंजाम आणविला. त्यानें जाऊन मीरखान याजला घेऊन (तो) आला. प्रथम हजीरी एकशें आठरा स्वारांची झाली. तेव्हांपासून कलमजारीची शहारत पडून स्वारांच्या चुंगी येऊं लागल्या. मग लिहिण्याचे कामावर विनायकराव सदाशिव उज्जनीस होते त्यांजला समजल्यावर येऊन सामल झाले. भेट घेऊन मी फडणीसांकडील कारकून आहे. शामराव माहडीक यांचीहि सोनंओळख होती त्यानें रुकार दिल्हा. मग दप्तराचें काम त्याचें हवालीं केलें. फीर फीर महतपुरावर आले. त्यांनींहि ठिकाण लागूं दिला नाहीं. लढाईस उभे राहिले. यशवंतराव होळकर यांजपाशीं कांहीं बैरागी होते त्यांनीं तलबे विषयीं धरणें दिलें. हें वर्तमान महतपुरी वाघास समजून त्यानें बहिराग्याशीं पैगम लाविला कीं, “ तुम्ही धरणें निकटीचें देऊन यशवंतराव होळकर आमचे हातीं द्यावा.” हें वर्तमान यशवंतराव

---

(८५) **देपाळपुरावर येऊन पडले** – देपाळपुरावर हल्ला केला. **कलमजारी** – सैन्याची जमवाजमव, सैन्यभरती. **जामियत** – जमाव. **बोहरा** – बोहरी. **बनात** – कापड. **शहारत** – शाहरत, आवाई, बोलवा, जाहिरात. **चुंगी** – टोळी. **लिहिण्याचे कामावर** – कारकून शिलेदाराच्या कामावर. शिलेदारांच्या पगाराचा हिशेब ठेवणारा कारकून तो कारकून शिलेदार. **सोन ओळख** – तोंळ ओळख. दसऱ्याच्या दिवशीं सोनें देण्यास ओळख पुरते तितपत. **रुकार दिल्हा** – आपली विनायकरावाची ओळख आहे असें सांगितलें. **फीर फीर** – फिरत फिरत. **त्यांनींहि ठिकाण लागूं दिला नाहीं** – महतपूरकर दबले नाहींत, शरण जाऊन ठाणें हवाली करीनात. **तलब** – पगारांपैकीं मिळावयाची राहिलेली बाकी. **पैगम** – सूत्र, बोलणें. **निकटीचें धरणें देणें** – पक्के धरणें देणें, व देणेकऱ्यास जागचे जागीं हलूनहि न देणें.

होळकर यांस समजतांच बैरागी धरणें न बसतां त्याजला बोलावून हिशेब करून पैका रोख पदरीं घालून काहाडून दिल्हें. यावर महतपुरकरांशीं कांहीं द्यावें घ्यावें असें बोलणें होतें त्यास तऱ्हे देऊन अर्धरात्रीं कूच करून चालले. हें वर्तमान बाघास समजल्यावर पांचशें स्वार पाठवून घेराघेरी करून यशवंतराव यांस सांपडविलें. धरून घ्यावे, (यांत) तथा राहिली नाहीं. परंतु पुण्याची ती दशा. कोण्या कलास उंट बसतो. तेव्हां तऱ्हे देऊन निघोन गेले. यशवंतराव महाराज हंडे हार्याचे सुमोर आले.

(८६) यशवंतराव जमल्याचें वर्तमान पुण्यास कळल्यावर तेथून बापू होळकर यास रवाना करावें हा मनोदय बाळासाहेब यांचा. परंतु मुत्सदी यांचे मनांत बापू होळकर गेले असतां कार्यास खोट नाहीं. परंतु बापूस कोणें आकळावें ? तेव्हां नागो जिवाजीची सिद्धता करून शिलेदार, बाराशें स्वार पागा व फुलणसाहेब निसबत दुंदरनेक याचें पलटण पुणें मुकामीं होते तें दिल्हें. चांदवडा आलीकडे धोंडोपंत गोडबोले श्रीमंतांकडून होते त्याशीं कईकबाडावरून कटकट झाली. ते चढून आले. यांनीं मुकाबला केला. स्वार सरंजाम होता परंतु फुलणसाहेबानें अग्रसर होऊन स्वार सरंजामाचा जाबता ठेऊन पांचा गोळ्यांत लढाई खतम केली. मग तेथून दरकूच नागो जिवाजी महेश्वरीं नर्मदा उतरून इंदुरास दाखल झाले.

---

(८५) **बैरागी धरणें न बसतां** – बैराग्यांनीं धरणें धरून बसावयाच्या आधींच. **महतपूरकरांशीं कांहीं द्यावें घ्यावें इत्यादि** – महतपूरकराला हि तुम्हीं कांहीं पैका दिला पाहिजे असें बैरागी शिपाई अडवूं लागले होते. **तऱ्हा देणें** – थाप मारणें, सबब सांगणें, भूल करणें. **सांपडविलें** – पकडले. **तथा** – बाकी शिल्लक. **परंतु पुण्याची ती दशा. कोण्या कलास उंठ बसतो** – परंतु पुण्य किंवा दैव तारणार असल्यावर ते कोण्या प्रकारें तारील तें कसें सांगणार ? उंट जसा कोणच्या कलावर बसेल हें सांगतां येत नाहीं. तसाच दैवाचा प्रकार असतो. तें तारणार असलें म्हणजे कसेहि तारतें.

(८६) **यशवंतराव जमल्याचें** – यशवंतरावाजवळ सैन्य जमल्याचें. **कार्यास खोट नाहीं** – कार्य बिघडणार नाहीं. **आकळणें** – मन वळवणें. **कई कबाड-कही** – धान्य. **कबाड** – लाकुड-फांटा. सैन्याला लागणारें धान्य व लाकूडफांटा. सैन्याबरोबर एक टोळी असते ती आसपासच्या प्रदेशांतील धान्य लुटून व घरें मोडून लाकूडफांटा आणते. तीस 'कही' अशी संज्ञा आहे. **चढून येणें** –हल्ला करून येणें. **खतम केली** – समाप्त केली. फुलणसाहेबानें तोफेची फैर झाडताच धोंडोपंत गोडबोल्याचें सैन्य पळून गेलें.

(८७) तों इकडे यशवंतराव महाराजांनीं पांच हजार फौजेचा जमाव करून नेमावर हांडे हार्दे लुटून खरगोणचा सुमार धरला. तों इकडे इंदुराहून नागो जिवाजी यांनीं पांचशें स्वार शिलेदाराचे बापू पिंगळेबरोबर देऊन, एक पलटण त्यांत ज्यानसाहेब फिरंगी, असे नर्मदा उतरून कसरावदेवर आले. तेव्हां यशवंतराव महाराज यांनीं अवघड वाटून डांगरकराडा धरावा अशी मसलत शामराव महाडीक यांसी बोलले. तेव्हां महाडिकानें शिव्या देऊन स्पष्ट बोलला कीं, " गांडींत शेपूट घातल्यानें हरतऱ्हेनें हस्तगत करून, तूं धनगराचें बीज आहेस, पोटास भाकर, आंगास वस्त्र, बसावयास घोडें मिळेलच. परंतु आम्हांसारख्यांचे मस्तकीं मेखसूची योजना होऊन रांडापोरें ढाणकास वाटतील. तुझे मनांत धैर्य नसल्यास पाठिंबा ठेवून हें पलटण तरी उडऊन टाकूं यांत जय अपजय ईश्वर देईल तसें पाहून घेऊं. विना एक वेळ दाती दिल्याखेरीज नक्षा जमणार नाहीं." हाच मनसुबा सिद्ध करून मीरखाँ वगैरे रिसालदार बोलावून आणून, त्यांची खातरतसलीम करून हामराहा केलें. तेच समयीं तयारी करून पलटणचे सुमारास आले. तों इकडे पलटणें कूच होऊन खरगोणचे सुमारें जात होतीं. तितक्यांत यशवंतराव होळकर सडा घोडा राऊत दोन हजार येऊन पोंहोंचले. पलटणचा किल्ला बांधून होते. हें पाहतांच घोडे घालून माणसें जाया करून जानसाहेबांस धरून घेतलें. स्वार सरंजाम महेश्वरींच होता. यांनीं पलटणें गुंडाळून जावडाचावडी नर्मदेस घोडे पाणी पाजून पुन्हा मुक्कामास आले. मावशीबाई व भारमल होळकर यांचे मात्र मिळाले होते. जावडाचावडीस मुक्काम ठेवून मावशीबाई उतरून जाऊन घेऊन

---

(८७) **ज्यानसाहेब** – जीन बॅप्टीस्ट. **डांगर कराडा** – डोंगर कठडी. **डांगर कराडा धरणें** – डोंगर कठडीचा आश्रय घेणें. **हस्तगत करून** – हस्तगत करून घेतील. तूं लपून डोंगराचा आश्रय घेतलास तरी तुला पकडतील. **धनगराचें** – येथें अर्थ थोरल्या मल्हारराव होळकराचे. **मेखसू** – तंबू, राहुट्यांच्या मेखा ठोकण्याची मोठी लाकडी मोगरी. **ढाणक** – महार, मांग. **ढाणकास वाटणें** – शिरच्छेद करण्याकरतां मांगाच्या हवाली करणें. **पाठिंबा ठेऊन** – पाठिंबा ठेव. म्हणजे माझ्या पाठीशीं मुकाट्यानें बैस. **दाती देणें** – दाताडावर हाणणें, तोंडात मारणें. **नक्षा** – कीर्ति, वरचष्मा, जरब. **खातर तसलीम** – खात्री. हल्ल्यांत काम करून दाखविलेंत तर तुमचे अमुक अमुक उर्जित करूं, अमुक तमुक बक्षीस देऊं असें त्यांस आश्वासन देऊन. **किल्ला** – व्यवस्थित अशी सैन्याची शिस्तशीर रचना. **धरून घेतलें** – पकडले, हस्तगत केलें, कैद केलें. **मात्र** – ' आंत्र ' असें पाहिजे. मावशीबाई व भारामल होळकर हे आंतून यशवंतराव होळकरास फितूर झाले होते.

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था

आली. ते मावशीबाईचे वाड्यांतच होते. किल्यावर शिबंदी भिकाजी जमादार खानदेशी व टकापा कर्नाटकी वगैरे बाईसाहेबांचे हातचे होते. त्यांचा विश्वास न पडे. सबब त्यांशीं बोलणें लाविलें कीं, तुम्हीं किल्ल्याखालीं उतरून भवानीपाशीं राहवें तुमचा हिशेब तुम्हांस चुकवून देऊं. असें बोलणें करून किल्ल्यावरील शिबंदी दरोबस्त काहाडली. आपले बरोबरील मेहेरबानसिंग हजार बाराशें माणसें किल्ल्यावर घालून चौकीपहारे नेमिल्यावर खांसास्वारी किल्ल्यावर दाखल जाहली. नंतर शिबंदीचे तलबेविशीं बोलणें पडलें. तेव्हां त्यांसी उत्तर केलें कीं, मी होळकर होतो म्हणून तुम्हीं आपले तलबेकरितां किल्ला माझे हवाली केला. दुसरा कोणी येता त्याजलाहि असें करितां कीं काय ? हा दोष त्यांजकडे लावून हुसकून दिल्हे. तलबेपैकीं कवडी दिल्ही नाहीं. मासपक्ष महेश्वरीं राहून कलमजारी चाललीच होती.

(८८) तों इंदुराहून नागो जिवाजी बमय फौज पलटणसुद्धां समेरूढचा घांट उतरून कलाहई आखेपुरा छकडा बावडीचे सुमारें आले. तों हेहि महेश्वरीहून सरंजामसुद्धां मुकाबल्यास गेले. तेथें पलटणाशीं पाय न टिकतां महेश्वरास आले. किल्ल्याचे दरवाजे लावून पाहरे चौक्यांची मुस्तकी करून दरखदार मंडळी बोलावून बाईसाहेबांचा जामदारखाना फोडला. त्यांत किमती भारी, वजनांत हलके, अशी रकम काहाडून घेऊन कांहीं चांदी कांहीं सोन्याचीं भांडीं बर्तन माफक भार बर्दारी ओझ्याचा अजमास घेऊन त्याक्षणीं बाहेर पडले. तारापुराचा घांट चढून किल्ले मांडवास आले. त्यांचे मागें आबाजी रणसोड व भारमल होळकर वगैरे निघून गेले. नागो जिवाजी व इंदरनेक यांनीं मागोमाग येऊन किल्ला घेतला असतां

---

(८७) **बाईसाहेबांचे हातचे** – अहिल्याबाईच्या पदरचे; वेळचे. **मी होळकर होतो म्हणून .... असें करितां कीं काय ?** – यशवंतराव होळकर त्यांना म्हणाला, किल्ल्याचा कबजा मीं घेतला तो कांहीं तुम्हां शिबंदींतील लोकांशीं करार करून नव्हे. माझा करार काय असेल तो तिसऱ्याशींच होता. पण मी होळकरांपैकींच आहे असें पाहून तुम्हीं आतां आपल्या पगाराची बाकी माझ्याकडे मागता काय ? दुसऱ्या कोणी किल्ला असा बळकावला असता तर तुमची त्याकडे बाकी मागण्याची प्राज्ञा होती काय ? व त्यानें तरी ती दिली असती कां ? तेव्हां तुम्हांस कांहीं एक मिळावयाचें नाहीं. चालते व्हा !

(८८) **मुस्तकी** – खंबीरता. **रकम** – ऐवज, जिन्नस, वस्तु, नग. **बर्तन** – भांडे. **भांडीबर्तन** – भांडीकुंडीं. **माफक भार बर्दारी** – भारबर्दारी माफक-ओझ्याच्या वाहनास झेपेल इतकें. **भार बर्दारी** – ओझें वहाण्यासाठीं बैल, तट्टे वगैरे.

महाराजांस मसलत कठीण पडती. हें त्याजपासून न घडतां अडीरात देऊन प्रहर दिवस चढतांना आले. इतक्या अवसरांत त्यांच्यानें जें घेववलें तें घेऊन किल्ला मोकळा टाकला. तों ते येऊन आंत येऊन शिरले. यांनींहि मासपक्ष किल्ल्यांत राहून राहिलें साहिलें बरबाद करून महाराजांशीं रहबार लाविला कीं, " आपण जमविलें हें नीटच, परंतु शिक्का काशीराव यांचे नांवाचा चालवून कारभार मुक्त्यारीनें करावा." असें बोलणें हैबतराव हमीर व निळोबा साठे निसबत पवार धारकर यांचे विद्यमानें होऊन हैबतराव हमीर हे बोलण्याचे दरम्यान त्यांजकडून किल्ल्यांतील श्रीरामजीच्या तुळशी उचलून देऊन नागो जिवाजी यांचें मनांतील संशय दूर होऊन भेटी जाहल्या. नंतर दहापांचा रोजांनीं नागो जिवाजी धरून पायांत बिड्या घातल्या. सोळा संस्कार करण्याचे ते केले. दुंदरनेक याचें बोलणें पडलें कीं, " आम्हीं चाकर ते पक्षीं सांगतील (ती) चाकरी करूं. आमचें भेटावयाचें प्रयोजन तें काय ? तेव्हां लिंग अडीच शेर पाहून लखबा दादावर जगन्नाथराम जयपूरचे शाहावर होते त्यांचे मदतीस रवाना करून किल्ले रामपुरा ही जागा बसावयास दिल्ही. त्यास लखबादादास सामल होऊन जयपुराची लढाई मारून फिरून रामपुरास येऊन बसला. इकडे किल्ले मांडव येथून कूच करून इंदुरास आले. मावशीबाईचा काळ मांडवावर झाला. भारमल होळकर याजला महेश्वरास रवाना करून खरगोण वगैरे महालचा बंदोबस्त केला. नंतर इंदुराहून कूच करून सुजपालपूर, सारंगपूर व अष्टे पांच महाल याचा परामर्ष करून शिरोंजेस गेले, तेथून पुढें मीरखान सुभा करून सागर प्रांतीं रवाना केला. त्यानें सागर लुटून माघारा शिरोंजेस आला. मग फिरत फिरत राघोगडावरून समेरूढचे घाटावरून महेश्वरास आले. महेश्वरीं आल्यावर पदरचे गोरगरीब बाईसाइबांचे लोभांतील होते त्यांचेहि अंगीं भूतदया खरीच,

---

(८८) **अडी रात देऊन** - अडवी रात देऊन. रात्र आड करून. भावार्थ त्यांनीं रातोरात कूच करून जावें, तसें गेले नाहींत. रात्रीं मुक्काम करून दुसरें दिवशीं आले. **रहबार**—वाचनाची चूक. रहदार असें असावें. रहदार म्हणजे राबता जा ये. येथें अर्थ बोलणें, सूत्र. **सोळा संस्कार** – येथें अर्थ पूर्वीं कैद्यांचा छळ करण्याचे जितके प्रकार होते तितक्या तऱ्हेनें त्यांचा छळ केला. **लिंग अडीच शेर पाहून** – ' शेठ सवाशेर आणि लिंग अडीच शेर ' भावार्थ मालकापेक्षां नोकर शिरजोर. लिंगायत लोक गळ्यांत शिवलिंग घालतात. तें पुष्कळ वेळां मोठें व जड असतें. यावरून वरील म्हण प्रचारांत आली. **मीरखान सुभा करून** – मीरखानाला सरसेनापतीपद देऊन. **त्यांचेहि अंगीं इ०** – यशवंतराव होळकराच्या मनांत. भावार्थ, अहिल्याबाईच्या पदरच्या गोरगरीबांनाहि लुटण्याचे यशवंतरावाच्या जिवावर आलें. परंतु करतो काय ! फौजेचा खर्च वेळच्यावेळीं

परंतु फौजेचा जमाव होऊन खर्चाच्या अडचणीकरितां आपपर विचार राहिला नाहीं. कसेंहि करून पैका उत्पन्न करून फौजेस द्यावा, हेंच लक्ष गोविंदराव भगवंत व काशिनाथ आपाजी वगैरे मामलेदार होते ह्यांजपासून ठोकून पिटून चार रुपये घेतले. मग फौजेसुद्धां इंदुरास आले. मग देशीहून लाडाबाईचें वर्तमान आले. मग प्रपंचाची बुद्धि धरून गोतपात (पाहून) नंतर भिवाजी फणसे यांचे कन्येशीं विवाह केला. लग्न झाल्यावर केसू बाहूर परगणे धार येथें छावणी झाली. तथें आनंदराव पवार वगैरे यांच्या भेटी जाहल्या. एका खवाचे गहूं चार महिने सारे फौजेनें खाल्ले.

(८९) पुढें कंपू भरण्याचा इरादा (होऊन) फुलणसाहेब याजला कंपू भरण्याचा हुकूम देऊन, विठ्ठल महादेव कारकून फडणिसांकडील बराबर देऊन, जावरें व देपाळपूर वगैरे महाल खर्चास लावून देऊन, कंपू भरण्यास पाठविलें. त्याच मुक्कामीं शिंद्याकडील बाया सेदव्याचा घांट चढून पुढें महाराजांस पत्रें आलीं कीं, आम्हीं उज्जनीस येतों, तुम्हीं आम्हांस अनुकूल असावें, त्याजवरून पुन्हां इंदुरास येऊन शामराव महाडीक याची रवानगी बायांस घेऊन यावें याजकरितां सरंजाम बरोबर देऊन वाटे लावले. नर्मदेचे जवळ महाडीक यांच्या व बायांच्या भेटी जाहल्या. बोलणें चालणें परस्परें होऊन दरकूच इंदुराजवळ घेऊन आले. यांच्या त्यांच्या भेटी जाहल्या. बाळाभाऊ कारभारी यांचीं बोलणीं परस्परें झालीं कीं, तुम्हीं आम्हांस अनुकूल असावें. तुम्हांस उज्जनीस पावल्यावर खर्चास दरमहा बोलल्याप्रमाणें देत जाऊं. परस्परें बेलभंडार होऊन बायांबराबर स्वारी उज्जनीस गेली. तेथें गेल्यावर बायांनीं लखबादादा मेवाडांत होते त्यांजकडे पत्र पाठवून त्यांजला बोलाविलें. तेहि दरकूच अगरकानडचे सुमारें येऊन त्यांचीं पत्रें बायांस

---

(८८) भागलाच पाहिजे. म्हणून मिळेल त्या उपायानें त्याला पैका उभारावा लागला व म्हणूनच त्यानें वरीलप्रमाणें अहिल्याबाईच्या पदरच्या लोकांना छळून त्यांजकडून तेवढें द्रव्य काढलें. **प्रपंचाची बुद्धि धरून** – लग्न करावें अशी इच्छा होऊन. **गोतपात पाहून** – मुलींचें कुळशील जुळतें कीं नाहीं तें पाहून. **खवाचे** – मोडी वाचनाची चूक दिसते. मूळ शब्द ' पेंवाचे ' असा असावा. धारेस सुबत्तेची कमाल होती. तेथें इतकी प्रचंड पेंवे होतीं कीं, त्यांपैकीं एकाच पेवांतील गव्हावर साऱ्या फौजेची चार महिनेपर्यंत गुजराण झाली.

(८९) **कंपू भरणें** – कवायती कंपूत शिपायांची भरती करणें. **पर्याय** – प्रकार.

आलीं कीं, होळकरापाशीं कबूल केलें त्यापैकीं एक पैसा देऊं नये, आम्हीं येऊन पोंचल्यावर जें करणें तें करूं. ही बातमी महाराजांस कळतांच गांवांत स्वारी बायांकडे गेली. तेथें बोलण्याचा पर्याय दुसराच पहाण्यांत आला. कारभारी यांचीं बोलणीं चढाचीं पाहिलीं, तेव्हां महाराज स्पष्ट बोललें कीं, "तुम्ही आम्हाला सामल केलें. सांप्रत बोलण्याचा विचार तुमचा दुसरा दृष्टीस पडला. त्यापक्षीं आमची तुमचीं बोलणींप्रमाणाच्या गोष्टी जाहल्या त्या तुमचे तुम्हांपाशीं आमचें आम्हांपाशीं. तुम्हांस कळेल तें तुम्हीं करावें, आम्हांस कळेल तें आम्हीं करूं." असें बोलून पानसुपारी, अत्तर-गुलाब कांहीं न घेतां आपले लष्करांत स्वारी आली. तों मागें बाया शहरांतून निघून उडोशाच्या तळावर त्याजकडील फौज पडली होती तेथें येऊन राहिल्या.

(९०) इकडे महाराजांनीं रात्रौ शामराव महाडीक व चिमणाजीपंत भाऊ व मीरखां बोलावून सल्ला केला कीं, लखबादादा व बाया सामल झाल्यावर आपणास जड पडतील. यास्तव बायांवर जरब द्यावी. असा मथितार्थ होऊन फुलणसाहेबाचा कंपू व माखणलालशिंगाचा कंपू या उभयतांस ताकीद करून उडोशाचे तळावर बायांकडील फौज पडली आहे त्याचें रुखें तोफा लावून मागील दोन घटका रात्र राहतां तोफा सुरू करणें. मग त्यांणीं फौजेचें रुखें तोफा लावून मागील दोन घटका रात्र राहतां गोळा सुरू केला. फौज लुटून घेतली. ज्याला सवड फावली तो शहरांत निघून गेला. बाया सडया निघून लखबादादाकडे गेल्या. हें कळल्यावर फौजेचें कूच करून सडी स्वारी त्यांचे मागें गेली. लखबादादाचें व इकडील पांचा कोसाचें अंतर राहिलें.

(९१) मग लखबादादाकडील भला मनुष्य पेगाम घेऊन आला. बोलणीं झालीं. "परस्परें ऋणानुबंध वडिलोपार्जित त्याजवर नजर देऊन झाली गोष्ट ही भविष्यावर टाकून आपण आपला उद्योग करावा. आम्ही आपले उद्योगास जातो." ही गोष्ट इकडे सोयकर पडली. माघारीं कूच केलें. तों बातमी आली कीं, सत्वाशाकडे शिंद्याकडील तोफा पटलणें, देवजी गौळी, चिंतो आत्माराम वगैरे सरदार आले. कांहीं पटलणें मुकाबल्यास आलीं. तेव्हां फौजेचें कूच करून

---

(९०) बायांवर जरब द्यावी – शिंदे बायांच्या सैन्यावर हल्ला करावा. **मथितार्थ**– मसलत.

(९१) भला मनुष्य – मुत्सद्दी, वकील, बोलणें चालणें करण्यासारखा वजनदार मनुष्य. **झाली गोष्ट भविष्यावर टाकणें** – घडलें तें अदृष्टात होतें म्हणून नाईलाजानें घडलें अशी संपादणी, बतावणी करणें. **सोयकर** – सोईस्कर.

तिकडे चालले. संताजी लांभाते व कृष्णाजी मुकुंद बक्षी याजला त्यांचे तोंडावर पुढें रवाना केलें. त्यानें नेवरीजवळ पलटणें घेरलीं. त्यांची यांची गोळागोळी झाली, तों मागून स्वारी दाखल झाली. पलटणें लुटून तसेंच माघारीं घांट उतरून सत्वाशाजवळ फौजेचा मुक्काम करून पलटणें व स्वारी रेवे पावेतों गेली. इकडून रेवा पार होऊन शिंद्याकडील जिनसीचे गोळे चालले. लढाई मातबर झाली. देवजी गौळी कामास आले. जागा अडचणीची, मैदानची जागा गांठ पडल्यावर पाहून घेऊं. असा विचार करून नर्मदेचे कांठीं आपल्या तोफा सोडून माघारी आले. कुशाबा बक्षीवर क्रोध केला कीं, तोफा सोडून माघारी आलास. लाज कशी वाटली नाहीं ? मग कुशाबा बक्षी यांनीं जीव झोंकून पांच हजार स्वार मराठा घेऊन तोफेवर जाऊन बसला आणि लोकांस बोलला कीं, " मजला तरी मरावयाचें आहे. तुम्हांस होळकराचे निमकापासून आदा होणें असल्यास घोडीं सोडून तोफा काढाव्या. हें न करितां मागें गेल्यास होळकर प्राण घेईल, सोडणार नाहीं. त्याचें हातें मरावें याजपरीस येथें मरावें यांत लौकिक व पुण्य पुरुषार्थ आहे." मराठा लोक, अबरू तलम. घोडीं सोडून तीस तोफा दराबीवर धरून तीन कोस आणिल्या. तों पावेतों कारखान्याचें माणूस बैल रसा कांहीं एक नाहीं. झाडींत असल्यास लागून होते कारखाना जैयत, तेव्हांच मेळामेळ होऊन तोफा काढून आणल्या. मग सरकार प्रसन्न होऊन कृष्णाजी मुकुंद याजला बक्षीस जाहली कीं, आज पावेतों तुजविशीं पाप-पुण्य मनांत होतें तें टाकून समाई जाहली. हें वाणी बक्षीनें श्रवण करून चिरंजीव तऱ्हेंतील कुरणिसा करून हात

---

(९१) **जिनसी** – तोफखाना. **कुशाबा** – कृष्णाजी मुकुंद बक्षी. **जीव झोंकून** – जिवावर उदार होऊन. **निमक** – मीठ. **निमकापासून आदा होणें असल्यास** – खाल्ल्या मीठाची उत्तीर्णता करून दाखविणें असल्यास,खाल्ल्या मिठास जागणें असल्यास. **मराठा लोक अब्रू तलम** – मराठे लोक अब्रूला फार जपतात. तलम वस्त्र जरा कोठें खोंबारा लागला तरी फुकट जातें. त्याप्रमाणें अब्रूची गोष्ट आहे, असें मराठे मानतात व ती जाऊं नये याकरितां प्राणहि देतात. **दराबी** – तोफा वहाण्याचा खटारा. श्री. भावे 'दराबीची' अर्थ – तोफेखालचा फडपैय्या म्हणजे 'Stand' असा देतात. **रसा** – दोरखंड, दोर. **समाई** – निखालसता. **चिरंजीव तऱ्हेंतील कुरणीसा करून** – राजे लोकांना निरनिराळ्या दर्जाच्या लोकांनीं सलाम किंवा मुजरा करण्याच्या निरनिराळ्या रीति ठरलेल्या असतात. सदारांनीं विशिष्ट तऱ्हेनें मुजरा करावयाचा. राजघराण्यांतील लोकांनीं किंवा राजपुत्रांनीं कांहीं विशिष्ट तऱ्हेने मुजरा करावयाचा अशा रीति ठरलेल्या असतात.

जोडून विनंती केली कीं, "दागिने-वस्त्रें देतां ती खाऊन फाडून टाकितों. हें देणें माझे प्रालब्धानें झालें."

(९२) ऐशीं बोलणीं होऊन पलटणसुद्धां कूच करून शाहापुरावरून घांसदाणा करीत इंदुरास आले. तों शिंद्याकडील फौज-पलटणें चिंतो आत्माराम घेऊन उज्जनीजवळ दाखल झाले. बातमी समजल्यावर उज्जनीजवळ आले. क्षिप्रेनजीक मुक्काम करून पुढें छबिन्यास कुशाबा बक्षी व कृष्णाजी माहडीक व चिमणाजीपंत यांजला त्यांचें लष्कर गोगाशाचे टेकडीपुढें उज्जनीचे गांवकुसांशीं लगत पडलें होतें, त्याचे तोंडावर पाठविलें. हें वर्तमान चिंतोपंतांस कळतांच त्यांनीं फौज तयार करून त्यांचे मुकाबल्यास आले. त्यांची यांची गोळागोळी सुरू जाहली. दिवस थोडा राहिला. सबब चिंतो आत्माराम मुक्कामास गेले. म्हणून बक्षीचा निरोप खांशांस येतांच स्वारीहि छबिन्याजवळ आली. रात्रीचा विषय सबब एक्या टेकडीवर जाऊन खांसे तमाशा पाहण्यास बसले. तों मागून फुलण व माखणशिंगाकडील पलटणें येऊन पावलीं. मग शिंद्यांचे फौजेच्या सुमोरें मोर्चेबंदी आंगपाताकडे मीरखां वगैरे पठाणाकडील यांजला आज्ञा जाहली कीं, तिकडून मोर्चेबंदी करावी. रात्रौ खाशांचा व मीरखानाचा संकेत जाला होता कीं, दिवस उगवल्यावर तोफा सुरू करून हल्ल्याचा विचार होईल ते समयीं एक बाण इशाऱ्याचा सोडूं, म्हणजे तुम्हीं उठावणी करावी. मग दिवस उगवतांच तोफा सुरू करून पलटणाच्या बाजूस पागा हुजुरात व बक्षी, चिमणाजीपंत वगैरे होऊन तोफा दाराबीवर धरून संकेताचा बाण सोडतांच आंगपाताचे दरवाजाकडून मीरखानाची उठावणी जाली. चहूंकडून फौजच फौज, तेव्हां शिंद्याचे लोक घाबरून गांवांत पळूं लागले. चिंतो आत्माराम कामास आले. लढाई खतम जाली. नंतर आठ पंधरा दिवस तेथेंच मुक्काम होता.

---

(९१) येथें बक्षीनें होळकरास आपण त्याचे जिवलग कुटुंबीयच झालों असें दर्शविण्याकरितां त्या पद्धतीनें कुरणिस म्हणजे मुजरा केला. **दागिने वस्त्रें देतां तीं इ०** – बक्षी म्हणाला, "तुम्ही बक्षीस म्हणून दागिने किंवा वस्त्रें दिलीं असतीत तर तीं अंगावर घालून केव्हां तरी फाटून गेलीच असती. परंतु तुम्ही आतां हें जें कृपेचें किंवा शाबासकीचें बक्षीस मला दिलेत तें मला अक्षई पुरेल."

(९२) **घास दाणा** – सैन्याच्या घोड्यासाठीं दाणावैरण मिळविण्यासाठीं मागितलेली खंडणी. **छबिना** – सैन्याच्या छावणीभोंवतीं रखवालीस ठेवलेला स्वारांचा पहारा. **स्वारीहि** -- यशवंतराव. **तमाशा** – लढाईचा तमाशा.

(९३) या अवसरांत शिंदे यांनीं सरजेराव बापुखां वगैरे सतलजसाहेब यांचा कंपू बरावर देऊन हंडयाचे घांटे चढून इंदूरचे सुमारें चाल केली. हें वर्तमान महाराजास समजतांच उज्जनीहून कूच करून खजराण्यास इंदूरनजीक मुक्काम केला. तों शिंद्याकडील फौज येऊन पोहोंचली. मग सडी स्वारी होऊन त्याचे तोंडावर गेली. पहिले दिवशीं इंदुराहून पांच कोश तेथून ऐवज आणून याचे पदरीं घालावा आणि यांनीं कूच करून चालावें. हें वर्तमान दुंदरनेकास समजून मोहोनलाल यांस कंपूचे समजाविशीकरितां बावीस रवाना केलें. मशारनिले कंपूंत येऊन, नवमाही तलब आम्ही देतो तुम्हीं कूच करून रामपुऱ्यास चलावें. कबूल करून ऐवज पदरीं घातल्यावर कूच करून साहेबापाशीं येतों, ऐसें कबूल करून मोहनलाल रामपुऱ्यास दुंदरनेकापाशीं येऊन सर्व वर्तमान सांगून ऐवज मागूं लागला. तेव्हां दुंदरनेक यानें मुद्दा घातला कीं, माहडिकाकडील दोघे गृहस्थ आहेत ते आमचे स्वाधीन केल्यावर ऐवज देऊं. ही बातमी कंपूंत गेली. कंपूवाल्यांनीं क्रिया दिल्ही होती. ते म्हणूं लागले, ग्यारमाही तुम्हीं द्याल तर तुम्हांबरोबर येतों. नाहींतर तुम्हांस कोटयाचे दरवाज्यांत पावतें करून देतों, म्हणजे आम्हीं क्रियेपासून मुक्त झालों. हें साकल्य उभयतांनीं शामराव माहडीक यांस लिहिलें. त्यांनीं ग्यारमाही कबूल करून उभयतांस लिहिलें. पत्रें आलियावर कुमेदानाशीं ग्यारमाही बोलणें करून त्याची दिलजमाई होऊन पूर्वीं वचन कथन जाहलें होतें त्याची बळकटी केली. खाळाखालीं उतरून पार गेल्यावर वांटणी सुरू करूं. प्रातःकाळीं कंपूचें कूच जालें, खाळाखालेचे कांठीं गेले. तेथें टाकून गाडे उतरावयास वाट करितात हें वर्तमान दुंदरनेकास समजल्यावर स्वार रवाना करून कंपू लुटून घ्यावा, ते स्वार दिखाई देतांच कुमेदानानीं तोफा फिरवून स्वारास गोळे मारले. स्वार आले होते ते उधळून गेले.

(९४) नदी आहे तेथें मुक्काम शिंद्याकडील फौजेचा जाहला. त्याजकडील पेंढारी आलीकडे येऊं लागले. हें कळतांच महाराजाची स्वारी पोहोंचून त्यांजकडील

---

(९३) **अवसरात** – या अवधींत. **चाल केली** – चाल करविली. **नवमाही तलब** – नऊ महिन्यांचा पगार, पगाराची बाकी. **क्रिया** – वचन. **ग्यारमाही** – अकरा महिन्यांचा पगार. **कुमेदान** – कमांडर या इंग्रजी शब्दाचा मराठी अपभ्रंश. कुमेदान हा कंपूचा कमांडर सेनापति. **वचन कथन** – आणक्रिया. **खाळाखाली** – नदीचें नांव आहे. **तेथें टाकून** – तेथें या शब्दापुढें कांहीं तरी शब्द गळाला असावा असें वाटतें. तो काय असावा हें उमगत नाहीं. **दिखाई देतांच** – दृष्टिपथांत येताच, दिसूं लागताच.

व हिकडील लोकांची झटपट जाली. पांच पंचवीस माणूस जायां झाले. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं शिंद्याकडील फौजेचें कूच झालें. तेव्हां तोंडावर महाराजांची स्वारी उभे राहिली. त्यांनीं पलटणें व तोफांचा पऱ्हा बांधून बुणग्यांची रव पलीकडील आंगीं घालून चालले. दोन प्रहराचे समयीं इकडील फत्तेसिंग माने व हुजुरात पैकीं बारगीर यांनीं त्यांचे स्वारावर करवऱ्या केल्या. त्यांचा व हिकडील जमाव पडतां खांशांनीं पाहतांच आपला घोडा पुढें केला. तों त्यांचे बराबर सारेच लोक उठले. तों तोफखाना सुरू जाहला. त्यांचें उठावणीस तोफा घेऊन पुढें गेले. ते दिवशीं इकडील तिकडील शें पन्नास माणसें कामास आलीं. त्यांचे फौजेनें तीन कोशाचें कूच करून मुक्काम केला. तिसरे दिवशीं इंदुराहून एका कोसावर मुक्काम शिंद्याकडील फौजेचा आला. पाहून खांसे व मीरखां यांनीं विचार करून फौजेची तोड राखावी या करितां माने व शिलेदार व हुजुरात जागजागां ठेऊन गांवानजीक तोफा पलटणें यांचे मोर्चे लाविले. आश्विन शुद्ध ८ अष्टमी सन १२११ ते दिवशीं लढाई झाली. ते काळीं मीरखानावर झिंबड पडली म्हणोन खांसे इकडून मीरखानाकडे समाचारास गेले. तों फौज जागां जागां मोर्च्यांवर होती ते महाराजांचे बराबर गेली. मग सुने रान पाहून शिंद्याकडील फौज पलटणें यांनीं चालून घेतलें. मग महाराजांकडील पेंढारी यांनीं पळ काहडला. लढाई हारले. मीरखानाकडून खांसे येतात तों इकडील फडशा जाला. तेव्हां तसेच अस्तमान पावेतों स्वारी उभी राहून रात्रौ जांबेस गेले.

(९५) जांबेस तीन चार दिवस राहून लोकांस हुशार करून दसऱ्याचे मुहूर्तें पुन्हा डेरे इंदूरच्या रुखें दिल्हे. पांच रुपये स्वारी खर्चास वाटून नवलाईस शामराव माहडीक जुंजरनेकाचा कंपू घेऊन आले. त्यांजला सामल जाले. पूर्वीं शामराव माहडीक कांहीं कामाकरितां कोटयास पाठविले होते. नंतर इकडील अडचण पाहून शामराव यांस पत्रें लिहिलीं होतीं कीं, जुंजरनेकास सरमजासुद्धां घेऊन तुम्हीं यावें याजवरून शामराव माहडीक यांनीं रामपुऱ्यास जुंजरनेकास पत्र पाठविलें त्याचीं

---

(९४) **पऱ्हा** – पऱ्हा, भिंत, रांग. **रव** – रांग. **बुणगा** – सैन्यांतील वाणी, वणूज, व्यापारी, दुकानदार, बिन लढाऊ लोक. **करवऱ्या** – मूळांत कलथऱ्या असें असावें. **कलथनी** – हल्ला, उलटून पडून केलेला हल्ला. **जमाव पडता** – भिडतां, दोन्ही सैन्यांची गांठ पडतां. **फौजेची तोड राखणें** – तोंड, राखणें. तोंडावर फौज म्हणजे घोडेस्वारांचें सैन्य ठेवावें असा विचार करून. **मीरखानावर झिंबड पडली** – मीरखानाच्या टोळीवरच शत्रूचा सर्व हल्ला आला. **ते** – ती. **सुने रान** – मोकळें रान.

उत्तरें बयाद लावून येत गेलीं. मग माहडीक यांनीं कृष्णा लक्ष्मण, बाळाजी रघुनाथ जुंजरनेकाकडे रवाना केले. त्यांस सांगितलें कीं, साहेब आल्यास उत्तमच आहे. घेऊन यावें. नाहीं तर त्यांजकडील कंपूमध्यें शकटभेद करून कंपू घेऊन यावें. उभयतां मशारनिलेची व जुंजरनेकाची भेट होऊन बोलणीं झालीं कीं, कंपू बिघडला आहे. त्याची समजूत करून मागाहून येईन. ऐसे बोलून उभयतांस रवाना केलें. हें जुंजरनेकापासून रामपुऱ्याहून निघून कंपू बाबीवर होता तेथें आले. कंपूंतील कुमेदानासी देण्याघेण्याच्या गोष्टी बोलून हिंदु यांची गंगाजळ व मुसलमान यांचें कुराण याप्रमाणें वचन कथन घेऊन शामराव यांस पत्रें लिहिलीं. अस्तमानी खाळपार आले. ग्यारमाहीची वांटणी सुरू केली. एक्या पटलणाच्या गोलंदाजास ग्यारमाही दिल्ली. दुसरे दिवशीं कूच करून दोन चार कोश आले. मुक्कामीं येऊन वांटणी चालली. एक पलटणीची वांटणी जाली. ऐसें करीत करीत बुंदीस आले.

(९६) इकडे राजे जालमसिंग यांचीं पत्रें जुंजरनेकास गेलीं कीं, पत्रदर्शनी स्वार होऊन येणें. हें पत्र अस्तमान जाल्यावर दोन घटका रात्रीस रामपुऱ्यास पावलें. चित्तास गोडसें वाटून निघाले. लाखेरीस आले. तेथें हेरून चमेली तीरास आले. चमेली भरपूर. नाव चालेना. यास्तव पाट्यावर दोन चार मुक्काम होते. नंतर पार उतरून कोट्यास हवेलींत दाखल झाले. कांहीं एक विसांवा खाऊन दोन प्रहरचे अमलांत शामराव यांचे वाड्यावर शें-दोनशें लोकांनिशीं चाल करून गेले. वाड्यांत येऊन दरवाजे लाविले. शामराव यांची माडी चढून गेले. तों शामराव यांणीं चौफाळ्यावर निद्रा केली होती. त्यांजला पाहून उठून बसले. जुंजरनेक शामराव यांची मांडी दाबून बसला होता. ते नागवी तरवार हातीं पाहून शामराव बोलूं लागला कीं, तुझें मनांत जें असेल तें कर. त्या संधीस शामराव यांजकडील खिजमतगार कौलांवर चढून शेजारियाचे वाड्यांत उडी टाकून राजा जालमसिंग यांजपाशीं धांवत गेला. वर्तमान झालें तें सांगितलें. मग जालमसिंगानें भाईबेटे

---

(९५) बयाद लावणें – सबबी सांगण. **साहेब** – स्वतः जुंजरनेक. **शकटभेद** – फितूर. **गंगाजळ व कुराण** – हिंदु होते त्यांनीं गंगाजळ घेऊन शपथ केली, व मुसलमान होते त्यांनीं हातीं कुराण घेऊन शपथ घेतली.

(९६) भरपूर – पूर आलेली, पुरानें भरून चाललेली. **चौफाळा** – झोपाळा. **मांडी दाबून बसला होता** – उठून उभे राहतां येऊं नये म्हणून मांडीवर गुडघा देऊन बसला होता. **जालमसिंग** – हा कोट्याच्या राज्याचा कारभारी. **भाई बेटे** – जीवाचे विश्वासू लढवय्ये शिपाई.

पाठविले. तों हवेलीचा दरवाजा बंद. मग शिड्या लावून हवेलींत उतरून शामराव व फिरंगी होता तेथें पावले. सर्व दृष्टीनें पाहून फिरंग्याचा हात धरून एकीकडे केलें. तलवार हिसकून घेतली. प्रतिष्ठेनें धरून जालमसिंगाकडे नेत होते. तों तेथून आज्ञा आली कीं, हवेलींत नेऊन कैद करणें. आणि सरंजाम सर्व लुटून घेऊन शामराव माहडीक यांजकडे पावता करणें. त्याजवरून जालमसिंगाचे आज्ञे-प्रमाणें त्यांचे लोकांनीं हवेलीवर चौक्या बसवून त्यांचें बराबरचे लोकांचीं हत्यारें घेऊन, शहराबाहेर काहाडून दिल्हें. कंपूचें वर्तमान समजलें कीं, साहेबांनीं शामराव धरून कैद केला. कंपूंत चार होरांचे चार चोरांचे होतेच, जे साहेबांचें साधन ठेऊन होते त्यांनीं खुषी मानली. उभयतां कारकून हवालदील जाले, वास्तविक वर्तमान (न) समजल्यामुळें मुजरत हलकारे जोडी रवाना केली. ती जोडी प्रहर रात्रीनंतर नदी उतरून हवेलींत गेले. पत्रें पाहून हलकारे यांस इनाम देऊन त्या वेळेस जाबसाल लिहून पदमसींचे गुमस्त्याकडून खर्चाची बेगमीची चिठ्ठी घेऊन दुसरे हलकारे रवाना केले. ते सूर्योदय झाल्यावर दुसरे दिवशीं घटिका दिवसास दाखल झाले. पत्रें पाहून दीलजमाई होऊन कंपूवाले कुमेदान अवघे बोलावून पत्रें वाचून दाखविलीं आणि साखरा वाटल्या. खर्चीची चिठ्ठी शहरांत सावकाराचे तेथें पाठवून सही केली. ऐवज आणून ताबडतोब वांटणी सुरू करून दो महिन्यांत अवघा फडशा केला. वीस रोजहि आगाऊ दिल्हे. भाद्रपदमासीं शामराव कोटयाहून निघून ताल्हेड्याचे मुक्कामीं कंपूंत येऊन सरंजाम सर्व अवलोकन केला. पंधरा दिवस तेथें मुक्काम होता. तेथून कूच करून शिंगोळीचा घांट उतरून खालीं आले. मार्गे जुंजरनेकास लालाजी बल्लाळ व राजे जामलसिंग यांनीं बहुतच फजीत केलें

---

(९६) **प्रतिष्ठेनें** – मुसक्या न आवळता सरदारास शोभेल अशा रीतीनें. **कंपूंत चार होरांचे चार चोरांचे होतेच** – कंपूत कांहीं या बाजूचे तर कांहीं त्या बाजूचे असे होतेच. जे **साहेबांचें साधन ठेवून होते त्यांनीं खुषी मानली** – जे लोक जुंजरनेकाशीं संधान ठेवून होते त्यांना जुंजरनेकानें शामरावास कैद केली या वार्तेनें आनंद झाला. **उभयता कारकून** – मागच्या परिच्छेदांत उल्लेखिलेले कृष्णा लक्ष्मण व बाळाजी रघुनाथ. **वास्तविक** – खरें, सत्य. **मुजरत** – ताबडतोब. **हलकारे जोडी** – हल-कऱ्यांची जोडी. **खर्चीची चिठ्ठी सही केली** – सावकारास खर्ची देण्याविषयींची चिठ्ठी देऊन ती सावकाराकडून मान्य करविली. **सही** – बहाल, खरें, बरोबर असा अर्थ फार्शी कोशांत पटवर्धन देतात. **वीस रोजहि आगाऊ दिले** – पुढील महिन्यांतील वीस दिवसांचा पगारहि आगाऊ दिला.

कीं, " तुम्हांस बोलाविलें कशास आणि तुम्ही केलें काय ? तुमचें व शामराव यांचें मेळ करून देऊं हरामखोरीचा डाग तुम्हांकडे न लागतां महाराजांची भेट घेऊन तुम्हांस निरोप देववावा, अशाकरितां तुम्हांस बोलाविलें. तें आमचें आम्हां-पाशीं राहून तुम्ही आपली अवखाद बाहेर काढून हरामखोरीचा मदसद परिधान केला. तुम्हांस महाराजांपाशीं पावतें करावें, परंतु आम्ही रजपूत आमचे इराद्यास खामी येती. बाकी तुम्ही आपल्याकडून कसर केली नाहीं." या भावीं दोष पदरीं देऊन रामपुऱ्यास रवाना करून त्याचे माथा आसान केलें. माहडीक कंपू घेऊन माळव्यांत आले. यजमानांचीं पत्रें, रात्रीचा दिवस करून यावें, प्रसंग अडचणीचा, म्हणून लिहीत गेले. इकडून लिहीत गेले कीं, आम्ही आल्या-शिवाय लढाईचा मुकाबला करूं नये. परंतु होणार भविष्य. आश्विन शुद्ध अष्टमीस लढाई शिकस्त जाली. पुढें जांबेच्या मुक्कामीं फौज समेटून नवलाईवर आले. तेथून माहडीक कंपूसुद्धां सामल झाला. पुन्हा कंपूसुद्धां खासरोदेस येऊन आणखी चार रुपये घेऊन रतलाबेस आले. तेथील तसनस करून मागती खासरोदेकडेच आले, तों सरजेराव घाटगे व पेंढारी वगैरे यांचा मुक्काम उज्जनीस होता. महाराजांनीं गजा कुंवर कामास येऊन (?) कृष्णाजी माहडीक यांजबरोबर सरमजास देऊन इंदूरचा बंदो-बस्त करावयास रवाना केले. तों शिंद्याकडील पेंढारी व फौज येऊन आश्विन वद्य चतुर्थीचे दिवशीं लढाई जाली. गजा कुंवर कामास येऊन कृष्णाजी माहडीक याजला जखमा आल्या. शिकस्त होऊन पेंढारी यांनीं इंदूर जाळून निघून गेले. कांहीं वस्ती जुने इंदुरास मात्र राहिली. हें वर्तमान स्वारींत येतांच कंपूसुद्धां इंदूरचे मुक्कामीं कार्तिकमाशी आले. शहर बेचिराख, तेव्हां लोकांस दिलदिलासा देऊन बंदोबस्त केला. नजीक इंदूर येथें मुक्काम होता.

(९७) तों काशीराव होळकर पुण्याहून निघून दरकूच देवाशास आले. (त्यांनीं) तेथून पांडुरंग शंकर व आनंदराव माधव निसबत बुळे उभयतांस खर्चाचे अडचणीमुळें महाराजांकडे पाठविले. उभयतांच्या भेटी जाहल्यावर पांडु-

---

(९६) अवखाद – अवकात, जोर, शक्ति. **मदसद** – मुखवटा. **इरादा** – बाणा. **खामी** – कमीपणा. **घेऊन** – ' देऊन ' असें पाहिजे. **आसान** – मूळ शब्द ' येसान ' म्हणजे यहासन असा असला पाहिजे. **यहसान** – कृपा, उपकार. **लढाई शिकस्त जाली** – लढाईंत पराभव झाला. **शिकस्त** – पराभव. **समेटून** – गोळा करून. **तसनस** – लुटालूट. **दिलदिलासा** – धीर, भरंवसा.

(९७) उभयतांच्या भेटी झाल्यावर – जाहल्यावर या शब्दापासून पुढें मनांत वागून या शब्दापर्यंत स्वतंत्र क्लॉज आहे. ' जाहल्यावर यांचा सत्कार केला. ' असें

रंग शंकर यांणीं तुकोजी होळकर गादीचे मालक जाल्यावर पूर्वीच्या खटल्याचे दिवाण हे; यांणीं विठोबा व यशवंराव होळकर व काशीराव होळकर याजला, रखमाबाई होळकर सुभेदारांची स्त्री इची जलाली फार मोठी, तेव्हां सुभेदार यांनीं त्रिवर्गाची सोय पांडुरंग शंकर यांस करून प्रगणें कायथें पूर्वी मोठे सुभेदार यांणीं तुकोजी होळकर सुभेदार यांस जाहगीर लावून दिल्ही होती, तो महाल सदरहू अन्वयें यांचे खर्चास लावून देऊन, काशीरायाचे नांवें सरदारीचा सरळ शिक्का कायम ठेवून, मशारनिल्हे यांणीं बाईच्या जरबेंत त्रिवर्ग मांजराचें पिलासारिखें पोटाशीं धरून, लहानाचे मोठे करून, नांवारूपास आणिलें. ती क्रिया महाराजांचे मनांत वागून यांचा सत्कार केला. यांचे समोर हुक्का पिऊ नये, गैरशिस्त भाषणें करूं नये, याप्रमाणें वहिवाट घातली. यांचे सांगितल्याप्रमाणें काशीराव होळकर यांजला खर्चास पाठवून महेश्वरीं दाखल जाहले. जालें वर्तमान फौजेंत आलियावर यांचे भेटीस महाराज सडे महेश्वरीं गेले. फौजेंत माहडीक होते. खांसे महेश्वरीं जाऊन बाईसाहेबांचे छत्रीपाशीं उभयतांच्या भेटी जाहल्या. उभयतांहि श्रमी जहाले. नंतर बाळासाहेब व महाराज किल्यांत आले. सलामीच्या तोफा जहाल्या. भोजन इत्यादिक न होतां महाराज निघून विठोबाचे देवळीं बाड होतें तेथें गेले.

(९८) दुसरे दिवशीं नर्मदेचे दक्षिण तीरास गोपाळराव चिटणीस दहा हजार फौज व चार पलटणें घेऊन आले. तेव्हां काशीराव होळकर यांजकडील सरंजाम महेश्वरीं होता त्याच्या मुकाबल्यास खुशालसिंग जाधव व हरजी काळगावडा पार उतरले. वासक शिद्दी जमादार दोन हजार मनुष्य याजप्रमाणें पार उतरून मुकाबला गोपाळरायाशीं जाला. लढाई सुरू होऊन तरवारीशीं गांठ पडली. ईश्वर सत्तेनें गोपाळरायाचे पाय उधळले. तो शिद्दी कांहीं ज्वारीच्या शेतांत व कांहीं नाल्यांत. हें गोपाळरायास ठाऊक नाहीं. इकडील फौजेनें त्याजवर घाला घातला. त्यांनीं दोन तीन तासेरे दिल्हे. त्यानें गोपाळराव यांची खराबी फार झाली. मग

---

(९७) आधीं वाचावें व मग पांडुरंग शंकराच्या माहितीचा परिच्छेद वाचावा. **पूर्वीच्या खटल्याचे** – तुकोजी होळकराच्या पहिल्या कुटुंबाच्या संसाराकडे दिवाणगिरीचें काम करण्यासाठीं पांडुरंग शंकर होते. **जलाली** – तामसी वृत्ति. तुकोजी होळकराची बायको रखमाबाई अत्यंत कजाग व दुष्ट असल्यामुळें तिचें मुलाशींहि बिलकूल पटत नव्हतें. **ती क्रिया** – ती बजावलेली कामगिरी. **जाले** – ' आले ' असें पाहिजे. अर्थात् काशीराव. **उभयताहि श्रमी जहाले** – दोघांनाहि फार वाईट वाटले. **बाड** – जनानखाना, कुटुंबकबिला.

(९८) **शिद्दी** – सिंधी असेंहि होईल.

हरनाथ याचे बरोबर चार पलटणें देऊन पार उतरून अंबाजी खंडेराव याजकडे सुभ्याचें काम सांगितलें. तेहि पार उतरले. दुसरी लढाई मुळठाणचे आसपास अडचणींत प्रसंग पडला. इकडील पलटणांत गोरा होता त्यानें नाल्याचें अवसान न पाहतां एक तोफ व चार कंपन्या घेऊन कोणास न पुसतां त्यांचे स्वार वाहडले होते त्यांजवर गेले. मारीत चालला. त्या स्वारांनीं पाठीवर घेऊन कंपन्या पावेतों तोफा खोऱ्यांत येतांच स्वार सरंजाम एकीकडे होऊन त्यांचीं पलटणें खोऱ्याचे वर होतीं त्यांचा व कंपन्याचा मुकाबला पडला. तेव्हां त्यांनीं त्यांची चाळीस तोफ उमाटयावर हे बदखलींत, इकडील स्वारांकडील मदत तोफांच्या माऱ्यास्तव न जाल्यामुळें चार कंपण्या पावेतों फौज मारली गेली. गोपाळराव यांस बऱ्हाणपुराहून शिंदे यांचें बोलावणें आल्यामुळें तिकडे गेले. हेहि महेश्वरास आले.

(९९) उभयतां बंधूंचें खलबत जालें. त्यांत हांशील कारभाऱ्यांनीं मजला सुख फार दिलेंहे. त्यांचें उसनें (झालें) म्हणजे माझा संतोष होईल. तेव्हां यशवंतराव महाराज यांनीं दूरादेश पाहून विचार केला कीं, वडिलांनीं आज्ञा केली हा याचा जातीस्वभाव. ब्राह्मण टाकून काय मिळणें हें आपल्यास ठाऊकच आहे. परंतु फौजेचा पसारा मोठा. त्यांत इंदुरच्या शिकस्तीपासून फौज हवालदील. पैक्या वांचून यांची दीलजमाई होत नाहीं. यास्तव मुत्सद्दी लोक कैद करून पैक्याची तोड करावी यांत फौजेस आधार वाटून वडिलांचाहि संतोष होईल. असा मनसोबा सिद्ध करून खंडो महादेव व दिवाणाकडील कृष्णराव भाऊ व श्रीपतराव व रामराव व आबाजी व पाराजी पंत व सखाराम जगजीवन व दिनकरराव पागनीस व दाजी मुनसी व स्वारींतील बाळाजी कृष्ण फडणीस इतक्या असाम्यास कैद करून (आणिल्या) आज्ञेस उजूर सखाराम जगजीवन व दिनकरराव पागनीस

---

(९८) **वाहडले होते** – वाहडून पुढें आले होते. **खोऱ्यांत** – खोलगट जागेंत. **उमाट्यावर** – उंच जागेवर, टेकडीवर. **बदखलींत** – खोल नाल्यांत.

(९९) **यशवंतराव यानें विचार केला कीं, वडिलांनीं आज्ञा केली हा यांचा जातीस्वभाव** – यशवंतरावानें मनांत विचार केला कीं, काशीरावानें हुकूम केला. तो वयानें वडिलच आहे. आणि शिवाय वाटेल तसे अविचाराचे हुकूम देणें हाहि त्याचा जातिस्वभावच आहे. तेव्हां तो मानण्याचें कारण नाहीं. **ब्राह्मण टाकून काय मिळणें** – कारभारी ब्राह्मण आहे त्यांस काढून टाकण्यानें कांहीं एक फायदा होणार नाहीं. उलट नुकसानच होईल. किंवा " ब्राह्मण ठोकून काय मिळणें " असाहि पाठ शोभेल. व तोच पुढील हकीकतीशीं शोभणार आहे. ब्राह्मण मुत्सद्यास तसदी करून फारसा पैसा मिळणार नाहीं असें यशवंतरावाचें मत. **उजूर** – विलंब, विरोध.

यांनीं रदबदल्या विशेष केल्यामुळें यातना फार जाल्या. खंडो महादेव व आबाजी पळसीकर यांनीं आज्ञेप्रमाणें, उजूर न करितां, चिट्या लिहून दिल्ह्या. पांच पन्नास लाखांचा तोदा करून वसुलास गुलाबीखां निसबत मीरखां सरकारपैकीं दयाराम जमादार, यांजला ठेऊन, व बाड महेश्वरीं विठोबाचे देवालयापुढील बंगल्यांत ठेऊन जातीनें इंदूर मुक्कामीं फौजेंत आले. लोकांस दम दिल्हा. पांच पंचवीस लाख रुपये तयार केले आहेत. वसुलास गुलाबीखां व दयाराम जमादार ठेविले आहेत. दो चौ महिन्यांत ऐवज वसूल होतो तोंपर्यंत आपण रजवाड्याकडून घास दाणा करूं.

(१००) अशा हमराईनें इंदूर मुक्कामींहून कूच केलें. ते तलावे करून पिंपळोद्यास आले. तों शामराव माहडीक केवळ प्रायोपवेशनीं यांनीं अडचणींचा प्रसंग पाहून मागें बाळोजी इंगळे पंचवीस हजार फौज व पांच पलटणें घेऊन होतेच. यास्तव माहडीक तसेंच पालखींत घालून बनाता गुंडाळून बाहेर काहाडिले. वाटेंतच त्यांचा प्राण गेला. मुक्कामीं जाऊन दहन करून प्रातःकाळीं कूच करून प्रतापगडावरून मेवाडांत होऊन पुष्कराचे स्थान बुंदीकोटें एकीकडे सोडून सिऊर अष्ट्याचे सुमारें हार्दे हांड्याचे घाटें उतरून नेमाडांत येऊन महेश्वरीं (आले.) तेथेंहि दम न खातां भारमल होळकर जावडाचावडीच्या मुक्कामीं भेटून, मनांत विचार केला, यांजला देशाचे मोहिमीस जाणें, काशीराव तेथें राहिल्यास आपले जिवास घोर केला, तसें यांचेबरावर रवाना करावें. काशीराव होळकर यांच्या कड्या विकड्या आचार विचाराच्या गोष्टी सांगितल्या. तों पावेतों काशीरायाविशीं महाराजांच्या मनांत विकल्प नव्हता. भारमल्लाच्या गोष्टी ऐकून मनांत विकल्पाचे पर्वत येऊन उष्ण काळाचे दिवस, मेवाडचा उबाळा, काशीराव होळकर यांचा पुत्र लहान, हें कांहीं न पाहतां बोलावयास कोणी नाहीं, दाबून बोलावयाजोगें मनुष्य पांडुरंग शंकर त्याचाहि काळ महेश्वरीं जाला, चिमणाजी कृष्ण याजला पाठवून तेच दिवशीं महेश्वरीहून जावडाचावडीस खरगोणेस (आले.) तेथें कंपू व नागो जिवाजी फौजसुद्धां धारेचे जिल्ह्यांत होते त्यांजला आणावयास कोण पाठवावें, ते

---

(९९) आज्ञेस हुजूर – अमुक इतका पैसा द्या, असा जो हुकूम फर्मावण्यांत आला त्याप्रमाणें वागण्यास केलेली दिरंगाई. **तोदा** – Compromise, adjustment, settlement (wilson). **दम देणें** – धीर देणें, आश्वासन देणें.

(१००) तलावे – तलावे तर नव्हे ? **तलावा** – टेहळणी, ज्याच्यावर स्वारी करावयाची त्या ठिकाणची किंवा मुलुखाची टेहळणी. **प्रायोपवेशनीं** – मरणोन्मुख. **तसे** – म्हणून. **कड्या विकड्या** – वेड्यावाकड्या, अनर्गल. **विकल्पाचे पर्वत येऊन** – अतिशय संशय उत्पन्न होऊन. **उबाळा** – उन्हाळा, उष्मा.

नर्मदा उतरले म्हणजे आपण घांट उतरावयाकरितां मुक्काम होते ते नर्मदा उतरल्यावर हे कूच करून सेदव्यानजीक मुक्काम केला. खरगोणचे मुक्कामीं सवड पडल्यावर काशीराव होळकर यांनीं भिकाजी होळकर सेदव्यांत होते त्याशीं संधान बांधून सेदव्यानजीक मुक्कामींहून निघून सेदव्यास गेले. हें वर्तमान कळल्यावर उपलाणी घोड्यावर बसून तेथें आले. जामदारखाना सांभाळावा तों दो लक्षाचें कापड हातीं लागलें. बाकी त्याचेबराबर मंडळी होती ती मल्हारराव रामचंद्र फडणीस आदि करून त्यांस बोलावून विचारलें कीं, बाळासाहेब कसे गेले ? मंडळीनें उत्तर केलें कीं, आम्हांस ठाऊक नाहीं. आपण आला तेव्हां (तेव्हांच) समजलें. मग बोललें कीं, "त्यांच्या करण्याच्या चाली माझ्या ध्यानांत आहेत. त्यांनीं केलें तें उत्तमच केलें. माझे प्रालब्ध माझेबराबरच आहे. तुम्हांस जावयाचें कीं राहावयाचें ? राहावयाचें असल्यास येथें बाळासाहेबांवेगळें काय आहे ? परंतु गांड घोड्याची मेहनत, डोकें हातावर, मिळेल ते दिवशीं खावें, नाहीं ते दिवशीं उपास करावा, हें तुमच्यानें होणार नाहीं. लेंकरें आहांत. बाळासाहेब दौलतीचे मालक. तुम्ही दरबारचे मालक. तुम्हीं त्यांजपाशींच असावें. तुमचीच मंडळीं मजबराबर आहे. जी माझी गत तीच त्यांची गत. चांगलें झाल्यास तुमचेच आहेत, वाईट झाल्यास तुमचे तुम्ही कायमच आहां. दौलत सांभाळालच." यांनीं उत्तर केलें, आज्ञा होईल तसें करूं. असें बोलून गोटांत आले. मल्हारराव रामचंद्र आपले राहुटीस गेले. बाळाजी कृष्ण यांजकडून महाराजांबराबर होते त्यांचेहि मानस असें आलें कीं, काशीराव होळकर मालक यांजपाशीं आपण असावें. तेव्हां आग्रह करून अर्थ नाहीं. मग कूच होऊन घांट उतरावयास गेले ते समयीं फडणिसांसह कारकून मंडळी हजर जाली. विनंती केली कीं, आम्हांस आज्ञा काय आहे ? महाराजांनीं श्रवण करून साहेब नौबत-शिक्के-कटार-बिछीना व आंगावरील पोषाक राहिला

(१००) **उपलाणी** – खोगीर वगैरेहि न घालता. भावार्थ अत्यंत त्वरेनें. **करण्याच्या चाली** – कपटी वर्तणूक. **येथें बाळासाहेबावेगळे काय आहे** – बाळासाहेबासारखेंच आहे. त्यांनीं चालविलें तसेंच तुमचे मी चालवीन. **गांड घोड्याची मेहनत इ०** – माझ्याबरोबर सड्या स्वारींत धावण्याची सारखी मेहनत तुम्हास पडेल. घोड्याचा खरारा स्वतः करावा लागेल. (मोतत्दार किंवा महारपोरगा शिलेदाराबरोबर सड्या स्वारींत असत नाहीं.) हाताची उशी करून त्यावर झोपण्याची पाळी येईल. **तुम्हीं दरबारचे मालक** – तुम्ही लढाऊ लोक नव्हेत. दरबारांत मुत्सद्याचीं कामें करणारे बिनलढाऊ लोक. **लेकरें आहात** – लढाईच्या मामल्याला अज्ञान आहात. **बिछीना** – बिछोना तर नव्हे. बिछौना–बिछाना.

होता तो याचेबरोबर इतका सरंजाम देऊन पन्नास स्वार दिल्हे. किल्ल्यापासून पांच कोशावर यांजला सोडून माघारे यावे असे सांगून रवाना करून आपण घांट उतरावयास गेले. व लष्करांत धारण रुपयाचे दोन शेर पीठ, खर्चाची अडचण रहात चालली. तथापि हिमतीचा पुरुष, भाग्यशाली. घांट उतरून थालनेर महाल बमय किल्ला भिकाजी होळकरास जहागीर (होता.) तीन दिवसांत किल्ला खालीं करून घेऊन, दरकूच जाऊन जामपूर मोराण्यास छावणी केली. तेथें कंपू व नागो जिवाजी येऊन सामल झाले. तेथील मुक्कामींहून भाद्रपदमासें सन १२१२ ते सालीं कूच करून जनस्थानास वद्य एकादशीस स्वारी दाखल जाली. तेथून बाडाबरोबर सरमजाम देऊन चांदवडास रवाना केले. काशीराव होळकरास भेटून इंदूर मुक्कामीं फौजेंत जावयाचे समयीं फत्तेसिंगराव माने यांजबरोबर फौज व महाराज कंपू फुलण (साहेबाचा) कंपू देऊन देशास रवाना करून, समागमें रामराव आबाजी पळशीकर यांजकडे पैका ठरला होता तो वसूल करावा सबब बरोबर दिल्हा. खंडो महादेव व सखाराम जगजीवन व मल्हार दाजी निसबत दादाजी गंगाधर हे दरकूच गाळण्याचे किल्ल्यांत टाकिले. माने खानदेशांत उतरल्यावर श्रीमंताकडील सुभा धोंडोपंत गोडबोले दहा हजार फौज व पन्नास तोफा होत्या त्यांची व मान्याची लढाई होऊन धोंडोपंत लुटून घेतले. ते पुढें मोहऱ्यावर होतेच. गणपत नारायण दिवाण हे काशिराम होळकराकडून फौज घेऊन खानदेशांत होते त्यांजबराबर सरमजाम बंगस पठाण व हयाद अलीखां व आचमसिंग पुरवय्या, दोन बेडे तीन हजार स्वाराचे, बाकी किरकोळ सिलेदार पागा हे फौजेंत फौज मिळवून उभयतां बेडेवाल्यांची खातरतसलीम करून साहेब नौबद देऊन हमराहा केला. गणपतराव नारायण दिवाण यांजकडून कारकून दिवाणगिरींचें काम करीतच होते, त्या कामावर ते मालक ठेऊन त्यांजकडे सोप झाली. मग जनस्थानी चार रुपये घेऊन, दरकूच आळेखिंडीस आले.

(१०१) इकडे यशवंतराव होळकर घांट उतरल्यावर श्रीमंतांस मसलत पडून श्रीमंतांनीं शिंदे यांसी लिहिलें त्याजवरून त्यांनीं सदाशिवराव सुभे पन्नास हजार फौज व एक कंपू समागमें देऊन पुण्यास रवाना केले होते, ते त्यांचे अगोदर पुण्यास दाखल झाले होते, महाराज आळेखिंडीस जाऊन मीरखां नवाब कांहीं सरंजाम घेऊन, जुन्नराकडे गेले. तिकडे शिंद्याकडील फौज पलटणें होतीं. लढाई

---

(१००) व – हा शब्द येथें निरर्थक आहे. **बमय किल्ला** – किल्ल्यासह. **जनस्थान** – नाशिक. **बेडा** – बेहडा, दस्ता. **ते** – यशवंतराव.

(१०१) मसलत पडणें – संकट उभे रहाणें. **सुभा** – सेनापति.

होऊन नबाब स्वारीचा रोख धरून आळेखिंडीस आले. सोबत्याकडील फौज पाठलाग करून खिंडीवर आले. इकडून महाराज सडा सरमजाम घेऊन त्यांचे मुकाबल्यास आले. आश्विन शुद्ध ८ मीस लढाई झाली. पलटणें मागें हटलीं. स्वारीचा कूच होऊन जेजोरीस आले. देवदर्शन होऊन पुण्यानजीक वानवडीचे अलीकडे पांच कोस हडपसरावर फौजेचा मुक्काम झाला. कंपू दोन कोश पुढें वाढवून राहिले. श्रीमंतांपाशीं वकील पाराशर दादाजी व गोपाळराव गानू खासगीवाले होते. पेशजी जामपूर मोराण्याचे मुक्कामीं स्वारी असतां श्रीमंताकडील वकील बोलण्यास आले होते. त्यांत हांसल, तुम्ही सरकार पदरचे सरदार, व तुमचे वडिलां-वडिलीं दौलतीस जपणें कसें हें माहीत असतां तुम्ही लाखों फौजा घेऊन स्वदेश खानदेशांत श्रीमंतांचे महालापासून लाखों रुपये घेऊन लुटीत जाळीत (आलां) यांतील अर्थ काय? तुमचा मनोधर्म समजला पाहिजे. यापूर्वीं सवाई मल्हारराव मारले गेल्यावर यशवंतराव नागपुराकडे गेले. विठोजी होळकर पंढरपुराकडे गेले. त्यांनीं कांहीं जमियत करून दंगा आरंभिला. तों पुण्यास कारभारी बाळोजी कुंजीर होते त्यांनीं फौज पाठवून विठोजी होळकर याजला हस्तगत करून पुणें मुक्कामीं आणून हत्तीचे पायीं मारून टाकिले. हा द्वेष महाराजांचे मनांत. मग जामपूर मोराण्याचे मुक्कामीं सदर्हू अन्वयें प्रश्न केल्यावर यांनीं उत्तर केलें कीं, "श्रीमंत आमचे धणी, इष्ट आराध्य. आम्ही सेवक लोक. चाकरी झाली न झाली हें कैलासवासी वडिलांस ठाऊक. व श्रीमंतांचे ध्मानांत. परंतु आमचे ऐकिण्यांत कैलासवासी खंडेराव होळकर व माळराव व सवाई मल्हारराव होळकर आम्हां पावेतों कसकशा अनावळया श्रीमंताच्या राज्यांत केल्या कीं, ज्यांत लाखों रुपये नुकसान व स्वाधिन होण्यास फौज खर्ची लाखोंच लागलें. परंतु हस्तगत केल्यावर अवघ्या गोष्टीचा बंदोबस्त करून हजारों रुपये सरबरा खर्ची देऊन जेथील तेथें पावतेच करीत आले. विठोजी होळकर यांजकडून स्वामींची अवज्ञा अथवा अरावळी तादृश केली नव्हती. तथापि वाळकाचे चोरीस बुक्यांचा मार. आपण धनी, पदरचे माणसास अमार्गाचे मार्गास लावावे यास्तव शिक्षा अन्यायासारखी क्रोध वश्य? आपले मनांत आलें. यशहि आलें असतां आमचे भाऊ बराबरीचे शिंदे, विंचूरकर, नारो शंकर वगैरे बरोबरीचे त्यांवरहि प्रसंग पडले तेथं मल्हारजी होळकर, तुकोजी होळकर

(१०१) सोबती – शिंदे. त्यांत हासल – त्यांतील मतलब असा. अनावळया – वाचनाची चूक. 'आनावळया' असें पाहिजे. मूळ शब्द आरवली किंवा आरावली असा आहे. आरवली – खोडी, दांडगाई. वाळक, वाळूक – काकडी. भावार्थ, वाळकाचे चोरीस बुक्कयांचा मार – क्षुल्लक अपराधास भलतीच मोठी शिक्षा.

यांनीं अन्यायाचें माफक करून घेतलें. वाजता वारा लागूं दिला नाहीं. श्रीमंतहि मान्य करीतच आले. आमचे प्रसंगीं आमचे भाऊ दालीबंद लहान मोठे एकानेंहि रदबदली न करितां रंगांत रंग मिळविला व स्वामींनींहि आदि पश्चात् विचार न पाहतां वाळकाचे चोरीवर प्राण घेतला. त्यास एक्या खेडयांत पाटील तरी गांवचा जमीनदार असतो, परंतु असामी, पांच पंचवीस बिघ्याचा खेडू त्याजवर जोर-जुलुम जाहला असतां बेरोम होऊन गांव जाळीत असतो, त्याचेंहि समाधान करून झाल्या गोष्टीचा बंदोबस्त होऊन जमिनीवर कायम करावा लागतो. तेव्हां आम्ही लहान मोठे आपले पायांपाशीं उभे राहणार, आमचे समाधान, शांतवन खावंदांनीं व बराबरीचे भाऊ यांनीं काय केलें ? असें बोलणें पडल्यावर (पेशव्याचे वकील) कायल होऊन आज्ञा घेऊन गेले.

(१०२) मग महाराज सदरीं लिहिल्याअन्वयें बाड चांदवडास ठेवून सडे हडपसर पावेतों आले. नंतर पाराजीपंतबावास पत्रें गेलीं. श्रीमंतास विनंती करावी कीं, " आम्हीं सरकार पदरचे, साहेब चाकरीस काया-वाचे मनःपूर्वक हजर. स्वामींचें दर्शन घेऊन बंधूचा अंदेशा व फौजा बाळगून परिश्रम करून करोडों रुपये देण्याचे पेंचांत (आलों) इत्यादि मुखेकडून गिरासीनें हे स्वामींचे चरणीं समर्पक करून, दुःखापासून वेगळे होऊन आज्ञा होईल ती चाकरी बजावूं. स्वामींचे पायाशीं दुसरा अर्थ कांहीं एक नाहीं. आम्हीं उभयतां शिंदे, होळकर आमचीं जीं वाकडीं असतील तीं आपसांत समजून तमाशा आपण पाहवा. " या भावीं बोलणीं

---

(१०१) **अन्यायाचे माफक करून घेतले** – अन्याय माफ केले. **दालीबंद-दाली** – तरवार अडकवण्याचा पट्टा. त्यावरून भावार्थ तलवारबहाद्दर. **रंगांत रंग मिळविला** – श्रीमंताची मर्जी पाहून त्याप्रमाणें होस हो केलें. **पांच पंचवीस बिघ्याचा खेडू** – पांच पंचवीस बिघे जमीन कसणारा कुणबी. **कुणबी** – शेतकरी. **जोरजुलूम** – जुलूम. **बेरोम** – मूळ शब्द ' बेहरम ' रुष्ट किंवा साशंक. **कायल** – निरुत्तर.

(१०२) **घेऊन** – घेऊं. **बंधुचा आन्देशा** – बंधूला मारले तसे मला माराल कीं काय हा संशय मनांत येतो. **आन्देशा** – दुःख असाहि अर्थ होईल. **बाळगून** – बाळगल्या. **करून** – केलें. **इत्यादि मुखें कडून गिरासीनें हे** – भावार्थ श्रीमंतास कळवावें कीं, आम्ही तुमचे चाकरच आहों. निष्ठापूर्वक चाकरी करूं. स्वामीचें दर्शन घ्यावें ही इच्छा आहे. व बंधूच्या नाशाबद्दलचें दुःख निवेदन करावयाचें आहे. आम्ही फौजा पदरीं बाळगल्यामुळें आम्हांस करोडो रुपये कर्ज झालें आहे. तें श्रीमंतांनीं फेडावें म्हणजे पुन्हा निष्काळजी होऊन चाकरी बजावू.

उभयतां बोलले. परंतु श्रीमंतांस कांहीं एक विश्वास न पटतां श्रीमंतांनीं सरंजाम सदाशिवराव शिंद्यांकडील व सरकारचे विंचूरकर वगैरे फौज वानवडीस आली. इकडील कंपू पुढें होतेच. फत्तेसिंगराव माने फौज कंपूसुद्धां बरोलीस होते. त्यांनीं त्यांचे मुकाबल्यास जरीपटका व मानकरी पुरंधऱ्याचे बरोबर देऊन रवाना केले होते. त्यांची लढाई होऊन जरीपटका पुरंधरे सांपडले नाहींत. बाकी तोफा आणून फौज लुटून घेतली. मालोजीराव घोरपडे पाडाव करून आणले. फत्तेसिंगानें घोरपड्यांची उजूतबाजू उत्तम प्रकारची ठेवून जखमांचा जाबता करून वस्त्रें देऊन रवाना केलें. माने फौजसुद्धां बरोबरच होते. त्रयोदशीस रात्रौ लढाई नक्षा झाला.

(१०३) पुढें तिन्ही कंपूची लायन. कंपू शेजारी फत्तेसिंग माने. उजवे बाजूस मीरखान बाबा, मागें कंपूचे पाठीवर महाराज हुजुरात शिलेदार घेऊन उभे. चतुर्दशीस सूर्योदयीं लढाई सुरू जाहली. तोफा चालू जाहल्या. शिंद्यांकडील पलटणचा मार जबर पडला. फौज थिजली. हें पाहून, महाराज हुशार होऊन, कंपू मागें टाकून हुजुरात घेऊन घोडे तोफांवर घातले. महाराज उठले पाहून मागें डावे बाजूस माने होते त्यांनींहि अनीना उचलल्या. इकडील फौज मीरखान होता त्याजवर (शिंद्यांनीं) चाल केली. तों महाराजांनीं तोफखाना घेऊन शिंद्यांची फौज मीरखानावर उठली तिच्या पिछाकडून घोडे घातले. दुरोख अडचण पडल्यामुळें फौज लुटून घेतली. इकडे माने उठले होते त्यांचा मुकाबला विंचूरकर यांनीं चांगला केला. परंतु अवघ्या फौजेचा मार झाला तेव्हां त्यांनीं हवा पाहून एकीकडे जहाले. श्रीमंतांकडील जरीपटका घाशीरामाचें तलावावर उभा होता तो पळून शहरांत गेला. तोफा जाऊं पावल्या नाहींत. शिंद्यांचे तोफखान्यावर महाराजांनीं घोडे घातले तेथें छेऱ्याच्या जखमा झाल्या. लढाई फत्ते जाली. श्रीमंत माघारीं पर्वतीस गेले. सदाशिवराव परभारें निघोन (त्यांनीं) तगरचा किल्ला नजीक केला. श्रीमंत पर्वतीस एक घटका ठरून, धीर न निघे तेव्हां निघोन लोहगडाखालीं होऊन महाडास गेले. फत्तेसिंग माने व बाळाजी कृष्ण निसबत फडणीस उभयतां श्रीमंतीचे मागें पाठविले कीं, आपण जाऊं नये, पुण्यास यावें, यास्तव. परंतु त्यांणीं यांशीं गांठ पडूं

---

(१०२) बरोलीस – बारामतीस असें पाहिजे. कदाचित् हे 'बारशीस' या मोडीशब्दाचे अशुद्ध वाचनहि असूं शकेल. **उजूतवाजू ठेवणें** – मानमर्यादा, बडदास्त, प्रार्थना, समाचार घेणें. **जखमांचा जाबता करून** – जखमा वगैरे बांधवून.

(१०३) अनीन उचलणें – घोड्यास दवडण्याचा इशारा करणें. **अनीन** – लगाम. **पिछा करून** – पाठीमागून, पिछाडीकडून. **हवा पाहून** – रागरंग पाहून. **जखमा आल्या** – जखमा झाल्या.

न देतां निघून गेले. तेहि माघारे आले. मग फत्तेसिंगराव माने आपले फौजेसुद्धां पंढरपुराकडे रवाना करून आपण फौजसुद्धां पुण्यावर मुक्काम करून राहिले. मग जुन्नराहून अमृतरावसाहेब येऊन बाबासाहेब फडके व मोरोबा फणडीस असे तीन चार महिने पुण्यावरच होते. कांहीं राजकारण करावें असा बेत, परंतु श्रीमंतांनीं कंपनीसाहेब याचा आश्रय करून वसलीसाहेब पलटणें घेऊन पुण्याचे सुमारास आले.

(१०४) मग यशवंतराव होळकर यांनीं मनसोबाचें धोरण पाहून, अमृतराव साहेब वगैरे राजकारण तेथील तेथें सोडून, झाडून कूच करून फाल्गुन शुद्ध ४ स श्रीजेजोरीस जाऊन, श्रीमार्तंडाचें दर्शन घेऊन पारनेरचे मार्गें संगमनेरावरून बेलापूरचे मार्गें पुणतांब्यास आले. तेथें आठ पंधरा मुक्काम होऊन औरंगाबादेस आले. मार्गें फत्तेसिंग माने फितुरांत येऊन, सरकारचे दरखदार कारकून होते ते कद करून, फौज श्रीमंतांकडे घेऊन जाऊं अशा विचारांत, सरकारांतून फौजा दरोबस्त कहाडण्याकरितां कृष्णाजी लक्ष्मण माने यांस आणावयास पाठविलें. त्याजलाहि अटकेंत ठेविलें. हें वर्तमान माने यांचेबराबर स्वारींत पठाणाचे स्वार दाहा एक्यापैकीं होते त्यांजला समजून त्यांनीं आपसांत विचार केला कीं, हवा बदलून माघारां मान्या चालला आहे. आपले बेडयांत गेल्यावर मुस्तकीम होऊन आपला बस राहणार नाहीं. ते पक्षीं त्या ठिकाणींच याजला बसांत आणून कैद करावा आणि महाराजापाशीं घेऊन जावें. यासाठीं घडेल तसें घडो. असें बोलून मान्याची पालखी धरली. मान्या निजला होता. दहाजणांनीं घोडे सोडून भोयांचे खांद्यावरून पालखी उतरून कटीरा लावून बसले. त्यांचे बेडयापैकीं कोणीच नव्हते, यांनीं याजला घेऊन सरकारी सरमजाम मराठे पागा पठाण वगैरे एकत्र करून हुशार केलें. हें वर्तमान मान्याचे खासगत बेडेवाले कृष्णाजी लक्ष्मण व रावजी त्रिंबक यांजला घेऊन चालले होते त्यांजला हे वर्तमान समजल्यावर उभयतांस सोडून देऊन, मान्याची आशा सोडून, आपण निघून गेले. उभयतां ब्राह्मण जाब त्याबरोबर नाहींत. तथापि धण्याचें नांव घेऊन चालले. मार्गांत दहापांच एक दोन असे स्वार लुगारीचे भेटत गेले. तेच बराबर घेऊन, जमाव करून दिवस रात्र चालून मान्यास मिळविलें. मग फौजेची दिलजमाई करून, मान्याचे पायांत

---

(१०३) करून – केला.

(१०४) **एक्या पैकीं** – कुटांटले, विश्वासघातले. **हवा बदलून** – फितूर होऊन. **बसात आणून** – आवाक्यांत आणून. **उभयता ब्राह्मण** – उभयतां कारभारी. **जाबता** – सैन्य, टोळी. **लुगारीचे** – लुटालूट करणारे.

बेड्या घालून, पालखींत टाकून औरंगाबादचे मैदानांत महाराजांस सामल जाले. असेच मीरखां पंढरपुराकडे होता तो लुटीचे चालचीवर राहिला होता. पत्रें निकडीचीं गेलीं असतां त्यांचें येणें न होय. मग तात्या आळेकर याजला आणावयास रवाना केलें. कारण दुधानें पोळलेल्यावर ताक फुंकणें प्राप्त. मान्या मराठा, त्याजपासून हरामखोरी जाली. तेव्हां याचा भरंवसा तो काय? त्यामुळें पंत मशारनिले पाठवून त्याजला घेऊन आले. मागील प्रकार (नि) घोर जाल्यावर अवरंगाबादेपासून चार रुपये घेऊन फौजेसुद्धां कूच करून वेरुळाजवळ त्रिंबकेश्वरीं आले. पुढें घोडपेचे मार्गें चांदवडास येऊन बाड बराबर घेऊन कोपरेलीस तापीतीरीं आले. पुणें मुक्कामीं भोंसकल्याकडील वकील आले होते. ते निरोप घेऊन नागपुरास जाते-समयीं बोलण्यांत आलें कीं, खंडेराव होळकर बाया वगैरे मल्हार शामजीसुद्धां दौलतराव शिंदे याजपाशीं आहेत ते तुमचे तुम्हांकडे पाठवून तुमचा त्यांचा वडिलोपार्जित स्नेह चालत आला तसा सलोखा करून देऊं. ते नागपुरास गेले. भोंसले सरमजामसुद्धां वऱ्हाड प्रांतीं येऊन शिंदे (व) ते एके ठिकाणीं होते. त्या प्रसंगीं बोलण्याचे भाव शिंद्यांस दर्शवून नमूदास आणून महाराजास पत्रें पाठविलीं कीं, शिंदे यांशीं बोलून मजकूर नमूदास आणिला आहे. आपल्याकडील मुखत्यार बोलणार पाठवून द्यावा. त्याचें उत्तर लिहिलें कीं, " शिंदे आम्हीं भाऊ. त्यांचा आमचा सलूख तो काय? सलुख्याचे चालीचीं निदर्शनें होत गेलीं म्हणजे सलूख अर्थात् आहे. आमचें खटलें आम्हांपाशीं आलें म्हणजे सहजच सलूख. बाकी मूल येथें आलें अथवा तेथें असलें सारखेंच. आपण लिहिलें ते पक्षीं सदर्हू अन्वयें व्यवहार झाल्यानंतर कोणास पाठविणें ते पाठवून देऊं." नंतर जातांच शिंदे व भोंसले यांजवर वसलीसाहेब अमृतरावसाहेब घेऊन मुकाबल्यास आले. तेव्हां मसलत गालब झाली. यास्तव समेट होऊन एकदिली त्रिवर्गाची झालीयावर कठीण पडावयाचें नाहीं. या धोरणावर खंडेराव होळकर खटल्यासुद्धां शिंदे यांनीं रवाना केलें. ते नजीक खरगोण सन १२१३ चे सालीं येऊन दाखल जहाले. शिंदे आपण एकत्र होऊन पलटणें काढून टाकावीं ही गोष्ट कारभारी खंडो महादेव बाळाजी कृष्ण सर्वांचे मनास आली. महाराजांचा रुकार पडेना. मग सर्वांनीं हरनाथ याजला पुढें करून महाराजापाशीं बोलाविलें कीं, शिंदे भोंसले आपण एकत्र होऊन मसलत उचलली असतां आपलें नुकसान तें काय? याभावीं मनसोब्याचें धोरण

---

(१०४) **चालची** – लालूच. **आमचे खटले** – होळकरांचा वारस असलेला मुलगा जो शिंद्यानें स्वतःजवळ ठेवला होता तो. **मसलत गालब झाली** – गंभीर परिस्थिति निर्माण झाली.

धरून बहुतां प्रकारीं बोलला. खाशांनीं उत्तर केलें कीं, " तुजला वाटतें दौलत मी चालवितों. माझ्या भरंवशावर महाराज स्वस्थ आहेत. परंतु हरनाथ एक आणि एकुणपन्नास हरनाथाची करामत मी खेळवून तुझा पल्ला राखितों. तुझें भरंवशावर मी आहे (ही) गुमराई एकरूप मनांत न आणितां सांगितलें तितकें काम करून असावें. इतःपर बोललास तर कामास पडणार नाहीं." तेव्हां त्यासी असें जालें कीं, मी यांचा वेगळा कसा होऊं. तात्पर्य नासो कीं सुधरो वडिलांचे हातचीं माणसें होतीं. कोणाचेहि माथां भार न करितां सांगितलें काम ज्याचे त्याचे हातें घेऊन इतिकर्तव्यता आपली आपण करावी, भरंवसा व विश्वास आपला आपल्यास अशा धोरणावर प्रवृत्ति होती.

(१०५) खंडेराव होळकर खटल्यासुद्धां दाखल झाल्यावर पूर्व भाषणाचें निदर्शनार्थ मल्हार शामजी व माधवराव गोविंद आळेकर या उभयतांची रवानगी शिंद्यांकडे केली. आपण कूच करून भाद्रपद शुद्ध १४ स फौज नर्मदेचा घांट उतरून उत्तर तीरास मुक्काम जाला. जातीनें खासा स्वारी महेश्वरीं येऊन आठ दिवस मुक्काम होऊन कुटुंबासुद्धां कूच जहालें. ते उज्जनीनजीक दसरा करून मंदोसरावरून मेवाडांत शहापुरास स्वारी आली. दिपवाळी तेथें करून पुढें कूच होऊन फाल्गुनअखेर अजमिरावरून हरमाडास आले. तों दिल्लीहून पलटणें आलीं. हरमाड मुक्कामीं कांहीं कहीशीं गांठ पडली. कुटुंबें बरोबर यास्तव जोधपूरचे राजाशीं संधान लावून, त्यांचीं पत्रें आणून, तेथून कारकून पाठवून, बाड जोधपुरीं ठेवावें हा बेत करून, पुष्करास येऊन, खटलें खंडेराव होळकरसुद्धां कांहीं सरमजाम देऊन जोधपुरास रवाना केलें. आपण सडी स्वारी करून हाडोतींतून गंगराडेवरून मंदोसरास ज्येष्ठमासीं अखेरसालीं आले. तेथें एक महिना मुक्काम (झाला.) फिरंगी याजकडील पलटणें हरमड्याचे आसपासून गेलीं तीं नीट कोट्यास गेलीं. कोटेवाल्याची फौज व बापू शिंदे बराबर घेऊन दऱ्याचे मार्गानें उतरून, रामपुरा व हिंगळाजगडाखालीं वगैरे जप्ती बसवून गरोठेनजीक आले. हें वर्तमान मंदोसर मुक्कामीं समजतांच तेथें लोकांची दिलजमाई करून ज्येष्ठ वद्य अमावास्याचे दिवशीं पलटणावर चाल केली. अंतुरचे घाटे चर्मण्वती उतरून सडा घोडा राऊत ऐशी हजार स्वारांच्या भरंवशावर तवातोबरा बांधून अग्नीचा कल्होळ असा येऊन गरोठेहून दोन कोसांवर मुकाबला जाला. लढाई फार मातबर जाली. फिरंगी लढाई हरून मुकुंददऱ्याचे मार्गें निघाली. कोटेवाल्याची सरमजामाचीं माणसें फार करून कामास

---

(१०४) गुरमाई – गर्व. एकरूप – बिलकूल.

(१०५) चर्मवति – चर्मण्वति.

येऊन सरदार धरला. एक फिरंगी खांसा मुकत्यार वासत आलीखां बंगस यानें घोडा उठवून हत्तीवर मारला. वरकड गोरे व पलटणें, तोफा, डेरे जेथील तेथें राहून सडे निघाले. कोटेवाल्यानीं फिरंग्यास नाव देऊन चर्मण्वती पार उतरून दिल्हे. व मागाहून सडी स्वारी कोट्यास दाखल झाली. कोटेवाल्यावर महाराजांचा दांत. कारण फिरंग्यास सामल होऊन त्याजला काहडून दिल्हें. आम्हांस मुकुंद-दऱ्याचा दरवाजा लावून अटकाविलें. यावरून कोटे खोदून चमेलींत टाकावें हा इरादा. परंतु मसलतीचें धोरण सोडून इकडे गुंतल्यास फिरंग्यास सोहोलत पडेल, यास्तव कोटेवाल्याचा अन्याय पदरीं त्याचे घालून, कांहीं पैका घेऊन चर्मण्वती उतरले. तों बाजीराव बापूजी पदरचे शिलकी चाकर इंद्रगडी होते. लाखेरीचे डोंगराचे माहीतगार. त्यानें सरकार चाकरीवर लक्ष देऊन, भिल्ल जमा करून, जागजागीं नाकीं बांधून पटलणें फार करून लुटून ध्यावी, (असें केलें) आंगरखे व बंदुका गाड्यावर घालून आणले. बुंदीचे आसपास महाराजांस येऊन भेटला. मर्जी बहुतच प्रसन्न होऊन टोंक, रामपुरा, लाखेरी वगैरे मामले सांगितलें. यांजकडे फिरंग्याशीं गांठ बनास नदीवर श्रावण वद्य ४ स घालून झटपट तेथें बरीच जाली. माणसें किती मारलीं किती नदींत उड्या घालून गेले, त्याजवर घोडे घालून पाण्यांत मारले. त्या लढाईंत सरशी इंग्रजांचीच झाली. इकडील कंपूचा मालक माणखासिंग मारला जाऊन, तोफा त्यांनीं घेतल्या होत्या. परंतु महाराज भाग्यवान् व पराक्रमाची पराकाष्ठा, जातीनें तोफेवर येऊन, छेरे भरून, तोफा आपण चालवून शेंकडों माणसें मारलीं. नंतर घोड्यावर आपण स्वार (होऊन) घोडे घातले याप्रमाणें तीहि लढाई फत्ते करून पिच्छावर चालले. नदीस पाणी यामुळें तोफा उतरूं पावल्या नाहींत. सडा घोडा राऊत उतरून पाठलाग करून कंपू मागें टाकलें. तोफा पलटणास सावर न फावता किल्ले खुशालगड प्रांत धुंडाड जयपुरवाल्याची जागा त्यांत शिरले. बाहेरून महाराजांनीं घेरा घातला. फिरंग्यानीं ओझेंपाझें आसबाब होता तो तेथील तेथें टाकून सडे माणूस बुंदख घेऊन मागील रात्रीस निघाले. तों मुकाबल्यास चिमणाजी कृष्ण याचें पथक होतें. त्याजवर ताशेरा देऊन बाहेर पडले. ते आग्र्याचे मार्गें गेले. स्वारी महाराजांची श्रावण शु॥

---

(१०५) **सोहोलत पडणें** – सवड सांपडणें. **शिलकी चाकर** – जुने कदीम, विश्वासू चाकर. **आंगरखे व बंदुका गाड्यावर घालून आणले** – इंग्रजांच्या बंदुका व त्यांचे युनिफार्मस् इतके लुटले कीं, त्यांचे ढीग गाड्यावरून घालून आणावे लागले. **सावर** – अवसर, अवकाश, आश्रय. **आसबाब** – सामानसुमान. **बुंदख** – बंदुख असें पाहिजे.

९ स शिकरी फत्तेपुरास दाखल झाले. तेथें कांहीं शरीरास बेआरामी जाहली याजमुळें आठ रोज मुक्काम जाहला.

(१०६) फिरंग्याचीं पलटणें झडत पडत आग्र्यास गेलीं. मुख्य साहेब आग्र्याचे किल्ल्यांत होता. आठ दिवसांची सवड पडल्यांत लीकसाहेब कानपूरचे छावणींत जाऊन जमियत करून आग्र्यास आला. महाराज फत्तेपुराहून कूच करून मथुरेस आले. तेथें इंग्रजांकडील सरंजाम होता तो निघून आग्र्यास गेला. तेथून गणपतराव दिवाण, चिमणाजीपंत भाऊ उभयतां सरमजामसुद्धां आग्र्याचे सुमारास पुढें रवाना केले. त्याजवर लीकसाहेब यांनीं छापा दिल्हा. परंतु हेलपटण्यांत न येतां सांवरून उभे राहिले. हें वर्तमान मथुरेस येतांच खुद्द खाशांचें कूच होऊन फाऱ्याकडे येऊन लढाईचा प्रसंग भाद्रपद वद्य ३० स आरंभ जाला. तेथून पलटणें मथुरेचे मुक्कामास आलीं. फिरंग्याकडील पलटणें चार छापे आले. परंतु प्रथम छाप्यांत महाराजांखालीं घोडे एका मागें तीन पडले. शेवटीं खबुतरासारखा जमिनीवर लुबकला होता परंतु खेत सोडलें नाहीं. मग रघोजी होळकर यानें पुढें येऊन आपल्या घोड्यावर महाराजांस बसवून जबरदस्तीनें काहाडलें. पुढें छापे आणखींहि आले, परंतु यांचे हिशेबांत आले नाहींत. मथुरेचे आलीकडे मुक्काम जाला. पलटणें कूच करून दिल्लीकडे चाललीं. यांनींहि पाठलाग केला. मार्गांत लढाई होतच गेली. स्वारी कुतबशाचे कोटानजीक मुक्काम करून सोनपत पानिपतावर मुक्काम केला. पलटणें यमुना उतरून चाललीं. तेव्हां त्यांचे मागें स्वारीचें कूच होऊन शामलीचे गढींत पलटणें गेलीं. तेथें मुक्कामास आश्विन वद्य ११ स गेले. लढाया तेथेंहि जाल्या. कार्तिक शुद्ध १ स पलटणें निघून पुढें चालले. तेव्हां कूच होऊन कोशिस गेले. तेथें शमरूची बेगम होती. तिजकडे गुलामखांस पाठवून तिचे बोलणें जालें मी सामल होते. तीस हजार रुपये बेगमीनें खर्चास पाठवून आंतून फितुर कीं, पलटणें मागून यावी. पुढें बेगमीनें आडवें व्हावें, हें समजतांच कही गेली होती याजकरितां महिपतराव रामचंद्र याजला पांच हजार घोडा राऊत सरमजाम सडा मुक्कामावर ठेवून कार्तिक शुद्ध ७ स कूच सरकारांनीं केलें. ते मागोमाग पलटणें येऊन दाखल जालीं. महिपतराव रामचंद्र यांची व त्यांची पलटणवाल्यांची गांठ पडली. यांनीं पलटणाशीं पेंढारी काव्यानें लांडगेतोड करून दारूगोळा फिरंग्याचा बराच खराब केला. कही आली ती सांभाळून महाराजांपाशीं येऊन दाखल जाहले. तेथून सोहरभचे सुमारें हासगनावरून आले. पलटणें महू

(१०६) झडत पडत – पडतझडत, दुर्दशा होऊन. सवड पडल्यांत – सवड सांपडून. छापा देणें – छापा घालणें. खेत – रणक्षेत्र.

रामपुऱ्याकडे गेली. यांनीं हरनाथास कागद लिहून कंपू दिल्लीस रवाना केला. त्यांनीं दिल्लीस मोर्चे लावून लढाई सुरू केली. तों दिल्लीस आवई कीं, पलटणें येतात. या दबावानें महाराजांची ताकीद आली कीं, बहुत हुशारी राहून खटला संभाळून असावें. गाफलीनें गळफाटयांत आल्यास कामीं पडणार नाहीं. हीहानवत रजा जाहल्यावर हरनाथ कोणास न पुसतां मोर्च्यावर पलटणें होतीं तीं जेथील तेथें सोडून कंपूचें कूच करून गेले. ज्यास समजलें तो मुकाटयाच त्याचे मागें गेला. शिल्लेदार वगैरे मोर्च्याचे मदतीचे लोक तेहि राहिले. मागील प्रहर रात्र राहता सर्वांस समजलें कीं, हरनाथसिंग कूच करून गेला, मोर्च्यांत कंपूचे कारकून जगन्नाथ राजाराम व चिमाजी यशवंत व सखाराम सदाशिव होते. यांजला समजतांच विचार पडला. मग शिल्लेदारांत रामाजी शिंदे व आणखीहि चार नांवाचीं माणसें होतीं त्यांजपाशीं गेले. विचार पुढें कसा करावा ? मग रामाजी शिंदे यांनीं विचार केला कीं, हिंमत धरून गोष्ट सांगितली कीं, नक्षा बदनक्षा याचें पुसणें हरनाथ याजला पुसा. तो न पुसतां मोर्चे सोडून गेला तेव्हां आपण राहिल्यावर दिवस उगवतां फिरंग्यास समजल्यावर आपल्यास वाचूं कशास देतील ? यास्तव मोर्च्याचे जाल तेथील तेथें ठेवून तंबूर वगैरे कांहीं एक न वाजवितां तोफा काहाडून तुम्हीं कूच करून जावें आम्हीं कंपेश पांच हजार स्वार आहों. दिवस उगल्यावर या शहरचीं माणसें बाहेर निघतील यांची तांब्यातांबोटी करून तुमचे मागोमाग येऊं. अशी सल्ला ठरून, पलटणें तोफा मुकाटयानें काढून, सडा घोडा राऊत राहिला. पलटणे दोन अडीच कोस पोचलें तों सूर्योदय झाला. स्वारांनीं बुणगे मोर्च्याचे पलटणाबरोबर (गेले होतेच, हे) सडे होतेच हुशार होऊन शहराभोंवते अरावळी आरंभिली. तों हे बातमी शहरांत कळली फौज कूच करून गेली तेव्हां तुरुकस्वार कांहीं स्वारांचे मुकाबल्यास आले. त्यांची यांची झुरमट चांगली होऊन शहरांत घातले. पांच पन्नास घोडे पाडाव करून आणले. मग तोफा मुकाबल्यास आल्या. मग टाळा देऊन पलटणें पिछाडीचा सुमार धरला. व मोरच्याचीं पलटणें व स्वार सरंजाम एकत्र होऊन हरना-

(१०६) **गळफट्यांत** – गळपट्यांत म्हणजे गळफांसांत, पेचांत. **हीहानवत रजा जाहल्यावर** – 'ही हालवंत रजा' असें पाहिजे. मोडींत न व ल सारखे दिसतात. **हालवंत** – जरबेची किंवा सक्तीची, तांतडीची. **मोर्चाचें जाल** – मोर्चाचें सामानसुमान. **तंबूर** – टँबूरीन या इंग्लिश शब्दाचा अपभ्रंश. टँबूरीन म्हणजे ताशा नौबती सारखे एक वाद्य. हें वाद्य युरोपियन – शिक्षित देशी कवायती कंपूंत वापरले जात असे. **कंपेश** – कमीअधिक. **तांब्यातांबोटी करणें** – लुटालूट, तोडातोड करणें. **तुरुक स्वार** – ट्रूपसमधले स्वार. **झुरमट** – झटापट.

त्याचा मुक्काम नव कोसांवर झाला होता तेथें सामल झालें. मग फिरत फिरत डिगेस येऊन मुक्काम केला. इकडे सरकारस्वारी सोर्मेस येऊन फर्काबादवाले पठाण यांजकडून महाराजांस दगा करावा हेंहि सिद्ध केलें. सरकारस्वारी कार्तिक शुद्ध १४ स फर्काबादेस आली. तों पठाणाकडील भले माणूस सामोरे येऊन शहरांत चालावें म्हणून अर्जी बहुत केली. त्यावरून शहराचे दरवाज्यापाशीं आले तों शहरची बळकटीसी ध्यानास आली. चाणाक्षहि खराच. दरवाज्यांतून फिरोन येऊन बाहेर मुक्काम केला. शहरापासून कोसावर फिरंग्याची छावनी होती ती लुटून जाळपोळ केली. मुक्काम जालियावर नबाबाकडून पांच हजार रुपये मेजवानी व एक हत्ती व पांच घोडे नजर आले. आणि वकिलाचें बोलणें पडलें कीं, उदईक मुक्काम करावा. तीन लक्ष रुपये देतों. याप्रमाणें बोलणें लावून तिकडे लीकसाहेबांस सूचना केली. सूचना जातांच ते महूहून कूच करून माणसास कोसास रुपया देऊन छापा कार्तिक शुद्ध १५ स सूर्योदयीं घातला. स्वारीचा मुक्काम होता. छापा येतांच समजल्यावर कूच जालें. सडे स्वार होते. पलटणें मागेंच होतीं. तींहि येऊन पोहोंचलीं. त्या छाप्यांत सरकार फौजेचा खराबा बहुत जाला. फौज निघाली. कारण जातीनें मागें राहून पलटणवाल्यावर चार उलटण्या केल्या. यामुळें छापा थोपला जाऊन फौजेस सोहलत निघण्यास पडली. पलटणें व जिनसी हरनाथसिंग घेऊन डिगेस राहिला. मथुरेस पलटणें होतीं त्यांनीं आपले कंपूंत कांहीं फितूर फांदडा करून कार्तिक शुद्ध ११ स छापा डिगेस घातला. तोफा तलावाच्या कांठीं होत्या त्या पाडाव करून नेल्या. शिलेदाराचे खटलें डिगेस यामुळें लोक बेदील. खाशांची उमेद कानपूरची छावणी जाळून कलकत्त्याचा सुमार धरावा. परंतु लोकांचे चेष्टित पाहून उमेदीचा अर्थ एकीकडे ठेवून डिगेस आले. तों इकडे तोफा बरबाद जाल्या. बुणगे डिगेंत, सरकार स्वारी गांवांत शिरली. तों मागोमाग पलटणें कार्तिक वद्य १४ स आलीं आणि डिगेस मोर्चे लाविले. कांहीं फितूरहि डिगेंत केला. हें महाराजांस समजल्यावर फौज बुणग्यासुद्धां बाहेर पडून होते तों यांनीं डीग घेतली.

---

(१०६) **येऊन** – आले. **अर्जी** – विनंति, विनवणी. **कारण** – चुकीचें वाचन, बहुधा येथें मुळांत ' आपण ' असा शब्द असावा. **जिनसी** – तोफखाना. **फितूर फांदडा** – फितवा. **शिलेदाराचे खटले डिगेस यामुळें लोक बेदिल** – यशवंतरावाच्या सैन्याचें कुटुंबकबिले डिगेंत आश्रयास होते. तेथेंच इंग्रजाचा छापा पडल्यामुळें यशवंतरावाचे शिलेदार बेदिल झाले. व त्याच्या इच्छेप्रमाणें कानपूरच्या इंग्रज छावणीवर हल्ला करून जाण्यास नाखूष झाले. **चेष्टित** – वर्तणूक. अर्थात येथें नाखुषी. **बाहेर पडून होते तो** – बाहेर पडत आहेत तोंच.

महाराज कूच करून कुंभेरीहून बिगटला तों अकस्मात राजे कूच करून कुंभेरीस आले. मागें पलटणाचा रूख भरतपुराकडे जाला. तेव्हां रणजितसिंग जाट याचें बोलणें लागलें कीं, तुम्हीं मदत असावें. चार रुपये खर्चास देऊं. याप्रमाणें ठरलें. मग महाराज कूच करून शहराबाहेर पडले. पलटणवाल्यांनीं शहरास मोर्चे लाविले. मार्गशीर्ष वद्य पक्षीं लढाई सुरू जाली. बाहेरून महाराज आंतून जाट. पांच महिने लढाई जाली.

(१०७) त्यांत कौतुक एके दिवशीं जालें. त्यांत महाराजांनीं शहरांत स्वस्थ निद्रा केली (होती.) दोन प्रहरची वेळ. त्या समयीं फिरंग्यांनीं हल्ला केला. जाट आपापले मोर्चावर सावधच होते. फौज महाराजांची मुक्कामावर जेथील तेथें हल्ला येऊन बिगटला. तों अकस्मात गैबी फौज, दिसण्यांत महाराज, राणोराण फौजच फौज होऊन हल्यांतील एक माणूस जाऊं पावलें नाहीं. किल्ल्यांतून जाट आपले डोळ्यांनीं पहातात. महाराज उलटून उलटून बासडे करितात. किल्ल्यांवरून जाट (व) फिरंग्याचे लोक बोलतात कीं, "वाहवारे महाराज! खूब बासडे लगाता है" ऐसें वर्णन अवघे ऐकितात. पहातात. ही गुल महाराज होते तेथवर आली. तेव्हां जवळ बसणार कृष्णाजी लक्ष्मण व बाळाजी भिकाजी, चार मराठे व धनगर व पठाण आश्चर्य करूं लागले कीं, "महाराज आपण तरि पलंगावर निजला (आहां) आम्हीं तर येथेंच आहों. फौज तरि आपले ठिकाणावर आहे. हें काय?" तेव्हां महाराजांनीं उत्तर केलें कीं, हें कृत्य मार्तंड जाणो. तुम्हांस काय सांगावें? बोलोन सत्वर घोड्यावर स्वार होऊन अवघ्या खांशांसुद्धां बाहेर आले. तों पलटणाचें खेत पाहिलें. तों पलटणाचा शेणसडा जाला. दरम्यान मराठा घोडा राऊत एकहि नाहीं. मग गोटांत होऊन पुन्हां शहरांत आले. लष्करांतहि सर्वत्रास हेंच आश्चर्य. शहरांत येतां दरवाजावरील लोक व कोटावरील सर्व महाराजांस रंग देतात. महाराजांनीं श्रवण करून मनांत हांसतात कीं, ईश्वराचें कौतुक अगाध

---

(१०६) **बिगटला** – सटकला. **अस्मात** – अकस्मात असें पाहिजे. **राजे कूच** – रोज कूच असें पाहिजे. **महाराज कूच करून येथपासून कुंभेरीस आले येथपर्यंत** – या वाक्याचा अर्थ कळत नाहीं. कुंभेरीहून कूच करून पुन्हा कुंभेरीस आला हें काय? **शहरास** – भरतपूर शहरास, भरतपुरास.

(१०७) **कौतुक** – ईश्वरी चमत्कार. **बिगटणें** – येऊन भिडणें. **गैबी** – गुप्त. **बासडा करणें** – भाल्याची फेंक करणें. **गुल** – दंगा, गडबड, आवई. **पलटणाचे खेत पाहिले** – पलटणें रणांगणावर मरून पडलेलीं पाहिलीं. **रंग देतात** – रंग देऊं लागले, अभिनंदन करूं लागले.

आहे. हेंच आश्चर्य. फिरंग्याचे अठरा हल्ले जाले, अठराही हल्ले आंतून जाट बाहेरून महाराज असेच मारून काढिले. भरतपुरावर माणसेंहि मोठीं मोठीं कामास आलीं. सोमाजी लांभाते, केवळ कळीचा अर्जुन, तेथेंच खपले. आणखी दहा पांच माणसें गणनीय कामास आलीं.

(१०८) पेशजी मेवाड प्रातांतून खंडो महादेव यांची रवानगी शिंदे यांजकडे समेटाकरितां जाली होती. शिंदेहि अजिंठ्याचें घाटची लढाई वसलीसाहेबाची खाऊन पुर्कस गळाठ्यांत आले. तेहि अडीरच होते. पंत मशारनिल्हे कारस्थानी रसायण घालून हरदु तर्फेचे किलाफाचे पर्वत मनांत, त्याचे मार्जनें शिंद्याकडील समक्ष व महाराजांकडील कागदीं पत्रीं निखालसता करून शिंदेसाहेबांपाशीं घेऊन आले. फौज लढाई हरली. त्यांत पैशाचे कमतीमुळें बुभुक्षता मनस्वी. येतांना मार्गांत सागरास सनाथ केले. (नंतर) दिवे लावणीचा कौल दिला तेव्हां कांहीं सुदरून सबळगडास आले. तेथें मुक्काम होऊन सरजेराव व खंडोपंत बाबा पुढें महाराजांकडे आले. हें संधान जाटानें पाहिलें कीं, होळकरांचेच सल्लेनें आपला जीव नाकास आला. आतां दोन्ही संधानें गळां पडल्यास टपली राहणार नाहीं. शत्रूचें पारिपत्य होईल तेव्हां होवो. पुढील धोरणें ध्यानास आणून फिरंग्याचा सलूख करून महाराजांस जाब दिल्हा. नंतर यशवंतराव महाराज कूच करून वैरेस गेले. व सर्जेराव, खंडोपंत बाबा भरतपूरनजीक पोहोंचलें. तेथें समजलें कीं महाराज कूच करून वैरेस गेले. तेव्हां हे भरतपूरचा सुमार सोडून वैरेस येऊन महाराजांच्या भेटी जाहल्यानंतर कूच करून हिडाणे केरोळी या मार्गें सबळगडचे सुमारें आले. चर्मण्वती उतरून चैत्र वद्य पक्षीं सन १२१४ चे सालीं भेटीचा बेत ठरला. शिंदे यांनीं जागा मैदान पाहून बिछायत करून, पांच हजार खांसा

---

(१०७) कळीचा अर्जुन – कलीयुगांतील अर्जुनच असा योद्धा.

(१०८) पुर्कस गळाठ्यांत आले – फार नुकसानी झाली. **अडीर** – अडील. **अडील** – ईर्षेचे, हटवादी किंवा आडीर म्हणजे अडलेले, अडचणींत सांपडलेले असाहि अर्थ होऊं शकेल. **मशारनिल्हे** – वर उल्लेखिलेले. **रसायण घालून** – बोलणें लावून, वाटाघाटीं सुरू करून. **हरदु** – दोहीकडील. **त्याचे मार्जनें** – त्यांचीं मार्जनें. **सागरास सनाथ केलें** – सागर शहर लुटलें. **दिवे लावणीचा कौल देणें** – मुलूख उध्वस्त केल्यानंतर पुन्हा वसाहत होण्याकरतां अभय-पत्रें देणें. **कौल** – आश्वासन-पत्र, अभय-पत्र. **सुदरून** – सुधरून, कांहींशीं स्थिति बरी होऊन. **जीव नाकास येणें** – जीवावर बेतणें. टेकीस येणें. **टपली** – (आंगाची) कातडी, साल. **बिछायत करून**– बैठक करून.

बदिमाख पोषाख येऊन बसले. नंतर महाराजांची स्वारी आली. साठ हजार स्वार, त्यांत महाराजांचे आंगांत दहा शेर रुईचा डगला. सफेत शेल्याचा धाटा, ढाल तरवार, बासडा खांद्यावर, गांठची गांठच (आले.) ह्यांत महाराज कोणते हें ओळखूं येईना. येतांच गराडा फिरवून देऊन दोन हजार खांसा उतरला. तिकडल्या हिकडल्या तोफा चालल्या, चार घटिकापर्यंत कोणाचा शब्द कोणाचे कानीं पडेना ही व्यवस्था जाली. दौलतरायाचे तोंड सुकून गेलें. एक दोन रोजांत बैठकी होऊन सफाईचीं बोलणीं चालणीं जालीं. उभयतांचा एक विचार होऊन तेथून कूच कोटयाकडे जालें.सोलापुरावरून इंद्रगड खानोलींचे मार्गें पाटयाजवळ चर्मण्वती उतरून मुक्काम जाला. पुढें तालडयावरून बुंदीचे मार्गें राळ्याचे मढीकडे कूच जालें. अंबोजी इंगळे याजपासून पैका घेऊन उभयतां सरदारांनीं वांटून घेतला.

(१०९) पुढें शिंद्याकडील ज्यान बत्तिसाचा कंपू यांत हुसेनी जाली. कांहीं एक दिवस राडा राहिला. मग महाराजांनीं सांडण्यावर पन्नास हजार रुपये रोकड घालून पांच पन्नास स्वारांनिशीं कंपूंत गेले. चांदणीखालीं बसोन ज्यान बत्तीस वेगळा करून अवघे आपसर बोलाविले. तेव्हां सर्वांत आश्चर्य वाटलें कीं, सरदार खावंद यांजला म्हणावें. छाती वाढून एकला आपल्यांत आला. आपसर बोलावून त्यांजला प्रश्न केला कीं, "तुम्ही चाकर आमचे (कीं) ज्यान बत्तिसाचे? आपसरानें विनंती केली कीं, "आम्हांस ज्यान बत्तीस व सरकारची बटीक दोन्हीहि सारखेच. ज्याचे ताबेदारीस लावून द्याल त्याचे हुकमानें चाकरी करूं. इतकाच अर्थ. बाकी आम्ही चाकर सरकारचे." "उत्तम आहे. आम्ही आज तुमची वांटणी सुरू करितों. ज्यान बत्तिसापासून कितीक सरकारी जाब समजून घ्यावयाचे (आहेत, करितां) त्याजला आमचे स्वाधीन करून द्यावें." आपसरांनीं मान्य केलें. वांटणी चालू करावी. आम्ही त्यांसी आणून हजर करून देतों. ते वेळेस मुत्सद्दी

---

(१०८) **बदिमाख** – दिमाखासह, भारी भारी पोषाख घालून बसले. **रुइचा डगला** – रुभरी चिलखत. **धाटा** – पागोटें पडूं नये म्हणून पागोट्यावरून व हनवटीखालून कपड्याचा पट्टा आवळतात त्यास धाटा म्हणतात. **गांठची गांठ** – टोळींच्या टोळी. जमावानें. **गराडा फिरवून देऊन** – ? **व्यवस्था** – अवस्था. **जाले** – जाणें झालें. **सोलापुरावरून** – ?

(१०९) **जान बत्तीस** – जीन बॅप्टीस्ट. **हुसेनी** – यादवी, दंगल, आपसांत कत्तल. **आपसर** – ऑफिसर्स, कंपूंतले. **छाती वाढवून** – छती करून, धाडस करून. **वांटणी** – पवार वांटणी. **मुत्सद्दी** – कारकून.

बोलावून वांटणीस कंपनी आणली. पन्नास तोडे टाकून दिले. त्यांनीं ज्यान बत्तसि आणून हजर करून दिल्हे. त्याजला घेऊन महाराज कंपूंतून निघोन शिंद्याचे डेऱ्यास आले. नंतर दौलतरायास वर्तमान समजलें. यांनीं ज्यान बत्तीस त्यांचे स्वाधीन केले " पन्नास हजार रुपये चांदणींत टाकून वांटणी सुरू करून आलों. हा ज्यान बत्तीस तुमचा हरामखोर अथवा सामखोर त्याशीं समजून काय घेणें तें घ्यावें. " असें बोलून आपल्या डेऱ्यास आले.

(११०) आठा चौ दिवसांनीं दौलतरायाचा गूढसंदेशा आला कीं, " अंबोजी इंगळ्यापासून आम्हांकडून पैसा निघत नाहीं, कारण रदबदल करणार फार. यास्तव तुम्हीं याजला आपले येथें नेऊन पैक्याचा ठराव करून हस्तगतहि करावें. हें वर्तमान समजतांच यादवराव भवानी निसबत पीलखाना याजबराबर पांचशें स्वार हुजरातीचे देऊन, हातचिठ्ठी शिंदे यांचे नांवें लिहून पाठविली कीं, अंबोजी इंगळे याजकडील पैका ठरावून उपयोग घडत नाहीं. त्यास तुमचे लष्करांत बळोत्तर. त्याजवर फौजेचा गुजारा. इकडे उत्पन्न जाहल्यास तवातोबरा, न जाहल्यास फाका. या अडचणीमुळें मशारनिल्हे पाठविले आहेत. इंगळे यांचे स्वाधीन करून द्यावे. या भावीं मशारनिल्हेची रवानगी केली. पूर्व संकेत होतांच, मशारनिल्हे जातांच चिठ्ठी पाहून इंगळे यांचे स्वाधीन केले. आपल्या जवळ आल्यावर समक्ष येऊं न देतां हरनाथाचे स्वाधीन करून दिल्हे. त्यानें हुजरातीचे चौकींत कापडाचें गदेल्यावर बसवून पुढें हात जोडून उभा राहिला आणि विनंती केली कीं, " आपण शिंदे होळकर यांचे येथील साहेब सुभे, मी हरनाथ तीन कवडीचा खास बारदार. फार वाईट आहे. तर झटकन बोलावें. माझा वाईटपणा उजेडांत आणूं नये. त्याचें बोलणें तीन चार पांच (लाख ?) श्रवण करून दहा पांच गालिप्रदानें शेलकीं समर्पक करून तगाद्याचीं आयुधें आणविलीं. तेल, तोबरा, खाट, जेरबंद आणून टाकिले. कोळसे शिलगावले. मग इंगळे बोलले कीं, उदईक

---

(१०९) **तोडा** – एक हजार रुपयाचा एक तोडा होतो. **चांदणी** – राहुटी. **हरामखोर** – गुन्हेगार. **सामखोर** – हरामखोरच्या उलट, म्हणजे मित्र.

(११०) **गूढ संदेशा** – गुप्त निरोप. **बळोत्तर** – बलवत्तर. **तवातोबरा** – उपजीविका, घोडयांची व शिलेदारांची. **फाका** – उपवास. **गदेला** – मोठी गादी. **साहेब सुभे** – मोठे अधिकारी. **खास बारदार** – हुजऱ्या. **तगाद्याचीं आयुधें** – छळ करण्याचीं हत्यारें. **तेल** – पलिते पेटवून अंगास लावण्याकरितां. **खाट** – खाटेवर बांधून घालून ती खाट उभी करून कमचानी मारीत असत. त्यालाच खाट मार असें म्हणत. **जेरबंद** – चाबूक, चामडयाचा चाबूक.

जाब ठरावांत आणूं. उत्तम आहे, म्हणोन आयुर्धे जेथील तेथें रवाना केलीं. तेच दिवशीं रात्रीं पन्नास ठरले व सहा महाराजांचे खासगत याप्रमाणें जाब ठरून पैका आणावयासि बाळाराम शेट आगरवाले कोटयास रवाना जाले. दौलतराव शिंदे यांजला सांगून पाठविलें कीं, पन्नास ठरून बाळाराम आगरवाले ऐवज आणावयास कोटयास रवाना केले. तेव्हां शिंदे यांस व त्यांचे व मंडळीस आश्चर्य झालें. आपलें येथें महिनाभर होते व महिनाभर आणखी राहते तथापि पूर्व दिवसच. विना निर्भिडतेखेरीज पैका निघत नाहीं असें आश्चर्य केलें. पैका आल्यावर पंचवीस त्यास दिले एकतीस आपण घेतले.

(१११) हें वर्तमान त्यांसी समजल्यावर किलाफाचें बीजारोपण पुन्हा जालें. भेटींत बोलण्यांत व्यवहारांत महाराजांस समजल्यावर शिंदे यांजला तळाचे तळावर ठेवून आपण कूच करून अजमीरनजीक पुष्करावर आले. तेथून बाडाचा खटला पुन्हा मारवाडांत रवाना करून जातीनें सडा घोडा राऊत घेऊन सेखावटीचे मार्गें हरियाण्यांतून दिल्ली उजवे बाजूस सोडून पटाळयास कार्तिक शुद्ध १२ सन १२१५ त मुक्कामास आले. तो दिल्लीकडून फिरंग्याकडील सरंजाम पलटणें वगैरे मालकिनसाहेब पटाळ्याचे सुमारें आले. मग शिखाशीं संधान बांधून सतलज उतरावयास कांठास आले. पाणी अक्षोभ. उतार नाहीं. तेव्हां मार्तंडाचें स्मरण करून, गंगेचें पूजन करून बेलाशक हत्ती गंगेंत घातला. त्यास हत्तीच्या गाशाचा पदर न भिजतां पार उतरून गेले. ते दिवशीं शिलेदार व शिलेदाराचीं रांडापोरें एकाचे गळां एक पडून रडण्याचा कोल्हाळ (झाला.) तेव्हांच उतरून पार गेले व व्यास नदी उतरून मार्गशीर्ष वद्य षष्ठीचे दिवशीं अमरसरास गेले. तेथें शिकाची सासू व गुरु यांशीं स्नेहाची पकायत करून त्याचे विद्यमानें रणजितसिंग शिकाच्या भेटी जहाल्या. संमज गंगेनें ठाव दिल्यावर या मागाहून पलटणें ताबडतोब येऊन पोहोंचलीं. तों त्यांनीं पाणी अक्षोभ, ठाव नाहीं (हें पाहून) मग लाचार होऊन, माहितगार आणून, घाट ठिकाणीं लावून उतरले. तेव्हां गंगेचे कांठीं आले. सरकार शिखासुद्धां अमरसरावर मुक्काम. तेथें मलकणसाहेबांकडील पैगाम सलुखा-

---

(११०) सहा महाराजांचे खासगत – इंगळ्यानें पन्नास लक्ष शिंद्याला व सहा लक्ष गुप्तपणें यशवंतराव होळकराला देण्याचें कबूल केलें. **विना निर्भिडितेखेरीज** – भीड सोडल्याखेरीज, निष्ठूर झाल्याखेरीज. **२५ त्यास दिले ३१ आपण घेतले** – शिंदे होळकरांची वांटणी पूर्वींपासून ठरून गेलेली होती.

(१११) **त्यासी** – कोणाशी ? इंग्रजास ? **अमरसर** – अमृतसर. **सत्रज** – सतलज नदी. **पकायत** – दृढता. **मलकण** – मालकम.

विषयीं मीरखान याजकडे आला. मग बाळाराम शेट व नबाब यांनीं मसलत करून दुसरे दिवशीं महाराजांचे कानाबर घातलें. त्यांचेंहि अंतःकरण होतेच. मग बाळाराम शेट हरनाथसिंग साहेबाकडे पाठविले. त्यांचें बोलणें होऊन भेटीचा बेत ठरला. साहेबांकडून दोन साहेब आले. महाराजांची भेट जहाली. दोस्ती ठरल्यावर साहेबांचें कूच होऊन दिल्लीकडे गेले.

(११२) दरम्यान रुमशामचे पातशहानें येशवंतराव महाराजांचे प्रतापाचा व जुवामर्दीचा जुलूष ऐकून तेथून खत व हत्ती, घोडे आले. त्याजवरून सलूख जाला. खत आल्यापासून खंडेराव होळकर यांचे नांवाचा शिक्का महकूब करून जातीचा शिक्का ऐवजीं हरफाचा चालू जाहला. सलुखा जहाल्यावर फौजेची तारिख बंद हिशास्ते टाकली. अमरसराहून माघारीं उलटलें. तेथून हरनाथसिंग याजबराबर सोडचिठ्या स्वदेशच्या देऊन अंमलफैल करून स्वदेश नेमाड माळवा येथील ऐवज फौजेचे समजाविशींकरितां जमा करावा म्हणून रवानगी केली. व मार्गांत शिखाचे स्वाधीन केले होते ते हरनाथसिंग याजला आज्ञा केली कीं, बाळासाहेबास घेऊन जावें. अशी आज्ञा होऊन हरनाथसिंगाची रवानगी जाहली मागाहून खांसा स्वारींचें कूच जहालें.

(११३) पुढें ज्वालामुखी जवळ पाहून फौज सारी मुक्कामीं (ठेवून) विसाच कोशाचे आंत राज्य टाकून ज्वालामुखीचे राजास पत्र लिहून, उत्तर आणून, दहा हजार स्वार बरोबर घेऊन फाल्गुनमासीं देवीच्या दर्शनास गेले. मार्ग बहुत दुर्घट. परंतु तेथील राजाचें संमत आणल्यावर दगाफटका न होता सुरक्षित देवदर्शन घेऊन, फौजेंत सावध होऊन, दरकूच बनवाड्यावरून जयपूरचे रानांत नरावयास स्वारी आली. दरम्यान हैदराबादी पठाण अग्रसर होऊन, तमाम फौजेचा आंतून एका होऊन तलबेकरितां बैदा जाला. फौज आपले ठिकाणीं साशंकित, सरदार आपले ठिकाणीं साशंकित, त्या प्रसंगीं ताबूत मोहरम आला. तेव्हां फकिरी मागावयास हैदराबादी पठाण आले. वीस हजार नागवी तलवार (त्यांनीं) वस्त्रें प्रावर्णं सोनें चांदी जवाहीर देणें (असें मागणें केलें) महाराजांचे (मनीं हा) अग्नीचा कलोल असें

---

(११२) **खत** – पत्र. **महकूब** – तहकूब, रद्द. **जातीचा शिक्का** – स्वतःच्या नांवाचा शिक्का. **ऐवजी हरफाचा** – **हरफ** – अक्षरें. मोहरेवर अक्षरें काढलेला. **फौजेची तारीख हिशास्ते** – ? **अमल फैल करून** – आपले अधिकारी नेमून.

(११३) फौज सारी मुक्कामीं विसाच कोशाचे आंत राज्य टाकून – ज्वालामुखीच्या राज्यापासून वीस कोसावर फौज ठेवून. **बैदा** – दंगा.

येऊं द्यावें न येऊं द्यावें असा विचार पडला. मग धर्मोजी शिंदे वगैरे मराठे धनगर यांनीं सल्ला दिल्हा कीं, " महाराजांनीं कोणाचेंहि वाईट केलें नाहीं. घर दौलत कांहीं एक न पाहतां झालें उत्पन्न तें अगोदर फौज मग काय असेल तें असो. असें आम्हींच खुशामत करितों असें नाहीं. लहान मोठे सर्व फौज (म्हणत) आहे. आतां हे कलुष सर्व पोटाचें आहे. यांचा मार्ग निघाल्याचें पोटीं सर्व तुझे चरणीं प्राण समर्पून आहेत. तेथें संशयाचें कारण मनांत आणूं नये. ज्यांचे घरीं पात भाजावयास खापर नव्हतें तें हत्तीनशीन करून दिल्हे. त्यांजपासून अन्य विचार काय व्हावयाचा आहे ? व दुसरे दक्षणात्य प्रकरणीं श्रीमंत, भोंसले, दाभाडे, गायकवाड, मोंगल, शिंदे व तुमचे वडील सर्वांनीं पराक्रम करून दौलत वृद्धिंगत केली, परंतु ही शोभा (दिसत नाहीं) फौजेंत बैदा तथापि आज वीस हजार तरवार नागवी, लोक एकापरीस एक, आफलातून, फकीर होऊन मागावयास आले ही शोभा कोणेहि ठिकाणीं पाहिली नाहीं. हेंहि एक नांव आहे. " असें संमत घेऊन डेऱ्यास यावें अशी परवानगी जाहली. तों लोकांनीं येऊन गराडा घालून अबीर खंडोगणती उडाला. शोभा अमोलिक झाली. लाख रुपये फकीरी देऊन बिदा केले. दुसरें दिवशीं आपण फकीरी घेऊन तीस हजार नागवी तरवार जातीनें फकीरी दिक्षा घेतली. त्या प्रमाणें अलंकार सहा हजार फकीर, वरकड सामान, अशा थाटानें आपणहि त्यांच्या गोटांत फकीरी मागावयास गेले. त्यांत समजतांच तीस हजार रुपयांचीं फुलें चांदी सोन्याचीं करून, गोटांत आले तेथून उडवीत डेऱ्यांत नेले. तेथें लाख रुपयांचा चौत्रा बैठकीस करून पांच लाख रुपये फकीरी बद्दल पावती दिली. गोडीगुलाबीनें फकीरी घेऊन आले. नंतर त्यांचा हिशेब करून जयपूरवाले जोधपूरवाले यांचा अपसांत सोयरिकीचा दंगा पडून लढाईचा मनसोबा, तेव्हां दुतर्फा महाराजाचें अगत्य. याचे पोटीं कांहीं पैका जयपूरवाल्यापासून घेतला, कांहीं जोधपूरवाल्यापासून घेऊन बाराट फौज होती तिचा फैसला करून, उभयतांचें रहस्य करून देऊन, या इतिकर्तव्यतेस दिवसांतर लागलें. यास्तव खंडेराव होळकर, गणपतराव दिवाण व फडणिसांकडील कारकून त्यांचे गोटांत येऊन हिशेबाचा आकार करून पैका देणें अवशिष्ट राहिलें. यामुळें शिपायी तर आहेतच. कोणी कोणी

---

(११३) ते अगोदर फौजेंत – उत्पन्न आलें तें अगोदर फौजेच्या पगारांत खर्च केलें. कलुष – कपट, ढोंग. पात – एक जातीचा मासा. आफलातून – आपलेहून, आपण होऊन. त्यांत – 'त्यांस' असे पाहिजे. चौतरा – चबुतरा, उंचवटा. बाराट – ? रहस्य करून देऊन – रहस्य करून दिलें. इतिकर्तव्यतेस – हें काम उलगडण्यास. दिवसान्तर – कांहीं दिवस.

असेंहि बोलो लागलें कीं, येशवंतराव आहे कोण ? धणी दिवाण फडणीस आम्हां-पाशीं, आम्हीं जे पाहिजे तें करूं. ही गोष्ट मनांत लागून रात्रीचा दिवस करून फौजेचा फैसला होऊन खंडेराव होळकर वगैरे मंडली आपली आणोन घेतली. पठाणाचा फडशा जाहल्यावर वेगळे होऊन कांहीं दिवस जयपूरवाल्यांनीं चाकर ठेविले. महाराज कूच करून हारमाडयाचे मुक्कामास आले. तेथें खंडेराव होळकर यांचे प्रकृतीस विकृत जहाली. सन १२१६ माघ शुद्ध ७ देहावसान होऊन, तेथें कांहीं दिवस मुक्काम होऊन कोटयाचे सुमारें चर्मण्वती उतरून पाटणास मुक्काम जाला. तेथें मराठ्यांचे फौजेची समजावीस होऊन, सन १२१७ अवल सालीं आषाढ शुद्ध १ स भानपूर मुक्कामीं आले. तेथें पलटणाचा दंगा होऊन महाराजांस तेलंग्यांनीं पाल-खींत घालून पलटणांत घेऊन गेले. तेथें काशिराम होळकर होते. तेथें भाषणें अर्वाच्य पूर्व (व) त् ऐकिलीं. लाचार (?) बाळाराम शेट कारस्थानी पन्नास हजार रुपयांचे तोडे नक्त आणून वांटणी सुरू केली. आपण जातीनें तेथें राहून महाराजांस काहाडून दिल्हे. भानपुऱ्यास येतांच काशिराव होळकर कुटुंबसुद्धां होते. त्यांजला चिमणाजीपंत भाऊ बरोबर देऊन सरकार बिजागडचे किल्ल्यावर पाठविले. दरम्यान सेंदेवाडयांत दादमखान वगैरे हजार बारासें स्वार पागेचे व दोन पलटणें होतीं. त्यांनीं आपसांत विचार करून काशिराम काहाडून नेऊन बंड करावें हा इरादा केला. वाहद्अल्लीखां बंगस खानदेश प्रांतीं रावेरीस होता त्याजकडे दादमखां यांनीं पैगाम लावून तेहि आपल्यांत सामल केले. दवड करून खरगोणापर्यंत गेले. काशीराव हातीं न लागतां चिमणाजीपंत यांनीं बिज्यागडचे किल्ल्यावर दाखल केले. मग दादमखां घाट उतरून रावेरीस आले. पांच विश्वे भारमल होळकरहि यांत होते. परंतु उघड जाले नाहींत. यावल साकळीस होते. पागा वळवून बंड केलें. सबब भानपूर मुक्कामींहून सदरदीन हावलदार दोन हजार हुजुरास घेऊन त्याचे पारिपत्यास रवाना जाले. ते दरकूच बहारपुऱ्यावर आले. हें वर्तमान बंगस दाद-मखां यांसीं समजल्यावर यांनीं पहिलवानखां पठाण पांचशें स्वारानिशीं त्याजवर रवाना केले. त्याची याची तरवार चालून चार घटिकाहि मोहरा न सांभळतां हाव-लदारांनीं पळ काढला. तों महेश्वर पाहून भानपुऱ्यास दाखल झाले. शेवटीं तें बंड पागा पलटणें वगैरे फिरंग्यांनीं अमळनेरावर बुडविलें.

(११४) महाराज पंजाबाहून स्वारी फिरल्यावर परतंत्र व्हावयास प्रारंभ जाला.

---

(११३) तेलंगी – मद्रासी शिपाई. **दवड** – दौड. **मोहरा संभाळणें** – हल्ला सोसणें, हल्ला थोपवून धरणें, तोंड संभाळणें.

(११४) परतंत्र – बेहोष, अमली पदार्थांच्या सेवनामुळें.

हा इरादाच कीं कलकत्ता पहावा. भानपुऱ्यास आलियावर तोफा सरमजाम कमती. तोफा वोतावयास कारखाना लाविला. चवऱ्यांशीं तोफा लहान मोठया वोतल्या. त्या कारखान्यांत कोटयाचा वकील तोंडीं लागला होता. लाडें लाडें बोलावयास गेला कीं, " आतां हा श्रम कशास करितां ? उष्ण या प्रकारचें." अशा भावीं अर्वाच्य बोलणें बोलावयास गेले. त्यास ताव दिला कीं, " कोटेवाले फिरंग्याचे गांडींत शिरून माझें करोडों रुपये नुकसान केलें. कोटे लुट्टन खोदून चमेलींत टाकावयाचें आहे. घाबरा कां होतोस ? " तो बेहोष होऊन जालमसिंगास मजकूर लिहिला. तेथें जरब पडून पांच लक्षांच्या हुंडया मुकाटयाच आल्या. (कीं) हे नजर करून सरदारांचीं मर्जी संपादन करावी. पांच लाख रुपये सहजांत आले. तात्पर्य जरबवान पुरुष आहे त्याचे तोंडांत दौलत आहे ! दिवसांदिवस परतंत्रता गालब होत चालली तोफांचा कारखाना आटोपल्यावर महालाचें पाहणें पाहूं लागले. परतंत्रतेच्या अनुसंगानें मनस्वी जमा वाढविल्या. त्याच्या व्यवधानांत गंगाराम कोठारी यानें स्वारी पंजाबांत गेलियावर मागें माळव्यांत सरदार कोणीच नव्हता, शिंद्याकडील वगैरे परराष्ट्र वगैरे आलीं, परंतु जुंमस खाऊं न देतां सरकारनक्षा राखून सरकारी जिल्ह्यांस तोसीस लागूं दिल्ही नाहीं. यामुळें खर्चाखालीं मुबलख आला. तथापि हमरहा केला असतां आणखीहि चार रुपये द्यावयाजोगा. ते न करितां एक लुच्या कारकून राजाराम शिवराम कोटयाचे शिफारशी असामी रामपुऱ्यास पाठविली होती, त्याचें न चालविल्यामुळें रामपुरा वगैरे माहालानिहाय तीन सालां विसां लक्षांचे तक्रारीचा तोंडा करून समजाविलें. कोठारी याचे प्राणाशीं गांठ घातली.

(११५) त्या प्रसंगीं महिपत बावा गोसावी ढोलीबावा भानपुऱ्यास आले होते. त्यांचे ठायीं आस्ता बसून उपदेश घेतला. तेव्हां त्यांनीं ब्राह्मणभोजन, देवपूजा, मंत्र, जप करण्याचें सांगितलें. त्याप्रमाणें क्रम चालला. त्यांत आश्विन वद्य ४ स १२१८ ते दिवशीं रात्रौ आरती करीत होते. आरती करतां वेळेस प्रकृति बेबस

---

(११४) तोंडीं लागला होता – प्रियपात्र बनला होता. **ताव देणें** – जरब दाखविणें. **बेहोष** – घाबरलेला, होष उडालेला. **गालब** – दृढ, वृद्धिंगत. **परतंत्रतेच्या अनुसंगानें मनस्वी जमा वाढविल्या** – व्यसनाधीन झाल्यामुळें कारभाऱ्यांनीं वाटेल तसा कारभार करून कर्ज करून ठेवलें. **खर्चाखालीं मुबलख आला** – फार खर्च करावा लागला.

(११५) अस्ता बसून – भक्ति बसून. **बेबस** – मोडी वाचनाची चूक ! **बेहोस**– बेहोष असे पाहिजे. किंवा **बेबस** याचा बिघडलेली, बिथरलेली असाहि अर्थ होईल.

होऊन अनिर्वाच्य शब्द वगैरे चेष्टा करण्यास प्रारंभ केला. तेथें जवळ सखाराम गोविंद निजबत नरतवेला व केशवराव विठ्ठल सारोळकर हे उभयतां जवळ होते. आणखीहि शागिर्दपेशा वगैरे मंडळी जवळ होती. परंतु हात लावावयास कोणाची हिंमत न चाले. मग सखाराम गोविंद याची सलग विशेष होती. हा बोलला कीं, "बेटे हो आतां महाराज कशाचे? धरा बळकट. सोवळें फेडून, चोळणा घालून, वाडांत नेऊं" असें बोलून कवळींत धरलें. महाराजांस चौ माणसांचें बळ. सखाराम गोविंदास आटोपेना. ज्याचे हातचा भाला तरवार ज्यास लागली त्यानें पुन्हा पाण्याची वाट पाहिली नाहीं ! मग केशवराव विठ्ठल यांनीं कंबर धरिली. मग हुजरे शागिर्द बिलगले. सोवळें फेडून चोळणा नेसवून वाडांत नेऊन घातलें. त्या नेण्यांत दहा पांचांस चापटा लाथा मारल्या ते दो दो चौ चौ रोजांनीं सुदरले. वाडांत जाऊन तेथेंहि दंगा केला. बायकांस लपतां हाल जाले. मग बाळाराम शेट व चिमाजीपंत भाऊ कारभारी होते त्यांनीं दौलतीस आळ घालून, महाराजांचे वाड वेगळें देऊन, जाबता केला. हुजरे व गोलंदाज यांत दांडगा, ज्वान, बळकट अशीं माणसें निवडून पाहरे नेमून देऊन, दरखदाकडील एक एक कारकून पाहाऱ्यावर ठेवून बाळाराम शेटाचे परवानगी खेरीज कोणी आंत जाऊं नये. सन १२१८ माघमासीं भानपुऱ्याहून कूच करून मलासी रामपुऱ्याजवळ गेलें. हें वर्तमान मीरखानास समजल्यावर समाचारास सडे आले. महाराजांची प्रकृति विलक्षण पाहून ते दिवसापासून ऐवजास अभिलाष उत्पन्न होऊन, दहा लक्ष रुपये घेऊन कारभार बाळाराम शेट यांनींच करावा असा तुळसाबाईचे विचारें ठरवून गेले. आपल्याकडील गफूरखां बराय मसलत ठेवून गेले. जातीनें फौजसुद्धां नागपुराकडे जाऊन महाराजांचा इरादा होता तो पूर्ण करावा या धोरणावर गेले.

(११६) इकडे सरकारांत धर्मांकुंवर याजकडे पलटणें दामदस्त याची वहिवाट होती. फौजेची मालकी कमी पडल्यामुळें वाडासभोंवता पलटणाचा गराडा घालून रहावे अशी चाल टाकली. सर्वांवर पलटणी छाप ठेवून कारभाराची मुखत्यारी आपले देठीं आणली. बाळाराम शेट रसायनी, बाहेर दुजागीं दिसूं न देतां क्रम चालविला. फाल्गुन मासीं भीमाबाई, गोविंदराव बुळे याजला दिली. लग्नसमारंभ उत्तम प्रकारचा जाला. इंदुरास मुक्काम आला. तेथें तुळसाबाई व मल्हारराव

---

(११५) सलग – सलगी. **ज्याचे हातचा भाला** – **ज्याचे** – त्याचे. **बराय मसलत** – मसलतीसाठीं.

(११६) चाल टाकली – पद्धत ठेवली. **आपले देठीं** – आपल्या हातांत. **दुजागीं** – द्वैतभाव.

महाराज वर्तमान यांची गोतबात जाली. पुढें इंदुरास आले. छावणी महूस ज्येष्ठ मासीं सन १२१९ चे अवलीस जाली. दिवसेंदिवस धर्माचें आक्रमण विशेष पडत चाललें. राजे महिपतराव निसबत नबाब हैदराबादवाले काली बेगम इच्यातर्फे जें राजकारण घेऊन आले त्यांतील आशय हैदराबादवाल्याचे दौलतींत नबाब मृत्यु पावल्यावर कारभाऱ्याचा काली बेगमेचा फाट पडून जागजागां वोढाताण होऊं लागली. सबब बेगमीनें मुखत्यार राजे महिपतराम करून पाठविला कीं, तेथील प्रसंगानुरूप जें बोलणें ठरणें तुमचे विचारें येईल तें आम्हांस कबूल. परंतु यशवंतराव होळकर याजला बमय फौज घेऊन यावें. या प्रीत्यर्थ कोटी रुपयांची भलावण सावकारी मशारनिल्हेबरोबर देऊन रवाना केले. यांचे निघण्याचे प्रसंगीं स्पर्धी कारभारी होते, त्यांजला कळल्यावर त्यांनीं यांजला लुटून घ्यावें सबब फौजा आडव्या रवाना केल्या. परंतु राजे महिपतराम यांजबराबर सरमजाम साहेबजोपेशीं पांच हजार स्वार पायदळ होतें. कितीएक ठिकाणीं प्रसंग पडला (तेथें) शिद्दीनीं जुमामर्दी करून मशारनिल्हेस घेऊन आले. महाराजांची भेट होऊन ते परतंत्रच, परंतु कारभारी यांनीं त्यांची दिलजमाई चांगली केली. बाजदबरसाद तुम्हीं सांगाल त्याप्रमाणें मनसोब्याची पैरवी होईल. अशा भावीं हुषारीनें ठेविले होते. पुढें धर्माचा बस चालल्यावर राजे महिपतराम भोसल्याकडील वकील उमाजी पाटील या उभयतांचें माथा तांब्राकडील फितुराचा आरोप ठेऊन जिवें मारून टाकिलें. गोठ लुटून घेतला. करोड रुपये महाल मुलूख द्यावा हें धोरण अल्प समजण्याचे माणसाचा सर जाल्यामुळें मसलत गांवखुद जाली. गफूरखां मीरखानाकडील होते, त्याजला लष्करांतून काहाडून दिल्हें. नंतर धर्मानें आपल्या करण्यास जो कोणी प्रतिकूल त्याचें पारिपत्य करावें हा इरादा धरिला. बाळाराम व विठ्ठल महादेव व महिपत गोमाजी वगैरे ल्हान मोठे आपापले ठिकाणीं साशंकित. कोणे समयीं काय अफत येईल. तुळसाबाईचाहि बस राहिला नाहीं. पुढें इंदूर मुक्कामींहून कूच करून मेवाडांत आले. धर्मानें हुकुमाची प्रवृत्ति महाराजांसारखी चालविली. शिलेदार पागा मुत्सदी वगैरे कोणी असो, तफावत पडल्यास पा (रप)

---

(११६) **गोतबात** – गोतपात. जातींत घेण्यासाठीं एका पंक्तीस जेवावयास बसावयाचा समारंभ. **भलावण सावकारी** – सावकारी निशा, भरणा करून देऊं अशी सावकारांनीं करून दिलेली हमी. **स्पर्धी** – स्पर्धा करणारे, हितशत्रु. **साहेबजोपेशी** – ! साहेबानें जोपासना केलेले ! युरोपियन अधिकाऱ्यानें शिक्षण दिलेलें किंवा कवायत शिकविलेलें ? **तांब्र** – तांम्र, इंग्रज. **बस** – वर्चस्व, हुकमत. **सर होणें** – वरचष्मा होणें. **प्रवृत्ति** – तऱ्हा.

त्याशिवाय दुसरी गोष्ट नाहीं. एकमुखी रुद्राक्ष जाला. तेव्हां मीरखान नवाब याजकडे प्रेष गेले कीं, तुम्ही तिकडे काय करितां ? दौलत गुलामाचे घरांत गेली. मग नवाब तिकडील संधान सोडून दरकूच मेवाडांत आले. तों धर्मा फौजेचा बंदोबस्त करून त्यांचा चिंचूप्रवेश होऊं दिल्हा नाहीं. नवाब व तुळसाबाई मुत्सदी यांचें सूत्र एक. तेव्हां मीरखानास निकराईची लढाई लढावयाचा विचार त्याजकडील हजार पांचशें स्वारांचा गोळा आला म्हणजे चार कंपन्या, दोन तोफा घेऊन बेलाशक गोळे मारावे. त्यांना टाळा देणें प्राप्त हाच मग. त्यांनीं पलटणाची गांठ पडूं न देतां फौजेची घेराघेरीं आरंभिली. रसद, चारा भरून आला म्हणजे चारा उतरून घ्यावा. घोडे माणूस हाकून द्यावें असें करूं लागलें. यानें लष्करांत चारा व धान्य न येऊं पावल्यामुळें लष्कर बेदील जालें. पलटणें भोंवतालीं घालून दरम्यान फौज असे तीन चार कूच करून आला. नजीक निवाहेडा चल नदीवर मुक्काम आला. ते दिवशीं मीरखानाचे अडचणीमुळें मुक्कामीं येण्यास कांहीं रात्र जाली. ते दिवशीं रात्र होऊन अंधार पडला अस्ता एकहि मशाल लावूं दिल्ही नाहीं. हलकें माणूस पुण्य थोडें. अंतःकरणांतून दौलतीचा अभिलाष उत्पन्न होऊन, बाडांत नागवी तलवार घेऊन पालख्यांत बाडाच्या हिंडूं लागला. मग त्याचे अंतःकरणीं काय असेल तें असो ! हें वर्तमान सदरदीन हवालदार हुजरातीचा मालक याजला समजतांच रऊ पाटील खास तबेलेवाला याजबरोबर पांच सहाशें बारगीर तोडें सिलगाऊन देऊन बाडाकडे पाठविला. त्यानें येऊन धांदल केली. ' पराय राज्यांत आणून प्रहर रात्र जाली, अद्याप डेरादांडा, दिवाबत्ती नाहीं हें काय ? धर्मदादा कोठें आहेत ? ' असें तोंडानें मात्र बोलून मशालची व फरास (यांस) धोपटाधोपटी करून मशाला लावून डेरेबाड उभें केलें. ते दिवशीं त्याचे मनांतील धर्म काय असतील ते महकूब जाले. यांतील वियष पलटणांत समजून त्याचे अंतःकरणास गोड न लागतां अवघे कुमेदान आपसर वगैरे एकत्र होऊन कौंसल केलें. आपण विदेशीं. धन्यानें एक आपला इमान शाबूत पाहून लाख फौजेचा मोहरा मारावा,या मरातब्यास आणून लाखों रुपयांची दौलत आपले जिमेस केली व लाखों रुपये

---

(११६) **एक मुखी रुद्राक्ष जाला** – एकट्याच्या हातीं सर्व सत्ता केंद्रित झाली. ज्यास एकच तोंड आहे अशा रुद्राक्षास एकमुखी रुद्राक्ष म्हणतात. **गुलाम** – सेवक, हुजऱ्या. **चिंचूप्रवेश** – चंचुप्रवेश. **गोळ** – गोल, जमाव. **हाच** – ? **हलकें माणूस पुण्य थोडें** – हलकट मनुष्य त्याच्या हातून पुण्यकारक गोष्ट कशीं घडणार ! त्याच्या हातून पापकृत्येंच घडावयाचीं. **पराय** – परक्या. **धर्म** – हेतु.

आपल्यास चारले. ती क्रिया एकीकडे ठेवून गुलामाचे नादीं लागून धन्यास अपाय करावा. यांत कोणी जाल्यास आपले सहा रुपये आपले कपाळीं आहेतच. ते पक्षीं ज्याचा शेर खातों त्यास सामल असोंवे ही नेकसल्ला. असा निश्चय करून हिंदूनीं गंगा व मुसलमानांनीं कुराण (उचलून) एकदिली करून तमाम आपले आपले पलटणांत वरदी फिरवून दिली. हें वर्तमान विठ्ठल महादेव यास समजल्यावर त्यांनीं बाळाराम शेटाकडे जाऊन संधी पाहून विचार केला कीं, पलटणवाल्यांची व आपली एकदिली करून गुलाम मारून टाकावा. असा निश्चय करून कुमेदान बोलावून त्याशीं बोलणें लाविलें. त्यांनीं एकच उत्तर केलें कीं, " धन्यानें आमचें घरदार कांहीं एक पाहिलें नसतां आमचा इमान अंकित करून दौलत आमचे हवाली केली. मुसलमानाचे पारिपत्याविषयीं भरोंसा आमचा तेथें आम्हीं गुलामास सामल होऊन धण्याशीं हरामखोरी करूं यांत ईश्वर आम्हांस काय जय देणार ? पुढें विदेशी माणसांची पत जाऊन शिंदे, होळकर, मोंगल, फिरंगी कोणीहि पायपुसापाशीं उभे राहूं न देतां लाखों माणसांचें अन्न उठेल. आमचे तलबेचा कोणीहि जिम्मा करावा. जे या फितुरांत आहेत तितक्यांस धरून आपले स्वाधीन करून देतों. पाहिजे तें करावें." तेव्हां बाळाराम शेट खरे, परंतु दौलतीचे कारभारी विठ्ठल महादेव पहिलेपासून सावकारी करीत होते. अलीकडे हा रोजगार जाल्यावरहि सावकारीचा श्रम विशेष वाहाडला. देण्याघेण्यांत बोलण्यांत सावकारी चाल हें सर्वांस माहीत तथापि बाळाराम शेट यांनीं छातीस हात लाविला कीं,तलबेचा आमचा जिम्मा. त्यांनीं उत्तर केलें कीं, घाल आपणच. जें होणें तें आपल्याच हातून होईल. परंतु जिम्मा सावकारी पाहिजे. मग तात्यांनीं छातीस हात लाविला कीं, तलबेचा जिम्मा माझा. आपण राजी जाले. मग महिपत गोमाजी बोलावून बाडापाशीं जाऊन तुळसाबाईस हा कार समजावून आपसरांची खातरी तसलीम व तात्यांचा पैक्याविशीं जिम्मा पक्का करून प्रातःकाळीं जे या कुभांडांत तितके धरून आमचे स्वाधीन करावे. आजपासन आठां दिवसां तुमची वांटणी चालू करूं. असा नमूद सिद्ध होऊन प्रातः-

---

(११६) यांत कोणी जाल्यास इ० – यांत कोणीहि विजयी झाला तरी आपल्या कपाळची सहा रुपयांची नोकरी कांहीं सुटत नाहीं. आपणास कांहीं मोठा फायदा होतो असें नाहीं. म्हणून आतांपर्यंत ज्याचा शेर खाल्ला म्हणजे ज्याचें अन्न खाल्लें त्याची बाजू धरावी हा उत्तम मार्ग. **आपण राजी जाले** – स्वतः जिम्मा घेण्यास तयार झाले. **कार** – कारस्थान, मसलत. **खातरी तसलीम** – खातर – तसली, खात्री.

काळीं सूर्योदयात्मात पलटणांत गुल करून धर्मा व सोभाराम व गपूसिंग व बाजूसिंग चौघे धरून देवडीवर आणून तुळसाबाई समक्ष शेटजीचे स्वाधीन केले. डोकीं मारावीं असा निश्चय झाला. नबाब मीरखानहि येऊन सामल जाले. मग तृतीय प्रहरीं फाल्गुन वद्य ११ सन १२१९ धर्मा व सोभाराम यांचीं डोकीं मारिलीं. गपूसिंग व बाजूसिंग एक वस्त्रानिशीं काढून दिल्हे. नबाब बराबर होतेच.

(११७) एकलिंगजीस कोणी तेलंग ब्राह्मण एकलिंगजीचा पुजारी याजकडील प्रेष आला कीं, महाराज या ठिकाणीं मजपाशीं आल्यास दोन दिवसांत वृत्तीवर आणीन. या दुराशास्तव दरकूच एकलिंगजीस जाऊन तेथें उपाय केला. कांहीं अंतर पडलें नाहीं. ब्राह्मण पळून उदेपुरास गेला. नंतर माघारे रासमीचे मुक्कामीं आले. मीरखानाबराबर तात्या आळेकर होते. मीरखान तुळसाबाईचा विचार होऊन तात्या आळेकर यांनीं कारभार करावा असें ठरलें. तात्या आळेकर यांचा संप्रदाय सारे आपून करावें परंतु माथ्यावर घेणारा वेगळा पाहिजे. त्याचे मागें आपण असावें. बाळाराम शेट याजला कांहीं चरित्र दाखवावें यास्तव नबाब मीरखान यांनीं फैल घातला कीं, आम्हांस दोन कोट रुपये लोकांचे व सावकारांचें देणें याचा मार्ग काय कादितां ? असें बोलणें घातलें. तेव्हां तुळसाबाई यांनीं तात्या आळेकर यांचे संधानें बाळाराम शेट याचे गळ्यांत हात घालून, " दादा कसें करूं ? नबाबास येथून कहाडावें. " तेव्हां यांतील चिन्हें बाळारामासी समजलीं. प्राण जाण्याचा समय आहे. तथापि छातीचा पुरुष. नबाबाशीं मेळ करून निभाऊन घ्याल तर सोईसोईनें तुम्हांस पेंचांतून काढील. त्यांनीं उत्तर केलें कीं, माझ्या तरी छातीस कटारा लागल्या आहेत. याची शकल काय ? बाळाराम अगरवाले यांनीं उत्तर केलें कीं, चौ महिन्यांचे करारानें चिठ्या मजवर कराव्या. आपण

---

(११६) गुल करणें – दंगा करणें.

(११७) **वृत्तीवर आणीन** – वेडांतून बरे करीन. **संप्रदाय** – रीत, पद्धति. **आणून** – आपून म्हणजे आपण असें पाहिजे. **माथ्यावर घेणारा** – जोखीम पत्करणारा, जबाबदारी स्वीकारणारा. **फैल घालणें** – कुरापत काढणें. **अंतर** – फेर. **ब्राह्मण पळून उदेपुरास गेला** – बोलल्या प्रमाणें गुण आणून दाखविला नाहीं याबद्दल प्रायश्चित्त मिळेल या भीतीनें. **आपून** – आपण स्वतः जातीनें. **माथ्यावर घेणारा** – अधिकृत जबाबदार मनुष्य. **चरित्र दाखविणें** – चमत्कार दाखविणें, इंगा दाखविणें. **फैल घालणें** – बोलणें घालणें. **काढील** – काढीन असें पाहिजे. मोडी वाचनाची चूक. **शकल** – मार्ग, युक्ति.

उदेपुरास जाऊन कांहीं ऐवज घेऊं. पुढें कोटयास जाऊन सावकार पाहून फैसला करून देऊं. मीरखानाचेंहि गळीं उतरलें. मग कांहीं शिलेदार पागा पलटणें बरोबर घेऊन नबाबाचा भराव समागमें तसेंच उदेपुरास आले. तेथें कांहीं ऐवज घेऊन ज्याची लाखाची चिठी त्यास शंभर रुपये दिल्हे. नबाबांनीं चिठ्या दीड कोटीच्या केल्या. त्याची खातरी शेटजीनें करून हवाला घेतला. उदेपुरास लाखीं शंभर या अन्वयें कांहीं दिल्हें, कांहीं देतों दिलावितों ऐसें करून कोटयास येऊन जालमसिंगास वर्तमान समजाऊन तात्या आळेकरहि त्याप्रसंगीं आले. त्रिवर्गांचा विचार होऊन शेटजीस गांगूरोणीचे किल्ल्यावर लपविलें. तेव्हां नबाबाचे देण्याचा राडा बहुतेक पडला. मग जालमसिंग दरम्यान पडून लाखीं साडे बारा ठरविलें. त्यांत उदेपूरचा वसूल मजरा घेऊन बाकी चुकवून द्यावी. हे रुपये साहा महिन्यांचा करार. साहा महिन्यांनीं व्याज चार रुपये शेंकडा कबूल करून घेऊन बाकी द्यावी. अशा तऱ्हेनें लाख पन्नास हजारांत दीड कोटीच्या फारखत्या घेतल्या. नबाब आपले मार्गें टोंक रामपुऱ्याकडे गेले. गफुरखां बराय मसलत हुजूर राहिले.

(११८) मग तात्या व बाळाराम शेट लष्करांत येऊन सरकार फौज राहिली या व्यवस्थेची तरकीब काढिली. बापू विष्णू याजबरोबर दोन पलटणें, चार हजार शिलेदार, पांचशें हुजरात ऐसे समागमें देऊन पोट भरावया मार्गस्त केले. तसेंच रामदीन व जगंनाथ राजाराम याजबरोबरहि सरमजाम देऊन रवाना केलें. इतक्यांत तिन्ही सुभ्यांत रामदीन याजकडे माहाल महत्पूर, सावेर, रावेर, प्रतापगडचा टाका इतकी जागा मुबादल्यास होती. याजमुळें त्याचे फौजेचा गाबावाबा हेरले बाहेर सुदरून काळ कहाडला. केवळ माहालचा ऐवज अकलेश पदरीं पाडून हातावर फौज चालविली. सरकारांत बोभाट येऊं दिला नाहीं. लोकांशीं आधार यांजकडे माहाल आहेत चिंता काय ? रुपये आपले येतील. अशा भावीं गुजारा चालत गेला. बापू विष्णू यांनीं सोळा महिने गुजारा केला.

---

(११७) भराव – जमाव. **लाखीं शंभर** – लाखाच्या ठिकाणीं शंभर. लाख द्यावयाचे तेथें शंभर दिले. **देतों दिलावितों** – देतो, देववतो. **राडा** – दंगा. **बहुतेक** – बहुत – कांहीं, फार. **मजरा घेणें** – हिशोबांत वळतें करून घेणें.

(११८) सरकार फौज राहिली – सरकार फौजेच्या देण्याची तोड काढणें तेवढी राहिली. **तरकीब** – योजना, उपाय. **गाबावाबा हेरले बाहेर सुदारून काळ कहाडला** – ! **हातावर फौज चालविली** – फौजेस रोजचे रोज तात्पुरतें खर्चास देऊन फौजेंत असंतोष होऊं दिला नाहीं.

(११९) पुढें पलटणाचा बैदा सागर प्रांतींहून माराकुटी झाली. मग त्याचीं तगीरी करून केशवराव माहडीक बंदोबस्तास पाठविले. सरकारांतून मदत कांहीं कापड बाळारामशेठ यांणीं दिल्हे. त्या कापडावर शिलेदार यांची समजूत केली. पलटण पागा याजला नक्त रुपये पाहिजेत तसेच जगंनाथ राजाराम यांणीं बासचाडा वगैरे चार दिवस काळ काडला. तेथेंहि पलटणाचा बैदा होऊन तेहि पलटणवाल्यांनीं माघारी आणले. सरकार स्वारी भानपुऱ्यास आली. तेथें उभयतां सुभे जगंनाथ राजाराम व केशवराव माहडीक येऊन दाखल झाले. पलटणचा बैदा त्यांत जगंनाथ राजाराम यांजकडील पलटणवाले यांनीं चालून घेतले. मग तुळसाबाई आदिकरून खटल्यास काढून रामपुऱ्यास रवाना करून, बाळारामशेट व तात्या आळेकर व विठ्ठल महादेव हे भानपूर मुक्कामीं पलटणचे मुकाबल्यास राहिले. मग पलटणवाल्यास कायल केलें, "तुम्हीं सरकार चाकर, पोटास मागावें तें न करितां वाडावर चालून घेतलें याचें प्रयोजन काय?" मग पलटणवाले कायल होऊन सांगितलें कीं, आम्हांस लक्ष्मीचा पेगाम आला कीं, तुम्हीं चालून याल तर पैका मिळेल. म्हणोन आम्हीं आलों. यांत कांहीं फितुरसा उत्पन्न झाला. मग लक्ष्मीस कैद करून इंदुरास पाठविलें. दोन हुजरे तोफेचे तोंडीं दिल्हे. पलटणचे कुमेदान कैद करून शिपाई फोडून तलब वांटितों म्हणून गणपतराव दिवाण व कुशाबा बक्षी तीन हजार स्वारानिशीं तलब वांटितों म्हणून पलटणांत गेले. दोन दिवस राहून गोड गुळचट बोलून विश्वास देऊन बेफाम केलें. तिसरें दिवशीं सूर्योदयाप्राग तयारी करून पलटणें लुटून घेतलीं. तोफा बंदुखा टाकून निघून गेले. यांणीं तोफा बंदुका गोळा करून आणल्या. दुंदरनेकाचे हातचा कंपू त्यांतील पलटण जयद बरबाद झाली तीहि माणसेंहि पुनः मिळालीं नाहींत व पलटणेंहि भरलीं गेलीं नाहींत! ही जरब केशवराव माहडीक याचे बरोबरील पलटणावर पडून, त्यांत पांच पन्नास दगाई होते ते काहडून दिल्हे. वरकडाचा फडशा केला. असा त्यांनीं करून घेतला.

---

(११९) माराकुटी – माराकूट, अत्यंत त्रास. **तगीरी** – बडतर्फी, कामावरून काढणें. **लक्ष्मीचा** – बाईसाहेबांचा, तुळसाबाईचा? **पेगाम** – प्रेष, निरोप. **बेफाम** – बेसावध. **जयद** – ? **दगाई** – दंगा करणारे, फितुरी.

मल्हारराव होळकर (तिसरा)

(१२०) पुढें सन १२२१ कार्तिक शुद्ध ११ स्वारी भानपुरे मुक्कामीं असतां यशवंतराव महाराजांचा काळ झाला. दिवस करून मल्हारराव महाराज गादीवर बसण्याचे प्रसंगीं जालमसिंग कोटेकर व लालाजी बल्लाळ आदि करून आले होते. समारंभ होऊन त्यांस बिदा केलें. नंतर ढाबळ्यावर छावणीस गेले. तेथून दोन पलटणें दोन पागा समागमें देऊन राजेश्री बाळोजी इंगळे याची रवानगी खेचीवाडयांत केली. फौज पलटणें यांची समजूत काढून पुनः छावणी कोहोळ्यास येऊन केली. तेथें महाराजांस देवी निघाल्या. नंतर अग्निसंस्कार छावणीस झाला. त्यांत वडिलोपार्जित कागदपत्र व कांहीं जवाहीर दग्ध जालें. नुकसानी गोष्ट फार मोठी झाली. तेथून कूच करून नजीक भानपूर इंद्रगडाखालीं मुक्काम झाला. तेथें तीन रोज मुक्काम झाला होता. त्यांत महामारीचें उपद्रवानें शेंकडों माणसें गारद झालीं. त्रासरूप होऊन तिसरें दिवशीं अर्ध रात्रीस कूच केलें. शामगड तालुके गरोट येथें छावणीस आले. प्रावृट्काळ चार महिने तेथेंच काढले. त्यांत तात्या आळेकर यांनीं हवा पाहून तीर्थरूपांचें भेटीस जातों, महाराजांचे प्रतापेंकडून मूलबाळ दृष्टीस पडलें आहे, देवदर्शन करून आपल्याला काम पडल्यास बोलावाल ते वेळेस हजरच आहों, अशा भावीं साकर पसरून मैनाबाईस अनुकूळ, तेव्हां तुळसाबाई अर्थातच, अशा संधींत दौलतींत हिंडल्या वागल्याचा मोहाजबा व बोलापेशासारखा नमोदसिद्ध करून गौरवपुरस्कर निघाले. तों उष्ण काळ दिवस मूल ल्हान ये विषयींचा जाबताहि पुसला तथापि कसे घडेल काय घडेल यास्तव तीर्थरूपांस पत्रें लिहून महेश्वरास भेटी व्हाव्या असा बेत केला. महेश्वरीं भेटी झाल्या. तेथें मुलास विकृति होऊन मूल मेलें. यामुळें बहुत उदास. हें वर्तमान तुळसाबाईस, मैनाबाईस समजल्यावर यांचे अंतःकरणास वाईट वाटून मातंगपोसीस, अपशकून जाला, यामुळें माघारी आणावें याजकरितां रेवाजी फणसे यांची रवानगी केली. ते महेश्वरीं

---

(१२०) **अग्नीसंस्कार छावणीस झाला** – छावणीला आग लागली. **प्रावृट्काळ** – पावसाळा. **साकर पसरून** – साखर पेरून. **मोहाजबा** – Fig – Acquittal or cleared state तात्या आळेकरानें दौलतींत जो कारभार केला तो सर्व सरकारांत यथास्थित समजाविला व आपण कांहीं एक अफरातफर किंवा गोंधळ केलेला नाहीं असें सिद्ध करून पटवून दिलें. **बोलापेशा** – ? **मातंगपोशी** – मातम पोषी, दुखवटा, समाचार.

आलियावर यजमानाचें गौरवपूर्वक भाषण श्रवण करून, तीर्थरूपांस देशीं रवाना करून माघारी यावयाचा बेत ठरला.

(१२१) तों देशीं नथू फणसे याणीं बंड करून महिपतराव होळकर याचा मूल खास व विदूर दोन्ही बगलेंत मारून फौज ठेवून उद्योग आरंभिला. या गोष्टीस पांच विश्वे संमत भीतरपेटे श्रीमंतांचेहि होते. त्या आधारावर फणसे मजकूर मुलास घेऊन जेजोरीस जाऊन मार्तंडाचें दर्शन केलें. पुढें पुण्यास जाऊन एखादी मसलत उभी करावी. हें वर्तमान रामगड मुक्कामीं सरकारांत समजल्यावर त्यास धरून आणावें असा बेत ठरून आळेकर यांस पत्रें ताबडतोब गेलीं कीं, परशराम होळकर बमय फौज पलटणेंसुद्धां व रघुनाथ आपाजी उर्फ बाबा पागे व रोशन बेग नर्मदेचे आसपास नेमाड प्रांतीं त्यांजला चार रुपये खर्चाची अडचण असल्यास कार्याकारण मदत करून, फौज हामराहा होऊन, खानदेशांत उतरून, नथू फणसे पोरासुद्धां धरून आणावे, असा बेत करून मग तुम्हीं यावयाचें करावें. मग हीं पत्रें इंदूरचे मुक्कामीं आलीं. तेथें मास पक्ष मुक्काम करून, सरदाराची व फौज पलटणांची दिलजमाई करून, पंचवीस हजार रुपये खर्चास देऊन, सहा आणे पागे मजकूर याचे बेडयांत व दहा आणे परशराम होळकर याचे बेडयांत हा शिरस्ता जातीनें खर्चास दिले. पुढें उत्पन्न होईल त्याचा घाट घालून देऊन आपसांत हिला हरकत लौकिकी न दाखवितां एकदिलीनें रवाब जमवून पोरें व फणशा हस्तगत करावें असा बंदोबस्त करून देऊन, फौज ताबडतोब सेदव्याचा घांट उतरून तापी तीरास दाखल झाल्या. पुढें दरकूच येणार हा इरादा खानदेश स्वदेश यांस समजल्यावर मागें जातीनें यशवंतराव होळकर मालक असतां पृथ्वीचा पाटावरवंटा झाला त्याचा अद्याप उश्वास टाकिला नाहीं. तेव्हां ही फौज आली असतां प्राण राहणें कठीण. महाराजांचे प्रतापाचा जुलूष भारी, फौज अनिवार, श्रीमंत धैर्याचा व खंबीराचा गाढा. फणसे याशीं बोलण्याचें व इरादे एकीकडे ठेवून सरंजाम जेजोरीस पाठवून दोन्ही मुलें व फणसें मशारनिल्हे यांस निजलेले हस्तगत करून खंडो महादेव यांचे जिमेस केले. आणि फौज तापी उतरून जय अशी पत्रें फौजेस व फौजेवाले सरदारांस थेट लगत पाठवावीं म्हणून आज्ञा केली. मग खंडो महादेव याणीं त्रिवर्ग फौजेंत पोहोंचवून पत्रें दिलीं कीं, तुम्हीं तापी उतरत

(१२१) **विदुर** – अनौरस, लेकवळा. **घाट घालणें** – तोंडमिळवणी करणें, व्यवस्था लावणें. **खंबीर** – मूळ शब्द खमीर, निश्चय. **जय** – फत्ते. ' फत्ते केली ' अशीं पत्रें.

आपला मुद्दा घेऊन घांट चढून जावें. असाच लेख सरकारांतहि गेला. तेथूनहि आज्ञा आली कीं, तुम्हीं पोरें घेऊन हुजूर यावें. फौज पोरें घेऊन घांट चढून गेली.

(१२२) इकडे शामगडावरून मुक्काम रावपुऱ्यास आला. तेथें शिलेदार याचा बइदा मोठा जाहला. सात दिवस धरणें एक एक बाडासुद्धां जाहलें. पाणी देखील बाडांत जाऊं दिलें नाहीं. त्याची कांहीं तोडजोड होत आहे तों मीरखान येऊन दाखल जाहले. तेव्हां मोठाच राडा पडला. मग नबाबाची समजूत गुगलछबडा व निंबोहाडा दोन महाल लावून दिल्हे. त्यांत गुगलछबडा किल्ला मातबर. कुटुंबें ठेवावयास म्हणोन दिल्हा. आणि निंबोहडा मामलत म्हणून सांगितली. नबाबाचें कूच झालें. राहिले सिलेदार त्यांजला दम दिल्हा. तुम्हांस रोडगडावर शह देऊन तुमचा फैसला करून देऊं. असें बोलण्यांत आणून रामपुऱ्याहून कूच करून नजीक म्हसरोडगड मातेसरीस मुक्काम झाला. पुढें महाराजांचे लग्नाकरितां इंदूरास ताबडतोब जावयाचें. फौज तलबेविशीं बेबहा. आळेकर लष्करांत ग्वालेरीस गेले. शेटजींचे जिवावर अवघी करामत तोड–जोड फौज पुढें जुमस खाईना. तेव्हां मराठी फौज यासी कळविलें कीं, “ तलब आज अथवा उद्यां मिळावयाची तशी मिळेलच परंतु धनी बाळराजा, बायकाशीं गांठ, लग्न ये वर्षीं न झाल्यास पुढें होईल, परंतु जन्मभर ठोंसरा तुम्हांवर राहिल कीं, आमचे सोयेरधायेरे आप्त यांनीं पैक्यावर नजर ठेवून मुलाच्या लग्नांत वेध पाडला. महाराज असतां असें कोणीं केलेंच नाहीं. बायकामाणसें पाहून ओळख सोडली. याचा मात्र विचार करा. तेव्हां मराठमंडळ यास अंदेशा पडून, मेळ आपसांत विचार करून, कूच करावें असें ठरलें. पठाण यांची समजूत झाली नाहीं. मग सरकारचें कूच होऊन दरमजल इंदुरास आले. शेटजी पठाण मंडळ घेऊन भानपूर मुक्कामीं राहिले. नित्य धरण्यापारण्याशीं गांठ. तथापि शेटजी (ची) माया विशेष. मास पक्ष फोडा भागून दम देऊन लग्नाचे पहिले दिवशीं येऊन दाखल झाले. वैशाख शुद्ध सन १२२४ चे सालीं (लग्न) झालें. सोयरीक त्रिंबकराव देशगावडे यांचे कन्येशीं झाली. समारंभ फार मोठा झाला.

---

(१२८) **शह देऊन** – शह देऊं. (जुन्या ऐतिहासिक कागदपत्रांत कित्येक वेळां अनुस्वाराबद्दल पुढें (न) असें अक्षरच लिहण्याची पद्धत असे. येथें शह देऊन म्ह. शह देऊं. **शह** – हवाला. **दम देणें** – आश्वासन किंवा धीर देणें. **बेबहा** – बेबंद, बिथरलेली. **ठोंसरा** – आरोप, शब्द. **बायका माणसें पाहून ओळख सोडली** – कोणी कर्ता पुरुष राहिला नाहीं. फक्त बायका माणसें उरलीं असें पाहून त्यांना नडविण्यास सुरुवात केली असा बेईमानाचा आरोप तुमच्यावर येईल. **फोडा भागून** – ?

(१२३) नंतर सन १२२५ चे अव्वलीस आषाढमासीं कूच करून धनवडचे मुक्कामीं आले. दरम्यान कळशास मुक्काम झाला होता. तेथें गांववाल्यांनीं गोळी वाजविली. याजमुळें स्वारी चालतां चढे घोड्यानिशीं हल्ला केला. कांहीं रांगडे पळाले. कांहीं रांडापोरानिशीं धरून आणले. धनपटेस आल्यावर सिल्लेदाराचा बइदा पुन्हां झाला. तात्या आळेकर शिंद्यांचें लष्करांतून शिंदे यांचेविशी सावकार घेऊन आले होते, ते परभारें कोटयास राहिले. लष्करांत आले नाहींत. त्यासी आणावयासी विठ्ठल महादेव व शामराव पांडुरंग प्रथम गेले. याची दाद न लागतां फिरून आले. मग मैनाबाई जातीनें गेली. हिनेंहि बहुत प्रकारें समजाविलें. तथापि न येतां मैनाबाई फिरून आली. तात्याचें येणें न होय ही गोष्ट तुळसाबाईचे मनांत बाईटशी वाटून गणपतराव नारायण याचे हातें कामकाज घ्यावें, ऐसा भितरपेटया कार ठरला. हा मैनाबाईस टाकून संचणी होऊं लागली. ही गोष्ट तिजला असाह्य होऊन पलटनचें काम मैनाबाईकडे, पलटणांत बैदा होतांच, त्याचे समजुतीस जातें असें म्हणून पलटणांत गेली. रामदीन मैनाबाईचे पेटयांत, तेव्हां खूळ करावें अशा करण्यांत प्रवर्तक होऊन, बाईस समजल्यावर रामदीनास परभारें कैद करून पलटणवाल्याची खातरतसलीम करून मैनाबाईस कैद करून बिजलपुरास पाठविलें.

(१२४) तात्या आळेकर याजला कसेंहि करून आणावें. आपले कृत्यास विपर्यास होऊं पावणार नाहीं. असा निश्चय करून कपूरखां याजला व मिरसेदुद्दीन सारंगपूरकर पठाणमंडळपैकीं शहाणा माणूस व जमियतीचा धनी आणि प्रामाणिक. उभयतांस पाठवून, भुलथापा देऊन, तात्यास घेऊन आले. इकडे विठ्ठल महादेव व गणपतराव नारायण यांणीं कारभार करावा असें खचीत ठरून, तात्या आळेकर याजपासून पैका घ्यावा, असे उकाल निघूं लागले. तेव्हां आळेकर कपूरखांचे गोठांत जाऊन राहिले. त्याचे मुनीम माधवराव गणेश हे खासगीचे कामांत. याजवर हुजुरात वगैरे याची धरणींपारणीं होऊं लागलीं. त्यांत बाळाराम शेट व माधवराव गणेश यांणीं शक्कल ही काढली होती कीं, ज्यांत दौलतीचा बंदोबस्त प्रतिकूल त्याचें पारपत्य पारंपरी वोघास उचीत अशी शक्कल. परंतु आळेकर

---

(१२३) **कार** – करार. **मैनाबाईस टाकून** – मैनाबाईस न कळवितां. **खूळ करणें** – दंगा करणें, बंड करणें. **बाईस** – तुळसाबाईस. **खातर तसलीम करून** – खात्री करून, आश्वासन देऊन; अर्थात् तुमचा पगार वेळेवर देऊं, व बंड केल्याबद्दल तुम्हास शासन करणार नाहीं अशा अर्थाचें आश्वासन देऊन.

(१२४) **उकाल** – ओकाऱ्या. भावार्थ तात्या आळेकरास लुबाडावें असें पोटांतलें भावगर्भ बाहेर येऊं लागले.

हवालदील होऊन रुकारांत आले नाहींत. याजमुळें ती पैरवी मनचे मनांत राहून विठ्ठल महादेव व गणपतराव नारायण यांणीं पर्याय काढला. शिलेदार पलटणाची निकड सतत बसावी असा ठिकाण दिसेना. सबब गंगरोडचे किल्यावर जाऊन फौजेस जाब द्यावा. असा नमूद भितर पेटे सिद्ध करून, जावयास निमित्त सरकारांत पांच खण दुमजला बांधले होते, त्याजवर दिवाभीत येऊन बसलें, तेव्हां तेथें राहणें चांगले नाहीं, गंगरोडास चालावें, असा निश्चय करून कूच केलें. गंगरोडास येतांच बायाच्या पालख्या व महाराज किल्लेदाखल झाले. त्या संधींत आळेकर टाळा देऊन कोटयास गेले. पुढें फौज तरंगली. शेटजीसुद्धां व कारभारीसुद्धां शहरांत दाखल. फौज शहरांत येण्याची परवानगी नाहीं. फौज बाहेर, हे आंत. असे चार महिने निघोन, पुढें पलटणवाल्यांनीं कट करून, कांहीं पहारे किल्यावर अरदली खांशापाशीं होते, कार्तिक शुद्ध १५ ग्रहण होतें. त्या संधींत पांच चारशें माणूस हल्ला करून दरवाजावर आले. गणपतराव दिवाण याजला धरून दरवाज्यावर आणलें. विठ्ठल महादेव सावध होऊन किल्यावर गेले. तों लष्करांत जोतिबा नाईक याजला समजतांच शंभर बारगीर घेऊन दरवाजे अवघे पलटणवाल्याचे स्वाधीन तेव्हां मधींच गांवकूस चढून शंभर बारगिरानिशीं किल्यावर गेला. किल्ला आंवळून पलटणचीं माणसें दामदस्त अरदलीसुद्धां काहडून दिले. पलटनवाल्यांनीं गणपतरायास पलटणांत घेऊन गेले. तेथें तलबेचा फडशा करून घेऊन तोफा बंदुका मुकुंददऱ्याचे आंत दाखल झाल्यावर तुमचे स्वाधीन करूं असें बोलण्यांत आणोन, वाली दोन घेऊन, कूच करून गेल्यावर गणपतराव किल्यावर पोहोंचवून दिल्हे. गणपतराव किल्यास आल्यावर हुजुरच्या पलटणीचा बइदा झाला. पुढें बाहेरील पलटणें रोशनबेग वगैरे तेहि येऊन पोहोंचले. तात्या आळेकर तर निघून गेलेच होते. राहिले बाळाराम शेट व माधवराव गणेश, त्यांत माधवराव गणेश पाहऱ्यांत होतेच. राहिले बाळाराम शेट तेहि कैद केले. मासपक्ष कैद होते. पुढें त्यांचे शरीरास विकृति होऊन काळ झाला. तों पलटणें बाहेर तैनातीस होतीं तीं अवघीं जमा होऊन आलीं. त्यांची निकड त्यांत मैनाबाईकडील हरीसिंग कपतान जिनसींत होता. तो कैद करून मारहाण केली. तों माघ शुद्ध १४ स पलटणें चढून आलीं. इकडूनहि हुजरात पुढें होऊन बाया निघून भोजखेडीस आल्या. पलटणें व पठाणमंडळ व कपूरखां अवघे एकत्र होऊन, गांठ बांधून, रामपुऱ्यास आले. भोजखेडीचे मुकामीं रामदीन कैद होता. त्याजकडे कांहीं ऐवज घेणें ठरला तो

(१२४) **सतल** – पक्की, जाम. **दिवाभीत** – घुबड. **वाली** – वोली असे पाहिजे. **वोल** – ओल Hostage. **जिनसी** – तोफखाना.

विठोबा तात्याकडे भरणा करावा असा करार. त्यांत कांहीं देऊन कांहीं देऊं दिलाऊं अशावर काळ काढला. एके दिवशीं जोतिबा नाईक शेंपन्नास बारगीर घेऊन जाऊन एवजाविषयीं तगादा रामदिनास सक्त केला. त्यानें चोहों दिवसांचा करार करून रामजी सेडगे वगैरे सिलेदार फोडून पळून गेला. तोहि जाऊन पलटणांत सामल झाला. मग सरकार रामपुऱ्याचे मुक्कामीं येऊन, तेथून विठ्ठल महादेव व जालमसिंगाकडे जाऊन त्याजला दरम्यान घालून, पलटन सिलेदार यांची तोड काहडून, पलटणें सिलेदार सरकारास भेटावें असें ठरलें. नंतर तुळसाबाईचा इरादा श्रीमंतास जाऊन सामल व्हावें. विठ्ठल महादेव यांणीं जालमसिंगास दरम्यान घालून फौजेचा मार्ग काढला. परंतु पैक्यास ठिकाण कोणता ? तेव्हां ठाकूरदास याचे विद्यमानें दिल्लीचा फिरंगी लोणी अक्त्यार याजकडील पैगाम आणिला कीं, "तुमचे फौजेचा हिशेब होऊन पैका निघेल तो आम्हीं देऊं, व तुमचा मुलूख तुम्हांकडे आहे, तो आहेच. दहा लक्षांचा मुलूख तुम्हांकडे आणखी अंतरवेदींत देऊन तुम्हीं माळव्यांत स्वस्थ असावें, श्रीमंतांकडे जाऊं नये व आम्हांकडेहि सामल होऊं नये." असें बोलणें खचीत करून भलावणीची चक्ती जहनसाहेब व मालकणसाहेब पेंढारी यांचे पारपत्यास नर्मदा उत्तर तीरास होत त्यांजवर आणली. हें राजकारण घेऊन विठ्ठल महादेव पाटणचे छावणीहून अहूरचे मुक्कामीं आले.

(१२५) तो गणपतराव दिवाण व तुळसाबाई व जोती नाईक यांचा विचार खचीत होऊन इकडे तिकडे मन न कचवितां वडिलोपार्जित श्रीमंताचे गादीशीं क्रिया आहे तिजवरच मुस्तकीम राहून श्रीमंताकडे जावें. यांतच जें होईल तें होवो. शिळास बट्टा लाऊं नये. पलटणें फौजेची अडचण आहे त्यास आपण जाऊन पोंचले असतां श्रीमंतहि पैका देतील. त्यांचेंहि बोलणें खचीत आहे. ते पक्षीं नेक सल्ला हीच. विठ्ठल महादेव यांणीं फिरंग्याकडील राजकारण आणलें होतें तें कांहीं एक ध्यानास न आणितां आपले इतिकर्तव्यास विठ्ठल महादेव प्रतिकूळ. तेव्हां यांजपासून चार रुपये घेऊन पलटण फौजेची थोडीबहुत समजूत करूं हें मनांत बाळगून विठ्ठल महादेव यांणीं पलटण सिलेदार यांजला दीड लाख रुपये देऊन सिलेदार याशीं बोलणें खचीत केलें कीं बाईसाहेबांची भेट झाल्यावर तुम्हांशीं बोलण्यांत आलें आहे याप्रमाणें उलगडा करून देतील असें बोलोन सिलेदारास बरोबर घेऊन आलेच होते. पलटणाचे खातरींत कांहीं कसर होती. तों सिलेदार

---

(१२४) दरम्यान घालणें – मध्यस्थिस घालणें. **लोणी अक्त्यार** – अख्तर लोनी. **चकती** – पत्र

(१२५) **इति कर्तव्य** – योजना.

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था
१११ शनिवार पेठ, पुणे

भेटल्यावर रामदीन पलटणांत होते, यांणीं तात्यास सोडून सरकारांत पैगम लावून काहुराहून कूच झालें ते दिवशीं चालते स्वारींत येऊन मुजरे झाले. तोफा खुटल्या. स्वारी पुढें मुक्कामास गेली. मागें पलटणें आलीं तीं कोसा दोन कोसाच्या अंतरानें राहिलीं. तुळसाबाईस व दिवाण यांचे मनांत विठ्ठल महादेव यांजविषयीं पाप होतें. सिलेदाराचें ठरावाचें बोलणें ऐकून घेऊन, सिलेदारास आंतून सांगून दिल्हें कीं, तुम्हीं आपले तलबेचा फडशा मशारनिल्हेपासून करून घेणें तेव्हां सोडणें. मग सैदुदीन सारंगपूरकर यांजला किल्लेदारांनीं पुढें करून विठ्ठलपंत तात्यास देवडीवर बिचोबा देऊन ठेविलें. भंवताले सारंगपूरवाल्यांचे चवकीस पठाण. चालते स्वारींतहि त्यांचे पालखी समागमें शें दोनशें स्वार. त्यांचेच सरकारचा रामराम झाला. दरकूच महत्पुरास आले. तेथेंहि पलटणें हीं दाखल होऊन पाठीमागें अदकोसाचें अंतर राहिलें. विठ्ठल महादेव देवडीवर नजरबंदींत महत्पुरास आले. तेव्हां पलटणें फिरंग्यांचीं नर्मदातीराहून उज्जनीस आलीं. पुढें लाला सीताराम कायथ सरकारांत पाठविला कीं, " तुमचें आमचें बोलणें विठ्ठल महादेव याचे विद्यमानें ठरलें आहे. त्याजवर मुस्तकीम होऊन फौजेचा राडा उरकोन श्रीमंतांचा सेवाधर्म कायम ठेवूं. कंपनीच्या घरचीहि दोस्ती संपादावी, आपलाहि वोहोमा शाबूत राखावा." अशा भावीं बोलावयास पाठविलें. श्रवण करून लाला राखावा, त्या संधींत फौजेची तोड पाडून सडी स्वारी घोडा राऊत दोहों दिवसांत नर्मदापार होऊन तापीतीर पहावें, आपले पलटणाची समजूत जाल्यावर आंवळून संभाळून मागाहून येतील, असा बेत ठरवून आपल्याकडून बोलण्यास बहिरो अनंत सबनीस पाठविले.

(१२६) मशारनिल्हे रवाना केलियावर तिसरे दिवशीं पलटणवाले व हुजरात एकत्र होऊन पलटवाल्यांनीं गणपतराव नारायण दिवाण धरून पलटणांत नेले. महाराज बाडांत कचेरीचे जागां खेळत होते तेथून हुजरातवाल्यांनीं बाहेर आणोन हातधोंड्यावर बिचोबा देऊन कनात लावून तेथें ठेविले. तो मागाहून मुख्य मासाहेब बाहेर पडून महाराजापाशीं आली. तुळसाबाईहि यावयास लागली. तो पलटणाचे आपसर व बारगीर आडवे होऊन धमकाऊन आंत घातलें. विठ्ठल महादेव पाहऱ्यांत होतेच. त्याजला मार्गशीर्ष शुद्ध ११ स प्रेमसिंग कपतान याणें पलटणांत नेले. तेव्हां माणूस कोणी राहिलें नाहीं.

---

(१२५) **बिचोबा** – बिन खांबाचा तंबू. विठ्ठलपंतास कैद करून एका राहुटींत ठेवलें. **वोहोमा** – बोज, प्रतिष्ठा.

(१२६) **हातधोंड्यावर** – हातानें फेकलेला धोंडा जाऊन पडेल इतक्या अंतरावर.

(१२७) मग रोशनबेग वगैरे आपसर एकत्र होऊन हुजरातवाले सदरदीन हवालदाराकडील त्यांत कपूरखां कमकसर दोन अडीचशें माणूस मसलतीस बसले. त्यांत विचार होऊन बहिरो अनंत सबनीस दसनसाहेब मालकीणसाहेब याजपाशीं पाठविलें होतें. त्यांजला पत्र ल्याहावें असें ठरून सरकारचे नांवें कागद लिहिला कीं, "सरकारांत पलटणचा दंगा जाला आहे. एक दोन रोजांत बंदोबस्त होऊन तिकडील बोलण्याचा क्रम आहे त्यांतील हांसल ध्यानास आणोन उत्तर लिहिण्यांत येईल याप्रमाणें बोलावें. दोन दिवस महकुबी असावी." असें पत्र रवाना करून सरकारचा खेळखाना व लष्कर पलटणचे बुणगे सडे झाडून नरवर मुक्कामीं राहिले. द्वादशीस रात्रौ तुळसाबाईस कांहीं विकृत होऊन देहावसान झालें. बहिरो अनंत हवा पाहून, तांब्रास पुसून लष्करांत आले.

(१२८) तों मागोमाग पलटणें मुकाबल्यास आलीं. सरकारचें पलटणपैकीं रोशनबेग व रोशेनखां दोघांचीं पलटणें दोन मुकाबल्यास क्षिप्रा आडवी होऊन लयन बांधली. त्यांचा यांचा अदकोस पाऊण कोसाचे तफावतीनें गोळा सुरू झाला. दोन पलटणांनीं असा मार दिल्हा कीं, तांब्राचीं दोन पलटणें बरोबर झालीं. सहाशें गोरा, अठराशें पलटणचें माणूस मारलें गेलें. त्यांत मुख्य दसनसाहेब कामास आले. महाराजांचें बारा वर्षांचें वय, परंतु दोन तरवारा, खांद्यावर बांसडा, सडा घोडा घालावा हेंच बोलणें. गोळे चालत आहेत. महाराज उभे त्या ठिकाणीं गोळ्यांचा पाऊस होता. त्या संधींत श्रीमंतांकडील दोन हुजरे पत्रें घेऊन आले. त्यांत जेवीत असाल तरी आंचवावयास येथें येऊन सामल होणें. पत्रें श्रवण करून लढाई तांब्राची शिकस्त होऊन दोन कोस दाखविली. अशा संधींत स्वारांनीं हल्ला करावा, फौजहि मुबलख, परंतु कारभारी याचे आळाबंधन नाहीं.

(१२९) दुसरे द्वादशीस रात्रौ चार पांच खांसे पठाण मंडळपैकीं व मराठ्यांकडील पैकीं मिळोन, कारभारी तरी कोणी नाहींच, तेव्हां प्रथम सदरदीन हवालदाराकडे गेले. बोलले कीं, "सांज सकाळ लढाईचा इरादा. फिरंग्याशीं लढाई. घोडें माणूस पडेल, जखमी होतील, याचें बोलणें आम्हीं कोणाशीं बोलावें? आमची बरदास्त कोण करील? कोणीहि कारभारी असतां तुम्हांकडे यावयाचें

---

(१२७) सरकारचा खेळखाना – होळकरांचा धनी बाळराजा होता, अर्थात् त्यासाठीं निरनिराळे खेळ बरोबर स्वारीस बाळगावे लागत. तो स्वतंत्र कारखानाच असे. **तांब्र** – इंग्रज.

(१२८) बरोबर झाली – जमिनीबरोबर झाली, जमीनदोस्त झाली. **दोन कोस दाखविली** – दोन कोसपर्यंत इंग्रजांची फौज पळवून लाविली.

कारण नाहीं. धनी बाळराजा. यास्तव तुम्ही दौलतीचे पुराणे रफीक यास्तव तुम्हांपाशीं आलों आहोंत. याचा विचार आम्हांस काय सांगतां ?" सदरदीन हवालदारांनीं उत्तर केलें कीं, तुम्हीं चौघेहि बेडेवाले तसा माझाहि एक बेडा मानावा. कारभारी कोणी राहिलाच नाहीं. तेव्हां धनी आपला बारा वर्षांचा, त्याजवर लक्ष ठेवून, सर्वांनीं एकदील होऊन नक्षा राखावा. नक्षाचे पोटीं आपला जखमाना मोताना तलब धनी देईल. आपण घेऊं. या समयीं बारा अंदेशा काहडले असतां आपल्या हातून कांहीं होणार नाहीं. आणि दौलत गारद होईल. ते पक्षीं आपले कुळशिळावर नजर देऊन, आज पावेतों कैलासवासी महाराजांनीं आपल्यास कांहीं एक कमी न करितां लढाईचे प्रसंगीं जातीनें तरवारा मारून आपला वोहोमा ठेवीत होते. त्याचें स्मरण आजचे प्रसंगीं ठेवून, आपला बाळराजा याचे नक्षास्तव आपला प्राण वेंचून दौलत कायम राखल्यापोटीं आपली अडचण भरून घेऊं व सरकारहि देईल." अशा भावीं काव्यादाव्याच्या गोष्टी सांगितल्या. यांत सिल्लेदाराची हिंमत कांहीं एक राहिली नाहीं. तेथून उठोन बाहेर आल्यावर अपसांत बोलूं लागलें कीं, सदरदीन हवालदार म्हणजे महाराजांनीं चिरंजीवासारखा मरातब राखून मागें पुढें वक्त बेवक्त पडल्यास डोकी देईल अशा भरंवशाचीं माणसें त्यांची शक्कल तरी ध्यानास आली. पुढें पलटणवाले व कपूरखां याजकडेहि जाऊन त्याची उमेद काय आहे ती पाहूं. बाकी देणें घेणें सन्मान करणें हा धनीचा धनीच करील. कोणी घरींहून देत नाहींच परंतु तोंडाचे बोलण्यास याचें काय वेंचते ? असें बोलून पलटणांत गेले. तेथेंहि बारा हुकूम. त्यांनींहि अशाच गोष्टी सांगितल्या. तेथून कपूरखांचे येथें आले. त्यांनीं तरी नेहमींच हिंमत सोडली. मोठा भरंवसा मीरखानाचा. त्याजला मनसोब्याचा आकार ध्यानास आणून सामल होण्याविषयीं हुजरे व पत्रे दररोज रवाना होत गेलीं. त्यांचीं उत्तरें आलों म्हणून मात्र आलीं. भविष्यानुरूप बुद्धीस

---

(१३५) **रफीक** – स्नेही. **बेडेवाले** – बेहेडेवाले, एकेका स्वतंत्र कंपूचे अधिकारी. **जखमाना** – लढाईत जखमा लागल्या तर सरकारांतून शिपायांस औषधपाण्यासाठीं मिळणारी रकम. **मोताना** – शिपाई मेला तर त्याबद्दल त्याच्या उत्तरकार्याकरितां सरकारांतून मिळावयाची रकम. **तलब** – पगाराची बाकी. **बारा अंदेशा** – नसत्या तक्रारी. **राखल्यापोटीं** – राखली तर. **आपली अडचण भरून घेऊं** – आपलें झालेलें नुकसान भरून घेऊं. **बेवक्त** – कठीण प्रसंग. **शक्कल** – विचार. **कोणी घरींहून देत नाहींच** – कोणीहि स्वतःच्या पदरचे काढून देत नाहीं. सर्वजण सरकारचा हवाला देतात.

विपर्यास होऊन बंधुत्वाचा शिरोभाग केला. इकडे येतों म्हणून उत्तरें येत गेलीं. तिकडे कोणीं आप्त यांशीं मेळ करून त्याची कन्या आपले पुत्रास केली. याप्रमाणें फितूर होऊन सिलेदारास कोणी अंग न दिल्यामुळें आपलें ठिकाणीं बाज खाऊन तांब्रांनीं पाठ दिल्यावर कोणीहि जीव झोंकला नाहीं.

(१३०) इतक्यांत हरामखोर होते त्यांनीं हलकारे पाठविले कीं तुम्हीं कां पळतां? आमचे पळण्याची तयारी झाली. तेव्हां उलटून माघारां ठिकाणास येऊन, पेमसिंग सहा पलटणाचा मालक हा फितुरास आला होता, तो क्षिप्रेतीरीं मागें बाजूस होता. मग त्यांनीं रोशेनबेग व रोशेनखां मुकाबल्यास होते त्यांचा मोहोरा सोडून, पेमसिंगाचे पलटणांतून उतरून, तीन हजार स्वार एकदां तीन हजार पिस्तोलांची देवढ दिल्हीं. त्यांत सरकारी सरंजाम यांचे पाय उठले. ते समयीं महाराजांबरोबर हुजरातपैकीं शेंपन्नास स्वार व ब्रह्मवृंद मंडळी इतक्यानिशीं अभेटचा रस्ता धरिला. फिरंग्यांनीं तीन कोस पिच्छा केला. येणें कडून पार पडले. मागें बायका, देव, जामदारखाना, हत्तीचें निशाण अवघें त्यांनीं समेटलें. त्या प्रसंगीं मिराभाई यानें हत्तीचें निशाण आणलें. बायका काहडून आणण्यांत सुलतानजी बाहड व हरिबा होळकर व सदरदीन हवालदाराचा जांवई व लालमण होळकराचा पुत्र हिरामण व दलसिंग कुंवर इतक्यांनीं घोडे घालून श्रीमंत सौ. जिजीबाईसुद्धां काहडून आणल्या. सदरदीनाच्या जांवयास जखम तोंडावर आली. परंतु बायका काहडून आणल्या. बाकी अवघी दौलत गारद झाली.

(१३१) सरकार निघून एकटेच चार घटका दम खाऊन अर्ध रात्रीचे समयीं गडगुच्याचे समीप दम खाल्ला. तेथें पलटणचीं माणसें गणपतराव दिवाण व विठ्ठल महादेव यांजला घेऊन आले. मग तेथून पुढें चालले. तों चर्मण्वती उतरून मुक्काम केला. जखमी व घोड्यास चंदी मुदबख कांहीं एक नाहीं. तारोळा एकसारखा. मग मासाहेबांनीं बाडांत कांहीं ऐवज शिलकेस होता त्यांतून कांहीं ऐवज देऊन चंदी मुदबख केलें. मग विचार करून विठोबा तात्या याजला पलटणांतून आणून, त्याची खातरी करून, ते दिवशीं मार्गशीर्ष १४ स उभयतांस वस्त्रें दिल्हीं. तेथून कूच करून सितामहु मंदोसर याचे मधीं मुक्काम करून पुढें प्रतापगडावर मुक्काम केला. तेथून राजश्री विठ्ठल महादेव सलखाचे बोलण्यास

---

(१२९) शिरोभाग – शिरोभंग. **बाज खाणें** – भीति खाणें.

(१३०) समेटलें – काबीज केलें.

(१३१) चंदी मुदबख – घोड्यास दाणा व शिपायास जेवण. **तारोळा** – तारांबळ.

मलकण साहेबाकडे पाठविले. तेच दिवशीं छापा फिरंग्याकडील आला. परंतु छापेवाल्यांस आज्ञा होती कीं, त्यांजकडील पुढें बोलण्यास येऊन मार्गांत तुमची त्यांची भेट झाल्यास तुम्हीं त्याशीं खटका न करितां व पुढेंहि न जातां माघारीं यावें. असें सांगितलें होतें. तों मार्गांत छाप्याची व विठ्ठल महादेवाची गांठ पडली. मग छापेवाले व मशारनिल्हे पलटणांत दाखल झाले. नंतर यांचीं त्यांचीं बोलणीं बहुता प्रकारचीं होऊन कार ठरला. मुकुंदद्ऱ्यापासून सेदव्याचे डोंगरपर्यंत होळकर बहादर यांचा अमलाफैला राहील. त्यांत मीरखां व कपूरखां यांची जहागीर चालत आली त्याप्रमाणें चालावी. याशिवाय पंचपहाड, गंगरोड, डंग, आहूर हे चार महाल कोटेवाल्यास दिल्हे. दोन्ही डोंगरामध्यें तुम्हीं स्वस्थ असावें. जेथें रहाल तेथें तुम्हांशीं आमचा गोरा व दोन कंपन्या राहतील. तुम्हापासून पांच कोसांवर दोन पलटणें आमचीं राहतील. असा तह ठरून तहनामे यांच्या यादी परस्परें जाल्या.

(१३२) इकडे सरकारचा मुक्काम प्रतापगडावर होता. तेथून कूच करून भाऊगड परगणे मंदोसर येथें आलें. तेथें सिल्लेदार रामजी शेडगे वगैरे कांहीं पठाण व रामदीन व दीक्षित यांणीं विचार केला कीं, विठ्ठलपंत तात्या आल्यावर आपला प्रांत शुद्ध नाहीं पक्षीं येथें राहून अब्रु मलीन करावी हें चांगलें नाहीं. कमकसर पांच हजार स्वार कूच करून श्रीमंतांकडे गेले. मागाहून फिरंग्यांच्या रजबणाहि धांवल्या. परंतु गांठ पडली नाहीं. हे जाऊन श्रीमंतांस सामल झाले. मागाहून विठ्ठलपंत तात्या भाऊगडास येऊन पोंचले. कांहीं ऐवज फौजेचे समजाविसीकरितां मलकण साहेब यांणीं दिल्हा. मग येथून कूच करून रामपुऱ्याहून मौजे देवरी तालुके भानपूरा चर्मण्वतीचे कांठीं छावणी झाली. येथील मुक्कामीं इंग्रजांकडून अभीसाहेब उंटाच्या रजबणीचा मालक तो रामपुऱ्यास मुक्काम करून होता. तहनाम्यांतील कराराप्रमाणें छावण्या जाहल्या. मागाहून मलकणसाहेबहि परामर्षास आले. ते मास पक्ष राहून असेरीचे किल्ल्यावर बाजीरावसाहेब होते त्याचे तोडजोडीस गेले. नंतर देवरीहून कूच होऊन भानपुऱ्यास मुक्कामास आले. दसऱ्या पावेतों भानपुरींच होते. सिल्लेदारांची वगैरे कबजे करून तोड पाडली. महालानिहाय व पागा व सिल्लेदार पुढील वीस रोज वगैरे धरबंध करून कोणेहि गोष्टीचा कज्जा

---

(१३१) **खटका** – खटला, तंटा.

(१३२) **आपला प्रांत शुद्ध नाहीं** – आपली धडगत लागणार नाहीं. **रजबण** – रेजिमेंटचा अपभ्रंश. **कबज** – शिपायाकडून पगार पोंचल्याबद्दल लिहून घेतलेली पावती. **पुढील वीस रोज वगैरे धरबंध करून** – पुढील वीस दिवसांचा पगारहि शिपायास अगोदर दिला.

ठेविला नाहीं. दौलतीचा अजमास पाहून सिलेदार जितके ठेवावयाचे तितके ठेविले. भाजीभाकर देणें ती समयास ज्याची त्यास प्रविष्ट व्हावी. महालाचा बंदोबस्त रसदेची कवडी न घेतां चोहों हप्त्यांनीं ऐवज घ्यावा असा धरबंध करून, मानपुऱ्याहून इंदुरास येण्याचा विचार करून, दिपावळी उज्जनी मुक्कामीं झाली. कार्तिक शुद्ध ५ स इंदुरास दाखल झाले.

(१३३) महत्पूरचे लढाईंत दौलत बरबाद होण्यांत कसर राहिली नाहीं. इंदूर मुक्कामीं आल्यावर मलकणसाहेब यांणीं श्रीमार्तंडादि देवपूजा मात्र आपले फौजेंत गोळा करून आणून दिली. बाकी कांहीं एक राहिलें नाहीं. ते विठ्ठल महादेव यांणीं बैठकीचे पोटीं जवाहीरखाना, कापड, हत्तींचें सरंजाम, घोड्याचे सरंजाम चांदीसोन्याचे तयार केले. भांडीं बाडांत न ताट न वाट्या (न) पलंग. सोहलतीचे पोटीं दौलत पुनः उभी केली. दौलतीचीं माणसें दरखदार मामलेदार वगैरे कोणास उपोषित राहूं दिलें नाहीं. ज्याचें अन्नोदक उठलें त्यांस त्यांनीं तरी काय करावें ? त्याजला स्थळांतर करणें प्राप्त झालें. ऐसे थोडे पांच चार असाम्या. वरकड थोड्या बहुतानें स्थापना केली. इंदूर मुक्कामीं आलियावर अग्नीसाहेबाची बदली होऊन वलदलीसाहेब आले. मलकणसाहेब होतेच. पुढें चौका वर्षांनीं मलकणसाहेबाचीहि बदली झाली. मुंबईस जाऊन मुख्य विलायतीस गेले.

(१३४) इकडे चार हलकीं माणसें धान्याचे तोंडी लागून धनी बाळराजा दूरादेश विचार न होता कांहीं फितूर झाला. सांज सकाळ मसलत नमूद व्हावी. तो मग भेद झाला. बडे साहेब महाराजापाशीं आले. महाराजांस विचारलें, ' हा विचार आपले आज्ञेवरून झाला किंवा कसें आहे ? ' तेव्हां महाराजांनीं कानावर हात ठेविले. आणखी विचारलें कीं, विठ्ठल महादेव यांनीं बंदोबस्त करावा कीं न करावा ? अशी आज्ञा झाली. मग उठोन विठ्ठल महादेव याजकडे गेले. त्यांचे पदरीं हा दोष घालावा कीं, दौलत तुमचे डोक्यावर. दोन महिने घटवटणा होत असतां तुम्हांस खबर नाहीं. यांतील अर्थ तो काय ? अतःपर बंदोबस्त करून सावधानी ठेवीत जावी. असा दोष लावून आपले ठिकाणास गेले.

(१३५) नंतर बापू विष्णुस विठ्ठल महादेव यांणीं मासाहेबांकडे पाठविलें कीं, मासाहेबांस पुसावें. झालें तें बरेंच झालें. पुढें बंदोबस्ताविषयीं अज्ञा कशी ? मासाहेबांनीं खातरी केली कीं, तुम्हीं कांहीं एक मनांत अंदेशा न आणितां जे हरामखोर या मसलतींत असतील त्यांचें परिपत्य करावें. या भावीं खातरतसलीच्या गोष्टी

---

(१३३) बैठकीचे पोटीं – बैठक बसवून. व्यवस्था, तजवीज लावून. **सोहलतीचे पोटीं** – सावकाराकडून सवलतीच्या दरानें कर्जे काढून.

बापू विष्णु यांणीं येऊन सांगितल्या. त्याजवर जे जे या मसलतींत होते त्यांजला धरून आणले. त्या संधींत रावजी त्रिंबक, नर्मदेचे पुरानें महेश्वर वाहून गेलें, शेट-सावकार यांचें नुकसान सर्वोपरी झालें, त्यांचे खातरतसली करून आबादी करावी याजकरितां गेले होते, त्यांजकडे सांडणीस्वार पाठवून ताबडतोब घेऊन आले. रावजी त्र्यंबक आल्यावर जसा ज्याचा आचार तसें त्यास शासन करून काढून दण्याचें ते काढून दिले. कामांतून काहाडावयाचे तेहि काढून टाकिले. किल्ल्यावर पाठवावयाचे ते किल्ल्यावर पाठविले. याप्रमाणें आचरण यथाशिक्षा करून पुढें बंदोबस्त पूर्ववत केला. त्याजवरहि पांच चार वर्षें राजास राज्य प्रजेस चैन असें चाललें. सन १२३५ चे सालीं माघमासीं विठ्ठल महादेव यांचे पाठी पुटकळी झाली. त्याचा उपाय करतांना गुणावह न होतां दिवसांदिवस अधिक होत चालले. छावणींतील डाक्तर उपाय करीत होता. त्यानें छावणींत हवा खाण्यास नेले. एक दिवस तेथें होते. तेथें कांहीं प्रकृतीस ग्लानी विशेष आढळून आली. बडेसाहेब हवा खाण्यास गेले होते ते सांगून गेले कीं आम्हीं येऊं तोंपर्यंत तुम्हीं जाऊं नये. यांचे प्रकृतीस न माने. तेव्हां फाल्गुन वद्य ५ प्रातःकाळीं घरास आले. घरीं येतांच सर्व प्रायचित्तपूर्वक तुळा केली. तों शरीर व्यापून अवसान-काळ प्राप्त जाला. पंचमीस अर्ध रात्रीचे समयीं दत्तक घ्यावा असें ठरवून, लेकीचा मूल घ्यावा, असें मासाहेब महाराज दरखदार सरकार आश्रित, शास्त्री, पुराणिक वगैरे अवघे बोलावून सर्वानुमतें निश्चयांत आणून, सूर्योदयात्प्राक् दत्तविधान होऊन मांडीवर घेतला. नंतर वद्य ६ स दीड प्रहर दिवस चढतां देहावसान झालें. नंतर बडेसाहेब आले. त्यांनींहि बहुतच गमी मानली. तात्यासारखे माणूस गेलें. आमची भेट झाली नाहीं. त्या संधींत बाईनें सहगमनाविशीं आग्रह विशेष केला. मग मासाहेब व बडेसाहेब यांनीं खात्री फारशी केली तेव्हां महकूब होऊन दहन केलें.

(१३६) पुढें कारभार रावजी त्रिंबक करूं लागले. तों सन १२३६ च वैशाख शुद्ध ११ पावेतों कारभार केला. खावंदाचें संधान ठेवून काम केलें नाहीं. सबब द्वादशीस रावजी त्रिंबक यासी बिदाकीचीं वस्त्रें होऊन कारभाराचीं वस्त्रें दामोदर काशी किबे यांसी झालीं. त्यांनींहि माहे जमादिलाखर ऊर्फ मार्गशीर्ष मास सन १२३७ पर्यंत वहिवाट केली. परंतु आक्रमणाचे कमती यामुळें बंदोबस्ताची गोष्ट दिसून आली नाहीं.

---

(१३५) **यथाशिक्षा** – यथायोग्य. **गमी** – दुःख, श्रम.

(१३६) **बिदाकीची** – निरोपाची. **आक्रमणाचे कमती** – आवर घालण्याच्या कामीं असमर्थ.

(१३७) मग मासाहेब व महाराज एक विचार करून आपाजी कृष्णराव फिरंग्यांचे साहेबींत वागलेले. कर्तृत्वाची व सौजन्याची कीर्त परस्परें ऐकिण्यांत विशेष. ते आंग्रजांचा संबंध सोडून अनाहूत आले होते त्यांचीं बोलणीं होऊन, कारभाराची सोंप झाली. या दौलतीस अनमाहीत, परंतु सौजन्यतेचे पोटीं सर्वांस आपलेसे करून दौलतीस आळा घातला. पुढें चैत्रमासीं यजमानाचे अनुषंगें महेषावतीस नर्मदातीरीं सोमयाग ब्राह्मणाकडून करवावा असें ठरवून वेदमूर्ति राजश्री नारायणबाबा तळेगांवकर सत्पात्र पाहून, त्याजकडून आधान सिद्ध करवून, × × पूर्वक सोम केला. सरकारस्वारीहि प्रसंगास गेली होती. अनुष्ठान मोठें, परंतु खावंद पुण्यवान, अंतःकरणपूर्वक मनोत्साह व कारभारी सुशिक्षित. इतिकर्तव्यता निर्विघ्न सिद्धीस जाऊन, समारंभ फार मोठा होऊन, कारभारी यांचे जपण्याचे पोटीं शोभाहि अद्वितीय झाली. धरला बेत न रहातां पैकाहि विपुल लागला. ब्राह्मणांचा लौकिक कीर्ति बरीच झाली. पुढें पुनः इंदुरास आले. पुढें पांच सात महिने वहिवाट एक विचारें बरीच चालली. त्यांत ज्याच्या माथां ओझें त्यांजला खावंदाचें संधान ठेवून सर्वांचें मनोधारण राहील तें करावें ही नेक सल्ला. त्यांत मार्गाची गोष्ट नसल्यास न रुचली त्यांसी भवतव्यानुरूप अनुभव प्राप्त होऊन दौलतीचा क्रम चालविण्याचा तसा चालतच आहे. या अन्वयें सेवा सेवकत्वाचे संभाग चालतो त्याप्रमाणें चालवून दौलतीचे विभागी गोरगरीब याजवरहि कूर्मदृष्टि राहील याचे पोटीं श्रीमार्तंडकृपेनें पूर्वरंगास आणलें. परमेश्वरास अगाध नाहीं. अग्रे ईश्वरोवेत्ति. भावी पदार्थ आगमन ऐकिलें पाहिजे त्या धोरणावर इतिहास यच्यावत् लिहिला असे मिती.

समाप्त

(१३७) **अनमाहीत** – अपरिचित. **सोम** – सोमयाग. **इतिकर्तव्यता** – योजलेलें काम. **जपण्याचे पोटीं** – व्यवस्था ठेवण्याच्या शिस्तिमुळें.

होळकरांची कैफियत

परिशिष्ट १ – पुरवणी टीपा

पृष्ठ ५ **श्रीमंतांची फौस बढवणीस येऊं लागली :** — बढवणीचा ठाकूर अनुपसिंग नांवाचा होता.

पृष्ठ १४ परिच्छेद १२ **यांतील तपशिलासाठीं बाबूराव विष्णुचें गोविंदपंतास पत्र आहे तें पहा.**

२१-२-१७५१

" नेनवेयाहून मजल दरमजल जैनगरास चालिले. दोन तीन मजली जैनगर राहिलें, तों राजियास वर्तमान कललें. त्याणीं वकील व याचा — गणेश मालीं राजे यानें दोन लाख रुपये देऊन पाठविलें. त्याची भेट जाली. सुभेदार इतराज जाहाले. कांहीं केल्या न यैकत. मजल दरमजल चालिले. वकिलांहि लेहून पाठविले कीं हे यैकत नाहीं. केशवदास मारिला त्याचा सूड आपणांस घेणें आहे, यैसें लेहून पाठविलें. राजियाचे कारभारी जुने घरीं बैसले होते. हरगोविंद व विद्याधर दोघे राजियापासीं गेले कीं सुभेदार येतात. फौज आपली आणावी, बाहिर जाऊन लढाई करावी अगर गांवांतून लढाई करावयाची असेल तरी मोर्चेबंदि करावी. तोफा बुरजे बुरुज ठेवावी, यैसें उभयेतानीं सांगितलें. त्याजवरी इतराज राजा जाहला. त्याचे कारभारी नवे माहावत व येक नाहावी त्याजला बोलाविलें कीं, सुभेदाराच्या चित्तांत कीं केशवदास आपण मारिला, त्याचा सूड घेणार. याजकरितां तुम्ही सुभेदारापासीं जाऊन गोष्टमात करणें; च्यार पांच लाख रुपये मागतील तर देऊन वाटेस लावणें, यैसें दोघां कारभारीयासी सांगितलें. कारभारी म्हणाले कीं आम्ही येकंदर न जाऊं. आम्हास तो मारील. तुम्ही आपले हातें मारणें, परंतु आम्हांस तिकडे न पाठवणें. मग राजा उगाच राहिला. संध्याकाल जाहला. वर्तमान यैकिलें कीं सुभेदार येथून दाहा कोसावर आले. खिजमतदारास सांगितलें कीं काला नाग जित आणवणें व सोमलखार घेऊन येणें. औषध करणें आहे. त्याणीं आणून दिल्हें. दोन प्रहर रात्रीस जहर राजे याणें घेतलें. नाग अंगास डसविले. पहाटे ईश्वरसिंग राजा याचा प्राण गेला. तिधी बाईकानीं जहर घेतलें. व येक कलावंतिण इणें जहर घेतलें. यैसे चार बाईका व राजा यैसे जहर घेऊन प्राण दिघले. हें कोणास शहरांत ठावकें नाहीं व कारभारी यांसीहि ठाऊक नाहीं. येक खिजमतगारास मात्र ठाऊकें होतें. पौष वद्य १२ शुक्रवार प्रहर दिवसा फौज खंडेराऊ व गंगाधरपंत तात्या (चंद्रचूड) नगरावर गेले. सुभेदार व बुनगे तीन कोसावरी मागें राहिले. दोन प्रहर पावेतों कोण्ही गोळे टाकिले नाहींत. फौज बाहिर उभी. कारभारी राजीयासी गेले कीं महाराज फौज बाहेर येऊन लागली, आपण अजून निजलेसे काय ? म्हणून उठवावयास लागले तों खिजमतगार म्हणाला कीं महाराजानें यैसें कर्म केलें ! ! मग आकांत शहरांत जाहला. जुने कारभारी हरगोविंद व विद्याधर याणीं थांबाथांब शहारांत करून मग बाहिर भेटीस आले. उभयतांस भेटले.

सुभेदारासहि सांगोन पाठविलें. तिसरा प्रहरास कूच करून शाहराजवळ फौज सुद्धां राहिले. पाहावयास माणसें पाठविलीं, तों खरेंच जाहालें. मग यांणीं चौकीया दरवाज्याबर जागजागीं ठेविलें. राजमंदिरीं चौकी ठेविली. राजेयाचा मुरदा च्यारी प्रहर दिवसपर्यंत होता. मग सुभेदारानीं कारभारी आपले मातबर दोघे पाठऊन व सेला पाठऊन अगिनडाव दिघला. तीन बाईका व येक कलावंतीण यैसें जलालें. दुसरीया दिवशीं राजेयाचे हवेलींतून चौक्या बसविल्या आणि इकडे माधोसिंगास सांडणीस्वार पाठविला. पत्र पाठविलें कीं जलदीनें येऊन पोहचणें आणि इकडे हरगोविंद व विद्याधर सुभेदारापासीं येऊन बहुत रदबदल करून शाहरचा व राजियाचे आपेश तुम्ही माथां न घेणें, राज्य भारी आहे, याची स्थापना करावी. मग सुभेदाराचे चितास घेऊन जागजागा चौकिया बसविल्या होत्या. त्या खंडणीचा करार करून चौक्या उठविल्या. यैसा करार मदार होऊन च्यार रोज जाहले. राज्याची येक राणी व वीस कलावंतिणी तेहि सती पडल्या. रुपयाच्या वसुलास लागले. तो माधोसिंग पंधरावे रोजीं आला. सुभेदार पुढें जाऊन भेटले. येक हतीवर उभयता बसले, तैसेच गांवांत जाऊन त्याच्या हवेलींत घातलें. सुभेदार माघारे आले. माधोसिंग आल्यावरी आठवे रोजीं राजश्री जायाजीं सिंदेहि आले. आपण दोन तीन वेला सुभेदारास त्यांस विचारिलें कीं आमच्या यैवजाची वाट काय ? तिकडे पंतास निकट लागली आहे, वरातावर वराता होतात, आमची वाट काय ? त्याणीं सांगितलें कीं हे रुपये वसूल होतील, यांतून रुपये हुंडिया करून तुम्हांस रवाना करूं. यैसें उत्तर दिल्हें. आणप्रमाण केलें. वसुलास लागले. इतकियांत माधोसिंग याची फौज दाहा पंधरा हजार आली होती. सेखावन वगैरे लोक जमाव जाल्यावर त्याची नजर फिरली. मग कुविद्या धरिली कीं सुभेदारास व जायाजी शिंदे यास जेवावयास करावें. अन्न अवघें विखाचें करावें. दाहा पांच खासे होतील यांस जेऊं घालावें आणि मारावें यैसे केलें. यांजला बहुत प्रकारें विनंति केली. सुभेदार कबूल जाहले. जायापानी गोष्ट उडविली कीं, आपण येकंदर जात नाहीं. तुम्ही जाल तरी जा, परंतु आपण येकंदर जाणार नाहीं. मग राहिले. त्याणें पांच सात दिवस पकवानें केलीं होतीं. त्यांत अवघे वीख घातलें. पाणियांत वीख घातलें आणि ब्राह्मणासि पेढे विखाचे केले. सोमलखार दोन मण घेतला होता. यैसा प्रसंग केला होता. ईश्वरें सरदारांस वांचविलें. जायापानें मोडा घातला; व उमेदसिंग बुंदीवाले याणें मोडा घातला. मग त्याणें अन्न मातींत पुरलें. याजला खबर नाहीं. दुसरे रोजीं दुसरा विचार केला कीं, गंगाधरपंत व आणखी कारभारी बोलाऊन आणून येथें मारावें. पहिले जात असत. दोन च्यार दिवस गांवांत रहात असत. याजकरितां बोलाऊं पाठविलें. दरवाजेयावरी ताकीद केली कीं, चौघांच्या पालख्या येतील, आम्हांकडे येऊं देणें, मग शाहरचे दरवाजे लावणें. यैसे करार करून याजला बोलाऊं पाठविलें. त्याजला सांगोन पाठविलें कीं आपण प्रहर दिवसांत येतों. तैसेच जायाजी सिंदे याजकडे गेले. तिकडे संध्याकाल पावेतों लागला. शाहरांत लोक दाहा पांच हजारी माणूस शहर पाहावयासी व उंटें व घोडीं — सूत घ्यावयासी जात असत. ते दिवशीं जायाजी शिंदे यांजकडील खासे

फार शहरांत गेले. च्यार पालखियाचे सरदार बसोन गेले. याणीं म्हटलें कीं तात्या आले वर्तमान रा × सांगितलें. दरवाजे लाविले. माघ वद्य ९ रोजीं गुरुवासरी राजियाचा हुकूम जाला कीं महराठे लोक अले. कतल! यैसे सांगोन अगोदर लोकांस विसारत होती. होतांच राजा उठोन माडीवर जाऊन बसला. शहरचे दरवाजे लावले. दोन प्रहरापासून आपलेकडील माणसें मारीत होते. तों प्रहर रात्रपर्यंत माणूस कापिलें. तीन हजार माणूस कापलें व येक हजार माणूस जखमी जाहलें. जायापाकडील मातबर मातबर सरदार नामांकित हजार व सिपाय व चाकर वगैरे सुभेदाराकडील मातबर पंचविस व चाकर वगैरे हजार दीड हजार व ब्राह्मण शंभर व बटकी व पेंढारी व मुलें यैसे कापून काहडलीं. जखमीं जे आले ते कितेक मरतात. सें पनास माणूस वगैरे कितेक जे गांवांत वांचलें तितके मात्र आलें. गांवकुसावरून उडया घालून आले. त्याचे पाय मोडले व कमर मोडले. कितेक वांचोन आले. यैसा कहर शहरांत केला. येक हजार घोडे भलभले चांगले बसोन गेले होते तितकेहि गेले. सोनीयाचीं कडीं व मोतीयाच्या जोड्या व पैका वस्तभाव घ्यावयास गेले इतके मानूस गेले. सुमार नाहीं. मारले फार गेले. त्यास जायाजी शिंदे याजकडील मातबर सरदार वगैरे फार मारले गेले. ”

[लेखांक नं. ३१ पृष्ठ ५१ ते ५४ पानिपत प्रकरण भाग २ रा. पेशवे दप्तर.]

पृष्ठ १६ **त्याची पहाडावर गढी, माची (स) शहर :-** मॉंची नांवाचें एक गांवहि जयपूर नजिक आहे. कदाचित् ‘ मॉंची शहर ’ असाहि पाठ मुळांत असण्याचा संभव आहे. “ जयपूरच्या दलैरायनें मॉंचीचें मीणे लोकांचा पराभव करून तोहि हस्तगत केला. हे मीणे लोक फार शूर होते व अद्यापहि त्या भागांत बहुसंख्येनें ते वस्ती करून आहेत. मॉंचीच्या भागांत मोठें जंगल आहे आणि तेथेंच वाघांचे वगैरे शिकार करण्यासाठीं जयपूरच्या राजांनीं विशेष प्रकारची व्यवस्था केली आहे. या ठिकाणीं बाणगंगा नदी अडवून पाण्याचा संचय करून जयपूर शहरास पाण्याचा पुरवठा अलीकडे केला आहे. मॉंची जयपूरापासून १५।१६ मैल आहे. निसर्गाची शोभा फार रम्य आहे. एका बाजूस भले उंच पर्वत आहेत. त्यांत जुन्या काळीं शिकरीकरतां बांधलेली एक मॉंची आहे. त्यापलीकडे जमवाय माताजीचें मंदिर आहे. मॉंचीस दुलैरायानें रामगडचा किल्ला बांधला तो अद्यापहि दिसतो.”

[जयपूर दर्शन ले. म. म. द. वा. पोतदार पृ. ३.]

पृष्ठ ३६ व ३८ **विसाजी लांबहाते किंवा विसोबा लांभाते :-** हा थोरल्या मल्हारराव होळकरांचा व्याही. या विसाजी लांभात्याच्या नातवाला मल्हाररावाची सीताबाई नांवाची एक मुलगी होती ती दिली होती. विसाजी लांभाते मोठा पांडुरंग भक्त होता. त्याची आषाढी कार्तिकीची पंढरीची वारी कधीं चुकली नाहीं. पुढें वार्धक्यामुळें विसाजीस वारीला जाणें अशक्य झाले. म्हणून विसाजीच्या नातवानें इंदुरास इंद्रेश्वरापासून नजीक पंढरीनाथाचें देऊळ बांधलें. विसाजीच्या नातवाचें नांव संताजी

लांभाते. त्यालाच सिताबाई दिली. या संताजीचा नंबर दोनचा मुलगा सुलतानजी त्यांनें हें देऊळ बांधलें. [मालवसाहित्य इंदूर विशेषांक वर्ष ५ अंक १ शके १८५५ इंदूरचे ऐतिहासिकदृष्टया अल्प विवेचन. ले. दा. ब. दांडेकर.]

पृष्ठ ४१ परिच्छेद ३२ **मल्हाराव शके १६८७ भाद्रपद वद्य ११ प्रहर दिवस चढतां पंचत्व पावले :–** महेश्वर दरबारच्या बातमीपत्रांत "छ. ९ सव्वाल शनवार वैशाख ११ रोजीं मल्हारराव होळकरांचें श्राद्ध केल्याचा उल्लेख आहे." (ले. २५४) यावरून चंद्रचूड दप्तर कला १, ले.१०४ यांत वैशाख शु॥ ११ शके १६८८ (म्हणजे ता. २०-५-१७६६) रोजीं मल्हाररावाचा काळ जाहला असें लिहिलें आहे, तेंच खरें ठरतें. कैफियतींत मल्हाररावाचा मृत्यू शके १६८७ भाद्रपद व॥ ११ स दिला आहे तो मल्हाररावाच्या एकाद्या पक्षावरून दिला असावा. डफ मल्हररावाचा मृत्यू सन १७६७ त देतो. तोहि असाच चुकला आहे. आमचे बखरकार मल्हाररावास साडेसात महिने अगोदर मारतात, तर पाश्चात्य इतिहासकार त्याला कांहीं महिने अधिक जगवितात !! अहल्याबाईचे चरित्रकार पुरुषोत्तमहि असेच या बाबतींत चुकले आहेत. ते शके १६८७ चा वैशाख समजतात. वस्तुतः त्यांनीं थोरल्या माधवरावाचें ता. १० जून १७६७ चें अस्सल पत्रहि पृष्ठ ७४ वरील टीपेंत दिलें आहे. पण शकाची चुकी त्यांच्याहि लक्षांत आल्याचें दिसत नाहीं.

[महेश्वर दरबारच्या बातमीपत्रांचा परिचय, विविधज्ञानविस्तार, लेखांक २ रा, पृष्ठ ४४०, वर्ष ५५ अंक ९. सप्टेंबर १९४४.]

पृष्ठ ४१ परिच्छेद ३२ **मल्हाररावाचा इंग्रजाकडून पराभव :–** श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी–पोष्यांकित अपाजी राम कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता। अषाढ शुद्ध ९ पर्यंत अपले कृपेंकरून यथास्थित असो विशेष. दिवस जाले. आपल्याकडून कृपा पत्र येऊन परामृश होत नाहीं तेणें करून चित्त चिंतातूर आसे यैसे नसावे सदैव आलिया वार्तिक समवेत पत्र पा। सांभाळ करीत असिले पाहिजे. जे वेळीं पत्रें येतात ते वेळेस आनंदानास होत जाती ते पत्रीं लिहिता पुर्वत नाहीं इकडील राजकी वर्तमान नजीबखानासी व जाठासी सलाह करून देऊन तेथून दर मजल आनूपशहरास आलो. तेथें सुज्यायतदौले येऊन भेटी बहुत मिनतमानी केली कीं फिरंगी यानीं आमचा मुलुख घेतला आहे आमची साईता करावी. त्यावरून श्रीमंत राजश्री सुभेदारानीं कबूल केले. (रो) हिले पठाण याचें पारपत्य करण तैसेच च्यार रोज महेकूफ करून दरमजल जाजमुहूस आला तेथें बातमी आली कीं कुराज्याहानाबादेंत नजफखान च्यार हजार फौजेनसी आहे त्यासीं शिकस्त दिल्ही. तदंतर फिरंगीच चालोन आले. त्यासी जुझ मातबर जाले. च्यार पांचसें घोडे आणले. तीन तोफा व चाली (स) पनास उंटे आणली. तेहि दम धरून मुकामास आले, आम्हीहि घेरा घालोन होतो, बातमी तो

आली, रोहिले पठाण येकत्र होऊन बुणग्याव (र) आले. मग तैसेच चालोन ते काळपीस बुणगे उतरून पुनरोक्त फौज रवाना तीर्थरूप राजश्री तात्यास केले, तेथें येक लढाई जाली. हरोल तमाम बुडविली. हजार + + + घोडे व च्यारसें उटे फिरंगी दोन पलटणें व बाणाच्या कैच्या व वीस पंचवीस निशाणें आणलीं; ते गांवचा आश्रये धरून राहिले. तेथें च्यार सा (को) स पावेतो फौजा राहेत यैसे पाणी नवते. यामुळें उलटोन कालपीस आले. तेहि रिकामी जागा पाहून कालपीस आले. नाकेबंदी केली मग च्यार पांच नावा मेळऊन रातवा धरून उतरले. मोर्चे तोफाखालें उघलले च्यार पांच घडी जुझ जाले परंतु बेहड भारी. घोडियाचा नाविलाज जाला. यामुळें गनिमाकावा करून बेहड पुढें देऊन उभे राहिलो. त्यांनीं कालपींत ठाणें बसऊन माघारे गेले. आम्हीं तैसेच उलटोण त्याचें ठाणें काढून देऊन आपलें ठाणें बसविलें. तेथून उगरगडचा बंदोबस्त करून छावणीस ग्वालर प्राते चाललो आहो. निश्चये आलिया लेहून पाा आपणाकडील साकल्यार्थ लिहावयासी आज्ञा केली पाहिजे. बहुत काये लिहिणें लोभाची वृधी कीजे हे विनंती. माणक्या घोडा सुज्यायेतदौले याजवळ होता तो श्रीमंत राजश्री सुभेदार घेऊन आले. हुजूरपागेंत आहे. बलो केला आहे. भेटीनंतर आपलाच आहे. कलावें म्हणोन लिहिलें आहे. विनंती

[भारत–इतिहास–संशोधक मंडळ, पुणें. वर्ष ९ वें. त्रैमासिक अंक २ रा होळकर–इंग्रजांची झटापट (१७६५) ले. कृष्णाजी वासुदेव पुरंदरे, पूर. पृष्ठ ३१–३२.]

पृष्ठ ४१ परिच्छेद ३२ **थोरल्या मल्हारराव होळकराचा मृत्यु.**

पत्र नं. १ श्री १६८८ वैशाख वद्य ४, १७६६ मे २७

तीर्थस्वरूप राजश्री जोसीबावा वडिलाचे सेवेसी —

विद्यार्थी माधवराव गंगाधर कृतानेक सा।। नमस्कार विनंती उपरी येथील कुशल वैशाख वद्य ४ भौमवासर मुकाम लस्कर दर जागा बेरछा नजीक सेवढें प्रांत दतीया येथास्थित जाणून स्वकीयें लेखन करीत असिले पाहिजे. विशेष दिवस जाले आपणाकडील अशिर्वाद पत्र येऊन परामर्ष होत नाहीं यास्तव चित उद्विग्न असे तरी यैसे न करावे. निरंतरी येणारा वार्तिका समागमे अशिर्वाद पत्रीं सांभाळीत असावे तेणें करून चित संतोषातें पावेल. तदनंतर इकडील वर्तमान श्रीमंत राजश्री दादासाहेबांच्या व श्रीमंत सुभेदारांच्या भेटी जाल्यानंतर राजश्री महादजी सिंद्याच्या व श्रीमंताच्या भेटी करून दिल्ह्या असे असतां पेशजी श्रीमंत सुभेदारांचे शरीरी दोन अडी (च) मास समाधान नवतें. दरम्यान गुजराकडील मुलकी बंदोबस्त ठाणी पेशजीची घेऊन खंडणी घेऊन जाटाचे पारपत्याकारितां श्रीमंतसहवर्तमान अलंपुर प्रांत झासी या मुका (मा) स

आल्यावर श्रीमंत सुभेदार बहुतच काइली जाले. दैवी मानवी उपाय करून अनुष्ठान दानधर्म बहुत कांहीं केले. आयुर्मर्यादे करून गुणास न येता सेवटीं भूमीवर उतरले. उपरातीक दुसरे रोजीं वैशाख शुद्ध ११ मंगलवारीं पावणें दोन प्रहर दिवस येतां देवआज्ञा जाली. समागमे सौ।। मातुश्री द्वारकाबाई व सौ।। मातुश्री बनाबाई यांनीं सहगमन केलें. विश्वांत धन्य धन्य होऊन येहलोक परलोक उत्तम गती जाली. परंतु परमेश्वरें सर्वांचें छत्र नेऊन बहुत वाईट केलें. श्रीमंत देखील सर्वजन बहुत शोकार्णवाते पावले. भगवत सता प्रमाण काळानुरूप होणारास उपाय काय! अलमपुरी तीन दिवस होऊन आस्ती गोळा करून रक्षा संपूर्ण बटगीया भरून भागीरथीस पाठविली. तेथून कुच करून पांच कोस काळीसिंद नदीवर मुकाम केले. येथें काल सातवे दिवसापासोन क्रियेस आरंभ होऊन आज आठवा दिवस जाला. येथें आकरे बारे तेरावा दिवस होऊन उपरांतीक गोहदकरांचें पारपत्य करून श्रीमंताची आज्ञा घेऊन देशास फौजेचे बंदोबस्ताकरितां यावे. कदाचित श्रीमंतच इकडे फौजा व सरदार छावणीस ठेऊन देशास आले तर समागमेच यावे. यैसे तीर्थस्वरूपाचे मानस आहे. श्रीमंत सुभेदारांचे क्रियेस दीड दोन लक्ष रु (प) येथपर्यंत खर्च करावा यैसे तीर्थरूपानीं चितीं धरिले आहे. होऊन येईल अगाध नाहीं. श्रीमंत सुभेदारांची पुण्याई प्रताप थोर, सर्व यथास्छित होऊन येईल चिंता नाहीं.

[चंडचूड–दफ्तर–कला पहिली पान ९७ लेखांक १०४.]

पत्र नं. २ श्रीमोरया १६८८ वैशाख शु. १५, १७६६ मे २४.

श्री मार्तंडजी

तीर्थरूप सौभाग्यादिसंपन्न मातुश्रीबाई वडिलांचे सेवेसी —

आपत्यें सदासिवानें व कृष्णरायानें चरणावर मस्तक ठेवून सा।। नमस्कार विज्ञापना. येथील कुशल वैशाख शुद्ध १५ पर्यंत मुकाम अलंपुर नजीक गोहद बारा कोस येथास्छित जाणून स्वकीये लेखन करीत असिले पाहिजे. विशेष वडिलीं पत्रें पाठविलीं तें पावून त्याचीं उत्तरें साकाल्यार्थें मुजरद कासीद जोडी देऊ व नबा या समागमें पेशजी लिहिलें आहे त्याजवरून ध्यानास येईल. अलीकडील वृत श्रीमंत राजश्री दादासाहेबाच्या सर्वांच्या भेटी होऊन येकत्र जाल्यानंतर गुजराकडील खंडणी चुकऊन बरकड ठाणीं व मुलकी बंदोबस्त करून पुढें गोहदचे पारपत्याकरितां मुकाम मजकुरी सर्व आल्यानंतर श्रीमंत सुभेदारांचे शरीरीं दोन अडीच मास समाधान नव्हतेंच. औषध उपाय, देवी उपाय, अनुष्ठानें, दानधर्म, श्री सी दर्शनाचा निश्चय सर्व उपाय केले परंतु गुणास न येतां वैशाख शुद्ध ११ मंगलवार पावणे दोन प्रहर दिवस येतां देवाज्ञा जाली. ईश्वरें बहुत वाईट केलें.

सर्वांचें छत्र नेलें. सर्व कुटुंब देखील श्रीमंतसुधा सर्व मंडळी सानिध्य असतां देहावसान जालें. सर्वत्रांस शोक बहुत प्राप्त जाला. श्रीमंत दादासा (हेब) (कि) तेक प्रकारें स्तव करून श्रीमंत कैलासवासी + + प्रमाणें मानून शोक करितात. सुभेदारांची पुण्याई थोर. योग्याप्रमाणें बहुत शरीरश्रम न होतां मृत्यु जाला. सौभाग्यादिसंपन्न मातुश्री बनाबाई व सौ. मा दारकाबाई उभयेतानीं सहगमन केलें, सर्व जनांत धन्य धन्य जाली. उत्तरक्रिया काळींसीद नदीवर होऊन पुढें सिष्टाचार जाल्यानंतर गोहदकरांचा वगैरे मनसबा कालदेशवर्तमानरूप होऊन येईल तदनुसार सेवेसी लिहिला जाईल.

[चंडचूड दफ्तर कला पहिली, पान ९८, लेखांक १०५.]

पृष्ठ ४२ **तों दहावे महिन्यांत मालराव होळकर याचा काळ झाला :–** दादासाहेब पेशव्यांचें गंगोबा तात्या चंद्रचूड यांस पत्र ५।४।१७६७ चें. " मालराव होळकर यास फाल्गुन वद्य द्वादशीस (१७।३।६७) देवाज्ञा जाली म्हणून रा।। सदाशिव गंगाधर यांनीं निवेदन केलें. "

[चंद्रचूड दप्तर कला १ ली लेखांक २०२ पृष्ठ १७३।७४.]

" अहिल्याबाईच्या अदृष्टांत पुत्रसौख्य नव्हतें. कारण मुलानें उधळलेले गुण तिला प्रत्यक्ष दिसत होते. अधिकार मिळाल्यापासून दहाच महिन्यांत मालेरावाचें देहावसान झालें. मालेरावाला हत्तीच्या साठमाऱ्या पाहण्याचा फार नाद होता. दुष्टांच्या नादी लागून हातून घडलेल्या अन्यायी हत्येच्या पातकाचें मनावर दडपण पडलेलें असतांना मालेरावचा अंत झाला. छत्री बागेंत त्याची छत्री आहे. छत्री बागेंत पूर्वाभिमुख छत्री खंडेराव होळकराची आहे. त्याच छत्रींत उत्तरेकडील कोपऱ्यांत अहिल्याबाईच्या मृत्यू-नंतर तिची मूर्ति बसविण्यांत आली. या छत्रीच्या दक्षिण अंगास मल्हारराव होळकराची छत्री असून उत्तर बाजूस मालेरावाची आहे. या छत्रीवर हत्तीचीं टकरा खेळत असलेलीं दगडी चित्रें कोरलेलीं आहेत. आपल्या हत्तीच्या करमणुकीकरतां मालेरावनें बांधलेला 'हत्तीचा पाळा' शिवागंजाच्या दक्षणेस आहे. " (इंदूरचें ऐतिहासिकदृष्ट्या अल्प विवेचन. दा. ब. दांडेकर. मालवसाहित्य इंदूर विशेषांक पृष्ठ ३५.]

" मालेराव आपल्या दुष्टपणाच्या व वेडसरपणाच्या चाळ्यांत एका मनुष्याचा खून करून त्या खुनाबद्दल पश्चात्ताप करीत लवकरच मेला. तो पश्चात्तापच म्हणावयाचा. कारण खून केलेला मनुष्य भूत होऊन आपला प्राण घेत आहे असे ओरडत मालेराव मेला ! " [अहिल्याबाई चरित्र परीक्षण कै. चिं. वि. वैद्य वि. ज्ञा. विस्तार पु. ४४ अंक १० पृष्ठ ३९७.]

पृष्ठ ४२ **सरदारास – मालेराव होळकरास – ' कांहीं ' या शब्दाचा संबंध आत्मकृत्यविकृतीकडे आहे.**

" मालेरावाच्या वाड्यांतील एका कुळंबिणीशी गांवांतील एका शिंप्याचा कांहीं अनैतिक संबंध होता. या संशयानें त्याला मालेरावानें ठार मारिलें. पण पुढें ते त्याच्या मनाला फार लागले व शेवटीं त्याला वायू होऊन तो मोठमोठ्यानें आरोळ्या मारू लागला व म्हणू लागला, ' मी तुझा भयंकर रीतीनें सूड घेईन ! ' तो शिंपी समंध होऊन मालेरावला त्यानें झपाटलें आहे अशा समजुतीनें अहल्याबाईनें त्यास परोपरीनें समजाविले पण तो म्हणे, ' मीं निरपराधी असताना तुझ्या मुलानें माझा प्राण घेतला. आतां मी जिवास जीव बळी घेईन तेव्हांच तृप्त होईन ! ' अशा समंधबाधेंतच मालेरावाचा अंत झाला. अहल्याबाईचें देवधर्माकडे जे पुढें लक्ष लागलें त्याचें हें एक कारण असावें. [" गर्जना " दिनांक ८-१-१९५४ देवी अहल्याबाई होळकर. लेखक श्रीनिवास गुरुराव देशपांडे.]

पृष्ठ ४३ **हरकुबाई :–** थोरल्या मल्हाररावाची उपस्त्री.

पृष्ठ ४३ **उदाबाई वाघमारे :–** ही थोरल्या मल्हारराव होळकराची दुसरी कन्या. हिच्याच नांवानें इंदुरांतील उदेपुरा बसविण्यांत आला. हा पुरा बजाजखान्याजवळ आहे. [होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें खंड १२, संपादक अ. ना. भागवत. पृष्ठ २८.]

पृष्ठ ४३ **नथ्याबा फणसे :–** हा अहिल्याबाईचा नातू, मुलगी मुक्ताबाई फणसे हिचा मुलगा. " अहिल्याबाईचे तुकोजी होळकराशीं वितुष्ट फार वाढले तेव्हां सन १७७९ त तिनें आपला नातू नथ्याबा फणसे यास दत्तक घेण्याचा ठराव पेशव्याकडून करून घेतला होता. ' तुकोजीची वर्तणूक सुधी नाहीं सबब त्याची सरदारी बरतर्फ करून त्यास कैद करावे आणि फणशाचा मूल दत्तक घेऊन त्याचें नांवें सरदारी करावी. यास नजर सरकारची पंचवीस लक्ष एक, यशवंतराव गंगाधराचे विद्यमानें करार केली असे. (८-८-१७७९). मात्र ही गोष्ट पुढें प्रत्यक्ष अमलांत आली नाहीं. " [मराठी रियासत उ० विभाग २, पृ. १२.]

पृष्ठ ४५ **हमराई बदरून :–** ' बदरून ' या वाचनाबद्दल ' दाखवून ' असा तर्क बळवंत कमळाकर यानीं सुचविला आहे. तो पाठ मूळ पाठ नसेल असा एक तर्क बळवंत कमळाकर यानीं सुचविला आहे. तो पाठ स्वीकारला तर पुढील प्रमाणें अर्थ बसेल. " तुकोजीचे व अहिल्याबाईचे बरें नव्हते. पण आतां त्यालाच वारस करण्याचा प्रसंग आला. म्हणून तुकोजीला हमराई म्हणजे दोस्ती दाखविणें जरूर झालें. "

पृष्ठ ४५ परिच्छेद ३५ **गारडा खेडीस** :– ‘ गाडरा खेडीस ’ असें पाहिजे. गाडरा खेडी हें गांव इंदुराजवळच आहे. गाडराखेडी म्हणजे धनगरवाडी. गाडर म्ह. मेंढरूं. आणि खेडी म्हणजे त्यांचें राहण्याचें ठिकाण किंवा गांव. त्यावरून गाडरखेडी नांव पडलें.

पृष्ठ ५६ **बाजी स्वयंपाक करितात, श्रीमंत जवळ बसून साहित्य देतात** :– राजे लोकांच्या घरांत गृहकलह लागला म्हणजे कट, गुप्त घात, मारेकरी, विषप्रयोग यांचा सुळसुळाट होतो. दुरितैरपि कर्तृमात्मसात् प्रयतंते नृपसूनवोहियत्’ इ० प्रकार सनातन आहे. आणि म्हणूनच राजे लोकांच्या खाण्याभोजनाच्या बाबत फार दक्षता बाळगण्याची पद्धत असते. राजे लोकांचें जेवण आधीं ‘ चोखे ’ लोक ठेवलेले असतात त्यांनीं खाऊन पाहावयाचें व मग राजानीं तें अन्न सेवन करावयाचें असे !! राघोबा व थो. माधवरावांच्या कलहांत माधवरावाला मारण्यासाठीं राघोबानें सर्व उपाय केल्याचा दाट प्रवाद तेव्हां होता. आणि म्हणूनच माधवरावाला स्वतःचा स्वयंपाक स्वतःच करण्याची पाळी आली असावी. राजघराण्याची चालू व जुनी अंतर्गत माहिती असणाऱ्यांना यांत बिलकूल आश्चर्य वाटण्यासारखें नाहीं.

पृष्ठ ५६ **याप्रमाणें सरकार लक्षास जपून, अशा माणसास इ०** :– ‘या प्रमाणें सरकारलक्षास जपून (असणाऱ्या) अशा माणसास ’ असें वाचलें म्हणजे अर्थाचा घोटाळा होणार नाहीं.

पृष्ठ ५७ **अद्यापीहि हिंगली न वाफेली** : – महाराष्ट्र वाक्संप्रदाय कोश भाग २ पृ. ६४५ वर ‘ हिंगणें वाफणें ’ असा वाक्प्रचार उद्धृत करून त्याचा गोळा बेरीज अर्थ असा दिला आहे. “ पदार्थास प्रथम हिंग लावून मग फोडणीस टाकतात. [हिंगणें वाफणें हा वाक्प्रचार लक्षणेनें व निषेधात्मक वापरतात.] १ आरंभहि नसणें; अपुरे असणें. ”

पृष्ठ ६२ **शेखावटी** :– “ हा जयपूर संस्थानांतील सुमारें पांच लाख वस्तीचा छोटासा प्रांत आहे. या प्रांतांतून अनेक धाडसी लोक बाहेर जाऊन लक्षाधीश झाले आहेत. रुइया, नेवाटिया, शेकसरिया, पोदार वगैरे अनेक प्रसिद्ध व्यापारी घराणीं या भागांतील व आसपासचीं आहेत.” [‘ जयपूर दर्शन ’ म. म. पोतदार पृष्ठ २२.]

पृष्ठ ६२ **बयाणा** :– हें ठिकाण जयपूर देवशाच्या पूर्वेस व भरतपूरच्या दक्षिणेस आहे.

पृष्ठ ६३ **पहारेवाला बसला होता. तीन डंके नौबतीवर गैबी झाले** :– ‘ होता (तों) तीन डंके ’ असें वाचावे. शेवटचा डंका वाजवून नगारखान्याचे लोक झोंपले असतां प्रत्यक्ष मार्तंडानें गुप्तपणें येऊन तीनदा नगारा वाजविला.

पृष्ठ ६४ **मी शेणगोळा करून ठेवते** :– तुकोजीराव जातीनें अधू होता परंतु ऐट थोरल्या मल्हाररावाची आणावयाचा ! अत्यंत मदिराभक्त व विषयासक्त. रखमाबाई

त्याची अत्यंत लाडकी बायको. ती फार सुस्वरूप होती. पण वर्तनानेंहि वाईट होती. रखमाबाईच्या मुठींत तुकोजीराव असे. रखमाबाईला तुकोजीरावाची हिंमत व पराक्रम पुरा ठाऊक ! म्हणून या वेळचें तुकोजीचें अवसान पाहून ती थट्टेनें हेळणेनें म्हणाली, " जा पराक्रम करून या. तुमच्या त्या पराक्रमाला दृष्ट लागायला नको म्हणून शेणगोळा इकडे तयार करून ठेवते. " पुढें नारोतपंनाना व रखामाबाईचें सख्य कानावर आल्यावर तुकोजीचा नारोपंतावर अत्यंत राग झाला व तो दंश मनांत असल्यामुळेंच त्यानें त्याचे अनन्वित हाल करून त्यास कैदेंत कुजविले व आत्महत्त्या करावयास लावले.

[मराठी रियासत उ. विभाग २ पृष्ठ २३ पाहा.]

पृष्ठ ६५ **गोषा** :- धनुष्याला दोरी जोडतात तें धनुष्याचें किंवा कमानीचें टोंक. पर्शिअन शब्द आहे.

पृष्ठ ६५ **जाट जातीनें विवस्त्र होऊन इ०** :- " After two honrs' close engagement Nawalsingh was obliged to retreat...... He threw away his ornaments lest he should be rocognised by the enemy and with a few attendants reached the fort (of Aring) in safety " From the lost field Nawalsingh took refuge first in Aring (4 miles east of Gowardhan) and later in Dig.

[Fall of the Mughal Empire Vol. III page 11, 12]

पृष्ठ ६६ **जाटापासून चार हजार रुपये घेऊन** :- ' चार हजार ' ही खासच वाचनाची चूक वाटते. मोडी ' साठ हजार ' या शब्दांचें चार हजार असें चुकीचें वाचन होणें शक्य आहे. वास्तविक खरी रक्कम कांहीं लाख असली पाहिजे.

पृष्ठ ६८ **कसरावद** :- मोठी व छोटी कसरावद अशी दोन गांवें आहेत. तीं खरगोण महेश्वर रस्त्यावर आहेत. दोघांत अंतर ३ मैल आहे.

पृष्ठ ८९ परिच्छेद ५७

श्री

लालसोटची लढाई :- श. १७०९ अ. श्रा. शु. १५

ता. ३०-७-१७८७

विज्ञापना ऐसीजे. छ. १२ सवाल शनवारचे दिवशीं लढाई राजश्री पाटीलबावा यांच्या फौजेची व जैपूर, मारवाडकर, हमदानी यांची लढाई झाली. खासा पाटीलबावा चढाई चढून भाईच्या मुक्कामापुढें जाऊन उभे राहिले. तिकडून तेहि खासा चढून आले. ते दिवशीं राजश्री शिवाजीपंत बापू यांच्या फौजेनें वगैरे पाटीलबावाकडील सरदारांनीं मिळोन राठोड पुढें वाढून आले होते ते शिकस्त करून मोडून माघारा घातले. चार पांचशें राठोड लढाईंत ठार पडले. चार पांच सरदार त्यांजकडील ठार जाहले.

पांच सातशें जखमी होऊन ते माघारा निघाले. बापूकडील फौज वगैरे पाटीलबावांकडील फौज एक कोस पावेतों पाठीमागें लागून मारीत गेले. राठोडांचा मोड जाहला. तेव्हां महंमदबेग हमदानी राजाचे डावे बाजूस उभा होता, तो राठोडाचे कुमकेस तेथून निघाला. त्यास वाटेंत अकस्मात तोफेचा गोळा लागून मृत्यु पावला. पुढें तेहि कोणी आले नाहींत. इकडील फौजांनीं चालून जावें तेंहि झाले नाहीं. पर्जन्य आला व पुढें खाया, नाला, संध्याकाळचा समय जाणून परस्परें आपलाले जागीं उभे राहून अस्तमान पावेतों तोफांची मारगिरी परस्परें जाहली. भाई उभे होते, त्याजवर दोन तीन तोफा जैपूरकरांनी थोरल्या लागू केल्या होत्या. गोळेहि बहुत आले. शें पन्नास घोडीं माणसें मेलीं व जखमी झालीं. परंतु भाई ठिकाणावरून हालले नाहींत. तोफेच्या गोळयानें भाईचे तरवारीच्या कवजाची वाटी उडाली, आणि तोच गोळा शिकारबंदाजवळ मोतदार उभा होता त्यास लागला. ईश्वरें भाईस कुशल केलें. इतकेंहि जाहलें, परंतु भाई ठिकाण सोडून आलीकडे पलीकडे जाहले नाहीं. प्रातःकाळचे प्रहर दिवसापासून ते दोन घटका अवशीचे रात्रपावेतों तोफा परस्परें चालत होत्या. उपरांतिक तेहि सरून चवकी ठेवून गोटांत आले. परंतु सरसी ते दिवशीं आपले इकडील चांगली जाहली. राठोड मोडून घातले. हमदानी मेला. पुढें एक लढाई आणखी चांगली द्यावी ही उमेद इकडील लोकांची. परंतु आतून; त्यांनीं फौजेंत फितूर केला हें समजलें नव्हतें. पलटणें व मोगल यांजकडे संधानें करून खासा पाटीलबावास व भाई आदिकरून सरदारांस दगा करावा व लढाईंत घालवावें, हें न साधल्यास लढाईचे वेळेस आम्ही चालून घेऊं, ते वेळेस तोफांचीं मारगिरी चुकवून आम्ही त्यांचे फौजेंत शिरलों म्हणजे आम्हांस शरीख होऊन दक्षण्यांची लढाई मारावी, अशा तऱ्हेनें त्यांचीं संधानें सिद्ध झालीं होतीं. शनवारचेच लढाईंत त्यांना संधान करून घालवावें असें होतें. परंतु राठोड मोडून घातले. हमदानी मेला. बाजूकडील सरे पाहिली म्हणून तोंफांची मारगिरी करूं लागले. तेहि तोफांचे मोहरे जमीदोज धरून गोळा जातो. कोणी त्याचे गोळा पावेतों पोंहचे, कोणी न पोंहचे. गोळे हजारों चालतात. अद्याप राजाकडील फौज उभी आहे तेथून हालत नाहीं. तेव्हां गोळे जातात कोणीकडे हा भाईस संदेह येऊन बातमीदार पाठविले, ते येऊन सांगूं लागले, गोळा तेथपावेतों जात नाहीं. तेव्हां गोलंदाजास पुसूं लागले, गोळा तेथवर कां जात नाहीं ? ते म्हणूं लागले, तोफा धाकट्या, गोळा तेथवर पोंहचत नाहीं. तेव्हां बिडी थोरल्या दोन तोफा नेऊन तेथें लाविल्या त्यांचा गोळा हमदानीस लागून ठार झाल्याची बातमी आली. पुढें गोळे जाऊन राजाचे फौजेंतील पांच सातशें घोडीं माणसें मेलीं जखमी झालीं. हें शनवारच्या लढाईचें वर्तमान. उपरांतिक दुसरे दिवशीं छ. १२ सवाल आदितवारचे दिवशीं भाई वगैरे फौजा चढवून लढाईचे जाग्यापुढें वाढून जाऊन दोन

चार गोळे तोफांचे मारले. ते कोणी बाहेर आले नाहींत. तिसरा प्रहर पावेतों उभे राहून अस्तमानी गोटांत आले. बावा तेथेंच भाईजवळ मुक्काम करून राहिले होते. त्याजवर छ. १४ सवाल सोमवारचे दिवशीं सारे पलटणांनीं तलब आमची सात आठ महिन्यांचीं चुकवून द्या म्हणोन बोलणें तटाचें घालून मलई केली. सात हजार माणूस एक जागा झालें. वरकड आपापले जागा बइदा करून बसले. तेव्हां बावांनीं बहुता प्रकारच्या तड-जोडी त्यांस मध्यस्तांकडून बोलविल्या. शेवटीं सौ बायांवरील वस्ता ठेवून तुम्हांस तीन रोजमरे यांचा ऐवज देऊं, वरकड हिशेब लढाईअखेर झाल्यानंतर चुकवून देऊं असेंहि बोलले. कांहीं नक्तहि द्यावयास लागले. त्यांत वरकड पलटणींनीं थोडाबहुत ऐवज घेऊन तोड पाडिली. सात हजार माणसांची मलई एके जागा झाली होती, ते कोणताहि जाबसाल ऐकतना. लढाईचे वेळीं व आधीं त्या पलटणाचे निसबतीस मिळून सवाशें तोफा त्यांच्या जिमेस दारूगोळा छरेसुद्धां होत्या. त्या तोफांचीं तोंडें यांजवर फिरवून तलब चुकवून द्या, नाहीं तर तोफा आम्ही घेऊन जाऊं. यांणीं बहुत सांगितलें, परंतु न ऐकतां छ. १५ सवालचे दिवशीं तिसरा प्रहरां कूच करोन सवाशें तोफा, दारूगोळे, गाडीवान, गोलंदाजांसुद्धां घेऊन चालले. तेव्हां शिवाजीपंत बापू व रावराजा आदिकरून तमाम सरदार बोलावून सलाह पुसली. आपल्या तोफा व सात हजार बंदूक घेऊन चालले. पुढें याचें कसें करावें ? कंपूनीं कूच केलें त्यापूर्वी त्यांणीं जैपुरकराकडे सूचना करून त्यांची फौज चार पांच हजार चवकीपुढें येऊन उभी राहिली. मागून गोटांत तमाम फौजेची तयारी झाली. याप्रमाणें बातम्या पैदरपै येऊन पोंचल्या. तेव्हां सर्वांचे विचारें ठरलें जें, लष्करांत फितूर झाला नकळे. हिंदुस्थानी कोण कोण फितुरांत मिळाले आहेत. साऱ्याच पलटणांनीं तलबेचा बइदा केला होता. परंतु वरकड राहिले. तोंच कंपू सात हजार माणूस कूच करून चालले. वरकड लष्करांत पलटणें व मोगल वगैरे हिंदुस्थानी येथें आहेत यांचा विश्वास काय ! येसमयीं लढाई घेणें सलाह नाहीं. लष्करांत एकच गर्दी होऊन आपले पारखें कोणाचा विश्वास कोणास न येतां पाणिपत होईल. कंपू तोफा घेऊन जातों, जाऊं द्यावा, या वेळेस त्याशीं लढाई घेऊं नये, याप्रमाणें समस्तांनीं बावांशीं बोलून तेथेंच बसले आहेत, तोंच कंपू कूच करोन दीड कोस इकडून गेला. तिकडून राजाची फौज पुढें येऊन तोफा व कंपूस घेऊन त्यांची चवकी उभी राहत होती तेथें त्यांस उतरविले. त्याजवर अस्तमान झाला. तितक्यांत बातमी आली जे, कंपू दाखल जाहल्याचें वर्तमान राजास जाऊन पोहचलें. त्यावरून राठोडसुद्धां त्यांच्या फौजा तमाम तयार होऊन लढाईचे इराद्यानें येतात. दुसरी बातमी आली जे दवलतराम, पहाडसिंग फौजा घेऊन पुढें आले. राजे अद्यापि आले नाहीं. तेव्हां येथेंहि जिनबंदी होऊन चार शेरांची धारण. शिलेदारांस उपास. परंतु तेथें भाईसमागमें तमाम सरदार फौजसुद्धां

लढाईच्या जाग्यावर जाऊन उभे राहिले. मागाहून बावांनींहि सिद्धता केली. पुढें चार पांच घटका रात्र गेल्यानंतर कंपूनें एक शिलक तोफांची केली. तेव्हां सर्वांस समजलें, आतां ते चालून घेतात. कोणी तर्क केले, कंपू त्याकडे गेला; त्याणें सलामी तोफांची शिलक केली. त्यावर बातमीहि या अन्वयेंच आली. परंतु फौजा राठोडसुद्धां तमाम उभे आहेत, तेव्हां बावांनींहि आपले चिलखत आणविलें,.आणि निश्चय केला जे, ते तिकडून पुढें वाढून आले म्हणजे इकडून आपण चालून जावें. ईश्वरानें नेमिलें असेल तें होईल. त्याजवर बातमी आली जे, त्यांच्या फौजा माघारा गेल्या, तोफखान्याजवळ चवकी हजार पांचशें स्वार आहेत. तेव्हां यांणींहि चवकी ठेवून भाई गोटांत बावाजवळ आले. त्या उपरांतिक प्रहर सहा घटिकांनीं शिवाजीपंत बापू पाटीलबावांजवळ येऊन बावा व भाई यांस एकांतीं घेऊन बसून बोलले. समय पाणिपतसारखा प्राप्त झाला. आज रात्रीसच ते चालून येते म्हणजे मरणें प्राप्त. उद्यां प्रातःकाळीं कच्छे व राठोड तमाम यांच्या फौजा चालून येणार. आपलीं पलटणें तोफा त्यांजकडे गेल्यानें त्यांस हुशारी येऊन ते हावभरी जाहले. आपले फौजेची हुशारी मंदावली. फौजेंत पलटणें व मोगल रांगडे हिंदुस्थानी आहेत त्यांचा विश्वास नाहीं. परिच्छिन्न ते लढाईचे समयीं घालवितील. अझून परीक्षा पहावयाची बाकी राहिली नाहीं. दक्षणी फौज किती आहे ती आपल्या ध्यानांत आहे. चार शेरांची धारण, बाहेरून रसद येत नाहीं. शिलेदार उपासानें मेले. घोडीं मेलीं; राहिलीं त्यांत सामर्थ्य नाहीं. वैरणीचा काळ. लढाई कशाचें बळावर घेणार ! ये वेळेस चार दिवस येथून निघावें. मसलतीस टाळा द्यावा. पुढें पाहून घेऊं. याप्रमाणें चांगले रीतीनें समयोचित बोलून कूच करावयाचा निश्चय ठरावून, मागील प्रहर रात्र राहतां सर्व्या फौजा तोंडावर ठेवून, बावा व आपण मागें राहून बुणग्याचें कूच माघारा करविलें. थोरले बुणगे चार पांच कोस मागें लालसोटानजीक होते तेथें सांडणीस्वार पाठवून त्याचेंहि कूच करविलें. तितक्यांत मागील घटकांत रात्र राहतां सर्व्या फौजेचेहि बुणगे थोरल्या बुणग्यांत येऊन सामील जाहले. लोक आपापले लादायचे गडबडींत, त्या संधींत बुणग्यांत तोफा होत्या. त्यांतील एक संदूख दारूचा कोगे पलटणच्या प्याद्यानें बत्ती लावून उडविला. त्याचा प्रकाश व बार थोरल्या तोफेप्रमाणें कडाखा होऊन जवळ दारू आणखी होती तेहि उडाली. बाणाच्या गाड्या तेथें होत्या, त्यास मात्र बत्ती जाऊन पोंहचली नाहीं. संधान करणारानें कसूर केला नाहीं, परंतु ईश्वरें मोठें कुशल केलें. बाणास बत्ती जाऊन पोहचती म्हणजे लष्कर ते दिवशींच बुडालें होतें. संदूख उडाला त्यावरून तमाम बुणग्यांतील लोकांस वाटलें जे, येथें पलटणें होतीं त्यांणीं तोफा लष्करावर फिरविल्या. आधींच समय पलटणीचा, त्यांत हें साहित्य जाहल्यानें वसवास जाऊन घडका केला. पळूं लागले. वस्तभाव लादालाद ज्यांची झाली होती ते घेऊन निघाले. ज्यांची राहिली

त्यांणीं कार्याकारण घेऊन वरकड तसेच टाकून पळाले. फार करून बाजारकऱ्यांचा दाणादुणा, कापड, कोणाची राहुटी, कोणाचीं पालें, खाशा पाटीलबावाच्या मुदबकाचीं भांडीं, फराशखान्यांतील ओझीं खाण्याची वगैरे तळावर तशीच राहून लोक जीव घेऊन पळतात तशासारखें पळूं लागले. कितेक तळावर आहेतच, तों अफरासियाबखानाचा बाजार लष्करचे सोद्यांनीं व पेंढारी यांणीं लुटला. विना लढाई एकच गर्दी चहूंकडून विलग तऱ्हेची होऊन बुणगे तेथून निघाले. त्याजवर पाठीमागून चौदहा घटकांनीं पाटीलबावा तळावर आले. पहातात तों पळाल्याप्रमाणें अवस्था दिसली. तेव्हां तेथें उभे राहून खाशा मुदबखाचीं भांडीं व फराशखान्याची ओझीं सांडण्या सुतरनाळाचे उंटावर घालून लोकांस सांगितलें, तळावरील तुमचे उपयोगी असेल तें घ्या, वरकड जमा करून फुंकून द्या. अफरासियाबखान याची स्त्री व मूल तळावरच राहिलें होतें. ओझीं त्यांचीं नित्य भाड्याचे उंटावर चालत. ते दिवशीं उंट मिळाले नाहींत. तेव्हां बावांनीं हत्तीवर त्यांचीं ओझीं लादून त्यांस मार्गस्त करून आपण चार घटका तळावर बसून तळास आग देविली. ते दिवशीं पिंपळाईस येऊन तिसरा प्रहरीं मुक्काम जाहला. बुणग्यास बारा कोसांची मजल पडली. सड्या स्वारीचे लोकांस सोळा सत्रा कोसांची मजल जाहली. अस्तमानी बावा बुणग्यांत आले. पाठीमागून चार सहा घटका रात्रीस भाई वगैरे फौजा तोफखाना सांभाळून घेऊन गोटांत आले. दरम्यान दयाराम पुरव्याची दोन पलटणें अडून उभीं राहिली होतीं. तलब आमची द्या नाहीं तर आम्ही येत नाहीं. सरकारच्या दहा पंधरा तोफा त्यांचे निसबतीस. बावांनीं बहुता प्रकारें सांगितलें न ऐकत. पाठीमागून भाई आले. त्यांणीं बावांस पुढें बिदा केलें, आणि सांगितले जे यांशीं बोलून पाहतों, आले तर उत्तम, नाहीं तर हीं दोन्ही पलटणें कापून काढून तोफा आपल्या घेऊन येतो. आपण पुढें जावें. त्यावरून बावा पुढें आले. भाई तेथें उभे राहून पलटणाशीं सख्त रीतीनें बोलून तोफा पलटणें लष्करांत घेऊन आले. दुसरे दिवशीं त्याच (अन्वयें) बुणगे पुढें घालून आपण पाठीमागें राहून आठा कोसांवर येऊन मुक्काम केला. खुशालगडांत एक दोन तोफा व फराशखाना वगैरे होते ते तेथील तेथेंच राहिले. आणावयास बनले नाहीं. कमावीसदार जीव घेऊन पळून आला. रांगड्यांनीं ठाणें आटोपलें. पाठीमागून हमदानीचा पुतण्या व पहाडसिंग दवलतराम हलद्या पंधरा हजार फौजेनिशी पाठलाग करावयास येतात. बातमी आली. त्यावरून नित्य खासा बावा व भाई वगैरे सरदार पाठीमागें फौज सुद्धां राहून बुणगे पुढें घालून मजल दरमजल मोठ्या मोठ्या मजली करीत, या अन्वयें डिगेपावेतों आले. रांगड्यांची फौज पिंपळाईपावेतों आली होती, तेथून माघारा परतोन गेले. नित्य लष्करांत अवाया पडत. आतां स्वस्थ आहे. परंतु लष्करानें अवाई खादली आहे. पुढें

पहावें. येथून पुढें फितुराची चवकशी व फितुरीयांचे पारपत्याचा विचार होणें तो होईल. नौबतरायाचे जिमेस तोफखाना पलटणें होतीं. इतका फितूर केवळ एका दोहों रोजांत जाहला नाहीं. दोन चार महिने संघान चाललें आहे हें आतां समजण्यांत आलें. रात्रंदिवस नौबतराय तेथें असतां त्यास न समजतां जाहलें किंवा तोहि यांत आहे कळे काय ? परंतु त्याचा संदेह बावांच्या अंतःकरणीं आला. वरकडास तो परिच्छिन्न आहेच. चवकशी होते. बाहेरून त्यांजवर चवकी स्वारांची आहे. पुढें काय निवडेल तें पहावें. परंतु याउपर फितुरीयांचीं पारिपत्यें होतील. बावांनीं कुटुंबें वगैरे कुल कारखाने बुणगे ग्वालेरीस रवाना करून सडे होऊन आहेत. प्रसंगीचें सविस्तर वृत्त निवेदन व्हावें यदर्थी तपसीलेंकरोन विनविलें आहे. नौबतराय याजकडे तोफखाना, पलटणें, बक्षीगिरी सांगितली. अलीकडे त्याजवर अखत्यार पाटीलबावानीं बराच दिला आहे. परंतु हिंदुस्थानी माणूस आर्जवी, फार तऱ्हेतऱ्हेनें आर्जवून कामकाज करून दाखवून मेळवून घ्यावें. समयास बनेल तशी वर्तणूक करावीं अशी चाल आहे. याकरितां पाटीलबावांनीं बहुत सावधपणें वर्तत जावें म्हणून स्वामींनीं पूर्वीं लिहिलें होतें व बाळाजीपंत जामगांवकर याजवळ बोलणें जाहल्यावरून त्यांणींहि या अन्वयें येथें लिहून पाठविलें. आम्ही स्वामीची वजिनस चिठी पाटीलबावांस एकांतीं वाचवून दाखवून मजकूर बोललों. ते समयीं म्हणूं लागले येविशींचा बंदोबस्त आहे, काळजी न करावी. निदान स्वामीच्या लिहिल्या अन्वयेंच प्रत्ययास आलें ! आतां स्मरतात ! हिंदुस्थानीं यांणीं दवलतच गारग केली होती, पाणपत होण्यांत बाकी नव्हती. परंतु श्रीमंतांचे पुण्येंकरून व पाटीलबावांचे दैवेकरून बचाव जाहला ही गोष्ट थोरली जाहली. सांप्रत बावाहि आपले जागीं खिन्न आहेत. श्रीमंतांनीं लिहिलें व घरच्या मंडळीनेंहि सांगितलें. परंतु होणारासारखी बुद्धि झाली. हिंदुस्थानीयांचे विश्वासावर गेलों त्याचें फल पावलों, असें म्हणत असतात. होणारास कोणाचा उपाय नाहीं. वाईट व्हावें याकरितां त्यांणीं संग्रह केला नव्हता. परंतु हिंदुस्थानी बेइमान ! वेळेस त्यांणीं घालविलें हें आतां प्रत्ययास आलें. पुढें दौलतीचा वगैरे बंदोबस्त करितात तो जाहल्यावर मागाहून लिहून पाठवूं., सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

[ऐतिहासिक पत्रव्यवहार लेखांक २६१ पृष्ठ २३२ ते २३७ संपादक गो. स. सरदेसाई, कृ. पां. कुलकर्णी, या. मा. काळे.]

पृष्ठ ७१ परिच्छेद ५० **अहल्याबाईनें हरिपंत्तास व महादजीस कशी ठणकाऊन उत्तरें दिलीं त्याचा नमुना**

ता. २८ आक्टोबर इ. स. १७८०

मि. कार्तिक शुद्ध १ शके १७०२

" पुरवणी श्रीमंत राजश्री नानासाहेब यासः– विज्ञापना, राजश्री बाळाराव गोविंद

यांसी व मातुश्री अहिल्याबाईंशीं बोलणीं झालीं. ते समयीं बाई व बाळाराम व आबाजी नाईक वानवळे, बाईकडील मंडळी राजश्री कृष्णाजी मुरार व मुकुंदराव दिवाण व वासुदेव चिमणाजी व जयराम रावजी व आबाजी रणसोड इतके बसलें होते. बाईनीं फडणीसांस सांगितलें जे, पांचा वर्षांचा हिशेब बाळारावांस दाखवा. सरदार दक्षणेस होते. चौ साला जमा नी खर्च जो जाला, तो दाखवा म्हणून बाईनीं सांगितलें. त्यास फडणीसांनीं बाळारावांस हिशेब दाखविला. समजावून दिल्हा. बाई बोलली जे, 'हा वेळपर्यंत आम्ही हिशेब तुम्हांस नाहीं दाखविलें. सुभेदारांचे वेळेस तुमचे हिशेब आम्हांकडे आले. कितिकदां आम्हीं पाहिले आहेत. परंतु सांप्रत तुकोजीबावा विजयध्वज दौलतकर्ते पैदा जाले, त्या योगेंकरून तरी हिशेबाचे महजव घरोघर देणें आम्हांस प्राप्त झालें ! बरें, भगवत् इच्छेस उपाय नाहीं ! परंतु बाळाराव ! तुम्हांस कळलें असूं द्या, अद्याप तुकोजी बावांनींहि कोठें पराक्रम करून अधिकोत्तर मेळविलें नाहीं. सुभेदाराचेंच मेळविलें खातात, आणि महादजीबावांनींहि अधिकोत्तर कांहीं मेळविलें नाहीं. राणोजी शिंद्याच्याच दौलतीवर उडया मारितात. जयाजी शिंदे मेल्यावर, दत्ताजी शिंद्यानें कशी लढाई केली, तदोत्तरहि कसे पराक्रम केले; तसे तुम्हीं अगर तुकोजीबावांनीं कोठें काय पराक्रम केले आहेत ? आणि सांप्रत धनी लहान, मुत्सद्यांचा कारभार, राज्यांत मातबर सरदार तुम्हीच दोघे. तेहि समयानरूप समजूनच तुम्हांशीं वर्ततात. कैलासवासी श्रीमंत रावसाहेब होते, ते वेळेस त्यांच दाबहि तसेंच होते. तुमच्या वर्तणुकीहि तशाच होत्या. असो. इतकें बोलावयास कारण हेंच कीं, तुकोजी बावांचें इतके दिवस वांकडें पाऊल पडलें नाहीं. परंतु चार पांच वर्षें उभयतांच देशीं होते, तेथें उभयतांची मसलत जशी जाली असेल, तशी यांचीं पावलें पडत जातात. असो. काय चिंता आहे ? तुमचें मानस असेल कीं, बाईस चहूंकडून उपद्रव जाल्यानें, सारेच बंदोबस्त आपण केल्यावर बाईनीं काय करावयाचें आहे ? परंतु तुम्हांसहि कळलें असूं द्या, मी सुभेदाराची सून आहे. केवळ तुकोजीबावाच दौलतीचे धनी आणि मी कशांत कांहीं नाहीं, असें समजूं नका. तुकोजीबाबा हे माझे हातचे कामास लावलेले आहेत. त्यांणीं निमकहरामीचे फंद आम्हांसीं केल्यास, पुढें सुखरूप दौलत करूं म्हणतील, तर त्या गोष्टी दुरापास्त आहेत. फार खराब होतील. आजकाल पाटीलबावांचा दम तुकोजीबावा फार राखितात. आणि पाटीलबाच्याहि चित्तांत फार फंद असेल, उभयतांहि फौजसुद्धां मजवर चालून यावें. सुभेदारांचे पुण्यप्रतापें येथेंहि कोणी वांगडया लेऊन बसलें नाहीं. श्रीमार्तंड समर्थ आहे. जें ईश्वर घडवील तें खरें !' इतकें बाई बोलल्यावर बाळारावांनींहि फार नम्रतेचीं उत्तरें केलीं कीं उभयतांसहि वडील आपण आहेत. जितकी आपण रागें भरून आज्ञापिलें, त्याचे लेशहि

पाटीलबावाच्या चित्तांत नाहींत. असें असतां कितीकांनीं कितीक गोष्टी विपर्यास आपणास समजाविले असतील तें किमपी ध्यानांत न यावें. सुभेदाराचे जागां व राणोजी बावांचे जागां उभयतांसहि आपण वडील आहेत. असें फार बाळाराव बाइशीं ममतायुक्त बोलले. बाई बाळारावाशीं बोलली जे, बहुत ममतापुरस्कर बोलतां. परंतु दोन्ही शानें तुम्हांस पाठ आहेत. वरते तोंडानें बोलत जावें, पायानें तुडवीत जावें, हातपाय जोडून, आदब करीत असावी, हे तालीम तुम्हांजवळून शिकणारांनीं शिकून जावी. असो. तुकोजी-बावांनीं इतकें जें केलें आहे, तें तुमच्या मुखांतरें पुण्यांतहि श्रीमंतांजवळ बंदोबस्त केलाच असेल. येविशीं पुण्याहून धन्याचेंच पत्र आम्हांस आणा कीं, सुभेदाराचे तुम्ही कांहीं नव्हां. त्यांचे दौलतीचे वारिसदारी तुम्हांस पोंहचत नाहीं. सर्वविशीं मुगुटमणी तुकोजीबावा आहेत. तुम्हीं उठून काशीयात्रेस जाणें. असें धन्याचें व कारभाऱ्याचें पत्र, शंभर स्वार, एक कारकून येऊन, त्यांनीं आम्हांस उठून जा म्हटलें म्हणजे आम्ही तुमचे आज्ञेचा उजूर करणार नाहीं. त्यांचीच आज्ञा आम्हांस शिरसावंद्य आहे.' बाळाराव बोलले जे, श्रीमंत धनी, ते आमचे ओंजळीनें पाणी पितात कीं काय? बाई बोलली जे, तेहि काय करतील! आजचा काळ असाच आहे. अशीं फार बोलणीं झालीं. मग बाळारावहि बाईच्या संतोषानरूप बोलून बाईस संतोष करून निरोप घेतला. [महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें. लेखांक २३ पृष्ठ ५२-५३.]

पृष्ठ ७५ **जसे तुम्ही आपल्या बायका सुपारीच्या खांडासारख्या गिळून गेला इ०.**

"कोणे वेळेस (अहल्याबाईच्या) बोलण्यांत आलें. आहे कीं, शिंद्यानीं बायकांच्या मेखा खांदडीस दिल्या, तसें येथें होणार नाहीं. सुभेदारांच्या पुण्यप्रतापें जें घडणें तें यथायोग्यच घडेल," असें दोन चार वेळां भाषणें जालीं आहेत.

[महेश्वरदरबारचीं बातमीपत्रें. लेखांक ४० भाग १ ला पृष्ठ १०४.]

पृष्ठ ८१ **काकडावर :--** मोडीवाचनाची चूक दिसते. "यादवाडावर" असें मुळांत असावें! या बखरींत अन्यत्र काकक गांव आलें आहे, तें गुजराथेंत आहे.

काकड:-- हेंच काकर असावें. या बाबत Imperial gazetteer of India यांत पुढील माहिती मिळते. Kankrej is a flat open and fairly wooded contry situated on both sides of the बनास river (Palanpur agency, Gujrat.) Kankrej cmprises twenty six different estates held by Rajputs. The principal villaga in Kankrej is Thara, five miles north of which is Kakar (काकड) the ancient capital of state with some ruined temples.

(काफडादा नांवाचें एक गांव महेश्वर परगण्यांत महेश्वर व मांडूचा किल्ला यांमध्यें आहे. येथें सैन्याच्या छावणीसाठीं तळ पडत असे, असें सांगतात. तेव्हां काकड व काकडदा एकच कीं काय ?)

पृष्ठ ८१ परिच्छेद ५५ **यांतील टिपूच्या मराठी लष्करावरील छाप्याची हकीकत व टिपूचे कागदपत्र सुभेदाराकडे येत यासंबंधीं माहिती व खुलासा. सन १७८६ नोव्हेंबर**– "टिपूच्या लष्करांत मराठ्यांच्या हालचालीच्या सर्व बातम्या कळत होत्या. सायंकाळची संध्या आटपून हरिपंत तात्या मोंगल व भोसले यांसह आवशीस कलकेरीकडे निघाले. तों वाटेंत बारी होती तींतून बाजारबुणगे व लष्कर जात असतां टिपूच्या फौजेनें येऊन त्यावर बाणांचा अतोनात वर्षाव केला व बेदड्यांच्या झुंडी येऊन बेलाशक बाजार बुणगे लुटूं लागल्या ! भोसल्यांचे बुणगे बरेंच लुटले गेले आणि मोंगलांची तर अतोनात नासाडी झाली. या मोहिमेंत टिपूनें मराठ्यांच्या लष्करावर घातलेला हा शेवटचा छापा होय. छापा घालण्यापूर्वीं व नंतरसुद्धां टिपूकडून हरिपंत व होळकर यांजकडे प्रत्यहीं पत्रें येत कीं, तहाचें बोलणें करण्याकरितां वकील पाठवीत आहों. ते वकील कधीं पाठवावे हें लिहून द्यावें. होळकराच्या पत्रांत टिपूनें लिहिलें होतें कीं, "वकील मातबर पाठविले आहेत. यांचा बहुमान करून ज्या गोष्टीकडून दोहींकडील खलष दूर होय तें करावें." त्यावर होळकरानीं जबाब लिहिला कीं, "वकिलाची रवानगी करितों, कधीं करावी हें उत्तर येतांच रवानगी करितों, म्हणून (आपलीं) पत्रें येत असतां दरम्यान छापा आला ही गोष्ट न व्हावी. त्यास आपण दाना दुरंदेशी आहेत. असें असतां ही गोष्ट घडूं नये. त्यास ज्या समयीं सरकारांत वकिलाचें प्रयोजन लागेल ते समयीं आणविले जातील." हें होळकराचें उत्तर बाणेदारपणाचें होतें. तहाबद्दल टिपूची मध्यस्थी आजपर्यंत व यापुढेंहि होळकराकडेच होती. असें असतां ती मध्यस्थी एकीकडे राहून टिपूनें विश्वासघात करून छापा घातला ही गोष्ट होळकराच्या मनास बरीच लागली असावी. छापा आला त्या वेळीं शत्रूच्या लोकांनीं गर्दी केली त्यांतच होळकराचे पेंढारी मिसळून त्यांनीं आपलेंच लष्कर लुटलें, असा बोभाटा त्यावेळीं फार झाला होता, व त्यांत बरेंच तथ्य होतें. छाप्यानंतर दुसरे दिवशीं भोसले व मोंगल यांच्या लष्करांतलीं उंटें, घोडीं, बैल वगैरे पेंढाऱ्यांकडे सांपडलें, हें त्यांस प्रत्यक्ष प्रमाण होय. शत्रूकडून आलेला तहाचा संदर्भ कबूल करण्यांत होळकरानीं कांहीं लांचलुचत घेतली असावी, आणि त्यांच्याच प्रेरणेवरून पेंढाऱ्यांनीं लष्कर लुटलें; व लुटीचा माल टिपूस निम्म्या किंमतीस विकला; वगैरे अफवा त्या वेळीं मराठी लष्करांत उठल्या होत्या; त्यांत सत्याचा अंश पाहूं जातां ज्यांनीं या मोहिमेचा बराच बोजा आपल्या शिरावर उचलला होता असे थोर सरदार तुकोजी होळकर शत्रूस

सामील होऊन मराठी राज्याशीं बेईमानी करितील हें मुळींच संभवत नाहीं. पेंढारी ते बोलून चालून पेंढारीच ! त्यांनीं पाहिजे तें कुकर्म केलें असलें तरी त्याचा दोष होळकरांवर लादणें वाजवी नाहीं. होळकरांकडे तद्दाप्रकरणीं टिपूचे कागद नेहमीं येत असत व ते कागद वाटेंत धरून त्यांत कांहीं फितुराचें सांपडत कीं काय, म्हणून पुष्कळ शोध त्या वेळीं झाला. पण तसा लेखी पुरावा कोणांस कांहीं एक सांपडला नाहीं. लष्करच्या हालचाली होळकराच्या सल्लयानें हरिपंत करीत असत ही गोष्ट पुष्कळ सरदार लोकांस आवडत नव्हती हें मात्र खरें. "

[ऐतिहासिक लेख संग्रह खरेकृत पृष्ठ ४०३२, ४०३३, ४०३४.]

पृष्ठ ८२ ओळ ७ वी **मोंगल भोंसले यांचे येथें रामजानीचा तमाशा होत होता :-** या प्रसंगाचा उल्लेख समकालीन ऐतिहासिक कागदपत्रांत नाहीं. परंतु एका पोवाड्यांत मात्र आहे. शाहीर राघुकृत बदामीच्या किल्लयावरील लढाईच्या पोवाड्यांत पुढील उल्लेख सांपडतो :- " किल्लयांत फिरंगी रोहिला जंगी, मारितो रंग रकेल्याचा । तळ्याकडे मोर्चा भोंसल्याचा । आंत कानडा लोक फांकडा, शिपाई सडे तलवार नेमिलें चार हजार ॥ तळ्याचा तिरीं भोंसला, शिरी श्रीमंत बिनीवर । मोंगलाचें लष्कर ॥ बसूनियां हंबीर करिती विचार 'हल्ला करा एकदाची ' खबर ऐका बदामीची ॥ किल्लयाचें आंग भिउनि फिरंग भार हा पळतो कानड्याचा । मुजरा पाहती किल्लयाचा ॥ पाटणकर दंग, वाजे मृदंग, मांडला रंग, गोळा सुटला तोफेचा । ठाय उडविला नायकिणीचा ॥ "

पृष्ठ ८३ ओळ ७ वी **१० हजार फौज घेऊन :-** " १० हजार फौज देऊन " असें पाहिजे.

पृष्ठ ८४ ओळ १२ **उज्जनीस येऊन गोळे करणें इ० :-** 'गोळे मारणें' असें मुळांत असावें.

पृष्ठ ८६ ओळ १९ **पाटिलबावांनीं पागोटें टाकून फेटा बांधला :-** केल्या कर्माचें फळ मला पावलें असा पश्चात्ताप केला - " सांप्रत बावाहि आपले जागां खिन्न आहेत. श्रीमंतांनीं लिहिलें व घरच्या मंडळींनीं सांगितलें, परंतु होणारा सारखी बुद्धि जाली. हिंदुस्थानी यांचे विश्वासावर गेलों, त्याचें फल पावलों, असें म्हणत असतात. होणारास कोणाचा उपाय नाहीं. वाईट व्हावें याकरितां त्यांणीं संग्रह केला नवता. परंतु हिंदुस्थानी बेईमान वेळेस त्यांणीं घालविलें, हें आतां प्रत्ययास आलें. "

[आप्पाजी रामाचें पेशव्यास पत्र ता. २८ जुलै १७८३ लेखांक ५०३ पृष्ठ नं. ६९१. महादजी शिंदे यांची कागद-पत्रें संपादक सरकार व सरदेसाई.]

पृष्ठ ८८ ओळ २ री करवंदीप्रमाणें थालनेर येथें :- करवंदी प्रगणें (परगणे) थालनेर असें तर मुळांत नसेल !

पृष्ठ ८९ ओळ १७ मल्हारगड :- उदेपूरच्या आग्नेयीस व मंदोसराच्या वायव्येस आहे.

पृष्ठ ९० परिच्छेद ६० ओळ ११ वी. हल्ला आला नाहीं यापुढें पूर्ण विराम आहे तो नको.

पृष्ठ ९४ परिच्छेद ६२ ओळ ५ वी नारो गणेश असताना चढवीत होते :- नारो गणेश अस्तन्या चढवीत होते. आवेश किंवा स्फुरण आलें असतां आपण अस्तन्या मागें सारतो. नारो गणेशाला ईर्षा आली होती व तो अस्तन्या सारू लागला होता, परंतु आबा चिटणीसानें त्याला बुद्धिवाद सांगून शांत केलें.

पृष्ठ ९६ परिच्छेद ६४ तुकोजी होळकरानें नारो गणेशाचा केलेला छळ :- " सुभेदारांकडील प्रकार म्हणावा तरी, राजश्री नारोपंत यांचा दाब व चाल यथास्थित बरी अथवा वाईट होती. परंतु सुभेदारांचा भाव रक्षून सर्वांची मर्जी रक्षण केली होती. गुदस्तापासून येथें आलिया तागाईत पाटिलबाबांशीं स्नेह संपादून, थोडी बहुत पांच लक्षांची वांटणीहि घेतली व पांचा लक्षांचें इनामहि करून घेतलें, आणि फिरोन भयप्रीतहि राखिली होती, व दरबारांतहि सर्वांशीं स्नेह लहान मोठ्यांशीं ठेविला होता. ऐसें असतां, सुभेदारांनीं मल्हारनिल्हेची अब्रू बेतऱ्हा घेतली. ब्राह्मणाचें पारिपत्य श्रीमंताचे राज्यांत ऐसें कोणींच केलें नाहीं. श्रीमंताचे घरीं मुत्सद्यावर अथवा सरदारावर इतराजी जाली तर दरबार मात्र मना होतो. घरीं बसले नंतर त्यास शिक्षा जाहालियानंतर पांच रुपये त्याजपासून जागा असल्यास घ्यावे, नाहीं तर सरकार कामाचाच नसला तर दूर करावा. ही गोष्ट निदान जेथें तोडच नाहीं तेथें ह्या गोष्टी घडतात. बहुतच हरामखोर असला तरी किल्लाकोटहि प्राप्त होतो. परंतु मातबर माणसास अथवा छोटेखान्यास ब्राह्मणास मारहाण करणें अथवा बंदुखेचे जामगीनें आंग भाजावें, हें कोठें ऐकण्यांत नव्हतें. तें नारोपंतांस येथें प्राप्त जाहालें. मल्हारनिल्हेची जप्ती केली. घोडीं, उंटे, दौलत सर्व सरकारांत लाविलीं. त्यास कैद केलें. पुत्र व स्त्री या उभयतांस निरनिराळीं आणि नारोपंतांस स्वतंत्र याप्रमाणें ठेवून, मागतीं जे समयीं नारोपंतांचें पारिपत्य भिकाजी होळकर यांजकडून करविलें, तेव्हां त्यांनीं मल्हारनिल्हेचे स्त्रीस व पुत्रास उष्णामध्यें उभे करून, त्यांचे रूबरू मल्हारनिल्हेस तव्यावर उभे केलें आणि कानास चाप लाविले. खांद्यावर बन्दुका दिल्या. ऐसी बहुत प्रकारें विटंबना केली. प्रस्तुत कारभार राजश्री पाराशरपंत वाघ करीत असतात. जे समयीं बहुतच निग्रह मल्हारनिल्हेवर केला, तेव्हां गोवर्धनाचे मुक्कामींहून पाटिलबावांनीं राजश्री

राणेखानभाई व राजश्री सदाशिव मल्हार यांस पाठविलें. त्यांनीं जाऊन सुभेदारास बहुत निषेध केला. तेव्हां बोलले कीं, याउपर त्यांस मारहाण करणार नाहीं. इतकी मात्र गोष्ट कबूल केली. परंतु खाण्यापिण्याची जैसी आटक होती, त्याप्रमाणेंच आठ पंध्रा दिवस होती. एक मार मात्र बंद जाहला होता. नंतर मशारनिल्हेपासीं पन्नास लक्ष रुपये मागों लागले- निदान पंचवीसपर्यंत आले. तेव्हां मशारनिल्हेनीं उत्तर साफच केलें कीं, माझी अब्रू राहती तर पांच रुपये तुम्हांस, माझे पदरीं होतें किंवा नव्हते, परंतु अब्रूकरितां देणें प्राप्त होतें. आतां कांहींच मिळत नाहीं. प्राण घ्यावा इतकी मात्र गोष्ट आहे. तेव्हां चोहोंकडून उपराळा नाहीं. हकनाहक प्राण जातो आणि विपरत्य होतात. ऐसें जाणून पंध्रा लक्षांचा ठराव जाहला. शिवाय दरबार खर्च काय पडला तो न कळे. याजमुळें पाटिलबावांस बहुतच वाईट वाटलें."

[आप्पाजी रामाचें पेशव्यास पत्र. महादजी शिंदे यांचीं कागदपत्रें लेखांक ५८६.]

पृष्ठ ९६ ओळ १ ली **बापू सुभेदारापुढें ठेऊन** :- 'बापूनीं सुभेदारापुढें ठेऊन' असे मूळांत असले पाहिजे.

पृष्ठ १०२ ओळ ३ री "**श्रीमंतास करण्यास** –" "श्रीमंताचे करण्यास" असें असावें.

पृष्ठ १०४-५-६-७ परिच्छेद नं. ६६ यांतील मेडत्याची लढाई होळकराच्या मदतीनेंच केवळ फत्ते झाली अशी जी हकीकत सांगितली आहे, तिला पारसनीस संपादित जोधपूर येथील राजकारणें या पत्रव्यवहारांत आधार सांपडतो. पेशव्यांचा जोधपूर येथील वकील कृष्णाजी जगन्नाथ २-११-१७९० च्या पत्रांत म्हणतो – "मेडत्याची लढाई श्रीमंतांचे पुण्यप्रतापें फत्ते जहाली. डभाईचा तोफखाना पिऊन खातरेंत न आणतां हजार स्वारांनीं तरवार अशी चालविली जे, दोन कोस माघारे फिरविले. राजश्री अलीबहाद्दराचे दिवाण राजश्री बळवंतराव सदाशिव, व राजश्री काशीराव होळकर व राजश्री बापूजी होळकर मागाहून येऊन तरवार चालविली, तेव्हां लढाई फत्ते जहाली. अस्सल वर्तमान या प्रकारें आहे."

पृष्ठ १०६ **अफूचा गाळावा घेऊन** – पैजेचा विडा उचलणें, किंवा आण प्रमाण करणें अशा वेळीं अफू गाळून प्यावयाचा कांहीं विधि रजपुतांत असावासें दिसतें. उदाहरणार्थ पुढील उतारा पहा– "इंद्रसिंग सवाईसिंगाचा भाऊ व सिवचंद भंडारी व बुधसिंग सर्व एकत्र होऊन, परस्परें निखालसता करून अफीम गाळून प्याले. आणभाष, क्रिया केली जे, बक्षीनें सवाईसिंगासीं नासूं नये. सवाईसिंगानीं बक्षीसीं दगा करूं नये. याप्रमाणें ऐक्यता जहाली."

[जोधपूर येथील राजकारणें पृष्ठ ९८ लेखांक २७ वा.]

पृष्ठ १०९ **सत्वासची गढी खालीं करून होळकराचें ठाणें उठवून (महादजीनें) बऱ्हाणपूरचा सुमार धरला वगैरे** – "नर्मदेच्या दक्षणेस नेमावर महाल मोठा.

शिंदे होळकरांचा समाईक. त्यांत सरवास जागा बहुत दिवस उजाड पडली होती तेथें (अहल्या) बाईंनीं ठाणें ठेविलें. निमें ठाणें (महादजी) बावांचें असावें, तें बाई ठेवूं न देत. म्हणत कीं, खर्च पडला तो देणें. असें एक वर्ष लोटलें. सांप्रत बावा त्याच मार्गें आले, त्यांनीं ते जागा खालीं करून घेतली. त्याचे बदला दुसरें स्थळ यांस (म्ह. अहिल्याबाईस) लाऊन दिलें म्हणोन वर्तमान आलें. बाई फार श्रमी आहेत." [मराठी रियासत उत्तर विभाग २ पृष्ठ २५९.]

पृष्ठ ११३ **असें बोलणें होतांच त्या समयीं** — असें त्यांचें बोलणें होत आहे तोंच.

पृष्ठ ११४ **पण निशाणाचा हत्ती भवानी शंकर मागें फिरेना. तेव्हां निशाण उतरून घेतल्यावर मागें फिरला** — ज्या हत्तीवर सैन्याचें मुख्य निशाण उभें केलेलें असतें त्याचें महत्त्व लढाईंत फार. निशाणाचा हत्ती शत्रूनें घेरून वळवून नेला तर किंवा तो हत्ती माघारा फिरला, तर तो पराजय किंवा मोड झाल्याची खूण समजली जाई. सर्व सैनिकांचे लक्ष त्या निशाणाकडे असें. यामुळेंच हत्तीच्या पायांत अंदू घालण्याची पद्धत पडली. अंदू घातले म्हणजे मग हत्तीला जागचें हालतां येत नसे. बाकी हत्ती हा स्वतःच अत्यंत बुद्धिमान प्राणी असतो व त्याला एकदा हुकूम झाला म्हणजे तो एकनिष्ठेनें बजावतो. आपल्या जवळ निशाण आहे तोंपर्यंत मागें फिरावयाचें नाहीं हें त्याला ठाऊक असतें. येथील युद्धप्रसंगांत तो त्याच न्यायानें वागला. त्याच्या वरून निशाण उतरून घेतलें तेव्हांच तो माघारी फिरला.

पृष्ठ ११५ **यांचा बेलभंडार त्यांची उदी** :– होळकरांनीं बेलभंडार उचलून व शिंद्यांनीं उदी उचलून शपथ प्रमाण केले. महादजी शिंद्यांचा गुरु किंवा अराध्य दैवत एक मुसलमान साधु होता. सबब शिंद्यांनीं उदी उचलून शपथ खावी हें सरळच.

पृष्ठ ११५ **सवाई मल्हारराव होळकराचें बंड** :– सन १७९१. पहा ऐतिहासिक लेखसंग्रह पृष्ठ ४४८७ व ४४८९ "तुकोजी होळकर यांचे पुत्र मल्हारराव बापाशीं भांडून हिंदुस्थानांतून दक्षिण देशीं आले. त्यांबरोबर पांच हजार फौज व पांच तोफा असें सामान होतें. त्यांनीं इकडे आल्यावर नबाबाच्या मुलखांत धामधूम केली व पेशवाई पैकीं कांहीं गांव लुटले." "चिरंजीवास समजून सांगावें. न ऐकत तर कैद करावें." अशीं तुकोजी होळकरांचीं नानांस पत्रें आलीं. त्यावरून मल्हारराव यास आणण्याकरितां नानांनीं बहिरोपंत मेहेंदळे यांस दहा पागा बरोबर देऊन पाठविलें. त्यांनीं जाऊन मल्हाररावाची समजूत करून त्यास पुण्यापासून सतरा अठरा कोसांवर आणिलें. तेथें ते बिथरून बहिरोपंतांशीं कलागत करून वाफगांवास गेले. बहिरोपंतांनीं जाऊन वाफगांवास वेढा घातला. तेव्हां मल्हाररावांनीं बाहेर पडून त्यांशीं लढाई केली आणि त्यांस मोडून त्यांचा नगारा व निशाण हिसकून घेऊन त्यास तीन कोसपर्यंत पिटून घातलें. त्यांनीं चाचेस जाऊन नानांस तें वर्तमान लिहिलें. मग नानांनीं बजाबा शिरवळकर यांजबरोबर स्वतःचें पथक व रंगराव त्रिंबक राजेबहाद्दर यांजबरोबर हजार दीड हजार स्वार व चार तोफा असें आणखी सामान मल्हाररावांस धरून आणण्याकरितां पाठविलें. महिना दोन

महिने राजेबहादूर यांनीं मेहनत केल्यावर मल्हारराव आपले फौजेस निरोप देऊन शें-पन्नास स्वारांनिशीं राजेबहादूर यांस भेटले व त्यांबरोबरच पुण्यास आले.

ज्या दिवशीं श्रीमंत डेरेदाखल झाले त्याच दिवशीं रंगराव राजेबहादूर मल्हारराव होळकरांस घेऊन वाफगांवाहून पुण्यास आले. होळकरांच्या श्रीमंतांच्या भेटी झाल्यावर श्रीमंतांनीं राजेबहादूर यांच्या रखवालीखालीं नदीपलीकडे तंबू देऊन होळकरांनीं रहावें असा हुकूम केला. त्याप्रमाणें पांच सहा महिनेपर्यंत होळकर स्वस्थपणें राहिले. ''

पृष्ठ ११६ **पन्नास स्वारांनिशीं कुदून पडून फौजा हात बेहत्तर केल्या :–** पुंडलीक कातगडेकृत हिंदी–मराठी कोशांत 'इहाता' असा शब्द आहे. त्याचा अर्थ घेरा, मर्यादा किंवा हद्द असा तेथें दिला आहे. त्यावरून मूळ पाठ "फौज इहाता तारबतार केल्या" असा असण्याचा संभव आहे. "पन्नास पन्नास स्वारानिशीं तटून पडून श्रीमंत व मोंगलाच्या फौजा पळवून सीमेपार उधळून लावल्या" असा अर्थ वरील पाठ स्वीकारल्यास बसूं शकेल.

पृष्ठ ११६ **त्यांचा कंपू :–** शिंद्याचा कंपू. डिबॉइनच्या हाताखालीं तयार करण्यांत आलेला.

पृष्ठ ११७ **फारबस :–** मूळ शब्द काय असावा कळत नाहीं. 'सरमस्त' असा पर्शियन शब्द आहे त्याचा अर्थ Intoxicated असा आहे.

पृष्ठ ११७ **मल्हारराव फरबस होऊन :–** थोरला मल्हारराव, त्याचा पुत्र खंडेराव तुकोजी, बापू, मल्हारराव सारे दारूबाज होते. "सरदार व कारभारी सदरहू आहेत त्यांचीं करणीं चाललीं आहेत. इतकें करून मसलत पुढें कोणती करणार? तर गुजराथची मसलत नाहींशी जाली! हे सरकार चाकरीपासून कृतार्थ व पाटिलबावांकडील हा अर्थ गुजरल्यानें भय मनांतील जाऊन, हिंदुस्थानचे अधिकारी जालों याजवर कृतार्थता मानून, मद्यादिक महापानाचा योग! शपथा केल्या ते दिवशीं श्रीमंताचे पाय व कैलासवासी सुभेदार यांचे पाय व बाईचे पायाच्या शपथा वाहिल्या काय? प्रांतांतील व लष्करांतील दुकानें मोडविलीं, सरकारचे जासूद, हुजरे व त्यांनीं आपले जासूदसमागमें देऊन मोडविलीं, व ताकीद आजपर्यंत चालली असतां, पुन्हा प्रसिद्ध वर्तणूक व दुकानें यांसी परवानगी राजरोष चालली! आम्ही स्वामींचें पत्र माझें नांवें आलें त्यांत अनाचाराचा बंदोबस्त केला, हें फार चांगलें जालें म्हणून लिहिलें होतें, त्याजवरून सांगितलें कीं, "आपण बंदोबस्त केला, तेणेंकडून श्रीमंतास व श्रीमंत राजश्री नाना, तात्यास संतोष जाला; व पुढें या पापापासून निवृत्त जाल्यानें कल्याणाची उमेद जाली, कीं सरदारांची क्रिया चांगली जाली, कल्याण होईल, व दिल्ली आगरे जेथपर्यंत तुमचा लौकिक आहे तेथपर्यंत तुमचा सद्‌लौकिक जाला. तेथपर्यंत बातम्या आपल्या अखबारींत गेल्या. असें असून पुन्हा लष्करांत दुकानें प्रसिद्ध बसलीं, तेव्हां ताकीद असावी." याचें उत्तर केलें कीं, "महापाना वेगळें माणूस वांचणार नाहीं. यास्तव नर्मदा उत्तरतीरीं सुटत नाहीं." तेव्हां उत्तर केलें कीं, "सुभेदार, तुम्ही शपथा पुत्रांसहित कोण कोणाच्या वाहिल्या, आणि त्याचें उत्तर

हें खासें ! सरदार व हे निवाळे तेव्हां न कूच (?) गोष्टीवर क्रिया तुमची ठीक न राहिली ! तेव्हां तुमची शपथ किंवा क्रिया मोठें कामांत राजकारणांत कशी पथ्य पडेल ? व खातरजमेवर कसें राहतील ? बाह्य इतका लौकिक तरी कशास्तव केला ? तर फजीती करून घेऊं नका. राज्यांत मनाई त्या चालीनें तुम्ही चाला. नाहीं तर दाखल्यास तुम्हांस लोक बोलतील, हें करणें उचित नाहीं." परंतु मदांधता अविवेकामुळें शपथा केल्या, त्यावर लक्ष राहिलें नाहीं ! कारकून कारभारी बाईसुद्धां फजीत करीतच आहेत. चालीस अंतर तिळप्राय नाहीं ! सरदारीची अब्रू नाहीं ! जवळचा पैसा खर्चिणें नाहीं ! दाभाड्याचे घरचा कारभार ऐकत होतों, ती दशा सांप्रत सर्व प्रकारें येथें प्राप्त जाली आहे. त्यांत दाभाडयाचे घरीं मद्य नव्हतें, वरकड विषय होते. येथें मद्य व अविचार, रयत लुटणें, मल्हारजी वगैरे केवळ लुच्च तऱ्हा ! जेथें मुक्काम जाला, तेथें अविचार लिहितां विस्तार !!"

[होळकर दरबारांतली हिंगण्यांची वकिली. लेखांक ८ वा पृष्ठ १८ व १९.]

पृष्ठ १२० **मुक्ताबाई फणसे**:-- अहिल्याबाईंची कन्या यशवंतराव फणसे यांस दिली होती.

पृष्ठ १२१ परिच्छेद ७५ " सुभेदाराचें शरीर अर्धें वायूनें गेलें आहे. तशीच तजवीज व कायम मिजाजी व मसलतीचा अर्थ जाला आहे ! व जेष्ठ चिरंजीव काशीराव त्यांचा एक हात पाय वायूनें कमी जन्मतांच आहे, व तद्वतच बुध्य, मसलत, कायम मिजाजी आहे !! कनिष्ठ चिरंजीव मल्हारराव त्यांची अवस्था सर्व स्वामीस विदित. जघन्यच आहे, तेंच आहे. बापूजी होळकर पुतण्या आहे, तो मात्र स्वारी शिकारी चाकरीच्या उपयोग।. त्याचे ठिकाणीं यांसी द्रोहबुद्धि विशेष याजला जाली आहे कीं, माझे पुत्र मागें पडतील. यास्तव पुत्रांस रूढीस घालावें. पुत्र जेष्ठ रूढीस घालावें, तर कनिष्ठ मल्हारराव म्हणतात कीं त्यास जिवें मारीन !! जेष्ठ पुत्र म्हणतात कीं, मी जेष्ठ, टिक्याचा धनी. मजला रूढीस न घातल्यास गोसावी होऊन छत्रीपाशीं बसेन. हें जेष्ठाचें भाषण ! मुख्यास पुत्रमोह विशेष जाला ! व्यसनासक्ति सर्वांस. मादक वस्तूचा संग्रह ! तेव्हां सर्वांस जमा करून आम्हीं सांगितलें कीं, यानें बहुतांचे नाश जाले. आपण संग्रह करितां, हें ठीक नव्हे. समय काय गुजरला आहे, व अभिमानरहित होऊन तोच उद्योग चालणें उचित नाहीं. आपलें रूबरू कोणी बोलत नाहीं, परंतु जग विरुद्ध जालें आहे. सुभेदार कैलासवासीचे पुण्याचे पुंज बहुत होत, त्याचा खर्च होत होत आपणहि तेंच पुण्य खर्चितां ! पापोत्कर्ष विशेष जाहला. पुण्यसंग्रह सरत आला. तुम्ही सरदार थोर, केवढे तुमचे मान, थोरपणा, त्यास हा बट्टा आहे. म्हणून पुत्रसहित जमा करून बोलणें झालें. त्यावरून पुत्रांकडून आपण श्रीमंतांचे पायांची व बाईचे पायांची व श्रीमार्तंडजीचे पायांची शपथ करून, दरोबस्त लष्करचीं दुकानें उठवून, प्रांतांत दरोबस्त मनाई राज्यांतील शिरस्तेप्रमाणें चिठ्ठी वेगळी विक्री होऊं नये याप्रमाणें ताकीद निक्षून जाली.

[होळकरदरबारांतील हिंगण्यांची वकिली लेखांक २ रा. पृष्ठ ७.]

पृष्ठ १२२ **"दौलतीचें ओझें कोणाचे माथा द्यावें? दोन पोरें दोन प्रकारचीं" :—**

"राजश्री काशीराव होळकर यास वस्त्रें द्यावीं हा पहिला बेत होता, परंतु हल्लीं मल्हारराव बिघडून आहे. त्याचें बोलणें परस्परें व सांगूनहि पाठवणें कीं, काशीराव यास वस्त्रें कशीं देतां ? माझी वाट काय ? माझा मजला हिस्सा द्यावा, पुढें कर्तव्य तें करावें, असें न करितां, एखादी गोष्ट केली तर, मी एखादा अनर्थ करून उठून जाईन. या प्रकारचीं भाषणें ऐकून तूर्त वस्त्रें देणें राहिलें. पुढें घडेल तें खरें !!

[महेश्वरदरबारचीं बातमीपत्रें लेखांक २५० पृष्ठ २२३.]

पृष्ठ १२५ **विठोबा :**— हाच विठोजी होळकर ज्यास पुढें बाळोजी कुंजराच्या सल्ल्यानुसार दुसऱ्या बाजीरावानें हत्तीच्या पायी देऊन ठार मारले. विठोजी हा यशवंतराव होळकराचा सख्खा भाऊ.

पृष्ठ १२५ **प्रति बाबासाहेबास (?) सहजात उचलून घ्यावे असा प्रसंगः**— 'बाळासाहेब' या ऐवजीं 'बाबासाहेब' असें चुकीचें वाचन झालेलें दिसतें. काशीरावाला बाळासाहेब म्हणत असत.

पृष्ठ १३४ **"त्यांत पवारांची जमियत स्वारपायदळ हजार बाराशें. एक तोफ रंगराव वोढेकर यांचे बरोबर. तीन हजार पेंढारी" :**— हें वाक्य पुढील प्रमाणें दुरुस्ती करून वाचले पाहिजे. "त्यांत पवारांची जमियत स्वार पायदळ हजार बाराशें (व) एक तोफ. रंगराव वोढेकर यांचेबरोबर तीन हजार स्वार पेंढारी."

पृष्ठ १३५ **पेंढारीः**— शिंदेशाही व होळकरशाही पेंढारी असें पेंढाऱ्यांत भेद असत. यशवंतराव होळकरानें कैद करून ठेवलेला करीमखान पेंढारी हा बुढणखान पेंढाऱ्याचा मुलगा. बुढणजवळ साठ पेंढारी जमात असे. तो महादजी शिंद्याचा राणाखानभाई याच्या पदरी होता. पानपतच्या लढाईतहि तो होता.

बाप वारला तेव्हां करीमखान पांच वर्षांचा होता. तो चौदा वर्षांचा झाला तेव्हां त्याच्या जवळची पेंढारी जमात हजार घोड्यांची झाली. व तो होळकराच्या पदरी राहिला. होळकराजवळ त्यानें तेरा वर्षें चाकरी केली. नंतर तो शिंद्याकडे गेला. तेथें त्याचें माहात्म्य फारच वाढलें. त्याच्याकडे पांच महाल होते. पुढें इंग्रज व शिंदे यांच्या युद्धकाळांत त्यानें शहाजानपूर, सारंगपूर इत्यादि आणिकहि जागा बळकाविल्या. १८०७ सालीं दौलतराव शिंद्यानें त्यास कैद केले. कांहीं दिवसांनीं त्यास मुक्त करण्यांत आलें. व शिंद्यांनीं त्यास गढाकोटा मुलूख आणि दुर्जनसालाचा बहादूरगड बहाल केले. पुढ एका लढाईत करीमखानाचा पराभव झाला. त्या लढाईत करीमखानाचा पुतण्या हा खुशाल कुंवर आणि मोती कुंवर याजबरोबर निसटून गेला.

पुढें त्या तिघांनीं भोपाळनजीक आसरा धरला. उपर्युक्त नामदारखानाच्या बापाचें नांव हबीबुल्ला ऊर्फ हिरू पेंढारी असे आहे. १८१२ सालीं त्याला ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत

कैद करून ठेवण्यांत आले होते. हिरूचा बाप इब्राहीम पेंढारी आणि करीमचा बाप बुढण पेंढारी हे सख्खे भाऊ.

हिरूखान पेंढारी असईच्या लढाईनंतर लवकरच वारला. त्याला तीन मुलगे होते. त्यापैकीं ज्येष्ठ दोस्त महमद हा त्यांच्या पेंढारी पथकाचा नायक बनला. १८१२ सालीं दोस्त महमदाजवळ १० हजार शिलेदार २–३ तोफा व कांहीं पायदळ होतें.

होळकरशाही पेंढारी :- १८०२ सालीं यशवंतराव होळकराजवळ गनीखान नांवाचा पेंढारी जमातदार होता. तो पुण्यावरील लढाईत ठार झाला. त्याचा मुलगा इमामबक्ष हा नंतर होळकराच्या सैन्यांतील मुख्य बनला.

हे सर्व पेंढारी मूळ दोघा अफगाण भावांची अवलाद होत. युसुफभाई अफगाण जमातींतील महमदखान आणि समतखान असे दोघे यांचे पूर्वज किंवा मूळ पुरुष होत. प्रथम काल्पीजवळ असतां थोरल्या बाजीराव पेशव्यांनीं त्यांना आपल्या नोकरींत घेतले. त्यावेळीं ते रोहिलखंडांत रहात असत. फक्त ५० अफगाण शिपायांचें पथक त्यांजवळ त्यावेळीं होतें. पेंढाऱ्यांच्या जमातींना 'दरा' अशी एक संज्ञा आहे."

[Poona Residency Correspondence Volume 14 लेखांक १३४.]

पृष्ठ १३९ **मावशीबाई** :— हरकूबाईलाच मावशीबाई म्हणत असत. (महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें पृ. ६१) ही थोरल्या मल्हारराव होळकराची उप स्त्री.

पृष्ठ १३९ परिच्छेद ८७ **जावडाचावडी** :— 'नावडातावडी' पाहिजे. या नांवाचा गांव महेश्वराजवळ आहे.

पृष्ठ १४० **समेरूढचा घाट** : — शिमरोळ गांवानजीकचा घाट. त्यावरून त्याला समेरूढचा घाट किंवा शमरूढचा घाट म्हणण्याची पद्धत पडली. शिमरोळ गांव महू परगण्यांत असून तेथें एक कजळीगड नांवाचा किल्लाहि आहे.

पृष्ठ १४२ **मग देशीहून लाडाबाईचें वर्तमान आलें** :— लाडाबाईच्या मृत्यूचें वर्तमान. लाडाबाई ही यशवंतराव होळकराची एक पत्नी.

पृष्ठ १४२ परिच्छेद ८९ व ९० **शिंदे बायांशीं यशवंतराव होळकराचा समेट व नंतर लगेच शिंदे बायांच्या सैन्यावर छापा** :— या संबंधांत जिवबादादा बक्षी चरित्रांतील पत्रांत तपशीलवार माहिती आहे. " (बायांशीं) समेटाविशीं वानवडीहून रा० तात्या पागनीस व आबा चिटणीस व बाबूराव आंग्रे व कंपूवाले फिरंगी असे पुसेशावळीचे मुकामीं आले होते. बोलणें झाले. ठराव म्हणाल तर (दौलतराव शिंद्यानें) श्रीमंत बायास अशेरचा किल्ला द्यावा आण आकरा लक्षांची जहागीर बऱ्हाणपूर व सरकार हांडा व जहानाबाद असे व अणखी अकरा लक्षांचे महाल द्यावे. आणि बायांची खासगी वस्तभाव व जवाहीर वगैरे जें आहे तें द्यावे. रावजीनीं (नारायणराव बक्षी यांनीं) वानवडीस पहिले प्रमाणें कामकाज करावें. आणि भाऊनीं (बाळाभाऊ बक्षी यांनीं) बरोबर असावे. ××× या प्रमाणें ठराव झाल्यावर बाया व त्यांचे कारभारी बाळाभाऊ हिंदु-

स्थानांत जहागिरीचे ठिकाणीं जाणयास निघाले. रस्त्यांत उज्जनीचे सुमारें पोचतात तों "मातोश्रींचा (बायांचा) मुक्काम आणि यशवंतराव होळकराचा मुक्काम जवळ होता. लष्करास लष्कर लागूनच होतें. दगा करील हें कोणास ठाऊक ! पश्चातेस छापा घालून चीजवस्त झाडूनसारी लुटली. यशवंत बाबूराव व धनबादादा व आनंदराव मळगांवकर व सखोबादादा, व साबाजी नारायण यांची बहुत खराबी झाली. परंतु जिवानिशीं आले. त्या गडबडींत एक लखबा बागळा यास तोफेचा गोळा लागून काळ झाला."

[जिवबादादा बक्षी चरित्र पृष्ठ २४६.]

"इकडील वर्तमान तर आपलें लष्कर उज्जनीवर मुक्काम करून होतें. त्यास यशवंतराव होळकर याचा व आपला एकोपा जाहला होता. आण लष्कर त्याचे आपले संनिध उतरले होतें. त्यांणीं विश्वास दाखवून एकाकी लष्करावर कार्तिक शु॥ १५ चे दिवशीं छापा घालून लष्कर लुटून घेतलें. ते दिवशीं लखबा बागळा यास तोफेचा गोळा लागोन ठार जाहला. ×× एक एक घोडेनशी हजार दोन हजार जमेतिनशीं मातोश्री बाई साहेबास घेऊन ते दिवशीं वीस कोस आलों." [बाळकृष्ण विठ्ठल यांचें पत्र १४-१२-१७९९ चें जिवबादादा बक्षी चरित्र. लेखांक २९९ पृष्ठ ५३२.]

पृष्ठ १४४ **झाडींत असल्यास लागून होते :—** याचा अर्थ लागत नाहीं. मूळ पाठ काय असावा तें उमगत नाहीं.

पृष्ठ १५१ **काशीराव होळकर यांजकडील सरमजाम महेश्वरीं होता त्याच्या मुकाबल्यास :—** होता या शब्दापुढें पूर्णविराम समजावा. पुढील त्याच्या या शब्दाचा संबंध गोपाळराव चिटणिसाकडे आहे.

पृष्ठ १५१ **रखमाबाई :—** ही पहिल्या तुकोजीराव होळकराची दुसरी स्त्री होय. हिचाच मुलगा सवाई मल्हारराव. ती फार रूपवती होती. ती १७९२ च्या सुमारास वारली. तिचा स्वभाव अत्यंत जहाल असल्यामुळें तुकोजीनें आपली तिन्ही मुलें म्हणजे काशीराव, यशवंतराव आणि विठोजी यांना पांडुरंग शंकर नांवाच्या एका ब्राह्मणाच्या देखरेखेखालीं कायमचास दूर ठेविले होतें. रखमाबाईचें व अहिल्याबाईचें बिलकूल पटत नसे. रखमाबाईची छत्री इंदुरास हरसिद्धी मंदिराचे ईशान्यबाजूस नदीस लागून आहे. [माळव साहित्य इंदूर विशेष अंक वर्ष ५ अंक १ पृष्ठ ३५] रखमाबाई ही सुलतानपूर येथें राहात असे.

पृष्ठ १५२ बदखलींत – मूळ शब्द ' बदखल ' हिंदी आहे. त्याचा अर्थ H. A. depressed or low spot, a bottom, basin, hollow (मोल्स).

पृष्ठ १५२ हरनाथ :– हा होळकराचा लेकवळा होता. अर्थात त्याची गणना ' कुंवर ' मंडळींत होत होती. यशवंतराव होळकराचा त्याच्यावर फार विश्वास असे.

पृष्ठ १५३ भारमल :– बखरींत येणारे भारमल व हरनाथ हे होळकरांचे लेकवळे. " लेकवळे मंडळींस दरमहा असून त्यांस कागदोपत्रीं ' चिरंजीव ' असें लिहिण्याची पद्धत आहे. जेव्हां जेव्हां यशवंतराव महाराजांनीं हरनाथसिंग यांस पत्रें लिहिलीं आहेत तेव्हां त्यांनीं त्यास ' चिरंजीव हरनाथसिंग ' असें लिहिलें आहे. या लोकांची इंदूर येथें ' कुंवर आळी ' म्हणून एक आळी माणिक चौकांत प्रसिद्ध आहे. या कुंवर मंडळींत पुष्कळ पुरुष मुत्सद्दी, शूर, कर्तबगार असे होऊन गेले आहेत. या कुंवर जातींत एकाच जातीचे लोक म्हणजे मराठे, धनगरच आहेत असें नाहीं तर त्यांत रजपूत, मुसलमान वगैरे जातीचेहि लोक असत. हरनाथसिंग या नांवावरून तो रजपूत असावा असें वाटतें. सर्व कुंवर मंडळी ' होळकर ' हेंच आपलें आडनांव बहुत करून लावतात. भारमलदादा हेहि हरनाथाप्रमाणेंच लेकवळे (कुंवर,) होते. हे मोठे मुत्सद्दी होते. महेश्वर संस्थानचा कारभार ते पहात असत. "

[भवानी शंकर यांची रोजनिशी पृष्ठ २०.]

दक्षणेंत लेकवळ्यांना ' शिंदे ' ही संज्ञा होती. हे लेकवळे आपापल्या आईचें आडनांव लावीत. पुण्यांत शिंदे आळी म्हणून आहे ती प्रसिद्धच आहे.

पृष्ठ १६१ अंतुरचा घाट – सध्यां हा घाट आवऱ्याचा घाट या नांवानें ओळखला जातो.

पृष्ठ १६१ मी यांचा वेगळा कसा होऊं ? – मी यांच्यापासून वेगळा म्हणजे दूर कसा होऊं, असें त्यांस झालें. यांच्याजवळ राहिलो तर हे केव्हां अब्रू घेतील याचा नेम नाहीं अशी भीति त्यास उत्पन्न झाली.

पृष्ठ १६१ हिंगलाजगड – भानपुरापासून १४ मैलांवर आहे. हा पूर्वी जयपूरकरांच्या ताब्यांत होता. पुढें होळकरांनीं जिंकला. किल्ल्यावर हिंगलाज नांवाची देवी असून रजपूत लोक विशेष करून तिचे भक्त असतात.

पृष्ठ १६१ रामपुरा – हें रामपुरा परगण्याचें मुख्य ठिकाण. पूर्वी हें उदयपूरच्या

त्यानंतर जहागिरीचे ठिकाणीं जाण्यास निघाले. रस्त्यांत उज्जनीचे सुमारें पोचतात तों "मातोश्रींचा (बायांचा) मुक्काम आणि यशवंतराव होळकराचा मुक्काम जवळ होता. लष्करास लष्कर लागूनच होतें. दगा करील हें कोणास ठाऊक ! पहाटेस छापा घालून चीजवस्त झाडूनसारी लुटली. यशवंत बाबूराव व धनबादादा व आनंदराव मळगांवकर व सखोबादादा, व साबाजी नारायण यांची बहुत खराबी झाली. परंतु जिवानिशीं आले. त्या गडबडींत एक लखबा वागळा यास तोफेचा गोळा लागून काळ झाला."

[जिवबादादा बक्षी चरित्र पृष्ठ २४६.]

"इकडील वर्तमान तर आपलें लष्कर उज्जनीवर मुक्काम करून होतें. त्यास यशवंतराव होळकर याचा व आपला एकोपा जाहला होता. आण लष्कर त्याचे आपले संनिध उतरले होतें. त्यांणीं विश्वास दाखवून एकाकी लष्करावर कार्तिक शु॥ १५ चे दिवशीं छापा घालून लष्कर लुटून घेतलें. ते दिवशीं लखबा वागळा यास तोफेचा गोळा लागोन ठार जाहला. ×× एक एक घोडेनशी हजार दोन हजार जमेतिनशीं मातोश्री बाई साहेबास घेऊन ते दिवशीं वीस कोस आलों." [बाळकृष्ण विठ्ठल यांचें पत्र १४-१२-१७९९ चें जिवबादादा बक्षी चरित्र. लेखांक २९९ पृष्ठ ५३२.]

पृष्ठ १४४ **झाडींत असल्यास लागून होते :—** याचा अर्थ लागत नाहीं. मूळ पाठ काय असावा तें उमगत नाहीं.

पृष्ठ १५१ **काशीराव होळकर यांजकडील सरमजाम महेश्वरीं होता त्याच्या मुकाबल्यास :—** होता या शब्दापुढें पूर्णविराम समजावा. पुढील त्याच्या या शब्दाचा संबंध गोपाळराव चिटणिसाकडे आहे.

पृष्ठ १५१ **रखमाबाई :—** ही पहिल्या तुकोजीराव होळकराची दुसरी स्त्री होय. हिचाच मुलगा सवाई मल्हारराव. ती फार रूपवती होती. ती १७९२ च्या सुमारास वारली. तिचा स्वभाव अत्यंत जलाल असल्यामुळें तुकोजीनें आपली तिन्ही मुलें म्हणजे काशीराव, यशवंतराव आणि विठोजी यांना पांडुरंग शंकर नांवाच्या एका ब्राह्मणाच्या देखरेखेखालीं कायमचास दूर ठेविले होतें. रखमाबाईचें व अहिल्याबाईचें बिलकूल पटत नसे. रखमाबाईची छत्री इंदुरास हरसिद्धी मंदिराचे ईशान्यबाजूस नदीस लागून आहे. [माळव साहित्य इंदूर विशेष अंक वर्ष ५ अंक १ पृष्ठ ३५] रखमाबाई ही सुलतानपूर येथें राहात असे.

×××

पृष्ठ १५२ बदखलींत – मूळ शब्द ' बदखल ' हिंदी आहे. त्याचा अर्थ H. A. depressed or low spot, a bottom, basin, hollow (मोल्स).

पृष्ठ १५२ हरनाथ :– हा होळकरांचा लेकवळा होता. अर्थात त्याची गणना ' कुंवर ' मंडळींत होत होती. यशवंतराव होळकराचा त्याच्यावर फार विश्वास असे.

पृष्ठ १५३ भारमल :– बखरींत येणारे भारमल व हरनाथ हे होळकरांचे लेकवळे. " लेकवळे मंडळींस दरमहा असून त्यांस कागदोपत्रीं ' चिरंजीव ' असें लिहिण्याची पद्धत आहे. जेव्हां जेव्हां यशवंतराव महाराजांनीं हरनाथसिंग यांस पत्रें लिहिलीं आहेत तेव्हां त्यांनीं त्यास ' चिरंजीव हरनाथसिंग ' असें लिहिलें आहे. या लोकांची इंदूर येथें ' कुंवर आळी ' म्हणून एक आळी माणिक चौकांत प्रसिद्ध आहे. या कुंवर मंडळींत पुष्कळ पुरुष मुत्सद्दी, शूर, कर्तबगार असे होऊन गेले आहेत. या कुंवर जातींत एकाच जातीचे लोक म्हणजे मराठे, धनगरच आहेत असें नाहीं तर त्यांत रजपूत, मुसलमान वगैरे जातीचेहि लोक असत. हरनाथसिंग या नांवावरून तो रजपूत असावा असें वाटतें. सर्व कुंवर मंडळी ' होळकर ' हेंच आपलें आडनांव बहुत करून लावतात. भारमलदादा हेहि हरनाथाप्रमाणेंच लेकवळे (कुंवर,) होते. हे मोठे मुत्सद्दी होते. महेश्वर संस्थानचा कारभार ते पहात असत. "

[भवानी शंकर यांची रोजनिशी पृष्ठ २०.]

दक्षणेंत लेकवळ्यांना ' शिंदे ' ही संज्ञा होती. हे लेकवळे आपापल्या आईचें आडनांव लावीत. पुण्यांत शिंदे आळी म्हणून आहे ती प्रसिद्धच आहे.

पृष्ठ १६१ अंतुरचा घाट – सध्यां हा घाट भावन्याचा घाट या नांवानें ओळखला जातो.

पृष्ठ १६१ मी यांचा वेगळा कसा होऊं ? – मी यांच्यापासून वेगळा म्हणजे दूर कसा होऊं, असें त्यांस झालें. यांच्याजवळ राहिलो तर हे केव्हां अब्रू घेतील याचा नेम नाहीं अशी भीति त्यास उत्पन्न झाली.

पृष्ठ १६१ हिंगलाजगड – भानपुरापासून १४ मैलांवर आहे. हा पूर्वी जयपूरकरांच्या ताब्यांत होता. पुढें होळकरांनीं जिंकला. किल्ल्यावर हिंगलाज नांवाची देवी असून रजपूत लोक विशेष करून तिचे भक्त असतात.

पृष्ठ १६१ रामपुरा – हें रामपुरा परगण्याचें मुख्य ठिकाण. पूर्वी हें उदयपूरच्या

ताब्यांत होतें. येथील चंद्रावतानीं मराठ्यांची सत्ता झुगारून देण्याचा अनेक वेळां प्रयत्न केला. परंतु तो निष्फळ झाला. शेवटीं थोडीशी जहागीर घेऊन त्यांना स्वस्थ बसावें लागलें. रामपुरा येथील तलवारी प्रसिद्ध आहेत.

पृष्ठ १६१ **गरोठ** – हें रामपुरा, भानपुरा जिल्ह्याचे सुभायतीचें ठिकाण होतें. तें पहिलें भिल्लांकडे होतें. त्यांजपासून चंद्रावतानीं जिंकून घेतलें. येथूनच ३ मैलांवर नागदा, मथुरा रेल्वेचें स्टेशन आहे.

पृष्ठ १६२ **प्रांत धुंडाड** – जयपूर ज्या भागांत आहे, त्या राजस्थानच्या भागाचें जुने नांव ' ढूँढाड ' असें आहे. या देशांतील डयौसाचें राज्य बडगुजरांच्यापासून जयपूरवंशांतील दुलेइ रायजी यानें जिंकून घेतलें.

पृष्ठ १६२ **खुशालगड** – यालाच कुशळगड किंवा कोसलगड म्हणतात. हें ठिकाण महू परगण्यांत विंध्याद्रींत आहे. तेथील किल्ला प्रसिद्ध असून त्याची उंची समुद्रसपाटी-पासून २६२१ फूट आहे.

पृष्ठ १६३ **तेथून सोहरभचे सुमारे हासगनावरून आले** – वास्तविक " तेथून सोरमचे सुमारे हासगजावरून आले. " असा मूळ पाठ असावा. हासगन हे ' हंसगज ' या शब्दाचें चुकीचें वाचन आहे.

पृष्ठ १६६ परिच्छेद १०७ **भरतपुरची लढाई** – ९।२।१७६७ च्या एका बातमी-पत्रांत भरतपूर किल्ल्याचें पुढीप्रलमाणें वर्णन केलेलें सांपडतें —

" भरतपुराची माहियत तरी शहरकोटा सभोंवतां चार गज खंदक असे. सभोंवतें रान, उतर अलंगेस दोन कोस झाडी व पूर्व अलंगेस दीड कोस झाडी असे व दक्षण अलंगेस येक कोस झाडी असे व पश्चिम अलंगेस कुंभेरीचे रस्त्याकडे पाव कोस झाडी, बाकी मैदान असे. शहराचे बुरुजावर तोफ मोठी येक व दोन लहान येकून तीन. तीन भांडीं दर बुरुजास असेत. मध्यें सफीलीवर रेहकले व जजाला व जंबुरे असे सामान शहरपन्त्यावर आहे. उपरी शहराचे पूर्व अलंग व उतर अलंगेचे कोनेयावर पका किला असे. त्याचा खंदक वीस गज रुंद असे. बुरुजावर मोठे भांडें येक व दोन लहान असी तीन तीन भांडीं भारी चांगली दर बुरुजास असेत. मध्यें सफीलीवर लहान भांडीं वगैरे जलेबी रेहकले भारी असेत. लहान भांडीं तर बहुत असेत. किले यास दोन द्वारें असेत. येक दक्षण अलंगेचें, त्यापुढें जिभी. चौबुरुजी मातबर असे. उतर द्वार येक असी दोन द्वारें असेत.

[ऐ. संकीर्ण साहित्य खं. ४. लेखांक नं. ६ पृष्ठ २६.]

पृष्ठ १६८ गराडा फिरवून देऊन :— येतांच यशवंतरावानें भेटीच्या बैठकीच्या डेऱ्याभोंवतीं आपल्या गार्डसचा पाहारा उभा केला. दगाबिगा होऊं नये यासाठीं ही तरतूद. गराडा म्हणजे गार्डस.

पृष्ठ १७१ तारिख बंद हिशास्ते टाकली:— 'तारीख बंदिस्व ते टाकली' असें मुळांत असेल ? बंदिस्त = n. a Settled stiperd or Salary. बंदिस्ती– Well ordered or well arranged state; Proper management or regular disposition. भावार्थ असा कीं यशवंतरावानें सैन्यांतील शिपायांचे दर तारखेस घ्यावयाचे हजेरी पट पाहण्याचे वगैरे कामें टाकलीं. सारांश सैन्य जय्यत ठेवण्याचें सोडून दिलें.

पृष्ठ १७१ ज्वालामुखी:— हें ठिकाण पंजाबांत कांग्रा व्हॅलीमध्यें आहे. तेथें उष्ण पाण्याचे झरे आहेत. त्यांतून गंधकाच्या ज्वाला किंवा भपकारे बाहेर पडत असतात. जवळच देवीचेंहि स्थान आहे. तिला 'ज्वालामुखी देवी' असेंच नांव आहे. कांगडा आणि मंडी संस्थानें सतलज आणि व्यासगंगा यांच्या दुआबांत आहेत. तेथील हिंदु देवालयें प्राचीन कालापासून प्रसिद्ध आहेत. कोटकांगड्याचा किल्ला १७७४ त शीख सरदार जयचंद यानें जिंकला. परंतु १७८५ सालीं संसारचंद्र यानें जिंकून घेतला. १८०५ च्या डिसेंबरांत यशवंतराव होळकराचे वकील संसारचंद्राला भेटले होते.

ज्वालामुखी देवीचें वर्णन कल्याण या हिंदी मासिकाच्या 'शक्ति' अंकांत प्रसिद्ध झालें होतें. 'एका उकळत्या पाण्याच्या कुंडांत पेटलेली ज्योत तेवत असते. पाण्याच्या लहरीमुळें ज्योत नाचलेली दिसते. हा चमत्कार पाहण्यास भाविक यात्रेकरूंची रीघ लागलेली असते.'

पृष्ठ १७२ आफलावून:— कदाचित् 'अफलातून' असा मूळ पाठ असेल. अफलातून म्हणजे बेफाम.

पृष्ठ १७२ बाराट फौज :— बरोट फौज असें पाहिजे. बरोट ही जयपुराकडील एक भाटांची जात आहे.

पृष्ठ १७३ हरमाड्याचे मुकामास आले. तेथें खंडेराव होळकर यांचे प्रकृतीस विकृत जहाली :— सन १२१६ माघ शुद्ध ७ देहावसान झालें. "यशवंतराव महाराज कोट्याहून रामपुरा, भानपुऱ्याकडेस येण्यास निघाले. रस्त्यांत शहापूर मुक्कामी महाराज यांचा पुतण्या खंडूजी हा हैजानें (पटकीनें) वारला. या योगानें महाराजास फार दुःख झाले."

[भवानी शंकर बक्षी रोजनिशी पृष्ठ १४४.]

खंडेराव होळकराला यशवंतरावानें मारविला असा एक प्रवाद रूढ आहे.

पृष्ठ १७५ भिमाबाई बुळे :— ही यशवंतराव होळकराची मुलगी. भिमाबाई ही गोविंदराव बुळे यांस दिली होती. या लग्नाच्या वेळीं यशवंतराव महाराज यांनीं त्यांस बुंदेलखंडांतील २ लक्ष उत्पन्नाचा ' कोंच परगणा ' आंदण दिला होता. तो बुळे घराण्याकडे स्वतंत्रपणें प्रथम व नंतर रोख रक्कम असा मिळून इ. स. १८४९ पर्यंत चालू होता. त्याचप्रमाणें त्यांनीं चांदवड परगाण्यापैकींहि त्यांस तीन गांवें आणखी इनाम दिलीं होतीं.

पृष्ठ १७५ सखाराम गोविंद निजबत नरतवेला. नरतबेला :— घोड्यांची पागा. या पागेंत घोडी मुळींच नसते. या घोड्यांच्या पागेचें काम सखाराम गोविंदाकडे होतें. ' कोतल नर कोतवाल घोडे मगनमस्त किलकरीत '– प्रभाकर शाहीराच्या एका लावणींत असा उल्लेख आहे.

पृष्ठ १७७ हाच मग :— ' हाच मार्ग ' असा मूळ पाठ असावा.

पृष्ठ १७९ एकलिंगजी :— हें सुप्रसिद्ध शिवमंदिर उदेपूर संस्थानांत आहे.

पृष्ठ १८० परिच्छेद ११८ त्याचे फौजेचा गाबावाबा हेरले बाहेर सुदरून काळ काढला :— इंदूरकर बळवंतराव कमळाकरांच्या पुरवणी टीपांत ' गाबागुबा ' असा पाठ सुचविण्यांत आला आहे. गाबागुबा याचा अर्थ किरकोळ खर्च. हा रांगडी शब्द आहे. तथापि ' हेरले बाहेर सुदरून ' या पुढील शब्दाचा अर्थ अनिर्णीतच राहतो. आमच्या मतें मूळ पाठ असा धरला म्हणजे बरोबर अर्थ लागतो. ' त्याचे फौजेचा गाबावा बाहेरले बाहेर सुदरून काळ काढला ' म्हणजे त्याच्या फौजेच्या पगारापैकीं कांहीं रक्कम वर खर्चास म्हणून त्या फौजेंतील लोकांस दिली. ही रक्कम रामदिनच्या सुभ्यांतील गांवावर रोखे करून परस्पर बाहेरल्या बाहेर उभी करण्यांत आली.

पृष्ठ १८१ जयद :— जय्यत. अर्थात् साहित्य सामानानिशी व अनुभविक, कजाखी कवायती शिपायानिशी जय्यत असलेली पलटण. मूळ पर्शियन शब्द ' जहद ' असा आहे. त्याचा अर्थ Tried, Experienced असा आहे.

पृष्ठ १८२ मैनाबाई :— ही तुळसाबाई हिची गुरुभगिनी. हिच्यामुळें इंदुरांत जुन्या वाड्याच्या दक्षिणेकडील बुरुजासमोरील श्रीकृष्णाचें मानभाव पंथाचें मंदिर स्थापन झालें. त्या पंथाचा प्रवेश या होळकरी राज्यांत हिच्यामुळेंच झाला.

पृष्ठ १८२ बोलापेशासारखा नमोद सिद्ध करून :—' बोलापेश ' ऐवजीं मुळांत ' बालायेशा ' असा पाठ असावा. बालायेशा याचा अर्थ पटवर्धन फारशी मराठी शब्दकोशांत उंचावणी, सर्फराजी, सन्मान, असा दिला आहे.

पृष्ठ १८२ भानपुरे मुक्कामीं यशवंतराव महाराजांचा काळ झाला :—

३१-१०-१८११ चें पत्र. " आज २७ ऑक्टोबर रोजीं यशवंतराव महाराज सकाळीं जागे झाले तेव्हांपासून त्यांची प्रकृति बिघडलेली होती. ताबडतोब तुळसाबाईकडे वर्दी गेली. तिनें अत्यवस्थ स्थिति पाहून सर्व कारभाऱ्यांस बोलावून आणलें. सकाळीं ९ वाजतां (१ प्रहर दिवस येतां) यशवंतरावाचें प्राणोत्क्रमण झालें. श्रावण अष्टमी. "

[Poona Residency Correspondence Volume No. 14 लेखांक ७६.]

पृष्ठ १८२ **परिच्छेद १२० पासून पुढें** - १८०९ नंतर यशवंतराव होळकराच्या दौलतीची जी कुतरोड झाली, व प्रकहलहानें व फितुरीनें जो नंगा नाच सुरू केला. त्यासंबंधीं समकालीन मराठी कागदपत्रांचा पुरावा उपलब्ध नाहीं. सुदैवानें रेसिडेन्सी दप्तरांतील पत्रव्यवहाराचे जे खंड अलीकडे प्रसिद्ध झाले आहे त्यांत मात्र ती हकीकत मिळते. बखरींतील हकीकतीला उपोद्बलक असे पुढील पत्रांतील उतारे पहा.

३०-९-१८०९ चें पत्र. यशवंतराव होळकर कूच करून निघण्याच्या बेतात आहे. बहुतेक सर्व होळकरी सैन्य गणपतरावाच्या ताब्यांत देण्यांत आल्याचें कळतें. हा गणपतराव पूर्वीं होळकराचा दिवाण होता. पूर्वीं यशवंतराव होळकरानें भलतीच जलाली केल्यामुळें जे सरदार किंवा मुत्सद्दी त्याला सोडून गेले होते त्यांतच हा गणपतराव होता. परंतु आतां ते पुन्हां सर्व समजूत होऊन परत यशवंतरावाकडे आले आहेत.

[Poona Residency Correspondence Volume No. 14 लेखांक ९.]

बाळाराम शेट :— ८-१२-१८११ चें पत्र. होळकराच्या लष्करांत शिपायांचा दंगा झाल्यामुळें यशवंतराव होळकराचा कबिला व अल्पवई बाळ राजा यांना घेऊन तुळसाबाई पळून रामपुऱ्याकडे गेली. दिवाण बाळाराम शेट हा मागें राहून बेदिल झालेल्या शिपायांना समजुतीच्या गोष्टी सांगून शांत करीत आहे. त्याचेकडून तुळसाबाईला जीं पत्रें येत आहेत त्यावरून कंपूचे लोक शांत होत आहेत असें दिसतें.

[Poona Residency Correspondence Volume No. 14 लेखांक ८४.]

२८ डिसेंबर १८१५ चें पत्र. होळकराच्या लष्कराची तलब चुकवून देण्यासाठीं बाळाराम शेट व तात्या आळतेकर फार धडपडत आहेत. परंतु मुदलातच नसलेला पैका ते कोठून उत्पन्न करूं शकणार ! बाया गंग्रेल येथें कोटेकराच्या सैन्याच्या संरक्षणाखालीं राहात आहेत. रामदीनच्या बेहड्यांतून नोकरी सोडून ३ हजार स्वार बाहेर पडले असून ते गांग्रेलला येत आहेत. त्यांना मारून परत घालवावें असें तुळसाबाई कोट्याच्या

सैन्याला सांगत आहे. परंतु आपणाला कोटेकर राण्याचा तसा हुकूम नाहीं असें ते सैनिक म्हणतात.

[Poona Residency Correspondence Volume No. 14 लेखांक २४७.]

९-२-१८१७ चें पत्र. मीरखानानें मल्हाररावाचा कबजा घेऊन तुळसाबाईला कारभारांतून अजिबात काढण्याचा कट केला आहे असा पक्का वहिम आहे. तथापि तीं दोघे वरकरणी एकमेकांविषयीं संशय बिलकूल दाखवीत नाहींत. बाळाराम शेट आणि मैनाबाई यांचे तुळसाबाईच्या प्रेरणेनें खून पाडण्यांत आले. (मैनाबाई ही मरहूम यशवंतराव होळकरांची एक बायको.) तसेंच बख्तर भाऊ (मैनाबाईचा भाऊ) हरी होळकर (यशवंतरावाचा पुतण्या) आणि महिपतराव चिटणीस यांचाहि तसाच निकाल लावण्यांत आला आहे.

[Poona Residency Correspondence Volume No. 14 लेखांक ३०२.]

८-४-१८१७ चें पत्र. मागच्या पत्रांत तुळसाबाईनें बाळाराम वगैरेंचे खून केल्याचें वृत्त लिहिलें होतें, परंतु तें खरें नाहीं. त्या लोकांना मारलें नाहीं, फक्त कैद करून ठेवण्यांत आलें आहे.

[Poona Residency Correspondence Volume No 14. लेखांक ३४८.]

मे १८१७ -- तुळसाबाईचें व गफूरखानाचें उघड वैर पडलें आहे. तुळसाबाईला कांहीं प्रमुख मराठा सरदारांचा पाठिंबा आहे. रामजी शिर्के आणि रामदीन यांना होळकराचा चालू कारभार पसंत नाहीं व ते होळकरास सोडून बाहेर पडून त्रिंबकजी डेंगळ्याला जाऊन मिळणार. रामदीन हा आपल्या बाराभाईसह लष्करांतून पळून गेल्याचें वृत्त आहे. (बिनकवायती घोडदळाला बाराभाई अशी संज्ञा होती.)

[Poona Residency Correspondence Volume No. 14 लेखांक ३१९.]

जून १८१७ -- अबाजीपंताचा काटा दूर झाल्यापासून गफूरखानाला कोणताच अटकाव राहिलेला नाहीं. तोच आतां होळकरशाहींत सर्वाधिकारी बनला असून तो आतां काय उत्पात करील सांगवत नाहीं. बहुधा तुळसाबाईचाहि खून करवील. तुळसाबाई-जवळ बळकट जमाव नाहीं. बहुतेक सैन्य गफूरखानाच्याच हुकमतीखालीं आलें आहे. आतां गफूरखान हा गादीचा धनी अल्पवई पोरगा आहे त्याला कबजांत घेण्याचा प्रयत्न करील; व कारभाऱ्यांना कैदेंत टाकील आणि त्यानंतर सारा कारभार मीरखानाच्या

हवाली करील. तुळसाबाईनें मीरखानामार्फत गफूरखानास निरोपहि पाठविला आहे
म्हणतात कीं, तुमचे कारस्थान मला सर्व कळत आहे. परंतु मल्हारराव होळकर किंवा
यशवंतरावाचा पुतण्या हरि होळकर यांपैकीं कोणीहि तुमच्या हातीं जिवंत लागतील ही
आशा सोडून द्या ! तुळसाबाईनें महेश्वरास पळून जाण्याचा प्रयत्न केला. परंतु गफूर-
खानाचें सैन्य आडवें आल्यामुळें ती उत्तरेकडे कोटा संस्थानांत आश्रयास गेली आहे.
परंतु कोट्याचा संस्थानिक तर मीरखानच्या मुठींतील. तुळसाबाईचें चारित्र्य निर्मळ
असतें तर दौलतींतील प्रमुख लोकांनीं तिचा पक्ष पोटतिडकीनें उचलला असता. परंतु
तिच्या अनाचारामुळें ते लोक तिच्यावर नाखूष होते.

[Poona Residency Correspondence Volume no. 14 लेखांक ३२१.]

६-११-१८१७ चें पत्र. मालकमसाहेबानें होळकराकडे पुढीलप्रमाणें अटी सांगून
पाठविल्या :- (१) शिंद्याप्रमाणेंच तुम्ही पेंढाऱ्यावर पाठविण्यासाठीं एक घोडेस्वारांची
फौज द्यावी. (२) त्याप्रमाणें एक किल्ला कंपनीस द्यावा. (३) आणि पेशव्यास
कसलीहि मदत देऊं नये. परंतु या अटी अमान्य होऊन शेवटीं इंग्रज होळकरांची
लढाईच झाली. लढाईच्या आधीं गफूरखानानें होळकराचा दिवाण गणपतराव आणि
तुळसाबाई यांना कैद करून हिंगलाजगडास रवाना केलें.

[Poona Residency correspondence Volume No.14 लेखांक ३४१.]

पृष्ठ १८२ सन १२२१ कार्तिक शुद्ध ११ - २८-१०-१८११. या बखरींत सर्व
सन ' फसली ' वापरले आहेत. तसेच ' शक ' शालीवाहन न वापरतां विक्रमसंवत्
वापरला आहे. नर्मदेच्या उत्तरेस विक्रम संवतच वापरतात.

फसली सन – " फसली सनास मृगासच आरंभ होतो. शहाजहान बादशहानें
दक्षणेंतील कांहीं मुसलमानी राज्यें जिंकून तोडरमल्लाच्या जमाबंदीची शिस्त सुरू केली,
तेव्हां त्याबरोबर उत्तर हिंदुस्थानांत अकबरानें सुरू केलेलें फसली सालहि दक्षिणेंत आलें,
व पुढें मराठ्यांनीं दक्षिणेंत अम्मल स्थापन केल्यावर आपल्या कागदोपत्रींहि याच सालाचा
फार उपयोग करूं लागले. एतद्देशीय संस्थानिक अद्यापहि फसली सालाप्रमाणेंच हिशेब
वगैरे करितात. हें साल सुरु सनाहून ९ वर्षांनीं पुढें असतें. फसली सालांत मृगापूर्वीं
५९१ व मृगानंतर ५९० वर्षें मिळविलीं म्हणजे इसवी सन निघतो. सुरू सन व फसली
सन या दोहोंचेहि मुसलमानी महिने व तारखा हिजरी सनाप्रमाणेंच असतात. "

विक्रम संवत् – " विक्रम् संवताचे व शालिवाहन शकाचे महिने व तिथि एकच
असतात. विक्रम संवतांत १३५ वजा केले म्हणजे शालिवाहन आणि ५७ वजा केले
म्हणजे इसवी सन येतात. "

पृष्ठ १८४ मासपक्ष फोडा भागून – ‘ फोडा भोगून ’ असें पाहिजे. फोडा म्हणजे अडचण.

पृष्ठ १८४ तुम्हास रोडगडावर ग्रह देऊन – “ तुम्हास म्हसरोडगडावर ग्रह देऊन ” असें पाहिजे. म्हसरोडगडची मातेसरी (मातोश्री) देवी प्रसिद्ध आहे.

पृष्ठ १८६ गंगरोडास बाया व महाराज किल्ले दाखल झाले – १८ डिसेंबर १८१५ चें पत्र. “ अल्पवई होळकरानें ताबुताच्या मिरवणुकींत नेहमींप्रमाणें भाग घेतला. परंतु नंतर होळकर कुटुंब गुप्तपणें पळून गेलें. नाहींतर स्वतःच्या सैन्याच्या कैदेंत पडण्याचा त्याला हरघडी धोका निर्माण झालेला आहे. होळकर कुटुंब आतां भानपुऱ्यापासून १ मजलीच्या अंतरावर असलेल्या गाग्रेळच्या किल्ल्यांत आश्रयास गेले आहे. दुसरे दिवशीं त्यांचे कारभारी दिवाण गणपतराव आणि बक्षी कृष्णोबा हेहि गाग्रेळास दाखल झाले. कृष्णोबा बक्षीची बायकामुलें मात्र शिलेदाराच्या तावडींत मागें अडकलीं आहेत. होळकर बायांनीं स्वतःच्या संरक्षणासाठीं जालीमसिंगाचीं दोन पलटणें जवळ बाळगलीं आहेत.

[Poona Residency Crrespondence Volume No 14 लेखांक २४६.]

पृष्ठ १९१ तारोळा – “ पु. दे. प्रवृत्त कार्यास कांहीं प्राप्त होतें जें प्रतिबंधक विघ्न तो तारोळा. ” अडचण, विघ्न [महाराष्ट्र भाषेचा कोश, परशरामपंत गोडबोले वगैरेंनीं रचलेला. सन १८२९.]

पृष्ठ १९३ मासाहेब – मल्हारराव (तिसरा) हा केसराबाई नांवाच्या राखेपासून झालेला यशवंतराव होळकराचा मुलगा. केसराबाई गरीब कुळांतली असताहि तिच्या सौंदर्यावर मोहित होऊन तिला यशवंतरावानें आपल्यापाशीं ठेवलें होतें. केसराबाईलाच कृष्णामासाहेब म्हणत असत. तिच्या नांवानें प्रसिद्ध असलेला केसरबाग व त्यांतील शिवमंदिर हीं स्थळें तेजपूर गांवाला चिकटून आहेत. केसराबाई १८४९ सालीं मृत्यु पावली.

[माळव साहित्य, इंदुर विशेषांक; दा. व. हाडेकरांचा लेख.]

पृष्ठ १९५ आधान सिद्ध करवून × × × पूर्वक सोम केला – गळलेला शब्द ‘ पशुवध ’ असावा. सोमयागांत पशू बळी द्यावा लागतो.

होळकरांची कैफियत

परिशिष्ट नं. २ – व्यक्तिसूचि

ज

ट

ठ

ड

त

ध

त्र

द

न

प

म

य

र

ल

व

श

स

ह
